विद्यार्थ्यांना ज्ञानार्थी बनविणारी ...
सवदीग्राफीज द मेगा सिरीज

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या

नवीन अभ्यासक्रम मान्यतेनुसार !

**PSI, STI, Asst. आणि संयुक्त चाळणी परीक्षांसाठी अतिशय दर्जेदार संदर्भ पुस्तक !**

# महाराष्ट्राचा भूगोल

नवीन अभ्यासक्रमानुसार
प्रथम आवृत्ती

'द मेगा स्टेट' कार

## ए. बी. सवदी

किंमत : ₹ १५०.००

निराली प्रकाशन

N1532

# 'महाराष्ट्राचा भूगोल' - ग्रंथाची ठळक वैशिष्ट्ये

- ओघवत्या परंतु वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीमध्ये सुलभ विवेचन.
- विविध स्पर्धा परीक्षार्थींना महाराष्ट्र भूगोलाचा सहजगत्या परिचय.
- नकाशे मोठ्या आकारात आणि अद्ययावत असल्याने अतिशय सुस्पष्ट व आनुषंगिक माहिती नकाशावाचनाद्वारा उपलब्ध.
- महाराष्ट्र भूगोलाच्या आढाव्यासाठी मोठ्या आकाराचे नकाशे.
- ग्रंथामध्ये शासकीय अधिकृत (महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९-१० आणि महाराष्ट्र संक्षिप्त सांख्यिकी, २००७ आणि भारतीय जनगणना - २०११) आकडेवारीचा समावेश. संकलन, विश्लेषण व संशोधनद्वारा अनुमान - एक प्रमुख वैशिष्ट्य.
- भूगोलाचे आलेखांद्वारा आकडेवारीच्या आधारे महाराष्ट्र दर्शन.
- आकडेवारी व निष्कर्षांची स्वतंत्र तक्त्यामध्ये मांडणी. त्या द्वारे परीक्षार्थींना अन्य अनुमाने काढता येणे सहज शक्य.
- संक्षिप्त स्वरूपात प्रत्येक प्रकरणाचा तक्त्याद्वारा सुलभ परिचय.
- इंटरनेट व वेबसाईटच्या आधारे अद्ययावत माहिती.
- विविध वर्तमानपत्रे व मासिकांच्या माहिती स्रोताच्या आधारे पुस्तकाला स्वतःचे आयाम.
- महाराष्ट्रासंबंधी सप्तरंगी नकाशा.
- महाराष्ट्राच्या प्रशासकीय विभागानुसार तालुकावार मोठा राजकीय रंगीत नकाशा.

◈◈◈



## महाराष्ट्राचा भूगोल

I. पोलीस उपनिरीक्षक परीक्षा (PSI) II. विक्रीकर निरीक्षक परीक्षा (STI)
III. सहायक परीक्षा (Asst.)
✻ मुख्य परीक्षा : नवीन अभ्यासक्रम

महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती : वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या (Population), स्थलांतरांची लोकसंख्या (Migration of Population) व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान.

**विविध परीक्षांसाठी महाराष्ट्र भूगोलाकरिता गुण : PSI (४० गुण) ; STI (३० गुण) ; Asst. (३० गुण)**

**खालील पदांसाठी घेण्यात येणाऱ्या संयुक्त चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम**

(१) प्रशासकीय अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (प्रशासन शाखा - लिपिक संवर्ग)
(२) सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथपाल, वितरण-अधिकारी आणि समन्वय अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट - ब
(३) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण-नि-उपशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (तांत्रिक)
(४) प्रबंधक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - ब (अतांत्रिक)
(५) प्रबंधक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षण सेवा, गट - ब
(६) वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (चालू रिक्त पदे)
(७) वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (अनुशेषाची पदे)
(८) वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (चालू रिक्त पदे)
(९) वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट - अ (शिक्षण प्रशिक्षण शाखा) (अनुशेषाची पदे)
(१०) तालुका क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट - ब
(११) जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट - अ
(१२) सहायक प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट - ब

**संयुक्त चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम वरीलप्रमाणे. (महाराष्ट्राचा भूगोल : ३० गुण)**
**(फक्त 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान' वगळून)**

■ ■ ■

# अनुक्रमणिका


**१. राजकीय आणि प्रशासकीय विभाग** १.१ - १.२०

राजकीय इतिहास — महाराष्ट्राचे भारतातील स्थान — महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग — महाराष्ट्राच्या काही भागांना लाभलेली वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक नावे — प्रशासकीय विभागांचे नकाशे.

**२. रचनात्मक (प्राकृतिक) भूगोल** २.१ - २.१३

**महाराष्ट्राचे मुख्य रचनात्मक (प्राकृतिक) विभाग :** (१) कोकण किनारपट्टी (२) सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट, सह्याद्रीच्या व सातपुडा पर्वताच्या डोंगररांगा (३) महाराष्ट्र पठार किंवा दख्खन पठारी प्रदेश किंवा देश.

**३. महाराष्ट्र : नदीप्रणाली** ३.१ - ३.१७

नद्यांच्या मार्गानुसार विभागणी — नद्यांच्या जलविभाजकांनुसार प्रदेशाची विभागणी.

**महाराष्ट्रातील नद्यांची खोरी :** (१) गोदावरी नदीचे खोरे (२) भीमा नदीचे खोरे (३) कृष्णा नदीचे खोरे (४) तापी नदीचे खोरे (५) नर्मदा नदीचे खोरे (६) कोकण नद्या किंवा कोकण खोरे.

**४. महाराष्ट्र : हवामान** ४.१ - ४.१८

महाराष्ट्रातील हवामानाचे स्वरूप.

**महाराष्ट्रातील ऋतू :**

(१) **उन्हाळा / उन्हाळ्यातील हवामानाची परिस्थिती :** तापमान — हवेचा दाब व वारे — पर्जन्य [मार्च ते मे (उन्हाळा) काळातील पर्जन्य] — सापेक्ष आर्द्रता.

(२) **पावसाळा / नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याच्या काळातील हवामानाची परिस्थिती :** भारतीय मान्सूनची संकल्पना — वातावरणशास्त्रामधील संज्ञा — मान्सूनचे स्वरूप — पर्जन्यामधील विभागवार बदल — सापेक्ष आर्द्रता — पावसाचे दिवस.

(३) हिवाळा – हिवाळ्यातील हवामानाची परिस्थिती किंवा ईशान्य मान्सून काळातील हवामानाची परिस्थिती : संक्रमणाचा महिना 'ऑक्टोबर' — हिवाळ्यामधील सर्वसाधारण तापमान — हिवाळ्यातील सरासरी किमान तापमान : डिसेंबर — हवेचा दाब व वारे — पर्जन्य — सापेक्ष आर्द्रता — हिवाळ्यातील हवेचे इतर आविष्कार.

**वार्षिक पर्जन्याचे वितरण.**

**५. वने** ५.१ - ५.१९

**महाराष्ट्रातील वनांचे प्रमुख प्रकार :**

(१) उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये

(२) उष्ण कटिबंधीय निमसदाहरित अरण्ये — कोकणातील अरण्ये — किनाऱ्यालगतची खाजण अरण्ये — पश्चिम घाट किंवा सह्याद्री पर्वतामधील अरण्ये.

(३) उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये

(४) उष्ण कटिबंधीय आर्द्र पानझडी अरण्ये किंवा उष्ण कटिबंधीय मान्सून अरण्ये

(५) उष्ण कटिबंधीय रूक्ष पानझडी अरण्ये

(६) उष्ण कटिबंधीय काटेरी अरण्ये.

अरण्यांचे इतर प्रकार.

**महाराष्ट्र वनविभागाद्वारा महाराष्ट्रातील वनांचे प्रकार :** वनविभागांची संरचना — महाराष्ट्रातील वनक्षेत्रे व त्यांची टक्केवारी.

**महाराष्ट्रातील वनांचे जिल्हावार स्वरूप :** महाराष्ट्रातील वनांचे जास्त व कमी क्षेत्र असणारे पाच जिल्हे.

**महाराष्ट्रातील वनांचे वर्गीकरण व त्याचे जिल्ह्यानुसार स्वरूप.**

महाराष्ट्रातील वन विभाग/वनवृत्त/वन विभागानुसार वनक्षेत्र.

महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये — वनजीव संपदा — व्याघ्र प्रकल्प — सामाजिक वनीकरण — वनशेती — वृक्षारोपण — वनसंरक्षण — वनसंवर्धन — अरण्यांचे महत्त्व.

**६. खनिजसंपत्ती** ६.१ - ६.१०

**महाराष्ट्रातील खनिजसंपत्ती :**

(१) मँगनीज (२) लोहखनिज (३) बॉक्साइट (४) क्रोमाईट
(५) चुनखडी (६) डोलोमाईट (७) कायनाईट व सिलिमनाईट (८) इतर खनिजे

**७. लोकसंख्या** ७.१ - ७.३८

**लोकसंख्याशास्त्रीय घटक :**

I. जन्म-मृत्यूचे प्रमाण
II. वयोगट
III. काम करणाऱ्या लोकांची विभागणी
IV. काम न करणाऱ्या लोकांची विभागणी
IV. भाषावार लोकसंख्या
VI. धार्मिक लोकसंख्या
VII. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे
VIII. राहणीमान
IX. ग्रामीण लोकसंख्या

X. नागरी लोकसंख्या : महाराष्ट्रातील नागरिकीकरणाचा १९०१ ते १९९१ पर्यंतचा संक्षिप्त आढावा — २००१ सालच्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्येची काही वैशिष्ट्ये — शहरांच्या वर्गवारीनुसार नागरी लोकसंख्येचे स्वरूप — महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येचे जिल्हावार वितरण - २००१ — महाराष्ट्रामध्ये नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीचे जिल्हावार वितरण - २००१ — महाराष्ट्रामधील शहर संकुले : जनगणना २००१. महाराष्ट्र : नगरपालिका

XI. अनुसूचित जाती-जमाती :
महाराष्ट्रामधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची लोकसंख्या.
अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या एकत्रित लोकसंख्येची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी टक्केवारी - २००१.
महाराष्ट्र : लोकसंख्याशास्त्रीय घटक - २००१

**८. महाराष्ट्र : जनगणना २०११** ८.१ - ८.३९

I. महाराष्ट्राची लोकसंख्या : २०११
II. लोकसंख्येची दशवार्षिक वाढ : २००१ - २०११
III. लोकसंख्येची घनता : २०११
IV. लिंग-गुणोत्तर : २०११
V. बालिका-बालकांची संख्या : २०११
VI. बालिका - बालकांचे लिंग-गुणोत्तर : २०११
VII. साक्षरता : २०११
VIII. ग्रामीण - नागरी लोकसंख्या : २०११

## ९. स्थलांतर ९.१ - ९.१४

(अ) महाराष्ट्रात स्थलांतराचे स्थूल स्वरूप

(ब) महाराष्ट्रात ग्रामीण आणि नागरी भागांमधून स्थलांतराच्या कारणानुसार स्थलांतरितांचे स्वरूप - २००१.

बुद्धिवंतांचे स्थलांतर.

## १०. ग्रामीण वसाहती व तांडे १०.१ - १०.१६

**महाराष्ट्रातील मानवी वसाहती :** मानवी वसाहत - उदय व विकास — आजचा महाराष्ट्र — महाराष्ट्रातील ग्रामनामे व नगरनामे.

**ग्रामीण वसाहती :** घरांचे प्रकार — ग्रामीण वसाहतीचे प्रकार — ग्रामीण वसाहतीची प्ररूपे — ग्रामीण वसाहतीची कार्ये.

**तांडे :** ग्रामीण गृहनिर्माणाच्या शासकीय योजना.

## ११. गलिच्छ वस्त्या/झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न ११.१ - ११.१३

गलिच्छ वस्ती/झोपडपट्टीची व्याख्या — गलिच्छ वस्त्यांचे स्वरूप — गलिच्छ वस्ती/झोपडपट्ट्या निर्मितीची कारणे व प्रश्न — गलिच्छ वस्ती/झोपडपट्ट्या निर्मूलनाच्या उपाययोजना — गलिच्छ वस्ती/झोपडपट्टी पुनर्वसनासंबंधी शासनाच्या योजना — महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण — जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान.

मुंबईमधील झोपडपट्ट्यांमध्ये साक्षरतेचे लक्षणीय प्रमाण - एक आश्चर्यकारक बाब (२००१).

मुंबईच्या झोपडपट्ट्यांमधील साक्षरतेचे ८३.१३ प्रमाण.

मुंबईच्या झोपडपट्टीमध्ये गरिबी, स्थलांतर व लिंग-गुणोत्तरांचे प्रत्यक्ष संबंध.

मुंबईची धारावी झोपडपट्टी.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान.

## ✍ संदर्भ ग्रंथ १

■ ■ ■

# १. राजकीय आणि प्रशासकीय विभाग

## राजकीय इतिहास

### १. मुंबई इलाखा (इ. स. १८६२ ते १९३७)

पश्चिम भारतातील ब्रिटिश आधिपत्याखाली असलेला प्रदेश एका प्रशासकीय विभागात एकत्रित आणला. याला 'मुंबई इलाखा' या नावाने ओळखले जाऊ लागले. **मुंबई इलाख्याचे क्षेत्रफळ १,८६,९२३ चौ. मैल होते. कमिशनरच्या अधिकाराखाली मुंबई इलाखा होता. त्याचे चार उपविभाग होते. (अ) उत्तर प्रशासकीय विभाग, (ब) मध्य प्रशासकीय विभाग, (क) सिंध प्रशासकीय विभाग, (ड) दक्षिण प्रशासकीय विभाग. या प्रशासकीय विभागाची मुख्यालय केंद्रे अनुक्रमे अहमदाबाद, पुणे, बेळगाव आणि कराची अशी होती.**

मुंबईचे प्रशासन कलेक्टरमार्फत होत असे. याचप्रमाणे शेख ओथमनसहित एडन आणि पेरीम बेट मुंबईच्या आधिपत्याखाली होते. संस्थानांचे क्षेत्रफळ व लोकसंख्या वेगवेगळी होती. **अनेक लहान-लहान जहागिऱ्या व संस्थाने एकत्रित करण्यात आली आणि मोठ्या आकाराचे जहागीर व एजन्सी निर्माण केल्या.** उदाहरणार्थ, गुजरातमधील काठेवाड, रेवकांठा आणि महीकांठा एजन्सी किंवा दक्षिण मराठा जहागीर जास्त क्षेत्रफळाच्या आणि महत्त्वाच्या एजन्सीजचा कारभार राजकीय अधिकाऱ्यामार्फत सुरू झाला. लहान क्षेत्रांचे प्रशासन जिल्ह्याच्या कलेक्टरमार्फत होत असे.

✲ **मुंबई इलाखा – सन १९११ :**

**राज्ये : (अ) सिंध :** खैरपूर. **(ब) गुजरात :** कच्छ, काठेवाड, पालनपूर, महीकांठा, रेवकांठा, बडोदा, भडोच. **(क) दख्खन :** दक्षिण मराठा जहागीर. **(ड) कर्नाटक :** दक्षिण मराठा जहागीर.

**एजन्सीज : (अ) गुजरात :** कैरा, सुरत. **(ब) कोकण :** ठाणे, कुलाबा, सावंतवाडी. **(क) दख्खन :** पश्चिम खानदेश, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर. **(ड) कर्नाटक :** धारवाड.

**ब्रिटिश प्रदेश : (अ) सिंध :** (१) हैद्राबाद, (२) कराची, (३) लारखाना, (४) सुक्कुर, (५) थर आणि पारकर, (६) उर्ध्व सिंध सरहद्द. **(ब) गुजरात :** (७) अहमदाबाद, (८) भडोच, (९) कैरा, (१०) पंचमहल, (११) सुरत. **(क) कोकण :** (१२) ठाणे, (१३) कुलाबा, (१४) रत्नागिरी, (१५) कॅनरा. **(ड) दख्खन :** (१६) अहमदनगर, (१७) पूर्व खानदेश, (१८) पश्चिम खानदेश, (१९) नाशिक, (२०) पुणे, (२१) सातारा, (२२) सोलापूर. **(इ) कर्नाटक :** (२३) बेळगाव, (२४) विजापूर, (२५) धारवाड. **(फ) २६. मुंबई शहर.**

✲ **मुंबई प्रांत – सन १९४१ :**

**ब्रिटिश जिल्हे : (अ) गुजरात :** अहमदाबाद, कैरा, भडोच, सुरत. **(ब) कोकण :** मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी. **(क) दख्खन :** पश्चिम खानदेश, पूर्व खानदेश, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापूर. **(ड) कर्नाटक :** बेळगाव, धारवाड, विजापूर, कॅनरा.

**एजन्सी :** (१) पश्चिम भारत राज्य एजन्सी, (२) गुजरात राज्य एजन्सी, (३) दख्खन राज्य एजन्सी.

✲ **मुंबई, सौराष्ट्र, कच्छ राज्ये – सन १९५१ :**

सन १९५१ मध्ये मुंबई राज्यात एकूण २८ जिल्हे : (१) बृहन्मुंबई.

**सध्याच्या गुजरातमधील जिल्हे :** (२) बनासकांठा, (३) साबरकांठा, (४) मेहसाणा, (५) अहमदाबाद, (६) कैरा, (७) पंचमहल, (८) बडोदा, (९) भडोच, (१०) सुरत, (११) अमरेली, (१२) डांग.

**सध्याच्या महाराष्ट्रातील जिल्हे :** (१३) पश्चिम खानदेश, (१४) पूर्व खानदेश, (१५) नाशिक, (१६) अहमदनगर, (१७) पुणे, (१८) उत्तर सातारा, (१९) दक्षिण सातारा, (२०) कोल्हापूर, (२१) सोलापूर, (२२) ठाणे, (२३) कुलाबा, (२४) रत्नागिरी.

**सध्याच्या कर्नाटकामधील जिल्हे :** (२५) कॅनरा, (२६) धारवाड, (२७) बेळगाव, (२८) विजापूर.

✲ **द्विभाषिक मुंबई राज्य : सन १९५६**

**मुंबई राज्यामधील पूर्वीची राज्ये :** (१) सौराष्ट्र राज्य, (२) कच्छ राज्य.

**१९५१ च्या मुंबई राज्यातील जिल्हे :** **कोकण :** ठाणे, कुलाबा, रत्नागिरी शिवाय मुंबई.

**दख्खन :** धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर.


**पूर्वीच्या मध्य प्रांतातील जिल्हे :** अमरावती, बुलडाणा, अकोला, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, चांदा.

**पूर्वीच्या निजाम (हैद्राबाद) राज्यातील जिल्हे :** औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड.

**कर्नाटकातील चार जिल्हे :** बेळगाव, धारवाड, विजापूर, उत्तर कॅनरा.

## २. महाराष्ट्र राज्य (१ मे १९६० पासून पुढे)

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्रात २६ जिल्हे होते आणि प्रशासकीय विभाग ४ होते. **आता महाराष्ट्रात ३५ जिल्हे आणि प्रशासकीय विभाग ६ आहेत.**




**महाराष्ट्र राज्य (स्थापनावेळेचे जिल्हे) : सन १९६०**

| | |
|---|---|
| **कोकण विभाग :** | (१) बृहन्मुंबई, (२) ठाणे, (३) कुलाबा, (४) रत्नागिरी. |
| **पुणे विभाग :** | (५) पुणे, (६) सातारा, (७) सांगली, (८) कोल्हापूर, (९) सोलापूर, (१०) नाशिक, (११) अहमदनगर, (१२) धुळे, (१३) जळगाव. |
| **औरंगाबाद विभाग :** | (१४) औरंगाबाद, (१५) बीड, (१६) परभणी, (१७) उस्मानाबाद, (१८) नांदेड. |
| **नागपूर विभाग :** | (१९) नागपूर, (२०) वर्धा, (२१) भंडारा, (२२) चांदा, (२३) अमरावती, (२४) बुलडाणा, (२५) अकोला, (२६) यवतमाळ. |

**नकाशा क्र. १.१ : महाराष्ट्र राज्य — सन १९६० (स्थापना वर्ष)**



# महाराष्ट्राचे भारतातील स्थान

(१) **स्थान : भारत :** उत्तर गोलार्धात भारत असून पूर्व गोलार्धातील आशिया खंडातील भारत हा महत्त्वाचा देश आहे. हिमालयाच्या दक्षिणेकडे अगदी हिंदी महासागरापर्यंत पसरलेला आशियाचा हा एक मोठा भूभाग आहे. यास **'भारतीय उपखंड'** असे म्हणतात. या उपखंडात भारत, पाकिस्तान, बांगला देश, श्रीलंका, भूतान, नेपाळ व माली यांचा समावेश होतो. याला 'सार्क' (SAARC) म्हणतात. (SAARC : South Asian Assocation for Regional Co-operation)

**महाराष्ट्र :** भारतामधील **२८ घटकराज्यांपैकी 'महाराष्ट्र राज्य' हे एक राज्य** आहे. भारताच्या मध्यवर्ती भागात महाराष्ट्र राज्य असून उत्तर भारत व दक्षिण भारतास एकत्रित आणणारी विशाल भूमी आहे. **(नकाशा क्र. १.२ पाहा.)**

(२) **अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार : महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार १५° ४४' उत्तर अक्षवृत्त ते २२° ६' उत्तर अक्षवृत्त असून रेखांश विस्तार ७२° ३६' पूर्व रेखावृत्त ते ८०° ५४' पूर्व रेखावृत्त आहे.** (१५.८° उ. अ. ते २२.१° उ. अ. व ७२.६° पू. रे. ते ८०.९° पू. रे.)

(३) **आकार :** भारतीय द्वीपकल्पाचा एक भाग महाराष्ट्र पठार (दख्खन पठार) आहे. **महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार** त्रिकोणाकृती असून दक्षिणेकडे चिंचोळा तर उत्तरेकडे रुंद होत गेलेला आहे. त्याचा पाया कोकणात व त्याचे निमुळते टोक पूर्वेस गोंदियाकडे आहे.

(४) **लांबी, रुंदी व क्षेत्रफळ :** पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस साधारणपणे पूर्व घाटापर्यंत महाराष्ट्र पसरलेला आहे. महाराष्ट्राची **पश्चिम-पूर्व लांबी सुमारे ८०० कि. मी. असून दक्षिणोत्तर रुंदी सुमारे ७२० कि. मी. आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. कि. मी. आहे.** क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतामध्ये राजस्थान (३,४२,२३९ चौ. कि. मी.) व मध्य प्रदेश (३,०८,३४६ चौ. कि. मी.) त्या खालोखाल महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे. **महाराष्ट्राने देशाचा ९.३६% प्रदेश व्यापलेला आहे.**

राज्यांच्या क्षेत्रफळासंबंधी अधिकृत आकडेवारी म्हणून भारत सरकार प्रकाशित करीत असलेल्या India Year Book चा आधार सर्वसामान्यपणे घेतला जातो. यानुसार प्रत्येक दशकात इअर-बुकमध्ये महाराष्ट्राचे क्षेत्रफळ किती दिलेले आहे याची माहिती अभ्यासकांना देत आहे. जसजशी आधुनिक शास्त्रीय उपकरणे सर्वेक्षणाकरिता उपलब्ध होतील, इनसॅटसारख्या उपग्रहाचा उपयोग होत जाईल याप्रमाणे अचूकतेकडे जाण्याचा प्रयत्न आहे.

**तक्ता क्र. १.१ : महाराष्ट्राचे क्षेत्रफळ विविध संदर्भानुसार**

| संदर्भ | जनगणना कालखंड - वर्ष | क्षेत्रफळ (चौ. कि. मी.) |
|---|---|---|
| भारत : १९६५ | १९६१ | ३,०७,२६८.३ |
| भारत : १९७७ आणि ७८ | १९७१ | ३,०७,७६२.० |
| भारत : १९८६ | १९८१ | ३,०७,६९०.० |
| भारत : २००० | १९९१ | ३,०७,७१३.० |

टीप : **'द मेगा स्टेट महाराष्ट्र' या ग्रंथासाठी महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. कि. मी. अधिकृत घेऊन आनुषंगिक आकडेवारी नोंदलेली आहे.**

(५) **नैसर्गिक सीमा :** महाराष्ट्राच्या **वायव्य** भागात सातमाळा डोंगररांगा, गाळणा टेकडा व सातपुडा पर्वतरांगेतील अक्राणी टेकड्या, **उत्तरेस** सातपुडा पर्वतरांगा व त्याच्या **पूर्वेस** गाविलगड टेकड्या आहेत, तर **ईशान्येस** दरकेसा टेकड्या, **पूर्वेस** चिरोली टेकड्या व भामरागड डोंगर या नैसर्गिक सीमा निर्माण करतात. **दक्षिणेस** पठारावर हिरण्यकेशी नदी व कोकणात तेरेखोल नदी **पश्चिमेस** अरबी समुद्र अशा महाराष्ट्राच्या नैसर्गिक सीमा आहेत.

**(६) राजकीय सीमा व सरहद्दी :** महाराष्ट्राच्या **वायव्य** भागात गुजरात राज्य आणि दादरा व नगर-हवेली हे संघराज्य क्षेत्र आहे. **उत्तरेस** मध्य प्रदेश, **पूर्वेस** छत्तीसगड तर **आग्नेयस** आंध्र प्रदेश या राज्यांच्या सीमारेषा आहेत. **दक्षिणेस** कर्नाटक व गोवा ही राज्ये आहेत.

**महाराष्ट्राच्या सरहद्दी :**

(अ) **वायव्येला** गुजरात राज्याला **ठाणे, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यांच्या सरहद्दी** भिडतात. केंद्रशासित प्रदेश (संघराज्य क्षेत्र) दादरा व नगर-हवेलीशी ठाणे जिल्ह्याची सरहद्द आहे.

(ब) **उत्तरेकडे** मध्य प्रदेशबरोबर **नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलडाणा, अमरावती, नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यांच्या सरहद्दी** आहेत.

(क) **पूर्वेस छत्तीसगड राज्याशी गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यांच्या सरहद्दी आहेत.**

(ड) **आग्नेयेस** आंध्र प्रदेशाला **गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ व नांदेड** जिल्ह्यांच्या **सरहद्दी** आहेत.

(इ) **दक्षिणेस** कर्नाटकाला **सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर** तसेच **उस्मानाबाद, लातूर व नांदेड** जिल्ह्यांच्या सरहद्दी आहेत.

(ई) **सरतेशेवटी** अगदी **दक्षिणेस** गोवा राज्याबरोबर **सिंधुदुर्ग** जिल्ह्याची सरहद्द आहे.

**(७) राजकीय स्वरूप :** १ मे १९६० रोजी महाराष्ट्रात २६ जिल्हे, २३५ तालुके, २८९ शहरे व ३५७७ खेडी होती; तेव्हा मुंबई (कोकण), पुणे, औरंगाबाद व नागपूर असे चार प्रशासकीय विभाग होते.


- यानंतर नाशिक व अमरावती असे दोन प्रशासकीय विभाग निर्माण झाले. **सध्या एकूण प्रशासकीय विभाग ६ आहेत.**
- तर महाराष्ट्रात **कुलाबा जिल्ह्याचे नामांतर** 'रायगड' करण्यात आले.
- तसेच यथावकाश **सिंधुदुर्ग,** लातूर, जालना, गडचिरोली व मुंबई उपनगर असे नवीन ५ जिल्हे उदयास आले. प्रथम रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन सिंधुदुर्ग तर चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली जिल्हे निर्माण झाले.
- त्यानंतर औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन जालना तर, उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन लातूर हे जिल्हे निर्माण झाले. एकूण ३० जिल्हे झाले. मुंबई जिल्ह्याचे विभाजन करून **मुंबई उपनगर** हा ३१ वा जिल्हा निर्माण केला.
- १ जुलै, १९९८ रोजी धुळे व अकोला जिल्ह्यांचे विभाजन होऊन अनुक्रमे **नंदुरबार व वाशीम** असे दोन नवीन जिल्हे निर्माण झाले. तेव्हा महाराष्ट्रात ३३ जिल्हे होते.
- यानंतर मे १९९९ मध्ये परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन **हिंगोली** तर भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन **गोंदिया जिल्ह्याची** निर्मिती झाली. **सध्या महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे आहेत. महाराष्ट्रात सध्या एकूण ३५८ तालुके (मुंबई उपनगर जिल्ह्यामधील ३ तालुके धरून) आहेत. (महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी, २००७ नुसार.)**

प्रशासकीय विभागानुसार कोकण विभाग (५० तालुके), पुणे विभाग (५८ तालुके), नाशिक विभाग (५४ तालुके), औरंगाबाद विभाग (७६ तालुके), अमरावती विभाग (५६ तालुके), नागपूर विभाग (६४ तालुके) याप्रमाणे तालुके आहेत.

२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात खेड्यांची संख्या ४३,६६४ आहे.

शहरांची संख्या (५३५), म्युन्सिपल कॉर्पोरेशन्स (२३), म्युन्सिपालिटी (२२६), कॅन्टोन्मेंट बोर्ड्स (७) आहेत.







महाराष्ट्राचे भारतातील स्थान : भारतातील २८ घटकराज्यांपैकी 'महाराष्ट्र राज्य' हे एक राज्य आहे. भारताच्या साधारण मध्यवर्ती भागात महाराष्ट्र असून उत्तर भारत व दक्षिण भारतात एकत्रित आणणारी विशाल भूमी आहे. भारतीय द्वीपकल्पाचा एक भाग महाराष्ट्र पठार आहे. महाराष्ट्राची पश्चिम-पूर्व लांबी ८०० कि. मी. तर दक्षिणोत्तर रुंदी ७२० कि. मी. आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सुमारे ३ लाख चौ. कि. मी. आहे.

नकाशा क्र. १.२ : महाराष्ट्राचे भारतातील स्थान

- The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
- Based upon survey of Indian with the permission of the Surveyor General of India.
- © Government of Indian Copyright Act.
- The administrative Headquarters of Haryana, Punjab and Chandigarh are at Chandigarh.
- The Boundary of Meghalaya show on this map is interpreted from the North-Eastern Areas (Reorganisation) Act, 1971, but has yet to be verified.
- The boundaries of 3 new states namely Uttaranchal, Jharkhand and Chhattisgarh are shown New States emerged in the year 2000.




*महाराष्ट्र राजकीय नकाशा : महाराष्ट्रात १ मे १९६० रोजी एकूण २६ जिल्हे होते. यथावकाश सिंधुदुर्ग, लातूर, जालना, गडचिरोली व मुंबई उपनगर असे पाच जिल्हे उदयास आले. १ जुलै १९९८ रोजी नंदुरबार व वाशीम असे दोन नवीन जिल्हे निर्माण झाले. १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन हिंगोली तर भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन गोंदिया ज़िल्ह्याची निर्मिती झाली. सध्या महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे आहेत.*

नकाशा क्र. १.३ : महाराष्ट्र - राजकीय विभाग



# महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग

महाराष्ट्राचे एकूण सहा प्रशासकीय विभाग आहेत. ते पुढीलप्रमाणे :

(अ) कोकण विभाग (ब) पुणे विभाग (क) नाशिक विभाग

(ड) औरंगाबाद विभाग (इ) अमरावती विभाग (फ) नागपूर विभाग

(नकाशा क्र. १.४ पाहा.)

### तक्ता क्र. १.२ : महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग

| विभाग | जिल्ह्यांची संख्या | जिल्हे |
|---|---|---|
| (अ) कोकण विभाग | ६ | (१) मुंबई शहर, (२) मुंबई उपनगर, (३) ठाणे, (४) रायगड, (५) रत्नागिरी, (६) सिंधुदुर्ग. |
| (ब) पुणे विभाग | ५ | (७) पुणे, (८) सातारा, (९) सांगली, (१०) कोल्हापूर, (११) सोलापूर. |
| (क) नाशिक विभाग | ५ | (१२) नाशिक, (१३) अहमदनगर, (१४) धुळे, (१५) नंदुरबार, (१६) जळगाव. |
| (ड) औरंगाबाद विभाग | ८ | (१७) औरंगाबाद, (१८) जालना, (१९) बीड, (२०) परभणी, (२१) हिंगोली, (२२) उस्मानाबाद, (२३) लातूर, (२४) नांदेड. |
| (इ) अमरावती विभाग | ५ | (२५) अमरावती, (२६) बुलडाणा, (२७) अकोला, (२८) वाशीम, (२९) यवतमाळ. |
| (फ) नागपूर विभाग | ६ | (३०) नागपूर, (३१) वर्धा, (३२) भंडारा, (३३) गोंदिया, (३४) चंद्रपूर, (३५) गडचिरोली. |
| एकूण जिल्हे | ३५ | |

### तक्ता क्र. १.३ : महाराष्ट्राचे जिल्हे : क्षेत्रफळ (चौ. कि. मी.)

| प्रशासकीय विभाग/जिल्हे | क्षेत्रफळ (चौ. कि. मी.) | प्रशासकीय विभाग/जिल्हे | क्षेत्रफळ (चौ. कि. मी.) | प्रशासकीय विभाग/जिल्हे | क्षेत्रफळ (चौ. कि. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| (अ) कोकण विभाग | ३०,७२८ | (क) नाशिक विभाग | ५७,४९३ | (इ) अमरावती विभाग | ४६,०२७ |
| १. मुंबई शहर | १५७ | १२. नाशिक | १५,५३० | २५. अमरावती | १२,२१० |
| २. मुंबई उपनगर | ४४६ | १३. अहमदनगर | १७,०४८ | २६. बुलडाणा | ९,६६१ |
| ३. ठाणे | ९,५५८ | १४. धुळे | ८०६३ | २७. अकोला | ५,४२९ |
| ४. रायगड | ७,१५२ | १५. नंदुरबार | ५०३४ | २८. वाशीम | ५,१५३ |
| ५. रत्नागिरी | ८,२०८ | १६. जळगाव | ११,७६५ | २९. यवतमाळ | १३,५८२ |
| ६. सिंधुदुर्ग | ५,२०७ | | | | |
| (ब) पुणे विभाग | ५७,२७५ | (ड) औरंगाबाद विभाग | ६४,८१३ | (फ) नागपूर विभाग | ५१,३७७ |
| ७. पुणे | १५,६४३ | १७. औरंगाबाद | १०,१०७ | ३०. नागपूर | ९,८०२ |
| ८. सातारा | १०,४८० | १८. जालना | ७,७१८ | ३१. वर्धा | ६,३०९ |
| ९. सांगली | ८,५७२ | १९. बीड | १०,६९३ | ३२. भंडारा | ३,८९५ |
| १०. कोल्हापूर | ७,६८५ | २०. परभणी | ६,५१७ | ३३. गोंदिया | ५,४२५ |
| ११. सोलापूर | १४,८९५ | २१. हिंगोली | ४,५२४ | ३४. चंद्रपूर | ११,४४३ |
| | | २२. उस्मानाबाद | ७,५६९ | ३५. गडचिरोली | १४,४१२ |
| | | २३. लातूर | ७,१५७ | महाराष्ट्र | ३,०७,७१३ |
| | | २४. नांदेड | १०,५२८ | | |

संदर्भ : India, 2001.

# महाराष्ट्राच्या काही भागांना लाभलेली वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक नावे


आपण 'महाराष्ट्र' या शब्दाची व्युत्पत्ती कशी झाली हे पाहिले. तसेच कोकण व देश या प्रादेशिक नावांचाही उल्लेख व परिचय करून घेतलेला आहे. देशावरच्या काही भागांना आणखी काही वैशिष्ट्यपूर्ण नावे आहेत याची माहिती पाहू. (नकाशा क्र. १.४ पाहा.)

**कोकण :** सह्याद्री पर्वत व अरबी समुद्राच्या दरम्यान असलेल्या अरुंद किनारपट्टीचे कोकण आहे. **कोकणात एकूण ६ जिल्हे आहेत.**

**देश :** सह्याद्रीच्या पूर्व बाजूला महाराष्ट्राचा 'देश' हा प्रादेशिक विभाग असून महाराष्ट्राच्या विकासात देशाचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर हे ५ जिल्हे व नाशिक विभागातील नाशिक व अहमदनगर जिल्हयांचा समावेश होतो. **देशात एकूण ७ जिल्हे आहेत.**

**घाटमाथा :** सह्याद्री पर्वताच्या उंचवट्याचा भाग घाटमाथा म्हणून ओळखला जातो.

**मावळ :** सह्याद्रीच्या पूर्वेकडील उतरणीचा भाग 'मावळ प्रांत' या नावाने ओळखला जातो.





**महाराष्ट्र : प्रशासकीय विभाग**

महाराष्ट्रात प्रशासकीय विभाग ६ आहेत. (अ) कोकण विभाग (६ जिल्हे), (ब) पुणे विभाग (५ जिल्हे), (क) नाशिक विभाग (५ जिल्हे), (ड) औरंगाबाद विभाग (८ जिल्हे), (इ) अमरावती विभाग (५ जिल्हे), (ई) नागपूर विभाग (६ जिल्हे). महाराष्ट्रात १ मे १९६० रोजी २६ जिल्हे होते. सध्या ३५ जिल्हे आहेत. महाराष्ट्रात सर्वात मोठा प्रशासकीय विभाग औरंगाबाद विभागाचा ८ जिल्हयांचा तर सर्वात कमी प्रशासकीय विभाग नाशिक विभाग, पुणे विभाग व अमरावती विभाग प्रत्येकी ५ जिल्हयांचा आहे.

नकाशा क्र. १.४ : महाराष्ट्र राज्य — प्रशासकीय विभाग






**महाराष्ट्र : पारंपरिक प्रादेशिक विभाग**

महाराष्ट्रात कोकण,देश, घाटमाथा, मावळ, खानदेश, मराठवाडा व विदर्भ आहेत. कोकणात ६ जिल्हे; देशावर ७ जिल्हे; खानदेशात ३ जिल्हे; मराठवाड्यात ८ जिल्हे व विदर्भात ११ जिल्हे आहेत. विदर्भाला 'वऱ्हाड' असेही म्हणतात.

नकाशा क्र. १.५ : महाराष्ट्राचे पारंपरिक प्रादेशिक विभाग

**खानदेश :** अशाच प्रकारे **'खानदेश'** हादेखील एक प्रादेशिक विभाग सुप्रसिद्ध आहे. उत्तर महाराष्ट्रातील तापी खोऱ्यातील धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यांना खानदेश म्हणतात. खानदेशामध्येही जमीन सुपीक व काळी असून त्या ठिकाणाचा कापूस व केळी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. **खानदेशात ३ जिल्हे समाविष्ट आहेत.**

**मराठवाडा :** मध्य महाराष्ट्रातील गोदावरीच्या खोऱ्यास **'मराठवाडा'** हे प्रादेशिक नाव आहे. हा प्रदेश तसा रूक्ष प्रदेश आहे. परंतु गोदावरी तीरावर नेवासे, पैठणसारखी पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत. मराठवाड्यात औरंगाबाद प्रशासकीय विभागाचा समावेश होतो. **मराठवाड्यात एकूण ८** जिल्हे आहेत.

**विदर्भ :** नागपूर विभागास **'विदर्भ'** किंवा **'वऱ्हाड'** या नावाने व्यवहारात संबोधले जाते, आपण 'वऱ्हाडी माणसं' आहोत असे अभिमानाने नागपूरकर सांगतात. तेथील सुपीक काळी जमीन व कापूस-संत्री यांचा अगदी निकटचा संबंध 'वऱ्हाड' या शब्दाशी आहे. यामध्ये अमरावती विभाग (५ जिल्हे) व नागपूर प्रशासकीय विभागाचा (६ जिल्हे) समावेश होतो. **विदर्भात ११ जिल्हे** आहेत.

## महाराष्ट्राचे भारतातील स्थान

**अक्षांश विस्तार :** १५° ४४' उत्तर अक्षवृत्त ते २२° ६'उत्तर अक्षवृत्त (१५.८° उ. अ. ते २२.१° उ. अ.)

**रेखांश विस्तार :** ७२° ३६' पूर्व रेखावृत्त ते ८०° ५४' पूर्व रेखावृत्त (७२.६° पू. रे. ते ८०.९° पू. रे.)

**आकार :** साधारण त्रिकोणाकृती, पाया कोकणात व निमुळते टोक पूर्वेस भंडाऱ्याकडे.

**लांबी व रुंदी :** पश्चिम-पूर्व लांबी सुमारे ८०० कि. मी., दक्षिण-उत्तर रुंदी सुमारे ७२० कि. मी.

**क्षेत्रफळ :** ३,०७,७१३ चौ. कि. मी. भारतात मध्य प्रदेश व राजस्थानच्या खालोखाल तिसरा क्रमांक.

**नैसर्गिक सीमा :** **वायव्य :** सातमाळा डोंगररांगा, गाळणा टेकड्या, अक्राणी टेकड्या;
**उत्तर :** सातपुडा पर्वतरांग, गाविलगड टेकड्या; **ईशान्य :** दरकेसा टेकड्या;
**पूर्व :** चिरोली टेकड्या, भामरागड डोंगर; **दक्षिण :** हिरण्यकेशी नदी, तेरेखोल नदी; **पश्चिम :** अरबी समुद्र.

**राजकीय सीमा :** **वायव्य :** गुजरात राज्य आणि दादरा व नगर-हवेली संघराज्य क्षेत्र; **छत्तीसगड :** मध्य प्रदेश;
**उत्तर व पूर्व आग्नेय :** आंध्र प्रदेश; **दक्षिण :** कर्नाटक व गोवा.

**महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग व जिल्ह्यांची संख्या :**

(अ) कोकण विभाग (६ जिल्हे), (ब) पुणे विभाग (५ जिल्हे), (क) नाशिक विभाग (५ जिल्हे),
(ड) औरंगाबाद विभाग (८ जिल्हे), (इ) अमरावती विभाग (५ जिल्हे), (ई) नागपूर विभाग (६ जिल्हे).


**महाराष्ट्रातील जिल्ह्यांची संख्या :** ३५.

**महाराष्ट्राचे प्रादेशिक विभाग :** (अ) कोकण, (ब) देश, (क) खानदेश, (ड) मराठवाडा, (इ) विदर्भ (वऱ्हाड).

**महाराष्ट्रातील तालुके :** (१) कोकण विभाग : ५०, (२) पुणे विभाग : ५८, (३) नाशिक विभाग : ५४,
(४) औरंगाबाद विभाग : ७६, (५) अमरावती विभाग : ५६, (६) नागपूर विभाग : ६४.

महाराष्ट्रात एकूण तालुक्यांची संख्या ३५८ आहे. (मुंबई जिल्ह्यामधील तीन तालुके धरून).








**महाराष्ट्र — तालुकावार पायाभूत नकाशा :**

महाराष्ट्रात कोकण विभागात ५० तालुके, पुणे विभागात ५८ तालुके, नाशिक विभागात ५४ तालुके, औरंगाबाद विभागात ७६ तालुके, अमरावती विभागात ५६ तालुके तर नागपूर विभागात ६४ तालुके आहेत. महाराष्ट्रात एकूण ३५८ तालुके आहेत.

**नकाशा क्र. १.६ : महाराष्ट्र — तालुकावार पायाभूत नकाशा**





| ■ कोकण विभाग (एकूण तालुके : ५०) | |
|---|---|
| १. मुंबई शहर जिल्हा | तालुके नाहीत. |
| २. मुंबई उपनगर जिल्हा (३) | बांद्रा (जिल्हा मुख्यालय) : (१) अंधेरी, (२) बोरिवली, (३) कुर्ला. |
| ३. ठाणे जिल्हा (१५) | (१) ठाणे (जिल्हा मुख्यालय), (२) तळासरी, (३) डहाणू, (४) जव्हार, (५) मोखाडा, (६) पालघर, (७) वाडा, (८) शहापूर, (९) वसई, (१०) भिवंडी, (११) कल्याण, (१२) मुरबाड, (१३) उल्हासनगर, (१४) अंबरनाथ, (१५) विक्रमगड. |
| ४. रायगड जिल्हा (१५) | (१) अलिबाग (जिल्हा मुख्यालय), (२) पनवेल, (३) कर्जत, (४) उरण, (५) खालापूर, (६) पेण, (७) पाली (सुधागड), (८) मुरुड, (९) रोहा, (१०) माणगाव, (११) श्रीवर्धन, (१२) म्हसाळा, (१३) महाड. (१४) पोलादपूर, (१५) तळा. |
| ५. रत्नागिरी जिल्हा (९) | (१) रत्नागिरी (जिल्हा मुख्यालय), (२) मंडणगड, (३) दापोली, (४) खेड, (५) गुहागर, (६) चिपळूण, (७) संगमेश्वर, (८) लांजा, (९) राजापूर. |
| ६. सिंधुदुर्ग जिल्हा (८) | (१) ओरस (जिल्हा मुख्यालय), (२) देवगड, (३) वैभववाडी, (४) मालवण, (५) कणकवली, (६) वेंगुर्ला, (७) सावंतवाडी, (८) दोडामार्ग. |

नकाशा क्र. १.७ : कोकण विभाग









| ■ पुणे विभाग (एकूण तालुके : ५८) | |
|---|---|
| १. पुणे जिल्हा (१४) | (१) पुणे शहर (जिल्हा मुख्यालय), (२) जुन्नर, (३) आंबेगाव (घोडेगाव), (४) वडगाव (मावळ), (५) राजगुरुनगर (खेड), (६) शिरूर, (७) पौड (मुळशी); (८) हवेली, (९) दौंड, (१०) वेल्हे, (११) सासवड (पुरंदर), (१२) भोर, (१३) बारामती, (१४) इंदापूर. |
| २. सातारा जिल्हा (११) | (१) सातारा (मुख्य कार्यालय), (२) खंडाळा, (३) महाबळेश्वर, (४) वाई, (५) फलटण, (६) मेढे (जावळी), (७) कोरेगाव, (८) खटाव (वडूज), (९) दहिवडी (माण), (१०) पाटण, (११) कराड. |
| ३. सांगली जिल्हा (१०) | (१) शिराळा (महाल), (२) विटा (खानापूर), (३) आटपाडी, (४) इस्लामपूर (वाळवा), (५) तासगाव, (६) कवठे महांकाळ, (७) जत, (८) मिरज, (९) पलूस. (१०) कडेगाव. (सांगली - जिल्हा मुख्यालय) |
| ४. कोल्हापूर जिल्हा (१२) | (१) कोल्हापूर-करवीर (जिल्हा मुख्यालय), (२) शाहूवाडी, (३) पन्हाळा, (४) हातकणंगले, (५) गगनबावडा, (६) शिरोळ, (७) कागल, (८) राधानगरी, (९) गारगोटी (मुदरगड), (१०) गडहिंग्लज, (११) आजरा (महाल), (१२) चंदगड. |
| ५. सोलापूर जिल्हा (११) | (१) उत्तर सोलापूर (सोलापूर जिल्हा मुख्यालय), (२) करमाळा, (३) माढा, (४) बार्शी, (५) माळशिरस, (६) पंढरपूर, (७) मोहोळ, (८) सांगोला, (९) मंगळवेढा, (१०) दक्षिण सोलापूर, (११) अक्कलकोट. |


नकाशा क्र. १.८ : पुणे विभाग




| | |
|---|---|
| ■ नाशिक विभाग (एकूण तालुके : ५४) | |
| १. नाशिक जिल्हा (१५) | (१) नाशिक (जिल्हा मुख्यालय), (२) सटाणा (बागलाण), (३) सुरगाणा, (४) कळवण, (५) मालेगाव, (६) पेठ, (७) दिंडोरी, (८) चांदवड, (९) निफाड, (१०) नांदगाव, (११) येवले, (१२) इगतपुरी, (१३) सिन्नर, (१४) त्र्यंबकेश्वर, (१५) देवळा. |
| २. अहमदनगर जिल्हा (१४) | (१) अहमदनगर (जिल्हा मुख्यालय), (२) कोपरगाव, (३) अकोले (४) संगमनेर, (५) श्रीरामपूर, (६) राहुरी, (७) नेवासे, (८) पारनेर, (९) शेवगाव, (१०) पाथर्डी, (११) श्रीगोंदे, (१२) कर्जत, (१३) जामखेड, (१४) राहता. |
| ३. धुळे जिल्हा (४) | (१) धुळे (जिल्हा मुख्यालय), (२) शिरपूर, (३) शिंदखेडा, (४) साक्री. |
| ४. नंदुरबार जिल्हा (६) | (१) नंदुरबार (जिल्हा मुख्यालय), (२) अक्कलकुवा, (३) धडगाव (अक्राणी), (४) तळोदे. (५) शहादा, (६) नवापूर. |
| ५. जळगाव जिल्हा (१५) | (१) जळगाव (जिल्हा मुख्यालय), (२) चोपडा, (३) यावल, (४) रावेर, (५) अमळनेर, (६) एरंडोल, (७) भुसावळ, (८) मुक्ताईनगर, (९) पारोळा, (१०) भडगाव, (११) पाचोरा, (१२) जामनेर, (१३) चाळीसगाव, (१४) धरणगाव, (१५) बोदवड. |


नकाशा क्र. १.९ : नाशिक विभाग






| | |
|---|---|
| ■ औरंगाबाद विभाग (एकूण तालुके : ७६) | |
| १. औरंगाबाद जिल्हा (९) | (१) औरंगाबाद (जिल्हा मुख्यालय), (२) सोयगाव, (३) कन्नड, (४) सिल्लोड, (५) वैजापूर, (६) खुलताबाद, (७) गंगापूर, (८) पैठण, (९) फुलंब्री. |
| २. जालना जिल्हा (८) | (१) जालना (जिल्हा मुख्यालय), (२) भोकरदन, (३) जाफराबाद, (४) अंबड, (५) परतूर, (६) मंठा, (७) घनसावंगी, (८) बदनापूर. |
| ३. बीड जिल्हा (११) | (१) बीड (जिल्हा मुख्यालय), (२) गेवराई, (३) आष्टी, (४) पाटोदा, (५) माजलगाव, (६) केज, (७) अंबेजोगाई, (८) वडवणी, (९) शिरूर (कासार), (१०) परळी, (११) धारूर. |
| ४. परभणी जिल्हा (९) | (१) परभणी (जिल्हा मुख्यालय), (२) जिंतुर, (३) पाथरी, (४) गंगाखेड, (५) सोनपेठ, (६) मानवत, (७) सेलू, (८) पालम, (९) पूर्णा. |
| ५. हिंगोली जिल्हा (५) | (१) हिंगोली (जिल्हा मुख्यालय), (२) कळमनुरी, (३) बसमत, (४) औंढा नागनाथ, (५) सेनगाव. |
| ६. उस्मानाबाद जिल्हा (८) | (१) उस्मानाबाद (जिल्हा मुख्यालय), (२) भूम (महाल), (३) कळंब, (४) परांडा, (५) तुळजापूर, (६) उमरगा, (७) वाशी, (८) लोहारा. |
| ७. लातूर जिल्हा (१०) | (१) लातूर (जिल्हा मुख्यालय), (२) अहमदपूर, (३) औसा, (४) निलंगा, (५) उदगीर, (६) देवणी, (७) शिरूर अनंतपाळ, (८) जळकोट, (९) रेणापूर, (१०) चाकूर. |
| ८. नांदेड जिल्हा (१६) | (१) नांदेड (जिल्हा मुख्यालय), (२) किनवट, (३) हदगाव, (४) भोकर, (५) कंधार, (६) बिलोली, (७) मुखेड, (८) देगलूर, (९) मुदखेड, (१०) हिमायतनगर, (११) माहूर, (१२) धर्माबाद, (१३) पेठ उमरी, (१४) अर्धापूर, (१५) लोहा, (१६) नायगाव (खैरगाव). |


नकाशा क्र. १.१० : औरंगाबाद विभाग




| ■ अमरावती विभाग (एकूण तालुके – ५६) | |
|---|---|
| १. अमरावती जिल्हा (१४) | (१) अमरावती (जिल्हा मुख्यालय), (२) धारणी (मेळघाट), (३) चिखलदरा, (४) अचलपूर, (५) चांदूर बाजार, (६) मोर्शी, (७) वरूड, (८) अंजनगाव-सुर्जी, (९) भातकुली, (१०) तिवसा, (११) दर्यापूर, (१२) नांदगाव (खंडेश्वर), (१३) चांदूर रेल्वे, (१४) धामणगाव रेल्वे. |
| २. बुलडाणा जिल्हा (१३) | (१) बुलडाणा (जिल्हा मुख्यालय), (२) जळगाव (जामोद), (३) संग्रामपूर, (४) मलकापूर, (५) नांदुरा, (६) शेगाव, (७) मोताळा, (८) खामगाव, (९) चिखली, (१०) मेहकर, (११) देऊळगाव राजा, (१२) सिंदखेड राजा, (१३) लोणार. |
| ३. अकोला जिल्हा (७) | (१) अकोला (जिल्हा मुख्यालय), (२) तेल्हारा, (३) आकोट, (४) बाळापूर, (५) मूर्तिजापूर, (६) पातूर, (७) बार्शी टाकळी. |
| ४. वाशीम जिल्हा (६) | (१) वाशीम (जिल्हा मुख्यालय), (२) कारंजा, (३) मालेगाव, (४) मंगरूळपीर, (५) रिसोड, (६) मानोरा. |
| ५. यवतमाळ जिल्हा (१६) | (१) यवतमाळ (जिल्हा मुख्यालय), (२) बाभूळगाव, (३) नेर, (४) दारव्हा, (५) कळंब, (६) राळेगाव, (७) दिग्रस, (८) घाटंजी, (९) पांढरकवडा (केळापूर), (१०) मारेगाव, (११) वणी, (१२) पुसद, (१३) महागाव, (१४) उमरखेड, (१५) आर्णी, (१६) झरी जामनी. |

नकाशा क्र. १.११ : अमरावती विभाग






| ■ नागपूर विभाग (एकूण तालुके – ६४) | |
|---|---|
| १. नागपूर जिल्हा (१४) | (१) नागपूर (जिल्हा मुख्यालय), (२) नरखेड, (३) सावनेर, (४) पारशिवनी, (५) रामटेक, (६) काटोल, (७) कळमेश्वर,(८) कामठी, (९) मौदा, (१०) हिंगणा, (११) नागपूर ग्रामीण (३ भाग), (१३) उमरेड, (१३) कुही, (१४) भिवापूर. |
| २. वर्धा जिल्हा (८) | (१) वर्धा (जिल्हा मुख्यालय), (२) आष्टी, (३) कारंजा, (४) आर्वी, (५) सेलू, (६) देवळी, (७) हिंगणघाट, (८) समुद्रपूर. |
| ३. भंडारा जिल्हा (७) | (१) भंडारा (जिल्हा मुख्यालय), (२) तुमसर, (३) मोहोडी, (४) साकोली, (५) पौनी, (६) लाखांदूर, (७) लाखणी. |
| ४. गोंदिया जिल्हा (८) | (१) गोंदिया (जिल्हा मुख्यालय), (२) तिरोडा, (३) गोरेगाव, (४) आमगाव, (५) देवरी, (६) सालकेसा, (७) अर्जुनी मोरगाव, (८) सडक-अर्जुनी. |
| ५. चंद्रपूर जिल्हा (१५) | (१) चंद्रपूर (जिल्हा मुख्यालय), (२) चिमूर, (३) नागभीड, (४) ब्रह्मपुरी, (५) वरोडा, (६) भद्रावती, (७) सिंदेवाही, (८) मूल, (९) राजुरा, (१०) गोंडपिंपरी, (११) बल्लारपूर, (१२) पोभुर्णा, (१३) सावली, (१४) कोरपना (१५) जिवती. |
| ६. गडचिरोली जिल्हा (१२) | (१) गडचिरोली (जिल्हा मुख्यालय), (२) कुरखेडा, (३) आरमोरी, (४) धानोरा, (५) चामोशी, (६) एटापल्ली, (७) अहेरी, (८) सिरोंचा, (९) भामरागड, (१०) कोरची वडसा, (११) वडसा देसाईगंज, (१२) मुलचेरा. |

नकाशा क्र. १.१२ : नागपूर विभाग

# बहुपर्यायी प्रश्न

(१) महाराष्ट्र राज्याची स्थापना .......... रोजी झाली.
(अ) १ नोव्हेंबर, १९५६ (ब) १५ ऑगस्ट, १९४७ (क) २६ जानेवारी, १९५० (ड) १ मे, १९६०

(२) भाषावार प्रांतरचनेनुसार सध्याचा महाराष्ट्र व .......... मिळून मुंबई राज्य निर्माण झाले.
(अ) गुजरात (ब) मध्य प्रदेश (क) कर्नाटक (ड) गोवा

(३) कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा व विदर्भ मिळून .......... ची स्थापना झाली.
(अ) मुंबई प्रांता (ब) महाराष्ट्र राज्या (क) मुंबई राज्या (ड) मुंबई इलाख्या

(४) महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार .......... उत्तर अक्षवृत्त ते .......... उत्तर अक्षवृत्त दरम्यान आहे.
(अ) १५° ४४', २२°६' (ब) १५° ६', २२° ४४' (क) ८° ४', ३७° ६' (ड) ८° ६', ३७° ४'

(५) महाराष्ट्राचा रेखांश विस्तार .......... पूर्व रेखावृत्त ते .......... पूर्व रेखावृत्त दरम्यान आहे.
(अ) ६८° ७', ९७° २५' (ब) ७२° ५४', ८०° ३६' (क) ७२° ३६', ८०° ५४' (ड) ६८° २५', ९७° ६'

(६) महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार .......... आहे.
(अ) त्रिकोणाकृती (ब) चौकोनी (क) अनियमित (ड) वर्तुळाकृती

(७) महाराष्ट्राचा पाया .......... मध्ये आहे, तर त्याचे निमुळते टोक पूर्वेस .......... कडे आहे.
(अ) खानदेश, कोल्हापूर (ब) विदर्भ, वेंगुर्ला (क) कोकण, गोंदिया (ड) दक्षिण महाराष्ट्र, धुळे

(८) महाराष्ट्राचे क्षेत्रफळ .......... चौ. कि. मी. आहे.
(अ) ३,७०,२६७ (ब) ३,०७,७१३ (क) ३२,८७,२६३ (ड) २६,७८,३२३

(९) महाराष्ट्राची पश्चिम-पूर्व लांबी सुमारे .......... कि. मी. आहे.
(अ) ६०० (ब) ७०० (क) ७२० (ड) ८००

(१०) महाराष्ट्राची उत्तर-दक्षिण रुंदी .......... कि. मी. आहे.
(अ) ७२० (ब) ७५० (क) ८०० (ड) ७००

(११) महाराष्ट्राचा भारतात क्षेत्रफळाच्या दृष्टीने .......... क्रमांक आहे.
(अ) दुसरा (ब) तिसरा (क) चौथा (ड) सहावा

(१२) महाराष्ट्राने भारताचा ..........% प्रदेश व्यापलेला आहे.
(अ) ६ (ब) ५ (क) ९ (ड) १०

(१३) महाराष्ट्राच्या .......... कडील नैसर्गिक सीमा सातपुडा पर्वतरांग व गाविलगड टेकड्या निर्माण करतात.
(अ) पश्चिमे (ब) दक्षिणे (क) उत्तरे (ड) पूर्वे

(१४) महाराष्ट्राच्या उत्तरेस .......... आहे.
(अ) मध्य प्रदेश (ब) गुजरात (क) आंध्र प्रदेश (ड) छत्तीसगड

(१५) महाराष्ट्राच्या वायव्येस गुजरात राज्याला ठाणे, नाशिक, धुळे व .......... जिल्ह्याच्या सरहद्दी भिडतात.
(अ) जळगाव (ब) अमरावती (क) मुंबई उपनगर (ड) नंदुरबार

## उत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | ड | (२) | अ | (३) | ब | (४) | अ | (५) | क |
| (६) | अ | (७) | क | (८) | ब | (९) | ड | (१०) | अ |
| (११) | ब | (१२) | क | (१३) | क | (१४) | अ | (१५) | ड |



(१६) महाराष्ट्राच्या दक्षिणेला गोवा राज्याबरोबर .......... जिल्ह्याची सरहद्द आहे.
(अ) रत्नागिरी (ब) कोल्हापूर (क) सिंधुदुर्ग (ड) सांगली

(१७) महाराष्ट्र स्थापनेच्या वेळी एकूण .......... जिल्हे होते.
(अ) ३१ (ब) ३० (क) २६ (ड) २८

(१८) १९६० साली महाराष्ट्रात एकूण प्रशासकीय विभाग .......... होते.
(अ) ४ (ब) ५ (क) ६ (ड) ३

(१९) महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर नवीन .......... जिल्हे निर्माण झाले.
(अ) ४ (ब) ९ (क) ४ (ड) ६

(२०) महाराष्ट्रात सर्वांत अलीकडचे .......... जिल्हे उदयास आले.
(अ) हिंगोली व गोंदिया (ब) नंदुरबार व वाशीम (क) सिंधुदुर्ग व गडचिरोली (ड) लातूर व जालना

(२१) सध्या महाराष्ट्रात एकूण .......... जिल्हे आहेत.
(अ) ३० (ब) २८ (क) ३५ (ड) २६

(२२) महाराष्ट्रात .......... प्रशासकीय विभागात सर्वांत जास्त जिल्हे आहेत.
(अ) कोकण (ब) पुणे (क) नागपूर (ड) औरंगाबाद

(२३) महाराष्ट्रात प्रशासकीय विभागात सर्वांत कमी जिल्ह्यांची संख्या .......... आहे.
(अ) ४ (ब) ६ (क) ५ (ड) ७

(२४) महाराष्ट्रात पूर्वीच्या कुलाबा जिल्ह्याचे नामांतर .......... करण्यात आले.
(अ) सिंधुदुर्ग (ब) रायगड (क) मुंबई उपनगर (ड) जालना

(२५) महाराष्ट्रात प्रादेशिक विभागानुसार सर्वांत जास्त जिल्हे .......... मध्ये समाविष्ट होतात.
(अ) कोकण (ब) देश (क) मराठवाडा (ड) विदर्भ

(२६) महाराष्ट्रात सर्वांत कमी जिल्हे .......... या प्रादेशिक विभागात आहेत.
(अ) खानदेश (ब) कोकण (क) देश (ड) मराठवाडा

(२७) विदर्भात .......... नवीन जिल्हा निर्माण झाला.
(अ) नंदुरबार (ब) हिंगोली (क) गोंदिया (ड) वाशीम

(२८) मुंबई उपनगर जिल्ह्याचे ठिकाण .......... आहे.
(अ) अंधेरी (ब) बांद्रा (क) बोरिवली (ड) कुर्ला

(२९) सिंधुदुर्ग जिल्ह्याचे ठिकाण .......... आहे.
(अ) देवगड (ब) रत्नागिरी (क) सिंधुदुर्ग नगरी (ड) वेंगुर्ले

(३०) महाराष्ट्रात एकूण .......... प्रशासकीय विभाग आहेत.
(अ) चार (ब) पाच (क) सात (ड) सहा

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१५) | ड | (१६) | क | (१७) | क | (१८) | अ | (१९) | ब | (२०) | अ |
| (२१) | क | (२२) | ड | (२३) | क | (२४) | ब | (२५) | क | (२६) | अ |
| (२७) | क | (२८) | ब | (२९) | क | (३०) | ड | | | | |

(३१) महाराष्ट्रात एका जिल्ह्यात सर्वांत जास्त तालुक्यांची संख्या .......... आहे.
(अ) १६ (ब) ११ (क) १३ (ड) १२

(३२) महाराष्ट्रात एका जिल्ह्यात १५ तालुके असणारे एकूण .......... जिल्हे आहेत.
(अ) ४ (ब) २ (क) ७ (ड) ५

(३३) महाराष्ट्र राज्याच्या .......... बाजूला कर्नाटक व गोवा ही राज्ये आहेत.
(अ) दक्षिण (ब) पूर्व (क) पश्चिम (ड) उत्तर

(३४) महाराष्ट्राच्या वायव्य भागात .......... च्या सीमारेषा आहेत.
(अ) मध्य प्रदेश (ब) आंध्र प्रदेश
(क) गुजरात राज्य, दादरा व नगर-हवेली (ड) कर्नाटक व गोवा

(३५) महाराष्ट्राच्या पूर्वेस .......... या नैसर्गिक सीमा निर्माण करतात.
(अ) सातमाळा डोंगररांगा व गाळणा टेकड्या (ब) सातपुडा पर्वतरांगा व गाविलगड टेकड्या
(क) चिरोली टेकड्या व भामरागड डोंगर (ड) अरबी समुद्र

(३६) महाराष्ट्राच्या पूर्वेस .......... ला गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याच्या सरहद्दी भिडलेल्या आहेत.
(अ) गुजरात (ब) आंध्र प्रदेश (क) कर्नाटक (ड) छत्तीसगड

(३७) महाराष्ट्रात सर्वांत जास्त तालुके .......... विभागात आहेत.
(अ) औरंगाबाद (ब) नागपूर (क) पुणे (ड) अमरावती

(३८) महाराष्ट्रात सर्वांत कमी तालुके .......... विभागात आहेत.
(अ) नाशिक (ब) पुणे (क) नागपूर (ड) कोकण (मुंबई)

(३९) महाराष्ट्रात .......... जिल्ह्यात एकही तालुका नाही.
(अ) मुंबई उपनगर (ब) मुंबई शहर (क) धुळे (ड) हिंगोली

(४०) महाराष्ट्रात एकूण तालुक्यांची संख्या .......... आहे.
(अ) २३५ (ब) ४५७ (क) ३५८ (ड) ३३५

(४१) महाराष्ट्रात .......... व .......... जिल्ह्यांत तालुक्यांची संख्या ३२ आहे.
(अ) नांदेड व यवतमाळ (ब) ठाणे व नांदेड (क) यवतमाळ व रायगड (ड) नाशिक व जळगाव

(४२) महाराष्ट्रात औरंगाबाद विभागात सर्वांत जास्त तालुक्यांची संख्या .......... आहे.
(अ) ६४ (ब) ५८ (क) ५६ (ड) ७६

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (३१) | अ | (३२) | ड | (३३) | अ | (३४) | क | ३५) | क | (३६) | ड |
| (३७) | अ | (३८) | ड | (३९) | ब | (४०) | क | (४१) | अ | (४२) | ड |

# २. रचनात्मक (प्राकृतिक) भूगोल

## महाराष्ट्राचे मुख्य रचनात्मक (प्राकृतिक) विभाग

महाराष्ट्राचे रचनात्मकदृष्ट्या (प्राकृतिकदृष्ट्या) प्रमुख तीन विभाग पडतात.

(१) **कोकण किनारपट्टी**

(२) **सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट, सह्याद्रीच्या व सातपुडा पर्वताच्या डोंगररांगा**

(३) **महाराष्ट्र पठार किंवा दख्खन पठारी प्रदेश किंवा देश (नकाशा क्र. २.१ पाहा.)**

### १. कोकण किनारपट्टी

महाराष्ट्राच्या पश्चिम भागात दक्षिणोत्तर पसरलेली लांब व चिंचोळी किनारपट्टी आहे. या किनारपट्टीच्या पूर्वेस दक्षिणोत्तर पसरलेला सह्याद्री पर्वत भिंतीसारखा उभा आहे, तर त्याच्या पश्चिमेस अरबी समुद्र पसरलेला आहे. **सह्याद्री पर्वत व अरबी समुद्र यांच्या दरम्यान असलेल्या या लांबट चिंचोळ्या सखल भागालाच 'कोकण' म्हणतात.**

**कोकणची निर्मिती :** महाराष्ट्राच्या पश्चिमेला व अरबी समुद्राला लागून असलेल्या सह्याद्री पर्वताचा प्रस्तरभंग होऊन कोकण किनारपट्टी तयार झाली. तसेच मुंबईजवळील जलमग्न अरण्यांचा प्रदेश असे दर्शवितो की, किनारपट्टीवर समुद्राची पातळी उंचावली गेली असावी. म्हणजेच किनाऱ्याचे निम्मजन (खचणे) झालेले आहे. ज्वालामुखी क्रियेचे अवशेष गरम पाण्याच्या रूपाने आढळतात. उदाहरणार्थ, वज्रेश्वरी येथील गरम पाण्याचे झरे.

**लांबी, रुंदी व क्षेत्रफळ :** कोकण किनारपट्टीची दक्षिणोत्तर लांबी सुमारे ७२० कि. मी. आहे. उत्तरेस डहाणूपासून दक्षिणेस वेंगुर्ल्यापर्यंत किंवा उत्तरेस दमणगंगा नदीपासून दक्षिणेस तेरेखोल नदीपर्यंत कोकणचा विस्तार आहे.

पश्चिम घाटामुळे कोकणची रुंदी मात्र सर्वत्र सारखी नाही. सरासरी रुंदी ३० ते ६० कि. मी. आहे. मुंबईच्या उत्तरेस तुलनात्मकदृष्ट्या सह्याद्री पर्वत पठाराकडे वळल्याने तिची रुंदी अधिक आहे. उत्तरेकडे काही भागांत किनारपट्टी ९० ते ९५ कि. मी. रुंद आहे. उदाहरणार्थ, उल्हास नदीच्या खोऱ्यात कोकणची रुंदी १०० कि. मी. आहे, तर दक्षिणेकडे काही भागांत ती ४० ते ४५ कि. मी. इतकी कमी रुंद आहे. **कोकणचे भौगोलिक क्षेत्रफळ सुमारे ३०,३९४ चौ. कि. मी.** आहे.

**कोकणची प्राकृतिक रचना :** सह्याद्री पर्वतामधून निघालेले डोंगराचे कडे पश्चिमेस किनाऱ्यापर्यंत जातात. त्यामुळे कोकणचा सर्वच भाग म्हणजे **एक सलग मैदान नाही. हा डोंगरदऱ्यांनी व्यापलेला परंतु कमी उंचीचा सखल भाग आहे.** अनेक ठिकाणी कमी उंचीच्या टेकड्या व डोंगरांचे सुळके आढळतात. सह्याद्री पर्वतामधून निघून अरबी समुद्रास मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यात सखल व काहीसा मैदानी भाग आढळतो. **किनाऱ्याजवळ वाळूचे पट्टे आहेत.** किनारपट्टीजवळ सखल भागाची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची सुमारे १५ मीटर इतकीच आहे. **किनाऱ्यापासून पूर्वेकडे सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंत ही उंची सुमारे २५० मीटरपर्यंत वाढते.** सह्याद्रीच्या पायथ्याशी उतार मंद आहे. **प्रदेशाचा सर्वसाधारण उतार पूर्व-पश्चिम दिशेने आहे.**


**उपविभाग : उत्तर कोकण व दक्षिण कोकण :** कोकणचे दोन उपविभाग पाडले जातात. त्यापैकी पहिला म्हणजे उत्तर कोकण व दुसरा दक्षिण कोकण आहे. **उत्तर कोकणात मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व दक्षिण कोकणात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश** केला जातो. उत्तर कोकणापेक्षा दक्षिण कोकण अधिक खडकाळ, डोंगराळ असून शहरे कमी व वाहतुकीच्या सोईही कमी आहेत.

**खलाटी व वलाटी :** कोकणामध्ये सखल प्रदेशाची उंची पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते. त्यांचे उंचीनुसार खलाटी व वलाटी असे दोन भाग पडतात. **पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या सखल भागास 'खलाटी' असे म्हणतात.** त्याची **समुद्रसपाटीपासूनची उंची फार कमी आहे. खलाटीच्या पूर्वेस जो डोंगराळ भाग आहे त्यास 'वलाटी' असे म्हणतात.** या प्रदेशाची **साधारण उंची २७५ ते ३०० मीटरपर्यंत** आहे. जसजसे सह्याद्रीच्या पायथ्यालगत जावे तसतशी त्याची उंची वाढत जाते.

**खाड्या :** कोकणमधील नद्या सह्याद्री पर्वतात उगम पावून खाली उतरतात व सखल भागातून वाहत अरबी समुद्रास मिळतात. सागरास भरती येते, तेव्हा भरतीचे पाणी नद्यांच्या मुखातून बरेच आतपर्यंत येते. **भरतीचे पाणी नदीच्या मुखात जेथपर्यंत आत शिरते तेवढ्या नदीच्या भागाला 'खाडी' म्हणतात.**

कोकणचा किनारा अनेक खाड्यांनी बनलेला आहे. मुंबईच्या उत्तरेस **दातीवरा व वसईची खाडी** आहे, तर वसईच्या दक्षिणेस जयगडपर्यंत **धरमतर, राजपुरी, बाणकोट, दाभोळ व जयगडच्या खाड्या** आहेत, तर त्याच्या दक्षिणेस **विजयदुर्गची खाडी, कर्लीची खाडी** व कोकणच्या दक्षिण सरहद्दीजवळ **तेरेखोलची खाडी** आहे.

**कोकणची किनारपट्टी रिया प्रकारची आहे.** किनाऱ्यावरील खडकात मालवण व हर्णे दरम्यान गुहा आढळतात.




**महाराष्ट्र : प्राकृतिक रचना :**

महाराष्ट्राचे प्राकृतिकदृष्ट्या कोकण किनारपट्टी, सह्याद्री पर्वत – डोंगराळ प्रदेश व महाराष्ट्र पठार असे तीन प्रमुख विभाग पडतात. अरुंद चिंचोळ्या किनारपट्टीचा भाग सखल व डोंगराळ आहे. किनारपट्टीस सह्याद्री पर्वत समांतर आहे. सह्याद्रीपासून शंभू महादेव डोंगररांगा, हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगा व सातमाळा डोंगररांगा पठारावर आहे. महाराष्ट्राचा बराचसा भाग दख्खनच्या पठाराने व्यापलेला आहे.

**नकाशा क्र. २.१ : महाराष्ट्र राज्य - प्राकृतिक रचना**

**सागरी किल्ले :** महाराष्ट्रात काही किल्ले जसे उंच पर्वत-पठाराच्या माथ्यावर आहेत, तसेच काही किल्ले सागर किनाऱ्यावर किंवा समुद्रातील खडकांवर बांधलेले आहेत. त्यांना 'सागरी किल्ले' म्हणतात. शिवाजी महाराजांच्या काळात व त्यानंतर बऱ्याच काळपर्यंत सीमांवरचे हे जागते पहारेकरी होते. उदाहरणार्थ, **वसईचा किल्ला, जंजिरा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग.**

**बंदरे :** महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीवर **मुंबई हे नैसर्गिक आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे बंदर** आहे. भारताचा बराचसा व्यापार याच बंदरातून चालतो. अलीकडे मुंबई बंदराचा ताण कमी करण्यासाठी **मुंबईजवळच न्हावा-शेवा हे बंदर उभारलेले आहे. मुंबईच्या दक्षिणेस अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, जयगड, रत्नागिरी, मालवण व वेंगुर्ला यांसारखी बंदरे आहेत.** या बंदरांची परस्परांत वाहतूक चालते. **महाराष्ट्रात एकूण ४९ बंदरे आहेत.**

ही बंदरे फार पूर्वीपासून व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत. प्राचीन व मध्ययुगीन काळात ग्रीस, रोम, इजिप्त व अरबस्तानाबरोबर व्यापार चालत असे.



कोकण किनारपट्टीजवळ अरबी समुद्रात सापडलेला 'बॉम्बे हाय' खनिज तेलसाठा तसेच वसई आणि रत्नागिरी येथे सापडलेले तेल यामुळे कोकणचा विकास होण्यास बराच वाव आहे.

**बेटे : मुंबई, साष्टी, खांदेरी, उंदेरी, घारापुरी व अंजदीव ही बेटे** कोकणातच समाविष्ट होतात.

## २. सह्याद्री पर्वत किंवा पश्चिम घाट, सह्याद्रीच्या व सातपुडा पर्वताच्या डोंगररांगा

**भारताच्या पश्चिम किनारपट्टीस सह्याद्री समांतर पर्वत** आहे. हा पर्वत **दख्खनच्या पठाराची पश्चिम सरहद्द निश्चित** करतो. उत्तरेस **तापी नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत सह्याद्री** पसरलेला आहे. त्याची **लांबी सुमारे १६०० कि. मी.** आहे. यापैकी **महाराष्ट्रात ४४० कि. मी. लांबीचा सह्याद्री पर्वत** आहे. यास **'पश्चिम घाट'** या नावानेही ओळखले जाते. त्याची **सरासरी उंची १२०० ते १३०० मीटर** आहे. **सह्याद्रीची उंची उत्तरेकडे वाढत जाते, तर दक्षिणेकडे कमी होत जाते.** सह्याद्री पर्वत आपली विशाल नजर पश्चिमेस असलेल्या अरबी समुद्रावर फिरवित असतो. समुद्रकिनाऱ्यास समांतर असणारा हा पर्वत किनाऱ्यापासून ३० ते ६० कि. मी. अंतरावर आहे.

पश्चिम किनारपट्टीच्या मैदानी प्रदेशाकडून (कोकणकडून) पर्वताकडे पाहिल्यास **सह्याद्री सरळ भिंतीसारखा** दिसतो. किनाऱ्याच्या सखल प्रदेशावरून सरळ कड्यासारख्या दिसणाऱ्या भूप्रदेशाची **उंची काही ठिकाणी १००० मी. पर्यंत** आहे. **पश्चिमेकडे सह्याद्रीचा उतार एकदम तीव्र** आहे.

**पूर्वेकडून पाहिल्यास पठारावर सह्याद्रीचा उतार इतका मंद आहे की, ती एक डोंगरांची रांग वाटते** आणि हा मंद उताराचा प्रदेश हळूहळू दख्खनच्या पठारात विलीन होत जातो. वैतरणा व सावित्री नद्यांच्या उगमाच्या क्षेत्राजवळ **सह्याद्री पर्वत कंकणाकृती** झालेला आहे.

**सह्याद्री पर्वत नद्यांचा जलविभाजक :** दख्खनच्या पठाराच्या पश्चिमेस असलेल्या सह्याद्री पर्वतावरून कोकणचा सखल प्रदेश पाहता येतो. **सह्याद्री पर्वतरांगांमुळे अरबी समुद्रास मिळणाऱ्या पश्चिमवाहिनी नद्यांचे आणि बंगालच्या उपसागरास मिळणाऱ्या पूर्ववाहिनी नद्यांचे जलविभाजक वेगवेगळे झालेले आहेत.** याशिवाय किनारपट्टीचा सखल प्रदेश आणि देशावरचा पठारी प्रदेश अलग झालेला आहे. उत्तर-दक्षिण दिशेने सह्याद्री रांग असून समुद्रकिनाऱ्यास सर्व ठिकाणी समांतर आहेच असे नाही. **सह्याद्रीच्या घाटमाथ्याची उंची निरनिराळी आहे आणि प्रत्येक ठिकाणी ती जलविभाजक आहेच असे नाही.** नद्यांच्या अपक्षरण (खनन) कार्यामुळे जलविभाजकांचे स्थान बदललेले आहे.

**दख्खनच्या पठारावरील नद्यांच्या उगमस्थानाचे प्रदेश :** दख्खनच्या पठारावरील महत्त्वाच्या नद्यांची उगमस्थाने सह्याद्री पर्वतामध्ये आहेत.

(१) गंगा नदीच्या खालोखाल असलेली गोदावरी नदी महाराष्ट्रातच वाहते. **नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वरजवळ गोदावरीचा** उगम आहे. नाशिक शहरात येईपर्यंत गोदावरी नदी २० कि. मी. लांबीच्या घळईतून वाहते.

(२) कृष्णा नदीची महत्त्वाची उपनदी **भीमा** आहे. सह्याद्रीमध्ये गोदावरी नदीच्या उगमाच्या दक्षिणेस सुमारे १०० कि. मी. अंतरावर **भीमाशंकर येथे भीमा नदी उगम** पावते.

(३) भीमा नदीच्या दक्षिणेस **महाबळेश्वर येथे कृष्णा नदीचा उगम** आहे, तसेच **कोयना** नदीही तेथूनच उगम पावते.

वरील महत्त्वाच्या नद्यांप्रमाणेच **गोदावरी, भीमा आणि कृष्णा नद्यांच्या बऱ्याच उपनद्यांचा उगम सह्याद्री पर्वतामध्ये झाला आहे.**

**सह्याद्री पर्वतामधील महत्त्वाची शिखरे :** सह्याद्री पर्वतात अनेक महत्त्वाची शिखरे आहेत. त्यापैकी काही शिखरांचा उल्लेख येथे करण्यात आलेला आहे. (१) **सह्याद्री पर्वतातील सर्वांत उंच शिखर कळसूबाई आहे.** त्याची **उंची १६४६ मी.** आहे. त्याचे भौगोलिक स्थान गोदावरीची उपनदी प्रवरा नदीच्या उगमाजवळ (इगतपुरीजवळ) आहे. (२) नाशिकच्या उत्तरेस सुमारे ९० कि. मी. अंतरावर **साल्हेर शिखर दोन क्रमांकाचे** आहे. त्याची **उंची १५६७ मी.** आहे. (३) नाशिकच्या उत्तरेस **सप्तश्रृंगी (१४१६ मी.), त्र्यंबकेश्वर (१३०४ मी.)** ही महत्त्वाची शिखरे आहेत. याशिवाय नाशिक जिल्ह्यात **तौला,** धुळे जिल्ह्यात **हनुमान;** नंदुरबार जिल्ह्यात **अस्तंभा,** पुणे जिल्ह्यात **तोरणा** यांसारखी शिखरे महत्त्वाची आहेत.

**घाटमाथा किंवा पर्वतमाथा व किल्ले :**

**सह्याद्री पर्वताच्या व त्याच्या शिखरांवर उंच व रुंद सपाट प्रदेशाला 'घाटमाथा' असे म्हणतात.** बऱ्याच ठिकाणी ते संपूर्णपणे सपाट प्रदेशाचे आहेत. उदाहरणार्थ, नेरळजवळील **माथेरान,** साताऱ्याजवळील **पाचगणी व महाबळेश्वर** (१४३८ मी.) हे प्रसिद्ध घाटमाथे आहेत. **ही थंड हवेची ठिकाणे म्हणूनही प्रसिद्ध आहेत.**

**किल्ले :** सह्याद्री पर्वतांच्या अशा अनेक घाटमाथ्यांवर **शिवनेरी, रायगड, सिंहगड, प्रतापगड, पन्हाळगड, विशाळगड** असे अनेक किल्ले बांधण्यात आलेले आहेत. शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्यांचा नीट बंदोबस्त ठेवलेला होता व या किल्ल्यांनी महाराष्ट्राचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले होते.

**घाट किंवा खिंड :** पर्वतांच्या रांगा जेव्हा लांबच-लांब पसरलेल्या असतात तेव्हा त्या उंच, लांब रांगांमध्ये कमी उंचीचा भाग असतो. या अशा कमी उंचीच्या भागास 'खिंड' म्हणतात.

नद्यांच्या अपक्षरण (खनन) कार्यामुळेही पर्वतरांगांची सलगता खंडित होते. त्या खिंड म्हणून ओळखल्या जातात. या खिंडीमधून वाहतुकीचे मार्ग जातात. वाहतुकीच्या या ठिकाणाला 'घाट' असे म्हणतात.

सह्याद्री पर्वतात अशा प्रकारचे पुढील महत्त्वाचे घाट आहेत. सह्याद्री पर्वतात उत्तरेकडून दक्षिणेकडे पर्वतरांगांवरून गेल्यास थळघाट, माळशेज, आंबेनळी, बोरघाट, कुंभार्ली घाट, आंबा घाट, फोंडा घाट आणि आंबोली घाट यांसारखे महत्त्वाचे घाट आढळतात. हे घाट म्हणजे कोकण व महाराष्ट्र पठार यांना जोडणारे दुवे आहेत. (नकाशा क्र. २.२ पाहा.)

(१) **थळघाट :** नाशिकच्या नैर्ऋत्येस ३५ कि. मी. अंतरावर थळघाट आहे. मुंबईहून नाशिककडे जाणारा रेल्वेमार्ग कसाराजवळ थळघाटातूनच जातो.

(२) **बोरघाट :** पुण्याच्या वायव्येस ७० कि. मी. अंतरावर बोरघाट आहे. पुणे-मुंबई दरम्यानचा रेल्वेमार्ग खंडाळ्याजवळून असलेल्या बोरघाटातून जातो.

सह्याद्री पर्वतातील इतर जे घाट आहेत ते कोकण व देश यांचा संपर्क साधण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. कुंभार्ली घाटातून कोकणात चिपळूण-पोफळी भागात जाता येते तर आंबा घाटातून रत्नागिरीकडे जाता येते. फोंडा आणि आंबोली घाट मालवण, वेंगुर्ला आणि दक्षिणेस गोव्याकडे जाण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

**राजकीय स्वरूप :** सह्याद्रीच्या पर्वतमय भागात नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांत पश्चिम भागाचा तर ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या काही पूर्व भागांचा समावेश होतो.

## सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा किंवा डोंगराळ प्रदेश

सह्याद्री पर्वताच्या लहान-मोठ्या डोंगररांगा सह्याद्रीपासून सर्वसाधारणपणे पूर्वेकडे जातात. तापी-पूर्णा खोऱ्यांच्या दक्षिणेस या रांगा पसरलेल्या आहेत. महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेचे ते एक वैशिष्ट्य आहे असे म्हणावयास हरकत नाही. या सर्व डोंगररांगांची निर्मिती मुख्य सह्याद्री पर्वतापासून झालेली आहे आणि यांच्या साधारण दिशा वायव्य-आग्नेय आहेत. स्थानिक आधारतल रेषेच्या वर डोंगरांची उंची २०० ते ३०० मी. दरम्यान आहे. बऱ्याच ठिकाणी डोंगरास तीव्र कडे आहेत. पठारावरून वाहणाऱ्या नद्यांचे या डोंगररांगा उपजलविभाजक आहेत. महत्त्वाच्या डोंगररांगा तसेच त्यांच्या लहान टेकड्यांना भिन्न-भिन्न स्थानिक नावे आहेत.

सह्याद्री पर्वताच्या खालील तीन मोठ्या डोंगररांगा आहेत.

(अ) शंभूमहादेव डोंगररांगा, (ब) हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगा, (क) सातमाळा-अजिंठा डोंगररांगा.

**(अ) शंभूमहादेव डोंगररांगा :** सह्याद्री पर्वतापासून ही डोंगररांग सुमारे १८° उत्तर अक्षवृत्तापासून आग्नेय दिशेने जाते. रायरेश्वरापासून शिंगणापूरपर्यंत पसरलेल्या रांगेला 'शंभूमहादेव डोंगर' असे म्हणतात. या डोंगररांगा सातारा व सांगली जिल्ह्यांतून पुढे कर्नाटकात जातात. भीमा नदीच्या खोऱ्याच्या दक्षिणेस शंभूमहादेव डोंगर आहे. यामुळे भीमा व कृष्णा या नद्यांची खोरी वेगवेगळी झालेली आहेत. महाराष्ट्रात पठारावरील दक्षिणेकडील सर्वांत मोठी शंभूमहादेव डोंगररांग आहे. शंभूमहादेव डोंगरावर काही ठिकाणी सपाट माथ्याचे प्रदेश आहेत. उदाहरणार्थ, वाईजवळील पाचगणी व महाबळेश्वर, 'टेबल लँड' या नावाने पाचगणी पठार प्रसिद्ध आहे.

**(ब) हरिश्चंद्र–बालाघाट डोंगररांगा :** गोदावरीच्या दक्षिणेस हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांग आहे. तिच्यामुळे गोदावरी व भीमा यांची खोरी वेगळी होतात. या डोंगररांगांच्या पश्चिम भागास 'हरिश्चंद्र घाट' व पूर्व भागास 'बालाघाट' या नावाने ओळखले जाते. पुढे हीच रांग आग्नेयेस वळून आंध्र प्रदेशातील हैद्राबादपर्यंत जाते. शंभूमहादेव डोंगररांगांप्रमाणेच या डोंगररांगांवरही सपाट माथ्याचे प्रदेश आहेत. उदाहरणार्थ, अहमदनगर जिल्ह्यातील हरिश्चंद्रगडापासून पूर्वेकडे पसरलेली सह्याद्रीची शाखा अकोळनेरजवळ पठारात विलीन होऊन जेऊरजवळ पुन्हा डोके वर काढते. पूर्वेस डोंगराची उंची ६०० मीटर आहे. बालाघाट हा सपाट माथ्याचा प्रदेश आहे.

**(क) सातमाळा–अजिंठा डोंगररांगा :** गोदावरी व तापी नदीच्या खोऱ्यांना वेगळी करणारी सातमाळा-अजिंठा डोंगररांग आहे. पूर्वेकडे हिची उंची कमी-कमी होत जाते. नाशिक जिल्ह्यात सातमाळा डोंगररांग आहे. अजिंठा टेकड्यांचा उतार उत्तरेकडे तीव्र असून दक्षिणेकडे गोदावरी नदीच्या खोऱ्याकडे मंद आहे. देवगिरीचा (दौलताबाद) इतिहासप्रसिद्ध किल्ला व अजिंठ्याची जगप्रसिद्ध लेणी याच डोंगरांत उत्तरेकडील उतारावर वाघूर नदीच्या वळणाच्या खडकात आहे. ही डोंगररांग तुटक-तुटक असून तिची साधारण दिशा पश्चिम-पूर्व आहे. वेरूळ डोंगरात वेरूळ लेणी आहे. डोंगराच्या पश्चिम भागास 'सातमाळा डोंगर' असे म्हणतात. नाशिक जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यात सातमाळा डोंगर सुरू होतो. पुढे याच्या रांगा मनमाडच्या पलीकडे अंकाई-टंकाईपासून 'अजिंठा टेकड्या' म्हणून ओळखल्या जातात. सातमाळा-अजिंठा डोंगररांगांच्या पूर्वेस उतार मंद स्वरूपाचा आहे तर पश्चिम बाजूस तीव्र उतार आढळतो.



## अन्य डोंगर किंवा टेकड्या

महाराष्ट्रात काही वैशिष्ट्यपूर्ण डोंगर किंवा टेकड्या पठारावर आढळतात. उदाहरणार्थ, धुळे जिल्ह्यात गाळणा डोंगर, औरंगाबाद जिल्ह्यात वेरूळ डोंगर, हिंगोली व नांदेड जिल्ह्यांत अनुक्रमे हिंगोली व मुदखेड डोंगर आहेत. विदर्भात नागपूर जिल्ह्यात गरमसूर डोंगर, गोंदिया जिल्ह्यांत दरकेसा टेकड्या, गडचिरोली जिल्ह्यात चिरोली टेकड्या, भामरागड व सूरजागड डोंगर आहेत. पूर्वेकडे अजिंठ्यापासून डोंगरांचे दोन सुळके होतात. त्यापैकी एक रांग देवगिरी सिंदखेडवरून दक्षिणेस परभणी व नांदेड जिल्ह्यातून जाते. तिला 'निर्मल रांग' असे म्हणतात तर उत्तरेस असणारी रांग यवतमाळ जिल्ह्यातून जाते.

## सातपुडा पर्वतरांग व डोंगररांगा

महाराष्ट्राच्या उत्तर सरहद्दीजवळ सातपुडा रांग पसरलेली आहे. महाराष्ट्रात सातपुडा पर्वतरांगेचा फारच थोडा भाग समाविष्ट होतो. पूर्व-पश्चिम दिशेने पसरलेल्या सातपुडा पर्वतरांगेमुळे नर्मदा व तापी नदीचे खोरे अलग झालेले आहे.

**सातपुडा पर्वताच्या डोंगररांगा :** महाराष्ट्रामध्ये सातपुड्याच्या काही डोंगररांगा उत्तर महाराष्ट्रात विखुरलेल्या आहेत. नंदुरबार जिल्ह्यात पश्चिम भागात तोरणमाळ हे एक लहान आकाराचे पठार असून त्याची उंची १०३६ मी. आहे तर त्या भागातील सर्वांत जास्त उंचीचे शिखर अस्तांभा डोंगर असून त्याची उंची १३२५ मी. आहे. या डोंगररांगांवरून तापी नदीचे पात्र पाहावयास मिळते.

सातपुडा पर्वतरांगांचा काही भाग अमरावती जिल्ह्याच्या उत्तर भागात आढळतो. त्यास गाविलगड टेकड्या असे म्हणतात. त्याची रुंदी २० ते ४० कि. मी. आहे. या ठिकाणी डोंगराची उंची १००० मी. पेक्षा जास्त आहे. येथील वैराट हा डोंगर महत्त्वाचा आहे. वैराट शिखराची उंची ११७७ मी. तर चिखलदराची उंची १११५ मी. आहे. अमरावतीच्या गाविलगड टेकड्यांचा दक्षिण उतार अतिशय तीव्र स्वरूपाचा आहे. १२०० मी. पासून एकदम ३०० मी. पर्यंत प्रदेशाची उंची कमी होते. या तीव्र कड्याची लांबी बरीच आहे.

# ३. महाराष्ट्र पठार किंवा दख्खन पठारी प्रदेश किंवा देश

सह्याद्री पर्वताच्या पूर्वेस विशाल असा पठारी प्रदेश पसरलेला आहे. त्यास 'महाराष्ट्र पठार' किंवा 'दख्खन पठारी प्रदेश' असे म्हटले जाते. सर्वसामान्य लोक त्यास व्यवहारात 'देश' असे म्हणतात. हा पठारी प्रदेश मूळ दख्खनच्या पठाराचा सर्वांत मोठा भाग आहे. नद्यांच्या खोऱ्यांनी महाराष्ट्र पठार तयार झालेले आहे. डोंगरांच्या दरम्यान आलटून-पालटून नद्यांची खोरी आढळतात. पठाराचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. या पठाराची पश्चिम सरहद्द सह्याद्री पर्वताने निश्चित केलेली आहे तर उत्तर व पूर्व सरहद्द सर्वसाधारणपणे ३०० मी. समोच्च रेषेने तयार झालेली आहे. महाराष्ट्र पठाराची पूर्व-पश्चिम लांबी ७५० कि. मी. आहे. हे अंतर सह्याद्री पर्वताच्या पूर्व उतारापासून विदर्भातील गोंदिया जिल्ह्यातील दरकेसा टेकड्या, गडचिरोली जिल्ह्यातील सूरजागड, भामरागड व चिरोली टेकड्यापर्यंत आहे. महाराष्ट्र पठाराची दक्षिणोत्तर रुंदी सुमारे ७०० कि. मी. आहे. हे अंतर उत्तरेस सातपुडा पर्वतापासून दक्षिणेस कोल्हापूर जिल्ह्यापर्यंत आहे. पठाराचा उतार पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतसा १००० मी. ला १ मी. याप्रमाणे कमी-कमी होत जातो. पठाराची सर्वसाधारण उंची ४५० मी. आहे. महाराष्ट्राचा ९०% भूभाग दख्खनच्या पठाराने व्यापलेला आहे. पठाराची पश्चिम भागात उंची ६०० मीटर तर पूर्व भागात ३०० मीटर उंची आहे. विदर्भात वर्धा-वैनगंगेच्या खोऱ्यात असलेल्या डोंगरांची उंची ४०० ते ४५० मीटर दरम्यान आहे.

## महाराष्ट्र पठाराची निर्मिती


महाराष्ट्र पठाराची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झाली आहे. सुमारे ७० दशलक्ष वर्षांपूर्वी दख्खनच्या प्रदेशात भूपृष्ठावर प्रचंड भेग पडून भ्रंशमूलक उद्रेक झाला आणि लाव्हारसाचे संचयन झाले. अशा प्रकारचे उद्रेक अधूनमधून सतत होत गेले व प्रत्येक वेळी लाव्हारसाचे संचयन झाले. लाव्हारसापासून महाराष्ट्र पठार तयार झाल्याने त्यास 'दख्खन लाव्हा' या नावानेही ओळखले जाते. लाव्हारसाचे अशा प्रकारचे संचयन सुमारे २९ वेळा उद्रेक होऊन सरतेशेवटी पठार तयार झाले. हा लाव्हारस प्रामुख्याने बेसिक प्रकारचा आहे. दख्खनच्या पठाराच्या पश्चिम बाजूस विस्तीर्ण कडा आहेत व त्यापासून पश्चिम घाटाची निर्मिती झाली, मुंबई समुद्राच्या बाजूकडे पठाराची जाडी जास्त आहे.

## दख्खनची पठारे

दख्खनच्या पठारी प्रदेशात डोंगररांगांवर काही भागांत लहान-लहान पठारे तयार झालेली आहेत.

(१) बालाघाट डोंगरावर अहमदनगर-बालाघाट पठार तयार झालेले आहे. या पठारामुळे उत्तरेस गोदावरी व दक्षिणेस भीमा नदीचे खोरे अलग झालेले आहे. या पठाराची पश्चिमेकडील उंची ८५० मी. व पूर्वेकडील उंची ६०० मी. आहे. या पठाराचा उतार सर्वसाधारणपणे वायव्य-आग्नेय असून त्याचे मोठ्या प्रमाणात अपक्षय (विदारण) झालेले आहे. या प्रदेशातून मुळा आणि सीना नद्या वाहतात.

(२) शंभू महादेव डोंगरांच्या उंचवट्याच्या भागात **सासवडचे पठार** आहे.
(३) तसेच **औंध पठार** आणि **खानापूर-जत पठारही** आहे.
(४) सातमाळा-अजिंठा डोंगरावरील सपाट प्रदेश **बुलडाणा पठार व मालेगाव पठार** आहे.
(५) मराठवाड्यात **मांजरा पठार** आहे.
(६) उत्तरेकडे धुळे-नंदुरबार जिल्ह्यात सातपुडा रांगांमुळे **तोरणमाळ पठार** आहे.




**महाराष्ट्र : शिखरे, खिंडी (घाट), पठार व डोंगररांगा :**

महाराष्ट्रात सर्वांत उंच शिखर कळसूबाई आहे. याचप्रमाणे साल्हेर, तौला, हनुमान ही महत्त्वाची शिखरे आहेत. थळ, बोर, कुंभार्ली, आंबा, फोंडा व आंबोली घाट महत्त्वाचे आहेत. तोरणमाळ, मालेगाव, अहमदनगर, सासवड, औंध, खानापूर, बुलडाणा ही पठारे आहेत. तसेच अस्तांभा, गाळणा, वेरूळ, हिंगोली, गाविलगड, गरमसूर, दरकेसा, चिरोली, सूरजागड व भामरागड डोंगर आहेत.

**नकाशा क्र. २.२ : महाराष्ट्र : शिखरे, खिंडी, पठार, डोंगर**

## दख्खनच्या पठारावरील खोऱ्यांचा प्रदेश

**महाराष्ट्राचा पठारी प्रदेश किंवा दख्खनचे पठार मुख्यत्वेकरून नद्यांच्या खोऱ्यांसाठी प्रसिद्ध आहे.** कारण या नद्यांच्या खोऱ्यांनी पठाराचा बराचसा भाग व्यापलेला आहे. **सह्याद्रीमध्ये उगम पावलेल्या गोदावरी, भीमा व कृष्णा या नद्या पूर्वेकडे वाहत जातात.** डोंगररांगांचा मृदू खडकांचा भाग नदीप्रवाहाने झिजलेला आहे, तर अतिशय कठीण खडक डोंगर म्हणून शिल्लक राहिलेला आहे. वरील डोंगररांगांमुळेच महाराष्ट्र पठाराचे नद्यांच्या खोऱ्याच्या रूपाने भाग पडलेले आहेत.



महाराष्ट्र पठारावर उत्तरेकडून दक्षिणेकडे आल्यास नद्यांची पुढील खोरी पाहावयास मिळतात :

**(१) तापी-पूर्णा खोरे, (२) गोदावरी खोरे, (३) प्राणहिता खोरे, (४) भीमा खोरे, (५) कृष्णा खोरे.**

**(१) तापी-पूर्णा खोरे :** महाराष्ट्र पठारावरील तापी-पूर्णा खोरे जरी भूगर्भशास्त्रीयदृष्ट्या व लोकांच्या बोलीभाषेने विशेषत: महाराष्ट्राशी निगडित असले तरी अनेक बाबतींत भिन्नता आढळते.

विशेषत: भूरचनेच्या दृष्टीने पाहता महाराष्ट्रातील गोदावरी, भीमा, कृष्णा नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात तर **तापी नदी मात्र पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते.** उत्तरेस तापी-पूर्णा खोरे मध्य प्रदेशापासून **सातपुडा पर्वतरांगांमुळे पठाराच्या इतर भागांपासून अलग** झालेले आहे. **तापी-पूर्णा खोरे हा वास्तविक पाहता खचदरीचा प्रदेश आहे.** पश्चिमेकडे ते गुजरातच्या मैदानाकडे उतरत जाते, तर पूर्वेस साधारण प्रतीच्या जलविभाजकांमुळे वर्धा खोऱ्यापासून वेगळे झालेले आहे. **मध्य प्रदेशात सातपुडा पर्वतरांगांमध्ये तापी नदी उगम पावते** आणि पश्चिमेकडे वाहत जाते. **तापी नदीला पूर्णा ही उपनदी मिळते.**

तापी-पूर्णा खोऱ्याचा खचदरीचा भाग उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे सातपुडा पर्वत व सातमाळा-अजिंठा डोंगररांगांनी मर्यादित झालेला असून **पात्रामधून या रांगा तीव्र कडद्यासारख्या भासतात.**

**(२) गोदावरी खोरे : महाराष्ट्रातील सर्वांत जास्त विस्ताराचे गोदावरी खोरे आहे.** उत्तरेस सातमाळा-अजिंठा डोंगरांमुळे गोदावरी खोरे हे तापी खोऱ्यापासून अलग झालेले आहे, तर दक्षिणेकडील बालाघाट डोंगररांग ही भीमा खोऱ्यापासून गोदावरी खोरे अलग करते.

गोदावरी खोऱ्याचा पश्चिमेकडील विस्तार अरुंद आहे. जसजशी नदी पूर्वेकडे वाहत जाते तसतसा तिचा विस्तार मात्र रुंद होत जातो. गोदावरी नदीस दोन्ही तीरावरून **अनेक उपनद्या येऊन मिळतात.** उदाहरणार्थ, **दुधना, पूर्णा, प्रवरा, सिंदफणा वगैरे.** या खोऱ्यांची सर्वसाधारण उंची ३०० ते ५५० मी. आहे. गोदावरी खोऱ्याच्या उगमाच्या क्षेत्राजवळ पश्चिमेस प्रदेशाची उंची १००० ते १५०० मी. आहे व ती पूर्वेकडे झपाट्याने कमी होते. **खोऱ्याचा आकार एखाद्या नरसाळ्याप्रमाणे दिसतो.**

बालाघाटाच्या दोन डोंगररांगांमधून अंबेजोगाईच्या दक्षिणेस मांजरा नदी वाहते. महाराष्ट्राच्या सीमेवर गोदावरी नदीस मांजरा नदी मिळते. त्यामुळे गोदावरीचे ते एक उपखोरेच आहे.

**(३) प्राणहिता खोरे :** विदर्भाच्या **पूर्वेकडील भाग वर्धा, वैनगंगा, पैनगंगा व प्राणहिता या नद्यांच्या खोऱ्यांनी व्यापलेला आहे.** प्रदेशाचा **सर्वसाधारण उतार उत्तर-दक्षिण** दिशेने आहे. या सर्व नद्या नागपूर मैदानावरून वाहत जाऊन गोदावरी नदीस मिळतात.

**(४) भीमा खोरे :** जरी भीमा ही कृष्णा नदीची उपनदी असली तरी **महाराष्ट्रात संपूर्णपणे स्वतंत्ररीत्या भीमा नदी वाहते, म्हणून भीमा खोऱ्याचा अलग खोरे म्हणून विचार** केला जातो. ती सह्याद्रीमध्ये भीमाशंकर येथे उगम पावून सुमारे ५०० कि. मी. पूर्वेस वाहत जाते आणि कर्नाटकात कृष्णा नदीस मिळते. **भीमा नदीच्या खोऱ्याचे क्षेत्र मध्य महाराष्ट्रात** पसरलेले आहे. उत्तरेस हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांग व दक्षिणेस शंभू-महादेव डोंगररांग यामुळे भीमा खोरे मर्यादित झालेले आहे. **भीमेला घोड, सीना तसेच मुळा, नीरा व माण या नद्या येऊन मिळतात.** या खोऱ्याच्या पश्चिमेस सह्याद्रीपर्यंत व पायथ्यालगत मावळ प्रदेश आहे. तेथील रांगा उत्तर-दक्षिण असून त्यावर अनेक शिखरे पाहावयास मिळतात. टेकड्यांचा दुसरा गट पूर्वेकडे असून तो सपाट माथ्यांचा आहे व तो हळूहळू पठारात विलीन होत जातो.

**(५) कृष्णा खोरे :** महाराष्ट्रात नद्यांच्या खोऱ्यांच्या दृष्टीने पाहता **सर्वांत कमी क्षेत्र कृष्णा खोऱ्याचे आहे. कृष्णा खोऱ्याने राज्याचा दक्षिण भाग व सह्याद्रीचा पूर्व भाग व्यापलेला आहे.** कृष्णा खोऱ्याची मर्यादा पश्चिमेस सह्याद्री पर्वत व पूर्वेस शंभू-महादेव रांगांनी निश्चित झालेली आहे. या खोऱ्यामध्ये कृष्णा नदीस अनेक उपनद्या मिळतात व त्या लहान-लहान डोंगररांगांनी अलग झालेल्या आहेत. कृष्णेस मिळणाऱ्या महत्त्वाच्या उपनद्या कोयना, वारणा, पंचगंगा, येरळा वगैरे आहेत.

## महाराष्ट्राची प्राकृतिक रचना

### कोकण किनारपट्टी :

**लांबी :** सुमारे ७२० कि. मी.; **रुंदी :** सरासरी ३० ते ६० कि. मी. ; **क्षेत्रफळ :** ३०, ३९४ चौ. कि. मी.
**उपविभाग :** (१) उत्तर कोकण : मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व रायगड. (२) दक्षिण कोकण : रत्नागिरी व सिंधुदुर्ग.
**खलाटी :** सागराजवळील सखल भाग. **वलाटी :** पूर्वेकडील डोंगराळ भाग (२७५ ते ३०० मी.)
**सागरी किल्ले :** (१) अर्नाळा (२) जंजिरा (३) सुवर्णदुर्ग (४) विजयदुर्ग (५) सिंधुदुर्ग.
**बंदरे :** (१) मुंबई : नैसर्गिक व आंतरराष्ट्रीय बंदर (२) न्हावा-शेवा : आंतरराष्ट्रीय बंदर.
**प्रादेशिक महत्त्वाची बंदरे :** (१) अलिबाग (२) मुरूड (३) श्रीवर्धन (४) जयगड (५) रत्नागिरी (६) मालवण (७) वेंगुर्ला.
**बेटे :** (१) मुंबई (२) साष्टी (३) खांदेरी व उंदेरी (४) घारापुरी व अंजदीव बेटे.

### पश्चिम घाट किंवा सह्याद्री पर्वत :

**नद्यांचा जलविभाजक :** पश्चिमवाहिनी व पूर्ववाहिनी नद्यांचा जलविभाजक.
**प्रमुख नद्यांची उगमस्थाने :** (१) गोदावरी-त्र्यंबकेश्वर (नाशिक) (२) भीमा - भीमाशंकर (३) कृष्णा व कोयना - महाबळेश्वर. याशिवाय या नद्यांच्या काही उपनद्या व कोकणातील नद्यांची उगमस्थाने सह्याद्री पर्वतात.
**घाटमाथा :** (१) माथेरान (२) पाचगणी (३) महाबळेश्वर.

## महाराष्ट्रातील महत्त्वाची शिखरे

| शिखर | उंची (मी.) | जिल्हा | शिखर | उंची (मी.) | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| कळसूबाई | १६४६ | नगर | अस्तंभा | १३२५ | नंदुरबार |
| साल्हेर | १५६७ | नाशिक | त्र्यंबकेश्वर | १३०४ | नाशिक |
| महाबळेश्वर | १४३८ | सातारा | तौला | १२३१ | नाशिक |
| हरिश्चंद्रगड | १४२४ | अहमदनगर | वैराट | ११७७ | अमरावती |
| सप्तशृंगी | १४१६ | नाशिक | चिखलदरा | १११५ | अमरावती |
| तोरणा | १४०४ | पुणे | हनुमान | १०६३ | धुळे |

## महाराष्ट्रातील खाड्या

| खाडी | नदी | जिल्हा | खाडी | नदी | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| दातीवरा | तानसा व वैतरणा | ठाणे | केळशी | भारजा | रत्नागिरी |
| वसई | उल्हास | ठाणे | दाभोळ | वशिष्ठी | रत्नागिरी |
| ठाणे | उल्हास | ठाणे | जयगड | शास्त्री | रत्नागिरी |
| मनोरी | दहिसर | मुंबई उपनगर | भाटये | काजळी | रत्नागिरी |
| मालाड | | मुंबई उपनगर | पूर्णगड | मुचकुंदी | रत्नागिरी |
| माहीम | माहीम | मुंबई उपनगर/ मुंबई शहर | जैतापूर | काजवी | रत्नागिरी |
| पनवेल | | रायगड | विजयदुर्ग | शुक | रत्नागिरी/सिंधुदुर्ग |
| धरमतर | पाताळगंगा | रायगड | देवगड | देवगड | सिंधुदुर्ग |
| राजपुरी | | रायगड | आचरा | आचरा | सिंधुदुर्ग |
| बाणकोट | सावित्री | रायगड/रत्नागिरी | कालावली | गड | सिंधुदुर्ग |
| | | | कर्ली | कर्ली | सिंधुदुर्ग |

## महाराष्ट्रातील प्रमुख घाट

| घाट | मार्ग | घाट | मार्ग |
|---|---|---|---|
| थळ (कसारा) घाट | नाशिक-मुंबई | कुंभार्ली घाट | कराड-चिपळूण |
| बोरघाट | पुणे-मुंबई | आंबा घाट | कोल्हापूर-रत्नागिरी |
| खंबाटकी घाट | पुणे-सातारा | आंबोली घाट | सावंतवाडी-बेळगाव |
| दिवा घाट | पुणे-बारामती | फोंडा घाट | कोल्हापूर-पणजी |



## महाराष्ट्रातील महत्त्वाचे किल्ले

| किल्ला | जिल्हा | किल्ला | जिल्हा | किल्ला | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| ब्रह्मगिरी | नाशिक | लिंगाणा | रायगड | राजगड | पुणे |
| साल्हेर-मुल्हेर | नाशिक | सुधागड | रायगड | तोरणा | पुणे |
| अंकाई-टंकाई | नाशिक | सिंहगड | पुणे | प्रतापगड | सातारा |
| हरिश्चंद्रगड | अहमदनगर | पुरंदर | पुणे | मकरंदगड | सातारा |
| रतनगड | अहमदनगर | शिवनेरी | पुणे | सज्जनगड | सातारा |
| रायगड | रायगड | लोहगड | पुणे | वासोटा | सातारा |
| कर्नाळा | रायगड | राजमाची | पुणे | वसंतगड | सातारा |
| प्रबळगड | रायगड | रोहिडेश्वर | पुणे | पन्हाळा | कोल्हापूर |
| सरसगड | रायगड | विसापूर | पुणे | विशाळगड | कोल्हापूर |

**सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा :** (अ) शंभू महादेव डोंगररांगा (ब) हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगा (क) सातमाळा-अजिंठा डोंगररांगा : जगप्रसिद्ध अजिंठा व वेरूळची लेणी, दौलताबाद किल्ला, निर्मल रांग.
**सातपुडा पर्वताच्या डोंगररांगा :** नंदुरबार जिल्ह्यात अस्तांभा डोंगर (१,३२५ मी.), अमरावती जिल्ह्यात गावीलगड टेकड्या, वैराट डोंगर.
**महाराष्ट्र किंवा दख्खनचा पठारी प्रदेश :** पश्चिम-पूर्व लांबी : ७५० कि. मी. ; उत्तर-दक्षिण लांबी : ७०० कि. मी.

## दख्खनवरील पठारे

| पठार | जिल्हा | पठार | जिल्हा |
|---|---|---|---|
| अहमदनगर पठार | अहमदनगर | खानापूर पठार | सांगली |
| सासवड पठार | पुणे | मालेगाव पठार | नाशिक |
| औंध पठार | सातारा | बुलडाणा पठार | बुलडाणा |
| पाचगणी पठार (टेबललँड) | सातारा | तोरणमाळ पठार | नंदुरबार |

## दख्खन पठारावरील अन्य डोंगर (टेकड्या)

| डोंगर | जिल्हा | डोंगर | जिल्हा |
|---|---|---|---|
| गाळणा डोंगर | धुळे-नंदुरबार | गरमसूर डोंगर | नागपूर |
| अजिंठा डोंगर | औरंगाबाद | दरकेसा टेकड्या | गोंदिया |
| वेरूळ डोंगर | औरंगाबाद | चिरोली डोंगर | गडचिरोली |
| हिंगोली डोंगर | हिंगोली | भामरागड | गडचिरोली |
| मुदखेड डोंगर | नांदेड | सूरजागड | गडचिरोली |

## महाराष्ट्र : जिल्हावार पर्वत/डोंगर/डोंगररांगा/टेकडी

| जिल्हा | पर्वत/डोंगर/डोंगररांगा/टेकडी | जिल्हा | पर्वत/डोंगर/डोंगररांगा/टेकडी |
|---|---|---|---|
| मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा | पाली, ॲन्टॉप हिल, शिवडी, खंबाला, मलबार हिल. | ठाणे जिल्हा | सह्याद्री |
| रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हा | सह्याद्री. | जळगाव जिल्हा | सातपुडा, सातमाळा, अजिंठा, शिरसोली व हस्तीचे डोंगर. |
| धुळे जिल्हा | धानोरा व गाळण्याचे डोंगर. | नंदुरबार जिल्हा | सातपुडा व तोरणमाळचे डोंगर. |
| नाशिक जिल्हा | सह्याद्री, गाळणा, साल्हेर, मुल्हेर, वणी, चांदवड, सातमाळा रांगा. | अहमदनगर जिल्हा | सह्याद्री, कळसूबाई, अदुला, बाळेश्वर, हरिश्चंद्रगड डोंगररांगा. |
| पुणे जिल्हा | सह्याद्री, हरिश्चंद्र, शिंगी, तसुबाई, पुरंदर, ताम्हानी, अंबाल डोंगररांगा. | सातारा जिल्हा | सह्याद्री, परळी, बाणमोली, महादेव, यवतेश्वर, मेंढोशी, आगाशीव, औंध, म्हस्कोबा, सीताबाई रांगा. |

## महाराष्ट्र : जिल्हावार पर्वत/डोंगर/डोंगररांगा/टेकडी

| जिल्हा | पर्वत/डोंगर/डोंगररांगा/टेकडी | जिल्हा | पर्वत/डोंगर/डोंगररांगा/टेकडी |
|---|---|---|---|
| सांगली जिल्हा | आष्टा, होनाई, शुकाचार्य, कमलभैरव, बेलगबाड, आडवा, मल्लिकार्जुन, मुचुंडी, दंडोबा रांग. | कोल्हापूर जिल्हा | सह्याद्री, पन्हाळा, उत्तर व दक्षिण दूधगंगा, चिकोडी रांग. |
| सोलापूर जिल्हा | महादेव, बालाघाट, शुकाचार्य. | औरंगाबाद जिल्हा | अजिंठा, सातमाळा, सुरपालनाथ. |
| जालना जिल्हा | अजिंठ्याची रांग, जांबुवंत टेकडी. | परभणी जिल्हा | उत्तरेस अजिंठ्याचे डोंगर, दक्षिणेस बालाघाट रांग. |
| हिंगोली जिल्हा | अजिंठ्याची डोंगररांग, हिंगोलीचे डोंगर. | नांदेड जिल्हा | सातमाळा, निर्मल, मुदखेड, बालाघाटचे डोंगर. |
| लातूर जिल्हा | बालाघाटचे डोंगर. | उस्मानाबाद जिल्हा | बालाघाट, तुळजापूर व नळदुर्ग डोंगर. |
| बीड जिल्हा | बालाघाटचे डोंगर. | बुलडाणा जिल्हा | — |
| अकोला जिल्हा | गाविलगडचे व अजिंठ्याचे डोंगर. | वाशीम जिल्हा | — |
| अमरावती जिल्हा | सातपुडा, गाविलगडच्या रांगा, पोहऱ्याचे व चिरोडीचे डोंगर. | यवतमाळ जिल्हा | अजिंठ्याचे डोंगर व पुसदच्या टेकड्या. |
| वर्धा जिल्हा | रावणदेव, गरमसूर, मालेगाव, नांदगाव, ब्राह्मणगाव टेकड्या. | नागपूर जिल्हा | सातपुड्याचे डोंगर, गरमसूर, महादागड, पिल्कापार टेकड्या. |
| भंडारा जिल्हा | आंबागडचे डोंगर, गायखुरी व भीमसेन टेकड्या. | गोंदिया जिल्हा | नवेगाव, प्रतापगड, चिंचगड व दरकेसाचे डोंगर. |
| चंद्रपूर जिल्हा | पेरजागड व चांदुरगडचे डोंगर, चिमूर व मूल टेकड्या. | गडचिरोली जिल्हा | चिरोली, टिपागड, सिरकोडा, सुरजागड, भामरागड, चिकियाला डोंगररांग. |

## बहुपर्यायी प्रश्न

(१) कोकण किनारपट्टीची लांबी सुमारे .......... कि. मी. आहे.
(अ) ७०० (ब) ८०० (क) ७२० (ड) ६२०

(२) कोकणची सरासरी रुंदी .......... कि. मी. आहे.
(अ) ४० ते ५० (ब) ९० ते ९५ (क) ३० ते ६० (ड) १५ ते ३०

(३) कोकणच्या सखल भागास .......... म्हणतात.
(अ) वलाटी (ब) देश (क) खलाटी (ड) काणकोण

(४) मुंबईच्या उत्तरेस .......... खाडी आहे.
(अ) धरमतरची (ब) वसईची (क) बाणकोटची (ड) कर्लीची

(५) कोकणच्या दक्षिण सरहद्दीजवळ .......... ची खाडी आहे.
(अ) दातीवरा (ब) जयगड (क) विजयदुर्ग (ड) तेरेखोल

(६) सुवर्णदुर्ग हा .......... किल्ला आहे.
(अ) भुईकोट (ब) सागरी (क) घाटमाथा (ड) डोंगरमाथा

### उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | क | (२) | क | (३) | क | (४) | ब | (५) | ड | (६) | ब |



(७) खांदेरी व उंदेरी ही .......... आहेत.
(अ) खाड्या (ब) सागरी किल्ले (क) बंदरे (ड) बेटे

(८) कोकणातील नवीन बंदर .......... आहे.
(अ) मुरुड (ब) रत्नागिरी (क) न्हावा-शेवा (ड) वेंगुर्ला

(९) कोकणची उत्तर व दक्षिण सीमा अनुक्रमे .......... यांनी निश्चित झाली आहे.
(अ) दातीवरा व तेरेखोलची खाडी (ब) वसईची खाडी व तेरेखोलची खाडी
(क) दातीवराची खाडी व कर्लीची खाडी (ड) वसईची खाडी व कर्लीची खाडी.

(१०) सह्याद्री पर्वतास .......... असेही म्हणतात.
(अ) पूर्व घाट (ब) पश्चिम घाट (क) घाटमाथा (ड) बोरघाट

(११) सह्याद्री पर्वताची सरासरी उंची .......... मीटर दरम्यान आहे.
(अ) १२०० ते १३०० (ब) १५०० ते १६०० (क) १००० ते १२०० (ड) ८०० ते १०००

(१२) अरबी समुद्रास समांतर असणारा सह्याद्री पर्वत किनाऱ्यापासून .......... कि. मी. अंतरावर आहे.
(अ) ६० ते ८० (ब) १५ ते ३० (क) ८० ते १०० (ड) ३० ते ६०

(१३) सह्याद्री पर्वतरांगेवरून दक्षिणेकडून उत्तरेकडे गेल्यास त्याची उंची .......... जाते.
(अ) कमी होत (ब) समान राहत (क) वाढत (ड) असमान होत

(१४) कोकण किनाऱ्याच्या सखल प्रदेशाकडून सह्याद्रीकडे पाहिल्यास .......... दिसतो.
(अ) डोंगररांगेसारखा (ब) सपाट पठारासारखा (क) खोलगट खोऱ्यासारखा (ड) सरळ कड्यासारखा

(१५) .......... नद्यांच्या उगमाच्या क्षेत्राजवळ सह्याद्री पर्वत कंकणाकृती झालेला आहे.
(अ) दातीवरा व उल्हास (ब) वैतरणा व सावित्री (क) मुचकुंद व वशिष्ठी (ड) कर्ली व तेरेखोल

(१६) त्र्यंबकेश्वर येथे .......... नदीचा उगम होतो.
(अ) गोदावरी (ब) गिरणा (क) प्रवरा (ड) दारणा

(१७) कृष्णा व कोयना नद्यांचा उगम .......... येथे आहे.
(अ) माथेरान (ब) भीमाशंकर (क) महाबळेश्वर (ड) पन्हाळा

(१८) महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर .......... आहे.
(अ) साल्हेर (ब) सप्तश्रृंगी (क) हनुमान (ड) कळसूबाई

(१९) .......... जवळ माथेरान हा प्रसिद्ध घाटमाथा आहे.
(अ) लोणावळा (ब) नेरळ (क) सातारा (ड) कोल्हापूर

(२०) नाशिक-मुंबई मार्गावर .......... घाट आहे.
(अ) थळ (ब) दिवा (क) आंबा (ड) कुंभार्ली

(२१) फोंडा घाट हा .......... मार्गासाठी उपयुक्त आहे.
(अ) पुणे-मुंबई (ब) पुणे-सातारा (क) कोल्हापूर-रत्नागिरी (ड) कोल्हापूर-पणजी

(२२) रेल्वे व रस्ते या दोन्ही मार्गांसाठी .......... सोईचा आहे.
(अ) आंबोली घाट (ब) खंबाटकी घाट (क) दिवा घाट (ड) बोर घाट

(२३) साल्हेर-मुल्हेर किल्ले .......... जिल्ह्यात आहेत.
(अ) अहमदनगर (ब) नाशिक (क) पुणे (ड) कोल्हापूर

### उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (७) | ड | (८) | क | (९) | अ | (१०) | ब | (११) | अ | (१२) | ड |
| (१३) | क | (१४) | ड | (१५) | ब | (१६) | अ | (१७) | क | (१८) | ड |
| (१९) | ब | (२०) | अ | (२१) | ड | (२२) | ड | (२३) | ब | | |

(२४) पुणे जिल्ह्यात .......... किल्ला आहे.
(अ) सिंहगड (ब) विशाळगड (क) सुधागड (ड) हरिश्चंद्रगड

(२५) महाराष्ट्रातील एका जिल्ह्याचे नाव .......... या किल्ल्यावरून पडले आहे.
(अ) राजगड (ब) सुधागड (क) मकरंदगड (ड) रायगड

(२६) भीमा नदीच्या खोऱ्याच्या दक्षिणेस .......... आहे.
(अ) हरिश्चंद्र घाट (ब) सातमाळा डोंगर (क) शंभू महादेव डोंगररांग (ड) बालाघाट

(२७) सातमाळा-अजिंठा डोंगररांग ही .......... खोऱ्यांना वेगळी करते.
(अ) तापी व गोदावरी (ब) प्राणहिता व गोदावरी (क) गोदावरी व भीमा (ड) भीमा व कृष्णा

(२८) .......... वर वेरूळची जगप्रसिद्ध लेणी आहेत.
(अ) बालाघाट (ब) निर्मल रांग (क) वेरूळ डोंगर (ड) सातमाळा डोंगर

(२९) परभणी व नांदेड जिल्ह्यातून जाणाऱ्या डोंगरांना .......... म्हणतात.
(अ) गाळणा डोंगर (ब) मेळघाट (क) निर्मल रांगा (ड) हिंगोली

(३०) दरकेसा टेकड्या .......... जिल्ह्यात आहेत.
(अ) गोंदिया (ब) नागपूर (क) चंद्रपूर (ड) गडचिरोली

(३१) सातपुडा पर्वतरांगांमधील अमरावती जिल्ह्याच्या उत्तर भागात .......... आहेत.
(अ) अस्तांभा डोंगर (ब) गाविलगड टेकड्या (क) मुदखेड डोंगर (ड) चिकोडी डोंगर

(३२) महाराष्ट्र पठाराची निर्मिती .......... मुळे झाली आहे.
(अ) भूप्रक्षोभ (ब) भ्रंशमूलक उद्रेक (क) भूकंप (ड) संचयन

(३३) उत्तरेकडे नंदुरबार जिल्ह्यात सातपुडा रांगेवर .......... पठार तयार झाले आहे.
(अ) तोरणमाळ (ब) तोरणा (क) औंध (ड) मालेगाव

(३४) गडचिरोली जिल्ह्यात .......... आहेत.
(अ) भामरागड डोंगर (ब) अस्तांभा डोंगर (क) खानापूर पठार (ड) सासवड पठार

(३५) बालाघाट डोंगरावर .......... पठार आहे.
(अ) बुलडाणा (ब) औंध (क) महाबळेश्वर (ड) अहमदनगर

(३६) 'टेबललँड' या नावाने .......... पठार प्रसिद्ध आहे.
(अ) पाचगणी (ब) तोरणमाळ (क) सासवड (ड) बुलडाणा

(३७) तापी-पूर्णा खोरे हा .......... आहे.
(अ) रुंद खोऱ्याचा प्रदेश (ब) खचदरीचा प्रदेश
(क) पूर्ववाहिनी (ड) तणावक हालचालींचा प्रदेश

## उत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२४) | अ | (२५) | ड | (२६) | क | (२७) | अ | (२८) | क |
| (२९) | क | (३०) | अ | (३१) | ब | (३२) | ब | (३३) | अ |
| (३४) | अ | (३५) | ड | (३६) | अ | (३७) | ब | | |



(३८) .......... खोऱ्याचा आकार एखाद्या नरसाळ्यासारखा आहे.
(अ) भीमा (ब) कृष्णा
(क) गोदावरी (ड) तापी

(३९) प्राणहिता नदीचे खोरे .......... पसरलेले आहे.
(अ) दक्षिण महाराष्ट्र (ब) मध्य महाराष्ट्र
(क) उत्तर महाराष्ट्र (ड) पूर्व महाराष्ट्र

(४०) पश्चिमेस सह्याद्री पर्वत व पूर्वेस शंभू महादेव डोंगररांगांनी .......... खोरे निश्चित झालेले आहे.
(अ) भीमा (ब) वैनगंगा
(क) कोकण (ड) कृष्णा

(४१) सासवड पठार, औंध पठार व खानापूर पठार .......... उंचवट्याच्या भागात आहेत.
(अ) सातपुडा पर्वताच्या (ब) बालाघाटच्या
(क) शंभू-महादेव डोंगराच्या (ड) हरिश्चंद्र घाटाच्या

(४२) कोकणचा विस्तार उत्तरेस .......... नदीपासून दक्षिणेस .......... नदीपर्यंत आहे.
(अ) वैतरणा, गड (ब) दमणगंगा, तेरेखोल
(क) वैतरणा, तेरेखोल (ड) दमणगंगा, गड

## उत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (३८) | क | (३९) | ड | (४०) | ड | (४१) | क | (४२) | ब |

# ३. नदीप्रणाली

## नद्यांच्या मार्गानुसार विभागणी

महाराष्ट्रातून वाहणाऱ्या नद्यांच्या मार्गानुसार त्यांचे चार विभाग पाडले जातात.

**(१) दख्खनच्या पठारावर वायव्य-आग्नेय दिशेने वाहणाऱ्या नद्या, (२) विदर्भातील उत्तर-दक्षिण दिशेने वाहणाऱ्या नद्या, (३) उत्तर महाराष्ट्रात खानदेशात पूर्व-पश्चिम दिशेने वाहणाऱ्या नद्या, (४) कोकण किनारपट्टीवरील पूर्व-पश्चिम दिशेने वाहणाऱ्या नद्या.**

## नद्यांच्या जलविभाजकांनुसार प्रदेशाची विभागणी

महाराष्ट्रामध्ये **सह्याद्री पर्वत व काही प्रमाणात सातपुडा पर्वतरांगांतील टेकड्या प्रमुख जलविभाजक** आहेत. सह्याद्री पर्वतातून दख्खनच्या पठारावर पूर्वेकडे पसरलेल्या **सातमाळा-अजिंठा डोंगररांगा, हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगा आणि शंभूमहादेव डोंगररांगा या दुय्यम जलविभाजक** आहेत; कारण सह्याद्री पर्वतातून उगम पावणाऱ्या मुख्य नद्यांना या डोंगरावरून वाहणाऱ्या उपनद्या येऊन मिळतात.

**महाराष्ट्रात सह्याद्री पर्वत मुख्य जलविभाजक गृहीत धरून नद्यांचे दोन विभाग होतात :**

**(१) पूर्ववाहिनी नद्या व (२) पश्चिमवाहिनी नद्या. (नकाशा क्र. ३.१ पाहा.)**

**(१) पूर्ववाहिनी नद्या : सह्याद्री पर्वतामध्ये उगम पावून दख्खनच्या पठारावरून पूर्वेकडे वाहत जाणाऱ्या नद्यांना 'पूर्ववाहिनी नद्या' असे म्हणतात.** या नद्यांपैकी काही नद्या कोणत्या तरी एखाद्या नदीस मिळतात, तर मोठ्या नद्या महाराष्ट्रातून पुढे कर्नाटक व आंध्र प्रदेशातून वाहत जाऊन बंगालच्या उपसागरास मिळतात. दख्खनच्या पठारावरून गोदावरी, भीमा आणि कृष्णा या नद्या पूर्वेस तसेच आग्नेय दिशेस वाहत जातात.

**(२) पश्चिमवाहिनी नद्या : सह्याद्री पर्वतात उगम पावून पश्चिमेकडे संपूर्ण पर्वत ओलांडून कोकण किनारपट्टीवरून वाहत जाणाऱ्या नद्यांना 'पश्चिमवाहिनी नद्या' म्हणतात.** कोकणामध्ये वैतरणा, उल्हास, सावित्रीसारख्या पश्चिमवाहिनी नद्या आहेत. या नद्या अरबी समुद्रास मिळतात.

दख्खनच्या पठारावरील वैशिष्ट्यपूर्ण भूरचनेमुळे **सातपुडा पर्वतरांगांमध्ये उगम पावणाऱ्या तापी-पूर्णा नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत जाऊन अरबी समुद्रास मिळतात, तसेच नर्मदा नदीही** महाराष्ट्राच्या वायव्य सरहद्दीला स्पर्श करून पश्चिमेस वाहते.

## महाराष्ट्रातील नद्यांची खोरी

महाराष्ट्रात प्रमुख जलविभाजक **सह्याद्री पर्वत असून पठारावरील डोंगररांगा आहेत. यामुळे महाराष्ट्रात नद्यांची खोरी निर्माण झालेली आहेत. त्याचप्रमाणे उपखोरीही पाहावयास मिळतात.** (नकाशा क्र. ३.२ पाहा.) याचे स्वरूप तक्ता क्र. ३.१ मध्ये दिलेले आहे.

**तक्ता क्र. ३.१ : महाराष्ट्रातील नद्यांची खोरी**

| क्र. | नद्यांची प्रमुख खोरी | नद्यांची उपखोरी |
|---|---|---|
| १. | गोदावरी खोरे | (अ) गोदावरी मुख्य खोरे, (ब) गोदावरी-पूर्णा खोरे, (क) मांजरा खोरे, (ड) पैनगंगा खोरे, (इ) वर्धा खोरे, (फ) वैनगंगा खोरे, (ग) प्राणहिता खोरे, (घ) इंद्रावती खोरे. |
| २. | भीमा खोरे | (अ) भीमा मुख्य खोरे, (ब) सीना खोरे. |
| ३. | कृष्णा खोरे | — |
| ४. | तापी खोरे | (अ) पूर्णा-तापी खोरे, (ब) तापी पूर्व खोरे. |
| ५. | कोकण | (अ) उत्तर कोकण, (ब) मध्य कोकण, (क) दक्षिण कोकण. |
| ६. | नर्मदा खोरे | — |


## गोदावरी नदीचे खोरे

**दक्षिण भारतातील व आपल्या महाराष्ट्रातील सर्वांत मोठी नदी गोदावरी असून ती दख्खनच्या पठारावर पश्चिम घाटापासून पूर्व घाटापर्यंत वाहून पुढे बंगालच्या उपसागरास मिळते.** महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील गंगा नदीच्या खालोखाल ही एक पवित्र नदी मानली जाते. तिला **'दक्षिण भारताची गंगा'** असेही म्हणतात.

**नदीप्रणालीचे क्षेत्र : सह्याद्री पर्वतात नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वराच्या ब्रह्मगिरी टेकडीवर गोदावरीचा उगम झालेला आहे** व बारा ज्योतिर्लिंगांपैकी हे एक ज्योतिर्लिंग आहे. गोदावरीचे उगमस्थान अरबी समुद्रापासून पूर्वेकडे फक्त ८० कि. मी. अंतरावर आहे.









**महाराष्ट्र : नदीप्रणाली**

महाराष्ट्रात सह्याद्रीच्या जलविभाजकामुळे पूर्ववाहिनी नद्या वाहतात. सातमाळा-अजिंठा डोंगररांगा, हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगा व शंभू-महादेव डोंगररांगा या उपजलविभाजकामुळे अनुक्रमे गोदावरी, भीमा व कृष्णा नद्या पठारावरून पूर्वेकडे कर्नाटक व आंध्र प्रदेशातून वाहत जाऊन बंगालच्या उपसागरास मिळतात. उत्तर महाराष्ट्रात पूर्व-पश्चिम दिशेने तापी-पूर्णा व नर्मदा नदी वाहत जाते तर कोकणात वैतरणा, उल्हास, सावित्रीसारख्या नद्या पश्चिमेस अरबी समुद्रास मिळतात.

**नकाशा क्र. ३.१ : महाराष्ट्र - नदीप्रणाली**




**महाराष्ट्र : जलविभाजक नद्यांची खोरी :**


महाराष्ट्रात सह्याद्री पर्वत हा प्रमुख जलविभाजक असून पठारावरील डोंगररांगांमुळे नद्यांची खोरी व उपखोरी निर्माण झालेली आहेत. गोदावरी खोऱ्यात (अ) गोदावरी मुख्य खोरे, (ब) गोदावरी-पूर्णा खोरे, (क) मांजरा, (ड) पैनगंगा खोरे, (इ) वर्धा खोरे, (फ) वैनगंगा खोरे, (ग) प्राणहिता खोरे, (घ) इंद्रावती खोरे आहेत. भीमा खोऱ्यात भीमा खोरे व सीना खोरे स्वतंत्र आहे. कृष्णा खोरे, तर तापी खोऱ्यात तापी-पूर्णा खोरे, तापी पूर्व खोरे; कोकणात उत्तर कोकण, मध्य कोकण, दक्षिण कोकण, तसेच उत्तरेस नर्मदा खोरे आहे.

**नकाशा क्र. ३.२ : महाराष्ट्र जलविभाजक — नदीखोरी**

नदीच्या प्रवाहाची सर्वसाधारण दिशा पूर्व व आग्नेयेस आहे. दख्खनच्या पठारावरून वाहणारी ही नदी महाराष्ट्र व आंध्र प्रदेशातून वाहत जाऊन मुखाजवळ त्रिभुज प्रदेश निर्माण करून पूर्वेस बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते. गोदावरीची एकूण लांबी सुमारे १४१५ कि. मी. असून तिचे नदीप्रणालीचे क्षेत्र ३,१३,३८९ चौ. कि. मी. आहे. यापैकी **महाराष्ट्रात नदीचा प्रवाह ६६८ कि. मी. असून नदीप्रणालीचे क्षेत्र १,५३,७७९ चौ. कि. मी. आहे. महाराष्ट्रातील गोदावरी खोऱ्यामधून दरवर्षी सुमारे ३७,८३० दशलक्ष घनमीटर पाण्याचा प्रवाह वाहतो.**

**राजकीय क्षेत्र :** गोदावरी खोऱ्यामध्ये प्रवाहाच्या पहिल्या टप्प्यात **नाशिक जिल्ह्याचा दक्षिण भाग, नगर जिल्ह्याचा उत्तर भाग व मराठवाड्यातील सर्व जिल्हे** येतात. याशिवाय पूर्व भागात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली हे विदर्भाचे जिल्हे गोदावरी खोऱ्याने व्यापलेले आहेत. **संपूर्ण गोदावरी खोऱ्याने महाराष्ट्राचे ४९% क्षेत्र व्यापलेले आहे.**






**गोदावरीचे खोरे :**

नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदी उगम पावून पूर्व व आग्नेय दिशेने मुख्यत्वेकरून मराठवाड्यातून वाहत जाते. उत्तरेस सातमाळा-अजिंठा डोंगररांगा व दक्षिणेस बालाघाट डोंगररांगांनी मर्यादित झालेल्या गोदावरीस उजव्या तीराने प्रवरा, सिंदफणा व मांजरा तर डाव्या तीराने दक्षिण पूर्णा, दुधना उपनद्या येऊन मिळतात. विदर्भातून वर्धा, वैनगंगा, पैनगंगा मिळून प्राणहिता नदीचे खोरे तयार होते. पुढे प्राणहिता व इंद्रावती या नद्या गोदावरीस मिळतात.

**नकाशा क्र. ३.३ : गोदावरीचे खोरे**

## गोदावरी खोऱ्याचे विभाग

महाराष्ट्रात गोदावरी नदीच्या खोऱ्याचे विभाग पुढीलप्रमाणे : (अ) गोदावरी नदीचे खोरे, (ब) गोदावरी-पूर्णा नदीचे खोरे, (क) मांजरा नदीचे खोरे, (ड) पैनगंगा नदीचे खोरे, (इ) वर्धा नदीचे खोरे, (फ) वैनगंगा नदीचे खोरे, (ग) प्राणहिता नदीचे खोरे, (घ) इंद्रावती नदीचे खोरे. (नकाशा क्र. ३.३ पाहा.)

**(अ) गोदावरीचे मुख्य नदीचे खोरे : गोदावरीचा ब्रह्मगिरी टेकड्यात उगम** झाल्यावर नदी डोंगराळ भाग ओलांडून खाली येते. नाशिकला येईपर्यंत नदीचे पात्र अरुंद असून तिचा प्रवाह खडकाळ प्रदेशातून आहे. गोदावरीच्या **उजव्या तीरावरून किंवा दक्षिणेकडून दारणा, प्रवरा, मुळा, बोरा, सिंदफणा, बिंदुसरा, कुंडलिका** या नद्या मिळतात, तर **डाव्या तीराकडून किंवा उत्तरेकडून कादवा, शिवना, खाम नद्या मिळतात.** गोदावरी नदी ही अहमदनगर-औरंगाबाद, बीड जिल्ह्याची उत्तर सरहद्द, औरंगाबाद-जालना जिल्ह्याशी निगडित आहे.

कळसूबाई शिखराजवळ उगम पावणारी **दारणा नदी** नाशिकच्या दक्षिणेला २४ कि. मी. अंतरावर उजव्या किनाऱ्याने गोदावरीला मिळते. आणखी १७ कि. मी. अंतरावर डावीकडून नांदूर येथे **कादवा नदी** मिळते. हरिश्चंद्र डोंगरावर भंडारदराजवळ **प्रवरा** नदी उगम पावते. **प्रवरा व मुळा नदीच्या** संयुक्त प्रवाहावर नेवासे वसलेले आहे. पुढे गोदावरीस प्रवाह उजवीकडून मिळतो. सातमाळाच्या डोंगरात **शिवना नदी** उगम पावून दक्षिणेला वाहते व गोदावरीस मिळते. यशिवाय बालाघाट डोंगरात बीड जिल्ह्यातून उगम पावणारी **सिंदफणा नदी** पैठणच्या पूर्वेस मिळते.

**(ब) गोदावरी–पूर्णा खोरे : अजिंठ्याच्या डोंगरात पूर्णा (दक्षिण पूर्णा) उगम पावते** व पूर्णा स्थानकाच्या दक्षिणेकडे परभणीवरून आलेली पूर्णा नदी डावीकडून गोदावरीस येऊन मिळते. त्या आधी **पूर्णा व दुधना** नद्यांचा संगम होतो. पूर्णा नदीला डाव्या तीरावरून **खेळणा**; तर उजव्या तीरावरून **अंजना, गिरजा, कापरा, दुधना** या नद्या मिळतात.

**(क) मांजरा नदी खोरे :** बीड जिल्ह्यात पाटोदा पठारावरील अंबेजोगाईच्या दक्षिणेकडे **मांजरा नदी वाहते** आणि नांदेडवरून पुढे गेल्यावर महाराष्ट्राच्या सीमेवर कोंडलवाडीजवळ उजवीकडून गोदावरीस मांजरा नदी मिळते. या खोऱ्यात **तावरजा, तेरणा, गिरणा, लेंडी, मन्याड** या नद्याही वाहतात. बीड जिल्ह्याची दक्षिण सरहद्द मांजरा नदीमुळे निर्माण होते. पुढे लातूर जिल्ह्यातून मांजरा वाहते.

नाशिक ते नांदेड दरम्यान गोदावरी नदी बेसॉल्ट खडकमय भागातून वाहते. हा खडक कठीण स्वरूपाचा असल्याने खननकार्य कमी असते. सह्याद्री व डोंगररांगांवरून वाहणाऱ्या उपनद्यांमधून गोदावरी खोऱ्यात गाळाचे मैदान निर्माण झाले आहे.

मुख्य गोदावरीच्या खोऱ्यात नाशिक, नेवासे, औरंगाबाद, जालना, पैठण, परभणी, बीड, नांदेड, उदगीर वगैरे महत्त्वाची शहरे आहेत.

**पूर्व विदर्भातील नद्या : पूर्व विदर्भातून** वाहणाऱ्या **वर्धा, वैनगंगा व मराठवाड्यातून उगम पावलेली पैनगंगा** वाहते. त्यांचा साधारण **प्रवाह उत्तर-दक्षिण दिशेने** असून त्या गोदावरीस मिळतात.

**(ड) पैनगंगा नदीचे खोरे : अजिंठा टेकड्यात आग्नेय उतारावर (२०° ३१' उ. अ. व ७६° २' पू. रे.)** पैनगंगा नदीचा उगम **होतो.** पैनगंगा ही नदी बुलडाणा व यवतमाळ पठारावरून पूर्वेकडे वाहत जाते आणि यवतमाळच्या पूर्व सरहद्दीवर बल्लारपूर येथे वर्धा नदीला पैनगंगा मिळते. पैनगंगा नदी ही वाशीम व यवतमाळ जिल्ह्यांच्या दक्षिण सीमा आहेत. पैनगंगा नदीस **उजव्या किनाऱ्याने कयाधू तर डाव्या किनाऱ्याने पूस, अडाण, आरणा, वाघाडी, खुनी या उपनद्या मिळतात.**

**(इ) वर्धा नदीचे खोरे : मध्य प्रदेशात बैतूल जिल्ह्यात सातपुडा रांगांच्या दक्षिण उतारावर वर्धा नदीचा उगम होतो** आणि पूर्वेकडे तापी खोऱ्यात वाहणाऱ्या पूर्णा नदीपासून अगदी तकलादू जलविभाजकाने वेगळे झालेले आहे. साधारणपणे उत्तर-दक्षिण दिशेने वर्धा नदी ४५५ कि. मी. वाहते. वर्धा नदीला **उजव्या किनाऱ्याने वेमला, निगुडा व विदर्भ तर डाव्या किनाऱ्याने कार, बोर, नंद व इरई या उपनद्या मिळतात.** वर्धा नदी ही वर्धा-अमरावती जिल्हा व पुढे यवतमाळ जिल्ह्याची पूर्व सरहद्द निर्माण करते.

**(फ) वैनगंगा नदीचे खोरे : महाराष्ट्राच्या सरहद्दीबाहेर** मध्य प्रदेशात मैकल पर्वतरांगांत शिवनी जिल्ह्यात दरकेसा **टेकड्यांजवळ भाकल येथे वैनगंगा नदी उगम पावून दक्षिणेकडे सुमारे ३०० कि. मी. अंतर जाते.** नागपूरच्या मैदानावरून वाहत येणाऱ्या **कन्हान, पेंच** तसेच गोंदिया जिल्ह्यातून येणारी **बाघ** या सर्व नद्या वैनगंगेस मिळतात. चंद्रपूर जिल्ह्यात **वर्धा व वैनगंगा नदीचा संगम चंद्रपूरच्या दक्षिणेस** होतो. यापुढे तिला **'प्राणहिता'** या नावाने ओळखले जाते. याशिवाय नाग, अंधारी, सुर, गाढवी वगैरे उपनद्या वैनगंगेस मिळतात. चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याची उत्तर-दक्षिण **सरहद्द** वैनगंगा नदीमुळे निर्माण होते.

**(ग) प्राणहिता नदीचे खोरे : वर्धा व पैनगंगा नद्यांचा एकत्रित प्रवाह व पुढे वैनगंगेबरोबरील संयुक्त प्रवाहास 'प्राणहिता नदी' म्हणतात.** महाराष्ट्र व आंध्र प्रदेशातील सुमारे ११७ कि. मी. सरहद्द तयार करते. गडचिरोली जिल्ह्यात सरहद्दीवर गोदावरीला प्राणहिता नदी येऊन मिळते.



**(घ) इंद्रावती नदीचे खोरे : मध्य प्रदेशात उगम पावणारी इंद्रावती नदी विदर्भाच्या गडचिरोली जिल्ह्याची आग्नेय सरहद्द निर्माण करून वाहते व ती पुढे गोदावरी नदीस मिळते. इंद्रावती नदीला बांदिया, अकेरा, डोंगरी व कोठरी उपनद्या मिळतात.**

गोदावरी आणि तिच्या उपनद्यांनी नदीच्या खोऱ्यातील दख्खनच्या लाव्हाची झीज केलेली आहे. खोऱ्याची सरासरी उंची ३५० ते ५५० मी. दरम्यान आहे. गोदावरी खोऱ्यात जसजसे पूर्वेकडे जावे तसतसा तिचा विस्तार कमी होत जातो. नांदेडजवळ तर खोऱ्याची रुंदी फक्त ५० कि. मी. आहे, तर त्या मानाने खोऱ्याच्या वरच्या बाजूस त्यांची रुंदी १५० ते २०० कि. मी. आहे. गोदावरी खोऱ्याचे उत्तर आणि दक्षिणेस जलविभाजक स्पष्टपणे दिसतात व ते तीव्र उताराचे आहेत. उत्तरेकडील **सातमाळा** व अजिंठा डोंगरांची मोठ्या प्रमाणात नदीने झीज केलेली आहे. दक्षिणेस बालाघाट रांगेमधील लहान-लहान नद्यादेखील नद्यांच्या उगमाच्या क्षेत्रात खननाचे कार्य मोठ्या प्रमाणात करतात व काही ठिकाणी नदीचौर्यदेखील पाहावयास मिळते. उदाहरणार्थ, अंबेजोगाईजवळ मांजरा नदीच्या काही फाटयांचे नदीचौर्य वाणनदीने केलेले आहे.

## भीमा नदीचे खोरे

गोदावरी नदीच्या खालोखाल महाराष्ट्रामध्ये कृष्णा नदीचे खोरे आहे. परंतु **कृष्णा नदीची उपनदी भीमा हिने महाराष्ट्राचा बराचसा भाग व्यापलेला आहे.** तसेच भीमा नदी कृष्णेला महाराष्ट्राच्या सरहद्दीबाहेर मिळत असल्याने **भीमा नदीचा स्वतंत्रपणे विचार केला जातो.**

**नदीप्रणालीचे क्षेत्र : भीमा नदीचा उगम पुण्याजवळ भीमाशंकर (१९° ४' उ. अ. व ७३° ३२' पू. रे.) येथे आहे.** खंडाळ्याच्या उत्तरेस ४० कि. मी. अंतरावर भीमा नदीचे उगमस्थान आहे. बालाघाट डोंगराच्या उत्तरेस गोदावरी नदी वाहते तर दक्षिणेस भीमा नदीचे खोरे आहे. नंतर भीमा नदी **आग्नेयेस ४५१ कि. मी. अंतर वाहत जाते** आणि **कर्नाटकात रायचूरजवळ कुरुगुड्डी येथे कृष्णा व भीमा नद्यांचा संगम होतो. महाराष्ट्रात भीमा नदीप्रणालीचे क्षेत्रफळ ६४,१८४ चौ. कि. मी. आहे.**

**राजकीय क्षेत्र :** भीमा खोऱ्यात **पुणे व सोलापूर जिल्ह्यांचा संपूर्णपणे समावेश** होतो तर **सातारा जिल्ह्याचे खंडाळा, फलटण व दहिवडी (माण) तालुके, नगर जिल्ह्याच्या दक्षिणेकडील श्रीगोंदा, कर्जत व जामखेड तालुके, मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा, भूम, तुळजापूर व उमरगा हे तालुके समाविष्ट** होतात.

**उपनद्या : भीमा नदीस उजव्या किनाऱ्याने म्हणजे दक्षिणेकडून भामा, इंद्रायणी, मुळा-मुळा, नीरा व माण या नद्या मिळतात तर डाव्या किनाऱ्याने म्हणजे उत्तरेकडून वेळ, घोड व सीना या नद्या येऊन मिळतात. (नकाशा क्र. ३.४ पाहा.)**

**भीमा नदीचा प्रवाहमार्ग :** भीमा नदीचा उगम सुमारे १,००० मी. पेक्षा जास्त उंचीच्या डोंगरावर **भीमाशंकर** येथे होतो व पहिल्या ८ कि. मी. च्या अंतरामध्येच नदी एकदम खाली कोसळते आणि २०० मी. उंचीच्या प्रदेशावरून वाहू लागते. सुरुवातीस नदीचा प्रवाह पूर्वेस आहे. नंतर तो आग्नेयेस होतो. त्यानंतर भीमा नदी भीमानेर खोऱ्याच्या अतिशय खडकाळ आणि अरुंद दरीमधून सुमारे ५० ते ५५ कि. मी. वाहते. त्यानंतर मार्गामध्ये **भामा आणि इंद्रायणी नद्या** उजव्या किनाऱ्याने आणि **वेळ** नदी येऊन मिळाल्यावर प्रवाह ईशान्येकडे वळतो. काही अंतरानंतर हा प्रवाह दक्षिणेकडे वाहू लागतो आणि रांजणगावाजवळ उजव्या बाजूने मुळा-मुठा या नद्या येऊन मिळतात. नंतर भीमा नदी आग्नेयेस वळते व नागमोडी वळणाने २०-२२ कि. मी. गेल्यावर **भीमा व घोडनदीचा** संगम होतो. घोडनदीला डाव्या किनाऱ्यापासून कुकडी व मीना नद्या मिळतात. पुढे टेंभुर्णीजवळ उजव्या किनाऱ्याने भोर तालुक्यातून वाहत येणारी नीरा नदी येऊन मिळते. या आधी **नीरा व कऱ्हा नद्यांचा संगम होतो. पवित्र तीर्थक्षेत्र पंढरपुरातून भीमा नदी** वाहत जाते व त्यानंतर उजव्या किनाऱ्याने येणारी **माण नदी** भीमेला मिळते.


**सीना खोरे :** भीमेच्या डाव्या किनाऱ्याने सीना नदी वाहते. अहमदनगर जिल्ह्यात सीनेचा उगम होतो. तिला **भोगावती व बोरी** या उपनद्या येऊन मिळतात. नंतर सीना नदी ही भीमेला सोलापूर जिल्ह्यात मिळते.

### भीमा नदीस मिळणाऱ्या प्रमुख उपनद्या

**(१) वेळ नदी : सह्याद्रीचा एक सुळका धाकले येथे या नदीचा** उगम होतो. ही नदी आग्नेयेस वाहताना भीमा नदीस समांतर वाहते आणि तळेगाव-ढमढेरेच्या खाली ८ कि. मी. अंतरावर भीमा नदीस मिळते. या नदीची लांबी ६४ कि. मी. आहे.

**(२) घोडनदी : घोडनदीच्या उगमाचे स्थान** सह्याद्री पर्वतावर असून **भीमा नदीच्या उगमाच्या उत्तरेस १५ कि. मी. अंतरावर** आहे. सुमारे २४ कि. मी. च्या अंतरामध्ये प्रदेशाची २०० मी. उंची कमी होते. तिला **कुकडी व मीना** या उपनद्या येऊन मिळतात व शिरूरजवळ भीमा नदीस घोडनदी येऊन मिळते.

**(३) भामा नदी : भीमाशंकरच्या दक्षिणेस १० कि. मी. अंतरावर भामा नदीचा** उगम होतो. तिच्या खोऱ्यास 'भामनेर' असेही म्हणतात. पिंपळगावजवळ ती भीमा नदीस येऊन मिळते.




**भीमा नदीचे खोरे :**

भीमा नदी पुण्याजवळ भीमाशंकर येथे उगम पावून आग्नेय दिशेने वाहते. पुणे, सोलापूर व काही प्रमाणात सातारा, नगर, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांचा काही भाग आपल्या खोऱ्यात समाविष्ट करते. उत्तरेस हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगा व दक्षिणेस महादेव डोंगररांगांनी मर्यादित झालेल्या भीमा नदीस उजव्या काठाने इंद्रायणी, मुळा-मुठा, नीरा व माण तर डाव्या काठाने घोड व सीना या उपनद्या येऊन मिळतात.

**नकाशा क्र. ३.४ : भीमा नदीचे खोरे**

**(४) इंद्रायणी नदी : लोणावळ्याच्या नैर्ऋत्येस ५ कि. मी. अंतरावर कुरवंडे खेड्याजवळ नदीचा उगम** होतो. नंतर ती पूर्वेस वाहते. डाव्या किनाऱ्याने तिला **आंद्र नदी** मिळते. नंतर **देहू आणि आळंदी या पवित्र तीर्थक्षेत्री इंद्रायणी वाहत जाते.** नंतर भीमा आणि इंद्रायणीचा संगम होतो.

**(५) मुळा–मुठा : बोरघाटाच्या दक्षिणेस मुळा नदीचा उगम** होतो. त्यानंतर ती पौड गावाजवळून वाहते, नंतर ती पूर्वेस वळते. मार्गात **पवना** आणि पुढे पुण्याजवळ उजव्या किनाऱ्याने **मुठा** नदीस येऊन मिळते. **मुळा-मुठेचा संयुक्त प्रवाह रांजणगावजवळ भीमा नदीस मिळतो.** मुठा नदीचा उगमही सह्याद्रीतील डोंगरामध्ये होतो. प्रवाहाचा पहिला भाग पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात आहे. **पुढे मुठा नदी पुणे शहरातून वाहते व मुळा नदीस मिळते.**

**(६) नीरा : भोर तालुक्यात नीरा नदीचा उगम** होतो. नंतर ती ईशान्येस वाहते व काही अंतर पुणे आणि साताऱ्याची सरहद्द निर्माण करते. नंतर नीरा व कऱ्हा नद्यांचा संगम होतो व शेवटी भीमा नदीस मिळते.

भीमा खोऱ्यात पुणे, अहमदनगर, बारामती, फलटण, पंढरपूर, सोलापूर, बार्शी, उस्मानाबाद आदी शहरे वसली आहेत.


## कृष्णा नदीचे खोरे

**महाराष्ट्र पठारावरून वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या खालोखाल महत्त्वाची कृष्णा ही नदी आहे. दख्खनच्या पठारावर पश्चिम घाटापासून पूर्व घाटापर्यंत वाहून पुढे बंगालच्या उपसागरास मिळते.**

**नदीप्रणालीचे क्षेत्र : कृष्णा नदीचा उगम सातारा जिल्ह्यात महाबळेश्वरला १२२० मीटर उंचीवर १७° ५९' उ. अ. व ७३° ३८' पू. रे. येथे झालेला आहे. 'क्षेत्र महाबळेश्वर' येथे कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री व सावित्री या पाच नद्यांची उगम-क्षेत्रे पाहावयास मिळतात.** कृष्णा नदीच्या उगमाच्या ठिकाणापासून पश्चिमेस ६५ कि. मी. अंतरावर अरबी समुद्र आहे. कृष्णा नदीचा उतार सुरुवातीस दक्षिणेस आहे. नंतर नदीचा प्रवाह पूर्वेस व आग्नेयेस होतो. महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशातून कृष्णा नदी वाहत जाते व शेवटी त्रिभुज प्रदेश निर्माण होऊन मच्छलीपट्टणजवळ बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते.

कृष्णा नदीची एकूण लांबी १२९० कि. मी. असून नदीप्रणालीचे क्षेत्र २,५९,००० चौ. कि. मी. आहे. **महाराष्ट्रात कृष्णा नदीचा प्रवाह फक्त २८२ कि. मी. लांबीचा असून तिचे नदीप्रणालीचे क्षेत्र २८,७०० चौ. कि. मी. आहे. महाराष्ट्रात कृष्णा नदीचे खोरे व भीमा उपनदीचे खोरे मिळून वार्षिक पाण्याचा प्रवाह २७,९२० दशलक्ष घनमीटर आहे.**






**कृष्णा नदीचे खोरे :**

वाईजवळ महाबळेश्वर येथे कृष्णा नदी उगम पावून आग्नेय दिशेने सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातून वाहत जाते. पश्चिमेस सह्याद्री पर्वत, ईशान्येस शंभू महादेव डोंगररांगा कृष्णेचे खोरे मर्यादित करीत असून तिला उजव्या काठाने कोयना, वारणा, पंचगंगा, दूधगंगा व वेदगंगा तर डाव्या काठाने फक्त येरळा नदी येऊन मिळते.

**नकाशा क्र. ३.५ : कृष्णा नदीचे खोरे**

**राजकीय क्षेत्र :** कृष्णा नदीच्या खोऱ्यात सातारा (भीमा खोऱ्याचे खंडाळा, फलटण व माण तालुके वगळून), सांगली (जत व **खानापूरचा पूर्व भाग वगळून) व संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्याचा समावेश होतो.**

पश्चिमेस सह्याद्री पर्वत व पूर्वेस शंभू महादेव डोंगरांच्या रांगा यांच्या दरम्यान कृष्णा नदी वाहते. तसेच **सर्वसाधारणपणे नदीप्रवाहाची दिशा उत्तर-दक्षिण असून ती सह्याद्री पर्वतास बऱ्याच अंशी महाराष्ट्रात समांतर** आहे. **महाराष्ट्रातील कृष्णा नदीच्या खोऱ्यास अप्पर कृष्णा खोरे असे म्हटले जाते.** कृष्णा नदीच्या उगमाच्या क्षेत्रात महाबळेश्वरच्या परिसरात पावसाचे प्रमाण ५०० ते ६२५ सें. मी. च्या दरम्यान आहे.

**कृष्णा नदीला बहुतेक सर्व नद्या उजव्या किनाऱ्याने किंवा पश्चिम व दक्षिणेकडून मिळतात. वेण्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, दूधगंगा व वेदगंगा या नद्या उजव्या किनाऱ्याने तर येरळा नदी डाव्या किनाऱ्याने कृष्णेस मिळते.**

## कृष्णा नदीचा प्रवाहमार्ग

**कृष्णा नदीचा उगम महाबळेश्वर येथे** झाल्यावर ती आग्नेयेस वाहू लागते. त्यानंतर कृष्णा नदी वाई क्षेत्रास पावन करून सातारा जिल्ह्यात माहुली येथे येते. येथे कृष्णा व वेण्णा नद्यांचा संगम होतो. नंतर कृष्णा नदी दक्षिणवाहिनी होते. पूर्वेकडील सुळक्यांना वळसा घालून माहुलीपासून सुमारे ५० कि. मी. अंतरावर **कऱ्हाड येथे कृष्णा व कोयनेचा प्रीतिसंगम होतो.** सातारा जिल्ह्यात या नद्यांव्यतिरिक्त **कुडळी, उरमोडी व तारळी** या नद्या वाहतात. **वारणा नदी** पूर्व व पुढे आग्नेय दिशेने १३० कि. मी. वाहत जाते व सांगलीजवळ उजव्या किनाऱ्याने कृष्णेस मिळते. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातून वाहणारी **पंचगंगा नदी** कुरुंदवाडजवळ कृष्णा नदीस मिळते. तेथून जवळच **श्रीक्षेत्र नृसिंहवाडी (नरसोबाची वाडी) येथे दत्ताचे जागृत देवस्थान आहे.** कोल्हापूर जिल्ह्यात दक्षिण भागातून वाहणाऱ्या **दूधगंगा व वेदगंगा** या नद्या ईशान्येकडे वाहत जाऊन त्यांचा संगम होतो व कुरुंदवाडच्या पुढे १५ कि. मी. अंतरावर कृष्णा नदीस हा संयुक्त प्रवाह येऊन मिळतो. कोल्हापूर जिल्ह्याची उत्तर सरहद्द वारणा नदीप्रवाहाने निश्चित होते.

डाव्या किनाऱ्याने कृष्णा नदीस फक्त **येरळा** नदी वाहते. नदीचा उगम सातारा जिल्ह्यात खटाव (वडूज) तालुक्यात शंभू महादेव डोंगरात होतो. भिलवडीजवळ कृष्णा नदीस येरळा मिळते.

## कृष्णा नदीच्या महत्त्वाच्या उपनद्या

**(१) कोयना : कोयना नदीचा उगम कृष्णा नदीप्रमाणेच क्षेत्र महाबळेश्वर येथे होतो.** नंतर ही दक्षिणेकडे वाहते. सातारा जिल्ह्यातील ही महत्त्वाची नदी दक्षिणेकडे हेळवाकपर्यंत ६५ कि. मी. पर्यंत वाहते. तेथे कोयना धरण बांधलेले आहे. वीजनिर्मितीसाठी तेथील पाणी बोगद्यातून पश्चिमेस पोफळी येथे सोडले जाते. हेळवाकनंतर कोयनेचा प्रवाह एकदम पूर्वेकडे वळतो आणि आणखी ६५ कि. मी. गेल्यावर कऱ्हाड येथे कृष्णा व कोयनेचा संगम होतो.

**(२) पंचगंगा : कोल्हापूर जिल्ह्यातील जीवनवाहिनी म्हणून पंचगंगा म्हटली जाते.** ती पाच नदीप्रवाहांपासून तयार झालेली आहे म्हणून तिला 'पंचगंगा' असे म्हणतात. **कुंभी, कासारी, तुळशी व भोगावती या चार उपनद्या व पाचवी सरस्वती गुप्त नदी मानली जाते.** अशी ही पंचगंगा नदी कृष्णेस मिळते.

कोल्हापूर जिल्ह्यातून दक्षिण भागातून दूधगंगा, वेदगंगा, घटप्रभा व ताम्रपर्णी नद्या वाहतात.

कृष्णा नदीच्या खोऱ्यात महाबळेश्वर, वाई, सातारा, कराड, सांगली, मिरज, कोल्हापूर तसेच किर्लोस्करवाडी, इस्लामपूर यांसारखी शहरे आहेत.

# तापी नदीचे खोरे

आपण आतापर्यंत वर्णन केलेल्या सर्व नद्या पूर्ववाहिनी व आग्नेयवाहिनी होत्या. त्या सर्व सह्याद्री पर्वतामध्ये उगम पावून बंगालच्या उपसागरास जाऊन मिळतात. **तापी नदी मात्र पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते.** दक्षिणेस सातमाळा-अजिंठा डोंगररांगा आणि उत्तरेस सातपुडा पर्वत यांच्या दरम्यान तापी नदी वाहते.

**नदीप्रणालीचे क्षेत्र :** सूर्याने स्वतःच्या उष्णतेपासून संरक्षण मिळविण्यासाठी तापी नदी निर्माण केली आहे असे म्हटले जाते. **तापी नदीचा उगम मध्य प्रदेशात सातपुडा पर्वतरांगांवर मुलताई येथे होतो.** नदीचा प्रवाह पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र व गुजरात राज्यातून वाहत जाऊन सुरत येथे अरबी समुद्रास तापी नदी मिळते.


तापी नदीची एकूण लांबी ६७० कि. मी. असून नदीप्रणालीचे क्षेत्र ५७,६६२ चौ. कि. मी. आहे. यापैकी महाराष्ट्रात तापी नदीची लांबी २०८ कि. मी. असून नदीप्रणालीचे क्षेत्र ३१,६६० चौ. कि. मी. आहे. महाराष्ट्रात तापी नदीच्या खोऱ्यातून दरवर्षी पाण्याचा प्रवाह सुमारे ७२५० दशलक्ष घनमीटर वाहतो.



## तापी नदीच्या उपनद्या

तापी नदीस विदर्भाच्या पश्चिम भागातून वाहत येणारी **पूर्णा नदी** मिळते. **ही तापीची मुख्य उपनदी आहे. तापी नदीला उजव्या किनाऱ्याने चंद्रभागा, भुलेश्वरी, शहानूर, नंदवान या उपनद्या मिळतात.** बहुतेक सर्व नद्या सातमाळा-अजिंठा डोंगरात उगम पावून दक्षिणोत्तर वाहून **डाव्या किनाऱ्याने तापीला मिळतात. या उपनद्या पैकी काटेपूर्णा, मोरना, मण व नळगंगा** आहेत, तर तापी-पूर्णेच्या संयुक्त प्रवाहास पुढे पश्चिमेकडे **वाघूर, गिरणा, बोरी, पांझरा, बुराई** या उपनद्या येऊन मिळतात. (नकाशा क्र. ३.६ पाहा.)

**राजकीय क्षेत्र :** तापी-पूर्णा खोऱ्याने **पश्चिम विदर्भाचा अमरावती, अकोला, वाशीम व बुलडाणा जिल्ह्यांचा भाग** व्यापलेला आहे तर यानंतर जळगाव, **धुळे व नंदुरबार हे जिल्हे या खोऱ्यात समाविष्ट** होतात.




**तापी नदीचे खोरे :**

मध्य प्रदेशात सातपुडा पर्वतात तापी नदी उगम पावून महाराष्ट्रात पूर्व-पश्चिम दिशेने खानदेशातून वाहते. तिला विदर्भातील अमरावती, अकोला व बुलडाणा जिल्ह्यातून वाहणारी पूर्णा नदी येऊन मिळते. उत्तरेस सातपुडा पर्वतरांग, दक्षिणेस सातमाळा-अजिंठा डोंगररांगांनी मर्यादित झालेल्या तापी-पूर्णा नदीला डाव्या काठाने काटेपूर्णा, मोरना, मण, नळगंगा, वाघूर, गिरणा, बोरी, पांझरा व बुराई या उपनद्या मिळतात. उजव्या काठाने कोणत्याही फारशा महत्त्वाच्या नद्या मिळत नाहीत.

नकाशा क्र. ३.६ : तापी नदीचे खोरे

**तापी नदीचे प्रवाहमार्ग :** उत्तर महाराष्ट्रात तापी-पूर्णा खोरे आहे. **तापी नदीचे क्षेत्र खचदरीच्या भागात आहे, यामुळे नदी खोल घळईमधून वाहत जाते** आणि **अमरावती जिल्ह्याची वायव्य सरहद्द तापीच्या घळईमुळे निर्माण झालेली आहे.** तापी नदीच्या दक्षिणेस मेळघाट व गाविलगडचे डोंगर तर उत्तरेस कालीभीतचे डोंगर आहेत. अमरावती जिल्ह्यातून पूर्व-पश्चिम दिशेने **कापरा, सिपना, गाडगी व डोलर** या उपनद्या तापी नदीला मिळतात. **त्यानंतर मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर खिंडीतून महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यात रावेर शहराजवळ तापी नदी पुन्हा प्रवेश करते. जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून वाहताना नदीचा प्रवाह पूर्व-पश्चिम दिशेने असून जवळ-**जवळ सरळ आहे. नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशे शहराच्या थोड्या पश्चिमेस तापी नदी गुजरातमध्ये प्रवेश करते.

तापी-पूर्णा खोऱ्याची **साधारण रुंदी २४० कि. मी.** आहे. खोऱ्याच्या उत्तरेस तापी नदीला अगदी जवळून **समांतर अशी सातपुडा** पर्वतरांग आहे. त्याची दक्षिण बाजू लहान-लहान प्रवाहाने झिजलेली असून **पायथ्याशी शिलापद किंवा पिडमाँट** तयार झालेले आहेत. तसेच तो भाग ओबडधोबड प्रदेशाचा बनलेला असून **बिहडची निर्मिती** झालेली आहे. तापी नदीच्या **खोल घळईने काठाचे भागी** झिजलेले आहेत. या नदीचा **मानवी दृष्टिकोनातून मर्यादित स्वरूपात उपयोग होतो.**


# महाराष्ट्राची नदीप्रणाली

| मुख्य नदीचे खोरे | लांबी व क्षेत्र (भारत व महाराष्ट्र) | राजकीय क्षेत्र | उपखोरे | उजव्या किनाऱ्याने मिळणाऱ्या उपनद्या | डाव्या किनाऱ्याने मिळणाऱ्या उपनद्या |
|---|---|---|---|---|---|
| **गोदावरी नदी** | **भारत :**<br>लांबी : १४१५ कि.मी.<br>क्षेत्र : ३,१३,३८९ चौ. कि. मी.<br>**महाराष्ट्र :**<br>लांबी : ६६८ कि. मी.<br>क्षेत्र : १,५३,७७९ चौ. कि. मी. | **नाशिक** जिल्ह्याचा दक्षिण भाग, **अहमदनगर** जिल्ह्याचा उत्तर भाग, **मराठवाड्यातील** सर्व जिल्हे, **विदर्भातील** वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे. | गोदावरी मुख्य खोरे | दारणा, प्रवरा, मुळा, बोरा, सिंदफणा, (बिंदुसरा), कुंडलिका, सरस्वती. | कादवा, शिवना, खाम. |
| | | | गोदावरी-पूर्णा खोरे | अंजना, गिरजा, कापरा, दुधना. | खेळणा. |
| | | | मांजरा नदीचे खोरे | तावरजा, तेरणा, गिरणा. | मन्याड, लेंडी. |
| | | | पैनगंगा खोरे | कयाधू. | पूस, आरणा, वाघाडी, खुनी. |
| | | | वर्धा खोरे | वेमला, निरगुडा, विदर्भ. | कार, बोर, नंद, इरई. |
| | | | वैनगंगा खोरे | कन्हान (पेंच, कोलार) नाग, मूल, अंधारी, पठारी. | सुर, चुलबंद, गाढवी, खोब्रागडी, बाघ, कटराणी, फुअर, बांदिया. डोंगरी. |
| | | | प्राणहिता-इंद्रावती खोरे | — | कोठारी |
| **भीमा नदी** | **महाराष्ट्र :**<br>लांबी : ४५१ कि. मी.<br>क्षेत्र : ४६,१८४ चौ. कि. मी. | **पुणे व सोलापूर** हे संपूर्ण जिल्हे, **साताऱ्यातील** खंडाळा, फलटण व माण तालुके, **मराठवाड्यातील** बीड जिल्ह्यातील आष्टी व उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा, भूम, तुळजापूर, उमरगा तालुके. | भीमा खोरे | भीमा, इंद्रायणी, मुळा-मुठा, पवना, वेळ, कऱ्हा, नीरा, माण, बोर. | कुकडी, पुष्पावती, मीना, घोड. |
| | | | सीना खोरे | — | भोगावती, बोरी |
| **कृष्णा नदी** | **भारत :**<br>लांबी : १२९० कि. मी.<br>क्षेत्र : २,५९,००० चौ. कि. मी.<br>**महाराष्ट्र :**<br>लांबी : २८२ कि. मी.<br>क्षेत्र : २८,७०० चौ. कि. मी. | **सातारा**-खंडाळा, माण व फलटण तालुका वगळून, **सांगली**-जत व खानापूरचा पूर्व भाग वगळून, **संपूर्ण कोल्हापूर** जिल्हा. | कृष्णा खोरे | कोयना, वारणा, पंचगंगा [कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती व सरस्वती (गुप्त)], दूधगंगा, वेदगंगा, घटप्रभा, ताम्रपर्णी. | येरळा, नंदला, अग्रणी. |

पुढे चालू



| मुख्य नदीचे खोरे | लांबी व क्षेत्र (भारत व महाराष्ट्र) | राजकीय क्षेत्र | उपखोरे | उजव्या किनाऱ्याने मिळणाऱ्या उपनद्या | डाव्या किनाऱ्याने मिळणाऱ्या उपनद्या |
|---|---|---|---|---|---|
| **तापी नदी** | **भारत :**<br>लांबी : ७२४ कि. मी.<br>क्षेत्र : ५७,६६२ चौ. कि. मी.<br>**महाराष्ट्र :**<br>लांबी : २०८ कि. मी.<br>क्षेत्र : ३१,६६० चौ. कि. मी. | **पश्चिम विदर्भाचा** अमरावती, अकोला व बुलडाणा.<br>**खानदेशचे** जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हे. | पूर्णा-तापी खोरे | चंद्रभागा, मुलेश्वरी, नंद, वान. | कापरा, सिपना, गाडगी, डोलर (अमरावती जिल्ह्यातील तापीच्या उपनद्या) पेढी, काटेपूर्णा, मोरना, मण, नळगंगा, बिसवा. |
| | | | तापी-पूर्णा खोरे | गोमई | वाघूर, गिरणा (अरम, लितूर, मोसम) बोरी, पांझरा, बुराई. |
| **कोकण** | नद्यांची लांबी : ४९ ते १५५ कि. मी. दरम्यान.<br>क्षेत्र : ३०,३९४ चौ. कि. मी. | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग. | उत्तर कोकण | **स्वतंत्र नद्या :** दमणगंगा, वरोळी, सूर्या, वैतरणा, (दहरेजा, पिंजाल, लोहानी, बांद्री उपनद्या), तानसा, मातसई, काळू, उल्हास (मुरबाडी, बारबी उपनद्या). | |
| | | | मध्य कोकण | **स्वतंत्र नद्या :** पाताळगंगा, आंबा, कुंडलिका, काळ, गांधार, भोगावती, घोड, सावित्री, भारजा, जोग, वशिष्ठी (जगबुडी उपनदी), शास्त्री (बाव उपनदी) | |
| | | | दक्षिण कोकण | **स्वतंत्र नद्या :** काजळी, मुचकुंदी, काजवी, शुक, देवगड आचरा, गड, कर्ली (कार्ली उपनदी), तेरेखोल, कळणा, तिलारी. | |
| **नर्मदा नदी** | **भारत :**<br>लांबी १२६० कि. मी.<br>**महाराष्ट्र :**<br>लांबी : ५४ कि. मी.<br>क्षेत्रफळ भारत : ७०५५ चौ. कि. मी. | नंदुरबार जिल्ह्याची वायव्य सरहद्द. | | | |




पूर्वेस सह्याद्री पर्वत व पश्चिमेस अरबी समुद्र यामुळे मर्यादित झालेल्या चिंचोळ्या कोकणातून अतिशय वेगाने नद्या वाहतात. उत्तरेकडून दक्षिणेकडे दमणगंगा, वैतरणा, उल्हास, सावित्री, तेरेखोलसारख्या प्रमुख नद्या साधारणपणे एकमेकांस समांतर दिशेने वाहत जाऊन अरबी समुद्रास मिळतात. नद्यांच्या मुखाशी खाड्या तयार झालेल्या आहेत.

उदा., वसईची खाडी, धरमतरची खाडी, दाभोळची खाडी, जयगडची खाडी वगैरे.

**नकाशा क्र. ३.७ : कोकणातील नद्या (कोकण खोरे)**

## तापी नदीची मुख्य उपनदी 'पूर्णा'

तापी नदीची मुख्य उपनदी पूर्णा असून तिचा उगम या खोऱ्यात पूर्वेस असलेल्या **गाविलगड डोंगराच्या दक्षिण उतारावर होतो.** नंतर ती दक्षिणेकडे अमरावती जिल्ह्यात येते व पश्चिमेला वळते. पुढे अकोला व बुलडाणा जिल्ह्यातून पश्चिमेस पूर्णा नदी वाहत जाऊन त्या ठिकाणी **तापी नदी जळगाव जिल्ह्यात शिरते तेथे श्रीक्षेत्र चांगदेवजवळ पूर्णा मिळते.** हे ठिकाण भुसावळच्या पूर्वेस आहे.

पूर्णा नदीच्या ज्या **उपनद्या गाविलगड टेकड्यांतून** येतात त्या उत्तर-**दक्षिणेस वाहतात व एकदम पश्चिमेस वळून पूर्णा नदीस मिळतात.** उदाहरणार्थ, **पेढी नदी.** दक्षिणेस असलेल्या अजिंठा डोंगरातून उगम पावणाऱ्या नद्या दक्षिणोत्तर वाहत जाऊन पूर्णा नदीला मिळतात. या सर्व उपनद्या **एकमेकांना समांतर** आहेत. **अकोला व वाशीम जिल्ह्यातून काटेपूर्णा, मोरना व मण या उपनद्या डाव्या काठाने तसेच बुलडाणा जिल्ह्यातून नळगंगा नदी दक्षिणोत्तर दिशेने वाहत जाऊन ती पूर्णेस मिळते.**

**तापी व पूर्णा नद्यांचा संयुक्त प्रवाह :** तापी व पूर्णेचा संयुक्त प्रवाह **जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून वाहत जातो.** या प्रदेशाला ' खानदेश ' असेही म्हणतात. डाव्या किनाऱ्याने तापी नदीस मिळणारी दुसरी महत्त्वाची उपनदी **गिरणा** आहे. तिचा उगम दक्षिणेस सातमाळ्याच्या उत्तर सुळक्यावरील चांदोर टेकडीत होतो व नदी पूर्वेस मालेगाव पठारावरून वाहत जाते. नंतर ती उत्तरेस वळते व जळगाव जिल्ह्यात तापी नदीस मिळते. **गिरणा नदीस उजव्या किनाऱ्याने पांजण नदी व डाव्या किनाऱ्याने मोसम** नदी मिळते. याशिवाय धुळ्याच्या जवळून वाहणाऱ्या **बोरी व पांझरा नद्या** प्रथम पूर्व दिशेने व नंतर दक्षिणोत्तर वाहत जाऊन तापी नदीस मिळतात. तसेच पश्चिम-पूर्व दिशेने **बुराई नदी** वाहत जाऊन तीदेखील तापीस मिळते.

तापी नदीच्या खोऱ्यात अमरावती, अकोला, चाळीसगाव, बुलडाणा, जळगाव, भुसावळ, धुळे व नंदुरबार यांसारखी महत्त्वाची शहरे आहेत.

## नर्मदा नदीचे खोरे

आपल्या महाराष्ट्रातून नर्मदा नदीचा काही भाग वाहतो. हे नेहमी सर्वसामान्य लोकांकडून विसरले जाते. **महाराष्ट्राच्या वायव्य कोपऱ्यात नंदुरबार जिल्ह्याची सुमारे ५४ कि. मी. सरहद्द नर्मदा नदीच्या प्रवाहामुळे तयार होते. ती अतिशय खोल घळईतून वाहते** आणि सातपुडा रांगात असलेल्या अक्राणी टेकड्यांमुळे तापी नदीपासून अलग झालेले आहे. भौगोलिकदृष्ट्या या भागातून नर्मदा नदी पार करणे अवघड आहे.



## कोकण नद्या किंवा कोकण खोरे

**नदीप्रणालीचे क्षेत्र :** पूर्वेस सह्याद्री पर्वत व पश्चिमेस अरबी समुद्र यामुळे कोकण किनारपट्टी मुळातच अरुंद झालेली आहे. शिवाय सह्याद्रीच्या पश्चिमेकडे तीव्र उतार आहे. या दोन कारणांमुळे **कोकणातील नद्या लांबीने खूप लहान असून वेगाने वाहतात व अरबी समुद्रास मिळतात.** उत्तरेस दमणगंगा नदी व दक्षिणेस तेरेखोल नदीपर्यंत ७२० कि. मी. लांबीच्या व ३० ते ६० कि. मी. रुंदीच्या या कोकण किनारपट्टीमधून या नद्या वाहत जातात. **या नद्यांची लांबी ४९ ते १५५ कि. मी. दरम्यान** असून कोकणातून वाहणाऱ्या या नद्यांमधून **वार्षिक पाण्याचा प्रवाह ४२,४८० दशलक्ष घनमीटर आहे.**

## कोकणातील नद्या व देशातील नद्या यांमध्ये अनेक बाबतींत फरक

(१) देशावरील नद्या पूर्ववाहिनी आहेत तर **कोकणातील नद्या पश्चिमवाहिनी** आहेत. (२) या नद्यांचा उगम जरी सह्याद्री पर्वतामध्ये होत असला तरी **देशावरून वाहणाऱ्या नद्या जास्त लांबीच्या** आहेत, तर **कोकणातील नद्या अतिशय आखूड** आहेत. (३) देशावरील नद्यांचे उतार सर्वसाधारण संथ स्वरूपाचे आहेत. त्यांची खोरी रुंद असून त्यांचा विविध प्रकारे उपयोग होतो; तर याउलट कोकणातील नद्या सरळ कड्यासारख्या असणाऱ्या सह्याद्री पर्वतावरून अतिशय वेगाने वाहत येतात आणि अरुंद व खडकाळ प्रदेशावरून लगेच समुद्रास मिळतात. त्यांचा उपयोग मर्यादित स्वरूपात होतो.

**तक्ता क्र. ३.२ : महाराष्ट्र — नदीप्रणाली स्वरूप**

(आकडेवारी महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात)

| क्र. | नदीचे खोरे | मुख्य नदीची लांबी कि. मी. | नदीप्रणालीचे अंदाजे क्षेत्रफळ (चौ. कि. मी.) | वार्षिक पाण्याचा प्रवाह (दशलक्ष घनमीटर) |
|---|---|---|---|---|
| १. | कोकण | ४९ ते १५५ | ३०,३९४ | ४२,४८० |
| २. | गोदावरी | ६६८ | १,५३,७७९ | ३७,८३० |
| ३. | भीमा | ४५१ | ४६,१८४ | २७,९२० |
| ४. | कृष्णा | २८२ | २८,७०० | |
| ५. | तापी-पूर्णा | २०८ | ३१,६६० | ७,२५० |
| ६. | नर्मदा | ५४ | ७,०५५ | ६२० |
| | एकूण | — | * ३,०७,७७२ | १,१६,१०० |

* India – 1971 and 1972 च्या आधारे महाराष्ट्राचे क्षेत्रफळ.

संदर्भ : (i) Commerce Annual Number, 1975; (ii) संकलित आकडेवारी.

## कोकणातील नद्यांचे 'खाडी' हे एक वैशिष्ट्य

सह्याद्रीच्या पश्चिम भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. पावसाळ्यात कोकणातील नद्या दुथडी भरून वाहतात. या नद्या समुद्रास मिळताना वाहून आणलेला गाळ मुखाजवळ साचल्याने वाळूचे दांडे निर्माण झालेले आहेत. नद्यांच्या मुखाजवळील सागराचे पाणी नदीमध्ये शिरते व पाणी खारट बनते. कोकणातून वाहणाऱ्या नद्यांच्या मुखाजवळ खाड्या निर्माण झालेल्या आहेत याचा उल्लेख मागील प्रकरणामध्ये केलेला आहे. नद्यांच्या किनाऱ्यालगतच्या प्रदेशात दलदल असून प्रवाहात भरतीचे पाणी शिरते.

**विभागवार नद्या :** कोकणच्या लांब परंतु अरुंद किनारपट्टीचे उत्तर कोकण, मध्य कोकण व दक्षिण कोकण असे तीन विभाग पाडले जातात. (नकाशा क्र. ३.७ पाहा.)

(१) उत्तर कोकणातून दमणगंगा, सूर्या, वैतरणा, तानसा, काळू, भातसई, उल्हास व मुरबाडी या नद्या वाहतात.

(२) मध्य कोकणातून पाताळगंगा, आंबा, कुंडलिका, काळ, सावित्री, वशिष्ठी, शास्त्री या नद्या वाहतात.

(३) दक्षिण कोकणातून काजवी, मुचकुंदी, वाघोटने, शुक, गड, कर्ली व तेरेखोल या नद्या वाहतात.

कोकणामधील वरील नद्यांपैकी वैतरणा व उल्हास या नद्या जास्त लांबीच्या आहेत. या नद्यांच्या मुखाजवळ त्यांचा प्रवाह किनाऱ्यास समांतर आहे, याचे मुख्य कारण तेथे असणाऱ्या डोंगरांच्या काही रांगा होय.

### उगमाजवळ मोठ्या प्रमाणात झीज

कोकणातून अतिशय वेगाने वाहणाऱ्या या नद्यांनी त्यांच्या उगमाच्या क्षेत्रात तेथील प्रदेशाची मोठ्या प्रमाणात झीज केलेली आहे आणि हळूहळू जलविभाजक पूर्वेकडे सरकत आहेत. अनेक ठिकाणी नदीचौर्याची शक्यता निर्माण झालेली आहे. विशेषतः त्र्यंबक घाटात आणि ताम्हणी भागात नदीचौर्य आढळते. वैतरणा आणि सावित्री नद्यांनी पूर्वेकडे वाहणाऱ्या काही प्रवाहांचा मार्ग आपल्या पात्रामध्ये वळवून घेतलेला आहे.

महाराष्ट्राच्या राजधानीचे स्थान कोकणात आहे. मुंबईचा फार मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. मुंबई, ठाणे, कल्याण इत्यादी औद्योगिकदृष्ट्या प्रगत शहरे कोकणात आहेत. त्या मानाने अलिबाग, रत्नागिरी, चिपळूण व वेंगुर्ला या शहरांचा कमी विकास झालेला आहे.

## बहुपर्यायी प्रश्न

(१) विदर्भाच्या पूर्व भागात नद्या .......... दिशेने वाहतात.
(अ) पूर्व-पश्चिम (ब) दक्षिण-उत्तर (क) पश्चिम-पूर्व (ड) उत्तर-दक्षिण

(२) पूर्व-पश्चिम दिशेने .......... मध्ये नद्या वाहतात.
(अ) खानदेश (ब) पश्चिम महाराष्ट्र (क) मराठवाडा (ड) पूर्व विदर्भ

(३) महाराष्ट्रात .......... ही प्रमुख जलविभाजक आहे.
(अ) शंभू महादेव डोंगररांग (ब) हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांग
(क) सह्याद्री पर्वत (ड) सातमाळा-अजिंठा डोंगररांग

(४) महाराष्ट्राच्या वायव्य सरहद्दीला .......... नदी स्पर्श करून जाते.
(अ) तेरेखोल (ब) इंद्रावती (क) नर्मदा (ड) गोदावरी

(५) महाराष्ट्रात .......... नदीला सर्वांत जास्त उपखोरी आहेत.
(अ) कृष्णा (ब) गोदावरी (क) तापी (ड) नर्मदा

(६) गोदावरीच्या खोऱ्याने महाराष्ट्राचे .......... क्षेत्र व्यापलेले आहे.
(अ) २५% (ब) ८०% (क) ४९% (ड) ६०%

(७) गोदावरीचा उगम नाशिक जिल्ह्यात .......... टेकडीवर होतो.
(अ) अस्तांभा (ब) गाळणा (क) ब्रह्मगिरी (ड) महाबळेश्वर

(८) महाराष्ट्राचे सर्वांत जास्त क्षेत्रफळ .......... नदीने व्यापलेले आहे.
(अ) कृष्णा (ब) भीमा (क) तापी (ड) गोदावरी

(९) प्रवरा, सिंदफणा व दुधना या .......... नदीच्या उपनद्या आहेत.
(अ) कृष्णा (ब) भीमा (क) तापी (ड) गोदावरी

(१०) गोदावरी नदीचे .......... उपखोरे आहे.
(अ) सीना (ब) पैनगंगा (क) पंचगंगा (ड) तापी

(११) कन्हान, पेंच व बाघ या उपनद्या .......... खोऱ्यात आहेत.
(अ) वर्धा (ब) पैनगंगा (क) वैनगंगा (ड) इंद्रावती

(१२) भीमा नदीचा उगम .......... येथे आहे.
(अ) त्र्यंबकेश्वर (ब) महाबळेश्वर (क) भीमाशंकर (ड) अजिंठा डोंगर

### उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | ड | (२) | अ | (३) | क | (४) | क | (५) | ब | (६) | क |
| (७) | क | (८) | ड | (९) | ड | (१०) | ब | (११) | क | (१२) | क |



(१३) भीमा नदीला डाव्या किनाऱ्याने मुख्यतः .......... नदी मिळते.
(अ) सीना (ब) मांजरा (क) इंद्रावती (ड) पूर्णा

(१४) कृष्णा, कोयना, वेण्णा, गायत्री व सावित्री या पाच नद्यांचा उगम एका ठिकाणी .......... येथे होतो.
(अ) ब्रह्मगिरी (ब) मुलताई (क) क्षेत्र महाबळेश्वर (ड) मैकल

(१५) संपूर्ण .......... जिल्ह्याचा समावेश कृष्णा नदीच्या खोऱ्यात होतो.
(अ) धुळे (ब) गडचिरोली (क) सिंधुदुर्ग (ड) कोल्हापूर

(१६) नीरा नदी .......... जिल्ह्याची सरहद्द निर्माण करते.
(अ) नाशिक व अहमदनगर (ब) सोलापूर व सांगली (क) कोल्हापूर व सांगली (ड) पुणे व सातारा

(१७) कृष्णा नदीला डाव्या किनाऱ्याने फक्त .......... नदी मिळते.
(अ) कोयना (ब) सीना (क) येरळा (ड) पूर्णा

(१८) कऱ्हाड येथे .......... नद्यांचा संगम होतो.
(अ) कृष्णा व कोयना (ब) भीमा व सीना (क) गोदावरी व प्राणहिता (ड) तापी व पूर्णा

(१९) कोल्हापूर जिल्ह्याची जीवनवाहिनी .......... आहे.
(अ) पैनगंगा (ब) पंचगंगा (क) पाताळगंगा (ड) पेंच

(२०) दक्षिणेस सातमाळा-अजिंठा डोंगररांगा व उत्तरेस सातपुडा पर्वत यांच्या दरम्यान .......... नदी वाहते.
(अ) गोदावरी (ब) भीमा (क) तापी (ड) वैनगंगा

(२१) महाराष्ट्रात दोन वेळा प्रवेश करणारी एकमेव .......... नदी आहे.
(अ) नर्मदा (ब) तापी (क) गोदावरी (ड) वर्धा

(२२) तापी नदीची मुख्य उपनदी .......... आहे.
(अ) पूर्णा (ब) पैनगंगा (क) सीना (ड) कोयना

(२३) तापी खोऱ्यात उपनद्या प्रामुख्याने .......... दिशेने वाहतात.
(अ) पूर्व-पश्चिम (ब) उत्तर-दक्षिण (क) पश्चिम-पूर्व (ड) दक्षिण-उत्तर

(२४) .......... नदी खोल घळईमधून वाहते.
(अ) भीमा (ब) प्राणहिता (क) नर्मदा (ड) तेरेखोल

(२५) महाराष्ट्रात .......... नदीची लांबी सर्वांत कमी आहे.
(अ) गोदावरी (ब) तापी (क) कृष्णा (ड) नर्मदा

(२६) .......... मधील नद्या अतिशय आखूड असतात.
(अ) खानदेश (ब) पश्चिम महाराष्ट्र (क) कोकण (ड) विदर्भ

(२७) कोकणात .......... नद्या जास्त लांबीच्या आहेत.
(अ) सावित्री व वशिष्ठी (ब) वैतरणा व उल्हास (क) काजवी व मुचकुंदी (ड) तानसा व भातसई

(२८) चंद्रपूर जिल्ह्यात प्रसिद्ध .......... तलाव आहे.
(अ) भंडारदरा (ब) तानसा (क) खडकवासला (ड) ताडोबा

(२९) लोणार सरोवर .......... जिल्ह्यात आहे.
(अ) बुलडाणा (ब) अकोला (क) जळगाव (ड) पुणे

(३०) ठाणे जिल्ह्यात .......... येथे गरम पाण्याचे झरे आहेत.
(अ) चांगदेव (ब) साव (क) वज्रेश्वरी (ड) उनपदेव

### उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१३) | अ | (१४) | क | (१५) | ड | (१६) | ड | (१७) | क | (१८) | अ |
| (१९) | ब | (२०) | क | (२१) | ब | (२२) | अ | (२३) | ब | (२४) | क |
| (२५) | ड | (२६) | क | (२७) | ब | (२८) | ड | (२९) | अ | (३०) | क |

(३१) महाराष्ट्रात सर्वसाधारण नदीप्रणाली .......... आहे.
(अ) पश्चिमवाहिनी (ब) पूर्ववाहिनी (क) दक्षिणवाहिनी (ड) उत्तरवाहिनी

(३२) पूर्व विदर्भातील नद्या .......... ला मिळतात.
(अ) तापी (ब) कृष्णा (क) गोदावरी (ड) भीमा

(३३) प्रवरा व मुळा नदीचा संयुक्त प्रवाह .......... येथे गोदावरीस मिळतो.
(अ) नेवासे (ब) नांदूर (क) पैठण (ड) पूर्णा स्थानक

(३४) भीमा खोऱ्यात .......... जिल्ह्याचा संपूर्णपणे समावेश होतो.
(अ) अहमदनगर (ब) सातारा (क) उस्मानाबाद (ड) पुणे

(३५) पवित्र तीर्थक्षेत्र पंढरपुरातून .......... नदी वाहते.
(अ) नीरा (ब) भीमा (क) मांजरा (ड) पूर्णा

(३६) मुळा-मुठेचा संयुक्त प्रवाह .......... जवळ भीमा नदीस मिळतो.
(अ) रांजणगाव (ब) शिरूर (क) टेंभुर्णी (ड) पिंपळगाव

(३७) कुरुंदवाडजवळ कृष्णेला .......... नदी मिळते.
(अ) वेण्णा (ब) पंचगंगा (क) वारणा (ड) दूधगंगा-वेदगंगा

(३८) मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर खिंडीतून महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यात .......... शहराजवळ तापी नदी पुन्हा प्रवेश करते.
(अ) शहादा (ब) अमरावती (क) रावेर (ड) बुलडाणा

(३९) जळगाव जिल्ह्यातील श्री क्षेत्र चांगदेवजवळ .......... संगम होतो.
(अ) कृष्णा-कोयना (ब) तापी-पूर्णा (क) वर्धा-वैनगंगा (ड) मुळा-मुठा

(४०) उत्तरेस सातपुडा पर्वतरांग व दक्षिणेस सातमाळा-अजिंठा डोंगरांनी .......... खोरे मर्यादित झालेले आहे.
(अ) कृष्णा (ब) वर्धा (क) तापी-पूर्णा (ड) सीना

(४१) कोकणातील नद्या .......... वाहिनी आहेत.
(अ) पश्चिम (ब) उत्तर (क) पूर्व (ड) दक्षिण

(४२) कोकणातील नद्यांचे .......... हे वैशिष्ट्य आहे.
(अ) चंद्राकृती सरोवरे (ब) पूर मैदाने (क) खाडी (ड) त्रिभुज प्रदेश

(४३) मध्य कोकणातून पाताळगंगा, वशिष्ठी व .......... नद्या वाहतात.
(अ) दमणगंगा (ब) वैतरणा (क) तेरेखोल (ड) शास्त्री

(४४) .......... मध्ये महाराष्ट्राचा तलावांचा प्रदेश आहे.
(अ) पूर्व विदर्भ (ब) कोकण (क) दक्षिण महाराष्ट्र (ड) खानदेश

(४५) तानसा, विहार व वैतरणा तलाव .......... ला पाणीपुरवठा करतात.
(अ) पुणे (ब) नागपूर (क) मुंबई (ड) औरंगाबाद

**उत्तरे**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (३१) | ब | (३२) | क | (३३) | अ | (३४) | ड | (३५) | ब | (३६) | अ |
| (३७) | ब | (३८) | क | (३९) | ब | (४०) | क | (४१) | अ | (४२) | क |
| (४३) | ड | (४४) | अ | (४५) | क | | | | | | |

# ४. हवामान

महाराष्ट्रातील हवामान वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याच्या प्राकृतिक रचनेचा परिणाम हवामानावर झालेला आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम बाजूस अरबी समुद्र आहे. यामुळे महाराष्ट्रात मान्सून वाऱ्यामुळे पाऊस मिळतो. कोकण किनारपट्टीस उत्तर-दक्षिण दिशेने पसरलेला सह्याद्री पर्वत हा महाराष्ट्राच्या हवामानाचा सर्वांत अधिक महत्त्वाचा प्राकृतिक घटक आहे. यामुळेच नैर्ऋत्य मान्सून वारे अडविले जाऊन मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. कोकणात आणि पठारावर पावसाचे पाणी वाहत जाते. महाराष्ट्रामध्ये पावसाव्यतिरिक्त तापमान काही भागांत सौम्य असते, तर काही ठिकाणी कडक ऊन पाहावयास मिळते. हिवाळ्यातही तापमान कमी होते. एखाद्या वेळेस थंडीची लाटही अनुभवास येते. महाराष्ट्रात जसे जास्त पावसाचे प्रदेश आहेत त्याचप्रमाणे अल्प पावसाचे प्रदेशही आढळतात.

### महाराष्ट्रातील हवामानाचे स्वरूप

(१) **कोकण - उष्ण, सम, दमट हवामान :** कोकणची सखल किनारपट्टी अरबी समुद्रास अगदी जवळ असल्याने वर्षभर तो प्रदेश फार उष्णही नसतो आणि फार थंडही नसतो. त्यामुळे कोकणचे हवामान सम असते. वर्षभर तेथील हवेत बरेच बाष्प असते. त्यामुळे हवेत दमटपणा असतो. म्हणून या हवामानाला उष्ण, सम व दमट हवामान असे म्हणतात. कोकणात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो.

(२) **सह्याद्री - आर्द्र व थंड हवामान :** समुद्रसपाटीपासून जसजसे उंच जावे तसतशी हवा थंड होत जाते. म्हणून सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर उन्हाळ्यातदेखील हवामान तुलनात्मकदृष्ट्या थंड असते; अर्थात हिवाळ्यात मात्र कडाक्याची थंडी असते. आंबोली, महाबळेश्वर, माथेरान, पाचगणी, चिखलदरा, तोरणमाळ या ठिकाणी उन्हाळ्यातदेखील तेथील हवा थंड असते. सह्याद्री भागात पाऊस जास्त प्रमाणात पडतो. म्हणजे थोडक्यात सह्याद्रीच्या पर्वतमय भागात आर्द्र व थंड हवामान असते.

(३) **महाराष्ट्र पठार - उष्ण, विषम व कोरडे हवामान :** महाराष्ट्राच्या पठारावर मार्च ते मे या काळात बरीच उष्णता असते, तर हिवाळ्यात हवा थंड असते. म्हणजेच उन्हाळ्यातील व हिवाळ्यातील तापमानात बरीच तफावत असल्याने पठारावरील हवामान विषम असते. पावसाचे प्रमाणही साधारण स्वरूपाचे असते. म्हणूनच पठारावरील हवामान उष्ण, विषम व कोरडे आहे.

## महाराष्ट्रातील ऋतू

(१) **उन्हाळा :** मार्च ते मे, (२) **पावसाळा :** जून ते सप्टेंबर, (३) **हिवाळा :** ऑक्टोबर ते फेब्रुवारी.

याचा आपण सखोलपणे अभ्यास करणार आहोत.

## उन्हाळा - उन्हाळ्यातील हवामानाची परिस्थिती

### तापमान

२१ मार्चनंतर **उत्तर गोलार्धात सूर्यकिरणे लंबरूप** पडण्यास प्रारंभ होतो तसेच **दिनमानाचा कालही वाढत** जातो. महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान सुमारे १६° उ. अ. ते २२° उ. अ. दरम्यान असल्याने या काळात **तापमान वाढत जाते.** कोकण किनारपट्टीस अरबी समुद्राच्या सान्निध्यामुळे खारे वारे व मतलई वारे यांचा फायदा मिळतो, तर दख्खनचे पठार हे सह्याद्री पर्वतामुळे अरबी समुद्रापासून अलग झालेले आहे. मराठवाडा व विदर्भ हे भाग खंडांतर्गत प्रदेशात येत असल्याने त्यांना सागरी वाऱ्यांचा फायदा मिळत नाही. यामुळे **कोकण व पठारावरील तापमानामध्ये बरीच तफावत पडते.**

(१) **दैनिक कमाल तापमान : कोकणामध्ये दैनिक कमाल तापमान ३०° ते ३३° से. च्या दरम्यान** आढळते. रत्नागिरीस ३२° से. तर मुंबईला ३३° से. तापमान असते. याच काळात दख्खनच्या पठारावर ते ३५° ते ४०° से. पर्यंत वाढते. पुण्याला ३७° से. व सोलापूरला ४१° से. पर्यंत तापमान वाढत जाते. तसेच आणखी पूर्वेकडे गेल्यास विदर्भामध्ये अतिशय कडक उन्हाळा अनुभवास येतो. **नागपूर, अमरावती भागात तर ४२° ते ४३° से. च्या आसपास तापमान** असते. उन्हाळ्यात **ऐन मोसमात खानदेश आणि विदर्भात ४६° ते ४८° से. पर्यंत तापमान** वाढत असल्याची नोंद आहे, तर **कोकणामध्ये जास्तीत जास्त तापमान ४१° से. पेक्षा जास्त वाढत नाही.**

(२) **दैनिक किमान तापमान :** उत्तर कोकणात दैनिक किमान तापमान २६° ते ३१° से. तर दक्षिण कोकणात २४° ते २७° से. दरम्यान असते. पुणे व सोलापूरला दैनिक किमान तापमान अनुक्रमे २२° से. व २५° से. तर अमरावती व नागपूर भागात २८° से. च्या आसपास दैनिक किमान तापमान असते.

**तक्ता क्र. ४.१ : मे महिन्यातील तापमान व आर्द्रता**

| शहरे | दैनिक कमाल तापमान (° से.) | दैनिक किमान तापमान (° से.) | तापमान कक्षा (° से.) | हवेची आर्द्रता दिवसाची (%) |
|---|---|---|---|---|
| मुंबई | ३२.८ | २६.७ | ६.१ | ६७ |
| रत्नागिरी | ३२.२ | २६.७ | ५.५ | ६९ |
| पुणे | ३७.२ | २२.२ | १५.० | ३२ |
| सोलापूर | ४०.६ | २५.० | १५.६ | १९ |
| अमरावती | ४२.२ | २७.२ | १५.० | १८ |
| नागपूर | ४२.८ | २८.७ | १४.१ | १९ |

**Ref. :** Climate of Maharashtra – India Meteorological Department.

**(३) दैनिक तापमान कक्षा :** उन्हाळ्यामध्ये काही महत्त्वाच्या शहरांच्या दैनिक तापमान कक्षा पाहिल्या असता असे आढळते की, **कोकणामध्ये दैनिक तापमान कक्षा ५° ते ६° से. दरम्यान** असते, तर त्या मानाने पठारावर दैनिक तापमान कक्षा वाढत जाते. **पुणे, सोलापूर, नागपूर भागांत तापमानकक्षा १५° से. पेक्षा जास्त** असते. मे महिन्यातील अतिशय कडक ऊन असणाऱ्या दिवसाचे तापमान पाहिले असता आपल्या लक्षात येते की, विदर्भामध्ये किती असह्य उन्हाळा असतो. उदाहरणार्थ, **नागपूरमध्ये दिवसाचे तापमान ४८° से. पर्यंत वाढत जाते तर रात्रीचे तापमान १९° से. पर्यंत खाली घसरते. म्हणजेच त्या ठिकाणी दैनिक तापमान कक्षा २९° से. पर्यंत असते.** म्हणूनच विदर्भासारख्या प्रदेशाचे हवामान विषम स्वरूपाचे आहे. याचे असेही कारण आहे की, हा प्रदेश भारताच्या मध्य भागात असून तो अरबी समुद्रापासून व बंगालच्या उपसागरापासून अति दूर असल्याने थंड सागरी वाऱ्यांचा उपयोग तापमानातील ही तफावत कमी करण्यास होऊ शकत नाही.

## हवेचा दाब व वारे

उन्हाळ्यात असे तापमान वाढत गेल्याने साहजिकच हवेचा दाब कमी-कमी होत जातो आणि **कोकण किनारपट्टीस समभार रेषा समांतर** जातात. नकाशा क्र. ४.२ मध्ये त्या दर्शविलेल्या आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीस समभार रेषांमधील अंतर जास्त असल्यामुळे वायुभाराचा उतार मंद स्वरूपाचा असतो. **एप्रिल आणि मे महिन्यात** जसजसा उन्हाळा कडक होत जातो तसतशा **समभार रेषा जवळजवळ** येऊ लागतात आणि **वायुभार उतार तीव्र होत जातो.** अरबी समुद्रावरील जास्त दाबाच्या प्रदेशाकडून वारे वाहू लागतात व **किनारपट्टीवर दुपारच्या कडक उन्हानंतर आरोह प्रकारचा पाऊस** पडतो, तर **मराठवाडा आणि विदर्भात उन्हाळ्याच्या शेवटच्या कालखंडात धुळीची वादळे** निर्माण होतात. तसेच या खंडांतर्गत प्रदेशात **उन्हाळा तीव्र स्वरूपाचा असल्याने अमरावती, अकोला, नागपूर तसेच खानदेशात धुळे आणि जळगाव जिल्ह्यात उष्माघाताने काही लोक दगावल्याची उदाहरणे आहेत.**

## पर्जन्य

उन्हाळा ऋतू जरी पावसाचा नसला तरी **एप्रिल व मे मध्ये अधूनमधून वळवाचा पाऊस पडत** असतो व **काही वेळेस ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट होऊन वादळी वारे** वाहतात. ते पाऊस देतात. कोल्हापूर जिल्ह्यात या काळात ८ ते १३ सें. मी. पाऊस पडतो. इतर ठिकाणी पावसाचे प्रमाण २ ते ५ सें. मी. असते. महाराष्ट्रात एप्रिल व मे महिन्यात जो पाऊस पडतो याला भारतीय उपखंडातील हवामानाची परिस्थिती बऱ्याच अंशी कारणीभूत आहे.

हिवाळ्यामध्ये वायव्य भारतात तयार झालेला जास्त दाबाचा पट्टा सूर्य कर्कवृत्ताकडे येत असल्याने हळूहळू दक्षिणेकडे सरकतो. एप्रिल महिन्यात हा जास्त दाबाचा पट्टा भारताच्या दक्षिण भागात असतो व त्याचा बराचसा प्रदेश सागरावरही असतो. यावेळी **वायव्य भारतात कमी दाबाचा प्रदेश तयार होत असतो. परंतु तो अजूनही कमजोरच असतो.** या कामी दाबाच्या प्रदेशाकडे दक्षिणेकडील जास्त दाबाच्या प्रदेशाकडून वारे वाहू लागतात. हे वारे काही प्रमाणात समुद्रावरून वाहत येतात. ते **एप्रिल व मे महिन्यात महाराष्ट्राच्याही काही भागावरून वाहत जाऊन पाऊस देतात. या वेळेस आंब्याचा बहर असतो म्हणून या पावसास** 'आंबेसरी' असे **म्हणतात.**

## मार्च ते मे (उन्हाळा) काळातील पर्जन्य

- महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील नाशिकचा दक्षिण भाग, अहमदनगर, पुणे साताऱ्यातील खंडाळा, फलटण, दहीवडी आणि सोलापूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण २.५ ते ५ सें. मी. आहे.
- सिंधुदुर्ग जिल्ह्याचा सावंतवाडी वगळता संपूर्ण जिल्हा, रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर, लांजा, संगमेश्वर, चिपळूण, खेड तालुके, कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिम भाग; सातारा जिल्ह्याचा पश्चिम व दक्षिण भाग; सांगली जिल्ह्याचा उत्तर व पश्चिम भाग याचप्रमाणे गडचिरोलीच्या दक्षिण भागात उन्हाळ्यातील पावसाचे प्रमाण ५ ते ७.५ सें. मी. आहे.



- कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, हातकणंगले, शिरोळ, गारगोटी, आजरा व चंदगड तालुके; सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी याचप्रमाणे सांगली जिल्ह्यात इस्लामपूर (वाळवा) व सांगली तालुक्यात उन्हाळ्यात पावसाचे प्रमाण ७.५ सें. मी. ते १० सें. मी. पाऊस पडतो.
- उत्तर महाराष्ट्र व कोकणात मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उन्हाळ्यात १ ते २.५ सें. मी. पावसाची नोंद होते.
- **महाराष्ट्रात उन्हाळ्यात सर्वांत जास्त पाऊस कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज व चंदगड तालुक्याच्या काही भागात १० सें. मी. ते १२.५ सें. मी. दरम्यान पडतो.**

## सापेक्ष आर्द्रता

उन्हाळ्यामध्ये हवा बरीच कोरडी असते आणि **बाष्पाचे प्रमाण कमी असते. दख्खनच्या पठारावर कोरडी हवा** पाहावयास मिळते. सोलापूर, नागपूर, अमरावती भागांत आर्द्रतेचे प्रमाण बरेच कमी म्हणजे १८% ते १९% असते. पुण्यामध्ये हवेची आर्द्रता ३२% असते, तर **कोकण किनारपट्टीमध्ये मात्र आर्द्रतेचे प्रमाण भरपूर असते. मुंबई व रत्नागिरी येथे अनुक्रमे ६७% ते ६९% सापेक्ष आर्द्रता आढळते.**

# पावसाळा - नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याच्या काळातील हवामानाची परिस्थिती

महाराष्ट्रामध्ये हवामानदृष्ट्या सर्वांत महत्त्वाचा काळ पावसाळा आहे. चार महिन्यांमध्ये जो काही पाऊस पडतो यावरच महाराष्ट्रातील लोकांचे जीवन अवलंबून असते. पिण्याचे पाणी, अन्नधान्ये, नगदी पिके, गुरांना चारा, उद्योगधंद्यांना पाणी या सर्वांची गरज नैर्ऋत्य पावसामुळे भागविली जाते. पावसाचे प्रमाण पाऊस पडण्याचा काळ, त्यामधील खंड, पावसाचे स्वरूप, त्याची विविधता वगैरे घटकांचा परिणाम महाराष्ट्रावर होतो. यामुळेच महाराष्ट्राच्या हवामानाचा अभ्यास करताना नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यामुळे पडणाऱ्या पावसाचे सखोल विवेचन करावयास पाहिजे.

**नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याची निर्मिती :** महाराष्ट्राच्या मान्सून वाऱ्याचे स्वरूप समजावून घेताना हे राज्य भारतापासून अलग करता येत नाही. तसेच आशिया खंडापासून भारत वेगळा करून हवामानाचा विचार करता येत नाही. म्हणूनच या काळात असणाऱ्या हवेच्या परिस्थितीचा विस्तृत स्तरावर विचार केल्यावर महाराष्ट्रामध्ये मान्सून वाऱ्याचे आगमन कसे होते ते लक्षात येईल.

## भारतीय मान्सूनची संकल्पना

भारतीय मान्सूनची संकल्पना समजण्यासाठी मान्सूनची ठळक वैशिष्ट्ये पाहू. या **सर्वसामान्य भारतीयांच्या मते, मान्सून म्हणजे पाऊस होय, तर खलाशाच्या दृष्टिकोनातून होडी वल्हविण्यासाठी सागरात वाऱ्याची दिशा कशी आहे. वातावरण शास्त्रज्ञांच्या मते, मान्सून म्हणजे भारतीय उपखंडामधील जानेवारी व जुलै काळातील प्रचलित वाऱ्याची उलटसुलट दिशा होय.**

**मान्सूननिर्मितीच्या बाबतीत परंपरागत स्पष्टीकरण :** उन्हाळ्यात आशिया खंडाच्या अंतर्गत प्रदेशाचे तापमान जास्त असल्याने हवेचा अतिशय कमी दाबाचा प्रदेश निर्माण होतो. भारतीय उपखंडाच्या वायव्य भागात हवेचे स्वतंत्र कमी दाबाचे केंद्र निर्माण होते. दक्षिण गोलार्धातील हिंदी महासागरावरील जास्त दाबाच्या प्रदेशाकडून वारे विषुववृत्त ओलांडून या कमी दाबाच्या केंद्राकडे आकर्षिले जातात. म्हणून त्यांना 'नैर्ऋत्य मान्सून वारे' असे म्हणतात. मान्सूनचे तंत्र समजण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. **मान्सूनच्या निर्मितीच्या बाबतीत सुरुवातीचे असे एक मत होते की, भूखंड व सागराची उष्णताग्रहणशक्ती भिन्न असल्याने भूखंडाचे तापमान जास्त असते. त्या मानाने सागराचे तापमान कमी असते व त्या अनुषंगाने वातावरणामधील हवेच्या दाबामध्ये फरक आढळतो. म्हणून सागराकडून भूखंडाकडे वारे वाहू लागतात.**

## वातावरणशास्त्रामधील संज्ञा

मान्सूनचे स्वरूप समजण्यापूर्वी वातावरणशास्त्रातील दोन संज्ञा समजावून घेऊ या.

**(१) आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्टा** *(Inter Tropical Convergence Zone, ITCZ)* **: हिंदी महासागरात विषुववृत्ताजवळ स्थित असलेल्या कमी दाबाच्या विस्तीर्ण प्रदेशास 'आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्टा' म्हणतात.** ऋतुमानानुसार या पट्ट्याचे स्थानांतर होते. यावर मान्सूनचे आगमन व निर्गमन अवलंबून असते.

**(२) पश्चिमी जेट स्ट्रीम : पश्चिम आशियात भूपृष्ठापासून सुमारे ३ कि. मी. उंचीवर वाहणाऱ्या वाऱ्यांना 'पश्चिम जेट स्ट्रीम' म्हणतात.** याचाही प्रभाव मान्सून हवामानावर पडतो.

## मान्सूनचे स्वरूप

दक्षिण आशियातील पावसाची कारणमीमांसा शास्त्रीय पद्धतीने अभ्यासलेली आहे. यामुळे मान्सूनचे स्वरूप थोड्या प्रमाणात समजू शकते. आपण मान्सूनच्या खालील बाबींचा अभ्यास करणार आहोत :

**(अ) मान्सूनचे आगमन व मान्सूनची वाटचाल** **(ब) पर्जन्यक्षमप्रणाली व मान्सूनच्या पावसाचे वितरण**
**(क) मान्सूनचा खंड** **(ड) मान्सूनचे निर्गमन**

**(अ) मान्सूनचे आगमन व मान्सूनची वाटचाल :** सर्वसाधारणपणे मान्सूनचे आगमन ही एक अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. उन्हाळ्यात भूभाग व जलभाग तापणे हे मान्सूनचे तंत्र आहे. **यामुळे भारतीय उपखंडाकडे मान्सून वारे वाहू लागतात.**

**(१) आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्ट्याचे उत्तरेकडे सरकणे :** हिंदी महासागराच्या उत्तरेकडील भूप्रदेश उन्हाळ्यात तापल्यामुळे वायव्य भागात कमी दाबाचे केंद्र निर्माण होते, तर हिंदी महासागराच्या दक्षिण भागात हवेचा जास्त दाब असतो. **हिंदी महासागरातील** आग्नेय व्यापारी वारे ४०° पू. रे. ते ६०° पू. रे. दरम्यान विषुववृत्त ओलांडून दिशा बदलून नैर्ऋत्य मान्सून वारे वाहतात व वायव्य भागातील कमी दाबाच्या केंद्राकडे वाहू लागतात.

**(२) वायव्य भागातील कमी दाबाचे केंद्र व आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्ट्यामधील नाते :** भारतीय उपखंडामधील वायव्य भागातील कमी दाबाचे केंद्र व आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्ट्यांचे नाते आहे. आग्नेय व्यापारी वाऱ्याने विषुववृत्त ओलांडून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर नैर्ऋत्य मान्सून वारे वाहणे या संदर्भात हे घटक महत्त्वाची कामगिरी पार पाडतात.

**(३) पश्चिम जेट स्ट्रीमच्या निर्गमनानंतरच आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्टा व पूर्वीय जेट स्ट्रीमचे आगमन :** हिमालयाच्या दक्षिण भागात स्थित असलेल्या पश्चिमी जेट स्ट्रीमचे निर्गमन झाल्यावरच आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्टा उत्तरेकडे सरकतो. पूर्वीय जेट स्ट्रीमदेखील पश्चिमी जेट स्ट्रीमच्या निर्गमनानंतरच प्रदेशात आढळतात.

**(४) मान्सूननिर्मितीची संकल्पना :** उन्हाळ्यात हिमालय व तिबेटचा ४ ते ५ दशलक्ष चौ. कि. मी. चा प्रदेश अतिशय तापतो व यापासून पूर्वीय जेट स्ट्रीमची निर्मिती होते. उंचीवरच्या प्रदेशात उष्णतेचे उत्सर्जन होऊन तपांबराच्या मध्यभागात घड्याळाच्या काट्याच्या दिशेने उच्च भूमीपासून विरुद्ध दिशेला मुख्य हवेचे दोन प्रवाह निर्माण होतात.

यापैकी एक हवेचा प्रवाह विषुववृत्ताकडे वाहू लागतो, की जो भूपृष्ठाजवळ विषुववृत्त ओलांडतो. यामुळे रिकामी झालेली त्याची जागा घेण्यास जाऊ लागतो व दुसरा प्रवाह ध्रुवाकडे वळतो. यापैकी **पहिला प्रवाह भारतावर 'पूर्वीय जेट स्ट्रीम' तर दुसरा प्रवाह पूर्व-मध्य आशियात 'पश्चिमी जेट स्ट्रीम' म्हणून स्थित होतो.**

श्रीलंकेत मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याचे आगमन होते. केरळमध्ये तिरुअनंतपुरमला १ जूनला मान्सूनचा पहिला पाऊस पडतो. त्यानंतर कोलकत्याला ७ जूनला, मुंबईला १० जूनला नैर्ऋत्य मान्सून वारे येतात. यापुढे उत्तरेकडे मान्सूनचे आगमन होते. भारतात सर्वत्र १५ जुलैपर्यंत मान्सून वारे वाहू लागतात.

**(ब) पर्जन्यक्षमप्रणाली व मान्सूनच्या पावसाचे वितरण :**

**आर्द्र काल व शुष्क काल :** सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने मान्सून म्हणजे पाऊस असाच निगडित आहे. अर्थात मान्सूनचा पाऊस कधीच सातत्याने पडत नाही, तर तो अधूनमधून पडतो. आर्द्र कालाच्या पाठोपाठ शुष्क काल येतो.

**पावसाचे वितरण :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या उष्ण कटिबंधीय आवर्तामुळे भारतातील मैदानी प्रदेशात पाऊस पडतो. नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याच्या अरबी समुद्राच्या शाखेमुळे भारताच्या पश्चिम किनारपट्टीला पाऊस मिळतो. पश्चिम घाटामुळे पडणारा हा पाऊस प्रतिरोध पर्जन्याचा असतो. पश्चिम किनारपट्टीजवळील विषुववृत्तीय जेट स्ट्रीमच्या स्थानावर पश्चिम किनारपट्टीवरील पाऊस अवलंबून असतो.

**मान्सून द्रोणी व आवर्ताचा संबंध :** बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या उष्ण कटिबंधीय आवर्तांची वारंवारिता दरवर्षी बदलत असते. आंतर उष्ण कटिबंधीय केंद्रीभवन पट्ट्याच्या स्थानावर आवर्ताचा मार्ग अवलंबून असतो. याला **भारतीय मौसम विज्ञानात 'मान्सून द्रोणी'** (Mansoon Trough) **म्हणतात. ज्याप्रमाणे मान्सून द्रोणीचा आस आंदोलित होत जातो, त्याप्रमाणे आवर्ताचा मार्गही बदलतो. यामुळे पावसाची तीव्रता व दरवर्षी पडणाऱ्या वितरणामध्ये फरक पडतो.**

पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व व ईशान्येकडे तर भारतीय मैदानावर व द्वीपकल्पाच्या उत्तर भागात वायव्येकडे गेल्यास पावसाचे प्रमाण कमी-कमी होत जाते.

**(क) मान्सूनचा खंड : नैर्ऋत्य मान्सूनच्या काळात पावसात सर्वसाधारणपणे खंड पडतो. हा खंड बऱ्याच वेळा एक वा दोन आठवडे किंवा आणखी काही आठवडेही असू शकतो. यालाच 'मान्सूनमधील खंड' असे म्हणतात.**

**पाऊस न पडण्याची अनेक कारणे** असू शकतात. यापैकी प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) पाऊस घेऊन येणारे **उष्ण कटिबंधीय आवर्ते वारंवार निर्माण न झाल्याने** अशा प्रकारचा खंड पडतो.

(२) उत्तर भारतात **मान्सून द्रोणीच्या स्थानामुळे** पाऊस पडत नाही.



(३) भारताच्या **पश्चिम किनारपट्टीला समांतर वारे वाहत असतील** तर पश्चिम किनारपट्टीवर पाऊस येत नाही.

(४) **पश्चिम राजस्थानात वातावरणाच्या निम्न स्तरावर तापीय परिस्थितीमुळे** पाऊस पडत नाही. तापमानाच्या विपरीततेमुळे घेऊन जाणाऱ्या वाऱ्यांना उंचीवर जाता येत नाही.

**(ड) मान्सूनचे निर्गमन :** वायव्य भारतामधून सप्टेंबरमध्ये मान्सूनचे निर्गमन होते. बहुतेक सर्व भागांमधून मान्सूनचे निर्गमन होते. द्वीपकल्पाच्या दक्षिण भागातून मध्य ऑक्टोबरला मान्सूनचे निर्गमन होते. **मान्सूनचे निर्गमन होत असताना बंगालच्या उपसागरावरून वारे वाहतात. बाष्प गोळा करतात व ईशान्य मान्सून वारे म्हणून तमिळनाडूच्या किनारपट्टीवर पाऊस देतात.**

## पर्जन्यामधील विभागवार बदल

**(१) पर्जन्याचा कालखंड : महाराष्ट्रात वर्षामध्ये जो पाऊस पडतो त्यापैकी सुमारे ८५% पाऊस नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यामुळे येतो.** कोकणच्या नैर्ऋत्य आणि पश्चिम भागावरून वाहणारे बाष्पयुक्त वारे सह्याद्री पर्वत ओलांडून महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशावर पाऊस देतात. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या काळातील **पावसाचे मासिक प्रमाण व त्याच्या प्रादेशिक वितरणात फार मोठ्या प्रमाणात तफावत व विविधता पाहावयास मिळते. सर्वसाधारणपणे जुलै महिन्यात सर्वांत जास्त पाऊस पडतो. अर्थात पूर्वेकडे विदर्भात ऑगस्ट महिन्यात पावसाचे प्रमाण जास्त असते.** या महिन्यात महाराष्ट्राच्या इतर भागांत भरपूर पाऊस पडतो. **पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त प्रदेशात सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण जास्त असते.** सप्टेंबरनंतर नैर्ऋत्य मान्सून वारे क्षीण होतात आणि आकाश निरभ्र होऊ लागते. पावसाचा जोरही कमी होतो. पावसाळ्यात येणारा पाऊस सतत चार महिने कोणत्याच प्रदेशात असत नाही. अनेक वेळा त्यामध्ये खंड पडतो. स्वच्छ व आल्हाददायक हवा असते. बऱ्याच वेळा कालखंड लांबल्याने शेतकऱ्यांचे तसेच लोकांचे पावसाकडे लक्ष असते.


**(२) पावसाचे सर्वसाधारण स्वरूप : पावसाळ्यात चार महिन्यांच्या कालखंडात कोकण आणि सह्याद्री पर्वतरांगेत भरपूर पाऊस पडतो. त्या मानाने मध्य महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण बरेच कमी दिसते. जसजसे पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण पुन्हा वाढत जाते.** त्याचे कारण विदर्भाचा परिसर बंगालच्या उपसागरावरील मान्सून वाऱ्याच्या शाखेच्या टापूत येतो. त्या भागात ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पाऊस पडतो.

**(३) कोकणातील भरपूर पर्जन्य :** महाराष्ट्राच्या पश्चिम भागात कोकण व घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस कोसळतो. कोकणच्या चिंचोळ्या किनारपट्टीत सरासरी पाऊस २५० ते ३०० सें. मी. आहे. **दक्षिण कोकणातून उत्तर कोकणामध्ये गेल्यास पावसाचे प्रमाण कमी-कमी होत जाते** हे आपणास किनारपट्ट्यावरील शहरांच्या पावसाच्या नोंदीवरून लक्षात येईल. उदाहरणार्थ, **दक्षिणेस पावसाळ्यात रत्नागिरी येथे २४४ सें. मी. पाऊस पडतो तर उत्तरेस अलिबागला १९६ सें. मी. पावसाची नोंद होते. मुंबईतील कुलाब्याची वेधशाळा १६९ सें. मी. पाऊस पडतो असे दर्शविते. (तक्ता क्र. ४.२ पाहा.)**

**तक्ता क्र. ४.२ : महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरातील नैर्ऋत्य मान्सून (जून ते सप्टेंबर) पर्जन्य, सापेक्ष आर्द्रता व पावसाचे दिवस**

| शहरे | नैर्ऋत्य मान्सून पाऊस (सें. मी.) | सापेक्ष आर्द्रता (%) | पर्जन्याचे दिवस |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | २४४ | ८५ | ८५ |
| अलिबाग | १९६ | ८६ | ७६ |
| मुंबई | १६९ | ८५ | ६७ |
| पुणे | ५० | ८१ | ३६ |
| मालेगाव | ४४ | ७६ | २७ |
| अहमदनगर | ४४ | ७९ | २७ |
| सोलापूर | ४३ | ७६ | ३१ |
| मिरज | ४० | ८६ | ३० |
| अकोला | ६८ | ७८ | ३७ |
| अमरावती | ७५ | ७६ | ४० |
| नागपूर | १०० | ७१ | ५० |
| चंद्रपूर | १२० | ७२ | ५२ |

**Ref. :** Climate of Maharashtra – India Meteorological Department




**नैर्ऋत्य मान्सून काळातील पर्जन्य :**
महाराष्ट्रात मान्सून काळातील पाऊस अत्यंत महत्त्वाचा असतो. (i) कोकण व घाटमाथ्यावर मान्सूनचा २५० सें. मी. पेक्षा जास्त पाऊस
पडतो. या काळातील सर्वांत जास्त पावसाची नोंद आंबोलीला ७०७ सें. मी. आहे. (ii) कोकण किनारपट्टीचा उत्तर-दक्षिण प्रत्यक्ष चिंचोळा पट्टा,
नाशिक, पुणे व कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागात १५० ते २५० सें. मी. पाऊस मान्सून काळात पडतो. (iii) पश्चिम घाटाच्या पूर्वेस
नंदुरबारपासून कोल्हापूरपर्यंत उत्तर-दक्षिण अरुंद पट्टा व विदर्भाच्या पूर्व भागात १०० ते १५० सें. मी. पावसाचे प्रमाण आहे. (iv) १०० सें. मी.
समपर्जन्य रेषेच्या पश्चिम घाटाच्या पूर्वेस, मराठवाड्याचा पूर्व भाग व विदर्भाच्या पश्चिम भागात पावसाळ्यात ७५ ते १०० सें. मी. पाऊस
पडतो. (v) नैर्ऋत्य मान्सून काळात ५० ते ७५ सें. मी. पाऊस पडणारा सर्वांत मोठा निमओसाड प्रदेश हा मराठवाडा, खानदेशचा जळगाव,
पश्चिम विदर्भाचा काही भाग आहे. (vi) पश्चिम महाराष्ट्रात मान्सूनचा खऱ्या अर्थाने असणारा अवर्षणग्रस्त प्रदेश नाशिक, नगर, पुणे, सातारा,
सांगली व सोलापूर जिल्ह्यात असून येथे पावसाचे प्रमाण ३० ते ५० सें. मी. आहे. (vii) महाराष्ट्रातील सर्वांत कमी पाऊस पडणारा पट्टा सातारा
जिल्ह्याच्या पूर्व भागात दहीवडी व म्हसवडचा परिसर असून येथे पावसाचे प्रमाण फक्त २९ ते ३० सें. मी.च आहे.

**नकाशा क्र. ४.१ : नैर्ऋत्य मान्सून काळातील पर्जन्य**

(४) **घाटमाथ्यावरील अति पर्जन्य :** कोकणच्या पूर्वेकडे गेल्यास हळूहळू प्रदेशाची उंची वाढत जाते आणि अरबी समुद्रापासून ३० ते ६० कि. मी. पूर्वेस गेल्यावर सह्याद्री पर्वताची उंच कड वाटेत उभी राहते. ही सुमारे १३०० मीटर उंचीची प्रचंड पर्वतरांग ओलांडण्याच्या प्रयत्नात बाष्पयुक्त नैर्ऋत्य मान्सून वारे घाटमाथ्यावर भरपूर पाऊस देतात. **सह्याद्री पर्वतरांगेवर दक्षिणेकडून उत्तरेकडे गेल्यास पावसाचे प्रमाण कमी-कमी होत जाते. दक्षिण कोकणात पावसाळ्यात आंबोली येथे सर्वांत जास्त म्हणजे ७०७ सें. मी. पाऊस कोसळतो, तर महाबळेश्वरला ५९४ सें. मी. पावसाची नोंद होते आणि त्याच्या उत्तरेस माथेरानच्या पठारावर**



**पावसाचे प्रमाण ४९३ सें. मी. आहे.** कोकण आणि घाटमाथ्यावर जुलै आणि **ऑगस्ट या दोन महिन्यात प्रामुख्याने मुसळधार पाऊस** कोसळत असल्याने तो जवळजवळ दररोज पडतो.

(५) **सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील भागातील पर्जन्याचे घटते प्रमाण :** सह्याद्री पर्वत ओलांडून नैर्ऋत्य मान्सून वारे आल्यावर पूर्वेकडील पठारावरून वाहू लागतात. या वाऱ्यामधील **बरेचसे बाष्प सह्याद्री पर्वत ओलांडताना पावसाच्या** रूपात पडून गेलेले असते. पठाराचा उतार पूर्वेकडे आहे तसेच प्रदेशाची उंची कमी-कमी होत गेल्याने तापमानात वाढ होत असते. पठारावरून वाहताना वाऱ्याच्या मार्गात कोणताही अडथळा नसल्याने बाष्पयुक्त वाऱ्याचे तापमान कमी होण्याचा प्रश्नच येत नाही. **भूप्रदेशावर मान्सून वाऱ्यामधील बाष्प येण्याऐवजी त्यांची बाष्पधारणशक्ती वाढतच जाते. यामुळेच महाराष्ट्र पठारावर पावसाचे प्रमाण झपाट्याने कमी होते आणि 'पर्जन्यछायेचा प्रदेश' निर्माण होतो.**

**सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर महाबळेश्वर येथे वर उल्लेखिल्याप्रमाणे पावसाळ्यात ५९४ सें. मी. पाऊस पडतो. तर त्याच्या पूर्वेस १५ कि. मी. अंतरावर असलेल्या पाचगणी येथे पावसाचे प्रमाण १५८ सें. मी. आहे, तर त्याच्या पायथ्याशी असलेल्या वाईमध्ये पावसाळ्यात पावसाचे प्रमाण ५४ सें. मी. एवढे कमी होते. आणखी पूर्वेकडे गेल्यास फलटणला ३२ सें. मी. पाऊस पडतो.** अशाच प्रकारचे आणखीन एक उदाहरण पाहता येईल. माथेरानला पावसाळ्यात ४९३ सें. मी. पाऊस आहे, तर पूर्वेकडे दख्खनच्या पठारावरील पुण्याला फक्त ५० सें. मी. पाऊस पडतो. अशाच तऱ्हेने उत्तरेकडे नाशिक जिल्ह्यात पावसाळ्यात सटाणा येथे फक्त ३८ सें. मी. पाऊस पडतो.

(६) **गोदावरी, भीमा व कृष्णा खोऱ्याच्या दक्षिणोत्तर पट्ट्यातील अवर्षणग्रस्त प्रदेश :** सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडे गोदावरी, भीमा व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यात घाट ओलांडल्यानंतर साधारणपणे **प्रत्येक खोऱ्यात ८० ते १२० कि. मी. रुंदीचा दक्षिणोत्तर असा एक पट्टा आहे की, तेथे पावसाचे प्रमाण ५० सें. मी. पेक्षा कमी असून ते अनिश्चित स्वरूपाचे आहे;** एखाद्या वर्षी समाधानकारक पाऊस पडतो तर दुसऱ्या वर्षी पावसाचे प्रमाण फारच कमी असते. हा प्रदेश 'अवर्षणग्रस्त' (Draught Prone) म्हणून ओळखला जातो. नाशिक व अहमदनगर जिल्ह्याचा पूर्व भागही यामध्ये समाविष्ट आहे. उदाहरणार्थ, **नाशिक जिल्ह्यात पावसाळ्यात मालेगाव ४४ सें. मी., नगर जिल्ह्यात संगमनेर ३७ सें. मी., तर पुणे जिल्ह्यात दौंड येथे ३२ सें. मी. व बारामती येथे ३३ सें. मी. याचप्रमाणे सातारा जिल्ह्यात दहीवडी येथे २९ सें. मी. पावसाची नोंद आहे.**

(७) **मराठवाड्यात साधारण वाढते पर्जन्य : दख्खनच्या पठारावरील अवर्षणग्रस्त प्रदेश ओलांडल्यानंतर पावसाचे प्रमाण पुन्हा वाढत जाते.** तसेच काही प्रमाणात बंगाल उपसागराच्या मान्सून वाऱ्याच्या शाखेचाही परिणाम होतो. म्हणूनच सोलापूरला पावसाळ्यात ४३ सें. मी. पर्यंत पाऊस पडतो आणि मराठवाड्यामध्ये औरंगाबादला ६० सें. मी., बीडला ५६ सें. मी., उस्मानाबाद ६७ सें. मी. तर नांदेडला ७८ सें. मी. पाऊस पडतो.

(८) **विदर्भातील निश्चित वाढते पर्जन्य :** विदर्भात पावसाचे प्रमाण जास्त वाढत जाते. **विदर्भात पश्चिमेकडून पूर्वेकडे गेल्यास पावसाळ्यात पावसाचे प्रमाण वाढत जाते.** उदाहरणार्थ, बुलडाणा ६७ सें. मी., अकोला ६८ सें. मी., अमरावती ७५ सें. मी., यवतमाळ ८५ सें. मी., वर्धा ९८ सें. मी. तर नागपूरला १०० सें. मी. पर्यंत पावसाची नोंद होते. **विदर्भाच्या पूर्व भागात विशेषत: भंडारा १२६ सें. मी., चंद्रपूर १२० सें. मी. व गडचिरोली जिल्ह्यात १२९ सें. मी. पर्यंत पाऊस वाढतो.** याचे प्रमुख कारण हा प्रदेश मुख्यत्वेकरून बंगाल उपसागरावरील मान्सून शाखेच्या टापूत येतो. **विदर्भातील सातपुडा पर्वतरांगांच्या गाविलगड डोंगररांगांमध्ये पावसाचे प्रमाण जास्त वाढत जाते.** उदाहरणार्थ, चिखलदरा येथे १५० सें. मी. पाऊस पडतो. हा पाऊस प्रतिरोध पर्जन्याचा असतो.

## सापेक्ष आर्द्रता

पावसाळ्यात वातावरणामध्ये सापेक्ष आर्द्रता भरपूर असते. **सर्वांत जास्त सापेक्ष आर्द्रता कोकण किनारपट्टीवर पाहावयास मिळते. कोकणामध्ये सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण ८५% ते ९०% पर्यंत आढळते तर पठारी प्रदेशात त्याचे प्रमाण थोडे कमी असते.** मध्य महाराष्ट्रात ७५% ते ८०% पर्यंत आढळते, तर विदर्भात सापेक्ष आर्द्रता ७०% ते ७५% असते.

## पावसाचे दिवस

महाराष्ट्रात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या काळात जरी पावसाळा असला तरी पाऊस पडणाऱ्या दिवसांची संख्या त्यापेक्षा बरीच कमी असते. **कोकणामध्ये २५० ते ३५० सें. मी. पाऊस पडणाऱ्या प्रदेशात पावसाचे सुमारे ७५ ते ९५ दिवस असतात, तर मध्य महाराष्ट्रात ५० ते ७५ सें. मी. पाऊस पडणाऱ्या प्रदेशात पावसाचे दिवस ३५ ते ५० असतात, तर विदर्भात १०० ते १५० सें. मी. पाऊस पडणाऱ्या प्रदेशात ६० ते ६५ दिवस पावसाचे असतात.**

**महाराष्ट्रात मान्सून काळात सर्वांत जास्त पावसाचे दिवस कोल्हापूर जिल्ह्यात गगनबावडा येथे १०८ दिवस आहेत.** या खालोखाल महाबळेश्वर येथे १०३ दिवस तर आंबोलीला पावसाळ्याचे ९७ दिवस आहेत तर **महाराष्ट्रात पावसाळ्यातील सर्वांत कमी पावसाचे दिवस सातारा जिल्ह्यात म्हसवड येथे १९ दिवस आहेत.** यानंतर सोलापूर जिल्ह्यात अकलूज, सातारा जिल्ह्यात फलटण, पुणे जिल्ह्यात बारामती व दौंड येथे मान्सून काळात पावसाचे प्रत्येकी २१ दिवस आहेत.

# हिवाळा - हिवाळ्यातील हवामानाची परिस्थिती किंवा ईशान्य मान्सून काळातील हवामानाची परिस्थिती

## संक्रमणाचा महिना 'ऑक्टोबर'

नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याचा काळ सप्टेंबरला संपतो आणि नोव्हेंबरपासून खऱ्या अर्थाने हिवाळा चालू होतो. ऑक्टोबर हा महिना पावसाळा आणि हिवाळा यांच्या दरम्यानचा संक्रमणाचा मानला जातो. जमीन हळूहळू वाळत चाललेली असते. **प्रखर सूर्यप्रकाश असतो आणि हवेमध्ये बाष्पाचे प्रमाण भरपूर असल्याने असह्य उकाडा अनुभवास येतो. अशा प्रकारच्या हवेलाच आपण 'ऑक्टोबर हीट' असे म्हणतो.** महाराष्ट्रामधून नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याचे निर्गमन सप्टेंबरच्या मध्यापासून सुरू होते आणि हळूहळू ईशान्य मान्सून वारे वाहू लागतात. **ऑक्टोबरमध्ये काही वादळे वारे येऊन पाऊस पडण्याची शक्यता असते.**

ऑक्टोबर महिन्यात दिवसाचे तापमान वाढलेले असते. **कोकण किनारपट्टीवर दिवसाचे तापमान २९° ते ३०° से. असते, तर दख्खनच्या पठारावर २९° ते ३४° सें. पर्यंत तापमान** आढळते. तर याच प्रदेशात रात्रीचे तापमान अनुक्रमे २४° ते २७° से. आणि २०° ते २७° से. असते. या काळात **सापेक्ष आर्द्रता किनारपट्टीवर ६०% ते ८०% असते, तर दख्खनच्या पठारावर ६०% ते ७५%** असते. ही आर्द्रता सकाळच्या हवेची असते तर संध्याकाळी हवेमध्ये सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण २५% ते ५०% असते.

नैर्ऋत्य मान्सून वारे निघून गेल्यानंतर मान्सूनोत्तर काळात **अरबी समुद्रावर चक्रीय वादळांची काही वेळा निर्मिती** होते. अशा वेळी **कोकण किनारपट्टीलगत अति वेगवान वारे** वाहतात. काही वेळा त्यांचा जोर फारच असतो आणि या वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. बऱ्याच वेळा ही वादळे कोकण किनारपट्टीवर येतात आणि प्रदेशाचे नुकसान होते.

## हिवाळ्यामधील सर्वसाधारण हवामान

२२-२३ सप्टेंबरनंतर दक्षिण गोलार्धात सूर्यकिरण लंबरूप पडण्यास प्रारंभ होतो तर उत्तर गोलार्धात सूर्यकिरण तिरपे पडू लागतात. दिनमानाचा काल कमी होत जाऊन रात्रमानाचा काल वाढत जातो. यामुळे महाराष्ट्रात ऋतुमानात बदल होत जातो. **नोव्हेंबर ते डिसेंबरपर्यंत हिवाळा ऋतू पाहावयास मिळतो. या काळात सर्वसाधारण थंड व कोरडी हवा असते. आकाश निरभ्र असते. वाऱ्याची मंद झुळूक वाहत असते.** एकंदरीत हवा सुखकारक आणि आल्हाददायक असते. महाराष्ट्रातील हाच कालखंड सर्वांत कमी तापमानाचा असतो.

**तक्ता क्र. ४.३ : डिसेंबर महिन्यातील तापमान व आर्द्रता**

| शहरे | दैनिक कमाल तापमान (° से.) | दैनिक किमान तापमान (° से.) | तापमान कक्षा (° से.) | सर्वांत जास्त तापमान कक्षा (° से.) | हवेची आर्द्रता दिवसाची (%) |
|---|---|---|---|---|---|
| **मुंबई** | ३०.६ | २०.६ | १०.० | २१.६ | ७३ |
| रत्नागिरी | ३१.७ | २०.० | ११.७ | २१.१ | ५३ |
| **पुणे** | २९.४ | १४.४ | १५.० | ३०.६ | ७४ |
| सोलापूर | ३०.० | १५.० | १५.० | २७.२ | ५६ |
| अमरावती | २८.३ | १४.४ | १३.९ | २५.३ | ५४ |
| **नागपूर** | २७.८ | १३.९ | १३.९ | २७.७ | ६१ |

**Ref.** : Climate of Maharashtra : India Meteorological Department

### तापमान

(१) **दैनिक कमाल तापमान :** महाराष्ट्रात हिवाळ्यात प्रामुख्याने महाद्वीपीय उष्ण कटिबंधीय वायुराशी पसरलेल्या असतात. कोकणामध्ये **कोकण किनारपट्टीवर दैनिक कमाल तापमान ३०° से. असते तर खंडांतर्गत भागात २८° ते ३०° से. तापमान** आढळते. मुंबई, रत्नागिरी येथे दैनिक कमाल तापमान सुमारे ३१° से. च्या आसपास असते. दख्खनच्या पठारावर हिवाळ्यात काही ठिकाणी सर्वांत जास्त तापमानाची नोंद ३८° ते ३९° से. असते.



(२) **दैनिक किमान तापमान :** दक्षिण कोकणात डिसेंबरमध्ये दैनिक किमान तापमान २१° ते २२° से. असते तर उत्तर कोकणात हेच तापमान १७° ते २०° से. आढळते. विदर्भ व मराठवाड्यात दैनिक किमान तापमानात १३° ते १६° से. आढळते. **ऐन हिवाळ्यात रात्रीचे तापमान बरेच कमी होते. दख्खनच्या उत्तर भागात कमी तापमान आढळते, तर अगदी क्वचितप्रसंगी १०° ते ११°** से. तापमान आढळते. तर एखाद्या वेळी गोठणबिंदूपर्यंतही तापमान खाली उतरते.

(३) **दैनिक तापमानकक्षा :** हिवाळ्यात दैनिक तापमानकक्षेमध्येही फरक पाहावयास मिळतो. सर्वसामान्यपणे **कोकण किनारपट्टीवर दैनिक तापमानकक्षा १०° से. असते, तर पठारावर १५° ते २०° से.** असते. याच पठारावर **विदर्भामध्ये हिवाळ्यात रात्रीचे तापमान ४° ते ५° से. पर्यंत कमी** होत जाते. सर्वांत जास्त तापमानकक्षा पाहता असे आढळते की, **सोलापूर, अमरावती व नागपूर भागात तापमान कक्षा २५° ते २७° से. आहे, तर पुण्यात दैनिक तापमान कक्षा सर्वांत जास्त ३१° से.** आढळून आली आहे. **कोकणात मात्र दैनिक तापमान कक्षा २१° ते २२° से. आहे.**

(४) **सरासरी मासिक तापमान :** हिवाळ्यामध्ये सरासरी मासिक तापमानाचा विचार केला असता असे आढळते की, बऱ्याचशा **समताप रेषा पश्चिम-पूर्व दिशेने असून त्या एकमेकास समांतर** असतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्राच्या मध्यातून २२.५° से. तर उत्तर महाराष्ट्रातून २०° से. समताप रेषा असते. दक्षिण कोकणातून वायव्य-आग्नेय दिशेने २५° से. समताप रेषा जाते.

## हिवाळ्यातील सरासरी किमान तापमान : डिसेंबर

**महाराष्ट्रात हिवाळ्यात संपूर्ण खानदेश, पश्चिम महाराष्ट्रात नाशिक जिल्हा, बराचसा अहमदनगर जिल्हा, पुणे जिल्ह्यातील जुन्नर, घोडेगाव, राजगुरुनगर, शिरूर, पुणे (हवेली) तालुके; मराठवाड्यात औरंगाबादचा पश्चिम भाग याचप्रमाणे विदर्भात अमरावती जिल्ह्याच्या उत्तर भागातील धारणी, चिखलदरा, वरूड; नागपूर व भंडारा जिल्ह्याचा उत्तर भाग याशिवाय चंद्रपूर व गडचिरोलीच्या मध्य भागात डिसेंबर महिन्याचे सरासरी किमान तापमान १०° से. ते १२.५° से. पाहावयास मिळते.**

पश्चिम घाट व सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याचा पूर्व भाग, सोलापूर जिल्ह्याचा पूर्व भाग, उस्मानाबाद जिल्ह्यात उमरगा, तुळजापूर आणि लातूर जिल्ह्यात निलंगा तालुक्यात, कोकणात घाटालगतच्या भागात डिसेंबर महिन्याचे सरासरी किमान तापमान १५° सें. ते १७.५° से. पर्यंत असते.

कोकण किनारपट्टीलगत २०° से. ते २२.५ से. दरम्यान डिसेंबरचे सरासरी किमान तापमान असते तर त्याला लागून असणाऱ्या प्रदेशात १७.५° से. ते २०° से. पर्यंत किमान तापमानाची नोंद होते.

महाराष्ट्राच्या उर्वरित भागात म्हणजे दक्षिण महाराष्ट्र, बऱ्याच प्रमाणात मराठवाडा व पश्चिम विदर्भ, पूर्व विदर्भात नागपूर जिल्ह्याचा दक्षिण भाग, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूरच्या उत्तर भागात हिवाळ्याचे सरासरी किमान तापमान १२.५° ते १५° से. दरम्यान आहे.

## हवेचा दाब व वारे

हिवाळ्यामध्ये **समभार रेषांचा सर्वसाधारण कल वायव्य-आग्नेय दिशेने असतो. या काळातील समभार रेषांमधील अंतर जास्त असल्याने वायुभाराचा उतार कमी असतो. त्यामुळे वारे मंद वेगाने वाहतात. या वाऱ्यांची साधारण दिशा ईशान्य-नैर्ऋत्य दिशेने असते.** ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे आल्यास या समभार रेषा १०१८ मिलीबार ते १०१४ मिलीबार दरम्यानच्या असतात. अर्थात हे अगदी त्याचे ढोबळ स्वरूप असते. यामध्ये बराच बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## पर्जन्य

हिवाळ्यामध्ये बऱ्याच ठिकाणी हवा अतिशय स्वच्छ असते. त्यामुळे **पावसाचे प्रमाण बरेच कमी** असते.

- **कोकणात आणि पठारांच्या पश्चिम भागात हवा जवळजवळ कोरडी असून पाऊस पडला तर तो २ ते ३ सें. मी. पेक्षा जास्त पडत नाही.**
- महाराष्ट्राच्या पूर्व भागात विदर्भामध्ये बंगालच्या उपसागरावरून वाहणाऱ्या चक्रीय वादळामुळे वारे त्या भागात गेल्यास काही प्रमाणात पाऊस पडतो. त्याचा **फायदा तेथील हिवाळ्यातील रब्बी पिकांना होतो. विदर्भातील एकूण पावसापैकी सुमारे ५% ते ७% पाऊस** हिवाळ्यात पडतो.
- हिवाळ्यात पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भात अमरावती व यवतमाळ जिल्ह्यात २.५ सें. मी. ते ५ सें. मी. दरम्यान पर्जन्य पडते.
- संपूर्ण मराठवाडा, पश्चिम विदर्भात बुलडाणा, अकोला व वाशीम जिल्हे आणि खानदेशात जळगाव जिल्ह्याच्या पूर्व भागात हिवाळ्यात १ सें. मी. ते २.५ सें. मी. दरम्यान पाऊस पडतो.
- कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेशात धुळे व नंदुरबार जिल्ह्यात हिवाळ्यात पर्जन्याचे प्रमाण १ सें. मी. पेक्षा कमी असते.

### सापेक्ष आर्द्रता

हिवाळ्यामध्ये **सर्वसामान्यपणे हवेची आर्द्रता कमी** असते. **दख्खनच्या पठारावर** सापेक्ष आर्द्रतेची सरासरी **सकाळच्या वेळी ४५% असते** व त्यानंतर सूर्याच्या उष्णतेमुळे बाष्पाचे प्रमाण कमी-कमी होत जाऊन २०% ते ३०% आढळते. **सोलापूर, अमरावती, नागपूर भागात सकाळच्या वेळी ५५% ते ६०% सापेक्ष आर्द्रता असते, तर दुपारच्या वेळी २५% ते ४०% पर्यंत** कमी होते. **कोकणामध्ये सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण ६०% ते ७५%** असते.

### हिवाळ्यातील हवेचे इतर आविष्कार

दऱ्यांच्या खोऱ्यात अनेक ठिकाणी तापमानाची विपरीतता पाहावयास मिळते. **पहाटेच्या वेळी दंव व धुके** पडलेले असते. अर्थात सकाळी ऊन पडल्यानंतर ते हळूहळू नाहीसे होते. भारताच्या **वायव्य भागात पश्चिमी वारे** वाहतात. ते थंड ध्रुवीय वायुराशींचे असल्याने प्रदेशाचे **तापमान झपाट्याने कमी करतात. तापमान गोठणबिंदूपर्यंत खाली** घसरते. अशा विशिष्ट हवेला **'थंडीची लाट'** असे म्हणतात. या **थंडीच्या लाटेचा तडाखा उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भाला फार मोठ्या प्रमाणावर** बसतो. उत्तर भारतात थंडीच्या लाटेमुळे काही लोक मृत्युमुखी पडतात. अशी आपत्ती महाराष्ट्रात सहसा पाहावयास मिळत नाही. पिकांवर थंडीच्या लाटेचा विपरीत परिणाम होतो.

## वार्षिक पर्जन्याचे वितरण

**महाराष्ट्रामध्ये हवामानात पाऊस हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे.** हवामानाचे इतर घटक महाराष्ट्राच्या जीवनावर फारसा परिणाम करीत नाहीत. पावसाचे प्रमाण, पावसाचे वितरण याचा अभ्यास करणे ही हवामानामधील महत्त्वाची गोष्ट आहे. नकाशा क्र. ४.२ वरून पावसाचे वार्षिक वितरण लक्षात येते. पावसाचे वितरण कशा स्वरूपाचे आहे हे खालील विवेचनावरून समजून येईल.

**(अ) ३०० -७५० सें. मी. पाऊस पडणारे प्रदेश (अतिशय जास्त पाऊस) :**

**तक्ता क्र. ४.४ : महाराष्ट्र : वार्षिक पर्जन्य - अतिशय जास्त पर्जन्य (३००-७५० सें. मी.) नोंद करणारी वेधशाळा केंद्रे**

| वेधशाळा केंद्रे | वार्षिक पाऊस | पावसाचे दिवस | सर्वांत जास्त वार्षिक पाऊस | सर्वांत कमी वार्षिक पाऊस | वेधशाळा केंद्रे | वार्षिक पाऊस | पावसाचे दिवस | सर्वांत जास्त वार्षिक पाऊस | सर्वांत कमी वार्षिक पाऊस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सिंधुदुर्ग जिल्हा | | | | | पुणे जिल्हा | | | | |
| आंबोली | ७४५ | १२५ | ८८७ | ४९९ | खंडाळा | ४७१ | १०९ | ५८४ | ३३० |
| कणकवली | ४१० | १०५ | ५५८ | ३२८ | लोणावळा | ४३० | १०७ | ६३६ | २३२ |
| सावंतवाडी | ३७६ | ११० | ५११ | २११ | | | | | |
| बांदा | ३५७ | ११० | ५७५ | १९६ | रत्नागिरी जिल्हा | | | | |
| कुडाळ | ३०८ | १०२ | ४२५ | १५७ | लांजा | ३९० | १०३ | ५२३ | २८९ |
| सातारा जिल्हा | | | | | मंडणगड | ३८५ | १०३ | ५५१ | २४६ |
| महाबळेश्वर | ६२३ | ११९ | ८४७ | ३६८ | देवरूख | ३६८ | १०८ | ५६३ | २१७ |
| कोल्हापूर जिल्हा | | | | | चिपळूण | ३५० | १०७ | ५१८ | २२४ |
| गगनबावडा | ६२१ | १२९ | ८२० | ३३५ | खेड | ३३७ | १०३ | ५२२ | २०६ |
| राधानगरी | ३८२ | १०७ | ४४६ | २६७ | दापोली | ३२९ | १०२ | ४७० | १५५ |
| रायगड जिल्हा | | | | | राजापूर | ३२१ | १०२ | ४८५ | २०२ |
| माथेरान | ५१७ | १०८ | ६९२ | २५८ | नाशिक जिल्हा | | | | |
| कर्जत | ३२८ | ९६ | ४६२ | १८४ | इगतपुरी | ३३४ | १०२ | ६६१ | १८० |
| महाड | ३१९ | १०१ | ४१५ | १९१ | | | | | |
| रोहा | ३१२ | ९७ | ५२४ | १६५ | | | | | |
| माणगाव | ३०९ | ९७ | ४२६ | २०४ | | | | | |

टीप : पावसाची आकडेवारी सें. मी. मध्ये तर दिवसाची आकडेवारी संख्येने दर्शविली आहे. या प्रकरणात अन्यत्र असाच संदर्भ पाहावा.

Ref. : Climate of Maharashtra – Data Consolidated from Page No. 23 to 76.



- **महाराष्ट्रात कोकण व पश्चिम घाटामध्ये पावसाचे वार्षिक प्रमाण ३०० सें. मी. पेक्षा जास्त आहे. किनारपट्टीलगत हा जास्त पाऊस पडत नाही तर त्याच्या पूर्वेस पावसाचे भरपूर प्रमाण आढळते. हा पावसाचा पट्टा दक्षिणोत्तर आणि चिंचोळा आहे.**
- **सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यांत सलग पट्टा आढळतो. उत्तरेकडे तो दोन ठिकाणी खंडित झालेला आहे.**
- किनारपट्टीच्या जसजसे अधिकाधिक पूर्वेकडे जावे तसतसा **सह्याद्री पर्वताचा पायथ्यालगतचा भाग** येतो आणि एकदम सरळ भिंतीसारखा सह्याद्री पर्वत पुढे उभा राहतो. यामुळे **अरबी समुद्रावरून येणारे बाष्पयुक्त वारे** सह्याद्री पर्वतावर येऊन धडकतात.
- **मान्सूनची धडक आल्याने घाटमाथ्यावरही पावसाचे प्रमाण ४०० सें. मी. पेक्षा जास्त असते. घाटमाथ्यावर आंबोली (७४५ सें. मी.), महाबळेश्वर (६२३ सें. मी.), माथेरान (५१७ सें. मी.) या ठिकाणी जास्त पाऊस पडतो. दख्खनच्या पठारावरून वाहणाऱ्या गोदावरी, भीमा, कृष्णा या मुख्य नद्या व त्यांच्या बऱ्याच उपनद्यांची उगमस्थाने सह्याद्री पर्वतावरच आहेत व तेथेही पावसाचे प्रमाण ४०० सें. मी. पेक्षा जास्त आहे.** या पावसामुळेच नद्यांना पाणीपुरवठा होतो.
- कोल्हापूर जिल्ह्यात पश्चिम भागात गगनबावडा येथे वार्षिक पाऊस ६२१ सें. मी., राधानगरी ३८२ सें. मी.; पुणे जिल्ह्यात लोणावळा ४३० सें. मी., खंडाळा ४७१ सें. मी. आणि नाशिक जिल्ह्यात इगतपुरी येथे वार्षिक पावसाची नोंद ३३४ सें. मी. आहे.
- कोकणात सह्याद्री पर्वताच्या पायथ्यालगतच्या प्रदेशात रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात वार्षिक पावसाचे प्रमाण ३०० सें. मी. ते ४०० सें. मी. पाऊस पडतो. उदाहरणार्थ, सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी ३७६ सें. मी., कुडाळ ३०८ सें. मी.; रत्नागिरी जिल्ह्यात लांजा ३९० सें. मी., मंडणगड ३८५ सें. मी., देवरूख ३६८ सें. मी. तर रायगड जिल्ह्यात कर्जत ३२८ सें. मी., रोहा ३१२ सें. मी. व महाड ३१९ सें. मी.

कोकणात व सह्याद्री पर्वतावर दक्षिणेकडून उत्तरेकडे गेल्यास पावसाचे प्रमाण कमी-कमी होत जाते.


**पावसाचे वार्षिक दिवस :** महाराष्ट्रात सर्वांत जास्त पाऊस (३०० ते ७५० सें. मी.) **पडणाऱ्या कोकण व सह्याद्री पर्वतावर पावसाचे वार्षिक दिवस साधारणपणे ९० ते १२० दिवस आहेत.** म्हणजे ३ ते ४ महिने पाऊस पडतो. **महाराष्ट्रात सर्वांत जास्त वार्षिक पावसाचे दिवस कोल्हापूर जिल्ह्यात गगनबावडा येथे १२९ दिवस आहेत.** या खालोखाल सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबोली १२५ दिवस; सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर ११९ दिवस; सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी व बांदा येथे प्रत्येकी ११० दिवस पाऊस पडतो.

**अद्यापपर्यंत सर्वांत जास्त वार्षिक पर्जन्य : महाराष्ट्रात आतापर्यंतच्या सर्वांत जास्त आंबोली येथे १९३९ साली ८८७ सें. मी. पावसाची नोंद झालेली आहे. या खालोखाल महाबळेश्वरला १९१४ साली ८४७ सें. मी. पाऊस पडला. याचप्रमाणे गगनबावड्याला १९०८ साली ८२० सें. मी. पावसाची नोंद झालेली आहे.**

**(ब) २०० ते ३०० सें. मी. पाऊस पडणारे प्रदेश (जास्त पाऊस) :**

- **अरबी समुद्रालगतचा कोकण किनारपट्टीलगतचा उत्तर-दक्षिण चिंचोळा भाग आणि घाटमाथ्याच्या लगेच पूर्वेस असलेल्या मावळ भागात पावसाचे प्रमाण २०० ते ३०० सें. मी. आहे.**
- कोकणामध्ये या पट्ट्यात **वेंगुर्ला (२६७ सें. मी.), हर्णे (२६५ सें. मी.), रत्नागिरी (२६२ सें. मी.) व ठाणे २४८ सें. मी. दक्षिणेकडून उत्तरेकडे असे पावसाचे प्रमाण कमी-कमी होत गेल्याचे पाहावयास मिळते.**
- मावळ भागाचा टापू सह्याद्री पर्वतास उत्तर-दक्षिण दिशेने असून त्याला बिलगून आहे. **नाशिक, पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागांचा यामध्ये समावेश होतो.**
- कोकणात सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीच्या प्रदेशात आणि ठाणे जिल्ह्याच्या मध्य व दक्षिण भागात वार्षिक पर्जन्याचे प्रमाण २०० ते ३०० सें. मी. आहे. **या पट्ट्यात सर्वांत जास्त वार्षिक पावसाची नोंद रायगड जिल्ह्यात खालापूरला २९५ सें. मी. आहे.** या खालोखाल पेण २८७ सें. मी., नागोठाणे २७७ सें. मी., पनवेल २७७ सें. मी. आहे.
- कोकणात वर उल्लेख केलेल्या प्रदेशात सर्वसाधारण वार्षिक पावसाचे प्रमाण २०० ते २९५ सें. मी. दरम्यान आहे.
- कोल्हापूर जिल्ह्यात चंदगडला वार्षिक पाऊस २७० सें. मी. पडतो.
- नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम भागात त्र्यंबकेश्वर २४६ सें. मी. व पेठ येथे २३५ सें. मी. वार्षिक पावसाची नोंद आहे.

**वार्षिक पर्जन्याचे दिवस :** महाराष्ट्रात २०० ते ३०० सें. मी. पाऊस पडणाऱ्या कोकण व घाटमाथ्याच्या काही भागात वार्षिक पर्जन्याचे ८० ते १०० दिवस आहेत. म्हणजेच सुमारे २॥ ते ३ महिने पावसाचे आहेत. **या पावसाच्या प्रदेशात कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे वार्षिक पर्जन्याच्या १०१ दिवसांची नोंद अशी सर्वांत जास्त आहे.** या खालोखाल सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ला येथे ९७ दिवस आहे. बऱ्याच ठिकाणी वार्षिक पावसाचे ९० ते ९५ दिवस आहेत.




**वार्षिक पर्जन्याचे वितरण :**

**महाराष्ट्रात अतिशय जास्त पावसाचा (३००-७५० सें. मी.) प्रदेश :** कोकण व पश्चिम घाटामध्ये आहे. सर्वांत जास्त पावसाची नोंद आंबोली (७४५ सें. मी.), महाबळेश्वर (६२३ सें. मी.), गगनबावडा (६२१ सें. मी.) व माथेरान (५१७ सें. मी.) आहे. **जास्त पावसाचे प्रदेश :** (२०० ते ३०० सें. मी.), कोकण किनारपट्टीचा चिंचोळा भाग आणि मावळ असे आहेत. **मध्यम पाऊस :** मावळच्या पूर्वेस उत्तर-दक्षिण पट्टा व विदर्भात १०० ते २०० सें. मी. पाऊस पडतो. **कमी पावसाचा प्रदेश :** महाराष्ट्रात मराठवाडा, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रात ५० ते १०० सें. मी. पाऊस आहे. खऱ्या अर्थाने **अवर्षणग्रस्त प्रदेश :** पश्चिम महाराष्ट्रात अहमदनगर, नाशिक, सातारा व सोलापूर जिल्ह्यात आहे. महाराष्ट्रात कमी पावसाची नोंद अकलूज (४५ सें. मी.), दौंड (४६ सें. मी.), दहिवडी (४६ सें. मी.), म्हसवड (४७ सें. मी.), फलटण (४७ सें. मी.) येथे आहे.

**नकाशा क्र. ४.२ : महाराष्ट्र राज्य - वार्षिक पर्जन्याचे वितरण**



**(क) १०० ते २०० सें. मी. पाऊस पडणारा प्रदेश (मध्यम पाऊस) :**

- **एक चिंचोळा पट्टा मावळच्या पूर्वेस उत्तर-दक्षिण दिशेने आढळतो. याचप्रमाणे कोकणात ठाणे जिल्ह्याच्या किनारपट्टीच्या लहानशा भागात १०० ते २०० सें. मी. पाऊस पडतो.**
- **महाराष्ट्राच्या पूर्व भागात विदर्भामध्ये या पावसाचा सर्वांत महत्त्वाचा टापू आहे.** यामध्ये चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा-गोंदिया हे पूर्ण जिल्हे समाविष्ट होतात. नागपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यातील पूर्व भागात पावसाचे हेच प्रमाण आढळते. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचा ईशान्य कोपरा व पूर्व भागात मध्यम पावसाची नोंद होते.
- मुंबईला कुलाबा येथे वार्षिक पाऊस १८० सें. मी. आहे. ठाणे जिल्ह्यात वसई १९१ सें. मी. व डहाणू १७६ सें. मी. पावसाची नोंद आहे. नंदुरबार जिल्ह्यात नवापूरला ११० सें. मी. पाऊस पडतो.
- पुणे जिल्ह्यात पौड-मुळशी १५२ सें. मी. तर वडगाव ११२ सें. मी. वार्षिक पाऊस आहे. सातारा जिल्ह्यात पाचगणी, मेढा व पाटणला वार्षिक पावसाची नोंद १८३ ते १८७ सें. मी. दरम्यान आहे. कोल्हापूर जिल्ह्यात गारगोटीला १५२ सें. मी. पावसाची नोंद आहे.
- मराठवाड्यात उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर १०० सें. मी. व लातूर जिल्ह्यात उदगीर येथे वार्षिक पाऊस १०६ सें. मी. पडतो.
- विदर्भात अमरावती जिल्ह्यात गोविलगड डोंगराच्या रांगेत धारणी येथे ११३ सें. मी. तर चिखलदरा येथे १७० सें. मी. पाऊस पडतो. भंडारा व गोंदिया जिल्ह्यात वार्षिक पावसाची नोंद १३० ते १६० सें. मी. आहे. उदाहरणार्थ, साकोली १५७ सें. मी., गोंदिया १५८ सें. मी., चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात वार्षिक पावसाचे प्रमाण १२० ते १८० सें. मी. आहे. उदाहरणार्थ, मुरूमगाव १८३ सें. मी., धानोरा १७४ सें. मी.

**(ड) ५० ते १०० सें. मी. दरम्यान पाऊस पडणारे प्रदेश (कमी पाऊस) :**

- दख्खनच्या पठारावरील सर्वांत विस्तृत भागात हा कमी पाऊस पडतो. **पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, मराठवाड्यातील सर्व जिल्हे, खानदेशामधील धुळे व जळगाव आणि पश्चिम विदर्भातील चारही जिल्ह्यांचा यात समावेश होतो.**
- पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त प्रदेश वगळता हा सर्व टापू ५० ते १०० सें. मी. पावसाचा आहे. यावरून असे लक्षात येते की, **महाराष्ट्राच्या विस्तीर्ण प्रदेशात पावसाचे प्रमाण बरेच कमी आहे.** परंतु या पावसाची अनिश्चितता असल्यामुळे येथे पाण्याची परिस्थिती साधारण स्वरूपाची असते.

या प्रदेशाचे दोन उपविभाग पडतात.

**(१) ७५ सें. मी. ते १०० सें. मी. दरम्यान पाऊस पडणारा प्रदेश :**

**महाराष्ट्रात खानदेश, मराठवाडा, विदर्भ व काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे वार्षिक प्रमाण ७५ सें. मी. ते १०० सें. मी. दरम्यान आहे.**

- खानदेशात प्रामुख्याने जळगाव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण ७७ सें. मी. ते ८० सें. मी. आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागात यावल ७७ सें. मी., जळगाव, भुसावळ व पाचोरा प्रत्येकी ७९ सें. मी. व जामनेर येथे ८० सें. मी. वार्षिक पावसाची नोंद आहे. नंदुरबार जिल्ह्यात तळोदे येथे ७९ सें. मी. पाऊस पडतो.
- मराठवाड्यात बीड जिल्ह्यात मोमीनाबाद (८५ सें. मी.), माजलगाव (८३ सें. मी.); नांदेड जिल्ह्यात नांदेड (९० सें. मी.); उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद (८१ सें. मी.), कळंब (७८ सें. मी.) व लातूर जिल्ह्यात अहमदपूर (८७ सें. मी.) येथे ७५ सें. मी. ते १०० सें. मी. दरम्यान वार्षिक पाऊस पडतो.
- विदर्भात अकोला जिल्ह्यात वार्षिक पावसाचे प्रमाण ७७ ते ८८ सें. मी. आहे. उदाहरणार्थ, बाळापूर (७७ सें. मी.), अकोट (७९ सें. मी.), अकोला (८० सें. मी.) व पातूर (८८ सें. मी.).
- वाशीम जिल्ह्यात ८६ सें. मी. ते ९३ सें. मी. पाऊस पडतो. उदाहरणार्थ, करंजा (८८ सें. मी.), मंगरुळपीर (८६ सें. मी.), रिसोड (९० सें मी.), वाशीम (९३ सें. मी.).
- अमरावती जिल्ह्यात अमरावती येथे ८८ सें. मी. व बडनेरा येथे ८५ सें. मी. पावसाची नोंद होते. खऱ्या अर्थाने धारणी, चिखलदरा वगळता अमरावती जिल्ह्यात पावसाचे प्रमाण ८० ते ९३ सें. मी. आहे.
- बुलडाणा जिल्ह्यात पावसाचे प्रमाण ७५ सें. मी. ते ९० सें. मी. आहे.
- यवतमाळ जिल्ह्यात पश्चिम भागात वार्षिक पावसाचे प्रमाण ९० ते ९४ सें. मी. आहे. उदाहरणार्थ, नेर (९० सें. मी.), दारव्हा (९२ सें. मी.), पुसद (९३ सें. मी.) व दिग्रस (९४ सें. मी.).

**वार्षिक पाऊस ७५ ते १०० सें. मी. पडणाऱ्या या प्रदेशात पावसाचे दिवस ४१ ते ६१ दिवस आहेत.** उदाहरणार्थ, हिंगोली (४१ दिवस), मोमीनाबाद (४५ दिवस), जळगाव (४७ दिवस), वाशीम (५२ दिवस), दिंडोरी (५४ दिवस), सांगली जिल्ह्यात शिराळा (९१ दिवस).

**(२) ५० ते ७५ सें. मी. दरम्यान पाऊस पडणारा प्रदेश :**

- **महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, खानदेश व मराठवाड्यात ५० ते ७५ सें. मी. पाऊस पडणारा प्रदेश आहे.**
- पश्चिम महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्याचा बराचसा पूर्व भाग या पावसाच्या टप्प्यात येतो. या परिसरात पावसाचे प्रमाण ५१ सें. मी. ते ६७ सें. मी. आहे. उदाहरणार्थ, कोपरगाव (५१ सें. मी.), कर्जत (५६ सें. मी.), अकोले (६० सें. मी.), शेवगाव (६३ सें. मी.) व पाथर्डी (६७ सें. मी.).
- नाशिक जिल्ह्यात सटाणा, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर व पेठ वगळता सर्वत्र पावसाचे प्रमाण ५४ ते ७५ सें. मी. आहे. उदाहरणार्थ, मालेगाव (५४ सें. मी.), नंदगाव (५८ सें. मी.), पिंपळगाव (६३ सें. मी.), चंदूर (६५ सें. मी.) व नाशिक (७० सें. मी.).
- पुणे जिल्ह्यात वार्षिक पावसाचे प्रमाण ५० ते ७४ सें. मी. आहे. उदाहरणार्थ, इंदापूर (५० सें. मी.), सासवड (५४ सें. मी.), आळंदी (६० सें. मी.), पुणे (६६ सें. मी.), जुन्नर (७४ सें. मी.).
- सांगली जिल्हा ५० ते ७५ सें. मी. दरम्यान पाऊस पडणारा आहे. उदाहरणार्थ, विटा (५४ सें. मी.), तासगाव (६० सें. मी.), मिरज (६४ सें. मी.).
- सातारा जिल्ह्यात ५० ते ७१ सें. मी. पाऊस पडतो. उदाहरणार्थ, खंडाळा (५० सें. मी.), औंध (६७ सें. मी.), कोरेगाव, वाई व कराड प्रत्येकी ७१ सें. मी. पावसाची नोंद होते.
- सोलापूर जिल्ह्यातही पावसाचे वार्षिक प्रमाण ५१ ते ६९ सें. मी. दरम्यान आहे. उदाहरणार्थ, माळशिरस (५१ सें. मी.), माढा (५८ सें. मी.), पंढरपूर (६१ सें. मी.), बार्शी (६६ सें. मी.), सोलापूर (६८ सें. मी.), अक्कलकोट (६९ सें. मी.).
- खानदेशात धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यात पावसाचे वार्षिक प्रमाण ५७ सें. मी. ते ७७ सें. मी. आहे. धुळे जिल्ह्यात शिंदखेडा (५७ सें. मी.), धुळे (६१ सें. मी.), नंदुरबार जिल्ह्यात नंदुरबार (६४ सें. मी.), जळगाव जिल्ह्यात वार्षिक पावसाचे प्रमाण ६८ ते ७४ सें. मी. दरम्यान आहे. उदाहरणार्थ, अमळनेर (६८ सें. मी.), एरंडोल (७० सें. मी.), चाळीसगाव (७१ सें. मी.), एदलाबाद (७४ सें. मी.).
- मराठवाड्यात बीड जिल्ह्यात वार्षिक पावसाचे प्रमाण ६७ ते ७३ सें. मी. आहे. उदाहरणार्थ, आष्टी (६७ सें. मी.), बीड (७० सें. मी.), पाटोदा (७३ सें. मी.).

**तक्ता क्र. ४.५ : महाराष्ट्र : वार्षिक पावसाची ५० सें. मी. पेक्षा कमी पाऊस नोंद करणारी वेधशाळा केंद्रे**

| वेधशाळा केंद्रे | वार्षिक पाऊस | पावसाचे दिवस | वेधशाळा केंद्रे | वार्षिक पाऊस | पावसाचे दिवस | वेधशाळा केंद्रे | वार्षिक पाऊस | पावसाचे दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अहमदनगर जिल्हा** | | | पुणे जिल्हा | | | सातारा जिल्हा | | |
| संगमनेर | ५० | ३१ | जेजुरी | ४९ | ३४ | दहिवडी | ४६ | ३२ |
| **धुळे जिल्हा** | | | बारामती | ४७ | ३१ | म्हसवड | ४७ | ३० |
| साक्री | ४९ | ४१ | दौंड | ४६ | ३० | फलटण | ४७ | ३२ |
| **नाशिक जिल्हा** | | | सोलापूर जिल्हा | | | | | |
| सटाणा | ४८ | ३२ | अकलूज | ४५ | ३० | | | |

**Ref.** : Climate of Maharashtra–India Meteorological Department.

**(इ) ५० सें. मी. पेक्षा कमी पाऊस पडणारे प्रदेश (अवर्षणग्रस्त प्रदेश) :**

- **पश्चिम महाराष्ट्रात ५० सें. मी. पेक्षा कमी पावसाचे प्रदेश बहुतेक सर्व जिल्ह्यांत येतात.** या प्रदेशाला 'अवर्षणग्रस्त प्रदेश' किंवा 'कायम दुष्काळी प्रदेश' असे म्हटले जाते.
- अनेक भागांत पावसाचे प्रमाण ४५ ते ५० सें. मी. आहे व तोही एखाद्या वेळेस पडतो किंवा पडत नाही. अशा या अस्थिर व अनिश्चित पावसामुळे हा प्रदेश दुष्काळी भाग राहिलेला आहे.



- **सातारा व सांगली जिल्ह्याचा पूर्व भाग, तसेच पुणे, अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यांचाही काही भाग दुष्काळी म्हणून ओळखला जातो आणि उत्तरेकडे धुळे जिल्ह्यात त्याचा लहानसा पट्टा आहे.**
- सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडे असलेल्या त्या **अवर्षणग्रस्त प्रदेशाचे क्षेत्रफळ ६२,००० चौ. कि. मी.** आहे. महाराष्ट्राच्या एकूण **क्षेत्रफळापैकी २०% प्रदेश अवर्षणग्रस्त** आहे. या प्रदेशात सुमारे **१ कोटी २० लाख लोक** राहतात. याचे महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येशी १६% प्रमाण पडते.
- पश्चिम महाराष्ट्रात ५० सें. मी. पेक्षा कमी पावसाचा प्रदेश आहे. **अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर** (४९.६ सें. मी.), नाशिक जिल्ह्यात सटाणा (४८ सें. मी.), पुणे जिल्ह्यात जेजुरी (४९ सें. मी.), **बारामती** (४७ सें. मी.), दौंड (४६ सें. मी.) पाऊस पडतो. याचप्रमाणे सातारा जिल्ह्यात दहिवडी (४६ सें. मी.), **म्हसवड** (४७ सें. मी.), फलटण येथे ४७ सें. मी. वार्षिक पावसाची नोंद होते. सोलापूर जिल्ह्यात अकलूज **येथे वार्षिक पाऊस** ४५ सें. मी. आहे.
- अर्थात कमी पाऊस पडणाऱ्या या प्रदेशात काही भागांत जलसिंचनाच्या **योजना राबविल्या आहेत.** उदाहरणार्थ, बारामती, दौंड, संगमनेर, फलटण व अकलूज.
- **अवर्षणग्रस्त प्रदेशात वार्षिक पावसाचे ३० ते ४७ दिवस आहेत व महाराष्ट्रात सर्वांत कमी पावसाचे दिवस सोलापूर जिल्ह्यात अकलूज, पुणे जिल्ह्यात दौंड व सातारा जिल्ह्यात म्हसवड येथे फक्त ३० दिवस आहेत.** यानंतर धुळे जिल्ह्यात साक्री, अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर, नाशिक जिल्ह्यात सटाणा, पुणे जिल्ह्यात बारामती येथे प्रत्येकी वार्षिक पावसाचे ३१ दिवस आहेत.

सातारा जिल्ह्यात दहिवडी व फलटणला वार्षिक पावसाचे ३२ दिवस आहेत.

## महाराष्ट्राचे हवामान

**महाराष्ट्रातील ऋतू**

| उन्हाळा | पावसाळा | हिवाळा |
|---|---|---|
| १. तापमान<br>• दैनिक कमाल तापमान<br>• दैनिक किमान तापमान<br>२. हवेचा दाब व वारे<br>३. पर्जन्य<br>• मार्च ते मे (उन्हाळा) पर्जन्य<br>४. सापेक्ष आर्द्रता | १. भारतीय मान्सूनची संकल्पना<br>• वातावरणशास्त्रामधील संज्ञा<br>२. मान्सूनचे स्वरूप<br>• मान्सूनचे आगमन व मान्सूनची वाटचाल<br>• पर्जन्यक्षम प्रणाली व मान्सूनच्या पावसाचे वितरण<br>• मान्सूनचा खंड<br>• मान्सूनचे निर्गमन<br>३. पर्जन्य विभागवार बदल<br>४. सापेक्ष आर्द्रता<br>४. पावसाचे दिवस | **१. संक्रमण महिना 'ऑक्टोबर'**<br>२. तापमान<br>• **दैनिक कमाल तापमान**<br>• **दैनिक किमान तापमान**<br>• **दैनिक तापमान कक्षा**<br>• **सरासरी किमान तापमान - डिसेंबर**<br>३. हवेचा दाब व वारे<br>४. पर्जन्य |

**वार्षिक पर्जन्याचे वितरण**

(अ) ३०० ते ७५० सें.मी. पाऊस पडणारे प्रदेश (अतिशय जास्त पाऊस)
(ब) २०० ते ३०० सें.मी. पाऊस पडणारे प्रदेश (जास्त पाऊस)
(क) १०० ते २०० सें.मी. पाऊस पडणारे प्रदेश (मध्यम पाऊस)
(ड) ५० ते १०० सें.मी. पाऊस पडणारे प्रदेश (कमी पाऊस)
(i) ७५ ते १०० सें.मी. दरम्यान पाऊस पडणारा प्रदेश (ii) ५० ते ७५ सें.मी. दरम्यान पाऊस पडणारा प्रदेश
(इ) ५० सें.मी. पेक्षा कमी पाऊस पडणारे प्रदेश (अवर्षणग्रस्त प्रदेश)

# बहुपर्यायी प्रश्न

(१) कोकणचे हवामान .......... असते.
(अ) कोरडे (ब) विषम (क) सम (ड) थंड

(२) पठारावरील हवामान .......... असते.
(अ) दमट (ब) विषम (क) सम (ड) समशीतोष्ण

(३) उन्हाळ्यात पठारावर दैनिक तापमानकक्षा ..........
(अ) वाढते. (ब) कमी होते. (क) फारशी बदलत नाही. (ड) तशीच राहते.

(४) एप्रिल-मे महिन्यात पडणाऱ्या पावसास .......... म्हणतात.
(अ) आंबेसरी (ब) मृगसरी (क) वर्षासरी (ड) माघारीचा पाऊस

(५) उन्हाळ्यात नागपूरला सापेक्ष आर्द्रता .......... असते.
(अ) भरपूर (ब) साधारण (क) मध्यम (ड) बरीच कमी

(६) दक्षिण कोकणातून उत्तर कोकणात गेल्यास पावसाचे प्रमाण ..........
(अ) वाढत जाते. (ब) कमी होत जाते.
(क) तेवढेच राहते. (ड) फारसा फरक पडत नाही.

(७) सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर उत्तरेकडून दक्षिणेकडे गेल्यास पावसाचे प्रमाण ..........
(अ) कमी होत जाते. (ब) तेवढेच राहते.
(क) वाढत जाते. (ड) फारसा फरक पडत नाही.

(८) सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडे गेल्यास लगेचच .......... निर्माण होतो.
(अ) अवर्षणग्रस्त प्रदेश (ब) अति पर्जन्याचा प्रदेश (क) कायम दुष्काळी प्रदेश (ड) पर्जन्यछायेचा प्रदेश

(९) महाराष्ट्र पठारावरील अवर्षणग्रस्त प्रदेशात पावसाचे प्रमाण .......... दरम्यान असते.
(अ) २५ ते ५० सें. मी. (ब) ५० ते १०० सें. मी.
(क) ५ ते २५ सें. मी. (ड) १०० ते १५० सें. मी.

(१०) महाराष्ट्रात सर्वांत जास्त पाऊस .......... येथे पडतो.
(अ) आंबोली (ब) महाबळेश्वर (क) माथेरान (ड) कळसूबाई

(११) पर्जन्यछायेच्या प्रदेशात .......... चा समावेश होतो.
(अ) महाड (ब) वाई (क) महाबळेश्वर (ड) उस्मानाबाद

(१२) नैर्ऋत्य मान्सूनच्या दोन्ही शाखांपासून प्रामुख्याने .......... मध्ये पाऊस पडतो.
(अ) कोकण (ब) विदर्भ (क) पश्चिम महाराष्ट्र (ड) मराठवाडा

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | क | (२) | ब | (३) | अ | (४) | अ | (५) | ड | (६) | ब |
| (७) | क | (८) | ड | (९) | अ | (१०) | अ | (११) | ब | (१२) | ब |



(१३) मध्य महाराष्ट्रात पावसाचे दिवस .......... असतात.
(अ) ७५ ते ९५ (ब) ६० ते ६५ (क) ३० ते ५० (ड) १०० ते १२५

(१४) पावसाळा व हिवाळा यांच्या दरम्यानचा .......... हा संक्रमणाचा महिना म्हणून ओळखला जातो.
(अ) नोव्हेंबर (ब) सप्टेंबर (क) ऑक्टोबर (ड) डिसेंबर

(१५) हिवाळ्यात विदर्भामध्ये रात्रीचे तापमान .......... पर्यंत कमी होत जाते.
(अ) ४° ते ५° से. (ब) ५° ते १०° से. (क) १०° ते १५° से. (ड) १५° ते २०° से.

(१६) महाराष्ट्रात सर्वांत जास्त पावसाचे प्रमाण .......... आहे.
(अ) खानदेश (ब) विदर्भ
(क) कोकण व पश्चिम घाट (ड) पश्चिम महाराष्ट्र

(१७) महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी .......... प्रदेश अवर्षणग्रस्त आहे.
(अ) २०% (ब) ३०% (क) ४०% (ड) ५०%

(१८) नैर्ऋत्य मान्सून काळात महाराष्ट्रात .......... पाऊस पडतो.
(अ) ४०% (ब) ५०% (क) ७०% (ड) ८७%

(१९) महाराष्ट्रात नैर्ऋत्य मान्सून काळात सर्वांत कमी पाऊस .......... जिल्ह्यात पडतो.
(अ) सातारा (ब) पुणे (क) अहमदनगर (ड) सोलापूर

(२०) महाराष्ट्रात सर्वांत जास्त पावसाच्या दिवसाची नोंद .......... झालेली आहे.
(अ) आंबोली (ब) महाबळेश्वर (क) गगनबावडा (ड) सावंतवाडी

(२१) उन्हाळ्यात दैनिक तापमान कक्षा .......... ला सर्वांत जास्त असते.
(अ) मुंबई (ब) पुणे (क) सोलापूर (ड) नागपूर

(२२) महाराष्ट्रात हवामानदृष्ट्या सर्वांत महत्त्वाचा काळ .......... याचा असतो.
(अ) ईशान्य मान्सून काळ (ब) नैर्ऋत्य मान्सून काळ
(क) मान्सूनपूर्व काळ (ड) मान्सूनोत्तर काळ

(२३) महाराष्ट्राच्या हवामानावर .......... याचा प्रामुख्याने प्रभाव पडतो.
(अ) सह्याद्री पर्वत (ब) दख्खन पठार
(क) कोकण (ड) पठारावरील डोंगररांगा

(२४) महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे .......... महिन्यात सर्वांत जास्त पाऊस पडतो.
(अ) ऑगस्ट (ब) जून (क) जुलै (ड) डिसेंबर

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१३) | क | (१४) | क | (१५) | क | (१६) | क | (१७) | अ | (१८) | ड |
| (१९) | अ | (२०) | क | (२१) | ड | (२२) | ब | (२३) | अ | (२४) | क |

(२५) सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील भागात पर्जन्याचे प्रमाण .......... असते.
(अ) वाढत (ब) कमी होत (क) तेवढेच (ड) साधारण

(२६) महाराष्ट्रात .......... मध्ये पावसाचे प्रमाण सर्वांत जास्त असते.
(अ) कोकण (ब) सह्याद्री पर्वतातील नद्यांचे उगमस्थान
(क) विदर्भ (ड) मावळ

(२७) महाराष्ट्रात नैर्ऋत्य मान्सून वाऱ्याच्या आगमन व निर्गमनामध्ये .......... असते.
(अ) निश्चितता (ब) नियमितता (क) ठरावीक दिवशी (ड) अनिश्चितता

(२८) मान्सून काळातील पावसात पडणारा खंड .......... मध्ये असतो.
(अ) जुलै व ऑगस्ट (ब) ऑक्टोबर व नोव्हेंबर (क) डिसेंबर व जानेवारी (ड) एप्रिल व मे

(२९) कोकणात बाष्पाचे प्रमाण नेहमी .......... च्या आसपास असते.
(अ) ४०% (ब) ८५ ते ९०% (क) ७०% (ड) २०%

(३०) उष्ण कटिबंधीय वर्षारण्याचा हवामान विभाग .......... मध्ये आहे.
(अ) पश्चिम महाराष्ट्र (ब) कोकण (क) खानदेश (ड) विदर्भ

(३१) महाराष्ट्राच्या वार्षिक पर्जन्याच्या वितरणाचे प्रतिनिधित्व ......... जिल्हा करतो.
(अ) नाशिक (ब) पुणे (क) कोल्हापूर (ड) सातारा

(३२) महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण ३०० ते ५०० सें. मी. असणारा व ज्याची उंची ६०० ते १५०० मीटर असणारा प्रदेश .......... या नावाने ओळखला जातो.
(अ) अवर्षणग्रस्त (ब) पर्जन्यछाया (क) निश्चित पर्जन्य (ड) घाटमाथ्याचा विभाग

(३३) महाराष्ट्रात पर्जन्यछायेचा प्रदेश हा .......... आहे.
(अ) रुंद व सलग पट्टा (ब) अरुंद व अलग पट्टा (क) अरुंद व सलग पट्टा (ड) रुंद व अलग पट्टा

(३४) महाराष्ट्रात रब्बी ज्वारीचे क्षेत्र .......... मध्ये आढळते.
(अ) पर्जन्यछायेचा प्रदेश (ब) अवर्षण प्रदेश
(क) निश्चित पावसाचा प्रदेश (ड) जास्त पर्जन्याचा प्रदेश

(३५) महाराष्ट्र पठारावर .......... हवामान आहे.
(अ) कोरडे (ब) सम (क) आर्द्रतायुक्त (ड) वर्षारण्य

**उत्तरे**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२५) | ब | (२६) | ब | (२७) | ड | (२८) | अ | (२९) | क | (३०) | ब |
| (३१) | क | (३२) | ड | (३३) | क | (३४) | ब | (३५) | अ | | |

# ५. वने

## महाराष्ट्रातील वनांचे प्रमुख प्रकार

महाराष्ट्रात वनस्पतींचे प्रमुख वैशिष्ट्यपूर्ण प्रकार पाहावयास मिळतात.

(१) **उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये** (२) **उष्ण कटिबंधीय निमसदाहरित अरण्ये**
(३) **उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये** (४) **उष्ण कटिबंधीय आर्द्र पानझडी अरण्ये किंवा उष्ण कटिबंधीय मान्सून अरण्ये**
(५) **उष्ण कटिबंधीय रूक्ष पानझडी अरण्ये** (६) **उष्ण कटिबंधीय काटेरी अरण्ये**

### १. उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये

**प्रदेश :** महाराष्ट्रामध्ये कोकण भागात **सह्याद्रीच्या पायथ्यालगत सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी** परिसरात ही सदाहरित अरण्ये पाहावयास मिळतात. **वार्षिक पर्जन्य सुमारे २०० सें. मी. किंवा त्याहीपेक्षा जास्त असणाऱ्या प्रदेशात व जांभा मृदेच्या भागात उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये पाहावयास मिळतात.**

**वृक्षांचे स्वरूप :** प्रदेशातील भरपूर पाऊस, आर्द्रतेचे जास्त प्रमाण व जमिनीमध्ये ह्यूमसचे मुबलक प्रमाण असल्याने **घनदाट** वनस्पतींचे आच्छादन पाहावयास मिळते. **वृक्षांची उंची ४५ ते ६० मी.** दरम्यान असते. घनदाट अरण्यांमध्ये कमी उंचीच्या वनस्पतींचीदेखील वाढ होते.

**वृक्षांचे प्रकार :** सदाहरित अरण्यांमध्ये **नागचंपा, पांढरा सिडार, फणस, कावसी, जांभूळ** वगैरे वृक्ष आढळतात. त्या घनदाट अरण्यात अधूनमधून **बांबू आणि कळक** यांचे विविध प्रकार आहेत.

**आर्थिक महत्त्व :** सदाहरित अरण्यात असलेल्या वनस्पतींचा **आर्थिकदृष्ट्या मर्यादित प्रमाणात उपयोग** होतो. त्याचे कारण या वनस्पतींपासून तयार होणारे **लाकूड अतिशय कठीण** असल्याने ते टिंबर म्हणून वापरण्यास योग्य असत नाही; तरीही तेथील वृक्षांची तोड बऱ्याच प्रमाणात झालेली आहे. वृक्षांचे वनसंवर्धन होणे अत्यंत आवश्यक आहे; कारण त्यांच्या साहाय्याने मृदसंधारण होते. भूमिगत पाण्याची पातळी वाढते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मूळ वनस्पती तोडल्यानंतर त्या ठिकाणी त्याच प्रकारच्या वनस्पतींची निर्मिती होत नाही. कमी प्रतीच्या वनस्पती येऊ लागतात.

### २. उष्ण कटिबंधीय निमसदाहरित अरण्ये

**प्रदेश :** **वार्षिक पर्जन्य २०० सें. मी. पेक्षा कमी असणाऱ्या प्रदेशात निमसदाहरित अरण्ये** आढळतात. सदाहरित अरण्ये आणि पानझडीची अरण्ये यांच्या संक्रमण अवस्थेत ही अरण्ये आहेत. **पश्चिम किनारपट्टीवर कोकणामध्ये त्यांचा एक सलग पट्टा** पाहावयास मिळतो. त्याचप्रमाणे **सह्याद्री पर्वताच्या पश्चिम भागात घाटमाथ्यावरही काही वनस्पती** आढळतात. **विशेषतः आंबोली, लोणावळा, इगतपुरीच्या परिसरात निमसदाहरित अरण्ये** आहेत. **(नकाशा क्र. ५.१ पाहा.)**

**वृक्षांचे स्वरूप :** उष्ण कटिबंधीय निमसदाहरित अरण्यात आढळणारे **वृक्ष सदाहरित अरण्यांपेक्षा कमी उंचीचे** असतात. या अरण्यातील **वृक्षांची पाने गळण्याचा हंगाम वेगवेगळा** असतो. यामुळे वर्षभरात सर्वसाधारण स्वरूपात हिरवीगार वनश्री पाहावयास मिळते. अधूनमधून काही पानझडी वृक्षही असतात.


**वृक्षांचे प्रकार :** निमसदाहरित अरण्यात **किंडल, रान फणस, नाना, कदंब, शिसम, बिबळा** वगैरे वृक्ष आढळतात. **बांबूची वने कमी** प्रमाणात आहेत.

**आर्थिक महत्त्व :** निमसदाहरित अरण्यातील वृक्षांचा आर्थिकदृष्ट्या बराच उपयोग होतो. विशेषतः **आईन, नाना, वावळी** हे वृक्ष महत्त्वाचे आहेत.

### कोकणातील अरण्ये

आतापर्यंत वर्णन केलेली सदाहरित आणि निमसदाहरित अरण्ये प्रामुख्याने कोकणात आणि त्याच्या लगतच्या डोंगराळ प्रदेशात आढळतात. कोकणच्या वनस्पतींची काही वैशिष्टे आहेत. कोकणच्या सखल प्रदेशात नद्यांच्या खोऱ्यात, तसेच डोंगरउतरणीवर भाताची खाचरे आहेत, तर किनारपट्टीवर अनेक ठिकाणी नारळाच्या आणि पोफळीच्या बागा आहेत. नारळ हा कोकणचा कल्पवृक्ष आहे. तशाच विपुल प्रमाणात पोफळीच्या बागाही पाहावयास मिळतात. कोकण किनारपट्टीवरील हिरवीगार वनश्री त्या प्रदेशाची शोभा वाढविते.

कोकणामध्ये नारळ, पोफळीव्यतिरिक्त बिब्बा, उंडी, मुचकुंद, भोपा, तिवर वगैरे वैशिष्ट्यपूर्ण कोकणी झाडे आढळतात. अशा अनेक वृक्षांचा सर्व तऱ्हेने उपयोग होतो. उदाहरणार्थ, उंडीच्या फळाचे कडू तेल औषधी असते. भोपा, तिवर, मारांडी ही खाजणातील झाडे आहेत, तर डोंगरातील झाडे मुचकुंद व बिब्बा आहेत. वरील वृक्षांव्यतिरिक्त येकळी, निर्गुडी, टाकळी, करवंदी अशा झाडाझुडपांशिवाय वृक्षावळीची नोंद अपुरी ठरते. कारण तुकारामानेही 'चंदनाच्या संगे बोरिया, बाभळी, येकळी, टाकळी, चंदनची' असा येकळी टाकळीचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. याबरोबरच कांडे साबर, फडचा निवडुंग या वनस्पतींची दाद घेतली की वृक्षनामावली संपूर्ण झाली असे समजावे.




**महाराष्ट्र - अरण्ये**

उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये सावंतवाडी परिसरात असून वनस्पतीचे दाट आच्छादन आहे. निमसदाहरित अरण्ये कोकण व घाटमाथ्यावर आहेत. उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये महाबळेश्वर, पाचगणी भागात आहेत. आर्द्र पानझडी अरण्ये पर्जन्यछायेच्या प्रदेशात व पूर्व विदर्भात आहेत. रूक्ष पानझडी अरण्ये देशावर कमी पावसाच्या प्रदेशात आहेत. काटेरी अरण्ये मुख्यतः फक्त मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भात आढळतात.

**नकाशा क्र. ५.१ : महाराष्ट्र - अरण्ये**

## किनाऱ्यालगतची खाजण अरण्ये

समुद्रकिनाऱ्यालगत भरती आणि ओहोटी यांच्या दरम्यानच्या प्रदेशात, खाड्यांच्या काठावरील गाळाच्या जमिनीत 'खाजण अरण्ये' पाहावयास मिळतात. या प्रदेशातील वनस्पतींचे वैशिष्ट्ये म्हणजे जमिनीमधून मुळे वर येतात. खाजण अरण्यामधील लाकडांचा वापर मुख्यत्वेकरून जळणासाठी केला जातो. खाजण वनस्पतीपासून टॅनिन उपलब्ध होते. याचा उपयोग कातडी कमाविणे, माशांची जाळी धुणे याकरिता होतो. सागर किनाऱ्याची झीज कमी होण्यासाठी खाजण वनस्पतींचा उपयोग होतो. काजळी, तिवर, मारुडी, अंबोरी इत्यादी वृक्ष आढळतात.



## पश्चिम घाट किंवा सह्याद्री पर्वतामधील अरण्ये

सह्याद्री पर्वतामधील डोंगररांगा आणि घाटमाथ्यावर निमसदाहरित आणि सदाहरित अरण्ये आहेत. **माथेरान, महाबळेश्वर, खंडाळा, भीमाशंकर आणि अशाच प्रकारच्या डोंगराळ भागात पुढील महत्त्वाचे वृक्ष पाहावयास मिळतात.** जांभूळ, अंजन, पार जांभूळ आणि हिरडा या वनस्पती माथेरानपेक्षा महाबळेश्वर येथे मुबलक प्रमाणात आहेत, तर माथेरानला काटे कुंभेल वनस्पती बऱ्याच ठिकाणी आढळते. महाबळेश्वरला आढळणारे इतर महत्त्वाचे वृक्ष म्हणून कोकम, भोमा, बकुळ, आंबा, शेंद्री, रानफणस, काटकुरा, तेजपात, सुरंगी वगैरे वनस्पतींचा उल्लेख केला जातो. कोयनेच्या खोऱ्यात माकड लिंबू, येवती, कर्पा, कुसुम वगैरे वृक्ष आहेत. पाचगणी भागात पिंपरनेल, कानफुटी वृक्ष आहेत तर वाई घाटात भारतीय लव्हेंडर वृक्ष आहेत. याशिवाय तेथे रानमिरवले, डोंगरी मिरची, मिरवेल वगैरे वृक्ष आढळतात.

महाबळेश्वर आणि माथेरान येथील वनस्पतींचे संशोधन स्वातंत्र्यपूर्व काळात काही इंग्रज अधिकाऱ्यांनी केलेले होते. बर्डवूड या इंग्रज अधिकाऱ्याने असे नमूद करून ठेवले आहे की, वरील भागांत सुमारे ६७६ प्रकारच्या वनस्पती आहेत. डोंगररांगांवर बिनवासाच्या फुलांचे २४ प्रकार, नेचरी (Ferns) चे ३६ प्रकार तर शेवाळ्यासारख्या वनस्पतींचे ९ प्रकार आहेत. डॉ. कुक यांनी महाबळेश्वर आणि माथेरान येथील वनस्पतींचा विशेष अभ्यास केला व त्यांनी असे सांगितले की, माथेरानला १४० वनस्पती निराळ्या आहेत, की ज्या महाबळेश्वर येथे आढळत नाहीत तर महाबळेश्वर येथे सुमारे १३० अशा वनस्पती आहेत की ज्या माथेरानच्या पठारावर नाहीत.

## ३. उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये

**प्रदेश :** **सह्याद्री पर्वतावर २५० सें. मी. पेक्षा जास्त पाऊस असणाऱ्या प्रदेशात** ही अरण्ये आहेत. **महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान** आणि भीमाशंकरच्या परिसरात उपउष्ण सदाहरित अरण्ये आहेत. उत्तर महाराष्ट्रात **गाविलगड टेकड्यांवरही ही अरण्ये** आहेत.

**वृक्षांचे स्वरूप :** सह्याद्री पर्वतामधील वर उल्लेखिलेल्या प्रदेशातील **पावसाचे भरपूर प्रमाण, तुलनात्मकदृष्ट्या मध्यम स्वरूपाचे** तापमान, **दीर्घकाळ पाऊस आणि आर्द्रता या सर्व घटकांमुळे सदाहरित वृक्षे** आढळतात. तेथील **जांभा जमिनीचाही प्रभाव वनस्पतींच्या वितरणावर** झालेला आहे. अरण्यातील वृक्षांची फार मोठ्या प्रमाणात तोड करण्यात आली असून त्यांचे लहान-लहान पट्टे राहिलेले आहेत.

**वृक्षांचे प्रकार :** उपउष्ण सदाहरित अरण्यात जांभळा, अंजन, हिरडा, आंबा, बेहडा, कारवी वगैरे महत्त्वाचे वृक्ष आहेत.

**आर्थिक महत्त्व :** अरण्यातील **अनेक वृक्षांचा आर्थिकदृष्ट्या उपयोग** होतो. महाबळेश्वरच्या परिसरातील जावळीच्या खोऱ्यात शिवकाळात अति घनदाट वनस्पती होत्या. त्यानंतर मात्र वनस्पतींची तोड मोठ्या प्रमाणात झाली आहे. **हिरडा वृक्षाचे** लाकूड चांगले मजबूत असते. अशाच तऱ्हेने इतर वृक्षांचाही उपयोग केला जातो व **मधुमक्षीपालन** हा एक महत्त्वाचा लघुउद्योगधंदा आहे.

## ४. उष्ण कटिबंधीय आर्द्र पानझडी अरण्ये किंवा उष्ण कटिबंधीय मान्सून अरण्ये

**प्रदेश :** महाराष्ट्रात ही अरण्ये प्रामुख्याने **चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांच्या पूर्व भागात चिरोल आणि नवेगाव टेकड्यांवर** आहेत. तो परिसर **' आलापल्ली अरण्ये ' म्हणून ओळखला** जातो. याशिवाय **भंडारा व गोंदिया जिल्ह्याचा काही भाग, सातपुडा पर्वतरांगांतील** गाविलगड टेकड्या (मेळघाट) यांचा समावेश होतो. **उत्तर कोकणातील डोंगररांगा, तसेच सह्याद्री** पर्वतातील घाटमाथा ओलांडल्यानंतर **पर्जन्यछायेचा प्रदेश**, याशिवाय सह्याद्री पर्वतापासून निघणाऱ्या **शंभू महादेव, हरिश्चंद्र-बालाघाट आणि सातमाळा** डोंगररांगांच्या पश्चिम भागात आर्द्र पानझडी अरण्ये पाहावयास मिळतात. **कोल्हापूर, नाशिक, ठाणे, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांत** पानझडी अरण्ये आहेत.

**वृक्षांचे स्वरूप :** या प्रदेशात **वार्षिक पाऊस १२० ते १६० सें. मी.** असून तो प्रामुख्याने पावसाळ्यात जून ते सप्टेंबर **या चार महिन्यांच्या काळात नैर्ऋत्य मान्सून** वाऱ्यांपासून पडतो आणि वर्षातील **बाकीचे आठ महिने जवळजवळ कोरडे** असतात. पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या **पाण्याचा पुरवठा वनस्पतींना वर्षभर पुरेसा असत नाही.** म्हणजेच वर्षातील बाराही महिने वनस्पती हिरव्यागार राहण्याइतपत जमिनी ओल्या राहत नाहीत. विशेषतः **उन्हाळ्यात जास्त उष्णतेमुळे जमिनीत ओलावा वनस्पतींना पुरत राहावा म्हणून अनेक वनस्पतींची पाने गळून पडतात. त्यामुळे या पर्णहीन वनस्पती पुन्हा पावसाळा सुरू होईपर्यंत कशातरी तग धरू शकतात. म्हणूनच अशा वैशिष्ट्यपूर्ण वृक्षांना 'पानझडीची अरण्ये' असे म्हणतात.** या अरण्यांमध्ये घनदाट वृक्षांचे प्रमाण मध्यम स्वरूपाचे असते. काही सदाहरित वृक्ष अधूनमधून असतात. **वृक्षांची उंची ३० ते ४० मीटर असते.** काही भागांमध्ये स्थलांतरित शेतीमुळे आता अरण्ये तुरळक राहिलेली आहेत.

**वृक्षांचे प्रकार :** आर्द्र पानझडी अरण्यात **प्रमुख वनस्पती सागवान** आहेत. याशिवाय **आईन, हिरडा, बिबळा, लेंडी, येरूल, किंडल, कुसुम, आवळा, शिसम, सिरस** वगैरे वृक्ष आढळतात. **बांबूची वनेही** पाहावयास मिळतात. व्यवहारात ते वासे म्हणून प्रसिद्ध आहेत.

**आर्थिक महत्त्व :** आर्द्र पानझडी अरण्यातील अनेक वृक्ष आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. सर्वांत महत्त्वाचा वृक्ष सागवान आहे. पूर्वीच्या काळी महाराष्ट्रात सागाची प्रचंड झाडे होती. जुन्या प्रचंड वाड्याचे लाकूडकाम सागवानाचे असे. आता मात्र हे वृक्ष मर्यादित प्रदेशातच राहिलेले आहेत. चंदनाचे वृक्षही अधूनमधून आढळतात. या अरण्यातील अनेक वृक्षांची देखभाल वनखात्यामार्फत केली जाते. **चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील 'आलापल्ली अरण्यामधील' वृक्षाची भारतातील प्रसिद्ध वृक्षांमध्ये गणना केली जाते. महाराष्ट्रात चंदनाची काही झाडे आढळतात.** ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की, **'चांदु वो चांदणें चांपे वो चन्दने, देवकी नंदनेंवीण नावडे वो'.**

## ५. उष्ण कटिबंधीय रूक्ष पानझडी अरण्ये

**प्रदेश : सातपुडा पर्वतरांगा आणि अजिंठा डोंगररांगांत** रूक्ष पानझडी अरण्ये आढळतात. **घाटमाथ्याच्या पूर्वेस** पायथ्यालगत असणाऱ्या **कमी उंचीच्या टेकड्यांवरही ही अरण्ये** पाहावयास मिळतात. अशाच प्रकारे **विदर्भामध्येही डोंगराळ भाग** या अरण्यांनी व्यापलेला आहे.

**वृक्षांचे स्वरूप : वार्षिक पर्जन्य ८० ते १२० सें. मी. असणाऱ्या प्रदेशात रूक्ष पानझडी अरण्ये** आढळतात. त्यांचे सलग पट्टे नाहीत. ते अधूनमधून पाहावयास मिळतात. पानझडी वृक्ष उंच असतात. काही ठिकाणी **कमी उंचीचे वृक्षही** आढळतात. अधूनमधून **गवताळ प्रदेशही** असतो. पावसाळ्यातच फक्त वनस्पती हिरव्यागार दिसतात. कोरड्या हवामानात **पाण्याच्या अभावामुळे बरेचसे वृक्ष पर्णहीन** असतात.

**वृक्षांचे प्रकार :** उष्ण कटिबंधीय रूक्ष पानझडी अरण्यात **सागवान, धावडा, शिसम, तेंदू, पळस, बीजसाल, लेंडी, हेडी, बेल, खैर, अंजन** वगैरे वृक्ष असतात.

**आर्थिक महत्त्व :** या अरण्यांमधील **अनेक वनस्पतींचा उपयोग टिंबर** म्हणून व्यापारी दृष्टीने केला जातो, तसेच **इंधन म्हणून लाकडाचा वापर** मोठ्या प्रमाणात करतात. **खैरसारख्या वनस्पतींचा उपयोग कात** निर्माण करण्यासाठी केला जातो. पानझडी वृक्ष अरण्यांमध्ये **मानवाचे अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे अनेक झाडे तोडून बरीचशी जमीन पिकाच्या लागवडीखाली** आणण्यात आली आहे. या अरण्यांमध्ये महत्त्वाचे वृक्ष नाहीसे होऊ नयेत म्हणून काही उपाययोजना केलेल्या आहेत.

## ६. उष्ण कटिबंधीय काटेरी अरण्ये

**प्रदेश :** दख्खनच्या पठारावर **मध्य महाराष्ट्रात** नद्यांच्या खोऱ्याच्या लागवडीच्या परिसरात असणाऱ्या **डोंगररांगांवर** आणि **कमी उंचीच्या पठारावर** काटेरी झाडे आढळतात. **पुणे, सातारा, सांगली व अहमदनगरच्या पूर्व भागात, तसेच सोलापूर, मराठवाडा आणि विदर्भ भागातही** टेकड्यांवर काटेरी अरण्ये आहेत.

**वृक्षांचे स्वरूप : वार्षिक पर्जन्य ८० सें. मी. पेक्षा कमी असणाऱ्या प्रदेशात ही अरण्ये** आढळतात. या प्रदेशात **अधूनमधून उत्तम प्रकारचे वृक्ष** पाहावयास मिळतात. यावरून असे लक्षात येते की, पूर्वी या परिसरात चांगल्या प्रकारच्या वनस्पती असल्या पाहिजेत; परंतु त्यांचा मानवाने नंतर नाश केल्याचे स्पष्टपणे जाणवते. पठारावर **ज्या-ज्या भागात पाण्याची उपलब्धता आहे, तेथें हिरव्यागार वनस्पती** असतात. **कोरड्या हवामानास जुळवून घेणाऱ्या काटेरी वनस्पतींचे प्रमाण जास्त** आहे. अशा वनस्पती कोरड्या हवामानात-देखील जगू शकतात.

**वृक्षांचे प्रकार :** काटेरी अरण्यात **बाभूळ, खैर, हिवर** हे वृक्ष सर्वत्र आढळतात. **निंब झाड** अनेक ठिकाणी पाहावयास मिळते.

**आर्थिक महत्त्व :** काटेरी अरण्यात आढळणाऱ्या वृक्षांचा उपयोग आर्थिकदृष्ट्या बऱ्याच बाबतीत केला जातो. **तारवडसारख्या झुडपाचा उपयोग टॅनिंगसाठी केला जातो. विविध प्रकारची झाडे जळणासाठी तोडली जातात.**

### अरण्यांचे इतर प्रकार

महाराष्ट्रात वर उल्लेखिलेल्या प्रमुख प्रकारांव्यतिरिक्त काही स्थानिक ठिकाणी खालील वृक्ष आढळतात :

**(१) अंजन वृक्ष :** दख्खनच्या पठारावर मध्यम पाऊस असणाऱ्या प्रदेशात नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव तसेच पश्चिम महाराष्ट्रात व काही प्रमाणात मराठवाडा आणि विदर्भामध्ये अंजन वृक्ष आहेत.

**(२) कोकणातील जांभा जमिनीवरील वृक्ष :** पश्चिम घाटातील जास्त उंचीच्या प्रदेशात जांभा जमिनीवर आयरूल वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळतात, तर सखल प्रदेशात गवत उगवत असून अधूनमधून खुरटी वनस्पती आढळते. त्यामध्ये घाणेरीचे प्रमाण जास्त आहे.

**(३) बाभळीची झाडे :** दख्खनच्या पठारावर बहुतेक सर्व ठिकाणी विशेषतः नद्यांच्या किनाऱ्यालगत बाभळीची झाडे पाहावयास मिळतात.



# महाराष्ट्र वन विभागाद्वारा महाराष्ट्रातील वनांचे प्रकार


**(१) दक्षिण उष्ण कटिबंधीय सदाहरित वने : महाराष्ट्रातील पश्चिमेकडील उंच पर्वतरांगांच्या उतारावरील नद्यांच्या पाणलोट क्षेत्राच्या संरक्षणाबरोबर जलसंधारणाचे महत्त्वाचे कार्य करतात.** यामध्ये प्रामुख्याने आंबा, किंजळ, अंजन, पार जांभूळ, हिरडा इत्यादी वृक्ष प्रजाती आढळतात.

महाराष्ट्रातील वने या नकाशात जी 'सदाहरित वने' दाखविली आहेत ती वस्तुतः 'सामी सदाहरित वने' या सदरात मोडतात.

**(२) दक्षिण उष्ण कटिबंधीय पानगळतीची सदाहरित वने : ठाणे जिल्हा, सह्याद्रीच्या डोंगराळ भागातील काही सुरक्षित खोरी व गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात आढळतात.** सागवान, खैर, शिसव, सादडा, किंजळ, धावडा, बीजासाल, कुंभी, तिवस वगैरे मौल्यवान वृक्षजाती व तीन-चार प्रकारचे बांबू या वनस्पती प्रकारांनी ही वने समृद्ध आहेत. महाराष्ट्रात याचे क्षेत्र ३४१० चौ. कि. मी. आहे. एकूण वनक्षेत्राशी दमट वनांची ५.५ टक्केवारी आहे.

**(३) दक्षिण उष्ण कटिबंधीय पानगळतीची शुष्क वने : महाराष्ट्रातील सर्वांत जास्त वनक्षेत्र पानगळतीच्या शुष्क वनांनी व्यापलेले आहे. यात प्रामुख्याने नाशिक, खानदेशाचे आणि विदर्भाचे सर्व जिल्हे आणि औरंगाबाद व नांदेड जिल्ह्याचे काही भाग यांचा समावेश होतो. विदर्भातील या वनात वाढणाऱ्या सागवानाला देशातील लाकडाच्या बाजारपेठेत** विशेषतः **स्तरकाष्ठासाठी फार मोठी मागणी आहे.** याचे क्षेत्र १०,३२६ कि. मी. असून त्याची टक्केवारी १६% आहे.

चांगल्या प्रतीच्या या लाकडांना पाच ते सहा हजार रुपये घनमीटरपर्यंत सरासरीने ठोक किंमत पडते. सागाखेरीज सावर, मोह, टेंभुर्णी, बीजसाल, अंजन, बांबू, चंदन, शिसम वगैरे इतर मौल्यवान वृक्ष वनस्पती या वनात आढळतात.




**आलेख क्र. ५.१ : महाराष्ट्र — वनांच्या प्रकारांचे वितरण**

**(४) दक्षिण उष्ण कटिबंधीय काटेरी वने : पुणे, अहमदनगर, सांगली, सातारा, सोलापूर, मराठवाड्यातील बहुतेक जिल्हे, खानदेश व पश्चिम विदर्भातील काही भाग या कमी पावसाच्या प्रदेशात काटेरी वने अस्तित्वात** आहेत. यात बाभळी, हिवर, चंदन सालई, गराडी यांसारखी खुरट्या वाढीची झाडे व इतर मरु-वनस्पती या गवताचे प्रकार आढळतात. महाराष्ट्रात काटेरी वनांचे सर्वांत जास्त क्षेत्र ४०,६०२ चौ. कि. मी. म्हणजे ६३% आहे.

**(५) दक्षिण उष्ण कटिबंधीय समशीतोष्ण रुंदपर्णी पर्वतीय वने : फक्त कोल्हापूर, सातारा, रायगड व पुणे जिल्ह्यांतील घाटमाथ्यावरील विशिष्ट भागात आढळतात. (उदा. आंबोली, महाबळेश्वर, माथेरान, भीमाशंकर परिसर) भू-जल संरक्षणाच्या दृष्टीने ही वने महत्त्वाची आहेत.** जांभूळ, अंजन, फणस, आंबा, हिरडा, बेहडा, अर्जुन वगैरे प्रमुख वृक्ष असणाऱ्या या वनातून हिरडा, फळे, शिकेकाई, मध, मेण इत्यादी गौण वनस्पती मिळतात. महाराष्ट्रात रुंदपर्णी पर्वतीय वनांचे ९८५० चौ. कि. मी. क्षेत्र आहे. याची टक्केवारी १५ आहे.

**(६) सागरी किनारी आणि भरती ओहोटीची दलदली वने : महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग, ठाणे जिल्ह्यांच्या पश्चिम सागरी किनाऱ्यावरील खाड्या व दलदलीच्या भागात ही वने आढळतात. ही वने समुद्रतटाच्या संरक्षणाचे महत्त्वाचे कार्य करतात.** यामध्ये प्रामुख्याने ॲव्हिसिनिया, रायझोफोरा या वृक्ष प्रजातींचा समावेश होतो.

महाराष्ट्रातून दलदलीच्या वनांचे क्षेत्र फक्त १६७ चौ. कि. मी. असून याची टक्केवारी नगण्य म्हणजे ०.५% आहे. रायगड जिल्ह्यात सर्वांत जास्त क्षेत्र ९५ चौ. कि. मी. व मुंबई उपनगरात ३७ चौ. कि. मी. आहे.

### वनविभागाची संरचना

महाराष्ट्रात प्रधान मुख्य वनसंरक्षक असून त्यांचे प्रमुख कार्यालय नागपूरला आहे. राज्यस्तरावर एकूण ९ कार्यालये आहेत. प्रत्येकाचे पदाधिकारी मुख्य वनसंरक्षक असतात. याचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**वनविभागाची संरचना :** (१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (२) प्रशासन, (३) विकास, (४) उत्पादन, (५) संधारण, (६) मूल्यांकन व राष्ट्रीयीकरण, (७) वन्य जीव, (८) संरक्षण, (९) धोरण व तंत्रज्ञान.

**प्रादेशिक वनवृत्ते :** महाराष्ट्रात वनविभागात एकूण ११ प्रादेशिक वनवृत्ते आहेत. प्रत्येक वनवृत्ताचे वनसंरक्षक प्रमुख असतात. प्रादेशिक वनवृत्ते पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| (१) नागपूर | (२) उत्तर चंद्रपूर | (३) दक्षिण चंद्रपूर |
| (४) अमरावती | (५) यवतमाळ | (६) औरंगाबाद |
| (७) पुणे | (८) ठाणे | (९) नाशिक |
| (१०) कोल्हापूर | (११) धुळे. | |

**कार्यात्मिक वनवृत्ते :** महाराष्ट्रात वनविभागात एकूण ९ कार्यात्मिक वनवृत्ते आहेत. वनसंरक्षक हे प्रत्येक वृत्ताचे प्रमुख असतात.

कार्यात्मिक वनवृत्ते पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| (१) पुणे : कार्य आयोजना | (२) नागपूर : कार्य आयोजना | (३) नागपूर : वन्य जीव |
| (४) बोरिवली : वन्य जीव | (५) नाशिक : वन्य जीव | (६) अमरावती : व्याघ्र प्रकल्प |
| (७) नागपूर : मूल्यनिर्धारण घटक | (८) पुणे : संशोधन | (९) पुणे : वन शिक्षण. |

### महाराष्ट्रातील वनक्षेत्रे व त्यांची टक्केवारी

महाराष्ट्र वनविभागाचे वनांच्या दृष्टीने तीन प्रमुख विभाग आहेत. प्रशासकीय विभागांची गटवारी यामध्ये समाविष्ट केलेली आहे.

**(अ) पश्चिम महाराष्ट्र विभाग** : (I) कोकण विभाग, (II) नाशिक विभाग, (III) पुणे विभाग.

**(ब) मराठवाडा विभाग** : (IV) औरंगाबाद विभाग.

**(क) विदर्भ विभाग** : (V) अमरावती विभाग, (VI) नागपूर विभाग.

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. कि. मी. आहे. यांपैकी ६४,३३५ चौ. कि. मी. क्षेत्रात वने आहेत. महाराष्ट्राच्या एकूण भू-प्रदेशापैकी फक्त २१% क्षेत्रात वने आहेत. वास्तविक ही टक्केवारी किमान ३३% पर्यंत वाढविण्याची गरज आहे.

## महाराष्ट्रातील वनांचे जिल्हावार स्वरूप

### महाराष्ट्रातील वनांचे जास्त क्षेत्र असणारे पाच जिल्हे

महाराष्ट्रात २००७-०८ सालानुसार, सर्वांत जास्त वनाचे क्षेत्र गडचिरोली जिल्ह्यात १३,०२८ चौ.कि.मी. (राज्याची वनक्षेत्र टक्केवारी) (२१.०५%) आहे. या खालोखाल चंद्रपूर जिल्हा : ५००१ चौ.कि.मी. (८.८%); अमरावती जिल्हा : ३५०४ चौ.कि.मी. (५.६६%); नाशिक जिल्हा : ३,४३२ चौ.कि.मी. (५.५४%) आणि यवतमाळ जिल्हा : २,९६१ चौ.कि.मी. (४.७८%) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

### महाराष्ट्रातील वनांचे कमी क्षेत्र असणारे पाच जिल्हे

**महाराष्ट्रात २००७-०८ सालानुसार, सर्वांत कमी वनांचे क्षेत्र मराठवाड्यात लातूर जिल्ह्यात ४३ चौ. कि. मी. आहे.**

यानंतर मुंबई शहर व उपनगर (४४ चौ. कि. मी.), उस्मानाबाद (६१ चौ. कि. मी.), रत्नागिरी (६६ चौ. कि. मी.) व परभणी (९८ चौ. कि. मी.) हे जिल्हे आहेत.




**२००१ ते ३५०० चौ. कि. मी. वनक्षेत्र असणारे जिल्हे :** महाराष्ट्रात गोंदिया (२,८३२ चौ.कि.मी.); नागपूर, नंदुरबार, पुणे आणि धुळे जिल्ह्याचा (२,०५६ चौ.कि.मी.) उतरत्या क्रमाने क्रमांक आहेत.

**१००१ ते २००० चौ. कि. मी. वनक्षेत्र असणारे जिल्हे :** या गटात अहमदनगर (१,९९५ चौ.कि.मी.); जळगाव, रायगड, सातारा, कोल्हापूर, नांदेड, बुलडाणा, वर्धा, भंडारा (१,५१६ चौ.कि.मी.) असे जिल्हे आहेत.

**५०१ ते १००० चौ. कि. मी. वनक्षेत्र असलेले जिल्हे :** महाराष्ट्रात औरंगाबाद व सिंधुदुर्ग जिल्हे.

**१०१ ते ५०० चौ. कि. मी. वनक्षेत्र असलेले जिल्हे :** महाराष्ट्रात सोलापूर, बीड, सांगली, हिंगोली, अकोला, वाशीम जिल्हे.




**नकाशा क्र. ५.२ : महाराष्ट्र - वनांचे क्षेत्र**

**जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्राशी वनक्षेत्राची टक्केवारी : महाराष्ट्रात सर्वांत जास्त गडचिरोली जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी ९०.४% क्षेत्र वनांचे आहे.** याचा प्रथम क्रमांक आहे. या खालोखाल गोंदिया (५२.२%), चंद्रपूर (४३.७%), ठाणे (४०.२%), नंदुरबार (४७.५%), भंडारा (३८.९%) असे जिल्हे आहेत.

**जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्राशी वनक्षेत्राची नगण्य टक्केवारी असलेले जिल्हे :** लातूर (०.६%), रत्नागिरी (०.८%), उस्मानाबाद (०.८०%), जालना (१.३१%), परभणी (१.५%).

महाराष्ट्रात २००७-०८ सालानुसार, एकूण वनक्षेत्र ६१,९०३ चौ.कि.मी. आहे. भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २०.१% क्षेत्र **वनाखाली आहे.** प्रशासकीय विभागानुसार **सर्वांत जास्त वनांचे क्षेत्र नागपूर विभागात आहे. या विभागात २६,२१४ चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे.** राज्यामधील सुमारे ४२.३३% वनक्षेत्र नागपूर विभागात आहे तर सर्वांत कमी वनक्षेत्र औरंगाबाद विभागात आहे. **या विभागात फक्त २,९९७ चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे.** राज्यातील ४.७५% वनक्षेत्र औरंगाबाद विभागात आहे.

नाशिक विभागात वनक्षेत्र ११,८७२ चौ.कि.मी. असून राज्यामधील १९.७% वनक्षेत्र या विभागात आहे. या खालोखाल अमरावती विभागात वनक्षेत्र ८,४१३ चौ.कि.मी. (सुमारे १४%) आहे. यानंतर कोकण विभागाचा क्रमांक आहे. या विभागात ६२५४ चौ.कि.मी. (११.११%) आहे.

## महाराष्ट्रातील वनांचे वर्गीकरण व त्याचे जिल्ह्यानुसार स्वरूप

महाराष्ट्रात वनक्षेत्राचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे :

(I) वनविभागाच्या अखत्यारीमधील वनक्षेत्र : (१) राखीव वनक्षेत्र, (२) संरक्षित वनक्षेत्र, (३) अवर्गीकृत वनक्षेत्र.

(II) वनविभागाच्या अखत्यारीमधील खासगी वने

(III) महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडे वर्ग केलेले वनक्षेत्र

(IV) महसूल विभागांतर्गत वनक्षेत्र

### I. वनविभागाच्या अखत्यारीमधील वनक्षेत्र

महाराष्ट्रात महसूल व वनविभागाच्या अखत्यारीमधील २००८-०९ अखेर अनुक्रमे ५५,३६७ चौ.कि.मी. व २४४९ चौ.कि.मी. **होते. भौगोलिक क्षेत्राच्या अनुक्रमे १८% व ०.८% होते.** वनक्षेत्र ६०,८३५ चौ. कि. मी. आहे. यांपैकी राखीव क्षेत्र ४५,५३६ चौ. कि. मी., संरक्षित क्षेत्र ९,२०८ चौ. कि. मी. व अवर्गीकृत वनक्षेत्र ६,०९१ चौ. कि. मी. आहे.

**(१) राखीव क्षेत्र :** महाराष्ट्रात राखीव वनक्षेत्र ४५,५३६ चौ. कि. मी. आहे. **महाराष्ट्रात राखीव वनक्षेत्राचे सर्वांत जास्त क्षेत्र गडचिरोली जिल्ह्यात ८९४३ चौ. कि. मी. आहे.** त्या खालोखाल धुळे-नंदुरबार (३९६७ चौ. कि. मी.), अमरावती (३४५५ चौ. कि. मी.), चंद्रपूर (३२७९ चौ. कि. मी.), यवतमाळ (२७५५ चौ. कि. मी.), ठाणे (२३१० चौ. कि. मी.) व भंडारा-गोंदिया (२१५९ चौ. कि. मी.) जिल्ह्यांत राखीव वनक्षेत्र आहे.

**महाराष्ट्रात सर्वांत कमी राखीव क्षेत्र लातूर जिल्ह्यात फक्त ४ चौ. कि. मी. आहे.** यानंतर मुंबई व मुंबई उपनगर (७ चौ. कि. मी.), रत्नागिरी (११ चौ. कि. मी.), सिंधुदुर्ग (१८ चौ. कि. मी.), उस्मानाबाद (३१ चौ. कि. मी.), जालना (७९ चौ. कि. मी.) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

**(२) संरक्षित वनक्षेत्र :** महाराष्ट्रात संरक्षित वनक्षेत्र फक्त ९२०८ चौ. कि. मी. आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यात संरक्षित क्षेत्रे नाहीत.

**महाराष्ट्रात सर्वांत जास्त संरक्षित क्षेत्र गडचिरोली जिल्ह्यात ३८४२ चौ. कि. मी. आहे.** या खालोखाल भंडारा-गोंदिया (१,०६५ चौ. कि. मी.), ठाणे (९५९ चौ. कि. मी.), नागपूर (८३६ चौ. कि. मी.), चंद्रपूर (८१५ चौ. कि. मी.) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

**(३) अवर्गीकृत वनक्षेत्र :** महाराष्ट्रात अवर्गीकृत वनक्षेत्र ६,०९१ चौ. कि. मी. आहे. **महाराष्ट्रात सर्वांत जास्त अवर्गीकृत वनक्षेत्र भंडारा-गोंदिया जिल्ह्यात ११०६ चौ. कि. मी. आहे.** यवतमाळ (७६७ चौ. कि. मी.), कोल्हापूर (६५४ चौ. कि. मी.), नागपूर (५१७ चौ. कि. मी.), चंद्रपूर (४२५ चौ. कि. मी.), सिंधुदुर्ग (३९१ चौ. कि. मी.), बुलडाणा (३८४ चौ. कि. मी.), गडचिरोली (३६७ चौ. कि. मी.) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

### II. वनविभागाच्या अखत्यारीमधील खासगी वने

महाराष्ट्रात या प्रकारची खासगी वने फक्त ५२३ चौ. कि. मी. आहेत. **महाराष्ट्रात फक्त कोकण, नाशिक व पुणे विभागात खासगी वने आहेत. महाराष्ट्रात सर्वांत जास्त खासगी वने सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३६ चौ. किं. मी. आहे.** या खालोखाल रायगड (११९ चौ. कि. मी.), कोल्हापूर (७६ चौ. कि. मी.), पुणे (७० चौ. कि. मी.) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.



### III. महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडे वर्ग केलेले वनक्षेत्र

महाराष्ट्रात या गटात २९७७ चौ. कि. मी. वनक्षेत्र आहे. **महाराष्ट्रात कोकण, नाशिक व विदर्भ विभागात ही वनक्षेत्रे आहेत. महाराष्ट्रात एफ. डी. सी. एम. कडे सर्वांत जास्त क्षेत्र चंद्रपूर जिल्ह्याचे ७५८ चौ. कि. मी. आहे. या खालोखाल** गडचिरोली (५२८ चौ. कि. मी.), ठाणे (४७९ चौ. कि. मी.), भंडारा-गोंदिया (४३० चौ. कि. मी.) ***जिल्ह्यांचा प्रथम क्रमांक आहे.***

### IV. महसूल विभागांतर्गत वनक्षेत्र

महाराष्ट्रात महसूल विभागांतर्गत एकूण ५२४४ चौ. कि. मी. वनक्षेत्र आहे. **यांपैकी राखीव क्षेत्र १३७५ चौ. कि. मी. आहे.** संरक्षित वनांचे क्षेत्र १३५ चौ. कि. मी. तर अवर्गीकृत वनाचे क्षेत्र सर्वांत जास्त म्हणजे **३७३ चौ. कि. मी. आहे.**

**वने (२००८-०९ सालची परिस्थिती) :** वन व महसूल विभागाच्या आधिपत्याखाली २००८-०९ अखेर अनुक्रमे ५५,३६७ चौ.कि.मी. व २,४४९ चौ.कि.मी. क्षेत्र होते व ते राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या (३,०७,७१३ चौ.कि.मी.) अनुक्रमे १८.० टक्के व ०.८ टक्के होते. **राज्यामध्ये कृषीव्याप्त क्षेत्रानंतर दुसऱ्या क्रमांकाचे मोठे क्षेत्र वनाखाली आहे. महाराष्ट्र वन विकास** महामंडळाकडे (म.व.वि.म.) २००८-०९ अखेरपर्यंत ३,५६३ चौ.कि.मी. (अस्थायी) **वन क्षेत्र हस्तांतरित करण्यात आले.** (ज्यापैकी ३,४०२ चौ.कि.मी. राखीव वनक्षेत्र व १६१ चौ.कि.मी. संरक्षित वनक्षेत्र होते.) जे राज्याच्या **भौगोलिक** क्षेत्राच्या सुमारे १.२ टक्के आहे. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या तरतुदीनुसार ज्या खाजगी वनांना भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत संबंधित कलम लागू होते त्यांना राखीव वनांचा दर्जा प्राप्त झाला व राज्यामध्ये २००८-०९ अखेर ५६० चौ.कि.मी. (अस्थायी) खाजगी वनक्षेत्र वन विभागाच्या आधिपत्याखाली आणण्यात आले, जे राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ०.२ टक्के होते.

### महाराष्ट्रातील वन विभाग/वनवृत्त/वनविभागानुसार वनक्षेत्र

महाराष्ट्राचे वनांचे पुढील भाग पाडलेले आहेत :

**(अ) पश्चिम महाराष्ट्र विभाग** : (१) ठाणे वनवृत्त, (२) नाशिक वनवृत्त, (३) धुळे वनवृत्त, (४) पुणे वनवृत्त, (५) कोल्हापूर वनवृत्त.

**(ब) मराठवाडा विभाग** : (६) औरंगाबाद वनवृत्त.

**(क) विदर्भ विभाग** : (७) अमरावती वनवृत्त, (८) यवतमाळ वनवृत्त, (९) नागपूर वनवृत्त, (१०) उत्तर चंद्रपूर वनवृत्त, (११) दक्षिण चंद्रपूर वनवृत्त.

महाराष्ट्रात एकूण ११ वनवृत्ते आहेत आणि ५८ वनविभाग आहेत.

**तक्ता क्र. ५.१ : महाराष्ट्र — वनवृत्ते व वनविभाग**

| अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग संख्या | अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | ८ | ७. | अमरावती | ५ |
| २. | नाशिक | ४ | ८. | यवतमाळ | ५ |
| ३. | धुळे | ५ | ९. | नागपूर | ५ |
| ४. | पुणे | ५ | १०. | उत्तर चंद्रपूर | ५ |
| ५. | कोल्हापूर | ६ | ११. | दक्षिण चंद्रपूर | ५ |
| | पश्चिम महाराष्ट्र विभाग | २८ | | विदर्भ विभाग | २५ |
| ६. | औरंगाबाद | ५ | | | |
| | मराठवाडा विभाग | ५ | | एकूण | ५८ |

# महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये

**महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने :** महाराष्ट्रात एकूण सहा राष्ट्रीय उद्याने आहेत.

(१) ताडोबा राष्ट्रीय उद्यान (चंद्रपूर)
(२) नवेगाव राष्ट्रीय उद्यान (गोंदिया)
(३) पेंच राष्ट्रीय उद्यान (नागपूर)
(४) बोरिवली राष्ट्रीय उद्यान (मुंबई उपनगर व ठाणे)
(५) गुगामाळ राष्ट्रीय उद्यान (अमरावती)
(६) चांदोली राष्ट्रीय उद्यान (सांगली, सातारा, कोल्हापूर व रत्नागिरी)

**महाराष्ट्रातील अभयारण्ये :** महाराष्ट्रात सहाही प्रशासकीय विभागात अभयारण्ये आहेत.

**(१) कोकण विभाग :** कोकण विभागात कर्नाळा पक्षी (रायगड), तुंगारेश्वर (ठाणे), तानसा (ठाणे), फणसाड (रायगड), मालवण सागरी (सिंधुदुर्ग) अशी पाच अभयारण्ये आहेत.

**(२) पुणे विभाग :** पुणे विभागात भीमाशंकर (पुणे व ठाणे), कोयना उद्यान (सातारा), सागरेश्वर (सांगली), राधानगरी-दाजीपूर (कोल्हापूर), मयुरेश्वर-सुपे (पुणे) अशी पाच अभयारण्ये आहेत.

**(३) नाशिक विभाग :** नाशिक विभागात रेहेकुरी-काळवीट (अहमदनगर), माळढोक पक्षी (अहमदनगर-सोलापूर), कळसूबाई-हरिश्चंद्रगड (अहमदनगर), यावल (जळगाव), गोताळा-ऑट्रमघाट (जळगाव-औरंगाबाद), नांदूर-मधमेश्वर (नाशिक), अनेर धरण (नंदुरबार) अशी आठ अभयारण्ये आहेत.

**(४) औरंगाबाद विभाग :** औरंगाबाद विभागात जायकवाडी पक्षी (औरंगाबाद-अहमदनगर), नायगाव-मयूर (बीड), येडशी-रामलिंग घाट (उस्मानाबाद) अशी तीन अभयारण्ये आहेत.

**(५) अमरावती विभाग :** अमरावती विभागात मेळघाट (व्याघ्र), ढाकणा-कोळकाज (अमरावती), काटेपूर्णा (वाशीम), पैनगंगा (यवतमाळ-नांदेड), अंबाबरवा (बुलडाणा), ज्ञानगंगा (बुलडाणा), लोणार (बुलडाणा), नरनाळा (अकोला), वान (अमरावती), टिपेश्वर (यवतमाळ) अशी दहा अभयारण्ये आहेत.

**(६) नागपूर विभाग :** नागपूर विभागात नागझिरा (गोंदिया), बोर (वर्धा-नागपूर), अंधारी (चंद्रपूर), चपराळा (गडचिरोली), भामरागड (गडचिरोली) अशी पाच अभयारण्ये आहेत.


## वनजीव संपदा

महाराष्ट्रातील प्राकृतिक रचना, हवामान, वनस्पती व अरण्यांच्या प्रकारातील विविधता यांमुळे वन्य पशू-पक्ष्यांची समृद्धी जोपासण्यास योग्य आहे. आपल्या राज्यात सुमारे ८५ जातींचे सस्तन वन्य पशू, ४६० जातींचे पक्षी, याशिवाय जमिनीवर सरपटणारे, जल-स्थल व पाण्यात राहणारे अनेक जातींचे प्राणी व कीटक वनांमध्ये आहेत. वन्यजीवांमध्ये वाघ, बिबळ्या, रानगवा, सांबर, चितळ, नीलगाय, भेकर, अस्वल, रानडुक्कर, तरस, कोल्हा, रानकुत्रा, शालू हे पशू तर बुलबुल, शमा, कोकिळा, सुतार, माळढोक, पोपट, हिरवे कबुतर, करकोचा, घुबड, स्वर्गनाचन (फ्लाय कॅचर), लाल तुती (रोझ फिंच), मोर, लावा तसेच स्थलांतर करणारी निरनिराळी बदके, पाणकोंबडे व रोहित यांचा समावेश होतो.

### वन्य पशू-पक्ष्यांनी समृद्ध प्रदेश

**(१) गोंदिया जिल्हा :** (अ) नागझिरा, (ब) नवेगाव परिसर. **(२) नागपूर जिल्हा :** (अ) पेंच नदीचे खोरे, (ब) नागलवाडी परिसर, **(३) वर्धा जिल्हा :** (अ) बोर धरणाचे पाणलोट क्षेत्र, (ब) गारपीट, ब्राह्मणवाडा परिसर. **(४) चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे :** (अ) ताडोबा, (ब) कोलसा, (क) मोहरली, (ड) कन्हारगाव, (ड) चपराळा, (फ) आलापल्ली, (ग) सिरोंचा व भामरागड क्षेत्रे. **(५) अमरावती जिल्हा :** मेळघाटचे डोंगर. **(६) यवतमाळ व नांदेड जिल्हा :** किनवट क्षेत्र. **(७) धुळे, नंदुरबार, जळगाव व नाशिक जिल्हा :** (अ) हरसूल, (ब) पेठ, (क) बाऱ्हे, (ड) यावल, (इ) चोपडा. **(८) मुंबई उपनगर :** (अ) बोरिवली. **(९) ठाणे जिल्हा :** (अ) तानसा, (ब) सूर्यमाल, (क) घसई, (ड) वंशाळा क्षेत्रे. **(१०) अन्य प्रदेश :** माथेरान, कर्जत, रोहा, भीमाशंकर, लोणावळा-खंडाळा, राधानगरी, आंबोली. याखेरीज अनेक पाणवठ्यांचे व जलाशयांच्या प्रदेशात पक्ष्यांची विविधता पाहावयास मिळते.






नकाशा क्र. ५.३ : महाराष्ट्र - अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने

### तक्ता क्र. ५.२ : महाराष्ट्रातील अभयारण्ये

| अभयारण्य | क्षेत्रफळ चौ. कि. मी. | जिल्हा |
|---|---|---|
| ◆ **कोकण विभाग** | | |
| कर्नाळा पक्षी | ४.४८ | रायगड |
| तुंगारेश्वर | — | ठाणे |
| तानसा | ३०४.८१ | ठाणे |
| फणसाड | ६९.७९ | रायगड |
| मालवण सागरी | २९.१२२ | सिंधुदुर्ग |
| ◆ **पुणे विभाग** | | |
| भीमाशंकर | १३०.७८ | पुणे व ठाणे |
| कोयना उद्यान | ४२३.५५ | सातारा |
| सागरेश्वर | १०.८७ | सांगली |
| राधानगरी | ३५१.१६ | कोल्हापूर |
| मयुरेश्वर, सुपे | ५.१५ | पुणे |
| | | |
| | | |
| ◆ **नाशिक विभाग** | | |
| रेहेकुरी, काळवीट | २.१७ | अहमदनगर |
| माळढोक पक्षी | ८४९६.४४ | अहमदनगर-सोलापूर |
| कळसूबाई, हरिश्चंद्रगड | ३६१.७१ | अहमदनगर |
| यावल | १७७.५२ | जळगाव |
| गौताळा औटरामघाट | २६०.६१ | जळगाव-औरंगाबाद |
| नांदूर-मधमेश्वर | १००.१२ | नाशिक |
| अनेर धरण | ८२.९४ | नंदुरबार |

| अभयारण्य | क्षेत्रफळ चौ. कि. मी. | जिल्हा |
|---|---|---|
| ◆ **औरंगाबाद विभाग** | | |
| जायकवाडी पक्षी | ३४१.०५ | औरंगाबाद व अहमदनगर |
| नायगाव मयूर | २९.८८ | बीड |
| येडशी-रामलिंग घाट | २२.३८ | उस्मानाबाद |
| ◆ **अमरावती विभाग** | | |
| मेळघाट (व्याघ्र) ढाकणा-कोळकाज | ११५०.०३ | अमरावती |
| काटेपूर्णा | ७३.६९ | वाशीम |
| पैनगंगा | ३२४.६२ | यवतमाळ-नांदेड |
| अंबाबरवा | १२७.११ | बुलडाणा |
| ज्ञानगंगा | २०५.२३ | बुलडाणा |
| लोणार | — | बुलडाणा |
| नरनाळा | १२.३५ | अकोला |
| वान | २११.०० | अमरावती |
| टिपेश्वर | १४८.६३ | यवतमाळ |
| ◆ **नागपूर विभाग** | | |
| नागझिरा | १५२.८१ | भंडारा |
| बोर | ६१.१० | वर्धा व नागपूर |
| अंधारी | ५०९.२७ | चंद्रपूर |
| चपराळा | १३४.७८ | गडचिरोली |
| भामरागड | १०४.३८ | गडचिरोली |

**संदर्भ :** वनविभागवार माहिती पुस्तिका : महाराष्ट्र राज्य

### तक्ता क्र. ५.३ : महाराष्ट्रातील वनोद्याने

| विभाग | जिल्हा | वनोद्याने |
|---|---|---|
| ◆ **कोकण** | ठाणे<br>रायगड<br>सिंधुदुर्ग | अर्नाळा, वज्रेश्वरी<br>घारापुरी (एलिफंटा)<br>माथेरान, आंबोली, नरेंद्र डोंगर |
| ◆ **पुणे** | पुणे | बनेश्वर, सिंहगड, पाचगाव-पर्वती, भांबुर्डा, मुळा-मुठा, शिवनेरी, उजनी-भिगवण |
| | सातारा | प्रतापसिंह (महाबळेश्वर), प्रतापगड |
| | सांगली | दाडोबा डोंगर |
| | कोल्हापूर | तबक उद्यान (पन्हाळा) आळते (हातकणंगले) |

| विभाग | जिल्हा | वनोद्याने |
|---|---|---|
| ◆ **औरंगाबाद** | औरंगाबाद<br>परभणी<br>नांदेड | अजिंठा, जायकवाडी<br>हिमायतबाग<br>येलदरी, शांतीघाट, बहादूरपुरा |
| ◆ **नाशिक** | नाशिक<br>धुळे<br>जळगाव | गंगापूर, सप्तश्रृंगी<br>तोरणमाळ, कंडेश्वर<br>पाल, पाटणादेवी, पद्मालय |
| ◆ **अमरावती** | अमरावती<br>बुलडाणा | चिखलदरा<br>राणीबाग, लोणार, बुलडाणा |
| ◆ **नागपूर** | नागपूर<br>चंद्रपूर | सेमिवरी हिल, रामटेक<br>माणिकगड |



### तक्ता क्र. ५.४ : वन्य प्राण्यांची क्षेत्रे

| वन्य प्राणी | क्षेत्रे (जिल्हा) |
|---|---|
| सांबर, चितळ, नीलगाय, चोशिंगा वगैरे. | चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया. |
| गवे | कोल्हापूर, सिंधुदुर्ग, भंडारा, गोंदिया, अमरावती. |
| जंगली कुत्रे व अस्वले | सिंधुदुर्ग, रत्नागिरी, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, नांदेड, अमरावती. |
| कस्तुरी मांजरे व पाणमांजरे | भंडारा, गोंदिया, अमरावती, कोकण. |

## व्याघ्र प्रकल्प (Tiger Projects)

१९७२ साली हा भारताचा 'राष्ट्रीय प्राणी' म्हणून घोषित केला. जंगलातील वाघांची भरपूर संख्या ही त्याला लागणारे भक्ष्य मुबलक तसेच वनस्पती मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचे दर्शवितात. यामुळेच वाघ हा जंगलाची समृद्धी दर्शविणारा प्राणी मानला जातो.

**वाघांचे मूळ स्थान :** पारिस्थितिकी विज्ञानाच्या व उपलब्ध जीवाश्मांच्या आधारे वाघांचे मूळ स्थान सायबेरियामध्ये असावे. या थंड प्रदेशातून त्यांचे स्थलांतर नंतरच्या काळात इतरत्र झाले. सायबेरियातून पुढे ते दक्षिणेकडील आशिया आणि मलेशियन द्वीपसमूहाकडे सरकले असावेत असा अंदाज आहे. त्यानंतर जगात इतरत्र त्यांचा प्रसार झाला.

भारतात काही अपवादात्मक प्रदेश वगळता वाघ सर्वत्र आढळतात. भारतात उत्तर व ईशान्य भागातील त्यांच्या अस्तित्वावरून भारतात वाघ पूर्वेकडून म्यानमार (ब्रह्मदेश) व आसाममध्ये आले असावेत व तेथून पुढे त्यांचा भारतात इतरत्र प्रसार झाला.

**व्याघ्र प्रकल्पाचा उद्देश : आपल्या राष्ट्रीय प्राण्यांचे संरक्षण, संवर्धन करणे, त्यासाठी मानवी अतिक्रमणापासून दूर अशा ठिकाणी राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्य निर्माण करून त्या ठिकाणी नैसर्गिक खुल्या वातावरणात त्यांना ठेवून त्यांचे जतन करणे व त्यांची संख्या वाढविणे असे आहे.**

**भारतातील या यशस्वी योजनेचे जनक आहेत वनखात्याचे माजी संचालक श्री. कैलास सांकला. त्यांनी आपले संपूर्ण जीवन या कार्यासाठी वाहून घेतले.** व्याघ्र प्रकल्प योजना भारतात सर्वांत प्रथम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानात सुरू करण्यात आली. या प्रकल्पाव्यतिरिक्त भारतातील बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, वर्ल्ड वाईल्ड लाईफ फंड व इंटरनॅशनल युनियन फॉर द कॉन्सर्वेशन ऑफ नेचर अॅन्ड नॅचरल रिसोर्सेस यांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटना, त्याचप्रमाणे दि वर्ल्ड हेरिटेज कन्व्हेन्शन, मॅन अॅन्ड बायोस्फिअर, वर्ल्ड नॅशनल पार्क काँग्रेस इत्यादी मान्यवर संस्था वाघांच्या संरक्षण व संवर्धनासाठी आपापल्या परीने कार्य करीत आहेत.

वन्य जीव गणना, २००७ अनुसार महाराष्ट्रात १४८ वाघ व २९२ बिबटे होते तर वन्य जीव गणना, २००५ नुसार ते अनुक्रमे २६८ व ७१७ होते.

## सामाजिक वनीकरण

**रस्ते, लोहमार्ग, कालवे, नद्यांचे प्रवाह, शाळा, महाविद्यालये, शासकीय मालकीच्या मोकळ्या जागा, नापीक क्षेत्रे इत्यादी ठिकाणी वृक्षारोपण केले जाते. हा कार्यक्रम 'सामाजिक वनीकरण' यामध्ये समाविष्ट होतो.**

**इंधन व इमारतीसाठी लाकूड पुरविणे, जनावरांना चारा उपलब्ध करून देणे, शेतजमिनीचे संरक्षण, लोकांना करमणुकीसाठी उद्याने तयार करणे इत्यादी सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टे आहेत.**

वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनामध्ये उत्तम कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना प्रोत्साहनात्मक 'वनश्री पुरस्कार' महाराष्ट्र शासनाद्वारे दिले जातात. १९९२ पासून महाराष्ट्रात खासगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड व 'कुरण विकास योजना' अमलात आणलेली आहे. याचप्रमाणे जिल्ह्यांच्या ठिकाणी दहा हेक्टर क्षेत्रात 'स्मृतिवनांची' निर्मिती होणार आहे.

सामाजिक वनीकरणामुळे पर्यावरण संतुलन व ग्रामीण भागात रोजगार मिळण्यास मदत होईल. सामाजिक वनीकरण कार्यक्रम योग्य रीतीने राबविण्यास समाजाचा हातभार लागणे महत्त्वाचे आहे.

वीस कलमी कार्यक्रमांतर्गत २००८-०९ साली सामूहिक जमिनीवर सुमारे १०,५१५ हेक्टर व १,१९० कि.मी. क्षेत्रावर (रस्त्यालगतची जमीन) वनीकरण करण्यात आले असून खाजगी जमिनीवरील वृक्षारोपणासाठी सुमारे २.७३ कोटी रोपे पुरविण्यात आली आहेत. २००९-१० मध्ये नोव्हेंबर, २००९ अखेर सामूहिक जमिनीवर सुमारे ५,२८१ हेक्टर व ७३८ कि.मी. क्षेत्रावर वृक्षारोपण करण्यात आले असून खाजगी जमिनीवरील लागवडीकरिता १.५१ कोटी रोपे पुरविण्यात आली आहेत.

## वनशेती

शेतीबरोबरच वनांचीही लागवड म्हणजे वनशेती होय. उपलब्ध असलेल्या शेतजमिनीचा कमाल वापर व अधिक काळ शेती किंवा वनाखाली जमीन असणे हाच प्रमुख उद्देश वनशेतीचा आहे. यामध्ये वन उत्पादने, फळे व चारा यांचे उत्पन्न घेतले जाते. यामुळे वेगाने वाढणाऱ्या वनस्पतींची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्याचे कार्यक्रम तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आलेले आहेत. सुरुवातीच्या काळात वृक्ष लागवडीच्या क्षेत्रात पीक पट्टे घेतात. **अलीकडे सर्वत्र निलगिरी व सुबाभूळ यांची स्वतंत्र लागवड अनेक ठिकाणी आढळते.**

## वृक्षारोपण

वृक्षारोपण हे वीस कलमी कार्यक्रमात अंतर्भूत असून याची अंमलबजावणी प्रामुख्याने वन विभाग, म. व. वि. म. व सामाजिक वनीकरण संचालनालय यांच्यामार्फत करण्यात येते. या अंतर्गत २००८-०९ साली वन विभाग आणि म. वि. वि. म. यांच्यातर्फे एकत्रितरीत्या ४०.९५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. सर्व ११ मंडळासाठी मिळून ३५,००० चौ.कि.मी. क्षेत्राचे लक्ष्य निश्चित करण्यात आले तर ५५,९६७ चौ.कि.मी. क्षेत्र साध्य झाले आणि त्यावर ३९.२० कोटी रुपये खर्च करण्यात आले. तसेच म. व. वि. म. साठी २,३२० चौ.कि.मी. क्षेत्राचे लक्ष्य करण्यात आले तर २,३३२ चौ.कि.मी. साध्य झाले व त्यावर १.७५ कोटी रु. खर्च करण्यात आले.

## वनसंरक्षण

महाराष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या वनस्पतींच्या प्रकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. कारण राज्यामध्ये एकूण भौगोलिक क्षेत्रफळापैकी फक्त १७% क्षेत्र अरण्याखाली आहे. राष्ट्रीय वनधोरणानुसार राज्यामध्ये एकूण जमिनीच्या ३३.३३% अरण्ये असावयास पाहिजेत. यासाठीच **उपलब्ध असलेल्या वनस्पतींचे संरक्षण करणे आणि नवीन वनस्पतींचे संवर्धन करणे जरुरीचे आहे.**

**वनसंरक्षण करण्याची पुढील कारणांमुळे आवश्यकता :**

(१) आपल्या महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतावर पावसाचे प्रमाण भरपूर आहे तर दख्खनच्या पठारावर पावसाचे प्रमाण कमी-कमी होत जाते व बऱ्याच वेळा दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. म्हणून या प्रदेशात उपलब्ध असलेल्या वनस्पतींचे संरक्षण करावयास पाहिजे.

(२) काही वेळा पावसाळ्यात पूर येतात. त्यामुळेही वनस्पतींचे नुकसान होते व किनारपट्टीवर ताड-माडाची झाडे व मँग्रोव्ह (खाजण/तिवर) वनस्पतींचे भरतीच्या पाण्यामुळे नुकसान होते.

(३) महाराष्ट्रात काही वेळेस चक्रीय वादळे येतात, त्यामुळे वनस्पतींचे नुकसान झालेले आहे. उदाहरणार्थ, १९४० आणि १९४८ साली फार मोठी वादळे झाल्याने ठाणे जिल्हृयातील अरण्यातील हजारो सागवान वृक्ष उन्मळून पडले. १९६४ व २००५ साली रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हृयात अशाच तऱ्हेचा वादळाचा तडाखा बसलेला होता.

(४) अरण्यांमधील वन्य प्राणीदेखील वनस्पतींचा नाश मोठ्या प्रमाणावर करतात. विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली आणि मेळघाट अरण्यात हरिण, सांबर यांनी लहान वनस्पतींचे बरेच नुकसान केल्याचे आढळते.

(५) वनस्पतींवर विविध प्रकारची कीड पडते. ते रोगांना बळी पडतात. सागवान व सेमल यांसारख्या वृक्षांना कीटकांचाही त्रास होतो व त्याचा विपरीत परिणाम वृक्षांवर होतो. वनस्पतींच्या वितरणावर नैसर्गिक कारणांपेक्षा मानवाच्या अतिक्रमणाने फार मोठे नुकसान झाले आहे. अनेक प्रकारचे बहुमोल वृक्ष तोडण्यात आले. गवताळ कुरणे नष्ट करण्यात आली. याचा परिणाम मानवास भोगावा लागत आहे.

(६) अरण्यांमध्ये कित्येक वेळा आगी लागतात, त्यामुळे अनेक वृक्ष भक्षस्थानी पडतात. बऱ्याच वेळा वन्य प्राण्यांपासून संरक्षण करण्याकरिता, स्थलांतरित शेतीसाठी व अशाच कारणांमुळे जाळ केला जातो. त्यामुळेही अरण्यांचे नुकसान होते.

वरील सर्व कारणांपासून वनस्पतींचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने वनसंवर्धनाचे कार्य विविध स्तरांवर हाती घेतलेले आहे.

## वनसंवर्धन

वनसंवर्धनासाठी अनेक योजना अमलात आणण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये खालील महत्त्वाचे विकास प्रकल्प आहेत :

**(१) मृदसंधारण :** कित्येक वर्षे जमिनीचा गैरवापर, अरण्यांची निष्काळजीपणाने केलेली नासधूस, अनियंत्रितपणे गवताळ कुरणांचा केलेला वापर अशा अनेक कारणांमुळे जमिनीची धूप फार मोठ्या प्रमाणात झालेली आहे. जमिनीवरील वनस्पतींचे आच्छादन नष्ट झाल्यामुळे केवळ वनस्पतींचा ऱ्हास झालेला नाही, तर सुपीक जमीनही वाहून गेलेली आहे आणि पाण्याची पातळी



अधिकाधिक खोलवर जाऊन त्याचा शेतीवर अनिष्ट परिणाम झालेला आहे. **जमिनीची धूप थांबविण्यासाठी उपाय अमलात आणले पाहिजेत.**

**(२) झाडांची नवी लागवड :** या योजनेखाली **रोपवाटिका तयार करणे, इमारती लाकूड व सरपणाचे लाकूड पुरविणाऱ्या झाडांची** लागवड करणे यांचा समावेश आहे.

**(३) शेतांच्या सभोवती वन्य झाडांची लागवड :** ग्रामीण भागात जळाऊ लाकडाची मागणी पुरविणे ही एक गंभीर समस्या बनत आहे. या दृष्टीने **गावातील पडीक जमिनीत झाडे लावण्याची योजना** आखली जाते.

**(४) वनांचा विस्तार :** या योजनेखाली **रस्त्यांच्या दुतर्फा झाडांची लागवड** केली जाते. त्यामुळे रस्त्यावर सावली मिळते व झाडांच्या लाकडाचाही उपयोग होतो.

**✲ संत तुकाराम वनग्राम योजना :**

वनाच्या व वन्य जीवांच्या महत्त्वाबाबत जागृती निर्माण करणे, अवैध वृक्षतोड आणि अतिक्रमण इत्यादींपासून वनांचे संरक्षण करण्याकरिता २००६-०७ साली संत तुकाराम वनग्राम योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत जून, २००९ पर्यंत एकूण १२,६२८ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठित करण्यात आल्या आहेत. सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा आणि राज्य स्तरावरील तीन समित्यांना तसेच मराठवाड्यातील एका समितीला २००८-०९ साली 'संत तुकाराम वनग्राम योजना उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समिती' पुरस्कार देण्यात आला. या योजनेअंतर्गत २००७-०८ व २००८-०९ साली अनुक्रमे ५० लाख रुपये व ५९ लाख रुपये खर्च करण्यात आले तर २००९-१० करिता ६५ लाख रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

## अरण्यांचे महत्त्व

**(१) सम हवामान :** एखाद्या प्रदेशात वनस्पतींचे आच्छादन भरपूर प्रमाणात असल्यास सम हवामान निर्माण होते. तापमानाची विषमता कमी होते. सापेक्ष आर्द्रता वाढते. यामुळे हवेतील कोरडेपणा जवळजवळ नाहीसा होतो. **अरण्यांमुळे प्रदेशातील पावसाचे प्रमाण वाढते.** हवा स्वच्छ आणि निरोगी राहते. उन्हाळ्यात धुळीचा व वादळांचा त्रास होत नाही.

**(२) जमिनीची धूप मर्यादित :** प्रदेशावर वनस्पतींचे आच्छादन असल्यावर वृक्षांची मुळे आणि गवताळ कुरणे जमीन घट्ट धरून ठेवतात. वनस्पतींच्या पानावर मुसळधार पाऊस प्रथम पडतो. त्यामुळे त्याचा जोर कमी होतो. **जमिनीची धूप कमी होते.** बरेचसे पाणी जमिनीत मुरते. कोरड्या हवामानातदेखील जमिनीची फारशी धूप होत नाही.

**(३) पाणीपुरवठ्यात वाढ :** वनस्पतींच्या आच्छादनाचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे महाराष्ट्रासारख्या राज्यात पावसाचे पाणी जे फक्त चार महिन्यांत मिळते, त्यापैकी बरेचसे पाणी जमिनीत मुरते. नद्यांचे प्रवाह नियंत्रित होतात. विनाशकारी पुरांचे प्रमाण कमी होते. **भूमिगत पाण्याची पातळी वाढल्यामुळे वर्षातील उरलेल्या आठ महिन्यात झऱ्यांमार्फत नद्या, तलाव, विहिरी यांना पाणी मिळते.**

**(४) खते :** अरण्यांमध्ये वनस्पतींच्या पानांपासून **कंपोस्ट खत** मिळते. त्याचा कृषी उत्पन्नाच्या वाढीसाठी उपयोग होतो.

**(५) चारा व वैरण :** अरण्यांमधून **गुरे आणि जनावरांना आवश्यक असणारा चारा आणि वैरण उपलब्ध** होते.

**(६) जंगल व्यवसाय :** **अरण्यांमध्ये लाकूड तोडणे, कंदमुळे, फळे गोळा करणे व** विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांवर अनेक लोकांची गुजराण चालते.

**(७) आदिवासी लोकांचे वसतिस्थान :** अरण्यांमध्ये **अनेक आदिवासी लोक वास्तव्य** करतात. कातकरी, गोंड, भिल्ल, वारली वगैरे आदिवासी लोक अरण्यांमध्येच राहतात.

**(८) औद्योगिक लाकूड व इतर उत्पादनास आवश्यक कच्चा माल :** विविध प्रकारच्या वृक्षांपासून औद्योगिक लाकूड अरण्यांमधूनच मिळते. तसेच सॉ-मिल, आगपेट्या, प्लायवूड, कागद, फायरबोर्ड वगैरेंसाठी आवश्यक कच्चा माल अरण्यातूनच उपलब्ध होतो.

**(९) वन्य प्राण्यांचे वसतिस्थान :** जंगलामध्ये वन्य प्राणी व अनेक प्रकारचे पक्षी राहतात.

अशा रीतीने मानवास अरण्याचे महत्त्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या आहे. शेतीव्यवसाय अप्रत्यक्षरीत्या अरण्यांवरच अवलंबून आहे; कारण त्यामुळे जमिनीची धूप थांबते. पिके घेतली जातात. पिकांना आवश्यक असणारा पाणीपुरवठा झऱ्यांमुळे होतो.

## महाराष्ट्रातील वने

| अरण्ये | प्रदेश | वृक्षांचे स्वरूप | वृक्षांचे प्रकार | आर्थिक महत्त्व |
|---|---|---|---|---|
| (१) उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये | २०० सें. मी. पेक्षा जास्त पर्जन्य असणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडीचा परिसर. | घनदाट वनस्पतीचे आच्छादन. उंची ४५ ते ६० मी. कमी उंचीच्या वनस्पतीही दृश्यमान. | नागचंपा, पांढरा सिडार, फणस इत्यादी. तसेच बांबू व कळकांचे विविध प्रकार. | कठीण लाकडामुळे टिंबरच्या वापरास मर्यादा, बरीच वृक्षतोड. |
| (२) उष्ण कटिबंधीय निमसदाहरित अरण्ये | २०० सें मी. पेक्षा कमी पर्जन्य असणाऱ्या किनारपट्टीवर सलग पट्टा. घाटमाथ्यावर आंबोली, लोणावळा, इगतपुरी परिसर. | कमी उंची, पानगळीचा हंगाम वेगवेगळा, पानझडी वृक्षांचे अस्तित्व. | किंडल, रानफणस, नाणा, कदंब, शिसम, बिबळा इत्यादी. | आर्थिकदृष्ट्या उपयुक्त उदा. आईन, नाणा, वावळी. |
| (३) उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये | २५० सें. मी. पेक्षा जास्त पर्जन्य असणाऱ्या महाबळेश्वर, माथेरान, भीमाशंकर व गाविलगड टेकड्या. | सदाहरित वृक्ष, त्याची मोठ्या प्रमाणात तोड, लहान-लहान पट्टे अस्तित्वात. | जांभूळ, हिरडा, अंजन, आंबा, बेहडा, कारवी इत्यादी. | हिरडा वृक्षाचे मजबूत लाकूड, अन्य वृक्षांचा उपयोग, मधुमक्षिकाचे पालन, लघुउद्योगधंदा. |
| (४) आर्द्र पानझडी किंवा मान्सून अरण्ये | १२० ते १६० सें. मी. पर्जन्य पडणाऱ्या पूर्व विदर्भ, मेळघाट, शंभू महादेव, हरिश्चंद्र-बालाघाट व सातमाळा डोंगरांचा पश्चिम भाग. | पूर्व विदर्भात 'आलापल्ली अरण्ये' प्रसिद्ध पानझडी अरण्ये. मध्यम घनदाट वृक्ष, अधूनमधून सदाहरित वृक्ष. उंची ३० ते ४० मीटर. | प्रमुख सागवानाशिवाय आईन, हिरडा, बिबला, लेंडी, येरूल, किंडल, कुसुम, आवळा, शिसम, सिरस इत्यादी बांबूची वने. | आर्थिकदृष्ट्या अनेक वृक्ष महत्त्वाचे. सागवान वृक्ष चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामधील 'आलापल्ली अरण्ये' भारतात प्रसिद्ध. |
| (५) रूक्ष पानझडी अरण्ये | ८० ते १२० सें. मी. पर्जन्य पडणाऱ्या सातपुडा, अजिंठा डोंगररांगा, पठारावरील कमी उंचीच्या टेकड्या. | सलग पट्टे नाहीत. उंच व कमी उंचीचे वृक्ष, गवताळ प्रदेश पावसाळ्यात हिरवीगार वनश्री. कोरड्या हवामानात बरेचसे वृक्ष पर्णहीन. | सागवान, धावडा, शिसम, तेंदू, पळस, बीजसाल, लेंडी, हेडी, बेल, खैर, अंजन इत्यादी. | अनेक वनस्पतींचा टिंबर म्हणून वापर जळण. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व जमीन लागवडीखाली. |
| (६) काटेरी अरण्ये | ८० सें. मी. पेक्षा कमी पर्जन्य असणाऱ्या पठारावर मध्य महाराष्ट्रात खोऱ्यांचा परिसर, तसेच डोंगररांगा, पुणे, सातारा, सांगलीचा पूर्व भाग, सोलापूर, मराठवाडा व विदर्भ. | अधूनमधून उत्तम वृक्ष, बऱ्याचशा वृक्षांचा नाश. पाण्याच्या उपलब्धतेनुसार हिरवीगार वनश्री. कोरड्या हवामानात काटेरी वनस्पती. | बाभूळ, खैर, हिवर, निंब. | जळण, टॅनिन. |



■ **कोकणातील अरण्ये :**

**कोकणी वृक्ष** : नारळी, पोफळी, बिब्बा, मुचकुंद, भोपा, तिवर.

**झाडे-झुडपे** : वेकळी, निर्गुडी, टाकळी, करवंदी तसेच काठे सांबर, फड्या निवडुंग.

**औषधी वनस्पती** : सर्पगंधा (रक्तदाब विकार), धावल (दमा विकार), सदंती, कुडा, मुरुडशिंग, शेंडवेल, कदंब, ब्रह्मी (बहुगुणी).

**बांबूची वने** : काटस बांबू, माणवेल, बांबू, चिवा इत्यादी. किनाऱ्याची खाजण अरण्ये — काजळी, तिवर, मारुडी, भोपा, आंबोरी इत्यादी. उपयोग — जळण, टॅनिन, कातडी कमाविणे, माशाची जाळी धुणे.

■ **घाटावरील अरण्ये :**

**वृक्ष** : जांभूळ, अंजनी, पारजांभूळ, हिरडा, काटे कुंभेल, कोळम, भोमा, बकुळ, आंबा, शेंद्री, रानफणस, काटकुरा, तेजपात, सुरुंगी इत्यादी वृक्ष माथेरान, महाबळेश्वर परिसरात, तर कोयनेच्या खोऱ्यात माकड लिंबू, येवती, कर्पा, कुसुम इत्यादी. पाचगणी परिसरात पिंपरनेल, कानफुटी; वाई घाटात भारतीय लव्हेंडर, रानमिखले, डोंगरी मिरची, मिरवेल इत्यादी.

## बहुपर्यायी प्रश्न

(१) कोकणामधील उंचावरील प्रदेशातील जांभा जमिनीवर .......... पाहावयास मिळतात.
(अ) खाजण अरण्ये (ब) वर्षारण्ये (क) पानझडी अरण्ये (ड) समशीतोष्ण अरण्ये

(२) उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये .......... पाऊस पडणाऱ्या प्रदेशात आढळतात.
(अ) ५० सें. मी. पेक्षा कमी (ब) ५० ते १०० सें. मी.
(क) १०० ते १५० सें. मी. (ड) २०० सें. मी. पेक्षा जास्त

(३) विदर्भाच्या पूर्व भागात असलेल्या वनस्पतींच्या प्रदेश .......... या नावाने ओळखला जातो.
(अ) आलापल्ली अरण्ये (ब) पानझडी अरण्ये (क) चिरोली अरण्ये (ड) काटेरी अरण्ये

(४) आर्द्र पानझडीच्या अरण्यात .......... ही प्रमुख वनस्पती आहे.
(अ) पाईन (ब) सागवान (क) बांबू (ड) बाभूळ

(५) .......... सारख्या वनस्पतींचा उपयोग कातनिर्मितीसाठी करतात.
(अ) हिरडा (ब) जांभूळ (क) खैर (ड) शिसम

(६) काटेरी अरण्यात .......... ही सर्वत्र आढळणारी वनस्पती आहे.
(अ) नागचंपा (ब) चंदन (क) तेंदू (ड) बाभूळ

(७) महाराष्ट्रात .......... जिल्ह्यात अरण्याची टक्केवारी जास्त आहे.
(अ) सिंधुदुर्ग (ब) गडचिरोली (क) औरंगाबाद (ड) सोलापूर

(८) महाराष्ट्रात चंद्रपूर जिल्ह्यात .......... हे सर्वांत मोठे राष्ट्रीय उद्यान आहे.
(अ) ताडोबा (ब) पेंच (क) नवेगाव (ड) बोरिवली

### उत्तरे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | ब | (२) | ड | (३) | अ | (४) | ब |
| (५) | क | (६) | ड | (७) | ब | (८) | अ |

(९) मेळघाट अभयारण्य .......... साठी राखीव आहे.

(अ) काळवीट (ब) गवा (क) व्याघ्र (ड) पक्षी

(१०) कोल्हापूर जिल्ह्यात .......... येथे वनोद्यान आहे.

(अ) पन्हाळा (ब) आंबोली (क) अजंठा (ड) तोरणमाळ

(११) गोंदिया जिल्ह्यात .......... हा वन्य पशू-पक्ष्यांनी समृद्ध असा प्रदेश आहे.

(अ) चपराळा (ब) तानसा (क) नवेगाव (ड) यावल

(१२) महाराष्ट्रात चंद्रपूर जिल्ह्यात .......... ठिकाणी कागदाची मोठी गिरणी आहे.

(अ) खोपोली (ब) बल्लारपूर (क) नवापूर (ड) सोनगड

(१३) महाराष्ट्रातील कोरड्या हवामानामध्ये .......... आढळतात.

(अ) उष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये (ब) उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये

(क) निमसदाहरित अरण्ये (ड) काटेरी अरण्ये

(१४) .......... वर काही ठिकाणी उपउष्ण सदाहरित अरण्ये आहेत.

(अ) कोकण (ब) घाटमाथा (क) मावळ (ड) पर्जन्यछायेचा प्रदेश

(१५) महाराष्ट्र पठारावर .......... पाहावयास मिळतात.

(अ) पानझडी अरण्ये (ब) समशीतोष्ण अरण्ये (क) खाजण अरण्ये (ड) वर्षारण्ये

(१६) महाराष्ट्रात .......... मध्ये खाजण अरण्ये आहेत.

(अ) खानदेश (ब) पूर्व विदर्भ

(क) खाड्यांचा दलदलीचा प्रदेश (ड) मराठवाडा

(१७) पानझडीची अरण्ये व सदाहरित अरण्ये यांच्या संक्रमण अवस्थेत .......... अरण्ये आहेत.

(अ) सदाहरित (ब) खाजण (क) काटेरी (ड) निमसदाहरित

(१८) उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्ये .......... परिसरात आढळतात.

(अ) महाबळेश्वर (ब) पन्हाळा (क) औरंगाबाद (ड) सावंतवाडी

(१९) खाजण वनस्पतीपासून .......... उपलब्ध होते.

(अ) कात (ब) तेल (क) डिंक (ड) इंधन

(२०) महाराष्ट्रात आलापल्ली अरण्ये .......... मध्ये आढळतात.

(अ) कोकण (ब) चंद्रपूर व गडचिरोली (क) पश्चिम घाट (ड) सातपुडा पर्वत

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (९) | क | (१०) | अ | (११) | क | (१२) | ब | (१३) | ड | (१४) | ब |
| (१५) | अ | (१६) | क | (१७) | ड | (१८) | अ | (१९) | ड | (२०) | ब |



(२१) वार्षिक पर्जन्य .......... असणाऱ्या प्रदेशात उष्ण कटिबंधीय रूक्ष पानझडी अरण्ये आढळतात.

(अ) १२० ते १६० सें. मी. (ब) ८० ते १२० सें. मी.

(क) २५० सें. मी. पेक्षा जास्त (ड) ८० सें. मी. पेक्षा कमी

(२२) .......... मध्ये अरण्ये बरीच कमी आहेत.

(अ) कोकण (ब) पश्चिम घाट (क) मराठवाडा (ड) पूर्व विदर्भ

(२३) महाराष्ट्रात .......... अरण्यासाठी विशेष प्रसिद्ध आहे.

(अ) प्रमुख नद्यांच्या उगमाजवळचा प्रदेश (ब) पर्जन्यछायेचा प्रदेश

(क) पठारावरील डोंगररांगा (ड) मध्य महाराष्ट्र

(२४) टिंबरमध्ये सर्वांत मौल्यवान लाकूड .......... आहे.

(अ) खैर (ब) शिसम (क) बाभूळ (ड) सागवान

(२५) पेंच राष्ट्रीय उद्यान .......... जिल्ह्यात आहे.

(अ) नागपूर (ब) गोंदिया (क) ठाणे (ड) गडचिरोली

(२६) पक्षी अभयारण्यासाठी .......... प्रसिद्ध आहे.

(अ) देऊळगाव-रेहेकुरी (ब) मेळघाट (क) कर्नाळा (ड) किनवट

(२७) माळढोक अभयारण्य .......... साठी प्रसिद्ध आहे.

(अ) व्याघ्र (ब) पक्षी (क) काळवीट (ड) गवा

(२८) येलदरी वनोद्यान .......... जिल्ह्यात आहे.

(अ) औरंगाबाद (ब) धुळे (क) परभणी (ड) गडचिरोली

(२९) अमरावती जिल्ह्यात .......... वनोद्यान आहे.

(अ) तोरणमाळ (ब) उजनी-भिगवण (क) चिखलदरा (ड) रामटेक

## उत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२१) | ब | (२२) | क | (२३) | अ | (२४) | ड | (२५) | अ |
| (२६) | क | (२७) | ब | (२८) | क | (२९) | क | | |

# ६. खनिजसंपत्ती

## (अ) महाराष्ट्रातील खनिजसंपत्ती

महाराष्ट्र हे खनिजसंपत्तीकरिता फारसे प्रसिद्ध राज्य नाही. महाराष्ट्रातील एकूण क्षेत्रफळापैकी फक्त १२.३३% क्षेत्रात खनिजसंपत्ती आढळते. राज्यातील बरीचशी खनिजसंपत्ती बेसॉल्ट खडकाच्या बाह्य क्षेत्रात विशेषतः स्फटिकयुक्त व रूपांतरित खडकात पाहावयास मिळते. महाराष्ट्रात खनिज दगडी कोळशाव्यतिरिक्त मँगनीज व लोह खनिज बऱ्याच प्रमाणात आढळते. याशिवाय बॉक्साइट, चुनखडी, इल्मेनाईट, क्रोमाईट व बांधकामाचे खडक यांचे वैशिष्ट्यपूर्ण साठे महाराष्ट्रात आहेत तर डोलोमाईट, कायनाईट, सिलिमनाईट, सिलिकायुक्त वाळू व काही उद्योगधंद्यांत वापरल्या जाणाऱ्या मृत्तिका यांचे अल्प प्रमाणात साठे आहेत. याशिवाय बुलफ्रॅम, बराइट, तांबे, शिसे व फेस्त, फेल्डस्पार, क्वार्टझ् (गारगोटीचे स्फटिक), सोपस्टोन, ॲसबेस्टॉस व अर्ध मौल्यवान स्फटिक इत्यादींचे साठे महाराष्ट्रात आहेत.

### महाराष्ट्रातील खनिजसंपत्तीची मुख्य क्षेत्रे

**(अ) पूर्व विदर्भ : चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर व यवतमाळ जिल्हे.**

**(ब) कोकण व दक्षिण महाराष्ट्र : सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व कोल्हापूर जिल्हे.**

या दोन क्षेत्रांत प्रामुख्याने महाराष्ट्राची खनिजसंपत्ती केंद्रित झालेली आहे. महाराष्ट्रात प्रमुख खनिजांच्या उत्खननासाठी २८५ खनिज पट्टे व गौण खनिजांचे २०३ खनिजपट्टे आहेत.

### खनिजसंपत्ती

महाराष्ट्रात पुढील खनिजे आढळतात :

| | | | |
|---|---|---|---|
| (१) मँगनीज | (२) लोहखनिज | (३) बॉक्साइट | (४) क्रोमाईट |
| (५) चुनखडी | (६) डोलोमाईट | (७) कायनाईट व सिलिमनाईट | (८) इतर खनिजे |

### मँगनीज

भारतात मँगनीजचा साठा सुमारे १६१ दशलक्ष टन असून यापैकी ४०% साठा एकट्या महाराष्ट्रात आहे. **मँगनीजचे प्रमुख साठे भंडारा व नागपूर जिल्ह्यांमध्ये असून त्या खालोखाल सिंधुदुर्ग जिल्ह्याचा उल्लेख केला जातो.**

**भंडारा व गोंदिया :** भंडारा जिल्ह्यातील मँगनीजचे साठे हे भारतातील मोठ्या साठ्यांपैकी एक आहेत. ते गोंडाइट मालेच्या खडकाशी **निगडित असून त्यामध्ये सिलोमिलोन हे मुख्य खनिज आढळते.** विलग झालेले धातुपाषाणाचे लहान-मोठे दगड उतारावरून घरंगळत येऊन किंवा विशिष्ट क्षेत्रात एकत्रित आल्यामुळे तयार होणारे साठेदेखील आढळतात. **प्रमुख साठे तुमसर तालुक्यात** डोंगरी, **बुद्रुक, कुरमुडा, सीतासावंगी व चिखलाजवळ आहेत.** इतर लहान-लहान साठे तेरा ठिकाणी विखुरलेले आहेत.

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यात मँगनीजचा पट्टा **सावनेर तालुक्यातील खापा या गावापासून सुरू होतो तो पूर्वेस रामटेक तालुक्यात जाऊन भंडारा जिल्ह्यातील भंडारा तालुक्यापर्यंत आहे. मँगनीजचा पट्टा पुढे मध्य प्रदेशात जातो. नागपूर जिल्ह्यात कांद्री, मनसळ, रामडोंगरी, कोदेगाव, गुमगाव, पारशिवनी व खापा भागात मँगनीजचे साठे आहेत. वैशिष्ट्यपूर्ण मँगनीजचा पट्टा सावनेर-रामटेक** आहे.


**पूर्व विदर्भात मँगनीजच्या काही महत्त्वाच्या खाणी गुमगाव, रामडोंगरी, कोदेगाव, मनसळ, कांदी, जुनेवाणी, माटक, बेलडोंगरी, गोगूलडोह, मॉंट्री, पारसिवनी, पाली, चिखला, डोंगरी बुद्रुक, सीतासावंगी, इदरबुची या ठिकाणी आहेत.**

या प्रदेशातील मँगनीजचे उत्पादन उघड्या खाणीतून व मानवी कष्टाने घेतले जाते. **कन्हान व तुमसर येथे फेरो-मँगनीज बनविण्याची संयंत्रे** उभारण्यात आलेली आहेत. निम्न प्रतीचे मँगनीज खनिज हे भिलाई पोलाद कारखान्यात वापरले जाते तर उच्च प्रतीच्या मँगनीजच्या खनिजाचा काही भाग निर्यात केला जातो.

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात **सावंतवाडी व वेंगुर्ला परिसरात** जांभा खडकात विस्कळीतपणे विखुरलेल्या धोंड्याच्या स्वरूपात मँगनीज आढळते. हा धातुपाषाण **हलक्या श्रेणीचा असून देगवे, आडाळी, कालपो** जवळ आढळतो. **सावंतवाडी तालुक्यातील डिंगणे, नेतडे, सासोली** तसेच **कणकवली तालुक्यात फोंडा** येथे मँगनीजचे साठे आहेत.









**महाराष्ट्र : खनिजसंपत्ती - १**

| | | |
|---|---|---|
| (i) | बॉक्साइट : | महाराष्ट्रात बॉक्साइटचे प्रमुख साठे कोकणात सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्ह्यात आहे. अल्प प्रमाणात कोकणात रायगड व ठाणे जिल्ह्यातही बॉक्साइटचे साठे आहेत. |
| (ii) | मँगनीज : | महाराष्ट्रात मँगनीजचे प्रमुख साठे विदर्भात भंडारा व नागपूर जिल्ह्यात आहेत. त्या खालोखाल कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. |
| (iii) | लोहखनिज : | महाराष्ट्रात लोहखनिजाचे प्रमुख साठे विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर या जिल्ह्यांमध्ये तसेच कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. - १ |
| (iv) | तांबे : | अल्प साठे विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात आहेत. - १ |
| (v) | क्रोमाईट : | भंडारा, गोंदिया, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात क्रोमाईटचे साठे आहेत. |

**नकाशा क्र. ६.१ : महाराष्ट्र - खनिजसंपत्ती - १**

### लोहखनिज

भारतात लोहखनिजाचा अंदाजे साठा १३४६ कोटी टनांचा आहे. यापैकी २०% लोहखनिज महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रात लोहखनिजाचे महत्त्वाचे साठे चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आहेत. उत्तम प्रकारचे खनिज **धारवाडी संघाच्या खडकाशी निगडित** असते. यामधील हेमेटाईट हे महत्त्वाचे खनिज आहे. ते उघड्या खाणीतून काढले जाते. **टॅकोनाईट व जांभा खडकात लोहखनिज आढळते. चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये टॅकोनाईट आणि रायगड, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व सातारा या जिल्ह्यांमध्ये जांभा खडकात लोहखनिज आढळते.**




**महाराष्ट्र : खनिजसंपत्ती - २**

| | | |
|---|---|---|
| (i) | **ॲसबेस्टॉस :** | पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यात आहेत. |
| (ii) | **जिप्सम :** | पुणे व सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिप्समचे साठे आहेत. |
| (iii) | **डोलोमाईट :** | विदर्भात नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ व गडचिरोली; कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात डोलोमाईट आढळते. |
| (iv) | **चुनखडी :** | विदर्भात यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली; कोकणात सिंधुदुर्ग व रत्नागिरी तर पश्चिम महाराष्ट्रात सांगली, सातारा व अहमदनगर जिल्ह्यात चुनखडीचे साठे आहेत. |
| (v) | **चिनी माती :** | प्रामुख्याने रत्नागिरी व कोल्हापूर जिल्ह्यात आढळते. |

**नकाशा क्र. ६.२ : महाराष्ट्र - खनिजसंपत्ती - २**

**पूर्व विदर्भ :** या विभागात जलजन्य खडकात लोहखनिज आढळते. **लोहारा, असोला, देवळगाव, बिआसी, पिंपळराव, फुसेर, रत्नपूर, सुरजागड, वाढवी, दामकोट, मातबरसी, कच्चा टेकडी, मुखारा, हितपार, गुंदावास, मेटा, पोयारकोटी, घांग्रामेटा इत्यादी ठिकाणी लोहखनिजाचे साठे आहेत. मखीला, मेंडेडोर, मुन्हेगाव, विठालगाव, लंकाछाह आणि पाडूर या भागातदेखील लोहखनिजाचे साठे** सापडले आहेत.

**येथील लोह पाषाण स्थूल असून यामध्ये ६१ ते ७१%** लोह असते. सुरजागड विभागात अंदाजे २७५ दशलक्ष टन लोहखनिजाचा साठा आहे. गडचिरोली जिल्ह्यात **सुरजागड भागातील साठे चांगल्या प्रतीचे आहेत.** ते बिडाच्या लोखंडाच्या कारखान्यात पुरेसे आहेत.



**चंद्रपूर :** खनिजसंपत्तीदृष्ट्या महाराष्ट्रात समृद्ध आहे. **चिमूर तालुक्यात पिंपळगाव, भिसी व असोला (गुंजेवाही); ब्रह्मपुरी** तालुक्यात रत्नापूर व **लोहार डोंगरी** येथे लोहखनिजाच्या खाणी आहेत.

**गडचिरोली :** चंद्रपूरप्रमाणेच खनिजसंपत्तीने विपुल असलेला जिल्हा म्हणजे गडचिरोली होय. गडचिरोली व देऊळगावचा परिसर लोहखनिजासाठी प्रसिद्ध आहे. याचप्रमाणे **सुरजागड, भामरागड, दमकोट व पडवी** भागात उच्च प्रतीचे लोहखनिज आहे.

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यात अग्निजन्य खडकात लोहखनिज सापडते. **गोरेगाव तालुक्यात आंबेतलाव व खुर्सीपार येथे मॅग्नेटाईट प्रकारचे लोहखनिज आढळते.** येथील साठे ६.२ दशलक्ष टनाचे असून यामध्ये ५४% लोह आढळते.

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात **वेंगुर्ला तालुक्यात रेडी, टाका, असोली, आजगाव, शिरोडा व नानोसा तर सावंतवाडी तालुक्यात** तळोणे, गुल्दावे, किन्हाळा, कवठाणी, सताडी, सातोली, अरीस, ठाकूरवाडी, नळेवाडी, मातोंड, ठबोले व तेंडोली या ठिकाणी लोहखनिजाचे साठे आहेत.

रेडीनजीक अरबी समुद्राच्या सन्मुख असलेल्या बुटक्या टेकड्यात २ कि. मी. लांबीपर्यंत लोहखनिजाचे साठे पसरलेले आहेत. येथील खनिज पाषाणस्थूल सच्छिद्र व भुसभुशीत प्रकारचे असून ते पट्टेदार हेमेटाईट-क्वार्ट्झाइटसोबत आढळते. **रेडी व बांदा या भागातील लोहखनिज धारवाड संघातील** खडकात असून यावर जांभा खडकाचा थर आहे. **यामध्ये ५०% लोह** आहे. उपलब्ध साठ्यांमध्ये जास्तीतजास्त लोहखनिज भुकटीच्या स्वरूपात सापडते. **रेडी येथील लोहखनिज साठे महत्त्वाचे आहेत.**

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात **शाहूवाडी व राधानगरी तालुक्यात** लोहखनिजाचे साठे आहेत.

## बॉक्साइट

**जांभा खडकात बॉक्साइटचे साठे असतात. बॉक्साइटचा उपयोग मुख्यत्वेकरून ॲल्युमिनिअमनिर्मितीसाठी केला जातो.** सुमारे ८०% बॉक्साइट हे ॲल्युमिनिअमसाठी वापरले जाते. उरलेले बॉक्साइट हे सिमेंट, लोह व पोलाद उत्पादनासाठी वापरतात. भारतातील सुमारे २१% बॉक्साइटचे उत्पादन महाराष्ट्रात होते.

**महाराष्ट्रात कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, सांगली व सातारा या जिल्ह्यांमध्ये बॉक्साइटचे साठे आहेत.** भरपूर पर्जन्य, उष्ण व दमट हवामान असणाऱ्या जांभा खडकाच्या प्रदेशात बॉक्साइटचे साठे आहेत. राज्यात बॉक्साइटचे सुमारे ६८ दशलक्ष साठे आहेत व ते **उच्च प्रतीचे** आहेत.

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात **शाहूवाडी, राधानगरी व चंदगड तालुक्यात** बॉक्साइटचे साठे आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात **बॉक्साइटचे महत्त्वाचे साठे राधानगरी, गारगोटी, वाकी, रांगेवाडी, उदगिरी, धनगरवाडी, मोगलगड, मानबेट, नागरतासवाडी व** कासारवाडा येथे आहेत. **कोल्हापूर जिल्ह्यात बॉक्साइट हे इंडियन ॲल्युमिनिअम कंपनीच्या बेळगाव येथील ॲल्युमिनिअम कारखान्यात धातुनिर्मितीकरिता उपयोगात आणले जाते.**

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील बॉक्साइटचे साठे प्रामुख्याने **मुरूड, रोहा व श्रीवर्धन तालुक्यात केंद्रित झालेले आहेत.**

(अ) **मुरूड तालुक्यात** सुणेगाव, कशिद, सावरोली, उसरोली, सारवे, देसते, डोहणे, चिखलगाव, महालोर, बोराशी, वांझाली व करंबळीवाडी येथे बॉक्साइटचे साठे आहेत.

(ब) **रोहा तालुक्यात** गोपाळवट, भासगवणी बोरहण, तांबेवाडी, केळनर व खापरी येथे बॉक्साइट आढळते.

(क) **श्रीवर्धन तालुक्यात** बावे, भारखेड, पुनेखेली, खुजारे, देवकुळ, मानेरी, वेळास, आदगांव, सायगांव, कुरवडे, वाकलघर, शेखाडी, कांदीली व डांगोरी येथेही बॉक्साइटचे साठे आहेत.

रायगड जिल्ह्यात बॉक्साइटचे सुमारे १० दशलक्ष टन साठे आहेत. **येथील बॉक्साइट हे रासायनिक व धात्विक प्रतीचे असून** त्यात **ॲल्युमिनिअमचे प्रमाण ४५ ते ५२%** आहे. रायगड जिल्ह्यातील काही बॉक्साइट निर्यात केले जाते.

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात सालसेट बेट व तुगार टेकड्यांच्या प्रदेशात बॉक्साइटचे साठे आहेत. येथील अंदाजित साठे १.३ दशलक्ष टनांचे **असून** ते कनिष्ठ प्रतीचे आहेत.


**मुंबई उपनगर :** बोरिवली, जोगेश्वरी व गोरेगाव भागातही बॉक्साइटचे साठे आहेत.

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात **आंबोली घाटाच्या परिसरात बॉक्साइटचे** साठे आहेत.

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात **दापोली व मंडणगड** तालुक्यातही बॉक्साइट सापडते. येथील अंदाजे साठे ३.२५ दशलक्ष टन आहेत.

**सातारा :** या जिल्ह्यातील साठे अल्प प्रमाणात व कनिष्ठ प्रतीचे असल्याने विशेष महत्त्वाचे नाहीत.

**सांगली :** सांगली जिल्ह्यात शिराळा तालुक्यात अल्प प्रमाणात बॉक्साइट आहे.




**महाराष्ट्र : खनिजसंपत्ती - ३**

(i) **अभ्रक :** पूर्व विदर्भात अभ्रकाचे साठे गडचिरोली जिल्ह्यात आहेत.

(ii) **इलमेनाईट :** रत्नागिरी जिल्ह्यात इलमेनाईटचे साठे आहेत.

(iii) **बेराईट्स :** प्रामुख्याने चंद्रपूर जिल्ह्यात आहेत.

(iv) **गारगोटी :** गारगोटीचे साठे सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

(v) **सिलिकायुक्त वाळू :** सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात सिलिकायुक्त वाळू आढळते.

**नकाशा क्र. ६.३ : महाराष्ट्र - खनिजसंपत्ती - ३**

## क्रोमाईट

धातू उद्योग, किमती खड्यावर प्रक्रिया करणारे उद्योग व रसायन उद्योगात क्रोमाईटचा उपयोग होतो. **भारतातील एकूण क्रोमाईटच्या साठ्यांपैकी सुमारे १०% साठा (५ कोटी टन) महाराष्ट्रात असून ते भंडारा, गोंदिया, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये आहेत.** सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली, जानोली व बागदा; भंडारा या जिल्ह्यांमध्ये मौनी तर नागपूर जिल्ह्यात टाका येथे क्रोमाईटचे साठे आहेत.



**तक्ता क्र. ६.१ : महाराष्ट्रातील जिल्हावार प्रमुख खनिजसंपत्तीचे वितरण**

| जिल्हे | खनिजसंपत्ती |
|---|---|
| (१) भंडारा - गोंदिया | मॅंगनीज, लोहखनिज, क्रोमाईट, कायनाईट, क्वार्टझाईट, सिझियम, व्हॅनेडियम. |
| (२) नागपूर | मॅंगनीज, लोहखनिज, चुनखडी, डोलोमाईट, जांभा, संगमरवर, टंगस्टन, गॅलिअम, अभ्रक, रेतीवाळू. |
| (३) चंद्रपूर | लोहखनिज, चुनखडी, ग्रॅनाईट, वालुकाश्म, बराईट, तांबे. |
| (४) गडचिरोली | लोहखनिज, चुनखडी, डोलोमाईट, ग्रॅनाईट, तांबे. |
| (५) कोल्हापूर | बॉक्साइट, जांभा, बराइट, लोहखनिज, चिनी माती, सिलिका. |
| (६) सिंधुदुर्ग | मॅंगनीज, लोहखनिज, क्रोमाईट, चुनखडी, डोलोमाईट, सिलिकामय, वाळू, ग्रॅनाईट, गेरू, शिरगोळ. |
| (७) रत्नागिरी | बॉक्साइट, क्रोमाईट, इल्मेनाईट, शिरगोळा, डोलोमाईट, सिलिका, वाळू, बराईट, खनिज तेल, कुरूंद. |
| (८) रायगड | बॉक्साइट, मीठ, खनिज जल, लोहखनिज (तुरळक), खनिज तेल, मिठागरे. |
| (९) ठाणे | बॉक्साइट, मीठ, खनिज जल, बांधकाम दगड, रेती. |
| (१०) सांगली | बॉक्साइट, चुनखडी. |

## चुनखडी

चुन्याचा मूलभूत पदार्थ चुनखडक आहे. बांधकामात जोडण्यासाठी लागणारा चुना हा चुनखडक भाजून तयार केला जातो. भरपूर प्रमाणात विखुरलेल्या मातीत चुनखडीच्या रूपात असलेल्या कंकरापासून चुना उपलब्ध होतो. ट्रॅव्हरटीन किंवा काल्फ टुफा, सागरातील शंख-शिंपले, अर्वाचीन काळातील पोवळ्यांचा चुनखडक भट्टीत भाजून चुना तयार करतात. योग्य प्रकारचा टुफा, मृण्मय चुन्याचा खडक किंवा बहुधा त्याचे खडक, चुनखडक व माती योग्य प्रमाणात मिसळून पोर्टलॅंड सिमेंट तयार करतात.

महाराष्ट्रात भारताच्या चुनखडकाचा ९% साठा व उत्पादन फक्त २% आहे. महाराष्ट्रात चुनखडीचे अंदाजे साठे ४००० दशलक्ष टन इतके आहेत. महाराष्ट्रात चुनखडीचे साठे बऱ्याच ठिकाणी आढळत असून ते विविध प्रकारच्या भूवैज्ञानीय प्रस्तर समूहाशी निगडित आहेत. **महाराष्ट्रात चुनखडीचे साठे प्रामुख्याने यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात विंध्ययन खडकात आहेत. अंतर-ट्रॅपी थरामधील चुनखडी तसेच कंकर हे नागपूर, नांदेड, धुळे, नंदुरबार, पुणे, नगर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व सातारा या जिल्ह्यांमध्ये आढळतात.**

**चंद्रपूर :** बारीक कणांचा आणि करड्या रंगाचा चुनखडक चंद्रपूर जिल्ह्यात **वरोडा तालुक्यात** आलेवाही रेल्वे स्टेशनजवळ पुरुकेपार, कोंडारा, कामागोहन, मरथा आणि नीलजाईजवळ चुनखडी सापडते. तसेच राजुरा तालुक्यात सांगोडा, अवरपूर, चांदूर, गंगापूर-बाकर्डी, नारंदा-पिप्री-वानुजा येथे चुनखडकाचे पट्टे आहेत. **चंद्रपूर जिल्ह्यात चुनखडीचे अंदाजे साठे १०२६ दशलक्ष टन आहेत.**

**यवतमाळ : यवतमाळ जिल्ह्यात चुनखडीचे साठे सर्वांत जास्त असून त्याचे अंदाजे साठे २९०० दशलख टन आहेत.** राजूर स्टेशनजवळ मांजरी व वांजरी येथे साधारणपणे बऱ्यापैकी चुनखडीचे साठे आहेत. मुकटवन, शिंदोला, चानकापरमडोह ठिकाणी चुनखडीचा साठा आहे.

**अहमदनगर :** अहमदनगर जिल्ह्यात ७५% कॅल्शिअम कार्बोनेट असलेला टुफा व **कामूर, कंडुर व खांडेरावाडी येथे** आढळतो.

**इतर जिल्हे :** धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील चुनखडीचे साठे कनिष्ठ दर्जाचे असून अंदाजे साठे ४० दशलक्ष टन आहेत. त्याचप्रमाणे नांदेड, पुणे व सांगली या जिल्ह्यांमध्ये कनिष्ठ दर्जाचे चुनखडीचे साठे आहेत. याचा उपयोग प्रामुख्याने चुनाभट्टीत होतो. नांदेड जिल्ह्यात चुनखडीचे साठे ३ दशलक्ष टन आहेत.

## डोलोमाईट

डोलोमाईटच्या एकूण उत्पादनापैकी ९०% उत्पादन लोह-पोलादनिर्मितीसाठी वापरले जाते व उरलेले खत कारखान्यात वापरतात. विंध्ययन युगातील चुनखडीच्या खडकाबरोबर **डोलोमाईट व डोलोमाईटयुक्त चुनखडीचे साठे प्रामुख्याने यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आहेत. याशिवाय रत्नागिरी व नागपूर जिल्ह्यात डोलोमाईट आढळते. सौसर प्रस्तर समूहाशी निगडित असलेले डोलोमाईटचे साठे मात्र केवळ नागपूर जिल्ह्यात आहेत.** भारताच्या डोलोमाईटच्या एकूण साठ्यांपैकी फक्त १ टक्का साठा महाराष्ट्रात आहे.

## कायनाईट व सिलिमनाईट

हिऱ्यांना पैलू पाडण्याच्या उद्योगात, याचप्रमाणे काचसामान, रसायन उद्योग, सिमेंट उद्योग व विजेची उपकरणे निर्मिती उद्योगात कायनाईटचा उपयोग होतो. भारताच्या कायनाईटच्या एकूण उत्पादनांपैकी १५% उत्पादन महाराष्ट्रात होते. **राज्यात भंडारा-गोंदिया जिल्ह्यात कायनाईटचे साठे आहेत.**

**भंडारा :** या जिल्ह्यातील **साकोली तालुक्यात** दहेगाव, पिंपळगाव, मोगरा, मिरगाव आणि भंडारा तालुक्यात गार्काभोंगा येथे कायनाईट व सिलिमनाईटचे साठे आहेत.

**तक्ता क्र. ६.२ : महाराष्ट्रातील खनिजसंपत्ती व प्रमुख उत्पादक जिल्हे**

| खनिज | जिल्हे | खनिज | जिल्हे |
|---|---|---|---|
| १. मँगनीज | भंडारा, गोंदिया, नागपूर, सिंधुदुर्ग | १३. क्वार्टझाईट | भंडारा, गोंदिया |
| २. लोहखनिज | चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर व सिंधुदुर्ग | १४. संगमरवर | नागपूर |
| ३. बॉक्साइट | कोल्हापूर, रत्नागिरी, रायगड, ठाणे, सांगली व सातारा | १५. बराईट | कोल्हापूर, रत्नागिरी व चंद्रपूर |
| ४. क्रोमाईट | भंडारा, गोंदिया, सिंधुदुर्ग व रत्नागिरी | १६. अभ्रक | पूर्व विदर्भ |
| ५. चुनखडी | यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, नांदेड, सांगली, नगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व सातारा | १७. बांधकाम सामग्री, चिनी माती, लिथोमार्च, कांव, पिवळी व पांढरी माती. | सर्वत्र उपलब्ध<br>सर्वत्र उपलब्ध |
| ६. डोलोमाईट | यवतमाळ, रत्नागिरी, गडचिरोली, नागपूर व चंद्रपूर | १८. टंगस्टन | नागपूर |
| ७. कायनाईट | भंडारा, गोंदिया | १९. गॅलियम | नागपूर |
| ८. सिलिकामय वाळू | सिंधुदुर्ग व रत्नागिरी | २०. सिझियम | भंडारा, गोंदिया |
| ९. जांभा | कोकण, पूर्व विदर्भ, कोल्हापूर व सातारा | २१. व्हॅनेडिअम | भंडारा, गोंदिया |
| १०. बेसॉल्ट | पूर्व विदर्भ व कोकण वगळता सर्वत्र | २२. मीठ | कोकण |
| ११. ग्रॅनाईट व पट्टिताश्म | चंद्रपूर, गडचिरोली व सिंधुदुर्ग | २३. खनिज जल | कोकण |
| १२. वालुकाश्म | चंद्रपूर, नागपूर व अमरावती | | |

### महाराष्ट्रातील इतर खनिजे

महाराष्ट्रात पुढील खनिज पदार्थ अल्प प्रमाणात आढळतात.

**(१) सिलिकामय वाळू : कलाडगी प्रस्तर समूहासोबत सिंधुदुर्ग जिल्ह्यात सिलिका वाळूचे साठे बऱ्याच ठिकाणी आढळून** येतात. यातील **वेंगुर्ला तालुक्यात** वेटोरा, चंदवण, वालावल, फोंडा इत्यादी साठे महत्त्वाचे आहेत. येथील वाळूचे साठे अंदाजे ४९ दशलक्ष टन आहेत. सिलिका वाळूचा उपयोग मुख्यत: काचकामात व ओतीव कामाच्या साच्यामध्ये होतो.

**(२) जांभा : कोकणामधील सर्व जिल्हे** (ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) तसेच **कोल्हापूर, सातारा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली** या जिल्ह्यांमध्ये जांभा आढळतो. मुरुमाशी संबंधित असलेली रंगीत माती सापडते. मुरुमात लाल व पिवळ्या गेरूची कोठारे सापडतात.

**(३) बेसॉल्ट :** महाराष्ट्रात बांधकामासाठी उपयुक्त असे खडकही आढळतात. यांपैकी बेसॉल्ट हा खडक पूर्व विदर्भ व कोकण वगळता सर्वत्र आढळतो.




**(४) ग्रॅनाईट व पट्टिताश्म : चंद्रपूर, गडचिरोली व सिंधुदुर्ग** जिल्ह्यात ग्रॅनाईट व पट्टिताश्म सापडते.

**(५) वालुकाश्म : चंद्रपूर, नागपूर व अमरावती** या जिल्ह्यांमध्ये वालुकाश्म आढळते.

**(६) क्वार्टझाईट : भंडारा, गोंदिया जिल्ह्यात** क्वार्टझाईटचे खडक आहेत.

**(७) संगमरवर : नागपूर जिल्ह्यात** अल्प प्रमाणात संगमरवर आढळते.

**(८) बराईट :** अग्निजन्य खडकामध्ये बराईट आढळते. याचा उपयोग रबर, कागद व रंग उद्योगात होतो. ते **कोल्हापूर, रत्नागिरी व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये आढळते.**




नकाशा क्र. ६.४ : पूर्व महाराष्ट्र : खाण क्षेत्र

**पूर्व महाराष्ट्र - खाण क्षेत्र :**

महाराष्ट्रात पूर्व भागात खनिजसंपत्तीचे केंद्रीकरण झालेले आहे. दगडी कोळसा, मँगनीज, लोहखनिज व चुनखडक हे प्रामुख्याने आढळतात. चंद्रपूर जिल्ह्यात सर्वांत जास्त प्रमाणात खनिजसंपत्ती आहे. यामध्ये चंद्रपूर, राजुरा, बल्लारपूर, भद्रावती, चिमूर, ब्रह्मपुरी व वरोडा परिसर प्रसिद्ध आहे. यानंतर नागपूर जिल्ह्यात नागपूर, सावनेर, रामटेक, कामठी व उमरेड; यवतमाळ जिल्ह्यात दिग्रस, उमरखेड, मारेगाव व वणी; भंडारा जिल्ह्यात भंडारा व तुमसर आणि गोंदिया जिल्ह्यात गोरेगाव परिसरात खनिजसंपत्ती आहे.

**(९) बांधकाम सामग्री :** विटांची माती, वाळू, रेती, चुनखडी इत्यादी बांधकाम सामग्री सर्वत्र आढळते.

**(१०) माती :** आर्क्रियन व गोंडवन प्रस्तर समूहाशी मातीचे महत्त्वाचे साठे निगडित आहेत. हे साठे नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व ठाणे या जिल्ह्यांमध्ये आहेत. याचे अंदाजे साठे ७.६ दशलक्ष टन आहेत. यांपैकी नागपूर जिल्ह्यात ३.८ दशलक्ष टन साठे आहेत. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही मातीचे साठे चिनी मातीच्या प्रकारात येतात. अमरावती व नागपूर जिल्ह्यातील बहुतांशी साठे उष्णतारोधक व पांढऱ्या मातीचे आहेत. या मातीचा उपयोग निरनिराळी भांडी, नळ (पाईप), उष्णतारोधक विटा तयार करण्यासाठी होतो. लिथोमार्च, गेरू (काव) व पिवडीसारखी रंगद्रव्ये बऱ्याच ठिकाणी आढळतात.

**(११) अभ्रक :** अभ्रकाच्या दृष्टीने **कडवळ** (सिंधुदुर्ग) येथील साठा महत्त्वाचा असून पूर्व विदर्भातही ते अल्प प्रमाणात आढळते.

**(१२) टंगस्टन :** हा अतिशय महत्त्वाचा युद्धोपयोगी धातूचा धातुपाषाण वुल्फाम ($WO_3$ ७० ते ७५%) आहे. लहान-लहान शिरांच्या रूपात व गाळाच्या साठ्यात फार कमी प्रमाणात **नागपूर जिल्ह्यात** टंगस्टन सापडते. याचे उत्पादन फार कमी व अनियमित आहे.

**(१३) गॅलिअम :** नागपूर जिल्ह्चात काही मँगनीज धातुकात गॅलियम आढळते.

**(१४) सिझियम :** भंडारा-गोंदिया जिल्ह्चाच्या हिरव्या अभ्रकात सिझियम हे दुर्मीळ मूलद्रव्य थोड्या प्रमाणात आहे.

**(१५) व्हॅनेडिअम :** भंडारा-गोंदिया जिल्ह्चातील अभ्रक, कायनाईट व सिलिमनाईटयुक्त क्वार्टझाइटात ०.५% व्हॅनेडिअम आढळते.

**(१६) अन्य खनिजे :** तांबे, शिसे, जस्त, अँटिमनी इत्यादींची उपयुक्त खनिजे, क्वॉर्टझ, फेल्डस्पार, बराईट याचप्रमाणे बेसॉल्ट खडकाच्या पोकळ्यात साचलेली कॅल्सेडोनी, अकीक, जमुनिया, ओपलसारखी उपरत्ने, कुरुविंद, गार्नेट, सोपस्टोन, फ्लिंट, चर्ट ग्रॅफाईट, अँडॅल्युसाईट, विविध प्रकारची झिओलाइटे इत्यादी उपयुक्त खनिजेही महाराष्ट्रात आढळतात. यांपैकी काही खनिजे उच्चतापासह (उच्च तापमानाला न वितळता टिकून राहणारे) व अपघर्षक (घासून वा खरवडून पृष्ठभाग गुळगुळीत करणारे) पदार्थ म्हणून व खतांसाठी उपयुक्त आहेत.

**(१७) मीठ :** महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीलगत विशेषतः रायगड, ठाणे व मुंबईलगतच्या भागात मीठ तयार केले जाते. मिठाचा वापर प्रामुख्याने खाण्याव्यतिरिक्त खतनिर्मिती व रासायनिक उद्योगातही केला जातो.

**(१८) खनिज जल :** कोकणात रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आढळणाऱ्या गरम झऱ्यातील खनिज जल हे काही रोगांवर उपयुक्त असते.

## महाराष्ट्रातील खनिजसंपत्ती

### खनिजसंपत्ती

**महाराष्ट्रातील खनिजसंपत्तीची प्रमुख क्षेत्रे : (अ) पूर्व विदर्भ :** चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व यवतमाळ जिल्हे.

**(ब) कोकण व दक्षिण महाराष्ट्र :** सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व कोल्हापूर जिल्हे. महाराष्ट्रात प्रमुख खनिजांचे २८५ पट्टे व गौण खनिजांचे २०३ पट्टे.

**✲ मँगनीज** : भारताचा ४०% साठा महाराष्ट्रात, प्रमुख साठे भंडारा व नागपूर या खालोखाल सिंधुदुर्ग जिल्हे.

**भंडारा -गोंदिया** : डोंगरी बुद्रुक व चिखला व अन्य १३ ठिकाणे. **नागपूर :** सावनेर ते रामटेकपर्यंत पुढे भंडारा तालुक्यापर्यंत.

**पूर्व विदर्भ** : गुमगाव, रामडोंगरी, कोदेगाव, मनसर कंट्री, जुनेवाणी, माटक, बैलडोंगरी, गोगूलडोह, मॉंट्री, पारसिवनी.

**सिंधुदुर्ग** : सावंतवाडी व वेंगुर्ला परिसर.

**✲ लोहखनिज** : भारताचा २०% साठा महाराष्ट्रात. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व सिंधुदुर्ग जिल्हे.

**चंद्रपूर व गडचिरोली** : लोहारा, असोला, देवळगाव, बिआसी, पिंपळगाव, फुसेर, रतनपूर, सुरजागड, वाढवी, दामकोट, मातबरसी, कच्चा टेकडी, मुखारा, हितपार, गुंदावास, मेटा, पोयारकोटी, धांग्रामेटा, सूरजागड विभागात २७५ दशलक्ष टन लोहखनिजाचा साठा. ६१ ते ७१% लोह.

**भंडारा-गोंदिया** : खुर्सीपार (मॅग्नेटाईट लोह) : ५४% लोह.

**सिंधुदुर्ग** : वेंगुर्ला तालुका - रेडी, टाका, असोली, आजगाव, शिरोडा व नानोसा. सावंतवाडी तालुका - तळोणे, गुल्दावे, किन्हाळा, कवठाणी, सताडी, सातोली, अरीस, ठाकूरवाडी, नळेवाडी, मातोंड, ठबोले व तेंडोली. रेडी - ५०% लोह.

**✲ बॉक्साइट** : कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, सांगली व सातारा. ६२ दशलक्ष टन साठे.

**कोल्हापूर** : राधानगरी, गारगोटी, वाकी, रांगेवाडी, उदगिरी, धनगरवाडी, मोगलगड, मानबेट, नागरतासवाडी व कासारवाडा.

**रायगड** : मुरूड, रोहा व श्रीवर्धन तालुका.

**ठाणे** : सालसेट बेट, तुंगार टेकड्या; **मुंबई उपनगर :** बोरिवली, जोगेश्वरी, गोरेगाव.

**सिंधुदुर्ग व रत्नागिरी** : आंबोली घाट परिसर, दापोली व मंडणगड.



**✲ क्रोमाईट** : महाराष्ट्रात १०% साठा. **सिंधुदुर्ग :** कणकवली, जानोली व बागदा. **भंडारा :** मौनी. **नागपूर :** टाका.

**✲ चुनखडी** : यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्चात प्रमुख साठे.

**कंकरचे साठे** : नागपूर, नांदेड, धुळे, पुणे, नगर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व सातारा.

**चंद्रपूर** : वरोडा तालुका (पुरकेपार, कोंडारा, कामागोहन, परथा व नीलजाई);
राजुरा तालुका (सांगोडा, अवरपूर, चांदूर, गंगापूर, बाकर्डी, नारंदा, पिंप्री, वानुजा).

**यवतमाळ** : सर्वांत जास्त साठे (२९०० दशलक्ष टन) राजूर स्टेशनजवळ मांजरी व वांजरी.

**अहमदनगर** : कायूर, कंडुर व खांडेरावाडी.

**✲ डोलोमाईट** : यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, रत्नागिरी व नागपूर जिल्हे.

**कायनाईट व सिलिमिनाईट** : भंडारा जिल्ह्चात साकोली तालुक्यात दहेगाव, पिंपळगाव, मोगरा, मिरगाव आणि भंडारा तालुक्यात शाकीभोंगा.

## बहुपर्यायी प्रश्न

(१) महाराष्ट्रातील खनिजसंपत्तीचे प्रमुख क्षेत्र .......... मध्ये आहे.
(अ) पूर्व विदर्भ (ब) खानदेश (क) मराठवाडा (ड) पश्चिम महाराष्ट्र

(२) महाराष्ट्रात मँगनीजचे प्रमुख साठे .......... व .......... जिल्ह्चात आहेत.
(अ) कोल्हापूर व सांगली (ब) रत्नागिरी व सिंधुदुर्ग (क) भंडारा व नागपूर (ड) उस्मानाबाद व लातूर

(३) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्चात .......... प्रकारचे लोहखनिज सापडते.
(अ) मॅग्नेटाईट (ब) हेमेटाईट (क) लिमोनाईट (ड) सिडेराईट

(४) सिंधुदुर्ग जिल्ह्चातील .......... येथील लोहखनिज साठे महत्त्वाचे आहेत.
(अ) शिरोडा (ब) ठाकूरवाडी (क) मातोंड (ड) रेडी

(५) पश्चिम महाराष्ट्रात बॉक्साइटचे साठे .......... जिल्ह्चात आढळतात.
(अ) नाशिक (ब) पुणे (क) कोल्हापूर (ड) सोलापूर

(६) महाराष्ट्रात चुनखडीचे सर्वांत जास्त साठे .......... जिल्ह्चात आहेत.
(अ) चंद्रपूर (ब) यवतमाळ (क) अहमदनगर (ड) धुळे

(७) सौसर प्रस्तर समूहाशी निगडित असलेले डोलोमाईटचे साठे फक्त .......... जिल्ह्यात आहेत.
(अ) यवतमाळ (ब) भंडारा (क) चंद्रपूर (ड) नागपूर

(८) कायनाईट व सिलिमनाईटचे साठे प्रामुख्याने .......... जिल्ह्चात आहेत.
(अ) भंडारा-गोंदिया (ब) गडचिरोली (क) वर्धा (ड) यवतमाळ

(९) आर्कियन व गोंडवन प्रस्तर समूहाशी मातीचे महत्त्वाचे साठे .......... जिल्ह्चात आहेत.
(अ) नागपूर (ब) अमरावती (क) कोल्हापूर (ड) धुळे

(१०) सिझियम व व्हॅनेडिअमसारखी दुर्मीळ मूलद्रव्ये .......... जिल्ह्चात आहेत.
(अ) नागपूर (ब) सिंधुदुर्ग (क) भंडारा-गोंदिया (ड) सातारा

### उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ | (२) | क | (३) | ब | (४) | ड | (५) | क | (६) | ब |
| (७) | ड | (८) | अ | (९) | अ | (१०) | क | | | | |

✲✲✲

# ७. लोकसंख्या

कोणत्याही प्रदेशामधील मग तो जिल्हा किंवा राज्य किंवा देश वा खंड असो; लोकसंख्येचा अभ्यास, प्रदेशामधील लोकसंख्येचे वितरण आणि लोकसंख्येच्या घनतेचे स्वरूप एवढाच मर्यादित प्रमाणात करून चालत नाही. लोकसंख्या ही एक सर्वांत महत्त्वाची साधनसंपत्ती आहे. मनुष्यबळ विकासासाठी लोकसंख्याशास्त्रीय घटकांची सर्वांगीण आणि सखोल विवेचन करण्याची नितांत गरज असते. साहजिकच, यासाठी लोकसंख्याशास्त्रीय घटकांची सर्व स्तरावरील सांख्यिकी आकडेवारी प्राप्त होणे आवश्यक असते. त्याचे विश्लेषण करून काही निष्कर्षापर्यंत येता येते. याच्या आधारे लोकसंख्येचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय स्वरूप लक्षात येते. त्याची सद्य:स्थिती, समस्यांच्या स्वरूपाची तीव्रता जाणवते. मानव विकास साधण्यासाठी भूगोलकार, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, नियोजनकार विचार करून कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत, त्या कशा प्रकारे राबविल्या पाहिजेत याचा आराखडा तयार केला जातो. योजनांचा फायदा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रामाणिकपणे यंत्रणा राबविण्याची आवश्यकता असते.

## लोकसंख्याशास्त्रीय घटक

| | | | |
|---|---|---|---|
| I. | जन्म-मृत्यूचे प्रमाण | II. | वयोगट |
| III. | काम करणाऱ्या लोकांची विभागणी | IV. | काम न करणाऱ्या लोकांची विभागणी |
| IV. | भाषावार लोकसंख्या | VI. | धार्मिक लोकसंख्या |
| VII. | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे | VIII. | राहणीमान |
| IX. | ग्रामीण लोकसंख्या | X. | नागरी लोकसंख्या |
| XI. | अनुसूचित जाती-जमाती. | | |

**महत्त्वाची टीप : बऱ्याचशा लोकसंख्याशास्त्रामधील घटकांची २०११ सालच्या जनगणनेची आकडेवारी अजून प्रकाशित झालेली नसल्याने २००१ सालच्या जनगणनेपर्यंतचे विश्लेषण केलेले आहे.**

## I. जन्म-मृत्यूचे प्रमाण

लोकसंख्येच्या वाढीचा दर जन्म-प्रमाण व मृत्यू प्रमाणावर अवलंबून असतो. म्हणून महाराष्ट्राच्या लोकसंख्येचे विस्तारित स्वरूप जन्म व मृत्यूच्या प्रमाणावरून लक्षात येईल. १९२१ पर्यंत लोकसंख्येच्या वाढीस आळा बसण्याचे कारण मृत्यू-प्रमाण जास्त होते. तसेच त्या काळात साथीचे रोग आटोक्यात आणण्यासाठी योग्य सुविधाही उपलब्ध नव्हत्या. परंतु त्यानंतर मात्र वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्या. त्यामुळे मृत्यू प्रमाण घटत गेले व हळूहळू लोकसंख्येत वाढ होत गेली. आयुष्यमानामध्येही वाढ झाल्याने लोकसंख्येत भर झाल्याचे आढळून येते.

### (अ) जन्म प्रमाण :

१९२१ ते १९९१ च्या दरम्यान दर हजारी जन्म प्रमाणाची आकडेवारी पाहिली असता असे आढळले की, १९६१ पर्यंत जन्माचे प्रमाण दर हजारी ४० च्या पुढेच होते. १९४१ च्या जनगणनेच्या वेळी तर ते ४७ होते. १९७१ च्या जनगणनेत जन्माचे प्रमाण दर हजारी ३६ पर्यंत घसरल्याचे आढळून येते. त्याचे प्रमुख कारण शासनाने राबविलेला कुटुंबनियोजन कार्यक्रम होय. परंतु **एकूण लोकसंख्येत बरीच वाढ झाल्याचे जाणवते याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मृत्यू प्रमाणातील घट, विशेष वैद्यकीय सुविधा आणि आयुष्यमानातील वाढ होय. १९९१ साली जन्माचे प्रमाण दर हजारी २५ पर्यंत खाली आहे. २००१ साली जन्माचे प्रमाण दर हजारी २१ पर्यंत कमी आले. २००८ साली १७.९ पर्यंत खाली आले.**


(i) **ग्रामीण भागामधील जन्मदर :** महाराष्ट्रात नमुना नोंदणी पद्धतीप्रमाणे जन्म प्रमाण असे आढळते की, २००१ सालानुसार ग्रामीण जन्मदर दरहजारी २१.१ आहे. यानंतर यामध्ये घट होत गेलेली आहे. २००४ आणि **२००८ सालानुसार ग्रामीण जन्मदर** अनुक्रमे १९.९ आणि **१८.४ पर्यंत खाली आला.** २००१ सालच्या तुलनेत ग्रामीण जन्मदरात दर हजारी २.७ दराने घट झालेली आहे.





(ii) **नागरी भागामधील जन्मदर :** महाराष्ट्रात नमुना नोंदणी पद्धतीप्रमाणे २००१ सालानुसार नागरी जन्मदर २०.२ आहे तर २००५ आणि **२००८ सालानुसार नागरी जन्मदर** अनुक्रमे १८.२ व **१७.२ पर्यंत खाली आला.** गेल्या २००१ सालच्या तुलनेने नागरी जन्मदरात दर हजारी ३ दराने घट झालेली आहे.

(iii) **महाराष्ट्रात एकूण जन्मदर :** महाराष्ट्रात २००१ सालानुसार दर हजारी २०.७ जन्मदर आहे. यामध्ये घट होऊन **२००८ साली हे प्रमाण १७.९ पर्यंत खाली आले.**




**आलेख क्र. ७.१ : महाराष्ट्र — जन्मदर, मृत्युदर व बाल-मृत्युदर**

### (ब) मृत्यू प्रमाण :

मृत्यू प्रमाणाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, १९११ ते २१ दरम्यान मृत्यू प्रमाण दरहजारी ३८ एवढे होते. १९५१ च्या जनगणनेपर्यंत ते २५ पर्यंत घसरले, तर १९७१ च्या जनगणनेमध्ये मृत्यू-प्रमाण दरहजारी फक्त १३ होते. १९९१ च्या जनगणनेनुसार हेच प्रमाण ८ पर्यंत खाली आलेले आहे. **२००१ च्या जनगणनेनुसार मृत्यू-प्रमाण ७.५ झाले.**

(i) **ग्रामीण भागामधील मृत्युदर :** नमुना नोंदणी पद्धतीप्रमाणे २००१ सालानुसार ग्रामीण मृत्युदर दरहजारी ८.५ आहे. २००४ साली यामध्ये बऱ्यापैकी घट होऊन तो ६.२ पर्यंत स्थिरावला; परंतु **२००५ साली यामध्ये वाढ होऊन ७.४ पर्यंत उंचावला तर २००८ सालीही तेवढाच होता.**

(ii) **नागरी भागामधील मृत्युदर :** महाराष्ट्रात ग्रामीण भागापेक्षा नागरी भागामध्ये मृत्युदर कमी आहे. नागरी भागात २००१ सालानुसार मृत्युदर दरहजारी ५.९ आहे. तो २००५ साली ५.४ पर्यंत खाली आला तर २००६ साली यामध्ये वाढ होऊन नागरी मृत्युदर ५.८ पर्यंत उंचावला. **२००८ साली तो ५.६ पर्यंत किंचित घटला.**

**(iii) महाराष्ट्रात एकूण मृत्युदर :** महाराष्ट्रात २००१ साली एकूण मृत्युदर दरहजारी ७.५ होता, तो २००४ साली ६.२ पर्यंत खाली आला; परंतु पुढील चार वर्षांमध्ये मृत्युदरामध्ये वाढ झाली. **२००८ सालानुसार एकूण मृत्युदर ६.६ आहे.**

### (क) बालमृत्यू प्रमाण :

आपल्या महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत बालमृत्यूचे प्रमाण जास्त होते. १९२१ च्या जनगणनेमध्ये ते दरहजारी २७१ एवढे प्रचंड होते आणि ही एक चिंतेची बाब होती. हे प्रमाण घटत जाऊन १९५१ मध्ये २०८ पर्यंत खाली आले. यामुळे १९७१ साली बालमृत्यू प्रमाण दरहजारी ९६ पर्यंत खाली आले. १९९१ साली बालमृत्यूचे प्रमाण दरहजारी ५४ एवढे खाली आले. **अलीकडे भारतात तसेच महाराष्ट्रात 'पल्स पोलिओ' सारखे कार्यक्रम यशस्वी झाल्याने बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत झालेली आहे. २००१ साली बालमृत्यू प्रमाण दरहजारी ४५ पर्यंत खाली आले आहे. २००८ सालानुसार बालमृत्यू प्रमाण ३३ आहे.**

**(i) ग्रामीण भागामधील बाल-मृत्युदर :** महाराष्ट्रात नागरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये बालमृत्यू प्रमाण जास्त आहे. याचे प्रमुख कारण ग्रामीण भागात गर्भवती महिलेची प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर योग्य प्रकारे काळजी घेतली जात नाही. याचप्रमाणे नवजात बालकाचीही चांगली देखभाल घेतली जात नाही.

महाराष्ट्रात ग्रामीण भागात २००१ सालानुसार बाल-मृत्युदर एक हजार जीवित जन्मामागे ५५ आहे. यानंतर २००४ साली ते ४२ पर्यंत खाली आले तर **२००८ साली ग्रामीण बाल-मृत्युदर ४० पर्यंत खाली घसरला.**

**(ii) नागरी भागामधील बाल-मृत्युदर :** महाराष्ट्रात ग्रामीण भागापेक्षा नागरी भागामध्ये बालमृत्यू प्रमाण निम्म्यापेक्षा कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे नागरी भागामध्ये ग्रामीण परिसरापेक्षा निश्चित चांगल्या वैद्यकीय सुविधा आहेत आणि याचा फायदा घेतला जातो. तसेच लोकही जागरूक आहेत.

महाराष्ट्रात नागरी भागामध्ये २००१ सालानुसार, बाल-मृत्युदर एक हजारी जीवित जन्मामागे २८ आहे. यानंतर किंचित घट होऊन **२००८ सालानुसार बाल-मृत्युदर २३ वर स्थिरावला आहे.**

**(iii) महाराष्ट्रात एकूण बाल-मृत्युदर :** महाराष्ट्रात नमुना नोंदणी पद्धतीने २००१ सालानुसार एकूण बाल-मृत्युदर ४५ आहे. यानंतर २००४ साली यामध्ये घट होऊन एकूण बाल-मृत्युदर ३६ पर्यंत खाली आला तर **२००८ साली तो ३३ वर स्थिरावला.**

## II. वयोगट

महाराष्ट्राच्या लोकशास्त्रीय प्ररूपात वयोगटाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरेल.

**१९९१ व २००१ सालच्या जनगणनेनुसार लोकसंख्येची वयोगटामधील टक्केवारी व तिची वैशिष्ट्ये :**

- बालगटाची (०–६ वर्षे) टक्केवारी १७.११% वरून १४.११% नी सुमारे ३% नी घटलेली आहे आणि यामध्ये **बालिकांची संख्या – मुलींची संख्या कमी होत आहे, ही शोचनीय बाब आहे.**
- ७ ते १४ वयोगटातही थोडी घट झालेली आहे.
- १५ ते ४९ वयोगटात म्हणजे कार्यकारी गटात मात्र ५०.३६% वरून ५२.७३% नी सुमारे २.५% नी वाढ झालेली दिसते. त्या मानाने ५० ते ५९ वयोगटात अल्प प्रमाणात घट झालेली आहे.
- ६० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये मात्र ६.९८% वरून ८.७३% पर्यंत वाढ झालेली आहे, हे विशेष. याचा अर्थ या दशकात **ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढलेले आहे. (तक्ता क्र. ७.१ पाहा.)**

**तक्ता क्र. ७.१ : वयोगटामधील लोकसंख्या आणि त्याची टक्केवारी**

| वयोगट | वर्ष १९९१ लोकसंख्या (लाख) | टक्केवारी (%) | वर्ष २००१ लोकसंख्या (लाख) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|
| ० – ६ | १३४.९७ | १७.११ | १३६.७० | १४.११ |
| ७ – १४ | १४६.०२ | १८.५० | १७४.२८ | १७.९९ |
| १५ – ४९ | ३९७.४९ | ५०.३६ | ५१०.८५ | ५२.७३ |
| ५० – ५९ | ५२.४९ | ६.६५ | ६१.२३ | ६.३२ |
| ६० + | ५५.०९ | ६.९८ | ८४.५७ | ८.७३ |
| वयाचा उल्लेख नाही | ३.१६ | ०.४० | १.१६ | ०.१२ |
| **एकूण** | ७८९.२२ | १००.०० | ९६८.७९ | १००.०० |

संदर्भ : *Economic Survey of Maharashtra, 2004-05, Page 148.*



**१९९१ व २००१ जनगणनेनुसार वयोगटामधील लोकसंख्या व तिची वैशिष्ट्ये :**

- ०–६ वर्षांच्या वयोगटातील संख्येत फारशी वाढ झालेली नाही. १३५ लाखांवरून फक्त १३७ लाखांपर्यंत वाढ झाली.
- ७ ते १४ वर्षांच्या वयोगटात २८ लाखांची भर पडली आहे.
- **१५ ते ४९ वयोगटात ३९७ लाखांवरून ५११ लाखांपर्यंत म्हणजे सर्वांत जास्त ११४ लाखांनी वाढ झालेली आहे.**
- ५० ते ५९ वयोगटात सुमारे ९ लाखांची वाढ झालेली आहे.
- ६० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांमध्ये **बऱ्यापैकी म्हणजे सुमारे ३० लाखांनी वाढ झालेली आहे.**


## III. काम करणाऱ्या लोकांची विभागणी

महाराष्ट्रामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार काम करणाऱ्या एकूण लोकांची संख्या ४११.७३ लाख आहे. यापैकी काम करणाऱ्या पुरुषांची संख्या २६८.५२ लाख तर **स्त्रियांची संख्या १४३.२१ लाख आहे.**

### काम करणाऱ्यांची वर्गवारी

महाराष्ट्रात काम करणाऱ्यांची वर्गवारी (१) शेतकरी (२) शेतमजूर (३) घरगुती उद्योग (४) इतर सेवा अशी आहे. याचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :

**महाराष्ट्र : काम करणाऱ्या लोकांची आर्थिक वर्गवारी (०००) वर्ष २००१**




आलेख क्र. ७.२ : महाराष्ट्र — काम करणाऱ्या लोकांची वर्गवारी (२००१)

### (१) शेतकरी :

- महाराष्ट्रामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार शेतकऱ्यांची एकूण संख्या ११८.१३ लाख आहे. यापैकी मुख्यत: काम करणारे शेतकरी १०८.८२ लाख आहेत तर सीमांतिक शेतकरी १६.३२ लाख आहेत.

- महाराष्ट्रामध्ये शेतीमध्ये काम करणाऱ्या पुरुषांची संख्या ६६.८१ लाख आहे तर स्त्रियांची संख्या ५१.३३ लाख आहे. यांची एकत्रित संख्या ११८.१३ लाख आहे.
- शेतामध्ये काम करणाऱ्या पुरुषांपैकी मुख्यत: शेतकरी ६१.८१ लाख तर सीमांतिक शेतकरी ५ लाख आहेत.
- शेतामध्ये काम करणाऱ्या स्त्रियांपैकी मुख्यत: स्त्री-शेतकऱ्यांची संख्या ४०.०१ लाख तर सीमांतिक स्त्री-शेतकऱ्यांची संख्या ११.३२ लाख आहे.

महाराष्ट्रात काम करणाऱ्या लोकांच्या संख्येत शेतकऱ्यांचा सर्वप्रथम क्रमांक असून या खालोखाल शेतमजुरांचा क्रमांक आहे.

### (२) शेतमजूर :

- महाराष्ट्रात काम करणाऱ्या शेतमजुरांची २००१ सालच्या जनगणनेनुसार एकूण संख्या १०८.१५ लाख आहे. यांपैकी मुख्यत: शेतमजुरांची संख्या ७६.४१ लाख तर सीमांतिक शेतमजुरांची संख्या ३१.७४ लाख आहे.
- महाराष्ट्रात पुरुष शेतमजुरांची एकूण संख्या ४९.२४ लाख आहे. यांपैकी मुख्यत: पुरुष शेतमजूर ३९.८२ लाख तर सीमांतिक पुरुष शेतमजूर ९.८२ लाख आहेत.
- महाराष्ट्रात पुरुष शेतमजुरांपेक्षा स्त्री-शेतमजुरांची संख्या जास्त आहे. एकूण स्त्री-शेतमजुरांची संख्या ५८.९१ लाख आहे. यांपैकी मुख्यत: स्त्री शेतमजुरांची संख्या ३७ लाख तर सीमांतिक स्त्री-शेतमजुरांची संख्या २१.९२ लाख आहे.

### (३) घरगुती उद्योग :

महाराष्ट्रामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार, घरगुती उद्योग करणाऱ्या लोकांची संख्या १०.८९ लाख आहे. यांपैकी मुख्यत: घरगुती उद्योग करणाऱ्यांची संख्या ८.१० लाख तर सीमांतिक घरगुती उद्योग करणाऱ्यांची संख्या २.७९ लाख आहे.

- महाराष्ट्रात घरगुती उद्योग करणाऱ्या पुरुषांची संख्या ५.६७ लाख असून यांपैकी मुख्यत: घरगुती उद्योग करणाऱ्या पुरुषांची संख्या ४.९४ लाख तर सीमांतिक घरगुती उद्योग करणाऱ्या पुरुषांची संख्या ७३,००० आहे.
- महाराष्ट्रात घरगुती उद्योग करणाऱ्या स्त्रियांची संख्या ५.२२ लाख आहे. यांपैकी मुख्यत: घरगुती उद्योग करणाऱ्या स्त्रियांची संख्या ३.१६ लाख तर सीमांतिक घरगुती उद्योग करणाऱ्या स्त्रियांची संख्या २.०६ लाख आहे.

### (४) इतर सेवा :

- महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार इतर सेवा करणाऱ्यांची एकूण संख्या १७४.५५ लाख आहे. यांपैकी मुख्यत: इतर सेवा करणाऱ्यांची संख्या १६१.१५ लाख आहे तर सीमांतिक इतर सेवा करणाऱ्यांची संख्या १३.४० लाख आहे.
- महाराष्ट्रात इतर सेवा करणाऱ्या पुरुषांची एकूण संख्या १४६.८१ लाख आहे. यांपैकी मुख्यत: इतर सेवा करणाऱ्या पुरुषांची संख्या १३८ लाख असून सीमांतिक इतर सेवा करणाऱ्या पुरुषांची संख्या ८.८१ लाख आहे.
- महाराष्ट्रात इतर सेवा करणाऱ्या स्त्रियांची एकूण संख्या २७.७५ लाख आहे. यांपैकी मुख्यत: इतर सेवा करणाऱ्या स्त्रियांची संख्या २३.१५ लाख तर सीमांतिक इतर सेवा करणाऱ्या स्त्रियांची संख्या ४.६० लाख आहे.

### ■ महाराष्ट्रात एकूण काम करणाऱ्यांचे स्वरूप

- महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, एकूण काम करणाऱ्या पुरुषांची संख्या २६८.५२ लाख असून यांपैकी मुख्यत: काम करणाऱ्या पुरुषांची संख्या २४४.१६ लाख तर सीमांतिक काम करणाऱ्या पुरुषांची संख्या २४.३६ लाख आहे.
- महाराष्ट्रात एकूण काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या १४३.२१ लाख आहे. यांपैकी मुख्यत: एकूण काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या १०३.३२ लाख तर सीमांतिक एकूण काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ३९.८९ लाख आहे.

### ■ जिल्हावार मुख्यत: काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी - २००१

**(i) महाराष्ट्रामधील पहिले पाच जिल्हे :** महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, मुख्यत: काम करणाऱ्यांची एकूण **लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये हिंगोली पहिल्या क्रमांकावर आहे. याची टक्केवारी ४१.८२ आहे.** या खालोखाल बुलडाणा (४०.७१%), अहमदनगर (३९.८७%), कोल्हापूर (३९.५९%) आणि वाशिम (३८.७८%) जिल्हे येतात.

**(ii) महाराष्ट्रामधील शेवटचे पाच जिल्हे :** महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, **मुख्यत: काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये सर्वांत शेवटचा क्रमांक सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आहे. याची टक्केवारी २६.९१% आहे.** यानंतर रायगड, नागपूर, भंडारा आणि गोंदिया (३२.६४%) जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.



### ■ जिल्हावार कृषीविषयक काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी - २००१

**(i) महाराष्ट्रामधील पहिले पाच जिल्हे :** महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, **कृषीविषयक काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये वाशिम जिल्ह्याचा (८३.७८%) सर्वप्रथम क्रमांक आहे.** या खालोखाल हिंगोली (८२.८९%), गडचिरोली (८२.२२%), नंदुरबार (८१.५५%) आणि बुलडाणा (८०.५९%) जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

**(ii) महाराष्ट्रामधील शेवटचे पाच जिल्हे : महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार कृषीविषयक काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये सर्वांत शेवटचा जिल्हा बृहन्मुंबई (०.१८%) आहे.** यानंतर ठाणे (२१.८७%), पुणे (३९.५४%), रायगड आणि कोल्हापूर (५८.०१%) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

### ■ महाराष्ट्रात काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग दर - २००१

**(i) महाराष्ट्रामधील पहिले पाच जिल्हे : महाराष्ट्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या सहभाग दरात २००१ सालानुसार गडचिरोली जिल्ह्याचा (४६.८९%) प्रथम क्रमांक** आहे. यानंतर गोंदिया (४३.२९%), हिंगोली (४१.६२%), भंडारा (४१.५६%) आणि नंदुरबार (४०.९७%) जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

**(ii) महाराष्ट्रामधील शेवटचे पाच जिल्हे : महाराष्ट्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या सहभाग दरात बृहन्मुंबई जिल्ह्याचा (१३.०६) सर्वांत शेवटचा क्रमांक असून** यानंतर ठाणे, नागपूर, अकोला व पुणे (२७.१०) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

## ४. काम न करणाऱ्या लोकांची विभागणी

काम न करणाऱ्या व्यक्तीचे कार्यप्रकारानुसार पुढील प्रकार पडतात :

(१) पूर्ण वेळ विद्यार्थी
(२) घरकाम करणारे
(३) अवलंबून असणारे व बालके
(४) इतर काम न करणारे

### (१) पूर्ण वेळ विद्यार्थी :

महाराष्ट्रात काम न करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या २००१ सालच्या जनगणनेनुसार, २३९.३१ लाख आहे. यांपैकी मुलांची संख्या १३१.१६ लाख आणि मुलींची संख्या १०८.१५ लाख आहे.

- ग्रामीण भागात काम न करणाऱ्या एकूण पूर्ण वेळ विद्यार्थ्यांची संख्या १३२.१५ लाख आहे. यांपैकी मुलांची संख्या ७३.२४ लाख आणि मुलींची संख्या ५८.९१ लाख आहे.
- नागरी क्षेत्रामध्ये काम न करणाऱ्या एकूण पूर्ण वेळ विद्यार्थ्यांची संख्या १०७.१६ लाख असून यांपैकी मुलांची संख्या ५७.९३ लाख आणि मुलींची संख्या ४९.२४ लाख आहे.

### (२) घरकाम करणारे :

महाराष्ट्रात काम न करणाऱ्यांमधील घरकाम करणाऱ्यांची (Household) एकूण संख्या ११३.९७ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २.४४ लाख तर स्त्रियांची संख्या १११.५३ लाख आहे.

- ग्रामीण भागात घरकाम करणाऱ्या पुरुषांची संख्या १.२३ लाख आणि स्त्रियांची संख्या ३४.७८ लाख आहे तर एकूण घरकाम करणाऱ्यांची संख्या ३६.०१ लाख आहे.
- नागरी क्षेत्रामध्ये घरकाम करणाऱ्यांची एकूण संख्या ७७.९६ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १.२१ लाख तर स्त्रियांची संख्या ७६.७५ लाख आहे.
- महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे घरकाम करणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या जास्त असून पुरुषांची संख्या नगण्य आहे.
- महाराष्ट्रात नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण भागात घरकाम करणाऱ्या स्त्रियांची संख्या त्या मानाने कमी आहे.

### (३) अवलंबून असणारे व बालके :

यामध्ये वयोवृद्ध आणि सहा वर्षांखालच्या बालकांचा समावेश होतो.

- महाराष्ट्रात या गटामधील एकूण संख्या १७२.४५ लाख आहे. यांपैकी पुरुषांची आणि बालांची संख्या ८०.८३ लाख तर स्त्रियांची आणि बालिकांची संख्या ९१.६५ लाख आहे.

- महाराष्ट्रात ग्रामीण भागात अवलंबून असणारे व बालकांची एकूण संख्या १०७.३८ लाख आहे. यांपैकी पुरुषांची आणि बालांची संख्या ५०.४१ लाख तर स्त्रियांची व बालिकांची संख्या ५६.९७ लाख आहे.
- महाराष्ट्रात नागरी क्षेत्रात अवलंबून असणारे व बालकांची एकूण संख्या ६५.१० लाख आहे. यांपैकी पुरुषांची आणि बालांची संख्या ३०.४२ लाख तर स्त्रियांची व बालिकांची संख्या ३४.६८ लाख आहे.
- महाराष्ट्रात अवलंबून असणारे व बालकांच्या संख्येनुसार नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण भागात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त आहे.

**(४) इतर काम न करणारे :**

महाराष्ट्रात इतर काम न करणाऱ्यांची एकूण संख्या १०.२४ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २१.०५ लाख आणि स्त्रियांची संख्या १०.२४ लाख आहे.

- ग्रामीण भागात इतर काम न करणाऱ्यांची एकूण संख्या ९.६२ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ६.२२ लाख आणि स्त्रियांची संख्या ३.४० लाख आहे.
- नागरी क्षेत्रामध्ये इतर काम न करणाऱ्यांची एकूण संख्या २१.६७ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १४.८३ लाख आणि स्त्रियांची संख्या ६.८४ लाख आहे.

**महाराष्ट्रात काम न करणाऱ्या व्यक्तीचे सर्वसाधारण स्वरूप :**

- महाराष्ट्रात काम न करणाऱ्या लोकांची एकूण संख्या ५५७.०५ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २३५.४९ लाख तर स्त्रियांची संख्या ३२१.५७ लाख आहे.
- महाराष्ट्रात ग्रामीण भागात काम न करणाऱ्या लोकांची एकूण संख्या २८५.१६ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १३१.१० लाख तर स्त्रियांची संख्या १५४.०६ लाख आहे.
- महाराष्ट्रात नागरी क्षेत्रामध्ये काम न करणाऱ्या लोकांची एकूण संख्या २७१.८९ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १०४.३८ लाख तर स्त्रियांची संख्या १६७.५१ लाख आहे.
- महाराष्ट्रात काम न करणाऱ्यांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त आहे.

## V. भाषावार लोकसंख्या

महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असून ८०% पेक्षा जास्त लोक मराठी भाषिक आहेत. याशिवाय गुजराती, तेलगू, तमिळ, कानडी हिंदी बोलणारेही लोक आहेत. यामध्ये गुजराती लोकांचे प्रमाण जास्त आहे. मुंबई शहरात त्यांनी प्रामुख्याने वास्तव्य केलेले आहे. तसेच अल्प प्रमाणात महाराष्ट्राच्या इतर शहरी भागांतही ते राहतात. फाळणीच्या काळातील परिस्थितीमुळे जे सिंधी निर्वासित आले त्यांनीदेखील मुंबईत राहणे पसंत केले. याचप्रमाणे उल्हासनगरला त्यांची वस्ती जास्त आहे. कालांतराने व्यवसायानिमित्त राज्याच्या इतर भागांत ते राहू लागले. महाराष्ट्राची मुख्य भाषा मराठी असली तरी या बोलीभाषेचे उच्चार, बोलण्याचा ढंग वगैरेंच्या बाबतीत प्रादेशिक तफावत बरीच जाणवते. पुण्याची मराठी भाषा शुद्ध मानतात. खानदेशी मनुष्य थोडा हेल काढून बोलतो. सातारा-कोल्हापूरकडील मराठी भाषेचा नूर तर वेगळाच आहे. वऱ्हाडमधील लोकांवर बोलण्यात हिंदी भाषेचा प्रभाव पडलेला आहे. मराठवाड्याची भाषादेखील भिन्न आहे. कोकणी भाषा तर आपले प्रादेशिक वैशिष्ट्य जतन करून आहे. असे जरी असले तरी आपण सर्व महाराष्ट्रीयन आहोत याचाही त्यांना अभिमान आहे.

महाराष्ट्रामध्ये भारतामधील सर्व भाषा बोलणारे लोक राहतात. हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्य सांगता येईल. महाराष्ट्रात भारतातील १५ भाषा बोलणारे लोकांचे वास्तव्य आहे. तक्ता क्र. ७.२ मध्ये आकडेवारी थोडी जुनी असली तरी विविध भाषा बोलणाऱ्यांचे साधारण स्वरूप, कल आणि टक्केवारी लक्षात येते.

**(१) मराठी (६.६६ कोटी) :** महाराष्ट्रात अर्थात मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. त्याची लोकसंख्या सुमारे ६ कोटी ६६ लाख आहे. एकूण लोकसंख्येशी मराठी बोलणाऱ्यांची टक्केवारी ७२.२१ आहे.

**(२) हिंदी (१.०७ कोटी) :** महाराष्ट्रात मराठीच्या खालोखाल हिंदी भाषिकांची संख्या १ कोटी ७ लाख आहे. याची टक्केवारी ११.५७ आहे.

**(३) उर्दू (सुमारे ६९ लाख) :** महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर उर्दू भाषा बोलणाऱ्यांची संख्या असून त्याची लोकसंख्या ६८.९५ लाख आहे. याची टक्केवारी ७.४७ आहे.

महाराष्ट्रात मराठी, हिंदी आणि उर्दू भाषा बोलणाऱ्यांची एकत्रित टक्केवारी ९१.२५ आहे.




**तक्ता क्र. ७.२ : महाराष्ट्र — बोलणाऱ्या प्रमुख भाषेनुसार लोकसंख्या**

| अ. क्र. | भाषा | लोकसंख्या टक्केवारी | लोकसंख्या | अ. क्र. | भाषा | लोकसंख्या टक्केवारी | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी | ७२.२१ | ६,६६,४३,९४२ | १०. | बंगाली | ०.३४ | ३,१०,१३७ |
| २. | हिंदी | ११.५७ | १,०६,८१,६४१ | ११. | पंजाबी | ०.२९ | २,६९,३०९ |
| ३. | उर्दू | ७.४७ | ६८,९५,५०१ | १२. | उडिया | नगण्य | ९३,९०० |
| ४. | गुजराथी | २.५१ | २३,१५,४०९ | १३. | काश्मिरी | नगण्य | ५,३४४ |
| ५. | तेलगू | १.५२ | १४,०५,९५८ | १४. | आसामी | नगण्य | २,५१६ |
| ६. | कन्नड | १.३६ | १२,५४,५१९ | १५. | संस्कृत | नगण्य | ४०८ |
| ७. | सिंधी | ०.७७ | ७,०९२२४ | १६. | इतर | ०.८३ | ७,६३,४९९ |
| ८. | तमिळ | ०.५७ | ५,२७,९९५ | | | | |
| ९. | मल्याळम | ०.४४ | ४,०६,३५८ | | एकूण | १०० | ९,२२,८५,७५० |

संदर्भ : (i) भारताची जनगणना - १९८१; १९८७ चा पेपर एक, महाराष्ट्र मालिका १२.

(ii) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी - २००७, पान नं. ४७.




आलेख क्र. ७.३ : महाराष्ट्र — भाषावार लोकसंख्येची टक्केवारी

**(४) गुजराथी (२३.१५ लाख) :** महाराष्ट्रात गुजराथी बोलणाऱ्यांची संख्या २३.१५ लाख आहे. याची टक्केवारी २.५१ आहे.

**(५) तेलगू :** महाराष्ट्रात तेलगू बोलणाऱ्यांची संख्या सुमारे १४ लाख आहे. याची टक्केवारी १.५२ आहे.

**(६) कन्नड :** महाराष्ट्रात कन्नड भाषा बोलणाऱ्यांची संख्या १२.५ लाख आहे. याची टक्केवारी १.३६ आहे.

**(७) १ टक्क्यापेक्षा कमी भाषा बोलणारे लोक :** महाराष्ट्रात सिंधी (७.०९ लाख, ०.७७%); तमिळ (५.२८ लाख, ०.५७%); मल्याळम (४.०६ लाख, ०.४४%); बंगाली (३.१० लाख, ०.३४%); पंजाबी (२.६९ लाख, ०.२९%) भाषा बोलणारे लोक राहतात.

**(८) अल्प भाषा बोलणारे लोक :** महाराष्ट्रात उडिया (९४,०००); काश्मिरी (५,३४४); आसामी (२,५१६) आणि संस्कृत (४०८) भाषा बोलणारे अल्प भाषिकदेखील आहेत.

**(९) इतर भाषा बोलणारे लोक :** महाराष्ट्रात इतर भाषा बोलणाऱ्यांची संख्या ७.६४ लाख आहे. याची टक्केवारी ०.८३ आहे.

## VI. धार्मिक लोकसंख्या


आपल्या महाराष्ट्रात भारताप्रमाणेच विविध धर्मांचे, विविध जाती-जमातीचे लोक राहतात. महाराष्ट्रात प्रामुख्याने सहा धर्मांचे लोक राहतात. हिंदू, मुस्लीम, बौद्ध, जैन, खिश्चन आणि शीख धर्मांचे लोक वास्तव्य करतात.

महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार ९,६८,७८,६२७ लोक आहेत. यांची धार्मिक लोकसंख्या व टक्केवारी यांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

**तक्ता क्र. ७.३ : महाराष्ट्र — धर्मानुसार लोकसंख्या व टक्केवारी (२००१)**

| अ. क्र. | धर्म | लोकसंख्या टक्केवारी | लोकसंख्या | अ. क्र. | धर्म | लोकसंख्या टक्केवारी | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हिंदू | ८०.३७ | ७,७८,५९,३८५ | ६. | शीख | ०.२२ | २,१५,३३७ |
| २. | मुस्लीम | १०.६० | १,०२,७०,४८५ | ७. | धर्म न सांगितलेले | ०.१ | ९७,७१३ |
| ३. | बौद्ध | ६.०३ | ५८,३८,७१० | ८. | इतर | ०.२४ | २,३६,८४१ |
| ४. | जैन | १.३४ | १३,०१,८४३ | | | | |
| ५. | खिश्चन | १.०९ | १०,५८,३१३ | | एकूण | १००.०० | ९,६८,७८,६२७ |

संदर्भ : (i) भारताची जनगणना - २००१. (ii) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी - २००७, पान नं. ४०.




आलेख क्र. ७.४ : महाराष्ट्र — धर्मानुसार लोकसंख्येची टक्केवारी



**(१) हिंदू (७,७८,५९,३८५) :** महाराष्ट्रात हिंदूधर्मीयांचे प्रामुख्याने प्राबल्य आहे. हिंदूधर्मीयांची लोकसंख्या सुमारे ७.७९ कोटी आहे. याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी ८०.३७ आहे.

**(२) मुस्लीम (इस्लाम १,०२,७०,४८५) :** महाराष्ट्रात हिंदूंच्या खालोखाल इस्लामधर्मीय लोक आहेत. यांची लोकसंख्या सुमारे १.०३ कोटी असून त्याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी १०.६ आहे.

**(३) बौद्ध (५८,३८,७१०) :** महाराष्ट्रात हिंदू आणि मुस्लीमधर्मीयांच्या खालोखाल बौद्धधर्मीयांची लोकसंख्या आहे. याची लोकसंख्या सुमारे ५८ लाख असून एकूण लोकसंख्येशी टक्केवारी ६.०३ आहे.

महाराष्ट्रात हिंदू, मुस्लीम आणि बौद्धधर्मीयांची एकत्रित टक्केवारी ९७ आहे.

**(४) जैन (१३.०१.८४३) :** महाराष्ट्रात जैनधर्मीयांची लोकसंख्या कमी आहे. महाराष्ट्रात सुमारे १३ लाख जैन लोक राहतात. याची टक्केवारी १.३४ आहे.

**(५) खिश्चन (१०,५८,३१३) :** खिश्चनधर्मीयांची लोकसंख्या सुमारे १०.६ लाख असून याची टक्केवारी १.०९ आहे.

**(६) शीख (२,१५,३३७) :** महाराष्ट्रात शीखधर्मीयांची संख्या अत्यल्प आहे. यांची एकूण लोकसंख्या सुमारे २.५ लाख (०.२२%) आहे.

**(७) धर्म न सांगितलेले :** महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेमध्ये ९७,७१३ लोकांनी आपला धर्म सांगितला नाही.

**(८) इतर धर्मीय लोक :** वरील धर्माव्यतिरिक्त इतर धर्मीयांची लोकसंख्या २,३६,८४१ (०.२४%) आहे.

## VII. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे

### महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप - २००२

महाराष्ट्रात २००२ सालानुसार, दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची सरासरी टक्केवारी ३५.७ आहे. याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :


**(१) महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या टक्केवारीतील पहिले पाच जिल्हे : या गटामध्ये सर्वांत जास्त दारिद्र्यरेषेखाली नंदुरबार जिल्हा असून त्याची टक्केवारी ७३ आहे.** यानंतर गोंदिया (५७.९%), गडचिरोली (५५.०%), धुळे (५३.६%) आणि भंडारा (५१.०) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

**महाराष्ट्रात प्रामुख्याने आदिवासी जमातीचे प्राबल्य असणाऱ्या वरील जिल्ह्यातील ग्रामीण भागात दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची टक्केवारी जास्त आहे.**

**(२) महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या टक्केवारीतील शेवटचे पाच जिल्हे : महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या टक्केवारीतील शेवटचा जिल्हा सातारा असून त्याची टक्केवारी १५.५ आहे.** यानंतर सांगली, कोल्हापूर, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्याचा (२५.०%) क्रमांक लागतो.

**(३) महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या४१ ते ५० टक्केवारी दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात प्रामुख्याने विदर्भाचा समावेश होतो. अमरावती (४९.६%), अकोला (४८.१%), चंद्रपूर (४७.५%), नागपूर (४७.४%), यवतमाळ (४५.५%), बुलडाणा (४४.५%), वाशिम (४३.१%), वर्धा (४१.१%) याचे उतरते क्रमांक आहेत. याशिवाय कोकणात ठाणे (४५.०%), खानदेशात जळगाव (४३.३%) आणि पश्चिम महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखाली ४०.४ टक्के लोक राहतात.

**(४) महाराष्ट्रामधील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या ३१ ते ४० टक्केवारी दरम्यान असणारे जिल्हे :** या गटामध्ये प्रामुख्याने मराठवाड्यामधील जिल्ह्यांचा समावेश होतो. हे जिल्हे पुढीलप्रमाणे : जालना (३८.३%), नांदेड (३७.६%), हिंगोली (३४.५%), परभणी (३३.२%) आणि उस्मानाबाद (३२.८%) जिल्हे दारिद्र्यरेषेखाली ३१ ते ४० टक्के दरम्यानचे आहेत. तसेच कोकणामधील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा (३९.१%) समावेश होतो.




नकाशा क्र. ७.१ : महाराष्ट्र — दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची टक्केवारी

**(५) महाराष्ट्रामधील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या २१ ते ३० टक्केवारी दरम्यान असणारे जिल्हे :** या गटामध्ये कोकणामधील रायगड जिल्हा (२९.७%), पश्चिम महाराष्ट्रामधील सोलापूर जिल्हा (२९.३%), अहमदनगर जिल्हा (२५%), मराठवाड्यामधील औरंगाबाद जिल्हा (२८.७%), बीड जिल्हा (२६.०) आणि लातूर जिल्ह्याचा (२९.८%) समावेश होतो.

## VIII. राहणीमान

सर्वसाधारणपणे राहणीमानाचा निकष दरडोई निव्वळ उत्पन्न गृहीत धरला जातो. २००८-०९ च्या दरडोई निव्वळ उत्पन्नानुसार महाराष्ट्राचे सरासरी उत्पन्न रु. ५४,८६७ आहे.

**(१) दरडोई निव्वळ उत्पन्नानुसार महाराष्ट्रामधील पहिले पाच जिल्हे :** महाराष्ट्रात २००८-०९ सालानुसार सर्वांत जास्त **निव्वळ उत्पन्न बृहन्मुंबईचे (मुंबई शहर व मुंबई उपनगर एकत्रित) रु. ८९,३४३ आहे.** या खालोखाल पुणे जिल्हा (रु. ७९,९६८); ठाणे जिल्हा (रु. ७८,५३१); नागपूर जिल्हा (रु. ६०,५९२) आणि रायगड जिल्हा (रु. ५७,०७४) आहे.

**(२) दरडोई निव्वळ उत्पन्नानुसार महाराष्ट्रामधील शेवटचे पाच जिल्हे :** महाराष्ट्रात २००८-०९ सालानुसार सर्वांत कमी **निव्वळ उत्पन्न विदर्भामध्ये वाशिम जिल्ह्याचे रु. २३,६२८ आहे.** यानंतर गडचिरोली जिल्हा (रु. २४,३७०); लातूर जिल्हा (रु. २८,७६४); नांदेड जिल्हा (रु. २८,८५३) आणि हिंगोली (रु. २९,१५०) असे जिल्ह्याचे क्रमांक आहेत.



**(३) महाराष्ट्रामध्ये दरडोई निव्वळ उत्पन्न रु. ५१,००१ ते ७५,००० दरम्यान असणारे जिल्हे :** या गटामध्ये वर उल्लेखिलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त कोल्हापूर जिल्हा (रु. ५५,९३१) व नाशिक जिल्ह्याचा (रु. ५५,८४१) समावेश होतो.

**(४) महाराष्ट्रामध्ये दरडोई निव्वळ उत्पन्न रु. ४०,००१ ते ५,००० दरम्यान असणारे जिल्हे : या गटात** अकरा जिल्ह्यांचा समावेश होतो. यामधील औरंगाबाद जिल्ह्याचे सर्वांत जास्त दरडोई निव्वळ उत्पन्न रु. ४९,४६५ तर सर्वांत कमी उत्पन्न वर्धा जिल्ह्याचे रु. ४१,७५७ आहे. उतरत्या क्रमाने अहमदनगर, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, रत्नागिरी, सोलापूर, चंद्रपूर, जळगाव आणि भंडारा असे जिल्हे येतात.

**(५) महाराष्ट्रामध्ये दरडोई उत्पन्न रु. ३०,००१ ते ४०,००० दरम्यान असणारे जिल्हे :** या गटामध्ये दहा जिल्ह्यांचा समावेश होतो. या गटामध्ये गोंदिया जिल्ह्याचे सर्वांत जास्त निव्वळ दरडोई उत्पन्न रु. ३६,९८६ आहे तर बुलडाणा जिल्ह्याचे सर्वांत कमी दरडोई निव्वळ उत्पन्न रु. ३०,१६५ आहे. या दरम्यान वर उल्लेख न झालेल्या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो.




नकाशा क्र. ७.२ : महाराष्ट्र — दरडोई निव्वळ उत्पन्न (२००८-०९)


## IX. ग्रामीण लोकसंख्या

**महाराष्ट्रात ग्रामीण लोकसंख्येच्या टक्केवारीत सातत्याने घट होत आहे.** १९२१ साली ग्रामीण लोकसंख्या ८१.५% होती. तर २००१ साली याचे प्रमाण ५७.६% पर्यंत घसरलेले आहे. याच काळात असे दिसते की, नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीत सातत्याने वाढ होत आहे. १९२१ साली नागरी लोकसंख्या १८.५% तर २००१ साली यामध्ये ४२.४% पर्यंत वाढ झाली. **(आलेख क्र. ७.५ पाहा.)**

**तक्ता क्र. ७.४ : ग्रामीण व शहरी लोकवस्तीचे प्रमाण %**

| वर्ष | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ८१.५ | ८१.४ | ७८.९ | ७१.३ | ७१.८ | ६८.८ | ६५ | ६१.३ | ५७.६ |
| शहरी | १८.५ | १८.६ | २१.१ | २८.७ | २८.२ | ३१.२ | ३५ | ३८.७ | ४२.४ |

संदर्भ : Maharashtra : 1973-74 व संकलित




- १९२१ साली ग्रामीण भागात ८१.५ टक्के लोक राहत होते. १९४१ ते ५१ या काळात मात्र एकदम ७१ टक्क्यांपर्यंत उतरले. याचे प्रमुख कारण असे आहे की, मुंबईसारख्या शहरांकडे खेड्यातील लोकांची कामधंद्यासाठी लागलेली रीघ होय. १९७१ साली ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण ६९% होते.
- ५० वर्षांच्या काळात ग्रामीण लोकसंख्या १०४ टक्क्यांनी वाढल्याचे दिसून येते.
- ग्रामीण लोकसंख्येच्या टक्केवारीत सातत्याने घटच होत आहे. १९९१ साली महाराष्ट्रात ग्रामीण-नागरी लोकसंख्येचे प्रमाण ६१% : ३९% होते. २००१ साली महाराष्ट्रातील ५७.६ टक्के लोक ग्रामीण व ४२.४ टक्के नागरी भागात राहतात.

आलेख क्र. ७.५ : महाराष्ट्र — ग्रामीण व नागरी लोकसंख्येची टक्केवारी

- २००१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागात ५५८ लाख लोक राहतात. यांपैकी पुरुषांची २८५ लाख तर स्त्रियांची संख्या २७३ लाख आहे. १९९१-२००१ या दशकात ग्रामीण लोकसंख्येत १५.३% नी वाढ झालेली आहे.

### महाराष्ट्राच्या ग्रामीण लोकसंख्येचे जिल्हावार वितरण - २००१

२००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची ग्रामीण लोकसंख्या ५,५७,७७,६०० आहे तर नागरी लोकसंख्या ४,०९,७५,६०० आहे. महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येपेक्षा ग्रामीण लोकसंख्या १,४८,०२,००० ने जास्त आहे.

**(१) ग्रामीण लोकसंख्येचे पहिले पाच जिल्हे : २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात सर्वांत जास्त ग्रामीण लोकसंख्या अहमदनगर जिल्ह्यात ३२,३६,९०० (५.८०%) आहे.** या खालोखाल नाशिक जिल्हा : ३०,५६,२०० (५.४८%); जळगाव जिल्हा : २६,२९,९०० (४.७१%); सोलापूर जिल्हा : २६,२४,३०० (४.७०%) आणि कोल्हापूर : २४,७२,८०० (४.३३%) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.


**महाराष्ट्राच्या एकूण ग्रामीण लोकसंख्येपैकी लोकसंख्येच्या पहिल्या पाच जिल्ह्यांत २३ टक्के लोक राहतात.**



**(२) ग्रामीण लोकसंख्येचे शेवटचे पाच जिल्हे : महाराष्ट्रात सर्वांत कमी ग्रामीण लोकसंख्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात** ७,८६,५०० आहे. यानंतर हिंगोली जिल्हा (८,३३,१००); वाशिम जिल्हा (८,४१,८००); गडचिरोली जिल्हा (९,०३,०००); वर्धा जिल्हा (९,११,७००) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

**(३) ग्रामीण लोकसंख्या २० ते २५ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा (२४.७३ लाख) व सातारा जिल्हा (२४.११ लाख); कोकणामधील ठाणे जिल्हा (२२.२९ लाख); मराठवाड्यामधील नांदेड जिल्हा (२१.८७ लाख) आणि विदर्भामधील यवतमाळ जिल्ह्याचा (२०.०१ लाख) या गटात समावेश होतो. या पाच जिल्ह्यांत मिळून महाराष्ट्राची १ कोटी १३ लाख ग्रामीण लोकसंख्या राहते व तिची महाराष्ट्राच्या ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी २०.२६ टक्के आहे.

**(४) ग्रामीण लोकसंख्या १५ ते २० लाख दरम्यान असणारे जिल्हे :** कोकणामधील रायगड जिल्हा (१६.७३ लाख), रत्नागिरी जिल्हा (१५.०५ लाख); पश्चिम महाराष्ट्रामधील सांगली जिल्हा (१९.५ लाख) याचप्रमाणे मराठवाड्यामधील औरंगाबाद जिल्हा (१८.१ लाख), बीड जिल्हा (१७.७४ लाख) आणि लातूर जिल्हा (१५.९ लाख) याशिवाय विदर्भातील बुलडाणा जिल्हा (१७.५९ लाख) आणि अमरावती जिल्हा (१७.०८ लाख) यांचा समावेश ग्रामीण लोकसंख्या १५ ते २० लाख दरम्यानच्या गटात होतो. या आठ जिल्ह्यांत मिळून महाराष्ट्राची १ कोटी ३८ लाख ग्रामीण लोकसंख्या वास्तव्य करते व तिची महाराष्ट्राच्या ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी २४.६९ टक्के आहे.




नकाशा क्र. ७.३ : महाराष्ट्र — ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी (२००१)

**(५) ग्रामीण लोकसंख्या १० ते १५ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** खानदेशामध्ये धुळे जिल्हा (१२.६२ लाख), नंदुरबार जिल्हा (११.०९ लाख); मराठवाड्यात जालना (१३.०५ लाख), परभणी जिल्हा (१०.४२ लाख) व उस्मानाबाद जिल्हा (१२.५३ लाख); विदर्भामध्ये अकोला (१०.०३ लाख), नागपूर जिल्हा (१४.५४ लाख), गोंदिया जिल्हा (१०.५७ लाख) आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा (१४.०६ लाख) समावेश होतो. या नऊ जिल्ह्यांत मिळून महाराष्ट्राचे १ कोटी ९ लाख ग्रामीण लोक राहतात. त्यांची एकूण ग्रामीण लोकसंख्येशी टक्केवारी १९.५३ आहे.

**(६) ग्रामीण लोकसंख्या ५ ते १० लाख दरम्यान असणारे जिल्हे :** कोकणामधील सिंधुदुर्ग जिल्हा (७.८७ लाख); मराठवाड्यामधील हिंगोली जिल्हा (८.३३ लाख); विदर्भामधील वाशिम जिल्हा (८.४२ लाख), वर्धा जिल्हा (९.१२ लाख), भंडारा जिल्हा (९.६० लाख) आणि गडचिरोली जिल्ह्याचा (९.०३ लाख) या गटात समावेश होतो. या पाच जिल्ह्यांत ५२.३७ लाख ग्रामीण लोक राहतात, त्यांची एकूण ग्रामीण लोकसंख्येशी टक्केवारी ९.३९ आहे.

## X. नागरी लोकसंख्या

**भारतातील राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य नागरिकीकरणात आघाडीवर आहे. इतर राज्यांच्या तुलनेने पाहता महाराष्ट्रात नागरिकीकरणाचा वेग जास्त आहे. याचे प्रमुख कारण औद्योगिकीकरणाची सुरुवात महाराष्ट्रात प्रथम सुरू झाली व त्याचा फायदा नागरिकीकरणाच्या प्रक्रियेस मिळाला.**

### महाराष्ट्रातील नागरिकीकरणाचा १९०१ ते १९९१ पर्यंतचा संक्षिप्त आढावा

- महाराष्ट्रात १९०१ व १९११ सालच्या आकडेवारीनुसार फक्त १५ ते १७% लोक नगरात राहत होते. खऱ्या अर्थाने नागरिकीकरणास फारसा प्रारंभ झालेला नव्हता.
- १९२१ ते १९७१ च्या जनगणनेची आकडेवारी पाहिली असता असे आढळते की, महाराष्ट्रात नागरी विकास हळूहळू परंतु सातत्याने झालेला आहे.
- १९२१ ते १९४१ दरम्यान नागरी प्रमाण १९ ते २१% दरम्यान होते. त्यानंतर मात्र पुढील दशकात त्यामध्ये एकदम २९% नी वाढ झाली.
- १९७१ साली ३१% लोक नगरात राहत होते. या काळातील नागरी लोकसंख्येच्या वाढीचे प्रमाण पाहता असे दिसून येते की, १९२१ ते १९३१ दरम्यान नागरी लोकसंख्येत १६% वाढ झाली, तर पुढील दशकात २७% वाढ झाल्याचे दिसून येते.
- **१९४१ ते १९५१ या दशकात मात्र नागरी लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणाने उच्चांक गाठला व त्या काळात लोकसंख्येत ६२% नी वाढ झाली. अर्थात ही प्रचंड वाढ होण्याचे कारण असे की त्या काळात ग्रामीण भागातून फार मोठ्या संख्येने लोकांनी नगरांकडे स्थलांतर केले.**
- त्यानंतरच्या पुढील दशकात मात्र नागरी लोकसंख्येची वाढ २१% नी झाली तर १९६१-७१ दरम्यान वाढीचे प्रमाण ४१% होते.
- १९२१ ते ७१ या दरम्यानच्या काळातील नागरी लोकसंख्येची वाढ पाहता असे आढळून येते की, ती ३०७% नी वाढली आहे. यावरून असे लक्षात येईल की, **महाराष्ट्रात अनेक नगरे आणि महानगरातील लोकवस्ती अतिशय झपाट्याने वाढत आहे.**
- १९८१ साली नागरी लोकसंख्यावाढीचे प्रमाण ४०% होते तर १९११ साली हेच प्रमाण ३९% लोक होते.

### २००१ सालच्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्येची काही वैशिष्ट्ये

- २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येची ४२.४% टक्केवारी म्हणजे ४११ लाख लोक नागरी भागात राहतात. यापैकी २१९ लाख पुरुष तर १९२ लाख स्त्रिया आहेत.
- **भारतात तमिळनाडू राज्याचा नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीत (४३.९) पहिला क्रमांक आहे. तर महाराष्ट्राचा त्याच्या खालोखाल दुसरा क्रमांक आहे.**
- महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येपैकी ५०% लोक फक्त ७ महानगरांमध्ये वास्तव्य करतात. बृहन्मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर) या मेगा सिटीमध्ये महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येपैकी १/३ लोक राहतात, तर महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी बृहन्मुंबईमध्ये १२.४% लोक राहत आहेत.



- १९९१ व २००१ या दशवार्षिकची महानगरांची वाढ पाहता, **काही वैशिष्टे पाहावयास मिळतात :** (१) बृहन्मुंबईची **लोकसंख्येत प्रत्यक्ष वाढ २० लाख झालेली आहे व ती राज्यात सर्वांत जास्त आहे. यापैकी ११ लाख लोक** स्थलांतरित आहेत. (२) पुणे शहरात या दशकात सुमारे **१० लाखांनी म्हणजेच मुंबई मेगा सिटीच्या निम्म्याने वाढ झालेली आहे हे** विशेष. (३) नागपूर, ठाणे, नाशिक व पिंपरी-चिंचवड महानगरात या दशकातील **वाढ ४ ते ५ लाखांच्या दरम्यान आहे.** (४) **लोकसंख्येच्या दशवार्षिक वाढीचा टक्केवारीदृष्ट्या विचार करता पिंपरी-चिंचवड महानगरात ९५% वाढ झालेली आहे व त्याचा महाराष्ट्रात प्रथम क्रमांक आहे. या खालोखाल** नाशिक (६६%) व पुणे (६२%) महानगराचा क्रमांक आहे.

### शहरांच्या वर्गवारीनुसार नागरी लोकसंख्येचे स्वरूप

'नागरी' याचा अर्थ ज्या वसाहतीला नगर परिषद महापालिका किंवा कॅन्टोन्मेंट आहे, ज्याची **किमान लोकसंख्या** ५००० आहे. ज्या वसाहतीमध्ये ७५% पुरुष कामगार बिगर शेतीव्यवसायात आहेत व ज्या वसाहतीची **लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी.** ला किमान ४०० आहे.

**शहरांची लोकसंख्येनुसार वर्गवारी :** शहराची वर्गवारी ६ वर्गांत केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| **१ ला वर्ग** : १,००,००० पेक्षा जास्त लोकवस्ती | **२ रा वर्ग** : ५०,०००-९९,९९९ | **३ रा वर्ग** : २०,०००-४९,९९९ |
| **४ था वर्ग** : १०,०००-१९,९९९ | **५ वा वर्ग** : ५०००-९९९९ | **६ वा वर्ग** : ५००० पेक्षा कमी लोकवस्ती |

महाराष्ट्रात १९५१ साली ३५२ शहरे होती तर १९६१ साली शहरांची संख्या २३८ एवढी **कमी झाली.**

**भारतीय जनगणनेद्वारे 'शहराची' सुधारित व्याख्या :** संख्या कमी होण्याचे **कोणतेही नैसर्गिक किंवा भौगोलिक** कारण नव्हते तर भारतीय जनगणनेची नागरी लोकवस्तीची वर उल्लेख केल्याप्रमाणे व्याख्या केली. यामध्ये **बिगर शेतीव्यवसायात** ७५% पुरुष कामगार व घनता दर चौ. कि. मी. ४०० लोक ही आणखी कलमे समाविष्ट केली. यापूर्वी वसाहतीची फक्त किमान लोकसंख्या ५००० एवढाच उल्लेख होता.

शिवाय बऱ्याच खेड्यांची लोकवस्ती यापेक्षाही जास्त होती व त्याचा समावेश शहर म्हणून झालेला होता. म्हणूनच महाराष्ट्रात १९५१ साली पाचव्या वर्गाच्या शहरांची संख्या १८८ होती ती १९६१ साली ७३ वर स्थिरावली. त्याचप्रमाणे ६ व्या वर्गाच्या शहरांची संख्या ३६ वरून १४ वर आली. या पुढील विश्लेषण शहरांच्या वर्गवारीमध्ये केलेले आहे.

### ◆ पहिल्या वर्गाची शहरे

**महाराष्ट्रात १९५१ साली पहिल्या वर्गाची (१ लाख लोकवस्तीपेक्षा जास्त) ९ शहरे होती.** याची संख्या १९७१ साली १८ शहरे झाली तर **१९९१ साली २७ शहरे आहेत. २००१ सालानुसार यांची संख्या ४० पर्यंत वाढलेली आहे.**

याच काळात महाराष्ट्रात पहिल्या वर्गाच्या शहरात **१९५१ साली ५० लाख,** १९७१ साली **१ कोटी** ११ लाख तर **१९९१ साली २ कोटी ७ लाख लोक राहत आहेत** असे आढळते. **२००१ सालानुसार, ३ कोटी १९ लाख लोक राहत आहेत. टक्केवारीने** पाहता, **१९५१ साली महाराष्ट्रात पहिल्या वर्गात नागरी लोकसंख्येपैकी ५४%,** १९७१ साली ७१% तर **१९९१ साली ७८% नागरी लोक** राहत होते. **२००१ सालानुसार, ७७.७३% लोक राहत आहेत. यावरून असे लक्षात येते की, राज्यात पहिल्या वर्गाच्या शहरांचा वाटा सर्वांत जास्त आहे.**

#### पहिल्या वर्गाच्या काही शहरांची वैशिष्ट्ये :

**मुंबई शहर व मुंबई उपनगर :** बृहन्मुंबईची वाढ झपाट्याने झालेली आहे. **१९५१ साली बृहन्मुंबईची लोकसंख्या ३० लाख** होती. ती १९७१ साली ६० लाख झाली. म्हणजे २० वर्षांत दुप्पट झाली तर **१९९१ साली ९९ लाखांपर्यंत वाढ** झालेली आहे. याचा अर्थ पुढील २० वर्षांत लोकसंख्या पुन्हा दीड पटीने झालेली आहे. या काळात दशवार्षिक वाढ ३८% ते ५३% पर्यंत झालेली आहे. १९९१ नंतर बृहन्मुंबईचे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले. एक मुंबई शहर जिल्हा व दुसरा मुंबई उपनगर जिल्हा होय.

२००१ साली मुंबई शहराची लोकसंख्या ३३ लाख तर मुंबई उपनगराची लोकसंख्या ८६ लाख झालेली आहे. याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यात कल्याण-डोंबिवलीची लोकसंख्या सुमारे १२ लाखांपर्यंत गेली आहे, तर ठाण्याची लोकवस्ती सुमारे १२.६ लाख आहे.

**पुणे :** पुणे शहराची **१९५१ साली ६ लाख लोकसंख्या** होती. ती १९७१ साली ११ लाखांपर्यंत वाढली. २० वर्षांत जवळजवळ दुप्पट झाली तर **१९९१ साली २५ लाखांपर्यंत लोकसंख्या** वाढत गेली. १९७१ ते १९९१ दरम्यान लोकसंख्येची एकूण वाढ दुपटीपेक्षा जास्त झालेली आहे. **पुणे शहराची वाढ याचप्रमाणे** त्याच्या परिसरात **उभारलेले औद्योगिक कारखाने यामुळे पिंपरी-चिंचवडची नवीन नगरपालिका स्थापन** केलेली आहे. २००१ साली पुण्याची लोकसंख्या २५ लाख तर पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या १० लाखांपर्यंत वाढली.

**नागपूर :** मुंबई व पुणे शहराच्या मानाने **नागपूरच्या लोकसंख्येची वाढ मर्यादित स्वरूपात** आढळते. नागपूरची १९५१ साली **लोकसंख्या ५ लाख** होती. ती १९७१ साली ९ लाखांपर्यंत वाढली तर **१९९१ साली १७ लाखांपर्यंत झाली.** लोकसंख्येच्या दशवार्षिक वाढीचा वेग १९५१-६१ दरम्यान ४२% होता तर १९८१-९१ दरम्यान तो २८% पर्यंत खाली आलेला आहे. २००१ साली नागपूरची लोकसंख्या २०.५ लाख आहे.

**नाशिक :** नाशिक नगराची वाढही झपाट्याने होत आहे. २००१ साली नाशिकची लोकसंख्या ११ लाख झालेली आहे.

महाराष्ट्रात (१) बुलडाणा जिल्हा, (२) रायगड जिल्हा, (३) सातारा जिल्हा, (४) उस्मानाबाद जिल्हा, (५) रत्नागिरी जिल्हा, (६) गडचिरोली जिल्हा, (७) सिंधुदुर्ग जिल्ह्यात १ लाख लोकवस्तीचे एकही शहर नाही.

### ◆ दुसऱ्या वर्गाची शहरे (५०,००० ते ९९,९९९ लोकसंख्या)

**१९५१ साली ११ शहरे होती तर १९९१ साली २८ शहरांपर्यंत संख्या वाढली. २००१ सालानुसार, शहरांची संख्या ४४ पर्यंत वाढली.** दुसऱ्या वर्गाच्या शहरांच्या नागरी **लोकसंख्येत ७ ते ८% वाटा** आहे. अशा शहराची **एकूण लोकसंख्या १९५१** साली ७ लाख **होती. ती १९९१ साली सुमारे २० लाखांपर्यंत वाढली. २००१ सालानुसार, शहरांची लोकसंख्या ३१.१५ लाखांपर्यंत वाढली.**

### ◆ तिसऱ्या वर्गाची शहरे (२०,००० ते ४९,९९९ लोकसंख्या)

**१९५१ साली फक्त २९** होती ती १९७१ साली ६० झाली. म्हणजे २० वर्षांत जवळजवळ दुप्पट झाली तर १९९१ साली **तिसऱ्या वर्गाच्या शहरांची संख्या १०३** पर्यंत वाढली. **२००१ सालानुसार, शहरांची संख्या १३५ पर्यंत वाढली.** तिसऱ्या वर्गाच्या शहरांची **१९५१ साली एकूण लोकसंख्या ८ लाख होती. ती १९९१ साली सुमारे ३२** लाख झाली. म्हणजे ४० वर्षांच्या काळात चौपट वाढ झालेली आहे. **२००१ सालानुसार, तिसऱ्या वर्गाच्या शहरांची लोकसंख्या ४१.७२ लाखांपर्यंत वाढली. महाराष्ट्रातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी तिसऱ्या वर्गाच्या शहरात १०.१५% लोक राहतात. महाराष्ट्रात २०,००० ते ४९,९९९ लोकसंख्या असणाऱ्या तिसऱ्या वर्गाच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ झालेली आहे.**

### ◆ चौथ्या वर्गाची शहरे (१०,००० ते १९,९९९)

१९५१ साली चौथ्या वर्गाच्या शहराची संख्या ७९ होती. ती १९७१ व १९८१ साली ९१ होती तर **१९९१ साली शहरांची संख्या ८३ पर्यंत** आली. २००१ सालानुसार, शहरांची संख्या १०१ पर्यंत वाढली. १९५१ साली चौथ्या वर्गाच्या शहरांची लोकसंख्या ११ लाख होती, ती १९७१ साली १२.८५ लाख झाली तर २००१ सालानुसार लोकसंख्या १४.७१ लाखांपर्यंत वाढली. नागरी लोकसंख्येची टक्केवारी पाहताना मात्र चौथ्या वर्गाच्या शहरामध्ये घट झालेली आढळते. १९५१ साली या गटाच्या नागरी लोकसंख्येची टक्केवारी १२ होती, ती १९७१ साली ८ टक्क्यांपर्यंत खाली तर २००१ सालानुसार याची घसरण ३.५८ टक्क्यांपर्यंत झालेली आहे.


### ◆ पाचव्या वर्गाची शहरे (५००० ते ९९९९)

महाराष्ट्रामध्ये १९५१ साली पाचव्या वर्गाच्या शहरांची संख्या १८८ होती, ती १९६१ साली ७३ पर्यंत घसरली. याचे कारण भारतीय जनगणनेने नगराची व्याख्या बदलली. यामध्ये बिगर शेतीव्यवसायाचे ७५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाण व लोकसंख्येची किमान घनता ४०० यांचा समावेश केला. १९८१ साली पाचव्या वर्गाच्या शहरांची संख्या ४२ टक्क्यांपर्यंत खाली आली तर २००१ सालानुसार शहरांची संख्या ५० पर्यंत वाढलेली आहे.

महाराष्ट्रामध्ये पाचव्या वर्गाच्या शहरांची लोकसंख्या १९५१ साली १३.२९ लाख होती, ती १९७१ साली ४.४१ लाखांपर्यंत एवढी खाली तर १९९१ साली ३.१४ लाखांवर स्थिरावली. २००१ सालानुसार पाचव्या वर्गाच्या शहरांची लोकसंख्या ३.६५ लाखांपर्यंत झाली.

पाचव्या वर्गाच्या शहराच्या टक्केवारीमध्ये झपाट्याने घट होत आहे. १९५१ साली या वर्गाची नागरी लोकसंख्येची टक्केवारी १८ होती, ती १९७१ साली ३ टक्क्यांपर्यंत खाली घसरली तर २००१ सालानुसार शहरांची लोकसंख्येची टक्केवारी फक्त ०.८९ टक्के आहे.






आलेख क्र. ७.६ : महाराष्ट्र — शहरांची वर्गवारी

◆ **सहाव्या वर्गाची शहरे (५००० पेक्षा कमी)**

महाराष्ट्रात सहाव्या वर्गाच्या शहरांचा वाटा एकूण नागरी लोकसंख्येत नगण्य आहे. याची संख्या १९५१ साली ३६ होती. ती १९९१ साली फक्त ९ झाली. २००१ सालानुसार, शहरांची संख्या ८ आहे. याचप्रमाणे याच काळात सहाव्या वर्गाच्या शहरांची लोकसंख्या १.४ लाखांवरून ती २९,००० पर्यंत घसरलेली आहे.

## राज्यामधील दशलक्ष नगरे

२००१ सालच्या जनगणनेनुसार राज्यात ७ शहरांची लोकसंख्या दशलक्षांपेक्षा जास्त आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) मुंबई व मुंबई उपनगर | : | १ कोटी १९ लाख | (२) पुणे | : | २५ लाख ३८ हजार |
| (३) नागपूर | : | २० लाख ५२ हजार | (४) ठाणे | : | १२ लाख ६३ हजार |
| (५) कल्याण, डोंबिवली | : | ११ लाख, ९४ लाख | (६) नाशिक | : | १० लाख ७७ हजार |
| (७) पिंपरी-चिंचवड | : | १० लाख १२ हजार | | | |

## महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीचे जिल्हावार वितरण - २००१

महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्येची टक्केवारी ४२.४३ टक्के आहे. याची वैशिष्टे पुढीलप्रमाणे :

**(१) महाराष्ट्रात १००% नागरी लोकवस्ती असणारे जिल्हे : महाराष्ट्रात मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे संपूर्णतः १०० टक्के नागरी लोकवस्ती असणारे जिल्हे आहेत.**




नकाशा क्र. ७.४ : महाराष्ट्र — नागरी लोकसंख्येची टक्केवारी (२००१)



**(२) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्या ५०.०१ ते ७५.०० टक्के दरम्यान असणारे जिल्हे :** महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यात नागरी लोकसंख्या ७२.५८ टक्के आहे. बृहन्मुंबईला बिलगून असणाऱ्या ठाणे जिल्ह्यात भारतामधून आणि महाराष्ट्रामधून स्थलांतर झालेल्या लोकांमुळे नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये भर पडलेली आहे. या खालोखाल नागपूर जिल्ह्यात नागरी लोकसंख्येची टक्केवारी ६४.२६% आणि पुणे जिल्ह्याची नागरी लोकसंख्येची टक्केवारी ५८.०८% आहे.

**(३) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीमधील पहिले पाच जिल्हे :** महाराष्ट्रात (१) मुंबई शहर (२) मुंबई उपनगर (३) ठाणे जिल्हा (४) नागपूर जिल्हा (५) पुणे जिल्हा यांचा समावेश नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये महाराष्ट्रामधील पहिल्या पाच जिल्ह्यांत होतो.

**(४) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीमधील शेवटचे पाच जिल्हे :** महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीमधील सर्वांत शेवटचा जिल्हा गडचिरोली असून त्याची टक्केवारी फक्त ६.३ टक्के आहे. यानंतर सिंधुदुर्ग जिल्हा (९.४७%), रत्नागिरी जिल्हा (११.३३%), गोंदिया जिल्हा (११.९५%) आणि सातारा जिल्हा (१४.१७%) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

**(५) महाराष्ट्रात प्रशासकीय विभागानुसार नागरी लोकसंख्येचे टक्केवारीचे स्वरूप :** महाराष्ट्रात प्रशासकीय विभागानुसार, नागरी लोकसंख्येच्या टक्केवारीमध्ये कोकण विभागाचा (७५.११%) सर्वांत पहिला क्रमांक आहे तर सर्वांत शेवटचा क्रमांक औरंगाबाद विभागाचा (२४.५३%) आहे.

**(६) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येची टक्केवारी ३०.०१ ते ४०.०० टक्के दरम्यान असणाऱ्या जिल्ह्यांचे स्वरूप :** महाराष्ट्रामध्ये या गटात सर्वांत जास्त नागरी टक्केवारी असणारा जिल्हा नाशिक (३८.८०%) असून सर्वांत शेवटचा जिल्हा सोलापूर (३१.८३%); या दरम्यान अकोला जिल्हा (३८.४९%), परभणी जिल्हा, औरंगाबाद जिल्हा, अमरावती जिल्हा आणि चंद्रपूर जिल्हा (३२.११%) असे उतरत्या क्रमाने आहेत.

**(७) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येची टक्केवारी २०.०१ ते ३० टक्के दरम्यान असणाऱ्या जिल्ह्यांचे स्वरूप :** या गटात कोल्हापूर जिल्हा (२९.८१%) आहे तर पिछाडीवर बुलडाणा जिल्हा (२१.२०%) आहे. यांच्या दरम्यान उतरत्या क्रमाने जळगाव जिल्हा (२८.५९%), वर्धा जिल्हा, धुळे जिल्हा, सांगली जिल्हा, रायगड जिल्हा, नांदेड जिल्हा, लातूर जिल्हा (२३.५७%) असे जिल्हे येतात.

**(८) महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येची टक्केवारी १०.०१ ते २० टक्के असणारे जिल्हे :** या गटात बारा जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये सर्वांत जास्त नागरी लोकसंख्येची टक्केवारी अहमदनगर जिल्ह्याची (१९.८९%) आहे तर सर्वांत कमी नागरी लोकसंख्येची टक्केवारी रत्नागिरी जिल्ह्याची (११.३३%) आहे. महाराष्ट्रामधील वर उल्लेख न झालेल्या सर्व जिल्ह्यांचा या गटामध्ये समावेश होतो.

## महाराष्ट्रामधील शहर संकुले (Urban Agglomerations) : जनगणना २००१

शहर संकुलाची संकल्पना *(Concept of Urban Agglomeration)* :

**एखाद्या मोठ्या शहराच्या सभोवती लहान-लहान शहरे/खेडी असतात. शहराच्या विकासाच्या प्रक्रियेत मोठी शहरे अशा लहान शहरे/खेड्यांपर्यंत पसरत जातात व ती मोठ्या शहराशी संलग्न होतात. कालांतराने मोठे शहर आणि सभोवतालची लहान-लहान शहरे यांचा पुंजका बनतो व ती एकमेकांशी रस्ते व रेल्वेमार्गाने जोडली जातात, याला 'शहर संकुल' *(Urban Agglomeration)* असे संबोधले जाते.**

महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार चौदा शहर-संकुले आहेत.

**(१) बृहन्मुंबई शहर संकुल :**

**महाराष्ट्रामधील सर्वांत मोठे आणि महत्त्वपूर्ण बृहन्मुंबई शहर संकुल आहे. याची २००१ सालच्या जनगणनेनुसार लोकसंख्या १ कोटी ६४ लाख ३५ हजार आहे.**

बृहन्मुंबई शहर संकुलामध्ये दोन विभाग आहेत :

(अ) बृहन्मुंबई (ब) ठाणे जिल्ह्यातील नगरे.

**(अ) बृहन्मुंबई :** बृहन्मुंबई दोन जिल्ह्यांचा मिळून झालेला आहे : (i) मुंबई शहर (ii) मुंबई उपनगर. २००१ सालच्या जनगणनेनुसार, मुंबई शहराची लोकसंख्या ३३,२६,८०० आहे तर मुंबई उपनगराची लोकसंख्या ८५,८७,६०० आहे.


**(ब) ठाणे जिल्ह्यातील शहरे (नगरे) :** बृहन्मुंबई शहर संकुलाचा विस्तारित भाग ठाणे जिल्ह्यामध्ये पसरलेला आहे. यांच्या अंतर्गत पाच महानगरपालिका आणि दोन नगरपरिषद यांचा समावेश केलेला आहे.

(i) कल्याण - डोंबिवली (११.९४ लाख) (ii) ठाणे (१२.६३ लाख)

(iii) उल्हासनगर (४.७४ लाख) (iv) नवी मुंबई (७.०४ लाख)

(v) मीरा-भाईंदर (५.२० लाख) (vi) अंबरनाथ (२.०४ लाख) : नगरपरिषद

(vii) बदलापूर (९८,०००) : नगरपरिषद




नकाशा क्र. ७.५ : बृहन्मुंबई व ठाणे शहर संकुल



**(२) पुणे शहर संकुल :**

महाराष्ट्रात बृहन्मुंबई शहर संकुलानंतर महत्त्वपूर्ण पुणे शहर संकुल आहे. याची २००१ सालच्या जनगणनेनुसार, लोकसंख्या ३७.५९ लाख आहे.

पुणे शहर संकुलामध्ये २ शहरे, ३ कटक मंडळे (कँटोन्मेंट) आणि १ गणना शहर आहे.

(i) पुणे (२५.३८ लाख) (ii) पिंपरी-चिंचवड (१०.१२ लाख)

(iii) पुणे कटक मंडळ (कँटोन्मेंट) (८०,०००) (iv) खडकी कटक मंडळ (७७,०००)

(v) देहूरोड कटक मंडळ (४७,०००) (vi) देहू गणना शहर (५,०००)

**(३) नागपूर शहर संकुल :**

नागपूर शहर संकुलाची २००१ सालच्या जनगणनेनुसार, लोकसंख्या २१.२९ लाख आहे. यामध्ये (i) नागपूर (२०.५२ लाख), (ii) वाडी (४०,०००) (iii) डिंगडोह (३७,०००) यांचा समावेश होतो.

**(४) नाशिक शहर संकुल :**

नाशिक शहर संकुलाची लोकसंख्या ११.५२ लाख आहे. यामध्ये (i) नाशिक (१०.७७ लाख), (ii) देवळाली (कटक मंडळ) (५१,०००), (iii) भगूर (१२,०००), (iv) एकलहरे (१२,०००) यांचा समावेश होतो.

**(५) औरंगाबाद शहर संकुल :**

औरंगाबाद शहर संकुलाची लोकसंख्या ८.९२ लाख आहे. यामध्ये (i) औरंगाबाद (८.७३ लाख) आणि (ii) औरंगाबाद कटक मंडळ (१९,०००) यांचा समावेश होतो.

**(६) कोल्हापूर शहर संकुल :**

कोल्हापूर शहर संकुलाची लोकसंख्या ५.०५ लाख आहे. यामध्ये (i) कोल्हापूर (४.९३ लाख) व (ii) गांधीनगर (१२,०००) यांचा समावेश होतो.

**(७) भिवंडी शहर संकुल :**

भिवंडी शहर संकुलाची लोकसंख्या ६.२१ लाख आहे. यामध्ये (i) भिवंडी (५.९९ लाख) आणि (ii) खोनी (२३,०००) यांचा समावेश होतो.

**(८) सांगली शहर संकुल :**

सांगली शहर संकुलाची लोकसंख्या ४.४८ लाख आहे. यामध्ये (i) सांगली-मिरज-कुपवाड (४.३७ लाख) आणि (ii) माधवनगर (११,०००) यांचा समावेश होतो.

**(९) इचलकरंजी शहर संकुल :**


इचलकरंजी शहर संकुलाची लोकसंख्या २.८६ लाख आहे. यामध्ये (i) इचलकरंजी (२.५८ लाख) आणि (ii) कबनूर (२८,०००) यांचा समावेश होतो.

**(१०) अहमदनगर शहर संकुल :**

अहमदनगर शहर संकुलाची लोकसंख्या ३.४८ लाख आहे. यामध्ये (i) अहमदनगर (३.०८) आणि (ii) अहमदनगर (कटक मंडळ) यांचा समावेश होतो.

**(११) भुसावळ शहर संकुल :**

भुसावळ शहर संकुलाची लोकसंख्या १.८८ लाख आहे. यामध्ये (i) भुसावळ (१.७२ लाख) आणि (ii) कन्हारी (१५,०००) यांचा समावेश होतो.




नकाशा क्र. ७.६ : महाराष्ट्र — शहर संकुले



**(१२) वसई – विरार शहर संकुल :**

वसई-विरार शहर संकुलाची लोकसंख्या १.७४ लाख आहे. यामध्ये (i) वसई (४९,०००), (ii) नवघर-माणिकपूर (१.१७ लाख) आणि (iii) संदोर (८,०००) यांचा समावेश होतो.

**(१३) कामटी शहर संकुल :**

कामटी शहर संकुलाची लोकसंख्या १.३७ लाख आहे. यामध्ये (i) कामटी (८४,०००) (ii) कन्हान पिपरी (२२,०००) (iii) टेकाडी (१७,०००) आणि (iv) कामटी कटक मंडळ (१४,०००) यांचा समावेश होतो.

**(१४) यवतमाळ शहर संकुल :**

यवतमाळ शहर संकुलाची लोकसंख्या १.५५ लाख आहे. यामध्ये (i) यवतमाळ (१.२१ लाख) आणि (ii) उमरखेड (३४,०००) यांचा समावेश होतो.

## महाराष्ट्र : महानगरपालिका

**महाराष्ट्रामध्ये २००७ सालानुसार, २३ नगरपालिका आहेत. यांची एकूण लोकसंख्या २ कोटी ९२ लाख १० हजार आहे. महानगरपालिकांमधील एकूण सदस्यांची संख्या २२३.२ असून यांपैकी ७१४ सदस्य स्त्रिया आहेत.**

याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

**(१) महाराष्ट्रामधील पहिल्या पाच महानगरपालिका आणि त्याची लोकसंख्या :**

(i) बृहन्मुंबई (११९.७८ लाख)
(ii) पुणे (२५.३८ लाख)
(iii) नागपूर (२०.५२ लाख)
(iv) ठाणे (१२.८३ लाख)
(v) कल्याण - डोंबिवली (११.९४ लाख)

महाराष्ट्रामधील पहिल्या पाच महानगरपालिकांची एकत्रित लोकसंख्या १ कोटी ९० लाख ४५ हजार आहे. **महानगरपालिकांच्या लोकसंख्येच्या ६५.२० टक्के लोक पाच महानगरपालिकांमध्ये वास्तव्य करतात तर बृहन्मुंबईमध्ये ४०.९ टक्के लोक राहतात.**

**(२) महाराष्ट्रामधील लोकसंख्यादृष्ट्या शेवटच्या पाच महानगरपालिका :**

**महाराष्ट्रामध्ये लोकसंख्यादृष्टचा सर्वांत शेवटची नगरपालिका वसई-विरार (२.९३ लाख)** आहे. यानंतर अहमदनगर (३.०८ लाख), धुळे (३.४२ लाख), जळगाव (३.६९ लाख) आणि अकोला (४.०१) नगरपालिका यांचे क्रमांक आहेत.


**१ लाख किंवा अधिक लोकसंख्या असणारी शहरे :**

महाराष्ट्रातील महानगरपालिका वगळता १ लाख किंवा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांची संख्या १६ आहे. यामध्ये सर्वांत जास्त लोकसंख्या लातूर शहराची (३ लाख) आहे. या खालोखाल चंद्रपूर (२.८६ लाख), परभणी (२.५९ लाख), इचलकरंजी (२.५८ लाख), जालना (२.३६ लाख) आणि अंबरनाथ (२.०४ लाख) असे क्रमांक आहेत. उर्वरित शहरे व त्यांची लोकसंख्या तक्ता क्र. ७.५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ७.५ : महाराष्ट्रामधील महानगरपालिकेव्यतिरिक्त १ लाख किंवा अधिक लोकसंख्या असणाऱ्या नगरपरिषदा - २००१**

| शहरे | लोकसंख्या (लाख) | शहरे | लोकसंख्या (लाख) | शहरे | लोकसंख्या (लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १. अंबरनाथ | २.०४ | ७. इचलकरंजी | २.५८ | १३. जालना | २.३६ |
| २. लातूर | ३.०० | ८. परभणी | २.५९ | १४. यवतमाळ | १.२१ |
| ३. भुसावळ | १.७२ | ९. नालासोपारा | १.८५ | १५. वर्धा | १.११ |
| ४. बीड | १.३८ | १०. गोंदिया | १.२१ | १६. बार्शी | १.०५ |
| ५. सातारा | १.०८ | ११. अचलपूर | १.०७ | | |
| ६. पनवेल | १.०४ | १२. चंद्रपूर | २.८९ | | |

संदर्भ : महाराष्ट्र संक्षिप्त सांख्यिकी, २००७; पान नं. २८ ते ३०.




नकाशा क्र. ७.७ : महाराष्ट्र — १ लाख किंवा अधिक लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिका आणि नगरपरिषदा



## XI. अनुसूचित जाती-जमाती

**अनुसूचित जाती :** भारतीय घटनेच्या कलम ३४१ अन्वये राष्ट्रपतींच्या आदेशानुसार भारतीय समाजातील काही जातीय गटांना अनुसूचित जाती असे घोषित केले आहे. इ. स. १९५० मध्ये अमलात आलेल्या स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने 'अनुसूचित जाती' या शब्दप्रयोगाचा स्वीकार केला.

सर्वसाधारणपणे मागासवर्गीय सामाजिक गट सूचित करण्याच्या हेतूने अनुसूचित जाती हा शब्दप्रयोग केलेला आढळतो. भारतीय राज्यघटनेने कलम ३६६ अन्वये अनुसूचित जातीची व्याख्या केलेली आहे. **''भारतीय घटनेपुरता विचार करावयाचा झाल्यास घटनेच्या कलम ३४१ अनुसार ज्या जाती, वंश, जनजाती अथवा जाती यांचे भाग अथवा त्यातील गट यांचा अनुसूचित जाती म्हणून उल्लेख केला असेल त्या सामाजिक गटांना 'अनुसूचित जाती' असे मानले जाईल.''**

**अनुसूचित जमाती : ''भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ (१) अनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना 'अनुसूचित जमाती' असे म्हणतात.''** यात एकाकी, डोंगरावर व जंगलात राहणारे व ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवनाचा परिचय होऊ शकला नाही अशांचा समावेश होतो. अशा लोकांना 'गिरीजन' किंवा 'आदिवासी' असे म्हणतात. यांचे मागासलेपण हे मुख्यत: आर्थिक व सांस्कृतिक आहे. इतर सर्व भारतीयांपेक्षा शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेला समाज म्हणजे 'अनुसूचित जमाती' होय.

महाराष्ट्रात डोंगराळ प्रदेशात घनदाट अरण्यात आदिवासी लोकांचे वास्तव्य आढळते ते बऱ्याच भागात विखुरलेले आहेत. राज्यात आदिवासी लोकांचे वास्तव्य प्रामुख्याने सह्याद्री पर्वत, सातपुडा पर्वतरांगा व गोंडवन विभागात (विदर्भ) पाहावयास मिळते.

आदिवासी लोकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते :

(अ) अनुसूचित जाती (ब) अनुसूचित जमाती

### (अ) अनुसूचित जाती

महाराष्ट्र शासनाने वर्गीकृत जातींची यादी प्रसिद्ध केलेली आहे. अनुसूचित जातींमध्ये महार, मातंग, चर्मकार यांची लोकसंख्या जास्त आहे. याचप्रमाणे होलिया, होलार, ढोर, खाटिक, मेडगी, मेहतर, डोंब, बेरड, शेणवी इत्यादींचा समावेश अनुसूचित जातींमध्ये केलेला आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जातींमध्ये नवबौद्धाचा समावेश केलेला आहे.

महाराष्ट्रात १९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या ८७,५८,००० आहे. त्याचे एकूण लोकसंख्येशी सुमारे ११% प्रमाण आहे. अनुसूचित जातींमध्ये साक्षरतेचे प्रमाण ५६% आहे. १९८१ साली अनुसूचित जातीची लोकसंख्या ४४,८०,००० होती. त्याचे एकूण लोकसंख्येशी ७.१% प्रमाण होते.


२००१ सालच्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या ९८.८२ लाख आहे. यांपैकी ५०.६३ लाख पुरुष व ४८.१९ लाख स्त्रियांची आहे. ग्रामीण भागात अनुसूचित जातींचे ६१.७ लोक राहतात. राज्यात अनुसूचित जातींचे प्रमाण १०.२% आहे.

### (ब) अनुसूचित जमाती

महाराष्ट्रात अनुसूचित जमाती सुमारे ४७ आहेत. यांचे वास्तव्य प्रामुख्याने डोंगराळ भागात व अरण्यात आहे. यांचे वास्तव्य पुढील प्रदेशात आढळते.

**(अ) सह्याद्री पर्वतमय प्रदेश :** महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतरांगांचा प्रदेश व्यापलेले कोकणातील ठाणे, रायगड तसेच पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, पुणे जिल्ह्यात मुख्यत्वेकरून पश्चिम भागात अनुसूचित जमाती राहतात. सह्याद्री पर्वतमय प्रदेशात महादेव कोळी, वारली, पारधी, ठाकर, मल्हार, कोळी, भिल्ल, कायोळी, कातकरी इत्यादी अनुसूचित जमाती वास्तव्य करतात.

**ठाणे जिल्ह्यात तळासरी, डहाणू, जव्हार, मोखाडे व जव्हार तालुके तसेच नाशिक जिल्ह्यात सुरगणा व कळवण तालुक्यात मुख्यत्वेकरून अनुसूचित जमातींचे केंद्रीकरण झालेले आहे.**




**आदिवासी जमाती :**


महाराष्ट्रात सहयाद्री पर्वतरांगेत ठाणे, रायगड तसेच नाशिक, अहमदनगर व पुणे जिल्ह्याचा पश्चिम भाग, सातपुडा पर्वतरांगेत नंदुरबार, धुळे, जळगाव व अमरावती तसेच अकोला व बुलडाणा जिल्हा; विदर्भात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली तर मराठवाड्यात नांदेड व परभणी-हिंगोली जिल्ह्यात अनुसूचित जमाती राहतात. विदर्भात गडचिरोली जिल्ह्यात कुरखेडा, धानोरा, इटापल्ली, अहेरी, सिरोंचा; नंदुरबार जिल्ह्यात अक्राणी, अक्कलकुवा, नवापूर; अमरावती जिल्ह्यात धारणी व चिखलदरा; ठाणे जिल्ह्यात तळासरी, डहाणू, जव्हार, मोखाडे व जव्हार; नाशिक जिल्ह्यात सुरगणा व कळवण तालुक्यात अनुसूचित जमातीचे केंद्रीकरण झालेले आहे.

**नकाशा क्र. ७.८ : महाराष्ट्र : आदिवासी जमाती**

**ठाणे जिल्ह्यातील** पालघर, वसई, वाडा, भिवंडी, कल्याण व उल्हासनगर; **रायगड जिल्ह्यातील** पनवेल, खालापूर, कर्जत व पेण; **नाशिक जिल्ह्यातील** सटाणा, दिंडोरी, नाशिक, इगतपुरी व सिन्नर; **अहमदनगर जिल्ह्यातील** जुन्नर; **पुणे जिल्ह्यात** आंबेगाव, खेड व मावळ तालुक्यात अनुसूचित जमाती विखुरलेल्या आहेत.

**(ब) सातपुडा पर्वतमय प्रदेश :** महाराष्ट्रात उत्तर भागात सातपुडा पर्वताच्या काही रांगा पसरलेल्या आहेत. धुळे, नंदुरबार, जळगाव व अमरावती त्याचप्रमाणे अकोला व बुलडाणा जिल्ह्यात अनुसूचित जमाती राहतात. सातपुडा पर्वतरांगांच्या परिसरात गोमित, पारधी, भिल्ल, कोरकू, गोंड, ढाणका इत्यादी अनुसूचित जमाती वास्तव्य करतात.






**नकाशा क्र. ७.९ : आदिवासी विभाग — धुळे, नंदुरबार, गडचिरोली**

नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी, अक्कलकुवा, नवापूर तसेच **अमरावती जिल्ह्यात** धारणी व चिखलदरा तालुक्यात अनुसूचित जमातींचे केंद्रीकरण झालेले आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादे व **धुळे जिल्ह्यातील** साक्री, शिरपूर; **जळगाव जिल्ह्यातील** चोपडा, यावल व रावेर; **अमरावती जिल्ह्यातील** मोर्शी व वरुड; **अकोला जिल्ह्यातील** तेल्हारा, अकोट व पातूर; तसेच **बुलडाणा जिल्ह्यातील** मेहेकर तालुक्यात अनुसूचित जमाती विखुरलेल्या आहेत.

**(क) गोंडवन प्रदेश (विदर्भ व मराठवाडा) :** महाराष्ट्रात गोंडवन प्रदेशात विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे तसेच मराठवाड्यातील नांदेड व परभणी, हिंगोली जिल्ह्यांत अनुसूचित जमातींचे वास्तव्य आढळते. गोंडवन प्रदेशात हळबा, पारधी, कोळंब, अध, गोंड, माडिया-गोंड, कोथा इत्यादी अनुसूचित जमाती राहतात.

**गडचिरोली जिल्ह्यातील** कुरखेडा, धानोरा, एटापल्ली, अहेरी व सिरोंचा तालुक्यात अनुसूचित जमातींचे केंद्रीकरण झालेले आहे.

**यवतमाळ जिल्ह्यातील** दारव्हा व वणी तालुके वगळून उरलेले सर्व तालुके; **वर्धा जिल्ह्यातील करंजा,** सेलू, आर्वी; **नागपूर जिल्ह्यातील** काटोल, रामटेक व पारशिवनी; **भंडारा जिल्ह्यातील** तुमसर, तिरोडा; **गोंदिया जिल्ह्यातील** गोंदिया, आमगाव, सालेकसा, गोरेगाव, देवरी, मोरगाव (अर्जुनी); **संपूर्ण चंद्रपूर जिल्हा** तसेच **गडचिरोली जिल्ह्यातील** चार्मोशी, गडचिरोली व आरमोरी तालुक्यातील अनुसूचित जमाती विखुरलेल्या आहेत.

**मराठवाड्यात** अनुसूचित जमातींचे प्रमाण कमी आहे. **नांदेड जिल्ह्यात** किनवट, हदगाव, **भोकर** तर **हिंगोली जिल्ह्यात** हिंगोली व कळमनुरी तालुक्यात अनुसूचित जमाती विखुरलेल्या आहेत.

महाराष्ट्रात १९९१ च्या जनगणनेनुसार भटक्या व विमुक्त जातींची लोकसंख्या सुमारे २० लाख आहे.

महाराष्ट्रात अनुसूचित जमातींची लोकसंख्या १९८१ साली सुमारे ५८ लाख होती. ती १९९१ साली ७३ लाखांपर्यंत वाढली. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जमातींची टक्केवारी ९.३% आहे. अनुसूचित जमातींमध्ये १९९१ च्या आकडेवारीनुसार साक्षरतेचे सरासरी प्रमाण सुमारे ३७% आहे. यामध्ये पुरुषांचे प्रमाण ४९% तर स्त्रियांचे प्रमाण फक्त २४% आहे.

महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातींची लोकसंख्या ८५.७७ लाख आहे. यामध्ये पुरुष ४३.६८ लाख व स्त्रियांची संख्या ४२.४९ लाख आहे. राज्यात अनुसूचित जमाती ८.५% आहेत. ग्रामीण भागात अनुसूचित जमातींचे ८७.३% लोक राहतात.

## महाराष्ट्रामधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची लोकसंख्या

### (अ) अनुसूचित जातींची लोकसंख्या वितरण - २००१

**महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या ९८,८१,६५६ असून तिची एकूण लोकसंख्येशी १०.२० टक्केवारी आहे.**




**नकाशा क्र. ७.१० : महाराष्ट्र — अनुसूचित जातींची लोकसंख्या (२००१)**

याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

**(१) अनुसूचित जातींच्या लोकसंख्येनुसार पहिले पाच जिल्हे : महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या लोकसंख्येनुसार सर्वांत प्रथम क्रमांक पुणे जिल्ह्याचा असून अनुसूचित जातींची लोकसंख्या ७.६२ लाख (७.७१%) आहे.** या खालोखाल नागपूर जिल्हा : ६.९६ लाख (७.०%) आहे. सोलापूर जिल्हा : ५.७८ लाख (५.८५%); नांदेड जिल्हा : ४.९८ लाख (५.०४%); अहमदनगर जिल्हा : ४.८५ लाख (४.९०%) असे क्रमांक आहेत. **महाराष्ट्रामधील वरील पाच जिल्ह्यांची मिळून अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची टक्केवारी ३०.५ आहे.**

**(२) अनुसूचित जातीच्या लोकसंख्येनुसार शेवटचे पाच जिल्हे : महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या लोकसंख्येनुसार सर्वांत शेवटचा जिल्हा रत्नागिरी (२४,५१५) आहे.** यानंतर सिंधुदुर्ग जिल्हा (३८,५३६); नंदुरबार जिल्हा (४१,४१२); रायगड जिल्हा (५३,६६७) आणि हिंगोली जिल्हा (१,०७,६९७) असे क्रमांक येतात.



**(३) प्रशासकीय विभागानुसार अनुसूचित जातींची लोकसंख्या :** महाराष्ट्रात प्रशासकीय विभागानुसार अनुसूचित जातींची सर्वांत जास्त लोकसंख्या पुणे विभागात २३.४९ लाख तर सर्वांत कमी लोकसंख्या अमरावती विभागात १२.७२ लाख आहे.

**(४) अनुसूचित जातींची लोकसंख्या ४.०१ लाख ते ५ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** महाराष्ट्रात या गटात पाच जिल्हे आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या ४.५० लाख असून या खालोखाल अमरावती जिल्हा (४.४७ लाख), नाशिक जिल्हा, लातूर जिल्हा आणि मुंबई उपनगर (४.०२ लाख) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

**(५) अनुसूचित जातींची लोकसंख्या ३.०१ लाख ते ४ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात तीन जिल्हे आहेत. अनुसूचित जातींची लोकसंख्या औरंगाबाद जिल्ह्यात ३.७६ लाख असून या खालोखाल ठाणे जिल्हा (३.४० लाख) आणि सांगली जिल्हा (३.१३ लाख) यांचे क्रमांक आहेत.

**(६) अनुसूचित जातींची लोकसंख्या २.०१ लाख ते ३ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. चंद्रपूर जिल्ह्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या २.९७ लाख तर भंडारा जिल्ह्यात ती लोकसंख्या २.०२ लाख आहे. यांच्या दरम्यान अनुसूचित जातींची लोकसंख्या उतरत्या क्रमाने जळगाव जिल्हा, बीड जिल्हा, यवतमाळ जिल्हा, सातारा जिल्हा, उस्मानाबाद आणि बुलडाणा जिल्ह्यात आहे.

**(७) अनुसूचित जातींची लोकसंख्या १.०१ लाख ते २.० लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात दहा जिल्ह्यांचा समावेश होतो. अनुसूचित जातींची लोकसंख्या मुंबई शहरात १.८३ लाख तर गडचिरोली जिल्ह्यात ती लोकसंख्या १.०८ लाख आहे. महाराष्ट्रामधील उर्वरित जिल्ह्यांची अनुसूचित जातींची लोकसंख्या याच्या दरम्यान आहे.

### (ब) अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे वितरण - २००१

महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातींची लोकसंख्या ८५,७७,२७६ **आहे. याची एकूण लोकसंख्येशी** टक्केवारी ८.८५ आहे.

**(१) अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येनुसार पहिले पाच जिल्हे : महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येत सर्वप्रथम ठाणे जिल्हा ११.९९ लाख असून त्याची टक्केवारी १३.९८ आहे.** या खालोखाल नाशिक जिल्हा : ११.९४ लाख (१३.९२%); नंदुरबार जिल्हा : ८.६ लाख (१०.०२%), यवतमाळ जिल्हा : ४.७३ लाख (५.५२%) आणि (५) नागपूर जिल्हा : ४.४४ लाख (५.१८%) असे क्रमांक आहेत. **महाराष्ट्रातील एकूण अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येपैकी वरील पाच जिल्ह्यांत मिळून ४८.६२ टक्के लोक राहतात.**

**(२) अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येनुसार शेवटचे पाच जिल्हे : महाराष्ट्रात अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येनुसार सर्वांत शेवटचा जिल्हा सिंधुदुर्ग (४,९५२) आहे.** यानंतर सांगली जिल्हा (१७,८५५); रत्नागिरी जिल्हा (२०,१०२); मुंबई शहर (२०,६६६) आणि कोल्हापूर जिल्हा (२१,३८७) अशी क्रमवारी आहे.

**(३) प्रशासकीय विभागानुसार अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे स्वरूप :** महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, अनुसूचित जमातींची सर्वांत जास्त लोकसंख्या नाशिक विभागात ३२.३७ लाख (३७.७३%) आहे तर सर्वांत कमी लोकसंख्या पुणे विभागामध्ये ३.९२ लाख (४.५७%) आहे.


**(४) अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४.०१ लाख ते ५ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात वर उल्लेखिलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त धुळे जिल्हा (४.४४ लाख) आणि जळगाव जिल्ह्याचा (४.३६ लाख) समावेश होतो.

**(५) अनुसूचित जमातींची लोकसंख्या ३.०१ लाख ते ४ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात चंद्रपूर जिल्हा (३.७५ लाख); गडचिरोली जिल्हा (३.७२ लाख); अमरावती जिल्हा (३.५७ लाख) आणि अहमदनगर जिल्ह्याचा (३.०३ लाख) समावेश होतो.

**(६) अनुसूचित जमातींची लोकसंख्या २.०१ लाख ते ३ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात रायगड जिल्हा, पुणे जिल्हा आणि नांदेड जिल्ह्यांचा समावेश होतो.

**(७) अनुसूचित जमातींची लोकसंख्या १.०१ लाख ते २ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात गोंदिया जिल्हा (१.९६ लाख); वर्धा जिल्हा, बुलडाणा जिल्हा, अकोला आणि औरंगाबाद जिल्हा (१ लाख) यांचा **समावेश होतो.**

**(८) अनुसूचित जमातींची लोकसंख्या २५,००१ ते १ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटांत आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. भंडारा जिल्ह्याची अनुसूचित जमातीची लोकसंख्या ९८ हजार तर उस्मानाबाद जमातीची लोकसंख्या २८ हजार आहे. या दरम्यान वर उल्लेखिलेल्या व्यतिरिक्त उरलेल्या जिल्ह्यांचा समावेश होतो.




नकाशा क्र. ७.११ : महाराष्ट्र — अनुसूचित जमातींची लोकसंख्या (२००१)

## (क) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या एकत्रित लोकसंख्येची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी टक्केवारी - २००१

महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या एकूण लोकसंख्येशी १९.१ टक्केवारी आहे तर त्यांची लोकसंख्या १,८४,५८,९३२ आहे.

याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

**(१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या एकत्रित लोकसंख्येची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार पहिले पाच जिल्हे :** यानुसार महाराष्ट्रात सर्वांत प्रथम क्रमांक नंदुरबार जिल्ह्याचा (६८.७%) आहे. या खालोखाल गडचिरोली जिल्हा (४९.५%); नाशिक जिल्हा (३२.५%); चंद्रपूर जिल्हा (३२.५%) आणि धुळे जिल्हा (३२.४%) असे जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

**(२) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या एकत्रित लोकसंख्येची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार शेवटचे पाच जिल्हे :** यानुसार सर्वांत शेवटचा जिल्हा रत्नागिरी असून त्याची टक्केवारी फक्त २.६ आहे. यानंतर सिंधुदुर्ग जिल्हा (५.०%), बृहन्मुंबई (५.६९%), सातारा जिल्हा (९.५%) आणि परभणी जिल्ह्यांचा (१२.३%) क्रमांक आहे.



**(३) प्रशासकीय विभागानुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या एकत्रित लोकसंख्येच्या टक्केवारीचे स्वरूप :** यानुसार सर्वांत जास्त टक्केवारी नाशिक विभागाची २९.१४ टक्के आहे तर सर्वांत कमी टक्केवारी कोकण विभागाची १०.५६ टक्के आहे.

**(४) अनुसूचित जाती आणि जमातींच्या एकत्रित लोकसंख्येची जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येशी टक्केवारी :**

**(i) ३०.१ ते ४० टक्के दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात वर उल्लेखिलेले जिल्हे वगळून अमरावती जिल्हा (३०.८%) आणि गोंदिया जिल्ह्याचा (३०.३%) समावेश होतो.

**(ii) २०.१ ते ३० टक्के दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात मराठवाड्यामधील नांदेड जिल्हा (२६.१%) व लातूर जिल्हा (२१.७%); विदर्भातील यवतमाळ जिल्हा (२९.५%), नागपूर जिल्हा (२८.०%) याचप्रमाणे भंडारा जिल्हा (२६.४%); वर्धा जिल्हा (२५.३%) आणि वाशिम जिल्ह्यांचा (२२.९%) समावेश होतो.

**(iii) १०.१ ते २० टक्के दरम्यान असणारे जिल्हे :** अनुसूचित जाती आणि जमातींच्या एकत्रित लोकसंख्येची टक्केवारी असणारे जिल्हे जास्त असल्याने (१५) दोन उपगटात विभागणी केली आहे.

**(iv) १५.१ ते २० टक्के दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात ९ जिल्हे आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या एकत्रित टक्केवारीत सर्वांत जास्त टक्केवारी जळगाव जिल्ह्याची १९.६ टक्के आहे तर सर्वांत कमी टक्केवारी बुलडाणा जिल्ह्याची १६ टक्के आहे. याच्या दरम्यान अहमदनगर जिल्हा (१९.५%), हिंगोली जिल्हा, उस्मानाबाद जिल्हा, ठाणे जिल्हा, सोलापूर जिल्हा, औरंगाबाद जिल्हा, अकोला जिल्हा (१६.५%) उतरत्या क्रमाने आहेत.

**(v) १०.१ ते १५ टक्के दरम्यान असणारे जिल्हे :** या गटात सर्वांत जास्त टक्केवारी रायगड जिल्ह्याची १४.६ टक्के तर सर्वांत कमी टक्केवारी परभणी जिल्ह्याची १२.३ टक्के आहे. या दरम्यान बीड जिल्हा (१४.१%), कोल्हापूर जिल्हा, जालना जिल्हा व सांगली जिल्हा (१२.८%) उतरत्या क्रमाने आहेत.

## महाराष्ट्र : लोकसंख्याशास्त्रीय घटक - २००१*

*** २०११ जनगणनेची लोकसंख्याशास्त्रीय काही घटकांची सांख्यिकी आकडेवारी शासनाने प्रकाशित न केल्याने २००१ सालच्या आकडेवारीचा घटकांनुसार एक दृष्टिक्षेप.**

### I. जन्म-मृत्यूचे प्रमाण : २००१ (दर हजार लोकसंख्येमागे)

| वर्ष | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जन्मदर | मृत्युदर | बाल-मृत्युदर | जन्मदर | मृत्युदर | बाल-मृत्युदर | जन्मदर | मृत्युदर | बाल-मृत्युदर |
| २००१ | २१.२ | ८.५ | ५५ | २०.२ | ५.९ | २८ | २०.७ | ७.५ | ४५ |
| २००८ | १८.४ | ७.४ | ४० | १७.२ | ५.६ | २३ | १७.९ | ६.६ | ३३ |

### II. वयोगट – २००१

| वयोगट | लोकसंख्या (लाख) | टक्केवारी | वयोगट | लोकसंख्या (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ० - ६ | १३६.७० | १४.११ | ५० - ५९ | ६१.२३ | ६.३२ |
| ७ - १४ | १७४.२८ | १७.९९ | ६० + | ८४.५७ | ८.७३ |
| १५ ० ४९ | ५१०.८५ | ५२.७३ | वयाचा उल्लेख नाही. | १.१६ | ०.१२ |
| | | | **एकूण** | ९६८.७९ | १००.०० |

### III. काम करणाऱ्या लोकांची विभागणी : २००१

काम करणाऱ्या एकूण लोकांची संख्या : ४११.७३ लाख

- काम करणाऱ्या पुरुषांची संख्या : २६८.५२ लाख
- काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या : १४३.२१ लाख

**(अ) शेतकरी :**

✻ शेतकऱ्यांची एकूण संख्या : ११८.१३ लाख
- पुरुषांची संख्या : ६६.८१ लाख
- स्त्रियांची संख्या : ५१.३३ लाख

**(ब) शेतमजूर :**

✻ शेतमजुरांची एकूण संख्या : १०८.१५ लाख
(मुख्यत: शेतमजुरांची संख्या : ७६.४१ लाख ; सीमांतिक शेतमजुरांची संख्या : ३१.७४ लाख)
- पुरुष शेतमजुरांची संख्या : ४९.२४ लाख
- स्त्री शेतमजुरांची संख्या : ५८.९१ लाख

**(क) घरगुती उद्योग :**

✻ घरगुती उद्योग करणाऱ्या लोकांची एकूण संख्या : १०.८९ लाख
(मुख्यत: घरगुती उद्योग करणाऱ्यांची संख्या : ८.१० लाख ;
सीमांतिक घरगुती उद्योग करणाऱ्यांची संख्या : २.७९ लाख)
- घरगुती उद्योग करणाऱ्या पुरुषांची संख्या : ५.६७ लाख
- घरगुती उद्योग करणाऱ्या स्त्रियांची संख्या : ५.२२ लाख

**(ड) इतर सेवा :**

✻ इतर सेवा करणाऱ्यांची संख्या : १७४.५५ लाख
(मुख्यत: इतर सेवा करणाऱ्यांची संख्या : १६१.१५ लाख ;
सीमांतिक इतर सेवा करणाऱ्यांची संख्या : १३.४० लाख)
- इतर सेवा करणाऱ्या पुरुषांची संख्या : १४६.८१ लाख
- इतर सेवा करणाऱ्या स्त्रियांची संख्या : २७.७५ लाख

**(इ) महाराष्ट्रात एकूण काम करणाऱ्यांचे स्वरूप :**

✻ एकूण काम करणाऱ्या पुरुषांची संख्या : २६८.५२ लाख
- मुख्यत: काम करणाऱ्या पुरुषांची संख्या : २४४.१६ लाख
- सीमांतिक एकूण काम करणाऱ्या पुरुषांची संख्या : २४.३६ लाख

✻ एकूण काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या : १४३.२१ लाख
- मुख्यत: काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या : १०३.३२ लाख
- सीमांतिक एकूण काम करणाऱ्या पुरुषांची संख्या : ३९.८९ लाख

**IV. महाराष्ट्रात काम न करणाऱ्या व्यक्तींचे सर्वसाधारण स्वरूप : २००१**

✻ काम न करणाऱ्या लोकांची एकूण संख्या : ५५७.०६ लाख
- काम न करणाऱ्या पुरुषांची एकूण संख्या : २३५.४९ लाख
- काम न करणाऱ्या स्त्रियांची एकूण संख्या : ३२१.५७ लाख

✻ ग्रामीण भागात काम न करणाऱ्या लोकांची एकूण संख्या : २८५.१६ लाख
- ग्रामीण भागात काम न करणाऱ्या पुरुषांची एकूण संख्या : १३१.१० लाख
- ग्रामीण भागात काम न करणाऱ्या स्त्रियांची एकूण संख्या : १५४.०६ लाख



✻ नागरी भागात काम न करणाऱ्या लोकांची एकूण संख्या : २७१.८९ लाख
- नागरी भागात काम न करणाऱ्या पुरुषांची एकूण संख्या : १०४.३८ लाख
- नागरी भागात काम न करणाऱ्या स्त्रियांची एकूण संख्या : १६७.५१ लाख

**V. धार्मिक लोकसंख्या : २००१**

**महाराष्ट्र — धर्मानुसार लोकसंख्या (२००१)**

| अ. क्र. | धर्म | लोकसंख्या टक्केवारी | लोकसंख्या | अ. क्र. | धर्म | लोकसंख्या टक्केवारी | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हिंदू | ८०.३७ | ७,७८,५९,३८५ | ६. | शीख | ०.२२ | २,१५,३३७ |
| २. | मुस्लीम | १०.६० | १,०२,७०,४८५ | ७. | धर्म न सांगितलेले | ०.१ | ९७,७१३ |
| ३. | बौद्ध | ६.०३ | ५८,३८,७१० | ८. | इतर | ०.२४ | २,३६,८४१ |
| ४. | जैन | १.३४ | १३,०१,८४३ | | | | |
| ५. | ख्रिश्चन | १.०९ | १०,५८,३१३ | | **एकूण** | **१००.००** | **९,६८,७८,६२७** |

संदर्भ (i) भारताची जनगणना - २००१. (ii) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी - २००७, पान नं. ४०.

✻ महाराष्ट्राचे दरडोई सरासरी निव्वळ उत्पन्न (वर्ष २००८ - ०९) : रु. ५४,६८७

**VI. कुटुंब :**

✻ दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची सरासरी टक्केवारी (वर्ष २००२) : ३५.७
✻ कुटुंबाची संख्या : १,९५,७७,००००
✻ बेघर व्यक्तींची संख्या : ३,४०,९२४
✻ संस्थांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींची संख्या : १०.२५ लाख

**VII. ग्रामीण लोकसंख्या :**

✻ ग्रामीण लोकसंख्या (२००१) : ५५८ लाख
- ग्रामीण पुरुष लोकसंख्या : २८५ लाख
- ग्रामीण स्त्री लोकसंख्या : २७३ लाख

✻ गावांची संख्या : ४१,०९५
✻ ओसाड गावांची संख्या : २,६१६

**VIII. नागरी लोकसंख्या :**

✻ नागरी लोकसंख्या - २००१ : ४११ लाख
- नागरी पुरुष लोकसंख्या : २१९ लाख
- नागरी स्त्री लोकसंख्या : १९२ लाख

**पहिल्या वर्गाच्या नगराचे (१ लाखापेक्षा जास्त लोकवस्ती) स्वरूप :**

✻ नागरी लोकसंख्या : ३१,९४९,०००
✻ नागरी लोकसंख्येची टक्केवारी : ७७.७३%
✻ नगरांची संख्या : ४०

**१०० टक्के नागरी लोकवस्ती असणारे जिल्हे** : (१) मुंबई शहर (२) मुंबई उपनगर

✻ महाराष्ट्रामधील शहर संकुलाची संख्या : १४
✻ महानगरपालिकांची संख्या (वर्ष २००७) : २३

## IX. अनुसूचित जाती आणि जमाती :

- ✼ अनुसूचित जातींची लोकसंख्या (२००१) : ९८,८१,६५६/९.८२ लाख
- ✼ अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्येची टक्केवारी : १०.२०
- ✼ अनुसूचित जमातींची लोकसंख्या (२००१) : ८५,७७,२७६/८५.७७ लाख
- ✼ अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी : ८.८५%

## X. अपंगांची स्थिती (२००६ – ०७)

- ✼ एकूण अपंग व्यक्ती : १५,६९,५८२ / १५.७० लाख (१००%)
- ✼ अंध व्यक्ती : ५,८०,९३० / ५.८१ लाख (३७%)
- ✼ पांगळ्या व्यक्ती : ५,६९,९४५ / ५.७० लाख (३६.३१%)
- ✼ मूक व्यक्ती : १,१३,०४३ / १.१३ लाख (७.२०%)
- ✼ कर्णबधिर : ९२,३९० / ९२.४ हजार (५.८९%)
- ✼ मनोरुग्ण : २,१३,२१४ / २.१३ लाख (१३.५९%)

### महाराष्ट्र : लोकसंख्याशास्त्रीय घटक (सर्वांत पहिला आणि शेवटचा जिल्हा : २००१)

| घटक | पहिला जिल्हा | शेवटचा जिल्हा |
|---|---|---|
| मुख्यत: काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येची टक्केवारी | हिंगोली (४१.८२%) | सिंधुदुर्ग (२६.६१%) |
| कृषीविषयक काम करणाऱ्यांची एकूण लोकसंख्येची टक्केवारी | वाशिम (८३.७८%) | बृहन्मुंबई व ठाणे (०.१८% व २१.८७%) |
| काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग दर | गडचिरोली (४६.८९%) | बृहन्मुंबई (१३.०६%) |
| दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची टक्केवारी | नंदुरबार (७३%) | सातारा (१५.५%) |
| दरडोई निव्वळ उत्पन्न (वर्ष २००८ - ०९) | बृहन्मुंबई (रु. ८९,३४३) | वाशिम (रु. २३,६२८) |
| कुटुंबाची संख्या | मुंबई उपनगर (१८.३८ लाख) | हिंगोली (१.८१ लाख) |
| पुरुषांची संख्या | मुंबई उपनगर (४७.४२ लाख) | सिंधुदुर्ग (४.१८ लाख) |
| स्त्रियांची संख्या | मुंबई उपनगर (३८.९९ लाख) | सिंधुदुर्ग (४.५१ लाख) |
| एकूण पुरुष - स्त्रियांची संख्या | मुंबई उपनगर (८६.४० लाख) | सिंधुदुर्ग (८.६९ लाख) |
| बेघर व्यक्तींची संख्या | ठाणे (५१,८८८) | हिंगोली (१,२८६) |
| संस्थांमध्ये राहणाऱ्या व्यक्ती | पुणे (९८,८५६) | सिंधुदुर्ग (५,०३६) |
| बेघर आणि संस्थांमध्ये राहणाऱ्या व्यक्ती | ठाणे (१,४३,१३४) | हिंगोली (७,६९१) |
| ग्रामीण लोकसंख्या (२००१) | अहमदनगर (३२.३७ लाख) | सिंधुदुर्ग (७.८६ लाख) |

पुढे चालू



| घटक | पहिला जिल्हा | शेवटचा जिल्हा |
|---|---|---|
| गावांची संख्या (२००१) | नाशिक (१,९२३) | हिंगोली (६७२) |
| ओसाड गावांची संख्या | वर्धा (३७८) | धुळे (३) |
| कोकणामध्ये सिंधुदुर्ग जिल्हा आर्थिकदृष्ट्या मागास असूनही एकही ओसाड गाव नाही, हे विशेष ! | | |
| नागरी लोकसंख्या (२००१) | मुंबई उपनगर (८५.८८ लाख) | गडचिरोली (६७,०००) |
| अनुसूचित जातींची लोकसंख्या | पुणे (७.६२ लाख) | रत्नागिरी (२४,५१५) |
| अनुसूचित जमातींची लोकसंख्या (२००१) | ठाणे (११.९९ लाख) | सिंधुदुर्ग (४,९५२) |
| एकूण अपंग व्यक्ती (२००६ - ०७) | मुंबई उपनगर (१,१५,८१०) | सिंधुदुर्ग (१२,८०८) |
| ✼ अंध व्यक्ती | मुंबई उपनगर (५८,७१४) | सिंधुदुर्ग (३,९३२) |
| ✼ पांगळ्या व्यक्ती | पुणे (३६,०९१) | सिंधुदुर्ग (४,०९४) |
| ✼ मूक व्यक्ती | मुंबई उपनगर (८,१४६) | भंडारा (१,१३५) |
| ✼ कर्णबधिर | पुणे (४,९२०) | सिंधुदुर्ग (७८५) |
| ✼ मनोरुग्ण | मुंबई उपनगर (१७,५०३) | चंद्रपूर (१,४६३) |

## बहुपर्यायी प्रश्न

(१) २००१ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ....... शहर संकुले आहेत.
(अ) १४ (ब) १६ (क) १२ (ड) १८

(२) सह्याद्री पर्वतरांगा, सातपुडा पर्वतरांगा व पूर्व विदर्भात लोकवस्ती ....... आहे.
(अ) अति दाट (ब) दाट (क) मध्यम (ड) विरळ

(३) मुंबईला लोकसंख्येची घनता ....... आहे.
(अ) मध्यम (ब) दाट (क) अति दाट (ड) विरळ

(४) मराठवाड्यात ....... घनतेची लोकवस्ती आहे.
(अ) दाट (ब) मध्यम (क) अति दाट (ड) विरळ

### उत्तरे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ | (२) | ड | (३) | क | (४) | ब |

(५) . . . . . . . मध्ये कमी घनतेची लोकवस्ती आढळते.
(अ) निश्चित पावसाचा प्रदेश (ब) अवर्षण प्रवण क्षेत्र
(क) जास्त पावसाचा प्रदेश (ड) मध्यम पावसाचा प्रदेश

(६) . . . . . . . असणाऱ्या प्रदेशात लोकवस्ती मध्यम ते दाट आहे.
(अ) काळी मृदा (ब) जांभा मृदा
(क) गाळाची मृदा (ड) तांबडी व पिवळसर मृदा

(७) . . . . . . . दाट अरण्याच्या जिल्ह्यात विरळ लोकवस्ती आहे.
(अ) रत्नागिरी व सिंधुदुर्ग (ब) सातारा व सांगली
(क) चंद्रपूर व गडचिरोली (ड) नगर व नाशिक

(८) द्वितीय श्रेणी व्यवसाय असणाऱ्या . . . . . . . परिसरात दाट लोकवस्ती आहे.
(अ) लातूर व उस्मानाबाद (ब) जळगाव - भुसावळ (क) पंढरपूर - सोलापूर (ड) पिंपरी - चिंचवड

(९) मुंबई-ठाणे औद्योगिक परिसरात लोकसंख्येची घनता . . . . . . . आहे.
(अ) अति दाट (ब) दाट (क) कमी (ड) मध्यम

(१०) महाराष्ट्रात सर्वांत जास्त स्थलांतर . . . . . . . आहे.
(अ) नागरीकडून ग्रामीणकडे (ब) ग्रामीणकडून ग्रामीणकडे
(क) ग्रामीणकडून नगराकडे (ड) नगराकडून नगराकडे

(११) महाराष्ट्रात २०२६ सालाची अंदाजित लोकसंख्या . . . . . . . कोटी असेल.
(अ) १२.९९ कोटी (ब) ११.२४ कोटी (क) १४.०० कोटी (ड) ११ कोटी

(१२) ठाणे जिल्ह्याचा अंतर्गत भाग वनांचा आणि आदिवासी लोकांचा . . . . . . . लोकवस्तीचा आहे.
(अ) घनदाट (ब) मध्यम (क) विरळ (ड) सर्वसाधारण

(१३) पश्चिम महाराष्ट्रामधील 'साखर पट्ट्याच्या' प्रदेशात . . . . . . . लोकवस्ती आहे.
(अ) दाट (ब) विरळ (क) कमी (ड) मध्यम

(१४) पुणे औद्योगिक पट्ट्यात . . . . . . . लोकवस्ती आहे.
(अ) अति दाट (ब) मध्यम (क) विरळ (ड) कमी

(१५) मराठवाड्यात औरंगाबाद परिसरात . . . . . . . लोकवस्तीची घनता आहे.
(अ) सर्वसाधारण (ब) मध्यम (क) विरळ (ड) दाट

(१६) महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, जन्मदर दरहजारी लोकसंख्येमागे . . . . . . . आहे.
(अ) २०.७ (ब) १८.५ (क) १७.९ (ड) १९.१

(१७) महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, मृत्युदर दरहजारी लोकसंख्येमागे . . . . . . . आहे.
(अ) ६.६ (ब) ८.५ (क) ७.५ (ड) ६.८

(१८) महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार, बालमृत्यूचे प्रमाण दरहजारी . . . . . . . आहे.
(अ) ७२ (ब) ३६ (क) ३३ (ड) ४५

## उत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (५) | ब | (६) | अ | (७) | क | (८) | ड | (९) | अ |
| (१०) | क | (११) | अ | (१२) | क | (१३) | ड | (१४) | अ |
| (१५) | ब | (१६) | अ | (१७) | क | (१८) | ड | | |



(१९) २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात १५ ते ४९ वयोगटात सर्वात जास्त . . . . . . . वाढ झालेली आहे.
(अ) २१४ लाख (ब) १३७ लाख (क) २८ लाख (ड) ३० लाख

(२०) २००१ सालच्या जनगणनेनुसार, काम करणाऱ्या एकूण लोकांची संख्या सुमारे . . . . . . . आहे.
(अ) २६९ लाख (ब) ४१२ लाख (क) १४३ लाख (ड) १०८ लाख

(२१) २००१ सालच्या जनगणनेनुसार, काम करणाऱ्या लोकांमध्ये . . . . . . . लोकांची संख्या जास्त आहे.
(अ) शेतकरी (ब) शेतमजूर (क) इतर सेवा करणारे (ड) घरगुती उद्योग

(२२) महाराष्ट्रात काम न करणाऱ्या लोकांमध्ये . . . . . . . यांची संख्या जास्त आहे.
(अ) घरकाम करणारे (ब) पूर्ण वेळ विद्यार्थी
(क) अवलंबून असणारी बालके (ड) इतर काम न करणारे

(२३) २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात हिंदी भाषिकांची टक्केवारी . . . . . . . आहे.
(अ) १२% (ब) ७% (क) ३% (ड) २.५%

(२४) २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात मुस्लीमधर्मीयांची टक्केवारी . . . . . . . आहे.
(अ) ६% (ब) १% (क) ११% (ड) ८%

(२५) २००२ सालानुसार महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाची टक्केवारी . . . . . . . आहे.
(अ) ५१% (ब) ४५% (क) २५% (ड) ३६%

(२६) महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबाच्या टक्केवारीत सर्वप्रथम . . . . . . . जिल्हा आहे.
(अ) नंदुरबार (ब) गोंदिया (क) गडचिरोली (ड) धुळे

(२७) २००८-०९ सालानुसार, महाराष्ट्रात दरडोई निव्वळ उत्पन्नाच्या आधारे . . . . . . . सर्वप्रथम क्रमांक . . . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) पुणे (ब) ठाणे (क) बृहन्मुंबई (ड) नागपूर

(२८) २००१ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची . . . . . . . टक्केवारी आहे.
(अ) १०.२०% (ब) १५% (क) ७.०% (ड) ६%

(२९) २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत . . . . . . . जिल्ह्याचा सर्वप्रथम क्रमांक आहे.
(अ) नागपूर (ब) पुणे (क) सोलापूर (ड) नांदेड

(३०) २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जमातींची . . . . . . . टक्केवारी आहे.
(अ) १०.००% (ब) ६% (क) ८.५% (ड) १२%

(३१) २००१ सालच्या जनगणनेनुसार, अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येत . . . . . . . जिल्ह्याचा सर्वप्रथम क्रमांक आहे.
(अ) नंदुरबार (ब) यवतमाळ (क) नाशिक (ड) ठाणे

## उत्तरे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१९) | अ | (२०) | ब | (२१) | क | (२२) | ब | (२३) | अ |
| (२४) | क | (२५) | ड | (२६) | अ | (२७) | क | (२८) | अ |
| (२९) | ब | (३०) | क | (३१) | ड | | | | |

# ८. महाराष्ट्र : जनगणना २०११

सर्वसाधारणपणे लोकसंख्या आधारसामग्री लोकांच्या विविध गटांसाठी उपलब्ध असते. उदाहरणार्थ, स्त्री आणि पुरुष, तरूण आणि वृद्ध, कार्यकारी आणि अकार्यकारी, साक्षर आणि निरक्षर इत्यादी स्वरूपात आकडेवारी गोळा केली जाते. अंतरिम काळासाठी जनगणना २०११ करिता लिंग-गुणोत्तर लोकसंख्या स्त्री आणि पुरुष, साक्षर आणि निरक्षर तसेच सात वर्षांखालील बाल-लोकसंख्येची आकडेवारी जिल्हा स्तरावर (याचप्रमाणे १९०१ च्या जनगणनेपासून यांचा कल) प्रकाशित करण्यात आलेली आहे. जनगणनेच्या इतिहासामध्ये पहिल्या प्रथम तृतीयपंथीची *(Third Gender)*, ज्यांनी पुरुष किंवा स्त्री या गटात नोंद केलेली नाही त्याची 'इतर' (Others) या गटामध्ये समावेश करून अशी आकडेवारीही गोळा केलेली आहे.

आपण महाराष्ट्र जनगणना - २०११ चा पुढील मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करणार आहोत.

I. महाराष्ट्राची लोकसंख्या (२०११)
II. लोकसंख्येची दशवार्षिक वाढ (२००१ - २०११)
III. लोकसंख्येची घनता (२०११)
IV. लिंग-गुणोत्तर (२०११)
V. बालिका-बालकांची संख्या (२०११)
VI. बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर (२०११)
VII. साक्षरता (२०११)
VII. ग्रामीण - नागरी लोकसंख्या (२०११)

## I. महाराष्ट्राची लोकसंख्या : २०११

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची लोकसंख्या ११,२३,७२,९७२ (सुमारे ११ कोटी २४ लाख/११.२४ कोटी) आहे. देशामध्ये लोकसंख्येत उत्तर प्रदेशाच्या (सुमारे १९.९६ कोटी) खालोखाल महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे तर बिहारचा (१०,३८,०४,६३७) तिसरा क्रमांक आहे.

२०११ सालच्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ (सुमारे १२१ कोटी) आहे. महाराष्ट्रात देशातील ९.२९ टक्के लोकसंख्या आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९,६८,७८,६२७ (सुमारे ९.६९ कोटी) होती. २००१-२०११ या दशकामध्ये १,५४,९४,३४५ लोकसंख्येची भर पडली.


### (अ) लोकसंख्येनुसार महाराष्ट्रातील पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे : २०११

तक्ता क्र. ८.१ : महाराष्ट्र - लोकसंख्या (२०११)

| घटक | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| पहिले पाच जिल्हे | ठाणे | पुणे | मुंबई उपनगर | नाशिक | नागपूर |
| लोकसंख्या | १,१०,५४,१३१ | ९४,२६,९५९ | ९३,३२,४८१ | ६१,०९,०५२ | ४६,५३,१७१ |
| टक्केवारी | ९.८४% | ८.३९% | ८.३०% | ५.४४% | ४.१४% |
| शेवटचे पाच जिल्हे | सिंधुदुर्ग | गडचिरोली | हिंगोली | वाशिम | भंडारा |
| लोकसंख्या | ८,४८,८६८ | १०,७१,७९५ | ११,७८,९७३ | ११,९६,७१४ | ११,९८,८१० |
| टक्केवारी | ०.७६% | ०.९५% | १.०५% | १.०६% | १.०७% |








नकाशा क्र. ८.१ : महाराष्ट्र - लोकसंख्या (२०११)

- **महाराष्ट्रामधील सर्वांत जास्त लोकसंख्येचा ठाणे जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार सर्वांत जास्त लोकसंख्येच्या ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या १,१०,५४,१३१ (सुमारे १ कोटी १०.५ लाख) आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.८४% लोक ठाणे जिल्ह्यात राहतात.
- **या खालोखाल पुणे आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांचा क्रमांक :** ठाणे जिल्ह्यानंतर दुसरा क्रमांक पुणे जिल्ह्याचा असून त्याची लोकसंख्या ९४,२६,९५९ (सुमारे ९४.२७ लाख) आहे. याची टक्केवारी ८.३९ टक्के आहे.
- **२००१ सालच्या जनगणनेनुसार लोकसंख्यादृष्ट्या पहिल्या तीन जिल्ह्यांची स्थिती :** २००१ साली महाराष्ट्रातील लोकसंख्येत मुंबई उपनगराचा पहिला क्रमांक (८.९%) आणि पुणे जिल्ह्याचा (७.५%) क्रमांक होता.
- मुंबई उपनगर जिल्ह्याची लोकसंख्या ९३,३२,४८१ (९३.३२ लाख) आहे. यानंतर नाशिक जिल्हा (६१.०९ लाख) आणि नागपूर जिल्ह्याचा (४६.५३ लाख) क्रमांक आहे.

  महाराष्ट्रामधील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये राज्यातील सुमारे ३७ टक्के लोकसंख्या वास्तव्य करते.
- **महाराष्ट्रामध्ये सर्वांत कमी लोकसंख्येचा जिल्हा सिंधुदुर्ग :** २०११ सालानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्याची लोकसंख्या फक्त सुमारे ८.४९ लाख आहे. यांची राज्यामधील टक्केवारी जेमतेम ०.८ टक्के आहे. यानंतर गडचिरोली जिल्ह्याचा वाटा फक्त एक टक्का आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने अन्य छोटे जिल्हे हिंगोली, वाशिम आणि भंडारा आहेत. यांचा प्रत्येकाचा वाटा सुमारे १.१ टक्का आहे. वर्धा आणि गोंदिया जिल्ह्यांची लोकसंख्येची टक्केवारी प्रत्येकी १.२ टक्के आहे.

## (ब) महाराष्ट्रामधील पुरुष लोकसंख्येचे वितरण - २०११

२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात पुरुषांची लोकसंख्या ५,८३,६१,३९७ (सुमारे ५.८४ कोटी) आहे.

**तक्ता क्र. ८.२ : महाराष्ट्र - पुरुष लोकसंख्या (२०११)**

| घटक | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| **पहिले पाच जिल्हे** | ठाणे | मुंबई उपनगर | पुणे | नाशिक | नागपूर |
| पुरुष लोकसंख्या | ५८,७९,३८७ | ५०,२५,१६५ | ४९,३६,३६२ | ३१,६४,२६१ | २३,८८,५५८ |
| टक्केवारी | १०.७% | ८.६१% | ८.४६% | ५.४२% | ४.०९% |
| **शेवटचे पाच जिल्हे** | सिंधुदुर्ग | गडचिरोली | भंडारा | हिंगोली | वाशिम |
| पुरुष लोकसंख्या | ४,१६,६९५ | ५,४२,८१३ | ६,०४,३७१ | ६,०९,३८६ | ६,२१,२२८ |
| टक्केवारी | ०.७१% | ०.९३% | १.०४% | १.०४% | १.०६% |

- **महाराष्ट्रामधील सर्वांत जास्त पुरुष लोकसंख्येचा ठाणे जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार सर्वांत जास्त पुरुष लोकसंख्येचा ठाणे जिल्हा असून पुरुष लोकसंख्या ५८.७९ लाख आहे. राज्यामधील १०.७ टक्के पुरुष ठाणे जिल्ह्यात वास्तव्य करतात.
- या खालोखाल मुंबई उपनगर जिल्ह्यात ५०.२५ लाख (८.६१%) आणि पुणे जिल्ह्यात ४९.३६ लाख (८.४६%) पुरुष लोकसंख्या आहे.
- यानंतर नाशिक जिल्हा आणि नागपूर जिल्ह्यात अनुक्रमे ३१.६४ लाख आणि २३.८९ लाख पुरुष लोकसंख्या आहे.
- वरील पाच जिल्ह्यांत मिळून राज्यामधील ३६.६५ टक्के पुरुष लोकसंख्या राहते.
- **महाराष्ट्रामध्ये सर्वांत कमी पुरुष लोकसंख्येचा सिंधुदुर्ग जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये सर्वांत कमी पुरुष लोकसंख्येचा सिंधुदुर्ग जिल्हा आहे. पुरुष लोकसंख्या फक्त ४,१६,६९५/४.१७ लाख (०.७१%) आहे.
- यानंतर गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्याचा क्रमांक असून त्यांची पुरुष लोकसंख्या अनुक्रमे ५,४२,८१३/५.४३ लाख (०.९३%) आणि ६,०४,३७१/६.०४ लाख (१.०४%) आहे.
- हिंगोली आणि वाशिम जिल्ह्यात राज्यामधील पुरुष लोकसंख्येची टक्केवारी अनुक्रमे १.०४ आणि १.०६ टक्के आहे.

## (क) महाराष्ट्रामधील स्त्री लोकसंख्येचे वितरण - २०११

२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात स्त्रियांची लोकसंख्या ५,४०,११,५७५ (सुमारे ५.४० कोटी) आहे.

- **महाराष्ट्रामधील सर्वांत जास्त स्त्री लोकसंख्येचा ठाणे जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार सर्वांत जास्त स्त्री लोकसंख्येचा ठाणे जिल्हा असून स्त्रियांची लोकसंख्या ५१,७४,७४४/सुमारे ५१.७५ लाख आहे. राज्यामधील ९.५८ टक्के स्त्रिया ठाणे जिल्ह्यात वास्तव्य करतात.



**तक्ता क्र. ८.३ : महाराष्ट्र - स्त्री लोकसंख्या (२०११)**

| घटक | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| **पहिले पाच जिल्हे** | ठाणे | पुणे | मुंबई उपनगर | नाशिक | नागपूर |
| स्त्री लोकसंख्या | ५१,७४,७४४ | ४४,९०,५९७ | ४३,०७,३१६ | २९,४४,७९१ | २२,६४,६१३ |
| टक्केवारी | ९.५८% | ८.३१% | ७.९७% | ५.४५% | ४.१९% |
| **शेवटचे पाच जिल्हे** | सिंधुदुर्ग | गडचिरोली | हिंगोली | वाशिम | भंडारा |
| स्त्री लोकसंख्या | ४,३२,१७३ | ५,२८,९८२ | ५,६९,५८७ | ५,७५,४८६ | ५,९४,४३९ |
| टक्केवारी | ०.८०% | ०.९८% | १.०५% | १.०७% | १.१% |

- या खालोखाल स्त्री लोकसंख्या पुणे जिल्ह्यात ४४.९१ लाख आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात ४३.०७ लाख आहे. यांची टक्केवारी अनुक्रमे ८.३१ टक्के आणि ७.९७ टक्के आहे.
- यानंतर नाशिक जिल्हा आणि नागपूर जिल्ह्यात राज्याची स्त्री लोकसंख्या अनुक्रमे ५.४५ टक्के आणि ४.१९ टक्के आहे.
- वरील पाच जिल्ह्यांत मिळून राज्यामधील स्त्री लोकसंख्येची टक्केवारी ३५.५ टक्के आहे.
- **महाराष्ट्रात सर्वांत कमी स्त्री लोकसंख्येचा सिंधुदुर्ग जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार सर्वांत कमी स्त्री लोकसंख्येचा सिंधुदुर्ग जिल्हा असून स्त्री लोकसंख्या फक्त ४,३२,१७३/४.३२ लाख आहे. राज्यामधील फक्त ०.८ टक्के स्त्रिया सिंधुदुर्ग जिल्ह्यात राहतात.
- यानंतर गडचिरोली आणि हिंगोली जिल्ह्यात स्त्रियांची लोकसंख्या अनुक्रमे ५.२९ लाख (०.९८%) आणि ५.७० लाख (१.०५%) आहे.
- स्त्री लोकसंख्येत शेवटून चौथा आणि पाचवा क्रमांक वाशिम जिल्हा (१.०७%) आणि भंडारा जिल्ह्याचा (१.१%) आहे.

**तक्ता क्र. ८.४ : महाराष्ट्र - सर्वांत जास्त आणि सर्वांत कमी लोकसंख्येचे जिल्हे (२०११)**

| घटक | सर्वांत जास्त | | सर्वांत कमी | |
|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण लोकसंख्या | ठाणे | १.१ कोटी | सिंधुदुर्ग | ८.४९ लाख |
| पुरुष लोकसंख्या | ठाणे | ५८.७९ लाख | सिंधुदुर्ग | ४.१७ लाख |
| स्त्री लोकसंख्या | ठाणे | ५१.७५ लाख | सिंधुदुर्ग | ४.३२ लाख |

## (ड) महाराष्ट्र लोकसंख्येच्या जिल्हावार वितरणाची वैशिष्ट्ये - २०११

**(१) महाराष्ट्रात एक कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असणारा एकमेव ठाणे जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एक कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असणारा एकमेव ठाणे जिल्हा (सुमारे १.१ कोटी) आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.८४ टक्के लोक ठाणे जिल्ह्यात वास्तव्य करतात.

२००१ सालच्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या ८१.३ लाख होती. गेल्या दहा वर्षांच्या कालखंडात लोकसंख्येमध्ये सुमारे २९.७ लाखाने वाढ झालेली आहे. महाराष्ट्रामधील जिल्हावार सर्वांत जास्त वाढ आहे. याचे प्रमुख कारण औद्योगिकीकरण आणि स्थलांतर हे आहे.

**(२) ९० लाख ते १ कोटी दरम्यान लोकसंख्या असणारे पुणे आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे :** २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात लोकसंख्येदृष्ट्या दुसऱ्या क्रमांकावर पुणे जिल्हा असून त्याची लोकसंख्या ९४.२७ लाख झालेली आहे. २००१ साली पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ७२.२ लाख होती. याचा अर्थ, गेल्या दहा वर्षांत लोकसंख्येत सुमारे २२ लाखांनी वाढ झालेली आहे.

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात मुंबई उपनगर जिल्ह्याचा तिसरा क्रमांक आहे. याची लोकसंख्या ९३.३२ लाख आहे. २००१ साली याची लोकसंख्या ८५.९ लाख होती. गेल्या दहा वर्षांत मुंबई उपनगर जिल्ह्यातील लोकसंख्येत ७.४ लाख वाढ झाली. १९९१-२००१ या दशकामध्ये लोकसंख्येची वाढ १८.४ लाख होती. याचा अर्थ, मुंबई उपनगरामध्ये लोकसंख्येची वाढ त्या मानाने कमी झालेली आहे आणि लोकसंख्यावाढीचा कल ठाणे जिल्ह्याकडे वळलेला आहे.

**(३) ४० ते ५० लाख लोकसंख्या असणारे जिल्हे :** या गटामध्ये चार जिल्हे आहेत. नागपूर जिल्ह्याची लोकसंख्या ४६.५३ लाख, या खालोखाल अहमदनगर जिल्हा (४५.५३ लाख), सोलापूर जिल्हा (४३.१६ लाख), जळगाव जिल्हा (४२.२४ लाख) यांचा क्रमांक लागतो.

**(४) ३० ते ४० लाख लोकसंख्या असणारे जिल्हे :** या गटात पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. सर्वांत जास्त लोकसंख्या कोल्हापूर जिल्ह्याची ३८.७४ लाख आहे. या खालोखाल औरंगाबाद, नांदेड, मुंबई (३.१४६ लाख) आणि सातारा जिल्हे (३०.०४ लाख) आहेत.

**(५) २० ते ३० लाख लोकसंख्या असणारे जिल्हे :** २०११ सालच्या जनगणनेनुसार ९ जिल्हे या गटामध्ये आहेत. अमरावती जिल्ह्याची लोकसंख्या सर्वांत जास्त (२८.८८ लाख) असून यानंतर सांगली, यवतमाळ, रायगड, बुलडाणा, बीड, लातूर, चंद्रपूर आणि धुळे जिल्ह्यांचा (२०.४९ लाख) क्रमांक लागतो.

**(६) १० ते २० लाख लोकसंख्या असणारे जिल्हे :** महाराष्ट्रामधील सुमारे १/३ जिल्ह्यांमध्ये (१२ जिल्हे) १० ते २० लाख लोकसंख्या आहे. या गटामध्ये जालना जिल्हा (१९.५८ लाख) प्रथम क्रमांकावर आहे. यानंतर परभणी (१८.३६ लाख), अकोला, उस्मानाबाद, नंदुरबार, रत्नागिरी, गोंदिया, वर्धा, भंडारा, वाशिम, हिंगोली (११.७९ लाख) आणि गडचिरोली जिल्ह्यांचा (१०.७२ लाख) क्रमांक आहे.

**(७) १० लाखांपेक्षा कमी लोकसंख्येचा सिंधुदुर्ग जिल्हा :** २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वांत कमी लोकसंख्येचा सिंधुदुर्ग जिल्हा (८.४९ लाख) आहे.

## II. लोकसंख्येची दशवार्षिक वाढ : २००१ - २०११

सर्वसाधारणपणे लोकसंख्यावाढीचा दर मागील जनगणनेच्या अनुषंगाने लोकसंख्येत वाढ किंवा घट किती टक्क्यांनी झाली या पद्धतीने व्यक्त केले जाते. दुसऱ्या शब्दामध्ये सांगावयाचे झाल्यास लोकसंख्येचा दशवार्षिक वाढीचा दर पूर्वीच्या जनगणनेमध्ये लोकसंख्येत किती टक्क्यांनी वाढ झाली किंवा घट झाली ते दर्शवितो. या दराला सोपेपणाचा गुणधर्म आहे. अंदाजाचा ओबडधोबड स्वरूपाचा परिपाक अशी त्याची मर्यादाही असते.

महाराष्ट्र आणि तिच्या जिल्ह्यांच्या १९०१ सालापासून २०११ सालच्या जनगणनेच्या आधारे काही महत्त्वपूर्ण लोकसंख्येच्या दशवार्षिक वाढीसंदर्भात महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत.

### (अ) लोकसंख्या दशवार्षिक वाढीसंदर्भात काही निष्कर्ष (१९०१ - २००१ दरम्यान)

**(१) २००१ - २०११ या दशवार्षिक काळामधील लोकसंख्यावाढीचे स्वरूप :**

- २००१-२०११ या दशवार्षिक काळामध्ये महाराष्ट्रात लोकसंख्यावाढीचा दर १५.९९ टक्के आहे तर राष्ट्रीय स्तरावर वाढीचा दर १७.६४ टक्के आहे.
- गेल्या १९९१-२००१ दशवार्षिक कालखंडात लोकसंख्यावाढीचा दर २२.७३ टक्के होता. याचा अर्थ, लोकसंख्या-वाढीचा दर ६.७४ बिंदूंनी (Percentile Points) घटला.
- भारतामध्ये लोकसंख्यावाढीच्या दरात महाराष्ट्राचा एकविसावा क्रमांक आहे.

**(२) लोकसंख्या दशवार्षिक वाढीच्या दरामधील फेरबदल (१९०१ - २०११ दरम्यान) :**

- १९०१ ते ११ ते १९३१-४१ कालावधीमध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्यावाढीच्या दरामध्ये वारंवार फेरबदल झालेले आहेत. १९०१-११ दशकात लोकसंख्यावाढीचा दर १०.७४ टक्के होता. परंतु पुढील दशकामध्ये तो – २.९१ टक्क्यांपर्यंत खाली आला तर १९२१-३१ दरम्यान वाढीचा दर १४.९१ टक्क्यांपर्यंत उंचावला.
- १९३१-४१ या दशकात पुन्हा ११.९९ टक्क्यांपर्यंत खाली आला. यानंतर सातत्याने पुढील जनगणना वर्षामध्ये लोकसंख्यावाढीचा दर वाढत गेला.
- १९६१-७१ दरम्यान वाढीचा सर्वोच्च दर २७.४५ टक्के होता.

यानंतर वाढीचा दर कमी-कमी होत गेला. अर्थात १९८१-९१ या दशकात १.२% अल्पशी वाढ झाली तर २००१-११ या दशकात लोकसंख्यावाढीचा दर १५.९९ टक्के आहे.



### (ब) १९०१ - २०११ दरम्यानच्या जिल्हावार लोकसंख्यावाढीच्या दराची वैशिष्ट्ये

- भारतीय जनगणनेमध्ये १९११-२१ हे दशक लोकसंख्यावाढीच्या दराच्या संदर्भात ऋणात्मक म्हणता येईल. महाराष्ट्रामध्येही हीच परिस्थिती होती. याची प्रमुख कारणे प्लेगसारख्या साथीच्या रोगांची लागण आणि टंचाईची परिस्थिती निर्माण झालेली होती.
- महाराष्ट्रामध्ये १९११-२१ या दशकात सरासरी लोकसंख्यावाढीचा दर – २.९१ टक्के होता. या दशकामध्ये ऋणात्मक वाढीचा दर बावीस जिल्ह्यांमध्ये होता.
- **महाराष्ट्रात १९११-२१ या दशकात सर्वांत जास्त ऋणात्मक वाढीचा दर बीड जिल्ह्याचा – २५.१२% होता.** या खालोखाल अहमदनगर जिल्ह्याचा (– २२.३२%) क्रमांक होता. यानंतर औरंगाबाद जिल्हा (– १८.०८%) आणि जालना जिल्ह्याचा (– १४.९३%) क्रमांक होता. ऋणात्मक वाढीच्या दरात सर्वांत शेवटचा क्रमांक ठाणे जिल्ह्याचा (– १.१२%) होता.
- महाराष्ट्रात १९११-२१ दशकामध्ये उर्वरित तेरा जिल्ह्यांमध्ये धनात्मक लोकसंख्यावाढीचा दर होता. सर्वांत जास्त लोकसंख्यावाढीचा दर धुळे व नंदुरबार जिल्ह्यात + ६.२० टक्के होता तर **सर्वांत कमी वाढीचा दर** कोल्हापूर जिल्ह्यात (+ ०.२५%) होता.
- १९०१-११ या दशकातदेखील कोल्हापूर (– ९.१७%), सांगली (– ४.९५%), सातारा (– १.६९%) आणि रायगड जिल्ह्यात (– ०.९३%) ऋणात्मक वाढीचा दर होता.
- १९०१ ते १९६१ दरम्यान महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये लोकसंख्यावाढीच्या दरामध्ये अनेक चढ-उतार पाहावयास मिळतात.
- **महाराष्ट्रामध्ये लोकसंख्येच्या दशवार्षिक वाढीच्या दरात १९६१-७१ वैशिष्टयपूर्ण दशक :**

महाराष्ट्रामधील १९६१-७१ या दशकात बारा जिल्ह्यांमध्ये सर्वांत जास्त लोकसंख्यावाढीचा दर होता. **प्रथम क्रमांक मुंबई उपनगराचा असून १९६१-७१ दशकामधील लोकसंख्यावाढीच्या दराची ११०.१४% नोंद झालेली आहे.** महाराष्ट्रामध्ये अद्यापपर्यंतची लोकसंख्यावाढीच्या दराची सर्वोत्तम वाढ आहे. अर्थात, मुंबई उपनगराच्या लोकसंख्यावाढीचा दर लक्षणीय आहे. प्रामुख्याने आंतरजिल्हा आणि आंतरराज्यीय स्थलांतरामुळे लोकसंख्या वाढलेली आहे.

दुसरा आणि तिसरा क्रमांक गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा असून लोकसंख्यावाढीचा दर अनुक्रमे ३५.१६% आणि ३१.२६% आहे.

- वरील जिल्ह्यांव्यतिरिक्त १९६१-७१ च्या दशकामधील लोकसंख्यावाढीचा दर जास्त असणारे जिल्हे यवतमाळ, कोल्हापूर, उस्मानाबाद, वाशिम, अमरावती, गोंदिया, सांगली, भंडारा आणि वर्धा होते.
- **महाराष्ट्रामध्ये लोकसंख्येच्या दशवार्षिक वाढीच्या दरात दुसरे वैशिष्टयपूर्ण दशक (१९८१-९१) :**

महाराष्ट्रात दुसऱ्या जिल्ह्याच्या गटसमूहाने १९८१-९१ दशकात सर्वांत जास्त लोकसंख्यावाढीच्या दराची नोंद केली आहे. पहिला क्रमांक ठाणे जिल्ह्याचा असून लोकसंख्यावाढीचा दर ५६.६२%, या खालोखाल औरंगाबाद जिल्ह्याचा (३९.५६%) क्रमांक लागतो. यानंतर नांदेड, पुणे आणि जालना जिल्हे येतात. या तीनही जिल्ह्यात १९८१-९१ दशकात लोकसंख्यावाढीचा दर साधारणपणे ३३ टक्के आहे. या व्यतिरिक्त या गटसमूहात हिंगोली, परभणी, रायगड, लातूर, बुलडाणा, सोलापूर, रत्नागिरी (११.९२%) जिल्ह्यांचा समावेश होतो.


### (क) २००१ - २०११ या दशकामधील लोकसंख्यावाढीच्या दराचे स्वरूप

*** अत्युच्च वाढीचा दर ३५ टक्क्यांपेक्षा जास्त :**

**(१) दशवार्षिक लोकसंख्यावाढीचा दर ३५ टक्क्यांपेक्षा जास्त असणारा ठाणे जिल्हा :** २००१ - २०११ या कालखंडात महाराष्ट्रामध्ये सर्वांत जास्त लोकसंख्या वाढीचा दर ठाणे जिल्ह्याचा असून तो ३५.९४ **टक्के** आहे. ११० वर्षांचा आढावा घेता असे आढळते की, १९११-२१ चा अपवाद वगळता १९०१-११ पासून १९८१-९१ पर्यंत ठाणे जिल्ह्याच्या लोकसंख्यावाढीच्या दराचा आलेख चढता आहे. १९८१-९१ दरम्यान लोकसंख्यावाढीचा कमाल दर ५६.६२ टक्के होता तर १९९०-९१ दरम्यान थोडा खाली म्हणजे ५४.९२ टक्के झाला.

*** उच्च वाढीचा दर (२५.१ ते ३५%) :**

**(२) लोकसंख्यावाढीचा दर ३०.१ ते ३५ टक्के दरम्यान असणारा पुणे जिल्हा :** २००१-११ दरम्यान लोकसंख्यावाढीचा पुणे जिल्ह्याचा दर ३०.३४ टक्के आहे. १९८१-९१ या दशकात लोकसंख्यावाढीचा दर ३२.८५% होता. तो १९९१-२००१ या दशकात ३०.७३ टक्क्यांपर्यंत खाली आला.




नकाशा क्र. ८.२ : महाराष्ट्र - लोकसंख्येची दशवार्षिक वाढ (२००१ - २०११)



**(३) लोकसंख्यावाढीचा दर २५.१ ते ३० टक्के असणारे जिल्हे :** औरंगाबाद जिल्ह्याचा लोकसंख्यावाढीचा दर २७.३३ टक्के आहे. १९८१-९१ दरम्यान वाढीचा कमाल दर ३९.५६ टक्के होता. नंदुरबार जिल्ह्याचा २००१-११ या दशकात लोकसंख्यावाढीचा दर २५.५ टक्के आहे आणि हाच वाढीचा कमाल दर आहे.

**तक्ता क्र. ८.५ : लोकसंख्यावाढीच्या दराच्या टक्केवारीनुसार जिल्ह्यांचे वर्गीकरण**

| उच्च वाढीचा दर (२५ टक्क्यांच्या वर) | | मध्यम उच्च वाढीचा दर (२० ते २५%) | | मध्यम वाढीचा दर (१५ ते २०%) | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | वृद्धी-दर | जिल्हा | वृद्धी-दर | जिल्हा | वृद्धी-दर |
| ठाणे | + ३५.९४ | नाशिक | + २२.३३ | धुळे | + १९.९६ |
| पुणे | + ३०.३४ | जालना | + २१.८४ | बीड | + १९.६५ |
| औरंगाबाद | + २७.३३ | परभणी | + २०.१८ | हिंगोली | + १९.४३ |
| नंदुरबार | + २४.५० | | | रायगड | + १९.३६ |
| | | | | लातूर | + १८.०४ |
| | | | | वाशिम | + १७.२३ |
| | | | | नांदेड | + १६.७० |

| मध्यम निम्न वाढीचा दर (१० ते १५%) | | निम्न वाढीचा दर (०.१ ते १०%) | | ऋणात्मक वाढीचा दर (० टक्क्यापेक्षा कमी) | |
|---|---|---|---|---|---|
| जळगाव | + १४.७१ | कोल्हापूर | + ९.९६ | सिंधुदुर्ग | – २.३० |
| नागपूर | + १४.३९ | सांगली | + ९.१८ | रत्नागिरी | – ४.९६ |
| यवतमाळ | + १२.९० | मुंबई (उपनगर) | + ८.०१ | मुंबई | – ५.७५ |
| अहमदनगर | + १२.४३ | सातारा | + ६.९४ | | |
| सोलापूर | + १२.१० | चंद्रपूर | + ५.९५ | | |
| उस्मानाबाद | + ११.६९ | भंडारा | + ५.५२ | | |
| अकोला | + ११.६० | वर्धा | + ४.८० | | |
| अमरावती | + १०.७७ | | | | |
| गडचिरोली | + १०.४६ | | | | |
| गोंदिया | + १०.१३ | | | | |

**Ref. :** *Part - II : Census of India, 2011; An Overview; Page 29.*

**✲ मध्यम उच्च वाढीचा दर (२०.१ ते २५%) :**

**(४) लोकसंख्यावाढीचा दर २०.१ ते २५ टक्के असणारे जिल्हे :** या गटामध्ये तीन जिल्हे आहेत. नाशिक जिल्हा (२२.३३%), जालना जिल्हा (२१.८४%) आणि परभणी जिल्हा (२०.१८%) यांचा समावेश होतो. नाशिक जिल्ह्यात वाढीचा कमाल दर १९५१-६१ दशकात २९.७५ टक्के होता.

**✲ मध्यम वाढीचा दर (१५.१ ते २०%) :**

**(५) लोकसंख्यावाढीचा दर १५.१ ते २० टक्के असणारे जिल्हे :** या गटसमूहात आठ जिल्हे आहेत. धुळे जिल्ह्याचा वाढीचा दर १९.९६ टक्के आहे. या खालोखाल बीड, हिंगोली, रायगड, लातूर, वाशिम आणि बुलडाणा जिल्ह्याचा (१५.९३%) क्रमांक आहे.

**✲ मध्यम निम्न वाढीचा दर (१०.१ ते १५%) :**

**(६) लोकसंख्यावाढीचा दर १०.१ ते १५ टक्के असणारे जिल्हे :** या गटसमूहात दहा जिल्हे आहेत. जळगाव (१४.७१%), नागपूर (१४.३९%) जिल्हे आघाडीवर आहेत. यानंतर यवतमाळ, अहमदनगर, सोलापूर, उस्मानाबाद, अकोला आणि अमरावती (१०.७७%) जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नागपूर जिल्ह्यात लोकसंख्यावाढीचा कमाल दर १९७१-८१ दशकात ३३.२६ टक्के होता. यानंतर तो कमी-कमी होत आला. १९९१-२००१ या दशकात वाढीचा दर २३.७४ टक्के होता.

✲ **निम्न वाढीचा दर (०.१ ते १०%) :**

**(७) लोकसंख्यावाढीचा दर ५.१ ते १० टक्के असणारे जिल्हे :** या वाढीच्या दरांच्या गटात कोल्हापूर जिल्हा (९.९६%) आहे. यानंतर सांगली, मुंबई उपनगर (८.०१%); सातारा, चंद्रपूर आणि भंडारा (५.५२%) जिल्हे येतात.

**मुंबई उपनगर जिल्ह्याच्या लोकसंख्यावाढीच्या दराची वैशिष्ट्ये :** मुंबई उपनगर जिल्ह्याचा (१९०१ - २०११ दरम्यान) लोकसंख्यावाढीचा दर नेहमीच धनात्मक राहिलेला आहे. यामध्ये बरेच चढ-उतार झालेले आहेत. मुंबई उपनगराचा १९०१-११ या दशकात वाढीचा दर २३.७९ टक्के होता. तो १९२१-३१ या दशकात नीचांक १.२६ टक्क्यांपर्यंत खाली आला. यानंतर मात्र १९६१-७१ दशकापर्यंत सातत्याने वाढत गेला. १९३१-४१ या दशकात वाढीचा दर २८.८७ टक्के होता. त्याने १९४१-५१ या दशकात ६६.२ टक्क्यांपर्यंत मजल मारली. १९५१-६१ दशकात १०७.४१ टक्क्यांपर्यंत आघाडी घेतली. **महाराष्ट्र उपनगर जिल्ह्यात १९६१-७१ हे दशक लोकसंख्या दशवार्षिक वाढ सर्वांत कमाल म्हणजे ११०.१४ टक्के झाली. महाराष्ट्रात दशवार्षिक वाढीचा सर्वांत जास्त दर मुंबई उपनगर जिल्ह्याचा (११०.१४%) नोंद केला गेला.**

यानंतर मात्र मुंबई उपनगर जिल्ह्याच्या लोकसंख्यावाढीच्या दरात सातत्याने घट झालेली आहे. १९७१-८१ दशकात वाढीचा दर ७०.९७ टक्क्यांपर्यंत खाली उतरला तर २००१-०११ साली दशवार्षिक वाढीचा दर फक्त ८.०१ टक्का आहे.

**(८) लोकसंख्यावाढीचा दर ०.१ ते ५ टक्के असणारा जिल्हा :** वर्धा जिल्ह्याचा वाढीचा दर ४.८ टक्के आहे.

✲ **ऋणात्मक वाढीचा दर (० टक्क्यापेक्षा कमी) :**

**(९) लोकसंख्यावाढीचा ऋणात्मक (० टक्क्यापेक्षा कमी) दर असणारे जिल्हे :** महाराष्ट्रात २००१-११ या दशकात सर्वांत जास्त ऋणात्मक वाढीचा दर मुंबई शहर जिल्ह्याचा असून तो – ५.७५ टक्के आहे. या खालोखाल रत्नागिरी (– ४.९%) आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा (– २.३०%) क्रमांक लागतो.

## III. लोकसंख्येची घनता : २०११

२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला ३६५ आहे तर राष्ट्रीय स्तरावर घनता ३८२ आहे.


२००१ साली महाराष्ट्राची घनता ३१५ होती. याचा अर्थ, दशवार्षिक कालखंडात घनतेमध्ये ६७ बिंदूंनी वाढ झालेली आहे.

**तक्ता क्र. ८.६ :, महाराष्ट्र - लोकसंख्या घनतेचे पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे (२००१ आणि २०११)**

| २०११ मधील क्रमांक | जिल्हा | घनता (वर्ष २०११) | घनता (वर्ष २००१) | घनतेमधील फरक (२००१ - २०११) | २००१ सालामधील घनतेनुसार क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्रातील घनतेनुसार पहिले पाच जिल्हे** | | | | | |
| १. | मुंबई उपनगर | २०,९२५ | १९,३७३ | + ५५२ | २ |
| २. | मुंबई शहर | २०,०३८ | २१,२६१ | – १२२३ | १ |
| ३. | ठाणे | १,१५७ | ८५१ | + ३०६ | ३ |
| ४. | पुणे | ६०३ | ४६२ | + १४१ | ४ |
| ५. | कोल्हापूर | ५०४ | ४५८ | + ४६ | ५ |
| **महाराष्ट्रातील घनतेनुसार शेवटचे पाच जिल्हे** | | | | | |
| १/३५ | गडचिरोली | ७४ | ६७ | + ७ | ३५ |
| २/३४ | सिंधुदुर्ग | १६३ | १६७ | – ४ | ३४ |
| ३/३३ | चंद्रपूर | १९२ | १८१ | + ११ | ३३ |
| ४/३२ | रत्नागिरी | १९६ | २०७ | – ११ | २७ |
| ५/३१ | यवतमाळ | २०४ | १८१ | + २३ | ३२ |

**Ref. :** *Statement - 3 : Ranking of Districts by Population Density 2001 and 2011; Part - II, Census of India, 2001; An Overview.*






नकाशा क्र. ८.३ : महाराष्ट्र - लोकसंख्येची घनता (२०११)

## (अ) २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामधील लोकसंख्या घनतेचे पहिले पाच जिल्हे

- **२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात लोकसंख्येच्या घनतेमध्ये सर्वप्रथम क्रमांक मुंबई उपनगर जिल्हयाचा असून घनता २०,९२५ आहे. २००१ सालची घनता १९,३७३ होती. २००१ सालच्या घनतेमध्ये ५५२ ने वाढ झालेली आहे.**
- लोकसंख्येच्या घनतेमध्ये दुसरा क्रमांक मुंबई शहराचा असून त्याची घनता २०,०३८ आहे. मुंबई शहराची २००१ सालची लोकसंख्येची घनता २१,२६१ होती. याचा अर्थ मुंबई शहराच्या लोकसंख्येच्या घनतेत – १,२२३ ने घट झालेली आहे. मुंबई शहरातून मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्हयात लोकांनी स्थलांतर केलेले आहे.
- महाराष्ट्रात लोकसंख्या घनतेमध्ये (२०११ साल) तिसरा क्रमांक ठाणे जिल्हयाचा आहे. याची घनता ११५७ आहे तर २००१ सालच्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हयाची घनता ८५१ होती. २००१-२०११ दरम्यान ठाणे जिल्हयाच्या घनतेमध्ये ३०६ बिंदूंनी वाढ झालेली आहे.
- महाराष्ट्रात लोकसंख्या घनतेमध्ये पुणे जिल्हयाचा (६०३) चौथा क्रमांक आहे. २००१ साली पुणे जिल्हयाची घनता ४६२ होती. २००१-२०११ दशकात पुणे जिल्हयाच्या घनतेची १४१ बिंदूंनी वाढ झालेली आहे.
- लोकसंख्या घनतेमध्ये कोल्हापूर जिल्हयाचा (५०५) पाचवा क्रमांक आहे. २००१ सालच्या जनगणनेच्या तुलनेने लोकसंख्येची घनता ४६ बिंदूंनी वाढलेली आहे.

## (ब) महाराष्ट्रातील लोकसंख्या घनतेनुसार शेवटचे पाच जिल्हे

- **२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये लोकसंख्येची सर्वांत कमी घनता गडचिरोली जिल्हयाची (७४) आहे.** गडचिरोली जिल्हयाची २००१ सालची घनता ६७ होती. यामध्ये ७ बिंदूंनी वाढ झालेली आहे.
- लोकसंख्या घनतेमध्ये सिंधुदुर्ग जिल्हयाचा (१६३) शेवटून दुसरा क्रमांक २००१ सालची घनता १६७ होती. याचा अर्थ, सिंधुदुर्ग जिल्हयात लोकसंख्येची घनता ४ बिंदूंनी घटलेली (– ४) आहे.
- चंद्रपूर जिल्हयाचा लोकसंख्या घनतेमध्ये शेवटून तिसरा क्रमांक (१९२) आहे. २००१ च्या तुलनेने चंद्रपूर जिल्हयाची घनता ११ बिंदूंनी वाढलेली आहे.
- रत्नागिरी जिल्हयाच्या घनतेमध्ये शेवटून चौथा क्रमांक (१९६) आहे. याची २००१ साली घनता २०७ होती. याचा अर्थ, रत्नागिरी जिल्हयाची घनता ११ बिंदूंनी (– ११) घटलेली आहे.

## (क) २०११ सालच्या जनगणनेनुसार जिल्हावार लोकसंख्येच्या घनतेची वैशिष्ट्ये

**(१) अति विशेष दाट लोकवस्तीच्या घनतेचे जिल्हे (घनता २०,००० पेक्षा जास्त) :** महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार अति विशेष दाट लोकवस्ती मुंबई बेट आहे. मुंबई बेटामध्ये मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे आहेत. मुंबई उपनगराची लोकसंख्येची घनता २०,९२५ आणि मुंबई शहराची घनता २०,०३८ आहे.

मुंबई संकुलाचा एकत्रित विचार केल्यास २०११ सालच्या जनगणनेनुसार ६०३ चौ.कि.मी. क्षेत्राची लोकसंख्येची घनता २०,६९४ आहे.

मुंबई शहर (सुमारे ३१.४६ लाख) आणि मुंबई उपनगर (सुमारे ९३.३२ लाख) मिळून सुमारे १२४.७८ लाख लोक राहतात.

**(२) अति दाट लोकसंख्येच्या घनतेचा जिल्हा (घनता ११०० - १२००) :** अति दाट लोकसंख्येच्या घनतेचा ठाणे जिल्हा आहे. याची २०११ सालच्या जनगणनेनुसार लोकसंख्येची घनता १,१५७ आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्हयाचा एकत्रित विचार केल्यास १०,१६१ चौ.कि.मी. क्षेत्रात सुमारे २३५.३३ लाख लोक राहतात. याची एकत्रित लोकसंख्येची घनता २,३१६ आहे.

**(३) घनदाट लोकवस्तीच्या घनतेचे जिल्हे (५०० ते ८००) :** २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात पुणे प्रशासकीय विभागामध्ये पुणे जिल्हा आणि कोल्हापूर जिल्हा याचा घनदाट लोकवस्तीच्या घनतेच्या जिल्हयात समावेश होतो. याची घनता अनुक्रमे ६०३ आणि ५०४ आहे.

**(४) दाट लोकवस्तीच्या घनतेचा जिल्हा (४०० ते ५००) :** २०११ सालच्या जनगणनेनुसार नागपूर जिल्हयाची लोकसंख्येची घनता ४७० आहे.

**(५) मध्यम लोकवस्तीच्या घनतेचे जिल्हे (घनता ३०० ते ४००) :** महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, मध्यम लोकवस्तीच्या घनतेचे आठ जिल्हे आहेत. या गटसमूहात प्रथम क्रमांक नाशिक जिल्हयाचा (घनता ३९३) आहे. या खालोखाल रायगड, औरंगाबाद (३६५), जळगाव आणि लातूर जिल्हयाचा क्रमांक आहे. यानंतर अनुक्रमाने सांगली, अकोला व नांदेड जिल्हे येतात.



**(६) साधारण लोकवस्तीच्या घनतेचे जिल्हे (घनता २५० - ३००) :** २०११ सालच्या जनगणनेनुसार, साधारण लोकवस्तीच्या घनतेचे दहा जिल्हे आहेत. या गटामध्ये सर्वांत प्रथम परभणी जिल्हयाचा क्रमांक (घनता २९५) आहे. या खालोखाल भंडारा, सातारा (२८७), धुळे, सोलापूर आणि नंदुरबार जिल्हयांचा क्रमांक आहे. यानंतर बुलडाणा, अहमदनगर, जालना आणि गोंदिया जिल्हे येतात.

**(७) कमी लोकवस्तीच्या घनतेचे जिल्हे (घनता २०० - २५०) :** या गटसमूहात सात जिल्हे आहेत. यामध्ये घनतेच्या दृष्टीने हिंगोली जिल्हा (२४८) आघाडीवर आहे. यानंतर वाशिम, बीड, अमरावती, उस्मानाबाद जिल्हे येतात. या खालोखाल वर्धा आणि यवतमाळ जिल्हयांचा क्रमांक लागतो.

**(८) विरळ लोकवस्तीच्या घनतेचे जिल्हे (घनता २०० पेक्षा कमी) :** महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार चार जिल्हे विरळ लोकवस्तीच्या घनतेचे आहेत. यामध्ये रत्नागिरी (१९६), चंद्रपूर, सिंधुदुर्ग आणि गडचिरोली (७४) जिल्हयांचा समावेश होतो.

## दृष्टिक्षेपामध्ये महाराष्ट्राच्या अंतरिम काळापुरती लोकसंख्येची जनगणना - 2011
## (MAHARASHTRA'S PROVISIONAL POPULATION 2011 CENSUS AT A GLANCE)

**I. महाराष्ट्राची लोकसंख्या, २०११** *(Population of Maharashtra, 2011)* **:**

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची लोकसंख्या ११,२३,७२,९७२ (सुमारे ११ कोटी २४ लाख/११.२४ कोटी) आहे. देशामध्ये लोकसंख्येत उत्तर प्रदेशाच्या (सुमारे १९.९६ कोटी) खालोखाल महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे.

महाराष्ट्रामध्ये देशामधील ९.२९ टक्के लोकसंख्या आहे. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९,६८,७८,६२७ होती. २००१-२०११ या दशकामध्ये १,५४,९४,३४५ लोकसंख्येची भर पडली.

**II. लोकसंख्येची दशवार्षिक वाढ** *(Decades Growth Rates of Maharashtra)* **:**

२००१-२०११ या दशवार्षिक काळामध्ये महाराष्ट्रात लोकसंख्यावाढीचा दर १५.९९ टक्के आहे. राष्ट्रीय स्तरावर वाढीचा दर १७.६४ टक्के आहे.

गेल्या १९९१-२००१ या दशवार्षिक कालखंडात वाढीचा दर २२.७३ टक्के होता. याचा अर्थ, वाढीच्या दरामध्ये ६.७४ टक्के बिंदूंनी (Percentage Points) घट झालेली आहे.

भारतामध्ये लोकसंख्यावाढीच्या दरात महाराष्ट्राचा एकविसावा क्रमांक आहे.

**III. लोकसंख्येची घनता, २०११** *(Density of Population, 2011)* **:**

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला ३६५ आहे तर राष्ट्रीय स्तरावर घनता ३८२ आहे.

२००१ साली महाराष्ट्राची घनता ३१५ होती. याचा अर्थ दशवार्षिक कालखंडात घनतेमध्ये ६७ बिंदूंनी वाढ झालेली आहे.

**लिंग-गुणोत्तर घटक (Sex Composition)**

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रामध्ये पुरुषांची लोकसंख्या ५,८३,६१,३९७ (सुमारे ५.८४ कोटी) आणि स्त्रियांची लोकसंख्या ५,४०,११,५७५ (सुमारे ५.४० कोटी) आहे.

२००१ सालच्या जनगणनेच्या तुलनेने पुरुष लोकसंख्येमध्ये ७९,५७,६५८ ने (सुमारे ७९.५८ लाख) आणि स्त्री लोकसंख्येमध्ये ७५,३३,५४४ ने (सुमारे ७५.३४ लाख) वाढ झालेली आहे.

पुरुष लोकसंख्येमधील वाढीचा दर १५.८% आणि स्त्री लोकसंख्येमधील वाढीचा दर १६.२ टक्के आहे. स्त्री लोकसंख्येच्या वाढीच्या दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या वाढ झाल्याने लिंग-गुणोत्तरामध्ये काही प्रमाणात सुधारणा झालेली आहे.

**IV. लिंग-गुणोत्तर, २०११** *(Sex Ratio, 2011)* **:**

२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये लिंग-गुणोत्तर ९२५ : १००० आहे. तर राष्ट्रीय स्तरावर हेच प्रमाण ९४० : १००० आहे.

भारतीय स्तरावर महाराष्ट्राचा लिंग-गुणोत्तरामध्ये बाविसावा क्रमांक आहे.

२००१-११ या दशवार्षिक कालखंडामध्ये महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तर ९२२ वरून ९२५ पर्यंत वाढलेले आहे.

**V. बाल लोकसंख्या – ० ते ६ वर्षे दरम्यान, २०११** *(Population in the Age Group 0 - 6)* **:**

२०११ सालच्या जनगणनेनुसार, बाल-लोकसंख्या १,२८,४८,३७५ (सुमारे १.२८ कोटी) आहे.

बालकांची संख्या ६८,२२,२६२ (सुमारे ६८.२२ लाख) आणि बालिकांची संख्या ६०,२६,११३ (सुमारे ६०.२६ लाख) आहे.

२००१ साली बाल-संख्या १.३१ कोटी होती. यांपैकी बालकांची संख्या ६८.७९ लाख आणि बालिकांची संख्या ६३.०९ लाख होती.

**२००१ - २०११ या दशवार्षिक काळामध्ये बाल-लोकसंख्येमधील घट - एक चिंताजनक बाब**

२००१-२०११ या दशवार्षिक काळामध्ये एकूण बालांच्या संख्येमध्ये तीन लाख एवढी घट झालेली आहे. यांपैकी बालकांच्या संख्येमध्ये ५७,००० नी घट झालेली आहे. बालिकांच्या संख्येमध्ये मात्र २ लाख ७३ हजारांनी घट झालेली आहे. ही मात्र सर्वांत चिंताजनक बाब आहे. स्वत:ला तथाकथित प्रगत आणि प्रगतिशील राज्य म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्राला बालिकांची संख्या एवढ्या प्रमाणात घटणे हे बिलकूल शोभनीय नाही.

**VI. बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर, २०११** *(Child Sex Ratio)* **:**

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रामध्ये बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर ८८३ : १००० आहे तर राष्ट्रीय स्तरावर हेच प्रमाण ९१४ : १००० आहे. राष्ट्रीय स्तरापेक्षा महाराष्ट्रात बालिका-बालकांचे गुणोत्तर ३१ बिंदूंनी कमी आहे.

महाराष्ट्रात २००१ साली बालिका-बालकांचे गुणोत्तर ९१७ : १००० एवढे होते. २००१-२०११ या दशवार्षिक काळामध्ये महाराष्ट्रात बालिका-बालकांचे गुणोत्तर ३४ बिंदूंनी घटलेले आहे, ही काही अभिमानाची गोष्ट नाही.

**VII. साक्षरता प्रमाण, २०११** *(Literacy Rates)* **:**

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रामध्ये ८,२५,१२,२२५ (सुमारे ८.२५ कोटी) साक्षर लोक आहेत. यांपैकी पुरुष साक्षर ४,६२,९४,०४१ (सुमारे ४.६३ कोटी) तर स्त्री साक्षर ३,६२,१८,१८४ (सुमारे ३.६२ कोटी) आहेत.

दुसऱ्या शब्दामध्ये सांगावयाचे झाल्यास, सात वर्षांखालील बाल वगळल्यास निरक्षर लोकांची संख्या १,७०,१२,३७२ (सुमारे १.७० कोटी) आहे. यांपैकी पुरुष निरक्षर ५२,४५,०९४ (सुमारे ५२.४५ लाख) आणि स्त्री निरक्षर १,१७,६७,२७८ (सुमारे १.१८ कोटी) आहेत.

२०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रामध्ये ८२.९१ टक्के लोक साक्षर आहेत. महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय स्तरापेक्षा (७४.०४%) जास्त साक्षर लोक आहेत.

महाराष्ट्रात पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८९.८२ टक्के आणि स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७५.४८ टक्के आहे. राष्ट्रीय स्तरावर हेच प्रमाण अनुक्रमे ८२.४ टक्के आणि ६५.४६ टक्के आहे.

२००१-२०११ या दशवार्षिक कालखंडामध्ये महाराष्ट्रात पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८५.९७ टक्क्यांवरून ८९.२२ टक्क्यांपर्यंत (३.८% बिंदूंनी) आणि स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६७.०३ टक्क्यांवरून ७५.४८ टक्क्यांपर्यंत (८.४५ टक्के बिंदूंनी) वाढलेले आहे.

## IV. लिंग-गुणोत्तर : २०११

मानववंश-शास्त्रज्ञ आणि लोकसंख्या शास्त्रज्ञांना लिंग-गुणोत्तराच्या बाबतीत स्वारस्य असते. या संबंधाची ही लिंग-गुणोत्तराची आकडेवारी विशिष्ट क्षेत्रासाठी पुरुष आणि स्त्रियांची स्थिती दर्शविते. म्हणून आकडेवारीवरील भाष्य करताना क्षेत्राच्या निर्देशक म्हणून गृहीत धरू नये.

२०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये लिंग-गुणोत्तर ९२५ : १००० आहे तर राष्ट्रीय स्तरावर हेच प्रमाण ९४० : १००० आहे. भारतीय स्तरावर महाराष्ट्राचा लिंग-गुणोत्तरामध्ये बाविसावा क्रमांक आहे.

२००१-११ या दशवार्षिक कालखंडामध्ये महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तर ९२२ वरून ९२५ पर्यंत वाढलेले आहे. ही वाढ ३ : १००० या प्रमाणात आहे.



**तक्ता क्र. ८.७ : महाराष्ट्र - लिंग-गुणोत्तरानुसार पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे (२००१ आणि २०११)**

| २०११ मधील क्रमांक | जिल्हा | लिंग-गुणोत्तर (वर्ष २०११) | लिंग-गुणोत्तर (वर्ष २००१) | लिंग-गुणोत्तरा-मधील फरक (२००१ - २०११) | २००१ सालानुसार क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्रातील लिंग-गुणोत्तरानुसार पहिले पाच जिल्हे** | | | | | |
| १. | रत्नागिरी | १,१२३ | १,१३६ | – १३ | १ |
| २. | सिंधुदुर्ग | १,०३७ | १,०७९ | – ४२ | २ |
| ३. | गोंदिया | ९९६ | १,००५ | – ९ | ३ |
| ४. | सातारा | ९८६ | ९९५ | – ९ | ४ |
| ५. | भंडारा | ९८४ | ९८१ | + ३ | ५ |
| **महाराष्ट्रातील लिंग-गुणोत्तरानुसार शेवटचे पाच जिल्हे** | | | | | |
| १/३५ | मुंबई शहर | ८३८ | ७७७ | + ६१ | ३५ |
| २/३४ | मुंबई उपनगर | ८५७ | ८२२ | + ३५ | ३४ |
| ३/३३ | ठाणे | ८८० | ८५८ | + २२ | ३३ |
| ४/३२ | पुणे | ९१० | ९१९ | – ९ | ३२ |
| ५/३१ | बीड | ९१२ | ९३६ | – २४ | ३१ |

**Ref. :** *Statement - 2 : Ranking of Districts by Sex Ratio, 2001 and 2011; Part - II, Census of India, 2011; An Overview.*

### (अ) २०११ सालच्या जनगणनेनुसार लिंग-गुणोत्तरामधील पहिले पाच जिल्हे

- महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, लिंग-गुणोत्तरामध्ये सर्वांत प्रथम रत्नागिरी जिल्हा असून लिंग-गुणोत्तर १,१२३ आहे. २००१ साली हे प्रमाण १,१३६ होते. तेव्हाही रत्नागिरी प्रथम स्थानावर होता. या दशकात ते १३ बिंदूंनी घटलेले आहे.
- महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तरामध्ये दुसरा क्रमांक सिंधुदुर्ग जिल्ह्याचा (१,०३७) आहे तर २००१ साली लिंग-गुणोत्तर १,०७९ होते. या दशकात लिंग-गुणोत्तर – ४२ बिंदूंनी कमी झालेले आहे.
- **महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तरामध्ये सर्वांत जास्त घट सिंधुदुर्ग जिल्ह्याची आहे, ही एक चिंताजनक बाब आहे.**
- २०११ सालामध्ये लिंग-गुणोत्तरामध्ये गोंदिया जिल्ह्याचा (९९६) तिसरा क्रमांक आहे. २००१ साली लिंग-गुणोत्तर १,००५ होते. याचा अर्थ, या दशकात – ९ बिंदूंनी लिंग-गुणोत्तरात घट झालेली आहे.
- महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तरामध्ये चौथा आणि पाचवा क्रमांक अनुक्रमे सातारा जिल्हा (९८६) आणि भंडारा जिल्ह्याचा (९८४) क्रमांक आहे.
- लिंग-गुणोत्तरामधील २००१ आणि २०११ मधील फरक पाहता असे आढळते की, भंडारा जिल्हा वगळता उरलेल्या चार जिल्ह्यात ऋणात्मक फरक आहे.

### (ब) २०११ सालच्या जनगणनेनुसार लिंग-गुणोत्तरामधील शेवटचे पाच जिल्हे

- महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार लिंग-गुणोत्तरात सर्वांत कमी लिंग-गुणोत्तर मुंबई शहराचे ८३८ आहे. २००१ साली ते ७७७ होते. याचा अर्थ, मुंबई शहराच्या लिंग-गुणोत्तरात + ६१ बिंदूंनी वाढ झालेली आहे.
- यानंतर मुंबई उपनगराचे लिंग-गुणोत्तर ८५७ आहे. ते २००१ साली ८२२ होते. या दशकात लिंग-गुणोत्तरात + ३५ बिंदूंनी वाढ झालेली आहे.
- ठाणे जिल्ह्याचे लिंग-गुणोत्तर ८८० आहे. ते २००१ साली ८५८ होते. या दशकात लिंग-गुणोत्तरात + २२ बिंदूंनी सुधारणा झालेली आहे.

- मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे हे जिल्हे लोकसंख्येत अग्रेसर आहेत. यांच्या लिंग-गुणोत्तरामध्ये काही प्रमाणात सुधारणा झालेली आहे.
- यानंतर पुणे जिल्ह्यात लिंग-गुणोत्तर ९१० आहे. २००१ साली लिंग-गुणोत्तर ९१९ होते. याचा अर्थ, पुणे जिल्ह्याच्या बाबतीत या दशकात लिंग-गुणोत्तर – ९ बिंदूंनी कमी झालेले आहे. या खालोखाल बीड जिल्ह्यात लिंग-गुणोत्तर ९१२ आहे. २००१ साली ९३६ होते. या दशकात लिंग-गुणोत्तर – २४ बिंदूंनी घटलेले आहे.

## (क) महाराष्ट्रामधील लिंग-गुणोत्तराचे वर्गीकरण

**(१) अत्यंत वाईट लिंग-गुणोत्तर (९०० पेक्षा कमी)** *(Worst Sex Ratio / Below 900)* **:**

२००१ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ९०० पेक्षा कमी गुणोत्तरे असणारे तीन चिंताजनक जिल्हे आहेत. ते मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्हे असून त्यांची लिंग-गुणोत्तरे अनुक्रमे ८३८, ८५७ आणि ८८० आहेत. या जिल्ह्यांची २००१ सालच्या लिंग-गुणोत्तराशी तुलना केल्यास असे आढळते की मुंबई शहर (६१ बिंदू), मुंबई उपनगर (३५ बिंदू) आणि ठाणे जिल्हा (२२ बिंदू) सुधारणा झालेली आहे.

**(२) निम्न लिंग-गुणोत्तर (९०१ ते ९२५)** *(Low Sex Ratio : 900 to 925)* **:**

या गटामध्ये सहा जिल्हे आहेत. पुणे (९१०), बीड (९१२), औरंगाबाद (९१७), उस्मानाबाद (९२०), जळगाव (९२२) आणि लातूर (९२४) जिल्ह्यांची लिंग-गुणोत्तरे आहेत. २००१-११ या दशकात वरील सर्व जिल्ह्यांत लिंग-गुणोत्तरे घसरलेली आहेत. लिंग-गुणोत्तराचे बिंदू बीडमध्ये २४ बिंदूपासून औरंगाबाद जिल्ह्यात ८ बिंदूपर्यंत खाली आलेले आहेत.

**(३) मध्यम निम्न लिंग-गुणोत्तर (९२६ ते ९४०)** *(Medium Low Sex Ratio : 926 to 940)* **:**

२०११ सालच्या लिंग-गुणोत्तरानुसार मध्यम निम्न लिंग-गुणोत्तरात महाराष्ट्रातील नऊ जिल्हे येतात. या गटात सर्वांत जासत लिंग-गुणोत्तर परभणी जिल्ह्याचे ९४० आहे. या खालोखाल नांदेड (९३७); हिंगोली, अहमदनगर, सोलापूर (९३२) या जिल्ह्यांचा क्रमांक आहे. यानंतर नाशिक (९३१); जालना, बुलडाणा आणि वाशिम (९२६) हे जिल्हे येतात.


**तक्ता क्र. ८.८ : महाराष्ट्र - लिंग-गुणोत्तर (२०११)**

| अत्यंत वाईट लिंग-गुणोत्तर (९०० च्या वर) | | निम्न लिंग-गुणोत्तर (९०० ते ९२५) | | मध्यम निम्न लिंग-गुणोत्तर (९२६ ते ९४०) | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | लिंग-गुणोत्तर | जिल्हा | लिंग-गुणोत्तर | जिल्हा | लिंग-गुणोत्तर |
| मुंबई | ८३८ | पुणे | ९१० | वाशिम | ९२६ |
| मुंबई (उपनगर) | ८५७ | बीड | ९१२ | बुलडाणा | ९२८ |
| ठाणे | ८८० | औरंगाबाद | ९१७ | जालना | ९२९ |
| | | उस्मानाबाद | ९२० | नाशिक | ९३१ |
| | | जळगाव | ९२२ | सोलापूर | ९३२ |
| | | लातूर | ९२४ | अहमदनगर | ९३४ |
| | | | | हिंगोली | ९३५ |
| | | | | नांदेड | ९३७ |
| | | | | परभणी | ९४० |

| मध्यम लिंग-गुणोत्तर (९४१ ते ९५०) | | मध्यम उच्च लिंग-गुणोत्तर (९५१ ते ९७०) | | उच्च लिंग-गुणोत्तर (९७० च्या वर) | |
|---|---|---|---|---|---|
| धुळे | ९४१ | कोल्हापूर | ९५३ | नंदुरबार | ९७२ |
| अकोला | ९४२ | रायगड | ९५५ | गडचिरोली | ९७५ |
| वर्धा | ९४६ | चंद्रपूर | ९५९ | भंडारा | ९८४ |
| अमरावती | ९४७ | सांगली | ९६४ | सातारा | ९८६ |
| यवतमाळ | ९४७ | | | गोंदिया | ९९६ |
| नागपूर | ९४८ | | | सिंधुदुर्ग | १०३७ |
| | | | | रत्नागिरी | ११२३ |

**Ref. :** *Part - II : Census of India, 2011; An Overview; Page 39.*






नकाशा क्र. ८.४ : महाराष्ट्र - लिंग-गुणोत्तर (२०११)

**(४) मध्यम लिंग-गुणोत्तर (९४१ ते ९५०) (*Medium Sex Ratio ; 941 to 950*) :**

महाराष्ट्रात मध्यम लिंग-गुणोत्तरात २०११ सालानुसार सहा जिल्हे आहेत. या गटात सर्वप्रथम क्रमांक नागपूर जिल्ह्याचा (९४८) आहे. या खालोखाल यवतमाळ (९४७); अमरावती, वर्धा, अकोला आणि धुळे जिल्ह्यांचा (९४१) क्रमांक आहे.

**(५) मध्यम उच्च लिंग-गुणोत्तर (९५१ ते ९७०) (*Medium High Sex Ratio : 951 to 970*) :**

२००१ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात या गटसमूहात चार जिल्हे आहेत. सर्वप्रथम क्रमांक सांगली जिल्ह्याचा (९६४) आहे. यानंतर चंद्रपूर (९५९), रायगड आणि कोल्हापूर जिल्ह्यांचा (९५३) क्रमांक लागतो.

**(६) उच्च लिंग-गुणोत्तर (९७० पेक्षा जास्त) (*High Sex Ratio : Above 970*) :**

२००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात उच्च लिंग-गुणोत्तर गटात सात जिल्हे येतात. यामध्ये सर्वप्रथम क्रमांक रत्नागिरी जिल्ह्याचा (१,१२३) आहे. या खालोखाल सिंधुदुर्ग (१,०३७), गोंदिया (९९६), सातारा (९८६), भंडारा (९८४), गडचिरोली (९७५) आणि नंदुरबार (९७२) जिल्हे येतात.

**तक्ता क्र. ८.९ : महाराष्ट्र - २००१ आणि २०११ सालच्या लिंग-गुणोत्तरामधील फरकानुसार पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे**

| क्रमांक | जिल्हा | लिंग-गुणोत्तर (वर्ष २०११) | लिंग-गुणोत्तर (वर्ष २००१) | लिंग-गुणोत्तरा-मधील फरक (२००१ - २०११) |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्रातील लिंग-गुणोत्तर फरकानुसार पहिले पाच जिल्हे** | | | | |
| १. | मुंबई शहर | ८३८ | ७७७ | + ६१ |
| २. | मुंबई उपनगर | ८५७ | ८२२ | + ३५ |
| ३. | ठाणे | ८८० | ८५८ | + २२ |
| ४. | नागपूर | ९४८ | ९३२ | + १६ |
| ५. | चंद्रपूर | ९५९ | ९४८ | + ११ |
| **महाराष्ट्रातील लिंग-गुणोत्तर फरकानुसार शेवटचे पाच जिल्हे** | | | | |
| १. | सिंधुदुर्ग | १,०३७ | १,०७९ | – ४२ |
| २. | बीड | ९१२ | ९३६ | – २४ |
| ३. | जालना | ९२९ | ९५१ | – २२ |
| ४. | रायगड | ९५५ | ९७६ | – २१ |
| ५. | बुलडाणा | ९२८ | ९४६ | – १८ |
| ५. | हिंगोली | ९३५ | ९५३ | – १८ |
| ५. | परभणी | ९४० | ९५८ | – १८ |

## (ड) लिंग-गुणोत्तरामधील कल (१९०१ - २०११ दरम्यान)

लिंग-गुणोत्तराचा कल विशिष्ट कालखंडामध्ये (१९०१ ते २०११ दरम्यान) लिंग-गुणोत्तराचा कल स्पष्ट करते. या कलाच्या आधारे लिंग-गुणोत्तराच्या स्वरूपाचा अंदाज व्यक्त करता येतो.

- नंदुरबार जिल्ह्यात लिंग-गुणोत्तर बहुतांशी स्थिर आहे.
- सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातही सर्वसाधारणपणे लिंग-गुणोत्तर स्थिर आहे.
- अकोला, अमरावती, नागपूर, बीड, लातूर याचप्रमाणे काही प्रमाणात उस्मानाबाद जिल्ह्यात १९०१ सालापासून लिंग-गुणोत्तरात बरेच चढ-उतार आहेत.
- रायगड आणि सातारा जिल्ह्यात जरी सापेक्षदृष्ट्या लिग-गुणोत्तर जरी उच्च स्वरूपाचे असले तरी तेथे लिंग-गुणोत्तरात वारंवार आणि लक्षणीय चढ-उतार आहेत.



- जळगाव, बुलडाणा, वर्धा, जालना, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यात लिंग-गुणोत्तरामध्ये संथ स्वरूपात घसरण आहे.
- भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात लिंग-गुणोत्तर सुस्थितीत असले तरी काळाच्या ओघात उतरता कल आहे.

## (इ) १९०१ ते २०११ सालच्या दरम्यानच्या लिंग-गुणोत्तरामधील विशेष वैशिष्ट्ये

- संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता, १९०१ ते १९७१ दरम्यान लिंग-गुणोत्तरात सातत्याने घट झालेली आहे.
  - — १९०१ साली लिंग-गुणोत्तर ९७८ तर १९७१ साली ९३०.
  - — १९८१ चा अपवाद वगळता २००१ साली लिंग-गुणोत्तर ९२२.
  - — २०११ साली महाराष्ट्राचे लिंग-गुणोत्तर ९२५.
- सर्वांत जास्त लिंग-गुणोत्तर : रत्नागिरी (वर्ष १९६१) (१२६४ : १०००)
- सर्वांत कमी लिंग-गुणोत्तर : मुंबई शहर आणि मुंबई उपनगर (बृहन्मुंबई) (वर्ष १९११) (५७० : १०००)

# V. बालिका - बालकांची संख्या : २०११

## (अ) बालिका - बालकांची संख्या (२०११)


महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, बालिका-बालकांची एकूण संख्या १,२८,४८,३७५ (सुमारे १.२८ कोटी) आहे. यांपैकी बालकांची संख्या ६८,२२,२६२ (सुमारे ६८.२२ लाख) आणि बालिकांची संख्या ६०,२६,११३ (सुमारे ६०.२६ लाख) आहे.

२००१ साली महाराष्ट्रात बालिका-बालकांची एकूण संख्या १.३१ कोटी होती. यांपैकी बालकांची संख्या ६८.७९ लाख तर बालिकांची संख्या ६३.०९ लाख होती.

२००१ आणि २०११ च्या आकडेवारीची तुलना करता, बालिका-बालकांची संख्या सुमारे तीन लाखांनी घटलेली आहे. यांपैकी बालकांच्या संख्येमध्ये सुमारे ५७,००० नी घट झालेली आहे तर बालिकांच्या संख्येत मात्र २ लाख ७३ हजारांनी कमी झालेली आहे. ही मात्र सर्वांत चिंताजनक बाब आहे. स्वतःला तथाकथित प्रगत आणि प्रगतिशील राज्य म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्राला बालिकांची संख्या एवढ्या प्रमाणात घटणे हे बिलकूल शोभनीय नाही.

**तक्ता क्र. ८.१० : बालिका-बालकांचे (० - ६ वर्षे) पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे (२०११)**

| क्रमांक | जिल्हा | बालिका-बालकांची संख्या | बालकांची संख्या | बालिकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्रातील बालिका-बालकांचे पहिले पाच जिल्हे** | | | | |
| १. | ठाणे | १२,५७,०८० | ६,५५,३५४ | ६,०१,७२६ |
| २. | पुणे | १०,६७,२६१ | ५,६९,९१६ | ४,९७,३४५ |
| ३. | मुंबई उपनगर | ८,७६,९१७ | ४,५९,१०१ | ४,१७,८१६ |
| ४. | नाशिक | ८,०५,३०२ | ४,२७,८७८ | ३,७७,४२४ |
| ५. | अहमदनगर | ५,३७,३४६ | २,९२,२४२ | २,४५,१०४ |
| **महाराष्ट्रातील बालिका-बालकांचे शेवटचे पाच जिल्हे** | | | | |
| १. | सिंधुदुर्ग | ६८,६३७ | ३५,९३० | ३२,७०७ |
| २. | गडचिरोली | १,१५,१०४ | ५८,८४२ | ५६,२६२ |
| ३. | भंडारा | १,२२,९३१ | ६३,३९८ | ५९,५३३ |
| ४. | वर्धा | १,२४,५३६ | ६५,००५ | ५९,५३१ |
| ५. | गोंदिया | १,३६,११६ | ७०,०१५ | ६६,१०१ |




नकाशा क्र. ८.५ : महाराष्ट्र - बालिका-बालकांची संख्या (२०११)



## (ब) महाराष्ट्रामधील बालिका-बालकांचे पहिले पाच जिल्हे (२०११)

महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, बालिका-बालकांच्या संख्येत ठाणे जिल्ह्याचा (१२.५७ लाख) प्रथम क्रमांक आहे. यामध्ये बालकांची संख्या ६.५५ लाख तर बालिकांची संख्या ६.०१ लाख आहे.

यानंतर पुणे जिल्ह्याचा दुसरा क्रमांक आहे. बालिका-बालकांची संख्या सुमारे १०.६७ लाख असून बालकांची संख्या ५.७० लाख आणि बालिकांची संख्या ४.९७ लाख आहे.

महाराष्ट्रात तिसरा, चौथा आणि पाचवा क्रमांक मुंबई उपनगर जिल्हा (८.७७ लाख), नाशिक जिल्हा (८.०५ लाख) आणि अहमदनगर जिल्ह्यांचा (५.३७ लाख) आहे.

## (क) महाराष्ट्रामधील बालिका-बालकांचे शेवटचे पाच जिल्हे (२०११)

महाराष्ट्रात बालिका-बालकांच्या संख्येत शेवटचा क्रमांक सिंधुदुर्ग जिल्ह्याचा (६८.६४ हजार) आहे. यामध्ये बालकांची संख्या ३५,९३० आणि बालिकांची संख्या ३२,७०७ आहे.

यानंतर दुसरा क्रमांक गडचिरोली जिल्ह्याचा (१,१५,१०४) आहे. यामध्ये बालकांची संख्या ५८,८४२ तर बालिकांची संख्या ५६,२६२ आहे.

तिसरा, चौथा आणि पाचवा क्रमांक अनुक्रमे भंडारा जिल्हा (१,२२,९३१), वर्धा जिल्हा (१,२४,५३६) आणि गोंदिया जिल्हा (१,३६,११६) आहेत.

## (ड) बालिका-बालकांचे जिल्हावार वितरण (२०११)

**(१) बालिका-बालकांची १२.१ ते १४ लाख दरम्यान संख्या असणारा ठाणे जिल्हा :** महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हा सर्व प्रथम क्रमांकावर असून बालिका-बालकांची संख्या १२.५७ लाख आहे.

**(२) बालिका-बालकांची १०.१ ते १२ लाख दरम्यान संख्या असणारा पुणे जिल्हा :** महाराष्ट्रात पुणे जिल्ह्याचा दुसरा क्रमांक असून बालिका-बालांची संख्या १०.६७ लाख आहे.

**(३) बालिका-बालकांची संख्या ८.१ ते १० लाख दरम्यान असणारे जिल्हे :** २०११ सालच्या जनगणनेनुसार या गटात मुंबई उपनगर (८.७७ लाख) आणि नाशिक जिल्ह्यांचा (८.०५ लाख) समावेश होतो.

**(४) बालिका-बालकांची संख्या ५.१ ते ६ लाख असणारे जिल्हे :** या गटामध्ये चार जिल्हे आहेत. प्रथम क्रमांक अहमदनगर जिल्ह्याचा (५.३७ लाख), यानंतर सोलापूर, औरंगाबाद आणि जळगाव (५.१४ लाख) जिल्हे येतात.

**(५) बालिका-बालकांची संख्या ४.१ ते ५ लाख असणारे जिल्हे :** या गटात नागपूर जिल्हा (४.८२ लाख) आणि नांदेड जिल्ह्याचा (४.४४ लाख) समावेश होतो.

**(६) बालिका-बालकांची संख्या ३.१ ते ४ लाख दरम्यान असणारे जिल्हे :** या गटसमूहात सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. या गटात प्रथम क्रमांक कोल्हापूर जिल्ह्याचा (३.९५ लाख); या खालोखाल बीड (३.४४ लाख); बुलडाणा (३.२४ लाख); यवतमाळ, लातूर आणि सातारा जिल्ह्याचा (३.०८ लाख) क्रमांक आहे.

**(७) बालिका-बालकांची संख्या २.१ ते ३ लाख असणारे जिल्हे :** या गटसमूहात दहा जिल्हे आहेत. सर्व प्रथम अमरावती जिल्ह्याचा (३.०० लाख) क्रमांक लागतो. या खालोखाल सांगली (२.९५ लाख); रायगड, जालना आणि मुंबई शहराचा (२.६२ लाख) क्रमांक आहे. यानंतर धुळे (२.६६ लाख); परभणी, नंदुरबार, चंद्रपूर आणि अकोला जिल्हे (२.०६ लाख) येतात.

**(८) बालिका-बालकांची संख्या १.१ ते २ लाख असणारे जिल्हे :** या गटात आठ जिल्हे आहेत. प्रथम क्रमांक उस्मानाबाद जिल्ह्याचा (२.० लाख) असून या खालोखाल हिंगोली, रत्नागिरी आणि वाशिम जिल्हे (१.४७ लाख) आहेत. यानंतर गोंदिया (१.३६ लाख); वर्धा, भंडारा आणि गडचिरोली (१.१५ लाख) जिल्हे येतात.

**(९) एक लाखापेक्षा कमी असणारा जिल्हा :** बालिका-बालकांची संख्या एक लाखापेक्षा कमी असणारा जिल्हा सिंधुदुर्ग आहे.

## VI. बालिका - बालकांचे लिंग-गुणोत्तर : २०११

२०११ सालच्या जनगणनेनुसार, राष्ट्रीय स्तरावर बालिका-बालकांचे सरासरी गुणोत्तर ९१४ आहे तर महाराष्ट्राचे बालिका-बालकांचे सरासरी लिंग-गुणोत्तर फक्त ८८३ आहे तर २००१ साली महाराष्ट्रात हेच प्रमाण ९१३ होते. याचा अर्थ असा की, दर १००० बालकांमागे ३० बालिकांची घट झालेली आहे.

## (अ) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तराचे वितरण

**(१) बालिका-बालकांचे अत्यंत वाईट लिंग-गुणोत्तर असणारे जिल्हे (८५० पेक्षा कमी) : २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर सर्वांत कमी बीड जिल्हयात असून ते फक्त ८०१ आहे. २००१ साली हेच प्रमाण ८९४ होते. याचा अर्थ, २००१-११ या दशकात बीड जिल्हयात बालिकांची ९३ बिंदूंनी घट झालेली आहे आणि महाराष्ट्रात सर्वांत जास्त घट आहे, ही एक शोचनीय बाब आहे.**

यानंतर जळगाव (८२९), अहमदनगर (८३९), बुलडाणा (८४२), कोल्हापूर (८४५), जालना (८४७), औरंगाबाद (८४८) जिल्ह्यांचा क्रमांक आहे. या गटसमूहात सात जिल्हे आहेत.


**(२) बालिका-बालकांचे वाईट लिंग-गुणोत्तर असणारे जिल्हे (८५१ ते ९००) :** या गटसमूहात सर्वांत जास्त म्हणजे तेरा जिल्हे आहेत. २०११ सालच्या गुणोत्तरात सर्वांत शेवटचा क्रमांक बालिका-बालकांच्या गुणोत्तरात उस्मानाबाद जिल्ह्याचा असून ते ८५३ आहे. यानंतर वाशिम (८५९), सांगली (८६२), परभणी (८६६), हिंगोली (८६८), सोलापूर (८७२) आणि लातूर (८७२) जिल्ह्याचा क्रमांक आहे.

याच गटामध्ये पुणे (८७३), मुंबई शहर (८७४), धुळे (८७६), सातारा (८८१), नाशिक (८८२) आणि नांदेड (८९७) या जिल्ह्यांचा समावेश होतो.

### तक्ता क्र. ८.११ : महाराष्ट्र - बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर (२०११)

| बालिका-बालकांचे अत्यंत वाईट लिंग-गुणोत्तर (८५० पेक्षा कमी) | | | बालिका-बालकांचे वाईट लिंग-गुणोत्तर (८५१ ते ९००) | | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | २००१ | २०११ | जिल्हा | २००१ | २०११ |
| बीड | ८९४ | ८०१ | उस्मानाबाद | ८९४ | ८५३ |
| जळगाव | ८८० | ८२९ | वाशिम | ९१८ | ८५९ |
| अहमदनगर | ८८४ | ८३९ | सांगली | ८५१ | ८६२ |
| बुलडाणा | ९०८ | ८४२ | परभणी | ९२३ | ८६६ |
| कोल्हापूर | ८३९ | ८४५ | हिंगोली | ९२७ | ८६८ |
| जालना | ९०३ | ८४७ | सोलापूर | ८९५ | ८७२ |
| औरंगाबाद | ८९० | ८४८ | लातूर | ९१८ | ८७२ |
| | | | पुणे | ९०२ | ८७३ |
| | | | मुंबई | ९२२ | ८७४ |
| | | | धुळे | ९०७ | ८७६ |
| | | | सातारा | ८७८ | ८८१ |
| | | | नाशिक | ९२० | ८८२ |
| | | | नांदेड | ९२९ | ८९७ |
| **बालिका-बालकांचे निम्न लिंग-गुणोत्तर (९०१ ते ९२५)** | | | **बालिका-बालकांचे मध्यम निम्न लिंग-गुणोत्तर (९२६ ते ९४०)** | | |
| जिल्हा | २००१ | २०११ | जिल्हा | २००१ | २०११ |
| अकोला | ९३३ | ९०० | नागपूर | ९४२ | ९२६ |
| मुंबई (उपनगर) | ९२३ | ९१० | अमरावती | ९४१ | ९२७ |
| सिंधुदुर्ग | ९४४ | ९१० | नंदुरबार | ९६१ | ९३२ |
| यवतमाळ | ९३३ | ९१५ | भंडारा | ९५६ | ९३९ |
| वर्धा | ९२८ | ९१६ | रत्नागिरी | ९५२ | ९४० |
| **बालिका-बालकांचे मध्यम लिंग-गुणोत्तर (९४१ ते ९५०)** | | | **बालिका-बालकांचे मध्यम उच्च लिंग-गुणोत्तर (९५१ ते ९७०)** | | |
| जिल्हा | २००१ | २०११ | जिल्हा | २००१ | २०११ |
| गोंदिया | ९५८ | ९४४ | गडचिरोली | ९६६ | ९५६ |
| चंद्रपूर | ९३९ | ९४५ | | | |






नकाशा क्र. ८.६ : महाराष्ट्र - बालिका-बाल लिंग-गुणोत्तर (२०११)

**(३) बालिका-बालकांचे निम्न लिंग-गुणोत्तर (९०१ ते ९२५) :** या गटात सात जिल्ह्यांचा समावेश होतो. अकोला जिल्ह्यात बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर ९०० आहे. यानंतर मुंबई उपनगर (९१०); सिंधुदुर्ग, यवतमाळ, वर्धा, ठाणे (९१८); आणि रायगड (९२४) या जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

**(४) बालिका-बालकांचे मध्यम निम्न लिंग-गुणोत्तर (९२६ ते ९४०) :** २०११ सालच्या जनगणनेनुसार या गटात पाच जिल्हे आहेत. नागपूर जिल्ह्यात बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर ९२६ आहेत. यानंतर अमरावती (९२७); नंदुरबार, भंडारा आणि रत्नागिरी (९४०) जिल्हे येतात.

**(५) बालिका-बालकांचे मध्यम लिंग-गुणोत्तर (९४१ ते ९५०) :** या गटात गोंदिया (९४४) आणि चंद्रपूर (९४५) या दोन जिल्ह्यांचा समावेश होतो.

**(६) बालिका-बालकांचे मध्यम उच्च लिंग-गुणोत्तर (९५१ ते ९७०) :** या गटामध्ये गडचिरोली जिल्हा (९५६) आहे.

### (ब) २०११ सालच्या जनगणनेनुसार बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरामधील पहिले पाच जिल्हे

महाराष्ट्रामध्ये २०११ सालच्या जनगणनेनुसार बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरात पहिला क्रमांक गडचिरोली जिल्ह्याचा असून त्याचे लिंग-गुणोत्तर ९५६ आहे. या खालोखाल चंद्रपूर (९४५), गोंदिया, रत्नागिरी आणि भंडारा (९३९) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

### (क) २०११ सालच्या जनगणनेनुसार बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरामधील शेवटचे पाच जिल्हे

महाराष्ट्रात बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरामध्ये शेवटचा बीड जिल्हा असून त्याचे लिंग-गुणोत्तर ८०१ आहे. यानंतर जळगाव (८२९), अहदमनगर, बुलडाणा आणि कोल्हापूर (८४५) हे जिल्हे येतात.

### (ड) २००१ - २०११ दशकातील बालिका - बालक लिंग-गुणोत्तरामधील फरक (ऋणात्मक आणि धनात्मक)

महाराष्ट्रात २००१ साली बालिका-बालक लिंग-गुणोत्तर ९१३ होते तर २०११ साली ८८३ पर्यंत खाली आले. याचा अर्थ, बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये (म्हणजे याच्यामधील फरकात) – ३० बिंदूंनी घट झाली आहे. दुसऱ्या शब्दामध्ये सांगावयाचे झाल्यास, २००१ सालच्या तुलनेमध्ये दर १००० मुलांमागे आणखी ३० मुलींची तूट झालेली आहे. याचे विपरीत परिणाम पुढील पंधरा ते वीस वर्षांत होऊ शकतात. आणखी स्पष्ट शब्दात असे म्हणता येईल की, २००१ साली मुलींची कमतरता ८७ होती, ती २०११ साली ११७ पर्यंत वाढलेली आहे, हे एक अत्यंत विदारक चित्र आहे.

**(१) महाराष्ट्रात २००१-२०११ या दशकामध्ये बालिका-बालक लिंग-गुणोत्तरातील सर्वांत जास्त फरक असणारा जिल्हा :** सर्वांत जास्त फरक असणाऱ्या बीड जिल्ह्यात (८९४ - ८०१ = –९३) –९३ बिंदूंचा आहे. याचा अर्थ, बीड जिल्ह्यात बालिका-बाल लिंग-गुणोत्तरात –९३ बिंदूंनी घट झालेली आहे.

**(२) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –७० ते –६१ बिंदू फरक असणारा जिल्हा :** बुलडाणा जिल्ह्यात बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामधील फरक –६६ बिंदू आहे.

**(३) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –६० ते –५१ बिंदू फरक असणारे जिल्हे :** या गटात चार जिल्हे आहेत. वाशिम व हिंगोली (प्रत्येकी –५९ बिंदू), परभणी (–५७ बिंदू), जालना (–५६) बिंदू आहेत.

**(४) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –५० ते –४१ बिंदू फरक असणारे जिल्हे :** या गटात पाच जिल्हे आहेत. यामध्ये औरंगाबाद (–४२), मुंबई (–४८), अहमदनगर, लातूर आणि उस्मानाबाद (–४१ बिंदू) जिल्हे आहेत.

**(५) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –४० ते –३१ बिंदू फरक असणारे जिल्हे :** या गटामध्ये पाच जिल्हे येतात. नाशिक (–३८ बिंदू), सिंधुदुर्ग (–३४ बिंदू), अकोला, नांदेड आणि धुळे (–३१ बिंदू) या जिल्ह्यांचा समावेश होतो.

**(६) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –३० ते –२१ बिंदू फरक असणारे जिल्हे :** यामध्ये नंदुरबार (–२९ बिंदू), पुणे (–२९ बिंदू) आणि सोलापूर जिल्हे येतात.

**(७) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –२० ते –११ बिंदू फरक असणारे जिल्हे :** या गटामध्ये महाराष्ट्रामधील सर्वांत जास्त जिल्ह्यांचा म्हणजे दहा जिल्ह्यांचा समावेश होतो. यवतमाळ (–१८ बिंदू); भंडारा, नागपूर, रायगड, गोंदिया, अमरावती, मुंबई उपनगर (–१३ बिंदू); ठाणे (–१३ बिंदू); रत्नागिरी आणि वर्धा (–१२ बिंदू) या जिल्ह्यांचा समावेश होतो.



**(८) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामध्ये –१० ते ० बिंदू फरक असणारे जिल्हे :** या गटात फक्त एकच गडचिरोली (–१० बिंदू) जिल्हा आहे.

महाराष्ट्रामधील ३५ जिल्ह्यांपैकी ३१ जिल्ह्यात बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामधील फरक ऋणात्मक आहे. याचा अर्थ, २००१ सालापेक्षा २०११ साली बालिका-बालक लिंग-गुणोत्तर कमी आहे, हे निश्चितच जनतेची सामाजिक जाणीव कोणत्या दिशेने जात आहे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. राजकीय नेते, सामाजिक नेते आणि कुटुंबांनी गंभीरपणे या महत्त्वाच्या मुद्द्याकडे पाहण्याची गरज आहे.

**(९) बालिका-बालक लिंग-गुणोत्तरामधील फरक १ ते २० असणारे जिल्हे :** या गटात चंद्रपूर (३), सातारा (३), कोल्हापूर (६), सांगली (११) बिंदूंनी वाढलेले आहे.

## VII. साक्षरता : २०११

लोकसंख्येच्या सामाजिक-आर्थिक विकासाचा साक्षरता एक महत्त्वाचा निर्देशक आहे की, जी मानव विकासासंबंधी महत्त्वाची माहिती उपलब्ध करून देते. समाजामधील साक्षरतेची उच्च पातळी म्हणजे विकासाची उच्च पातळी होय. जनगणनेनुसार जी व्यक्ती कोणतीही भाषा समजावून वाचू आणि लिहू शकते, तिला 'साक्षर' असे म्हटले जाते. जनगणनेच्या दृष्टीने सात वर्षांखालील मुला-मुलींना निरक्षर मानले जाते. जरी ते शाळेत जात असले आणि काही प्रमाणात वाचू आणि लिहू शकत असले तरी !

१९९१ च्या जनगणनेच्या आधी पाच वर्षांखालील मुला-मुलींना निरक्षर मानले जात असे. अर्थात, १९९१ च्या जनगणनेपासून फक्त प्रभावी साक्षरता दराचा विचार करण्याचा वरीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**साक्षरतेची स्थिती :** महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, ८,२५,१२,२२५ (सुमारे ८.२५ कोटी) लोक साक्षर आहेत. यांपैकी पुरुष ४,६२,९४,०४१ (सुमारे ४.६३ कोटी) आणि स्त्रिया ३,६२,१८,१८४ (सुमारे ३.६२ कोटी) साक्षर आहेत.

महाराष्ट्रात सर्वांत जास्त निरक्षर लोक ठाणे जिल्ह्यात १३,५४,११६ (१३.५४ लाख) आहेत. या खालोखाल पुणे जिल्ह्यात १०,७१,१८१ (सुमारे १०.७१ लाख) लोक आहेत. महाराष्ट्रात सर्वांत कमी निरक्षर लोक सिंधुदुर्ग जिल्ह्यात १,०५,०१३ (सुमारे १.०५ लाख) आहेत.

### (अ) महाराष्ट्रात २०११ सालानुसार एकूण साक्षरतेचे पहिले पाच जिल्हे

महाराष्ट्रात साक्षरतंत ठाणे जिल्ह्याचा सर्वप्रथम क्रमांक असून २०११ सालानुसार साक्षरतेची संख्या ८४,४२,९३५ (सुमारे ८४.४३ लाख) आहेत. या खालोखाल मुंबई उपनगर ७८,८५,९१७ (७८.८६ लाख); पुणे जिल्हा ७२,८८,५१७ (सुमारे ७२.८९ लाख); नाशिक जिल्हा (४२.९४ लाख) अणि नागपूर जिल्ह्याचा (३७.३४ लाख) क्रमांक आहे.

**तक्ता क्र. ८.१२ : महाराष्ट्र - साक्षरतेचे पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे (२०११) (लाखात)**

| घटक | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| **पहिले पाच जिल्हे** | ठाणे | मुंबई उपनगर | पुणे | नाशिक | नागपूर |
| **एकूण साक्षर लोक** | ८४.४३ | ७८.८६ | ७२.८९ | ४२.९४ | ३७.३४ |
| पुरुष | ४७.४९ | ४३.०५ | ४०.४९ | २४.०९ | २०.०५ |
| स्त्री | ३६.९४ | ३३.८१ | ३२.४० | १८.८५ | १७.२९ |
| **शेवटचे पाच जिल्हे** | गडचिरोली | सिंधुदुर्ग | हिंगोली | वाशिम | नंदुरबार |
| **एकूण साक्षर लोक** | ६.७५ | ६.७५ | ७.७४ | ८.५७ | ८.९२ |
| पुरुष | ३.८८ | ३.५७ | ४.५४ | ४.९१ | ५.४० |
| स्त्री | २.८७ | ३.१८ | ३.२० | ३.६७ | ३.७७ |

**Ref. :** *Part - II : Census of India, 2011; Table - 4; An Overview.*

### (ब) महाराष्ट्रात २०११ सालानुसार एकूण साक्षरतेचे शेवटचे पाच जिल्हे

२०११ सालानुसार महाराष्ट्रात एकूण साक्षरतेत सर्वांत शेवटचा जिल्हा गडचिरोली असून तेथे ६,७४,९५८ लोक साक्षर आहेत. यानंतर सिंधुदुर्ग (६,७५,२१८), हिंगोली (७.७४ लाख), वाशिम (८.५७ लाख) आणि नंदुरबार (८.९२ लाख) या जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

### (क) महाराष्ट्रात २०११ सालानुसार पुरुष साक्षरतेचे पहिले पाच जिल्हे

२०११ सालच्या जनगणनेनुसार, पुरुष साक्षरतेमध्ये ठाणे जिल्ह्याचा (४७.४९ लाख) प्रथम क्रमांक आहे. या खालोखाल मुंबई उपनगर (४३.०५ लाख), पुणे (४०.४९ लाख), नाशिक (२४.०९ लाख) आणि नागपूर (२०.०५ लाख) या जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

### (ड) महाराष्ट्रात २०११ सालानुसार पुरुष साक्षरतेचे शेवटचे पाच जिल्हे

महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार पुरुष साक्षरतेत सिंधुदुर्ग जिल्ह्याचा (३.५७ लाख) शेवटचा क्रमांक आहे. यानंतर गडचिरोली (३.८८ लाख), हिंगोली (४.५४ लाख), वाशिम (४.,९१) आणि भंडारा (५.४० लाख) जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

### (इ) महाराष्ट्रात २०११ सालानुसार स्त्री साक्षरतेचे पहिले पाच जिल्हे

महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, स्त्री साक्षरतेत सर्वांत पहिला क्रमांक ठाणे जिल्ह्याचा (३६.९४ लाख) आहे. या खालोखाल मुंबई उपनगर (३३.८१ लाख), पुणे (३२.४७ लाख), नाशिक (१८.८५ लाख) आणि नागपूर (१७.२९ लाख) जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

### (ई) महाराष्ट्रात २०११ सालानुसार स्त्री साक्षरतेचे शेवटचे पाच जिल्हे

महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, स्त्री साक्षरतेमध्ये सर्वांत शेवटचा क्रमांक जिल्हा गडचिरोली (२.८७ लाख) आहे. यानंतर सिंधुदुर्ग (३.१८ लाख), हिंगोली (३.२० लाख), वाशिम (३.६७ लाख) आणि नंदुरबार (३.७७ लाख) या जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

### महाराष्ट्रात साक्षरतेची टक्केवारी (२०११)

महाराष्ट्रात २०११ सालच्या टक्केवारीनुसार ८२.९१ टक्के लोक साक्षर आहेत. १९५१ साली महाराष्ट्रात फक्त २७.९१ टक्के लोक साक्षर होते. यानंतर सातत्याने साक्षरतेची टक्केवारी वाढत गेली आहे.

**तक्ता क्र. ८.१३ : महाराष्ट्र - साक्षरतेची टक्केवारी (१९५१ ते २०११)**


| वर्ष | एकूण साक्षर | पुरुष साक्षर | स्त्री साक्षर |
|---|---|---|---|
| १९५१ | २७.९१ | ४०.४९ | १४.५६ |
| १९६१ | ३५.०८ | ४०.२६ | १९.८० |
| १९७१ | ४५.७७ | ५९.४० | ३१.०० |
| १९८१ | ५७.२४ | ७०.०६ | ४३.५० |
| १९९१ | ६४.८७ | ७६.५६ | ५२.३२ |
| २००१ | ७६.८८ | ८५.९७ | ६७.०३ |
| २०११ | ८२.९१ | ८९.८२ | ७५.४८ |

टीप : (१) १९५१, १९६१, १९७१ या जनगणनेत पाच वर्षांपुढील व्यक्तींची साक्षरतेची टक्केवारी.

(२) १९८१ ते २०११ या जनगणनेत सात वर्षांपुढील व्यक्तींची साक्षरतेची टक्केवारी.

**Ref. :** *Part - II : Census of India, 2011; An Overview, Page No. 50.*






नकाशा क्र. ८.७ : महाराष्ट्र - साक्षरता

❊ **महाराष्ट्रामध्ये एकूण साक्षरतेच्या टक्केवारीनुसार पहिले पाच जिल्हे (२०११) :** महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, एकूण साक्षरतेची सर्वांत जास्त टक्केवारी मुंबई उपनगराची ९०.९० टक्के आहे. या खालोखाल नागपूर (८९.५२%), मुंबई शहर (८८.४८%), अमरावती (८८.२३%) आणि अकोला (८७.५५%) जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

❊ **महाराष्ट्रामध्ये एकूण साक्षरतेच्या टक्केवारीनुसार शेवटचे पाच जिल्हे :** महाराष्ट्रामध्ये २०११ सालच्या जनगणनेनुसार, एकूण साक्षरतेची सर्वांत कमी टक्केवारी नंदुरबार जिल्ह्याची (६३.०४%) आहे. यानंतर गडचिरोली (७०.५५%), बीड (७३.५३%), जालना (७३.६१%) आणि धुळे (७४.६१%) जिल्ह्याचे क्रमांक आहेत.

❊ **महाराष्ट्रामध्ये पुरुष साक्षरतेच्या टक्केवारीनुसार पहिले पाच जिल्हे (२०११) :** महाराष्ट्रामध्ये २०११ सालच्या जनगणनेनुसार पुरुष साक्षरतेच्या टक्केवारीत सर्व प्रथम क्रमांक मुंबई उपनगराचा (९४.२८%) आहे. या खालोखाल नागपूर (९३.७६%), सिंधुदुर्ग (९३.६८%), गोंदिया (९३.५४%) आणि अकोला (९२.८९%) या जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

❊ **महाराष्ट्रामध्ये पुरुष साक्षरतेच्या टक्केवारीनुसार शेवटचे पाच जिल्हे :** महाराष्ट्रामध्ये २०११ सालच्या जनगणनेनुसार, पुरुष साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वांत शेवटचा क्रमांक नंदुरबार जिल्ह्याचा (७१.९८%) आहे. यानंतर गडचिरोली (८०.२१%), धुळे (८२.५९%), बीड (८३.०९%) आणि जालना (८५.२५%) हे जिल्हे येतात.

**तक्ता क्र. ८.१४ : महाराष्ट्र - साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वांत पहिले आणि शेवटचे पाच जिल्हे (२०११)**

| घटक | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| **साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वांत पहिले पाच जिल्हे (२०११)** | | | | | |
| **एकूण साक्षरतेची टक्केवारी** | मुंबई उपनगर ९०.९०% | नागपूर ८९.५२% | मुंबई शहर ८८.४८% | अमरावती ८८.२३% | अकोला ८७.५५% |
| पुरुष साक्षरतेची टक्केवारी | मुंबई उपनगर ९४.२८% | नागपूर ९३.७६% | सिंधुदुर्ग ९३.६८% | गोंदिया ९३.५४% | भंडारा ९३.१७% |
| स्त्री साक्षरतेची टक्केवारी | मुंबई उपनगर ८६.९३% | मुंबई शहर ८६.०३% | नागपूर ८५.०७% | अमरावती ८३.५२% | अकोला ८१.९१% |
| **साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वांत शेवटचे पाच जिल्हे (२०११)** | | | | | |
| **एकूण साक्षरतेची टक्केवारी** | नंदुरबार ६३.०४% | गडचिरोली ७०.५५% | बीड ७३.५३% | जालना ७३.६१% | धुळे ७४.६१% |
| पुरुष साक्षरतेची टक्केवारी | नंदुरबार ७१.९९% | गडचिरोली ८०.२१% | धुळे ८२.५९% | बीड ८३.९९% | जालना ८५.२५% |
| स्त्री साक्षरतेची टक्केवारी | नंदुरबार ५३.९०% | गडचिरोली ६०.६६% | जालना ६१.२८% | बीड ६२.९९% | परभणी ६४.२७% |

**Ref. :** *Statement - 5, Ranking of Districts by Literacy Rate and Sex : 2011; Part - II, Census of India, 2011; An Overview.*

❊ **महाराष्ट्रामध्ये स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीनुसार पहिले पाच जिल्हे :** महाराष्ट्रात स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वप्रथम क्रमांक मुंबई उपनगराचा (८६.९३%) आहे. या खालोखाल मुंबई शहर (८६.०३%), नागपूर (८५.०७%), अमरावती (८३.५२%) आणि अकोला (८१.९१%) या जिल्ह्यांचे क्रमांक आहेत.

❊ **महाराष्ट्रामध्ये स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीनुसार शेवटचे पाच जिल्हे :** महाराष्ट्रात स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीनुसार सर्वांत शेवटचा क्रमांक नंदुरबार (५३.९०%) असून यानंतर गडचिरोली (६०.६६%), जालना (६१.२८%), बीड (६२.९९%) आणि परभणी (६४.२७%) जिल्हे येतात.



**साक्षरतेच्या टक्केवारीची वैशिष्ट्ये (२०११)**

(i) महाराष्ट्राची २०११ सालच्या जनगणनेनुसार साक्षरतेची सरासरी टक्केवारी ८२.९१ आहे. यापेक्षा जास्त साक्षरतेची टक्केवारी तेरा जिल्ह्यांची आहे.

(ii) ८० टक्क्यांपेक्षा आणि राज्याच्या साक्षरतेच्या सरासरी टक्केवारी दरम्यान दहा जिल्हे आहेत.

(iii) अकरा जिल्ह्यांची साक्षरतेची टक्केवारी ७० ते ८० टक्के दरम्यान आहे.

(iv) नंदुरबार या एका जिल्ह्याची साक्षरतेची टक्केवारी ७० टक्क्यांपेक्षा कमी म्हणजे ६३.०४% आहे.

(v) साक्षरतेच्या टक्केवारीच्या २००१ आणि २०११ च्या जनगणनेनुसार, नागपूर जिल्ह्याचा क्रमांक तिसरा होता, तो आता दुसरा आहे.

(vi) ठाणे जिल्ह्याचा क्रमांक सहावा होता, तो आता नववा आहे.

(vii) जळगाव आणि अहमदनगर जिल्ह्याचा क्रमांक सतरावा आणि अठरावा होता, तो चोविसावा आणि तेविसावा झाला.

(viii) धुळे जिल्ह्याचा क्रमांक २५ वरून ३१ व्या क्रमांकावर घसरला.

(ix) गडचिरोली आणि नंदुरबार या पहिल्याप्रमाणे ३४ वा व ३५ वा आहे.

(x) अमरावती, अकोला, पुणे, सिंधुदुर्ग, गोंदिया, भंडारा, सातारा, रायगड, कोल्हापूर, सांगली, उस्मानाबाद आणि यवतमाळ जिल्ह्याचे क्रमांक २००१ सालच्या जनगणनेनुसार आहेत.

**पुरुष साक्षरता (२०११) :**

- महाराष्ट्राच्या पुरुष सरासरी टक्केवारीपेक्षा (८९.८२%) अठरा जिल्ह्यांची टक्केवारी जास्त आहे. ८९.८२% आणि ८०% दरम्यान सोळा जिल्ह्यांची पुरुष साक्षरता टक्केवारी आहे. नंदुरबार जिल्ह्याची पुरुष साक्षरता टक्केवारी ७१.९८% आहे.
- नागपूरचा क्रमांक चौथ्यावरून दुसऱ्यावर आला. गडचिरोली आणि नंदुरबारचा अनुक्रमे ३४ वा आणि ३५ वा क्रमांक तसाच राहिला.

**स्त्री साक्षरता (२०११) :**

- राज्याच्या स्त्री साक्षरता टक्केवारीपेक्षा (७५.४८%) तेरा जिल्ह्यांची साक्षरता जास्त आहे.
- बारा जिल्ह्यांची साक्षरता ७५.४८ ते ७० टक्के दरम्यान आहे.
- सहा जिल्ह्यांची स्त्री साक्षरता ६० ते ७० टक्के दरम्यान आहे.
- नंदुरबार जिल्ह्याची स्त्री साक्षरता ६० पेक्षा कमी (५३.९०%) आहे.
- स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीची क्रमवारी पाहता, मुंबई उपनगराने दुसऱ्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आघाडी घेतलेली आहे.
- मुंबई शहर जिल्ह्याचा क्रमांक पहिल्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर आला.
- गडचिरोली आणि नंदुरबार जिल्ह्याचा क्रमांक अनुक्रमे ३४ व ३५ क्रमांकावर कायम राहिला.

**२००१ आणि २०११ च्या जनगणनेच्या दरम्यान साक्षरतेच्या प्रमाणामधील फरकाची वैशिष्ट्ये**

(i) पुरुष साक्षर आणि स्त्री साक्षर यांच्यामधील दरी कमी-कमी होत आहे.

(ii) चौदा जिल्ह्यांमध्ये पुरुष-स्त्री साक्षरतेमधील फरक १५ बिंदूंपेक्षा जास्त आहे.

(iii) सिंधुदुर्ग, पुणे, अकोला, वर्धा आणि ठाणे जिल्ह्यामधील पुरुष-स्त्री साक्षरतेमधील फरक १० बिंदूंपेक्षा जास्त परंतु राज्यपातळीच्या १४.३४ बिंदूंपेक्षा कमी आहे.

(iv) अमरावती, नागपूर, मुंबई उपनगर आणि मुंबई शहर जिल्ह्यात हा फरक १० बिंदूंपेक्षा कमी आहे.

(v) महाराष्ट्रात पुरुष-स्त्री साक्षरतेमधील सर्वांत जास्त फरक जालना जिल्ह्याचा २३.२७ बिंदू तर सर्वांत कमी फरक मुंबई शहर जिल्ह्याचा ४.५१ बिंदू आहे.

# VIII. ग्रामीण - नागरी लोकसंख्या : २०११

## ग्रामीण लोकसंख्येची वैशिष्ट्ये - २०११

- २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात ग्रामीण लोकसंख्या ६,१५,४५,४४१ (सुमारे ६.१५ कोटी) आहे. एकूण लोकसंख्येशी ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी ५४.७७ आहे.
- राष्ट्रीय स्तरावर हेच प्रमाण ६८.५४% आहे. याचा अर्थ, महाराष्ट्रात राष्ट्रीय स्तराच्या मानाने ग्रामीण लोकसंख्या १३.७७ टक्क्याने कमी आहे.
- २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात ग्रामीण लोकसंख्या ५,५७,७८,००० (सुमारे ५.७८ कोटी) होती तेव्हा एकूण लोकसंख्येशी ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी ५७.६० टक्के होती.
- याचा अर्थ, महाराष्ट्रात या दशकात ग्रामीण लोकसंख्या सुमारे तीन टक्क्याने कमी झाली. म्हणजे तीन टक्के लोकसंख्येने नागरी प्रदेशाकडे स्थलांतर करणे असा होता.
- २००१ - २०११ या दशकात ग्रामीण लोकसंख्येच्या वाढीचा दर नंदुरबार जिल्ह्याचा (२३.६२%) आहे.
- ग्रामीण लोकसंख्येचा या दशकात ऋणात्मक वाढीचा दर रत्नागिरी (– १०.३४%), रायगड (– ०.६३%) आणि वर्धा (– ३.९९%) आहे.

## नागरी लोकसंख्येची वैशिष्ट्ये - २०११

- २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या ५,०८,२७,५३१ (सुमारे ५.०८ कोटी) आहे. एकूण लोकसंख्येशी नागरी लोकसंख्येची टक्केवारी ४५.२३ आहे.
- राष्ट्रीय स्तरावर नागरी लोकसंख्येची टक्केवारी ३१.१६ आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय स्तरापेक्षा नागरी लोकसंख्येची टक्केवारी १४.०७ ने जास्त आहे.
- २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या ४,१९,०१,००० (४.१९ कोटी) होती, तेव्हा एकूण लोकसंख्येशी नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४२.४० टक्के होते.
- भारतामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार, मोठ्या राज्यामध्ये तमिळनाडू राज्यात नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४८.४५ टक्के होते तर दुसऱ्या क्रमांकावर केरळ (४७.७२%) आणि तिसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र (४५.२३%) आहे.
- २००१ सालच्या जनगणनेनुसार, नागरी लोकसंख्येचे प्रमाण तमिळनाडूचा (४३.९%) प्रथम क्रमांक होता आणि महाराष्ट्राचा (४२.४%) दुसरा क्रमांक होता.
- भारतामध्ये नागरी लोकसंख्यादृष्ट्या विचार करता, महाराष्ट्राचा नागरी लोकसंख्येत (५.०८ कोटी) प्रथम क्रमांक आहे.
- भारतामधील एकूण नागरी लोकसंख्येपैकी १३.४८ टक्के नागरी लोकसंख्या महाराष्ट्रात आहे.
- २००१ साली भारतामध्ये महाराष्ट्र नागरी लोकसंख्येत सर्वप्रथम होते.



## महाराष्ट्र : जनगणना २०११ सालच्या जनगणनेनुसार नागरी - ग्रामीण लोकसंख्येचे वितरण (अंतरिम)

### प्रस्तावना

परंपरेपासून आधुनिकतेची वाटचाल करीत असताना नागरिकीकरणाची पातळी हा एक रूपांतरणाचा निर्देशांक (An Index of Transformation) असतो. सर्वसाधारणपणे असे प्रस्थापित झाले आहे की, नागरिकीकरणाच्या वाढीमुळे दुय्यम आर्थिक क्रियांना चालना मिळते आणि प्राथमिक आर्थिक क्रियांवरील अवलंबन कमी करते. तसेच ती एक आर्थिक वाढ आणि विकासाची खूण मानली जाते. आर्थिक विकासाचा नागरिकीकरण एकसंघ भाग असतो. बऱ्याचशा आधुनिक आर्थिक क्रिया नगरामध्ये कार्यरत असतात आणि उत्पादकतेमध्ये वाढ होते. नगराच्या संदर्भात उत्पन्न प्राप्त करणे तुलनात्मकदृष्ट्या सहज शक्य असते. आर्थिक वाढीचा प्रभाव नागरिकीकरणावर असतो तर नागरिकीकरणाचा चांगला प्रभाव आर्थिक वाढीच्या दरावर होतो.

**जनगणना २०११ सालानुसार नागरी लोकसंख्येच्या वितरणासंबंधीचे महत्त्वाचे मुद्दे :**

- महाराष्ट्रात नागरी क्षेत्रामध्ये सुमारे ५.०८ कोटी लोकसंख्या आहे.
- महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येची टक्केवारी ४५.२३ आहे. भारतीय स्तरावर तमिळनाडू (४८.४५%) आणि केरळ (४७.७२%), नंतर महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे. २००१ च्या जनगणनेत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक होता.

  (राष्ट्रीय स्तरावर नागरिकीकरणाची टक्केवारी ३१.१६ आहे.)
- महाराष्ट्रात मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे आणि नागपूर जिल्हे हे सर्वांत जास्त नागरिकीकरण झालेले जिल्हे आहेत तर गडचिरोली, सिंधुदुर्ग आणि हिंगोली जिल्ह्यात किमान नागरिकीकरण झालेले आहे.
- २००१-११ या दशकामध्ये नागरी लोकसंख्येची दशवार्षिक वाढ २३.७ टक्के तर ग्रामीण लोकसंख्येची दशवार्षिक वाढ १०.३% आहे. राष्ट्रीय स्तरावर अनुक्रमे ३१.८% आणि १२.२% आहे.
- २००१-११ या दशकामध्ये लोकसंख्येमध्ये १,५४,९४,३४५ (१.५५ कोटी) ने वाढ झालेली आहे. यापैकी नागरी क्षेत्रात ९७,२६,५५१ तर ग्रामीण क्षेत्रात ५७,६७,७९४ ने वाढ झाली.
- मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे १०० टक्के नागरी आहेत. यानंतर ठाणे (७६.९२%), नागपूर (६८.३०%) आणि पुणे (६०.८९%) हे जिल्हे नागरिकीकरणाचे आहेत.
- महाराष्ट्रात ग्रामीण लोकसंख्येची सर्वांत जास्त टक्केवारी गडचिरोली (८९.००%) असून या खालोखाल सिंधुदुर्ग (८७.४०%) आणि हिंगोली (८४.८३%) जिल्ह्यांचा क्रमांक आहे.

### ग्रामीण – नागरी वाढीचा दर :

पूर्वी असे आढळलेले आहे की, विविध कारणामुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे लोकसंख्येचे स्थलांतर झालेले आहे.

- १९९१-२००१ या दशकात महाराष्ट्रात लोकसंख्येमध्ये ग्रामीण क्षेत्रात १५.२५ टक्के, नागरी क्षेत्रात ३४.५७ टक्के आणि एकत्रितपणे २२.७३ टक्के वाढ झालेली आहे.

**तक्ता क्र. ८.१५ : महाराष्ट्र - लोकसंख्यावाढीचा दर (१९९१-२००१ आणि २००१ - ११) (टक्केवारी)**

| घटक | १९९१ - २००१ | | | २००१ - २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री |
| एकूण | २२.७३ | २३.४५ | २१.९५ | १५.९९ | १५.८० | १६.२१ |
| ग्रामीण | १५.२५ | १५.९९ | १४.५० | १०.३४ | ११.०२ | ९.६४ |
| नागरी | ३४.५७ | ३४.७० | ३४.४३ | २३.६७ | २१.९९ | २५.५८ |

हेच स्वरूप २०११ च्या अंतरिम तक्त्यात पाहावयास मिळते. २००१-११ दशकामध्ये ग्रामीण क्षेत्रात १०.३४ टक्के आणि नागरी क्षेत्रात २३.६७ टक्के व एकत्रितपणे १५.९९ टक्के दशवार्षिक वाढ आहे.

१९९१-२००१ दशकात स्त्री आणि पुरुष लोकसंख्येच्या नागरी दशवार्षिक वाढीमध्ये अशाच प्रकारचे स्वरूप (३४.४% आणि ३४.७%) पाहावयास मिळते. परंतु २००१-११ दशकामध्ये स्त्रियांची दशवार्षिक वाढ (२५.५८%) पुरुषांच्या दशवार्षिक वाढीपेक्षा (२१.९९%) जास्त आहे.

**ग्रामीण आणि नागरी क्षेत्रामधील लोकसंख्येचे स्वरूप :**

१९९१ च्या जनगणनेमध्ये ग्रामीण आणि नागरी लोकसंख्येचा वाटा अनुक्रमे ६१.३१ टक्के आणि ३८.६९ टक्के होता तर २००१ ची आकडेवारी अनुक्रमे ५७.५७ टक्के आणि ४२.४३ टक्के होती. २०११ सालच्या जनगणनेनुसार याचे प्रमाण अनुक्रमाने ५४.७७ टक्के आणि ४५.२३ टक्के आहे.

**तक्ता क्र. ८.१६ : महाराष्ट्र - १९९१ ते २०११ दरम्यान नागरी व ग्रामीण क्षेत्राचा लोकसंख्येमधील वाटा**

| घटक | १९९१ | | | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री |
| ग्रामीण | ६१.३१ | ६०.१० | ६२.६० | ५७.५७ | ५६.४६ | ५८.७८ | ५४.७७ | ५४.१३ | ५५.४५ |
| नागरी | ३८.६९ | ३९.९० | ३७.४० | ४२.४३ | ४३.५४ | ४१.२२ | ४५.२३ | ४५.८७ | ४४.५५ |

**ग्रामीण क्षेत्र :** २००१ - ११ दशकामध्ये जिल्हा पातळीवर ग्रामीण क्षेत्रात सर्वात जास्त दशवार्षिक वाढीचा दर नंदुरबार जिल्हयात (२३.६२%) आहे तर वर्धा (– ३.९९%), रायगड (– ०.६३%), रत्नागिरी (– १०.३४%) आणि सिंधुदुर्ग (– ५.६८%) जिल्हयात ऋणात्मक वाढीचा दर आहे.

**नागरी क्षेत्र :** महाराष्ट्रात नागरी क्षेत्रात रायगड जिल्हयात (८१.८९%) सर्वांत जास्त लोकसंख्यावाढीचा दर आहे. या खालोखाल गडचिरोली (७५.३४%), गोंदिया (५७.३६%) आणि औरंगाबाद (४८.७०%) जिल्हे आहेत. मुंबई शहरामध्ये (– ५.७५%) ऋणात्मक वाढीचा दर आहे.

वरील जिल्हे वगळता सर्व जिल्हयांमधील नागरी क्षेत्रात लोकसंख्येचा दशवार्षिक वाढीचा दर ८ टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

**बालिका–बालकांच्या लोकसंख्येचे स्वरूप (० – ६ वर्षे) :** १९९१ साली एकूण लोकसंख्येशी बालिका-बालकांच्या संख्येची टक्केवारी १७.११ टक्के, ग्रामीण स्तरावर त्याचे १८.१७ टक्के आणि नागरी स्तरावर १५.४२ टक्के होते. २००१ साली हेच प्रमाण ग्रामीण क्षेत्रात १५.११ टक्के तर नागरी क्षेत्रात १२.७५ टक्के झाले.

**तक्ता क्र. ८.१७ : महाराष्ट्र - एकूण लोकसंख्येमधील बालिका-बालकांच्या संख्येची टक्केवारी (० - ६ वर्षे)**

| घटक | १९९१ | | | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री |
| एकूण | १७.११ | १७.०० | १७.२३ | १४.११ | १४.१८ | १४.०४ | ११.४३ | ११.६९ | ११.१६ |
| ग्रामीण | १८.१७ | १८.३६ | १७.९८ | १५.११ | १५.४६ | १४.७५ | १२.१० | १२.५४ | ११.६३ |
| नागरी | १५.४२ | १४.९४ | १५.९६ | १२.७५ | १२.५२ | १३.०२ | १०.६३ | १०.६९ | १०.५६ |

२०११ सालच्या जनगणनेनुसार, बालिका-बालकांची टक्केवारी ग्रामीण क्षेत्रात १२.१० टक्के आणि नागरी क्षेत्रात १०.६३ टक्क्यांपर्यंत खाली आलेली आहे. महाराष्ट्रात प्रत्येक जनगणनेमध्ये बालिका-बालकांची टक्केवारी कमी-कमी होत जात आहे, ही अतिशय चिंताजनक बाब आहे !

**लोकसंख्येचे लिंग–गुणोत्तर :** महाराष्ट्रात २००१ साली लिंग-गुणोत्तर ९२२ होते. ते २०११ साली ९२५ पर्यंत उंचावले आहे. लिंग-गुणोत्तरामध्ये काही प्रमाणात सुधारणा झालेली आहे.

ग्रामीण क्षेत्रात लिंग-गुणोत्तर ९४८ पर्यंत उंचावलेले दिसते. परंतु नागरी क्षेत्रात मात्र ते ८९९ पर्यंत खाली गेलेले आहे.

**तक्ता क्र. ८.१८ : महाराष्ट्र - लोकसंख्येमधील लिंग-गुणोत्तर (१९९१ ते २०११)**

| घटक | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| एकूण | ९३४ | ९२२ | ९२५ |
| ग्रामीण | ९७२ | ९६० | ९४८ |
| नागरी | ८७५ | ८७३ | ८९९ |



१९९१ पासून जरी ग्रामीण क्षेत्रात लिंग-गुणोत्तर उच्च स्तरावर असले तरी यामध्ये हळूहळू घट होत चाललेली आहे. नागरी क्षेत्रात चित्र सुधारत चालल्यासारखे दिसत आहे. २००१ साली नागरी क्षेत्रात लिंग-गुणोत्तर ८७३ होते, ते २०११ साली ८९९ पर्यंत वाढलेले आहे.

**बालिका–बालकांचे लिंग–गुणोत्तर (० ते ६ वर्षे) :** महाराष्ट्रात सर्वसाधारण लिंग-गुणोत्तरामध्ये काही प्रमाणात सुधारणा होत असली तरी बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरामध्ये मात्र झपाट्याने घट होत आहे.

**तक्ता क्र. ८.१९ : महाराष्ट्र - बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर (० ते ६ वर्षे)**

| घटक | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| एकूण | ९४६ | ९१३ | ८८३ |
| ग्रामीण | ९५३ | ९१६ | ८८० |
| नागरी | ९३४ | ९०८ | ८८८ |

सर्वसाधारणपणे नागरी लिंग-गुणोत्तरापेक्षा ग्रामीण क्षेत्रात लिंग-गुणोत्तर उच्च स्तरावर असले तरी २०११ साली ग्रामीण क्षेत्रामधील बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तरापेक्षा नागरी क्षेत्रात ते जास्त आहे. तरीही ग्रामीण आणि नागरी क्षेत्रात बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तरामध्ये झपाट्याने घट होत आहे.

ग्रामीण क्षेत्रात १९९१ ते २०११ दरम्यान ते ९५३ पासून ८८० पर्यंत खाली आलेले आहे तर नागरी क्षेत्रात याच कालावधीमध्ये ९३४ वरून ८८८ पर्यंत खाली उतरले आहे.

**साक्षरता प्रमाण :** महाराष्ट्रात काळाच्या ओघात सातत्याने साक्षरांची संख्या वाढत आहे आणि हाच कल २०११ सालीही दिसून आला.

**तक्ता क्र. ८.२० : महाराष्ट्र - ग्रामीण - नागरी साक्षरता टक्केवारी (१९९१ - २०११)**

| घटक | १९९१ | | | २००१ | | | २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री | लोकसंख्या | पुरुष | स्त्री |
| एकूण | ६४.८७ | ७६.५६ | ५२.३२ | ७६.८८ | ८५.९७ | ६७.०३ | ८२.९१ | ८९.३२ | ७५.४८ |
| ग्रामीण | ५५.५२ | ६९.७४ | ४०.९६ | ७०.३६ | ८१.९३ | ५८.४० | ७७.०९ | ८६.३९ | ६७.३८ |
| नागरी | ७९.२० | ८६.४१ | ७०.८७ | ८५.४८ | ९१.०३ | ७९.०९ | ८९.८४ | ९३.७९ | ८५.४४ |

महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार एकूण साक्षरतेची टक्केवारी ८२.९१ आहे तर हीच टक्केवारी ग्रामीण क्षेत्रात ७७.०९ टक्के आणि नागरी क्षेत्रात ८९.८४ टक्के आहे. ग्रामीण-नागरी क्षेत्राच्या दरम्यान साक्षरतेची दरी कमी-कमी होत आहे.

राज्य स्तरावर पुरुष आणि स्त्री साक्षरमधील अंतर १४ टक्के बिंदू आहे तर ग्रामीण क्षेत्रात १९ टक्के बिंदू आणि नागरी क्षेत्रात ९ टक्के बिंदू आहे.

**(Ref. :** *Census of India, 2011; Rural - Urban Distribution of Population*)

## महाराष्ट्राची जनगणना - २०११ (अंतरिम निष्कर्ष)

| घटक | मूल्य |
|---|---|
| महाराष्ट्राची लोकसंख्या | ११,२३,७२,९७२ (सुमारे ११ कोटी २४ लाख/११.२४ कोटी) |
| देशामध्ये लोकसंख्येत उत्तर प्रदेशच्या (सुमारे १९.९६ कोटी) खालोखाल दुसरा क्रमांक महाराष्ट्राचा. | |
| महाराष्ट्रामध्ये देशातील लोकसंख्येची टक्केवारी | ९.२९% |
| पुरुष लोकसंख्या | ५,८३,६१,३९७ (सुमारे ५.८४ कोटी) |
| स्त्री लोकसंख्या | ५,४०,११,५७५ (सुमारे ५.४० कोटी) |
| लोकसंख्येची दशवार्षिक (२००१ - २०११ वाढ) | १५.९९% (सुमारे १६%) |
| लोकसंख्येची घनता | ३६५ |
| लिंग-गुणोत्तर | ९२५ |
| लिंग-गुणोत्तरामधील फरक (२००१ व २०११) | ९२२ वरून ९२५ (+ ३ ने वाढ) |
| एकूण बालिका - बालक संख्या<br>बालक संख्या<br>बालिका संख्या | १,२८,४८,३७५ (सुमारे १.२८ कोटी)<br>६८,२२,२६२ (सुमारे ६८.२२ लाख)<br>६०,२६,११३ (सुमारे ६०.२६ लाख) |
| वर्ष २००१ आणि वर्ष २०११ ची एकूण बालिका-बालकांच्या संख्येचे स्वरूप | एकूण बालिका-बालकांच्या संख्येत सुमारे ३ लाखांची घट.<br>१.३१ कोटींवरून १.२८ कोटी |
| बालकांच्या संख्येचे स्वरूप | • बालकांच्या संख्येत ५७,००० नी घट.<br>६८.७९ लाखांवरून ६८.२२ लाख<br>• बालिकांच्या संख्येत २ लाख ७३ हजारांनी घट.<br>६३.०९ लाखांवरून ६०.२६ लाख.<br>सर्वांत चिंताजनक बाब. |
| एकूण बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर<br>ग्रामीण बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर<br>नागरी बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर<br>वर्ष २००१ आणि वर्ष २०११ मधील बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तराची तुलना | ८८३<br>८८०<br>८८८<br>३० बिंदूंनी घट<br>९१३ बिंदूवरून ८८३ बिंदू |
| एकूण साक्षरांची संख्या | ८,२५,१२,२२५ (सुमारे ८.२५ कोटी)<br>४,६२,९४,०४१ (सुमारे ४.६३ कोटी)<br>३,६२,१८,१८४ (सुमारे ३.६२ कोटी) |
| ग्रामीण लोकसंख्या | ६,१२५,४५,४४१(सुमारे ६.१५ कोटी/६ कोटी १५.४५ लाख) |
| नागरी लोकसंख्या | ५,०८,२७,५३१ (सुमारे ५.०८ कोटी/५ कोटी ०.८ लाख) |
| ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी<br>नागरी लोकसंख्येची टक्केवारी | ५४.७७%<br>४५.२३% |
| ग्रामीण पुरुष टक्केवारी<br>नागरी पुरुष टक्केवारी | ५४.१३%<br>४५.८७% |
| ग्रामीण स्त्री टक्केवारी<br>नागरी स्त्री टक्केवारी | ५५.४५%<br>४४.५५% |

पुढे चालू



| घटक | मूल्य |
|---|---|
| ग्रामीण लिंग-गुणोत्तर<br>नागरी लिंग-गुणोत्तर | ९४८<br>८९९ |
| एकूण लोकसंख्येची दशवार्षिक वाढ (२००१ - २०११)<br>ग्रामीण लोकसंख्येची दशवार्षिक वाढ<br>नागरी लोकसंख्येची दशवार्षिक वाढ | १५.९९%<br>१०.३४%<br>२३.६७% |
| एकूण पुरुष लोकसंख्येची वार्षिक वाढ<br>ग्रामीण पुरुष लोकसंख्येची वार्षिक वाढ<br>नागरी पुरुष लोकसंख्येची वार्षिक वाढ | १५.८०%<br>११.०२%<br>२१.९९% |
| एकूण स्त्री लोकसंख्येची वार्षिक वाढ<br>ग्रामीण स्त्री लोकसंख्येची वार्षिक वाढ<br>नागरी स्त्री लोकसंख्येची वार्षिक वाढ | १६.२१%<br>९.०४%<br>२५.५८% |
| एकूण बालिका-बालकांच्या (०-६ वर्षे) संख्येची टक्केवारी<br>ग्रामीण बालिका-बालकांची टक्केवारी<br>नागरी बालिका-बालकांची टक्केवारी | ११.४३%<br>१२.१०%<br>१०.६३% |
| एकूण बालकांची टक्केवारी<br>ग्रामीण बालकांची टक्केवारी<br>नागरी बालकांची टक्केवारी | ११.६९%<br>१२.५४%<br>१०.६९% |
| एकूण बालिकांची टक्केवारी<br>ग्रामीण बालिकांची टक्केवारी<br>नागरी बालिकांची टक्केवारी | ११.१६%<br>११.६३%<br>१०.५६% |
| एकूण साक्षरतेची टक्केवारी<br>ग्रामीण साक्षरतेची टक्केवारी<br>नागरी साक्षरतेची टक्केवारी | ८२.९१%<br>७७.०९%<br>८९.८४% |
| एकूण पुरुष साक्षरतेची टक्केवारी<br>ग्रामीण पुरुष साक्षरतेची टक्केवारी<br>नागरी पुरुष साक्षरतेची टक्केवारी | ८९.८२%<br>८६.३९%<br>९३.७९% |
| एकूण स्त्री साक्षरतेची टक्केवारी<br>ग्रामीण स्त्री साक्षरतेची टक्केवारी<br>नागरी स्त्री साक्षरतेची टक्केवारी | ७५.४८%<br>६७.३८%<br>८५.४४% |

पुढे चालू

| घटक | मूल्य |
|---|---|
| ग्रामीण - नागरी दशवार्षिक वाढ (टक्केवारी) (२००१ - २०११) | |
| (i) एकूण ग्रामीण दशवार्षिक वाढ | १०.३४% |
| (ii) एकूण नागरी दशवार्षिक वाढ | २३.६७% |
| (iii) पुरुष ग्रामीण दशवार्षिक वाढ | ११.०२% |
| (iv) स्त्री ग्रामीण दशवार्षिक वाढ | ९.६४% |
| (v) पुरुष नागरी दशवार्षिक वाढ | २१.९९% |
| (vi) स्त्री नागरी दशवार्षिक वाढ | २५.९९% |
| लोकसंख्येमधील ग्रामीण-नागरी टक्केवारी (२०११) | |
| (i) पुरुष ग्रामीण लोकसंख्या | ५४.१३% |
| (ii) पुरुष नागरी लोकसंख्या | ४५.८७% |
| (iii) स्त्री ग्रामीण लोकसंख्या | ५५.४५% |
| (iv) स्त्री नागरी लोकसंख्या | ४४.५५% |
| बालिका-बालकांच्या संख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी (२०११) | |
| (i) एकूण ग्रामीण बालिका-बालक | १२.१०% |
| (ii) एकूण नागरी बालिका-बालक | १०.६३% |
| (iii) एकूण बालके | ११.६९% |
| (iv) ग्रामीण बालके | १२.५४% |
| (v) नागरी बालके | १०.६९% |
| (vi) एकूण बालिका | ११.१६% |
| (vii) ग्रामीण बालिका | ११.६३% |
| (viii) नागरी बालिका | १०.५६% |
| लिंग-गुणोत्तर (२०११) | |
| (i) ग्रामीण लिंग-गुणोत्तर | ९४८ |
| (ii) नागरी लिंग-गुणोत्तर | ८९९ |
| बालिका-बालक लिंग-गुणोत्तर | |
| (i) ग्रामीण बालिका-बालक लिंग-गुणोत्तर | ८८० |
| (ii) नागरी बालिका-बालक लिंग-गुणोत्तर | ८८८ |
| ग्रामीण - नागरी साक्षरता टक्केवारी (२०११) | |
| (i) एकूण ग्रामीण साक्षरता | ७७.०९ |
| (ii) पुरुष ग्रामीण साक्षरता | ८६.३९ |
| (iii) स्त्री ग्रामीण साक्षरता | ६७.३८ |
| (iv) एकूण नागरी साक्षरता | ८९.८४ |
| (v) पुरुष नागरी साक्षरता | ९३.७९ |
| (vi) स्त्री नागरी साक्षरता | ८५.४४ |

**Ref. :** *Part - II : Census of India, 2011; An Overview.*



## महाराष्ट्र - लोकसंख्याशास्त्रीय घटकांमधील सर्वांत पहिला आणि सर्वांत शेवटचा जिल्हा
## जनगणना २०११ (अंतरिम निष्कर्ष)

| घटक | सर्वांत प्रथम जिल्हा | | सर्वांत शेवटचा जिल्हा | |
|---|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | ठाणे : | १,१०,५४,१३१ (९.८४%) | सिंधुदुर्ग : | ८,४८,८६८ (०.७६%) |
| पुरुष लोकसंख्या | ठाणे : | ५८,७९,३८७ (१०.०७%) | सिंधुदुर्ग : | ४,१६,६९५ (०.७१%) |
| स्त्री लोकसंख्या | ठाणे : | ५१,७४,७४४ (९.५८%) | सिंधुदुर्ग : | ४,३२,१७३ (०.८०%) |
| लोकसंख्या दशवार्षिक वाढीचा दर (२००१ - २०११) | ठाणे : | ३५.९४% | मुंबई शहर : | – ५.७५ (ऋणात्मक वाढ) |
| लोकसंख्येची घनता | मुंबई उपनगर : | २०.९२५ | गडचिरोली : | ७४ |
| लिंग-गुणोत्तर | रत्नागिरी : | ११२३ | मुंबई शहर : | ८३८ |
| लिंग-गुणोत्तर फरक (२००१ आणि २०११) | मुंबई शहर : | + ६१ बिंदू (७७७ वरून ८३८) | सिंधुदुर्ग : | – ४२ बिंदू (१०७९ वरून १०३७) |
| एकूण बालिका व बालकांची संख्या | ठाणे : | १२.५७ लाख | सिंधुदुर्ग : | ६८.६४ हजार |
| बालकांची संख्या | ठाणे : | ६.५५ लाख | सिंधुदुर्ग : | ३५.९३ हजार |
| बालिकांची संख्या | ठाणे : | ६.०२ लाख | सिंधुदुर्ग : | ३२.७१ हजार |
| बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर | गडचिरोली : | ९५६ | बीड : | ८०१ |
| बालिका-बाल लिंग-गुणोत्तर फरक (२००१ आणि २०११) | बीड : | – ९३ बिंदू (ऋणात्मक) (८९४ वरून ८०१ बिंदू) | गडचिरोली : | – १० बिंदू (ऋणात्मक) (९६६ वरून ९५६ बिंदू) |
| एकूण साक्षर | ठाणे : | ८४.४३ लाख | गडचिरोली : | ६,७४,९५८ |
| पुरुष साक्षर | ठाणे : | ४७.४९ लाख | सिंधुदुर्ग : | ३.५७ लाख |
| स्त्री साक्षर | ठाणे : | ३६.९४ लाख | गडचिरोली : | २.८७ लाख |
| एकूण साक्षरतेची टक्केवारी | मुंबई उपनगर : | ९०.९०% | नंदुरबार : | ६३.०४% |
| पुरुष साक्षर टक्केवारी | मुंबई उपनगर : | ९४.२८% | नंदुरबार : | ७१.९८% |
| स्त्री साक्षर टक्केवारी | मुंबई उपनगर : | ८६.९३% | नंदुरबार : | ५३.९०% |
| ग्रामीण लोकसंख्येची दशवार्षिक वाढ (२००१ - २०११) | नंदुरबार : | २३.६२% | रत्नागिरी : | – १०.३४% (ऋणात्मक वाढ) |
| नागरी लोकसंख्येची दशवार्षिक वाढ (२००१ - २०११) | रायगड : | ८१.८९% | मुंबई शहर : | – ५.७५% (ऋणात्मक वाढ) |

**Ref. :** *Part - II : Census of India, 2011; An Overview.*

# बहुपर्यायी प्रश्न

(१) २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे . . . . . . . आहे.
(अ) ९.६९ कोटी (ब) ११ कोटी, २४ लाख (क) ७.९० कोटी (ड) ६.३० कोटी

(२) महाराष्ट्राचा भारतात लोकसंख्येत . . . . . . क्रमांक आहे.
(अ) चौथा (ब) तिसरा (क) दुसरा (ड) पहिला

(३) महाराष्ट्रात देशातील . . . . . . लोकसंख्या आहे.
(अ) ९.२९% (ब) १२.५% (क) ८.००% (ड) १४.०९%

(४) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात सर्वांत जास्त लोकसंख्या . . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) मुंबई उपनगर (ब) नाशिक (क) पुणे (ड) ठाणे

(५) २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वांत कमी लोकसंख्या . . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) हिंगोली (ब) वाशिम (क) सिंधुदुर्ग (ड) गडचिरोली

(६) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात पुरुष लोकसंख्या . . . . . . आहे.
(अ) ६.५२ कोटी (ब) ५.०० कोटी (क) ४.५० कोटी (ड) ५.८४ कोटी

(७) २०११ सालच्या जनगणनेनुसार, पुरुष लोकसंख्येत सर्वप्रथम क्रमांक . . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) नागपूर (ब) पुणे (क) ठाणे (ड) मुंबई उपनगर

(८) २०११ सालच्या जनगणनेनुसार, स्त्री लोकसंख्येत सर्वप्रथम . . . . . . क्रमांक आहे.
(अ) ठाणे (ब) मुंबई उपनगर (क) नाशिक (ड) ठाणे

(९) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात १ कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असणारा एकमेव जिल्हा . . . . . . आहे.
(अ) पुणे (ब) ठाणे (क) मुंबई उपनगर (ड) नागपूर

(१०) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात लोकसंख्येची दशवार्षिक वाढ . . . . . . आहे.
(अ) १२.२% (ब) १८.५% (क) १५.९९% (ड) १०.७%

(११) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात सर्वांत जास्त दशवार्षिक वाढ असलेला . . . . . . जिल्हा
(अ) मुंबई उपनगर (ब) नाशिक (क) पुणे (ड) ठाणे

(१२) २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात दशवार्षिक वाढीमध्ये सर्वांत जास्त ऋणात्मक वाढ . . . . . . या जिल्ह्यात झालेली आहे.
(अ) मुंबई उपनगर (ब) मुंबई शहर (क) रत्नागिरी (ड) सिंधुदुर्ग

(१३) २०११ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या लोकसंख्येची घनता . . . . . . आहे.
(अ) ३१५ (ब) २५० (क) ३६५ (ड) २०४

(१४) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राच्या लोकसंख्येची सर्वांत जास्त घनता . . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) मुंबई उपनगर (ब) मुंबई शहर (क) ठाणे (ड) पुणे

(१५) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्राच्या लोकसंख्येची सर्वांत कमी घनता . . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) सिंधुदुर्ग (ब) रत्नागिरी (क) चंद्रपूर (ड) गडचिरोली

(१६) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तर . . . . . . आहे.
(अ) ९२२ (ब) ९३० (क) ९२५ (ड) ९१८

(१७) २०११ सालच्या जनगणनेनुसार, लिंग-गुणोत्तरामध्ये सर्वप्रथम क्रमांक . . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) सिंधुदुर्ग (ब) रत्नागिरी (क) गोंदिया (ड) सातारा

(१८) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात सर्वांत कमी लिंग-गुणोत्तर . . . . . . जिल्ह्याचे आहे.
(अ) मुंबई शहर (ब) मुंबई उपनगर (क) पुणे (ड) ठाणे

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | ब | (२) | क | (३) | अ | (४) | ड | (५) | क | (६) | ड |
| (७) | क | (८) | अ | (९) | ब | (१०) | क | (११) | ड | (१२) | ब |
| (१३) | क | (१४) | अ | (१५) | ड | (१६) | क | (१७) | ब | (१८) | अ |



(१९) २०११ सालच्या जनगणनेनुसार, २००१-२०११ दशकात महाराष्ट्रात लिंग-गुणोत्तरामध्ये सर्वांत जास्त घट . . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) रत्नागिरी (ब) गोंदिया (क) सातारा (ड) सिंधुदुर्ग

(२०) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात बालिका-बालकांची संख्या . . . . . आहे.
(अ) १.३१ कोटी (ब) १.२८ कोटी (क) २.१५ कोटी (ड) १.५० कोटी

(२१) २००१ आणि २०११ च्या जनगणनेची तुलना केल्यास बालिका-बालकांच्या संख्येत सुमारे . . . . . घट झालेली आहे.
(अ) १ लाख (ब) २ लाख (क) ३ लाख (ड) ४ लाख

(२२) २००१ - २०११ या दशकात बालिकांच्या संख्येत . . . . . नी घट झालेली आहे.
(अ) २ लाख ७३ हजार (ब) १.५ लाख (क) ६० हजार (ड) २ लाख

(२३) २०११ सालच्या जनगणनेनुसार, बालिका-बालकांच्या संख्येत . . . . . जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आहे.
(अ) मुंबई उपनगर (ब) ठाणे (क) पुणे (ड) नाशिक

(२४) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात बालिका-बालकांच्या संख्येत सर्वांत शेवटचा क्रमांक . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) गडचिरोली (ब) भंडारा (क) सिंधुदुर्ग (ड) वर्धा

(२५) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात बालिका-बालकांचे लिंग-गुणोत्तर . . . . . आहे.
(अ) ९१४ (ब) ९२२ (क) ९२५ (ड) ८८३

(२६) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरात पहिला क्रमांक . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) गडचिरोली (ब) चंद्रपूर (क) गोंदिया (ड) रत्नागिरी

(२७) २०११ सालच्या महाराष्ट्रात बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरात सर्वांत शेवटचा क्रमांक . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) जळगाव (ब) बुलडाणा (क) अहमदनगर (ड) बीड

(२८) २००१ आणि २०११ च्या जनगणनेनुसार, बालिका-बालकांच्या गुणोत्तरामधील फरक . . . . . घटलेला आहे.
(अ) २५ बिंदू (ब) २० बिंदू (क) ३० बिंदू (ड) १५ बिंदू

(२९) २००१ आणि २०११ या दशकामधील बालिका-बालकांच्या लिंग-गुणोत्तरामधील सर्वांत जास्त फरक . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) जालना (ब) बीड (क) कोल्हापूर (ड) औरंगाबाद

(३०) महाराष्ट्रात २००१ सालच्या जनगणनेनुसार . . . . . लोक साक्षर आहेत.
(अ) ८.२५ कोटी (ब) ९ कोटी (क) ७.५० कोटी (ड) १०.२ कोटी

(३१) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, सर्वांत जास्त साक्षरतेची संख्या . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) पुणे (ब) मुंबई उपनगर (क) नाशिक (ड) ठाणे

(३२) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, सर्वांत कमी साक्षरतेची संख्या . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) सिंधुदुर्ग (ब) गडचिरोली (क) हिंगोली (ड) वाशिम

(३३) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, साक्षरतेची टक्केवारी . . . . . आहे.
(अ) ७६.८८ (ब) ५७.२४ (क) ८२.९१ (ड) ६४.८७

(३४) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात एकूण साक्षरतेची सर्वांत जास्त टक्केवारी . . . . . जिल्ह्यात आहे.
(अ) मुंबई उपनगर (ब) नागपूर (क) मुंबई शहर (ड) अमरावती

(३५) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात एकूण साक्षरतेच्या सर्वांत कमी टक्केवारीमध्ये . . . . . जिल्हा आहे.
(अ) बीड (ब) नंदुरबार (क) गडचिरोली (ड) जालना

(३६) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, पुरुष साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वप्रथम क्रमांक . . . . . जिल्ह्याचा आहे.
(अ) सिंधुदुर्ग (ब) गोंदिया (क) नागपूर (ड) मुंबई उपनगर

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१९) | ड | (२०) | ब | (२१) | क | (२२) | अ | (२३) | ब | (२४) | क |
| (२५) | ड | (२६) | अ | (२७) | ड | (२८) | क | (२९) | ब | (३०) | अ |
| (३१) | ड | (३२) | ब | (३३) | क | (३४) | अ | (३५) | ब | (३६) | ड |

(३७) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, पुरुष साक्षरतेमध्ये पुरुष साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वांत शेवटचा क्रमांक . . . . . जिल्ह्याचा आहे.

(अ) धुळे (ब) गडचिरोली (क) नंदुरबार (ड) बीड

(३८) महाराष्ट्रात २०११ सालच्या जनगणनेनुसार, स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीत सर्वांत प्रथम क्रमांक . . . . जिल्ह्याचा आहे.

(अ) मुंबई उपनगर (ब) अमरावती (क) नागपूर (ड) मुंबई शहर

(३९) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात ग्रामीण लोकसंख्येची सर्वांत जास्त दशवार्षिक वाढ . . . . . जिल्ह्याची आहे.

(अ) गडचिरोली (ब) सिंधुदुर्ग (क) गोंदिया (ड) नंदुरबार

(४०) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात नागरी लोकसंख्येत सर्वांत जास्त दशवार्षिक वाढ . . . . . जिल्ह्याची आहे.

(अ) मुंबई उपनगर (ब) नाशिक (क) रायगड (ड) पुणे

(४१) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात नागरी लोकसंख्या सुमारे . . . . . आहे.

(अ) ५८% (ब) ५५% (क) ४५% (ड) ३९%

(४२) २०११ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात ग्रामीण लोकसंख्या . . . . . आहे.

(अ) ५५% (ब) ६१% (क) ५८% (ड) ६५%

(४३) २००१-११ या दशकामध्ये नागरी लोकसंख्येची वाढ सुमारे . . . . . आहे.

(अ) ३५% (ब) १६% (क) २०% (ड) २४%

(४४) २००१-११ दशकामध्ये ग्रामीण लोकसंख्येची वाढ सुमारे . . . . . आहे.

(अ) १६% (ब) १२% (क) १०% (ड) २०%

(४५) महाराष्ट्रात १०० टक्के नागरी लोकसंख्या . . . . . या जिल्ह्यात आहे.

(अ) मुंबई शहर व मुंबई उपनगर (ब) ठाणे
(क) नागपूर (ड) पुणे

(४६) २००१-२०११ या दशकामध्ये ग्रामीण क्षेत्रामध्ये जिल्हा स्तर सर्वांत जास्त लोकसंख्येची वाढ . . . . . या जिल्ह्यात झालेली आहे.

(अ) हिंगोली (ब) नंदुरबार (क) गडचिरोली (ड) गोंदिया

(४७) २००१-२०११ या दशकामध्ये ग्रामीण क्षेत्रात जिल्हा स्तरावर सर्वांत जास्त लोकसंख्येची ऋणात्मक वाढ . . . . . या जिल्ह्यात आहे.

(अ) सिंधुदुर्ग (ब) वर्धा (क) रायगड (ड) रत्नागिरी

(४८) २००१-२०११ या दशकामध्ये नागरी क्षेत्रात जिल्हा स्तरावर सर्वांत जास्त लोकसंख्येची वाढ . . . या जिल्ह्यात आहे.

(अ) रायगड (ब) गडचिरोली (क) गोंदिया (ड) औरंगाबाद

(४९) २००१-२०११ या दशकामध्ये नागरी क्षेत्रात जिल्हा स्तरावर सर्वांत जास्त लोकसंख्येची ऋणात्मक वाढ . . . . . या जिल्ह्यात आहे.

(अ) रत्नागिरी (ब) मुंबई शहर (क) वर्धा (ड) सिंधुदुर्ग

(५०) २०११ सालच्या जनगणनेनुसार, एकूण लोकसंख्येशी बालिका-बालकांचे प्रमाण सुमारे . . . . . आहे.

(अ) ११% (ब) १४% (क) १७% (ड) १३%

## उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (३७) | क | (३८) | अ | (३९) | ड | (४०) | क | (४१) | क | (४२) | अ |
| (४३) | ड | (४४) | क | (४५) | अ | (४६) | ब | (४७) | ड | (४८) | अ |
| (४९) | ब | (५०) | अ | | | | | | | | |

# ९. स्थलांतर

एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात होणारी मानवी हालचाल म्हणजेच स्थलांतर होय. स्थलांतराच्या प्रक्रियेत दोन स्थळातील अंतर, हेतू व स्थलांतराचा कालखंड या तीन घटकांना महत्त्वाचे स्थान असते.

**"विशिष्ट कालावधीत एका भौगोलिक किंवा राजकीय विभागातून आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय कारणासाठी दुसऱ्या भौगोलिक किंवा राजकीय विभागात जाऊन वास्तव्य करणे म्हणजेच 'स्थलांतर' होय."**

महाराष्ट्रामध्ये पुढील स्वरूपाची स्थलांतरे प्रामुख्याने पाहावयास मिळतात.

**(१) ग्रामीण – नागरी स्थलांतर :** • नागरी केंद्रात औद्योगिक विकास झालेला असतो. रोजगार सुविधांची उपलब्धता असते. यामुळे कुशल व अकुशल कार्यक्षमतेचे लोक नागरी केंद्राकडे सतत स्थलांतर करतात. • महाराष्ट्रात ग्रामीण भागातील लोक प्रामुख्याने मुंबई-पुणे विभागात स्थलांतर करतात. • मुंबईला स्वातंत्र्यपूर्व काळात गिरणीत काम करण्यासाठी कोकणातून विशेषतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून व देशावरून विशेषतः सातारा, सांगली व कोल्हापूर भागातून लोक मुंबईला आले. • अन्नधान्यांच्या कमी उत्पादनामुळे अवर्षणप्रवण क्षेत्रातून अनेक लोक मोलमजुरीसाठी मुंबईला आले. मुंबईला एकदा आल्यावर ते लोक पुन्हा आपल्या गावाकडे जाण्यास नाखूष असतात. • मुंबईला महाराष्ट्रातून लोक स्थलांतरित होतातच; परंतु त्यापेक्षाही अन्य राज्यांतून विशेषतः कर्नाटक, केरळ, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश व बिहारमधूनही लोक मुंबईला आलेले आहेत.

**(२) नागरी – ग्रामीण स्थलांतर :** आयुष्यभर नोकरी-उद्योग केल्यावर सेवानिवृत्तीनंतर कित्येक लोक आपल्या खेड्याकडे किंवा अन्य लहान नगराकडे स्थलांतर करताना मोठ्या महानगरातील अति गर्दी, प्रदूषण, राहत्या घरांचा प्रश्न वगैरे कारणांमुळे कमी वस्तीच्या प्रदेशाकडे स्थलांतराची प्रवृत्ती वाढते. विशेषतः मुंबईसारख्या महानगरातून काही लोक सेवानिवृत्तीनंतर पुणे किंवा त्यासारख्या अन्य नगरात एखादी वास्तू बांधून स्थलांतर करण्याची प्रवृत्ती आढळत आहे.

**(३) नागरी – नागरी स्थलांतर :** हे स्थलांतर मुख्यत्वे नोकरी-व्यवसायामुळे होते. यामध्ये पुरुषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त असते.

**(४) ग्रामीण – ग्रामीण स्थलांतर :** मुख्यत्वेकरून यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त असते. लग्नानंतर मुली सासरी जातात, त्यामुळे त्यांचे वास्तव्याचे ठिकाण बदलते. व्यवसायासाठी ऋतुकालीनदेखील ग्रामीण-ग्रामीण स्थलांतर होत असते.

**महत्त्वाची टीप : स्थलांतरासंबंधी २०११ जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध न झाल्याने २००१ सालच्या जनगणनेच्या अनुषंगाने स्थलांतराचा आढावा घेतलेला आहे.**

## (अ) महाराष्ट्रात स्थलांतराचे स्थूल स्वरूप

I. महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यामधील स्थलांतर
II. भारतामधील इतर राज्यांमधून महाराष्ट्रात स्थलांतर
III. आशियामधून भारताबाहेरच्या देशांमधून महाराष्ट्रात स्थलांतर
IV. इतर देशांमधून महाराष्ट्रात स्थलांतर

### I. महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यामधील स्थलांतर

महाराष्ट्र राज्यात २००१ सालच्या जनगणनेनुसार एकूण स्थलांतर ३४२.२५ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १२४.८६ लाख आणि स्त्रियांची संख्या २१७.३९ लाख आहे. **महाराष्ट्रात जिल्ह्यामधील स्थलांतरात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या सुमारे ९२.५३ लाखांनी जास्त आहे. याचे एक प्रमुख कारण स्त्रियांचे विवाह होय.**

महाराष्ट्रातील जिल्ह्यामधील स्थलांतराचे उपप्रकार पुढीलप्रमाणे :

**(१) गणना जिल्ह्यात इतरत्र स्थलांतर :**

एखाद्या जिल्ह्यात इतरत्र होणाऱ्या स्थलांतराचा समावेश यामध्ये होतो.

**(i) स्थलांतरितांची एकूण संख्या :** महाराष्ट्रामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार या प्रकारच्या एकूण स्थलांतरितांची संख्या २२१.३८ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ७२.३७ लाख आणि स्त्रियांची संख्या १४९.०१ लाख आहे.

**एकच जिल्हांतर्गत स्थलांतरामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे दुप्पट स्थलांतर झालेले आहे. याचेही प्रमुख कारण मुलींचे पालक विवाह-स्थळ पाहताना त्याच जिल्ह्यामधील स्थळास प्राधान्य देतात आणि हे प्रामुख्याने ग्रामीण भागात प्रकर्षाने पाहावयास मिळते.**

**(ii) गणना जिल्ह्यात ग्रामीण भागातून इतरत्र स्थलांतर :** महाराष्ट्रामध्ये २००१ सालानुसार, या प्रकारचे एकूण स्थलांतर १७०.४५ लाख झालेले आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ४८.९१ लाख तर स्त्रियांची संख्या १२१.५४ लाख आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थलांतर जवळजवळ अडीच पटीपेक्षा जास्त आहे.

**(iii) गणना जिल्ह्यात नागरी भागातून इतरत्र स्थलांतर :** महाराष्ट्रामध्ये एकूण स्थलांतर ५०.९३ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २३.४६ आणि स्त्रियांची संख्या २७.४७ लाख आहे. यामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या चार लाखांनी जास्त आहे.

**(२) महाराष्ट्रामधील एका जिल्ह्यामधून इतर जिल्ह्यात स्थलांतर :**

**(i) स्थलांतरितांची एकूण संख्या :** महाराष्ट्रामध्ये २००१ सालच्या जनगणनेनुसार अशा प्रकारच्या एकूण स्थलांतरितांची संख्या १२०.८७ लाख आहे. यांपैकी ५२.४९ लाख पुरुषांचे आणि ६८.३८ लाख स्त्रियांचे जिल्ह्याबाहेर परंतु महाराष्ट्रातच स्थलांतर झाले. यामध्येही पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थलांतर ५.५९ लाखांनी जास्त आहे.

**महाराष्ट्र राज्याचा विचार करता, एकाच जिल्ह्यामधील आणि जिल्ह्या-जिल्ह्यामधील स्थलांतर सर्वांत जास्त आहे.**

**(ii) गणना जिल्ह्यातील ग्रामीण भागातून राज्यातील इतर जिल्ह्यात स्थलांतर :** या प्रकारचे एकूण स्थलांतर २००१ सालानुसार ४२.२१ लाख आहे. यांपैकी पुरुषांचे स्थलांतर १३.८९ लाख तर स्त्रियांचे स्थलांतर २८.३२ लाख झाले. यामध्येही पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थलांतर दुपटीपेक्षा जास्त आहे.

**(iii) गणना जिल्ह्यातील नागरी भागातून राज्यातील इतर जिल्ह्यात स्थलांतर :** महाराष्ट्रामध्ये २००१ सालानुसार अशा प्रकारचे एकूण स्थलांतर ७८.६६ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ३८.६० लाख आणि स्त्रियांची संख्या ४०.०६ लाख आहे.

या प्रकारचे स्थलांतर ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात सुमारे ३६ लाखांनी जास्त म्हणजे खूपच जास्त आहे.

**थोडक्यात, महाराष्ट्र राज्यामधील जिल्हांतर्गत आणि आंतरजिल्हा स्थलांतरितांची एकूण संख्या ३४२.२५ लाख आहे. यांपैकी ग्रामीण भागातील स्थलांतरितांची संख्या २१२.८६ लाख आणि नागरी भागातील स्थलांतरितांची संख्या १२९.५९ लाख आहे.**

## II. भारतामधील इतर राज्यांमधून महाराष्ट्रात स्थलांतर

महाराष्ट्रामध्ये २००१ सालानुसार, भारतामधील इतर राज्यांमधून महाराष्ट्रात एकूण स्थलांतर ७३.१३ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ४१.७९ लाख आणि स्त्रियांची संख्या ३१.३४ लाख आहे. अशा प्रकारच्या स्थलांतरामध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सुमारे दहा लाखांनी जास्त आहे. **याचे प्रमुख कारण रोजगारासाठी भारताच्या इतर राज्यांमधून स्त्रियांपेक्षा पुरुषांचे स्थलांतर जास्त झालेले आहे.**

अशा प्रकारच्या स्थलांतरामध्ये भारताच्या इतर राज्यांमधील नागरी भागातून ६१.४८ लाख तर ग्रामीण भागातून ११.६५ लाख लोकांचे महाराष्ट्रामध्ये स्थलांतर झालेले आहे.


- १९९१-२००१ च्या दरम्यान स्थलांतरित झालेल्या प्रामुख्याने बृहन्मुंबईमध्ये (मुंबई शहर व मुंबई उपनगर) परप्रांतीयांची संख्या ११.२ लाख एवढी आहे. याचप्रमाणे ठाणे, पुणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक आणि रायगड जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात झालेली आहे. याचा ताण महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीवर पडलेला आहे.
- भारताच्या इतर राज्यांमधील ग्रामीण भागातून महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या पुरुषांची संख्या ५.३१ लाख आणि स्त्रियांची संख्या ६.३५ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरित संख्या एक लाखाने जास्त आहे.**
- भारताच्या इतर राज्यांमधील नागरी भागातून महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या पुरुषांची संख्या ३६.४८ लाख तर स्त्रियांची संख्या २५ लाख आहे. नागरी भागातील स्थलांतरात स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सुमारे ११.५० लाख जास्त आहे.

**महाराष्ट्रामध्ये अन्य राज्यांमधून झालेल्या स्थलांतराचे स्वरूप – २००१ :**

भारतामधील महाराष्ट्र हे एक औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर शहर आणि परिसरात उद्योगधंद्याची वाढ झालेली आहे. यामुळे नोकरी, व्यवसाय, रोजगार शिक्षणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध होतात. यामुळे महाराष्ट्रात भारताच्या सर्वच्या सर्व उरलेल्या सत्तावीस राज्यांमधून आणि केंद्रशासित प्रदेशामधून स्थलांतरितांचा ओघ वारंवार चालू असतो.

भारताच्या इतर राज्यांमधून महाराष्ट्रात होणाऱ्या स्थलांतरितांमध्ये उत्तर प्रदेशचा सर्वप्रथम क्रमांक आहे. २००१ सालच्या जनगणनेनुसार, उत्तर प्रदेश स्थलांतरितांची राज्यामधील टक्केवारी २८.३३ आहे. या खालोखाल कर्नाटक (१५.९३%), गुजरात (११.६१%), मध्य प्रदेश (८.०७%), आंध्र प्रदेश (५.९०%), राजस्थान (५.८९%) व बिहार (४.९४%) या प्रमुख सात राज्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्राच्या राज्यवार स्थलांतरामध्ये या सात राज्यांचा वाटा सुमारे ८१ टक्के आहे.






नकाशा क्र. ९.१ : महाराष्ट्रात अन्य राज्यांमधून झालेल्या स्थलांतराचे स्वरूप (२००१)

महाराष्ट्रात स्थलांतरित होणाऱ्या या राज्यांचा थोडक्यात आढावा पाहू या.

**(i) उत्तर प्रदेश (२०.७२ लाख) : महाराष्ट्रात सर्वांत जास्त स्थलांतरित लोक उत्तर प्रदेशामधून येतात. यांची एकूण संख्या २०.७२ लाख (२८.३३%) आहे.** यांपैकी पुरुषांची संख्या १४.२६ लाख आणि स्त्रियांची संख्या ६.४६ लाख आहे. स्थलांतरितांमध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या ७.८ लाखांनी जास्त आहे. कारण फक्त पुरुषवर्ग रोजगार व नोकरीसाठी जास्त प्रमाणात येतात.

- उत्तर प्रदेशच्या नागरी भागातून महाराष्ट्रात एकूण स्थलांतरित १९.७९ लाख लोक आले आहेत. यांपैकी पुरुषांची लोकसंख्या १३.६० लाख तर स्त्रियांची संख्या ६.१९ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या ७.४ लाखांनी जास्त आहे.
- उत्तर प्रदेशाच्या ग्रामीण भागातून महाराष्ट्रामध्ये एकूण स्थलांतरित फक्त ९४,००० लोक आले. यांपैकी पुरुषांची संख्या ६६,००० असून स्त्रियांची संख्या फक्त २७,००० आहे. स्त्रियांपेक्षा ग्रामीण पुरुषांची संख्या ३९,००० ने जास्त आहे.

**(ii) कर्नाटक (११.६५ लाख) :** २००१ सालानुसार, कर्नाटकामधून महाराष्ट्रात **एकूण** ११.६५ लाख (१५.९३%) लोक स्थलांतरित झाले. यांपैकी पुरुषांची संख्या ५.३६ लाख तर स्त्रियांची संख्या ६.२९ लाख आहे. **एकूण स्थलांतरात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या सुमारे एक लाखाने जास्त आहे.**

- कर्नाटकामधील नागरी भागातून महाराष्ट्रात ८.०६ लाख लोक महाराष्ट्रात आले. यांपैकी पुरुषांची संख्या ४.०४ लाख आणि स्त्रियांची संख्या ४.०२ लाख आहे. याचा अर्थ, नागरी भागामधून स्त्री-पुरुषांचे स्थलांतर साधारण समान आहे.
- कर्नाटकामधील ग्रामीण भागामधून महाराष्ट्रात ३.५९ लाख लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या १.३३ लाख आणि स्त्रियांची संख्या २.२७ लाख आहे. **ग्रामीण भागातून पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थलांतर ९४,००० ने जास्त आहे.**

**(iii) गुजरात (८.४९ लाख) :** २००१ सालानुसार, गुजरात राज्यामधून महाराष्ट्रात ८.४९ लाख (११.६१%) लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या ४.१२ लाख आणि स्त्रियांची संख्या ४.३७ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरित संख्या २५,००० ने जास्त आहे.**

- गुजरातच्या नागरी भागातून महाराष्ट्रात ७.६६ लाख लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या ३.८ लाख आणि स्त्रियांची संख्या ३.८६ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या फक्त ६,००० ने जास्त आहे.**
- गुजरातच्या ग्रामीण भागातून महाराष्ट्रात होणारे स्थलांतर नागरी भागापेक्षा अत्यल्प आहे. २००१ सालानुसार, ग्रामीण भागातील **एकूण** स्थलांतर ८३,००० आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ३१,००० तर स्त्रियांची संख्या ५१,००० आहे. **ग्रामीण भागातून पुरुषांपेक्षा स्त्रियांचे २०,००० पेक्षा जास्त स्थलांतर झाले.**

**(iv) मध्य प्रदेश (५.९ लाख) :** मध्य प्रदेशामधून ५.९ लाख (८.०७%) लोकांनी महाराष्ट्रात स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या २.५८ लाख आणि स्त्रियांची संख्या ३.३२ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरित संख्या ६४,००० ने जास्त आहे.**

- मध्य प्रदेशातील नागरी भागामधून महाराष्ट्रात एकूण ३.३२ लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या १.५९ लाख आणि स्त्रियांची संख्या १.७३ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरित संख्या १४,००० ने जास्त आहे.**
- मध्य प्रदेशामधील ग्रामीण भागातून महाराष्ट्रात एकूण स्थलांतर २.५८ लाख झाले. यांपैकी पुरुषांची संख्या ९९,००० तर स्त्रियांची संख्या १.५९ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरित संख्या ६०,००० ने जास्त आहे.**

**(v) आंध्र प्रदेश (४.३२ लाख) :** आंध्र प्रदेशामधून महाराष्ट्रात ४.३२ लाख (५.९%) लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या २.०६ लाख आणि स्त्रियांची संख्या २.२६ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरित संख्या २०,००० ने जास्त आहे.**

आंध्र प्रदेशाच्या नागरी भागातून महाराष्ट्रात ३.३३ लाखांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या १.६८ लाख आणि स्त्रियांची संख्या १.६५ लाख आहे. **नागरी भागातून पुरुष आणि स्त्रियांचे स्थलांतर साधारण सारखे आहे.**

आंध्र प्रदेशाच्या ग्रामीण भागातून महाराष्ट्रात ९९,००० लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या ३७,००० तर स्त्रियांची संख्या ६१,००० आहे. **ग्रामीण भागातून पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थलांतर २४,००० ने जास्त आहे.**



तक्ता क्र. ९.१ : महाराष्ट्र — पूर्वीच्या राहण्याच्या ठिकाणानुसार स्थलांतरित स्त्री-पुरुष - २००१ (हजार)

**I. महाराष्ट्र राज्यात :**

| अ. क्र. | पूर्वीचे राहण्याचे ठिकाण | एकूण स्थलांतरित (०००) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | गणना जिल्ह्यात इतरत्र | ७,२३७ | १४,९०१ | २२,१३८ |
| २. | महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात | ५,२४९ | ६,८३८ | १२,०८७ |
| | **एकूण (I)** | **१२,४८६** | **२१,७३९** | **३४,२२५** |

**II. गणना राज्याच्या (महाराष्ट्राच्या) बाहेरील भारतातील राज्ये :**

| अ. क्र. | पूर्वीचे राहण्याचे ठिकाण | एकूण स्थलांतरित (०००) | | | अ. क्र. | पूर्वीचे राहण्याचे ठिकाण | एकूण स्थलांतरित (०००) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | उत्तर प्रदेश | १,४२६ | ६३६ | २,०७२ | १६. | झारखंड | ४२ | १६ | ५८ |
| २. | कर्नाटक ‡ | ५३६ | ६२९ | १,१६५ | १७. | हरयाना | २२ | १८ | ४० |
| ३. | गुजरात‡ | ४१२ | ४३७ | ८४९ | १८. | उत्तराखंड | २२ | १४ | ३६ |
| ४. | मध्य प्रदेश‡ | २५८ | ३३२ | ५९० | १९. | आसाम | १० | ७ | १७ |
| ५. | आंध्र प्रदेश‡ | २०६ | २२६ | ४३२ | २०. | जम्मू व काश्मीर | ९ | ६ | १५ |
| ६. | राजस्थान | २६२ | १६९ | ४३१ | २१. | हिमाचल प्रदेश | ८ | ५ | १३ |
| ७. | बिहार | २७२ | ६९ | ३६१ | २२. | मणिपूर | १ | १ | २ |
| ८. | केरळ | १४६ | ११२ | २५८ | २३. | मेघालय | १ | १ | २ |
| ९. | तमिळनाडू | १३९ | १११ | २५० | २४. | त्रिपुरा | १ | १ | २ |
| १०. | पश्चिम बंगाल | १३९ | ७० | २०९ | २५. | अरुणाचल प्रदेश | † | † | १ |
| ११. | छत्तीसगड‡ | ९८ | १०७ | २०५ | २६. | मिझोराम | † | † | १ |
| १२. | ओरिसा | ६२ | ३० | ९२ | २७. | नागालँड | १ | † | १ |
| १३. | दिल्ली | ३६ | ३४ | ७० | २८. | सिक्कीम | † | † | २ |
| १४. | पंजाब | ३७ | ३१ | ६८ | २९. | केंद्रशासित प्रदेश | ६ | ६ | १२ |
| १५. | गोवा‡ | २५ | ३५ | ६० | | **एकूण (II)** | **४,१७९** | **३,१३४** | **७,३१३** |

| अ. क्र. | पूर्वीचे राहण्याचे ठिकाण | एकूण स्थलांतरित (०००) | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| **III.** | **आशियातील भारताबाहेरचे देश** | ९३ | ७२ | १६४ |
| **IV.** | **इतर देश** | ७ | ७ | १४ |
| | **एकूण (III + IV)** | **१००** | **७९** | **१७८** |
| | **एकूण (I + II + III + IV)** | **१६,७६५** | **२४,९५२** | **४१,७१६** |

टीप : (i) ‡ महाराष्ट्रात पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थलांतरितांची संख्या जास्त नोंद करणारी राज्ये.
(ii) † ५०० पेक्षा कमी.

संदर्भ : (i) भारताची जनगणना, २००१; (ii) महाराष्ट्र संक्षिप्त सांख्यिकी - २००७, पान नं. ४३ ते ४६.

**(vi) राजस्थान (४.३१ लाख) :** राजस्थानमधून महाराष्ट्रात एकूण स्थलांतर ४.३१ लाख (५.८९) लोकांनी केले. यांपैकी पुरुषांची संख्या २.६२ लाख तर स्त्रियांची संख्या १.६९ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या ९३,००० ने जास्त आहे.

राजस्थानच्या नागरी भागामधून महाराष्ट्रात ४.०२ लाख लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या २.४३ लाख तर स्त्रियांची संख्या १.५९ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची स्थलांतरित संख्या ८४,००० ने जास्त आहे.

राजस्थानच्या ग्रामीण भागामधून महाराष्ट्रात होणारे स्थलांतर नागरी भागापेक्षा बरेच कमी म्हणजे फक्त ३०,००० आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २०,००० आणि स्त्रियांची संख्या १०,००० आहे.

**(vii) बिहार (३.६१ लाख) :** २००१ सालानुसार बिहारमधून महाराष्ट्रात ३.६१ लाख (४.९४%) लोकांनी स्थलांतर केलेले आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २.७२ लाख आणि स्त्रियांची संख्या ६९,००० आहे.

बिहारमधील नागरी भागातून महाराष्ट्रात ३.२२ लाख लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या २.४२ लाख तर स्त्रियांची संख्या ८१,००० आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची स्थलांतरित संख्या १.६१ लाखांनी जास्त आहे.

बिहारमधील ग्रामीण भागातून महाराष्ट्रात होणारे स्थलांतर बरेच कमी आहे. याची एकूण स्थलांतरितांची संख्या फक्त ३९,००० आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ३१,००० तर स्त्रियांची संख्या जेमतेम ८,००० आहे.

**महाराष्ट्रात २ ते ३ लाख दरम्यान स्थलांतरित झालेल्या लोकांची राज्ये :**

महाराष्ट्रात केरळ (२.५८ लाख), तमिळनाडू (२.५० लाख), पश्चिम बंगाल (२.०९ लाख) आणि छत्तीसगड (२.०९ लाख) राज्यांमधून स्थलांतरित लोक आले. या चार राज्यांमधून महाराष्ट्रात एकूण स्थलांतरापैकी १२.६१% लोक आले. छत्तीसगडचा अपवाद वगळता, अन्य तीन राज्यांमधून स्त्रियांपेक्षा पुरुषांची स्थलांतरित संख्या जास्त आहे.

**महाराष्ट्रात ५०,००० ते १ लाख दरम्यान स्थलांतरित झालेल्या लोकांची राज्ये :**

महाराष्ट्रात ओरिसा (९२,०००), दिल्ली (७०,०००), पंजाब (६८,०००), गोवा (६०,०००) आणि झारखंड राज्यात मिळून ३.४८ लाख लोकांनी स्थलांतर केलेले आहे. यामध्ये गोवा वगळता अन्य राज्यांमधून स्त्रियांपेक्षा पुरुषांचे स्थलांतर जास्त आहे.

**महाराष्ट्रात १०,००० ते ५०,००० दरम्यान स्थलांतरित झालेल्या लोकांची राज्ये :** महाराष्ट्रात हरयाना (४०,०००), उत्तराखंड (३६,०००), आसाम (१७,०००), जम्मू व काश्मीर (१७,०००) आणि हिमाचल प्रदेश (१३,०००) राज्यात मिळून १.२१ लाख लोकांनी स्थलांतर केले.

- भारताच्या उर्वरित राज्यांमधून महाराष्ट्रात १००० ते २००० लोकांनी स्थलांतर केलेले आहे.
- केंद्रशासित प्रदेशामधून १२,००० लोकांनी महाराष्ट्रात स्थलांतर केलेले आहे.

### III. आशियामधून महाराष्ट्रात स्थलांतर

या गटामधून महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या लोकांची संख्या १.६४ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ९३,००० तर स्त्रियांची संख्या ७२,००० आहे.

### IV. इतर देशांमधून महाराष्ट्रात स्थलांतर

या गटामधून महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या लोकांची संख्या १४,००० असून पुरुष आणि स्त्रियांची संख्या समसमान आहे.

## (ब) महाराष्ट्रात ग्रामीण आणि नागरी भागांमधून स्थलांतराच्या कारणानुसार स्थलांतरितांचे स्वरूप - २००१

महाराष्ट्रात स्थलांतराची कारणे पुढीलप्रमाणे :

(१) रोजगार (२) व्यवसाय (३) शिक्षण (४) विवाह (५) जन्मानंतर (६) कुटुंबासह (७) इतर.

महाराष्ट्रात वरील कारणांमुळे २००१ सालच्या जनगणनेनुसार एकूण स्थलांतरितांची संख्या ४१७.१५ लाख आहे. यांपैकी ग्रामीण भागातून २२४.५ लाख आणि नागरी भागातून १९२.६५ लाख लोकांनी स्थलांतर केलेले आहे.

- एकूण स्थलांतरात पुरुषांची संख्या १६७.६५ तर स्त्रियांची संख्या २४९.५२ लाख आहे.
- ग्रामीण भागातील स्थलांतरामध्ये पुरुषांचे ६८.२२ लाख स्थलांतर आणि स्त्रियांचे १५६.२८ लाख स्थलांतर झाले.
- नागरी भागात स्थलांतरितांची पुरुषांची संख्या ९९.४२ लाख आणि स्त्रियांची संख्या ९३.२३ आहे.



महाराष्ट्रात टक्केवारीनुसार स्थलांतराच्या कारणाच्या उतरत्या क्रमाने असे क्रमांक आहेत : विवाहामुळे स्थलांतर सर्वांत जास्त असून त्याची टक्केवारी ३५.६४% आहे. या खालोखाल कुटुंबासह स्थलांतर (१७.२३%), रोजगार (१६.५५%), इतर कारणांमुळे स्थलांतर (१६.४२%), जन्मानंतर स्थलांतर (१२.२५%), शिक्षणामुळे स्थलांतर (१.४५%) आणि व्यवसायामुळे स्थलांतर नगण्य आहे.

**तक्ता क्र. ९.२ : महाराष्ट्र — ग्रामीण आणि नागरी भागामधून स्थलांतराच्या कारणानुसार स्थलांतरितांची एकूण संख्या - २००१ (०००)**

| स्थलांतराचे कारण | ग्रामीण | नागरी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. रोजगार | १,७९० | ५,११५ | ६,९०५ | १६.५५% |
| २. व्यवसाय | ३८ | १५५ | १९३ | नगण्य |
| ३. शिक्षण | २१२ | ३९२ | ६०४ | १.४५% |
| ४. विवाह | १०,६९१ | ४,१७७ | १४,८६८ | ३५.६४% |
| ५. जन्मानंतर | ३,१०५ | २,००४ | ५,१०९ | १२.२५% |
| ६. कुटुंबासह | २,६०३ | ४,५८५ | ७,१८८ | १७.२३% |
| ७. इतर | ४,०११ | २,८३७ | ६,८४८ | १६.४२% |
| एकूण | २२,४५० | १९,२६५ | ४१,७१५ | १००% |

आधार : भारताची जनगणना, २००१.

संदर्भ : महाराष्ट्र संक्षिप्त सांख्यिकी - २००७, पान नं. ४२

**(१) रोजगारामुळे स्थलांतर (६९.०५ लाख) :** २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात रोजगारामुळे ६९.०५ लाख लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या ६२.३२ लाख (१६.५५%) आणि स्त्रियांची संख्या बरीच कमी म्हणजे फक्त ६.७३ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सुमारे ५५ लाखांनी जास्त आहे. याचे मुख्य कारण रोजगारासाठी एकटे पुरुष मोठ्या प्रमाणात बाहेर पडतात.

२००१ सालानुसार, ग्रामीण भागातून १७.९० लाख लोकांनी रोजगारासाठी महाराष्ट्रात स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या १४.१३ लाख आणि स्त्रियांची संख्या जेमतेम ३.७७ लाख आहे. ग्रामीण भागामधून स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या स्थलांतरितांची संख्या सुमारे दहा लाखांनी जास्त आहे.

नागरी भागामधून रोजगारासाठी एकूण ५१.१५ लाख लोकांनी महाराष्ट्रात स्थलांतर केलेले आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ४८.२० लाख तर स्त्रियांची संख्या फक्त २.९६ लाख आहे. नागरी भागामधून रोजगारासाठी स्त्रियांपेक्षा पुरुषांच्या स्थलांतरितांची संख्या सुमारे ४५ लाख एवढी प्रचंड आहे. ग्रामीण भागापेक्षा नागरी भागामधील रोजगारासाठी पुरुषांची स्थलांतरितांची संख्या सुमारे तीन लाखांनी एवढी जास्त आहे.


**(२) व्यवसायामुळे स्थलांतर (१.९३ लाख) :** २००१ सालानुसार, महाराष्ट्रात व्यवसायामुळे १.९३ लाख लोकांनी स्थलांतर केले. यांपैकी पुरुषांची संख्या १.६७ लाख तर स्त्रियांची संख्या फक्त २५,००० आहे. रोजगाराप्रमाणेच व्यवसायासाठी प्रामुख्याने पुरुष आपले पूर्वीचे राहण्याचे ठिकाण सोडतात. यामध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या १.४२ लाखांनी जास्त आहे.

- व्यवसायामुळे ग्रामीण भागातून महाराष्ट्रात ३८,००० लोकांनी स्थलांतर केलेले आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २६,००० तर स्त्रियांची संख्या फक्त १२,००० आहे.
- नागरी भागातून व्यवसाय कारणासाठी महाराष्ट्रात स्थलांतर केलेल्यांची एकूण संख्या २.९३ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १.४१ लाख आणि स्त्रियांची संख्या फक्त १३,००० आहे.

**(३) शिक्षणामुळे स्थलांतर (६.०४ लाख) :** २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात शिक्षणामुळे स्थलांतरितांची संख्या ६.०४ लाख (१.४५%) आहे. यांपैकी मुलांची संख्या ४.४१ लाख आणि मुलींची संख्या फक्त १.६३ लाख आहे. शिक्षणामुळे स्थलांतर होणाऱ्या मुलींपेक्षा मुलांची संख्या सुमारे २.९ लाखांनी जास्त आहे. शिक्षणासाठी मुलींचे स्थलांतर करण्यास पालकांची इच्छा अनेक कारणांमुळे असतेच असे नाही. याचप्रमाणे मुलींचाही बऱ्याच वेळा स्थलांतराचा कल असतोच असे नाही.

- महाराष्ट्रात ग्रामीण भागातून शिक्षणामुळे स्थलांतर केलेल्यांची एकूण संख्या २.१२ लाख असून मुलांची संख्या १.४८ लाख तर मुलींची संख्या फक्त ६४,००० आहे. मुलींपेक्षा मुलांची संख्या साधारण २.३ पट आहे.
- महाराष्ट्रात नागरी भागातून शिक्षणामुळे स्थलांतरितांची एकूण संख्या ३.९२ लाख आहे. यांपैकी मुलांची संख्या २.९३ लाख आणि मुलींची संख्या ९९,००० आहे. मुलींपेक्षा मुलांची संख्या साधारण तीन पट आहे. ग्रामीण भागापेक्षा नागरी भागातून शिक्षणासाठी मुलींचे स्थलांतर संख्या आणि प्रमाण जास्त आहे.

**महाराष्ट्र : स्थलांतराच्या कारणांनुसार स्थलांतरितांची संख्या (लाख)**
**वर्ष - २००१**




आलेख क्र. ९.१ : महाराष्ट्र — स्थलांतराच्या कारणानुसार स्थलांतरितांची संख्या (२००१)

**(४) विवाहामुळे स्थलांतर (१४८.६८ लाख) :** २००१ सालच्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात विवाहामुळे होणारे स्थलांतर सर्वांत जास्त आहे. विवाहामुळे झालेल्या एकूण स्थलांतरितांची संख्या १४८.६८ लाख आहे. त्याची टक्केवारी ३५.६४ आहे. यांपैकी स्त्रियांच्या स्थलांतरितांची संख्या १४७.५४ लाख तर पुरुषांची संख्या फक्त १.१४ लाख आहे व ती नगण्य आहे. स्त्रियांचे स्थलांतर प्रामुख्याने महाराष्ट्रात जिल्हांतर्गत आणि आंतरजिल्हा स्थलांतर मोठ्या प्रमाणात आहे. याचप्रमाणे आंतरराज्यीय स्तरावर विवाहामुळे स्थलांतर होऊन महाराष्ट्रात स्थलांतर होणाऱ्या स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा १४६.४० लाखांनी जास्त आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातून विवाहामुळे होणाऱ्या स्थलांतरितांची एकूण संख्या १०६.९१ लाख आहे. यांपैकी स्त्रियांची संख्या १०६.११ लाख तर पुरुषांची संख्या ८०,००० म्हणजे नगण्य आहे.

महाराष्ट्रात नागरी भागातून विवाहामुळे होणाऱ्या स्थलांतरितांची एकूण संख्या ४१.७७ लाख आहे. यांपैकी स्त्रियांची संख्या ४१.४३ लाख तर पुरुषांची संख्या फक्त ३४,००० आहे. महाराष्ट्रात विवाहामुळे स्थलांतर होणाऱ्या स्त्रियांची संख्या नागरी भागापेक्षा ग्रामीण भागातून सुमारे ६५ लाखांनी जास्त आहे.



**(५) जन्मानंतर होणारे स्थलांतर (५१.०९ लाख) :** २००१ सालानुसार, महाराष्ट्रात जन्मानंतर होणाऱ्या एकूण स्थलांतरितांची संख्या ५१.०९ लाख (१२.२५%) आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ३१ लाख आणि स्त्रियांची संख्या २० लाख आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातून जन्मानंतर स्थलांतर होणाऱ्या लोकांची एकूण संख्या ३१.०५ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १९.३५ लाख आणि स्त्रियांची संख्या ११.७० लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सुमारे ७.५० लाखाने जास्त आहे.

महाराष्ट्रात नागरी भागातून जन्मानंतर होणाऱ्या स्थलांतरितांची एकूण संख्या २०.०४ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ११.७४ लाख तर स्त्रियांची संख्या ८.३० लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सुमारे ३.५० लाखाने जास्त आहे.

**(६) कुटुंबासह स्थलांतर :** २००१ सालानुसार, महाराष्ट्रात कुटुंबासह एकूण स्थलांतरितांची संख्या ७१.८८ लाख (१७.२३%) आहे. **या गटाच्या विवाहामुळे होणाऱ्या स्थलांतराच्या खालोखाल दुसरा क्रमांक आहे.** यांपैकी पुरुषांची संख्या २९.७४ लाख तर स्त्रियांची संख्या ४२.१४ लाख आहे. **पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या १२.४० लाखांनी जास्त आहे.**

महाराष्ट्रात ग्रामीण भागातून कुटुंबासह स्थलांतरितांची एकूण संख्या २६.०३ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ११.०८ लाख तर स्त्रियांची संख्या १४.९६ लाख आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या ३.८८ लाखांनी जास्त आहे.

महाराष्ट्रात नागरी भागातून कुटुंबासह स्थलांतरितांची एकूण संख्या ४५.८५ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १८.६६ लाख तर स्त्रियांची संख्या २७.१८ लाख आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या सुमारे ८.५ लाखांनी जास्त आहे. महाराष्ट्रात कुटुंबासह स्थलांतरितांची स्त्रियांची संख्या ग्रामीण भागापेक्षा नागरी भागामधून सुमारे १२ लाखांनी जास्त आहे.

**(७) इतर कारणांमुळे स्थलांतर :** २००१ सालानुसार, महाराष्ट्रात इतर कारणांमुळे होणाऱ्या स्थलांतरितांची संख्या ६८.४८ लाख (१६.४२%) आहे. यांपैकी पुरुषांची संख्या ३७.२६ लाख आणि स्त्रियांची संख्या ३१.२६ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सहा लाखांनी जास्त आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातून इतर कारणांमुळे स्थलांतरितांची एकूण संख्या ४०.११ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या २१.१३ लाख आणि स्त्रियांची संख्या १८.९८ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या ३.१५ लाखांनी जास्त आहे.

महाराष्ट्रात नागरी भागातून इतर कारणांमुळे स्थलांतरितांची एकूण संख्या २८.३७ लाख आहे. यांपैकी पुरुषांची संख्या १६.१३ लाख आणि स्त्रियांची संख्या १२.२४ लाख आहे. स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या ३.८९ लाखांनी जास्त आहे.

## बुद्धिवंतांचे स्थलांतर

### (BRAIN MIGRATION)

बुद्धिवंतांचे स्थलांतर ही एक अतिशय गंभीर समस्या आहे. **स्थलांतराचे आगमन व निर्गमन क्षेत्रात चांगले-वाईट परिणाम होतात.** स्थलांतर करणाऱ्यांमध्ये तरुण व बुद्धिवंतांचा भरणा जास्त असतो.

### बुद्धिवंतांच्या स्थलांतराचे प्रकार

**(१) बुद्धिवहन** *(Brain Drain)* : **''बुद्धिवंतांची स्थलांतरामुळे जी उणीव निर्माण होते तिला 'बुद्धिवहन' असे म्हणतात.''**

**(२) बुद्धी अतिरिक्तता** *(Brain Overflow)* : **''देशातील लोकसंख्येत आवश्यकतेपेक्षा जास्त तंत्रज्ञ व उच्चविद्याविभूषित लोक असतात व स्थानिक अर्थव्यवस्थेतही बुद्धिवान लोकसंख्या केव्हाही उपलब्ध होते, त्या स्थितीला 'बुद्धी अतिरिक्तता' असे म्हणतात.''**

जपान, संयुक्त संस्थाने, जर्मनी या देशांत बुद्धी अतिरिक्तता मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

**(३) बुद्धी आदान-प्रदान** *(Brain Exchange)* : **''दोन राष्ट्रांत बुद्धिवान लोकांची स्थलांतर प्रक्रियेद्वारे अदलाबदल होत असल्यास त्याला 'बुद्धी आदान-प्रदान' असे म्हणतात.''**

यामुळे राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासाला चालना मिळते. या प्रक्रियेत सहभागी झालेल्या देशांना पारस्परिक प्रबोधनाचा व वैज्ञानिक संक्रमणाचा लाभ मिळतो.

**(४) बुद्धी निर्यात** *(Brain Export)* : **''व्यावसायिक दृष्टिकोनातून एका देशातील बुद्धिवान लोकांना दुसऱ्या देशात नियमित पाठविले जाते. कुशल श्रमिक किंवा तंत्रज्ञानाचा नियमित आर्थिक करारावर पुरवठा करणे म्हणजे 'बुद्धी निर्यात' होय.''**

अविकसित व काही प्रमाणात विकसनशील राष्ट्रे अशी बुद्धी निर्यात करून परकीय चलन मिळवितात.

## बुद्धिवंतांच्या स्थलांतराचे परिणाम (Effects of Brain Migration)

### (अ) निर्गमन क्षेत्रावरील परिणाम :

(१) **बुद्धिवंतांच्या स्थलांतरामुळे निर्गमन क्षेत्रावर वाईट परिणाम होतात. गरीब व विकसनशील-अविकसित देशांना याचा मोठा फटका बसतो.**

- गरीब व अविकसित देश उच्च शिक्षणावर मोठा खर्च करतात. तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, अभियंते, वैद्यकीय व्यावसायिक यांच्या शिक्षणावर देशाची गरज म्हणून मोठा खर्च होतो.
- परंतु पदवी प्राप्त केल्यावर हे तंत्रज्ञ व इतर उच्चविद्याविभूषित लोक मोठ्या पगाराच्या व चांगल्या सेवा-सुविधांच्या अभिलाषेने श्रीमंत विकसित देशांकडे धाव घेतात.

(२) व्यक्तिगत स्तरावर त्यांचा निर्णय योग्यही असेल. परंतु ज्या समाजाने-शासनाने त्यांच्या शिक्षणावर प्रचंड पैसा खर्च केलेला असतो; त्या समाजाची, शासनाची **बुद्धिवंतांकडून राष्ट्राची उन्नती, सेवा घडावी ही अपेक्षा असते.**

- **परंतु कित्येक तंत्रज्ञ व बुद्धिवंत स्वतःच्या स्वार्थापोटी विकसित देशात स्थलांतर करतात.**

(३) भारतासारख्या विकसनशील देशातूनदेखील विकसित देशाकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे. या स्थलांतरामुळे जी बुद्धिवंतांची उणीव निर्माण होते तिला 'बुद्धिवहन' (Brain Drain) असे म्हणतात.

- **बुद्धिवहनामुळे विकसनशील व अविकसित देशांचे मोठे नुकसान होते.**

(४) ज्या विकसनशील व अविकसित राष्ट्रांनी तंत्रज्ञनिर्मितीसाठी भांडवल गुंतवणूक केलेली असते; तिचा फायदा मात्र विकसित देशांना झाल्याने **विकसनशील व अविकसित देशाचा आर्थिक विकासाचा वेग मंदावतो.**

(५) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील उच्चशिक्षित लोकांनी संयुक्त संस्थाने, कॅनडा, जर्मनी, ग्रेट ब्रिटन, जपान इत्यादी राष्ट्रांत स्थलांतर केल्याने **भारतात बुद्धिवहन समस्या गंभीर बाब आहे.**

### (ब) आगमन क्षेत्रावरील परिणाम :

(१) **श्रीमंत विकसित देशात तरुण, प्रतिभासंपन्न लोकांची भर पडते.**

(२) आगमन क्षेत्राला या बुद्धिवंतांचा चांगला लाभ होतो. इंग्लंड, अमेरिकेतील वैद्यकीय क्षेत्रात भारतीय वैद्यकीय व्यावसायिकांचा भरणा जास्त आहे.

(३) **विकसित देशांना तंत्रज्ञ, बुद्धिवंत सहज उपलब्ध झाल्याने त्यांची आर्थिक विकासाची गती अधिक वेगवान होते.**

जगात बुद्धिवहन समस्या दुसऱ्या महायुद्धानंतर प्रकर्षाने जाणवू लागली आहे.

## स्थलांतराचे परिणाम

स्थलांतराचे परिणाम निर्गमन क्षेत्रात (Out migration) तसेच आगमन (In migration) क्षेत्रातही दिसून येतात. स्थलांतरामुळे स्थलांतरित व्यक्ती नवीन पर्यावरणात व संस्कृतीत वावरते. यातूनच पुढे सांस्कृतिक देवाण-घेवाण होऊन सांस्कृतिक विकास होतो.

**निर्गमन क्षेत्रापेक्षा आगमन क्षेत्रात अधिक चांगले परिणाम** दिसून येतात; कारण आगमन क्षेत्रात कार्यक्षम व बुद्धिवंत लोकांची भर पडते.

**स्थलांतराचे परिणाम पुढीलप्रमाणे :**

### (अ) लोकसंख्याशास्त्रीय परिणाम :

अंतर्गत स्थलांतरामुळे आगमन क्षेत्रातील तसेच निर्गमन क्षेत्रातील लोकसंख्येच्या आकारावर व रचनेवर परिणाम होतो.

(१) लोकसंख्या व प्रदेशातील **साधनसंपत्तीचे पुनर्स्थानांकन किंवा संतुलन होण्यास मदत होते.**

(२) स्थलांतरामुळे **निर्गमन क्षेत्रातील लोकसंख्या घटते तर आगमन क्षेत्रातील लोकसंख्या वाढते.**

(३) **लोकसंख्येच्या आकारावर म्हणजे एकूण लोकसंख्या व तिची घनता, तिची वाढ बदलते. तसेच जनन, मर्त्यता, वयोरचना, लिंगरचना, साक्षरता यांत संख्यात्मक बदल जाणवतात.**

(४) **निर्गमन क्षेत्रात बालके, स्त्रिया व वृद्धांचे प्रमाण वाढते.**

(५) **निर्गमन क्षेत्रात बुद्धिवहन** (Brain Drain) **समस्या निर्माण होते. याउलट आगमन क्षेत्रात बुद्धिवंतांची व कार्यक्षम लोकसंख्येची भर पडते.**

आर्थिक विकासाला आगमन क्षेत्रामधील लोकसंख्या पोषक असते.



### (ब) आर्थिक परिणाम :

**✲ आगमन क्षेत्रातील आर्थिक परिणाम :**

(१) आगमन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्थलांतर घडून आल्यास त्या प्रदेशातील **मानव-साधनसंपत्ती** याचे गुणोत्तर बदलते. **साधनसंपत्तीवरील ताण वाढतो.**

**आर्थिक विकास व नियोजन यावर प्रतिकूल परिणाम** घडून येतो.

(२) मुळातच **न्यून लोकसंख्या असलेल्या प्रदेशात स्थलांतर घडून आल्यास ते आर्थिक विकासाला पोषक ठरते.** साधनसंपत्तीचा विकास होतो.

(३) मात्र अनियोजित व अनिर्बंधपणे स्थलांतर घडून आल्यास प्राथमिक गरजांची पूर्तता नीट होत नाही. **नागरी जीवनाच्या अनेक समस्या** उद्भवतात.

(४) **आगमन क्षेत्रात लोकसंख्या वाढल्याने नियोजनाचा आराखडा बदलावा लागतो.**

- आरोग्य, शिक्षण, पाणी, वीज, वाहतूक-संदेशवहन, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा यांचा नियोजन आरखडा व उचित अवलंब झाला नाही तर विशेषतः नागरी केंद्रात सार्वजनिक आरोग्याचा **प्रश्न निर्माण होतो.**

(५) शहराची निकोप वाढ होत नाही.

**गलिच्छ वस्त्या, प्रदूषण, सार्वजनिक आरोग्य यांसारखे ज्वलंत प्रश्न निर्माण होतात.**

**✲ निर्गमन क्षेत्रातील आर्थिक परिणाम :**

- निर्गमन क्षेत्रात कार्यक्षम लोकसंख्या घटते. • परावलंबितांचे प्रमाण वाढते. • आर्थिक उत्पन्नात घट होते.

### (क) सामाजिक परिणाम :

स्थलांतरामुळे आगमन व निर्गमन क्षेत्रातील सामाजिक भिन्नतेवर परिणाम होतो. जातिरचना, समाजपद्धती, विवाहप्रणाली, शिक्षण, चालीरीती या सामाजिक अंगांमध्ये विविधता निर्माण होते. सामाजिक अभिसरण व्हायला वेळ लागतो.

**✲ आगमन क्षेत्रातील सामाजिक परिणाम :**

(१) आगमन क्षेत्रात **अल्पसंख्याकांचे प्रमाण वाढून प्रसंगी सामाजिक ताणतणाव निर्माण** होतात. सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येते.

(२) आगमन क्षेत्रात काही अनुकूल बदलही दिसून येतात. आगमन क्षेत्रात **आचार-विचारांचे आदान-प्रदान** होते. **नवीन जीवनपद्धती-संस्कृती निर्माण होते.**

(३) **स्थलांतरित लोक नवीन पर्यावरणाशी व संस्कृतीशी मिळते-जुळते** घेतात. ते अधिक सहनशील बनतात.

(४) आगमन क्षेत्रात बुद्धिवंतांची भर पडल्याने त्यांच्या **ज्ञानाचा लाभ** मिळतो. **आर्थिक विकासाला चालना** मिळते.

(५) आंतरजातीय विवाह, विचारमंथन, समायोजन, उच्च शिक्षण यांमुळे **सामाजिक संक्रमणाला वाव** मिळतो.

**✲ निर्गमन क्षेत्रातील सामाजिक परिणाम :**

(१) निर्गमन क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण वाढल्याने त्या **परिस्थितिजन्य आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम** बनू लागतात. अनेक जबाबदाऱ्या अंगावर पडल्याने त्या **स्वावलंबी** होऊ लागतात.

(२) व्यवसाय पतपेढ्या, संघटना, विक्रीसंस्था, लघुउद्योग, शिक्षण यांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढू लागतो.

(३) मात्र निर्गमन क्षेत्रातील **साधनसंपत्तीचा पुरेपूर विकास होत नाही.**

### (ड) सांस्कृतिक परिणाम :

(१) **अंतर्गत स्थलांतरामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाण होते.**

विभिन्न चालीरीती, रूढी-परंपरा, नीतिमूल्ये, धार्मिक विचारप्रणाली, सण, उत्सव यांची पारस्परिक ओळख होते. **संस्कृती संवर्धनास** वाव मिळतो.

(२) काही वेळेस संस्कृती संक्रमण नीट न झाल्याने अल्पसंख्याक, बहुसंख्याक, गटबाजी, भाषावाद, प्रांतवाद, जातीय संप्रदाय निर्माण होऊन **राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते. सांस्कृतिक अवमूल्यन वाढू लागते.**

(३) भारतात व जगातील काही राष्ट्रांतसुद्धा अंतर्गत स्थलांतरामुळे **जातीयवाद, भाषावाद, प्रांतवादासारख्या सांस्कृतिक समस्या** निर्माण झालेल्या आहेत.

## महाराष्ट्रातील स्थलांतराचे स्थूल स्वरूप (२००१)

| स्थलांतर (२००१) | एकूण (लाख) | पुरुष (लाख) | स्त्रिया (लाख) |
|---|---|---|---|
| **I. महाराष्ट्रातील जिल्ह्यांमधील स्थलांतर** | | | |
| (१) गणना जिल्ह्यात इतरत्र स्थलांतर | | | |
| (i) स्थलांतरितांची एकूण संख्या | २२१.३८ | ७२.३७ | १४९.०१ |
| (ii) गणना जिल्ह्यामधील ग्रामीण भागातून इतरत्र स्थलांतर | १७०.४५ | ४८.९१ | १२१.५४ |
| (iii) गणना जिल्ह्यामधील नागरी भागातून इतरत्र स्थलांतर | ५०.९३ | २३.४६ | २७.४७ |
| (२) महाराष्ट्रातील एका जिल्ह्यातून इतर जिल्ह्यात स्थलांतर | | | |
| (i) स्थलांतरितांची एकूण संख्या | १२०.८७ | ५२.४९ | ६८.३८ |
| (ii) गणना जिल्ह्यामधील ग्रामीण भागातून इतर जिल्ह्यात स्थलांतर | ४२.२१ | १३.८९ | २८.३२ |
| (iii) गणना जिल्ह्यामधील नागरी भागातून इतर जिल्ह्यात स्थलांतर | ७८.६६ | ३८.६० | ४०.०६ |
| **II. भारतामधील इतर राज्यांमधून महाराष्ट्रात स्थलांतर** | ७३.१३ | ४१.७९ | ३१.३४ |
| (१) भारताच्या इतर राज्यामधील नागरी भागातून स्थलांतर | ६१.४८ | ३६.४८ | २५.०० |
| (२) भारताच्या इतर राज्यामधील ग्रामीण भागातून स्थलांतर | ११.६६ | ५.३१ | ६.३५ |
| (३) प्रमुख राज्यांमधून झालेले स्थलांतर | | | |
| (i) उत्तर प्रदेश | २०.७२ | १४.२६ | ६.४६ |
| (ii) कर्नाटक | ११.६५ | ५.३६ | ६.२९ |
| (iii) गुजरात | ८.४९ | ४.१२ | ४.३७ |
| (iv) मध्य प्रदेश | ५.९ | २.५८ | ३.३२ |
| (v) आंध्र प्रदेश | ४.३२ | २.०६ | २.२६ |
| (vi) राजस्थान | ४.३१ | २.६२ | १.६९ |
| (vii) बिहार | ३.६१ | २.७२ | १.६१ |
| (viii) केरळ | २.५८ | १.४६ | १.१२ |
| (ix) तमिळनाडू | २.५० | १.३९ | १.११ |
| (x) पश्चिम बंगाल | २.०९ | १.३९ | ०.७० |
| **III. आशियातील भारताबाहेरचे देश** | १.६४ | ०.९३ | ०.७२ |
| **IV. इतर देश** | ०.१४ | ०.०७ | ०.०७ |
| **महाराष्ट्रामधील एकूण स्थलांतरित लोक** | **४१७.१६** | **१६७.६५** | **२४९.५२** |



## महाराष्ट्रात ग्रामीण आणि नागरी भागांमधून स्थलांतराच्या कारणानुसार स्थलांतरितांचे स्वरूप (२००१)

| घटक | एकूण (लाख) | पुरुष (लाख) | स्त्रिया (लाख) |
|---|---|---|---|
| (१) रोजगारामुळे स्थलांतर | ६९.०५ | ६२.३२ | ६.७३ |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | १७.९० | १४.१३ | ३.७७ |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | ५१.१५ | ४८.२० | २.९६ |
| (२) व्यवसायामुळे स्थलांतर | १.९३ | १.६७ | ०.२६ |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | ०.३८ | ०.२६ | ०.१२ |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | १.५५ | १.४२ | ०.१३ |
| (३) शिक्षणामुळे स्थलांतर | ६.०४ | ४.४१ | १.६३ |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | २.१२ | १.४८ | ०.६४ |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | ३.९२ | २.९३ | ०.९९ |
| (४) विवाहामुळे स्थलांतर | १४८.६८ | १.१४ | १४७.५४ |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | १०६.९१ | ०.८० | १०६.११ |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | ४१.७७ | ०.३४ | ४१.४३ |
| (५) जन्मानंतर होणारे स्थलांतर | ५१.०९ | ३१.०० | २०.० |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | ३१.०५ | १९.३५ | १२.७० |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | २०.०४ | ११.७४ | ८.३० |
| (६) कुटुंबासह स्थलांतर | ७१.८८ | २९.७४ | ४२.१४ |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | २६.०३ | ११.०८ | १४.९६ |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | ४५.८५ | १८.६६ | २७.२८ |
| (७) इतर कारणामुळे स्थलांतर | ६८.४८ | ३७.२६ | ३१.२६ |
| (i) ग्रामीण भागातून स्थलांतर | ४०.११ | २१.१३ | १८.९८ |
| (ii) नागरी भागातून स्थलांतर | २८.३७ | १६.१३ | १२.२४ |

## बहुपर्यायी प्रश्न

(१) महाराष्ट्रात पुरुषांपेक्षा . . . . . . संख्या जास्त आहे.
(अ) स्त्रिया (ब) बालके (क) वयोवृद्ध (ड) अर्भके

(२) महाराष्ट्रात . . . . . . मध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थलांतर सर्वांत जास्त असते.
(अ) ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतर
(ब) नागरी भागातून ग्रामीण भागात स्थलांतर
(क) एकच जिल्हांतर्गत व जिल्ह्या-जिल्ह्यामधील स्थलांतर
(ड) एका नागरी भागातून दुसऱ्या नागरी भागातील स्थलांतर

(३) भारताच्या इतर राज्यांमधील स्थलांतरामध्ये स्त्रियांचे स्थलांतर . . . . . . असते.
(अ) जास्त (ब) कमी (क) तेवढेच (ड) दुप्पट

(४) भारताच्या अन्य राज्यांमधून महाराष्ट्रात होणाऱ्या स्थलांतरात . . . . . . सर्वप्रथम क्रमांक आहे.
(अ) बिहार (ब) गुजरात (क) कर्नाटक (ड) उत्तर प्रदेश

(५) गुजरातच्या ग्रामीण भागातून महाराष्ट्रात होणारे स्थलांतर नागरी भागापेक्षा . . . . . . आहे.
(अ) कमी (ब) जास्त (क) अत्यल्प (ड) समसमान

(६) कर्नाटकामधून महाराष्ट्रात एकूण स्थलांतरात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या . . . . . . असते.
(अ) जास्त (ब) कमी (क) समसमान (ड) अत्यल्प

(७) महाराष्ट्रात . . . . . . मुळे सर्वांत जास्त स्थलांतर होते.
(अ) कुटुंबासह (ब) रोजगार (क) विवाह (ड) व्यवसाय

(८) महाराष्ट्रात ग्रामीण भागातील लोक प्रामुख्याने . . . . . . विभागात स्थलांतर करतात.
(अ) कोल्हापूर - इचलकरंजी (ब) औरंगाबाद - जालना
(क) नागपूर - वर्धा (ड) मुंबई - पुणे

(९) महाराष्ट्रात सर्वांत जास्त . . . . . . स्थलांतर आहे.
(अ) ग्रामीण - नागरी (ब) नागरी - ग्रामीण (क) नागरी - नागरी (ड) ग्रामीण - ग्रामीण

(१०) महाराष्ट्रात उत्तर प्रदेशपेक्षा बिहारमधून होणारे स्थलांतर . . . . . . आहे.
(अ) जास्त (ब) तेवढेच (क) बरेच कमी (ड) कमी

(११) . . . . . . स्थलांतरामुळे निर्गमन क्षेत्रावर परिणाम होतात.
(अ) वृद्ध (ब) बुद्धिवंत (क) स्त्रिया (ड) बालके

### उत्तरे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ | (२) | क | (३) | ब | (४) | ड | (५) | क | (६) | अ |
| (७) | क | (८) | ड | (९) | अ | (१०) | क | (११) | ब | | |

# १०. ग्रामीण वसाहती व तांडे

## महाराष्ट्रातील मानवी वसाहती

**"मानवी वसाहत म्हणजे मानवाने प्राकृतिक पर्यावरणाशी साधलेले एक महत्त्वाचे अनुकूलन किंवा समायोजन आहे. संघटित लोकांची एकत्रित राहण्याची निवासस्थाने म्हणजे 'वसाहत' होय."**

### मानवी वसाहत : उदय व विकास

**(१) अश्मयुगीन महाराष्ट्र :** (इ. स. पूर्व तीन लाख वर्षे ते इ. स. पूर्व १० हजार वर्षे) महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यात केलेल्या सर्वेक्षणातून येथील उत्खननातून सापडलेली हत्यारे, प्राण्यांचे सांगाडे यावरून या संस्कृतीची माहिती मिळते.

**(२) मध्याश्मयुग व ताम्रपाषाणयुग :** (इ. स. पूर्व १० हजार ते इ. स. पूर्व ४००० वर्षे) महाराष्ट्रात पाटणे (जळगाव), पाचाड (रायगड), हातखंबा (रत्नागिरी), व इनामगाव (पुणे) येथे संशोधन करण्यात आले. हत्यारे लहान पण भौमितिक आकाराची होती. गारेच्या दगडापासून बनविलेली पाती होती. कदाचित या काळात मानव निसर्गतः उगविणारे धान्य गोळा करीत असावा, त्यामुळे मानवी जीवनात ऋतुमानानुसार स्थिरता लाभली, त्यामुळे शेतीचा शोध लागला.


**(३) नवाश्मयुग :** (इ. स. पूर्व ४००० ते इ. स. पूर्व २५००) महाराष्ट्रात नवाश्मयुगाचे अवशेष ताम्रपाषाण संस्कृतीच्या बरोबर संमिश्र स्वरूपात आढळतात. महाराष्ट्रात शेतीची सुरुवात साधारणतः चार हजार वर्षांपूर्वी झाली असावी असे तापीच्या खोऱ्यातील (धुळे जिल्हा) पुराव्यावरून म्हणता येईल.

**(४) ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्र :** (इ. स. पूर्व २५०० ते इ. स. पूर्व १२००) पाषाण व तांब्यापासून बनविलेली हत्यारे, दागिने वापरात होते. • शेती, पशुपालन, शिकार व मासेमारी यांवर अवलंबून असलेली अशी मिश्र अर्थव्यवस्था होती. आदिवासी लोक स्थलांतरित/झूम प्रकारची शेती करीत. • लोक चौकोनी आकाराच्या घरात राहत असत. घरांच्या भिंती मातीच्या किंवा कुडाच्या असत. छप्पर गवताने शाकारलेले असे. • लोक लहान खेड्यात राहत आणि प्रत्येक खेड्याची लोकसंख्या २०० ते ६०० दरम्यान असे. काही गावाभोवती तटबंदीचे अवशेष आढळून आले आहेत. • अहमदनगर जिल्ह्यातील जोर्वे, नेवासे (दायमाबाद) व पुणे जिल्ह्यात सोनगाव आणि इनामगाव येथे जी उत्खनने झाली त्यावरून महाराष्ट्रातील या संस्कृतीवर खूप प्रकाश पडला आहे. • स्थानिक गरजा भागून शेतीचे उत्पन्न शिल्लक राहू लागले. यातूनच व्यापार व अन्य व्यवसायांचा जन्म झाला. • नगरे अस्तित्वात आली. नगरे ही ग्रामीण समाजाभिमुख होती. ग्रामीण जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजांची पूर्तता करणारे कारागीर, कलाकार व तज्ज्ञ लोकांचे गट नगरात वस्ती करून असत. • ताम्रपाषाणयुगीन संस्कृती इ. स. पूर्व १२०० च्या सुमारास दुष्काळामुळे लोप पावली.

**(५) लोहयुगीन महाराष्ट्र :** इ. स. पूर्व सातव्या, आठव्या शतकात लोह तयार करण्याचे तंत्रज्ञान जाणणाऱ्या लोकांनी महाराष्ट्रात वसाहत केली. लोखंडाची हत्यारे वापरास सुरुवात झाली. हा मानव दक्षिण भारतातून विदर्भात आला असावा.

**(६) नागरी संस्कृतीस प्रारंभ :** • इ. स. पहिल्या ते तिसऱ्या शतकापर्यंतच्या काळात मानव वस्ती करू लागला. लोहयुगीन संस्कृती परिपक्व झाली. भविष्यातील नागर संस्कृतीच्या खुणा दिसू लागल्या. महाराष्ट्रातील काळ्या जमिनीतील लोखंडी नांगरामुळे यशस्वी लागवड शक्य झाली. वाढते कृषी उत्पन्न, लोखंडाचा उपयोग, भाजलेल्या विटांची घरे, खिळे ठोकून बसविलेले छप्पर व त्यावरील कौले, पाटा-वरवंटा, दळणाचे जाते, तटबंदीची शहरे, दर्यावर्दी व्यापार व बंदरे, लेखनकला, नाण्यांचा वापर व कारागिरांचे संघ उदयास आले. वाहतूक विकासाला मदत झाली.

**(७) सांस्कृतिक परंपरा :** • महाराष्ट्राचा काही भाग अशोकाच्या (इ. स. पूर्व २७२ - २३६) साम्राज्यात होता. • मौर्यांच्या राजकीय धोरणामुळे महाराष्ट्रात व्यापारात वृद्धी झाली. • महाराष्ट्राची सामाजिक व सांस्कृतिक जडणघडण सातवाहनांच्या काळात प्रकर्षाने झालेली आढळते. इ. स. १५० च्या सुमारास सातवाहनांची सत्ता दक्षिणेत केंद्रित झाली. या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर वसाहती होत्या. सातवाहनांच्या साम्राज्यात तटबंदी बांधलेली तीस शहरे होती. • रोमन साम्राज्याशी कृषी व्यापार सुरू होता. • महाराष्ट्रात इ. स. २५० च्या सुमारास वाकाटकनंतर बदामीचे चालुक्य, कल्याणीचे चालुक्य यांची राजवट होती. • मध्ययुगीन काळात देवगिरीचे यादव, नंतर खिलजी, तुघलक व बहामनीची राजवट होती. • मराठेशाहीच्या आधी महाराष्ट्रावर मुघल, निजामशाही व आदिलशाहीची सत्ता होती, यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर काही परिणाम झाला. • शिवाजीराजेंच्या उदयानंतर महाराष्ट्रात एक विशिष्ट अस्मिता निर्माण झाली. शिवाजी, संभाजी व शाहू आणि पेशवे यांनी महाराष्ट्राला आपले वेगळेपण प्राप्त करून दिले. • १८१८ ला पेशवाईचा अंत होऊन इंग्रजांनी सत्ता काबीज केली. त्याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या समाजजीवनावर पडले.




नकाशा क्र. १०.१ : महाराष्ट्र - प्रागैतिहासिक मानवी वसाहती



## आजचा महाराष्ट्र

स्वतंत्र भारताच्या सरकारने भाषावार प्रांतरचना करून १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. सन २००१ साली भारतात ५,९३,६४३ खेडी होती. महाराष्ट्रातील खेड्यांची संख्या ४१,०९५ होती. महाराष्ट्रात ६ प्रशासकीय विभाग व एकंदर ३५ जिल्हे व ३५८ तालुके आहेत.

पुढील तक्ता क्र. १०.१ मध्ये भारतातील व महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या आकारानुसार खेड्यांची संख्या दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १०.१ : भारत व महाराष्ट्र - खेड्यांची संख्या (वर्ष २००१)**

| | १००० पेक्षा कमी | १००० ते १९९९ | २००० ते ४९९९ | ५००० ते ९९९९ | १०,००० पेक्षा जास्त | एकूण खेडी |
|---|---|---|---|---|---|---|
| भारत | ३,६४,४८२ | १,२९,९७९ | ८०,४१४ | १४,८०६ | ३,९६२ | ५,९३,६४३ |
| महाराष्ट्र | २२,३८३ | ११,५७० | ५,८६२ | १,०१८ | २६२ | ४१,०९५ |

संदर्भ : भारत, २००६; पान १८.

भारतातील एकूण खेड्यांपैकी १००० पेक्षा कमी लोकसंख्येची सुमारे ६१% खेडी आहेत, तर १००० ते १९९९ पर्यंत लोकसंख्येची सुमारे २२% खेडी आहेत. महाराष्ट्रात अनुक्रमे ५४% व २८% खेडी आहेत. **(तक्ता क्र. १०.१ पाहा.)**

## महाराष्ट्रातील ग्रामनामे व नगरनामे

**(अ) मूळ शब्दाला प्रत्यय लावून झालेली नावे :** ही नावे त्या-त्या प्रदेशाचा इतिहास, निसर्ग, संस्कृती यांचे दर्शन घडवितात. ग्राम नावामध्ये अधिक प्रमाणात वापरले जाणारे प्रत्यय म्हणजे गाव, पूर, वाडी, खेड, बली, ओली, वाडा, डर, घर आणि पुरी.

- 'गाव' या प्रत्ययाचा वापर सर्वाधिक होतो. 'ग्राम' हा शब्द ऋग्वेदात असून याचा अर्थ शेतीवर आधारित खेडे असा आहे.
- पर्शियन व अरबी शब्दांचा प्रभाव ग्रामनामावर पडू लागला. • 'आबाद' प्रत्यय प्रसिद्ध पुरुषांच्या नावापुढे लावून औरंगाबाद, दौलताबाद, उस्मानाबाद अशी नावे पडली तर पूर व नगर हे संस्कृत प्रत्यय उर्दू नावापुढे आले. उदाहरणार्थ, अहमदनगर, रहिमतपूर, इस्लामपूर.
- वाडी प्रत्ययाची गावे नद्यांच्या खोऱ्यात जास्त आहेत. उदाहरणार्थ, बनगरवाडी, धनगरवाडी, नृसिंहवाडी. • वली व ओली हे प्रत्यय कोकणचे नैसर्गिक वैशिष्ट्य दर्शवितात. उदाहरणार्थ, कणकवली, बाणोली.

**(ब) प्रत्यय नसलेली नावे :** उदाहरणार्थ, पुणे, नाशिक, चिपळूण, वेल्हे, नीरा.

**(क) कसबा :** 'कसबा' म्हणजे कसबी किंवा कारागिरांचे वसतिस्थान. कसबा हे जरी नगर असले तरी याची सामाजिक व आर्थिक अभिमुखता ग्रामीण असते. याला 'ग्रामीण नगर' मानणे वस्तुनिष्ठ आहे. उदाहरणार्थ, कसबा-बावडा, गगन-बावडा.

**(ड) मौजे :** मौजे पद्धतीच्या खेड्याच्या वाड्या असतात. गावात विविध कारागीर, व्यापारी, इतर हुन्नर असलेले लोक राहतात. गावात दर आठवड्याला बाजार भरतो. ग्रामीण जनता, शेतमाल, जनावरे यांची खरेदी-विक्री करतात. संपूर्णपणे कृषीप्रधान खेड्याला 'मौजे' म्हणतात.

**(इ) खुर्द व बुद्रुक :** लहान खेड्याच्या नावापुढे 'खुर्द' तर मोठ्या खेड्यांच्या नावापुढे 'बुद्रुक' हे विशेषण लावले जाते. उदाहरणार्थ, लहान गाव 'गोंदवले खुर्द' व मोठे गाव 'गोंदवले बुद्रुक' या दोन्ही गावांच्या मधून नदी वाहते.

## ग्रामीण वसाहती

### घरांचे प्रकार

**भारतीय जनगणना विभागानुसार घराची व्याख्या : "घर म्हणजे वास्तू किंवा वास्तूचा भाग ज्याला रस्त्यापासून स्वतंत्र प्रवेशद्वार व सामुदायिक अंगण असते."**

**(१) बांधकाम साधनसामग्री :** महाराष्ट्रात तसेच संपूर्ण देशभरात घरे बांधण्यासाठी स्थानिक उपलब्ध असलेल्या बांधकाम साधनसामग्रीचा वापर केलेला असतो. दगड, चिखल, कच्च्या विटा, बांबू, वेत, लाकूड, वनस्पतींची पाने, झावळ्या, फांद्या, गवत इत्यादींचा वापर केलेला असतो. गरीब लोकांची घरे स्थानिक साधनसामग्रीचा वापर करून बांधलेली असतात. श्रीमंत लोकांची घरे अधिक आरामदायक असतात. यावरून **घरांचे दोन प्रकार पडतात :**

**(अ) कच्ची घरे :** घराच्या बांधकामासाठी स्थानिक बांधकाम सामग्रीचा वापर केलेला असतो. **(ब) पक्की घरे :** पक्क्या भाजीव विटा, सिमेंट, लोखंड, ॲस्बेस्टॉस यांच्या साहाय्याने सिमेंट काँक्रिटच्या भव्य वास्तू बांधलेल्या असतात. **(तक्ता क्र. १०.२ पाहा.)**

**तक्ता क्र. १०.२ : भारतीय जनगणनेद्वारा घरांचे प्रकार व बांधकाम सामग्री**

| घरांचा प्रवर्ग | बांधकाम साधनसामग्री |
|---|---|
| | **भिंती :** |
| पक्का | पक्क्या भाजीव विटा, जी.आय. शीट्स किंवा इतर धातू, दगड, सिमेंट काँक्रिट. |
| कच्चा | गवत, फांद्या, पाने, वेत, बांबू, चिखल, लाकूड, दगड, कच्च्या विटा. |
| | **छप्पर :** |
| पक्के | कौले, पत्रे-लोखंडी, जस्त, इतर धातूचे किंवा ॲस्बेस्टॉसचे पत्रे, आरसीसी काँक्रिट. |
| कच्चे | गवत, पाने, वेत, बांबू, फांद्या, काटक्या, लाकूड. |

**२. महाराष्ट्र : घरांच्या प्रकारांचे प्रादेशिक वितरण :** महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पारंपरिक पद्धतीची घरे स्थानिक हवामान व साधनसामग्री यांच्याशी मिळती-जुळती आहेत.

**(अ) देश/दख्खनच्या/महाराष्ट्र पठारावरील घरे :** • देशावर ज्या भागात पावसाचे प्रमाण कमी आहे अशा भागातील घरे मातीच्या विटांपासून बांधलेली आहेत. स्थानिक काळा दगड भिंतीसाठी वापरतात. • घरांचे छत लाकडी पट्ट्या टाकून झाकून घेतल्यावर त्यावर माती टाकली जाते, याला **'माळवदी किंवा धाब्याची घरे'** म्हणतात. देशावर सर्वत्र धाब्याची घरे आहेत. • पूर्वी गावातील सर्वांत मोठी घरे ही बहुधा देशमुख, पाटील वा जहागीरदारांची असत. कृष्णा, भीमा, गोदावरी, तापी नद्यांच्या खोऱ्यात धाब्याची घरे आढळून येतात. उष्णतेचे दुर्वाहक लाकूड असल्याने उन्हाळ्यात ही घरे थंड राहतात.

अलीकडील काळात मात्र घरांचे स्वरूप बदलत चालले आहे. लाकडाच्या वाढत्या किमती, अपुरा पुरवठा यामुळे खेड्यातील घरेसुद्धा आता छपरासाठी कौले किंवा सिमेंटचे पत्रे यांचा वापर करीत आहेत. घरांना खिडक्या कमी असतात, एकच प्रवेशद्वार असते.

**(ब) कोकणातील घरे :** कोकणात ४०० सें.मी. पर्यंत भरपूर पाऊस पडतो. याचा परिणाम येथील घर बांधणीवर झाल्याचा दिसून येतो. • घराचे छप्पर उतरते व कौलारू किंवा नारळ-पोफळीच्या पानांनी शाकारलेले असते. अलीकडे धातूचे किंवा सिमेंटचे पत्रेदेखील छपरासाठी वापरले जातात. घरापुढे मोकळे अंगण, तुळशी-वृंदावन तसेच नारळ-पोफळीच्या बागा दिसतात. • कोकणातील घरे परस्परांपासून अलग-अलग दिसून येतात, यामुळे बहुतेक कुटुंबे आत्मनिर्भर असतात. • खलाटी भागातील खेडी ओळीसारखी दिसतात, तर वलाटी भागातील खेड्यांच्या रचनेत विविधता आढळते. घरे विखुरलेली तर काही ठिकाणी पुंजक्यासारखी दिसतात.

**(क) सह्याद्री घाटमाथा व अन्य पर्वतराईंचा डोंगराळ प्रदेश :** सह्याद्री घाटमाथ्यावर प्रामुख्याने भिल्ल, कोळी, वारली, ठाकूर, कातकरी इत्यादी आदिवासी वा आदिवासीसादृश्य जमाती राहतात. जास्त पावसामुळे उतरत्या छपराची घरे बांधतात. बऱ्याच ठिकाणी घरांचे छत वनस्पतींच्या विविध भागांपासून तर भिंती कुडाच्या असतात. घरे विखुरलेली आढळतात. जंगलात घरांचे पुंजके आढळतात. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर उंच-सखल टेकड्यांच्या क्षेत्रात शाकारलेली गोलाकार झोपड्यांची निवासस्थाने आढळतात.

## ग्रामीण वसाहतीचे प्रकार

**प्रस्तावना :** महाराष्ट्रातील खेडी एकाच प्रकारची नाहीत. त्यांचे काही ठळक प्रकार आहेत. या विभिन्नतेच्या निर्मितीत भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक घटकांचे योगदान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील खेड्यांचे प्रकार, त्यांच्या वितरणाची ठळक वैशिष्ट्ये यांचा स्थूल आढावा आपण घेणार आहोत.

**(१) विखुरलेल्या/एकाकी वसाहती : एक किंवा एकापेक्षा जास्त कुटुंबे जेव्हा परस्परांपासून थोड्या दूर अंतरावर राहतात, यामुळे निर्माण होणाऱ्या वसाहतीला 'विखुरलेल्या वसाहती' असे म्हणतात.** सामान्यतः या वसाहती विपरीत हवामानविषयक स्थिती, उंच-सखल डोंगराळ टेकड्यांचा प्रदेश, घनदाट जंगले व गवताळ प्रदेश, कृषीयोग्य जमिनीची कमतरता, तसेच विस्तृत कृषी क्षेत्रे, आपल्या कृषी क्षेत्रावर घर करून राहणारे शेतकरी अशा ठिकाणी आढळून येतात. स्वातंत्र्यप्रियता, नवीन आव्हाने स्वीकारण्याची तयारी, चांगले हवामान, नवीन साधनसंपत्तीचा शोध व स्थलांतराची तयारी यामुळेदेखील मूळ वस्तीतून लोक नवीन जागी जाऊन स्वतंत्र वस्त्या उभारतात. **विखुरलेल्या वस्त्या म्हणजे गृहसमूहातील अंतरात्मक विलगता होय.**



**विखुरलेल्या वस्त्यांच्या निर्मितीची कारणे व वितरणाचे स्वरूप :**


**(१) प्रतिकूल नैसर्गिक/भौगोलिक परिस्थिती :** सह्याद्रीचा घाटमाथा, कोकण किनारपट्टीवरील सखल खलाटीचा भाग, सह्याद्रीच्या पश्चिम उतारावरील पर्वतराई नजीकचा उंच-सखल वलाटीचा प्रदेश, पश्चिम महाराष्ट्रातील मावळ पट्टा, सातपुडा पर्वत व टेकड्यांचा प्रदेश, पूर्व महाराष्ट्रातील टेकड्यांचा प्रदेश येथे उंच-सखल भूप्रदेश, कृषी व वसाहतीसाठी सलग भूमीचा अभाव, मृदेची स्तरीय विविधता, जमिनीचे विभक्तीकरण, पाण्याची अनिश्चितता, विकेंद्रित व्यवसाय इत्यादी घटकांमुळे विखुरलेल्या वसाहती आढळतात.

• **कोकणात** विखुरलेल्या वस्त्यांचे प्राबल्य आहे. कोकणात 'खलाटी' भागातील खेडी या उत्तर-दक्षिण रेखाकृती दिसतात. गावातील प्रमुख रस्त्याच्या दुतर्फा घरे असतात. एका गावाची सीमा दुसऱ्या गावाच्या वस्तीला मिळालेली असते. एकाच नात्याच्या किंवा एका जातीच्या दोन-चार वस्त्याही असतात; यांना पाडा, पडाळ इत्यादी नावाने ओळखले जाते. • पर्वतराईला लागून असलेल्या 'वलाटी' भागातील खेडी एखाद्या ओळीसारखी दिसतात. सपाट जमीन उपलब्ध नसल्याने घरे बऱ्याच प्रमाणात विखुरलेली दिसतात. काही ठिकाणी ती एकत्र पुंजक्यासारखीदेखील आढळतात. • **पूर्व विदर्भात** खेड्यांचा आकार लहान असतो. आदिवासी लोकांच्या १०-२० झोपड्या मिळून वाडी अस्तित्वात येते. जास्त पर्जन्य, समृद्ध भूजल पातळी, सुपीक जमीन असूनही आदिवासींचा विकास झालेला नाही. • महाराष्ट्रात पर्वतीय व डोंगराळ भागात आदिवासी जमाती राहतात. तेथे सलग शेतजमीन नसल्याने अशी विखुरलेली खेडी असतात. • महाराष्ट्रातील गोंड, कोलाम, कोरकू इत्यादी वन्य जातींचे वास्तव्य असणाऱ्या वनक्षेत्रात पुंजक्या-पुंजक्यांनी घरे बांधल्याचे आढळते.

**(२) आर्थिक घटक :** कृषीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मूळ गावात राहण्यापेक्षा शेतात जाऊन वस्ती करतात. महाराष्ट्रात या शेतवस्त्यांना 'वस्ती' किंवा 'वाडी' असे म्हणतात. आर्थिक व सामाजिक कारणांच्या प्रभावामुळे वाडीसंस्कृती विकसित होते. कोकणातील कृषी अर्थव्यवस्था कुटुंबप्रधान आहे. एक घर दुसऱ्या घरापासून अलग असल्याने बहुतेक कुटुंबे आत्मनिर्भर असतात.

**(३) सामाजिक घटक :** जाति-वर्णव्यवस्था, धार्मिक व वांशिक भिन्नता यांमुळे विलगतेची प्रवृत्ती वाढत आहे. ग्रामीण वस्त्यांमध्ये उच्चवर्णीय लोक आर्थिक व सामाजिकदृष्ट्या निम्न स्तरातील लोकांना सामावून घ्यायला सहजासहजी तयार नसतात, त्यामुळे सामाजिक दरी वाढत जाते, यामुळे मुख्य ग्रामीण वस्ती व अन्य लोकांची वस्ती असे विकेंद्रित चित्र दिसते. ग्रामीण भागातून रोजगाराच्या शोधार्थ लोक शहराकडे स्थलांतर करतात. नागरी विभागातील ग्रामीण-नागरी सीमान्त भागात या लोकांच्या विखुरलेल्या झोपड्या आढळतात.

**(४) राजकीय घटक :** प्रादेशिक विकासासाठी धरणे, विद्युत प्रकल्प, वसाहतीकरण, खनिजांचा शोध, संशोधन संस्था, औद्योगिक वसाहती इत्यादी कारणांमुळे मूळ वस्त्यांच्या अस्तित्वाचे प्रश्न येतात. मोठ्या प्रकल्प योजना कार्यान्वित झाल्यावर तेथील जमिनी व खेडी पाण्याखाली जातात. तेथील वसाहतींचे पुनर्वसन करावे लागते. कोयना प्रकल्पाच्या वेळी पाटण व जावळी तालुक्यातील १६ वस्त्यांचे विकेंद्रीकरण झाले. नर्मदासागर योजनेमुळे मध्य प्रदेश, महाराष्ट्र व गुजरात राज्यातील २३७ खेड्यांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ३३ खेड्यांचे पुनर्वसन होणार आहे, यामुळेदेखील विखुरलेल्या वस्त्यांची निर्मिती होते.





**नकाशा क्र. १०.२ : विखुरलेल्या वसाहती (सांगली जिल्हा)**
**संदर्भ : सर्व्हे ऑफ इंडिया, No. 47 K/12**

भारतीय स्थलनिर्देशक नकाशा 47 K/12 वरील सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील घोटी बुद्रुकच्या पूर्वेस व पेडच्या उत्तर-पूर्वेस कचरवाडी, किंडरवाडी, सिद्धेवाडी, शेडगांवाडी, भडकोवाडी, धोंडेवाडी, मुलानवाडी इत्यादी ग्रामवाड्या विखुरलेल्या आहेत. (**नकाशा क्र. १०.२ पाहा.**)

**विखुरलेल्या वस्त्यांची वैशिष्ट्ये :** • विखुरलेल्या वस्त्यांमध्ये अंतरात्मक विलगता स्पष्टपणे पाहावयास मिळते. • खेडी, वाड्या, वस्त्यांची लोकसंख्या मर्यादित असते. • २०० ते ५०० लोकसंख्येच्या अनेक वाड्या, वस्त्या आढळतात. • शेतकरी शेतजमिनीवरच राहत असल्याने दैनंदिन प्रवास वाचतो. • श्रमाची व वेळेची बचत होते. • सामाजिक सेवा उपलब्ध नसतात. • वसाहती पर्यावरणाशी अधिक निकट असतात. त्या प्रदूषणमुक्त असतात. • भांडण, तंटे-बखेडापासून मुक्त असल्याने सामाजिक स्वास्थ्य चांगले असते. • दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी मध्यवर्ती खेड्यावर अवलंबून असतात. • घरांचे समूह दूर अंतरावर असल्याने सांघिक कार्ये साधण्यात अडचणी येतात.

**(२) सघन/केंद्रित वसाहती : एकापेक्षा जास्त गृहसमूह एकत्र येऊन वस्त्यांचे केंद्रीकरण होते, त्याला 'सघन/केंद्रित वस्ती' असे म्हणतात.** अनेक कुटुंबे जवळजवळ राहतात, त्यामुळे सघन वसाहत निर्माण होते. संरक्षण, समूह प्रवृत्ती, समाजप्रियतेचा गुण व प्राकृतिक मर्यादा यांमुळे केंद्रित वसाहती निर्माण होतात.




**नकाशा क्र. १०.३ : केंद्रित वसाहती (सांगली जिल्हा)**
संदर्भ : सर्व्हे ऑफ इंडिया, No 47 K/8

महाराष्ट्रातील देश किंवा दख्खनचे पठार बऱ्यापैकी सपाट असल्याने केंद्रित वसाहती आढळतात. मध्यभागी लोकवस्ती व सभोवती पसरलेली शेती असते. ओढे, नाले, प्रवाह, नद्या, तळी, सरोवरे अशा पाणवठ्याजवळ गाव वसल्याचे दिसते. शेतीसाठी चांगली जमीन असावी व भरड, मुरमाड जमीन गाव वसविण्यासाठी वापरावी असा संकेत असे. अशा भरड जमिनीचा रंग पांढरट असल्याने गावच्या वस्तीला 'गाव पांढरी' किंवा 'पांढरी' हा शब्द वापरला जाऊ लागला, त्यामुळे खेड्याच्या वस्तीचा उल्लेख 'पांढरी' किंवा 'गावठाण' या नावाने होऊ लागला.

**केंद्रित वसाहतीच्या निर्मितीची कारणे व वितरणाचे स्वरूप :**

**(१) प्राकृतिक घटक :** • देशावरील नद्यांच्या खोऱ्यात पाण्याची उपलब्धता सहज शक्य आहे तेथे केंद्रित वसाहती आढळतात. • नद्यांच्या खोऱ्यातील जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणलेली असते, यामुळे गावठाणाचा आकार लहान असतो. घरे दाटीदाटीने वसलेली असतात. • डोंगराळ व तीव्र उताराच्या भागात वसाहतीयोग्य भूमी मर्यादित असते, यामुळे कमीत कमी जमीन गावठाणाखाली असते. साहजिकच वसाहतीचे केंद्रीकरण होते. • प्रतिकूल पर्यावरणात मानवी समूहांना सहकार्य व संरक्षणाची गरज असते. यामुळेदेखील केंद्रित वसाहती निर्माण होतात.


**(२) आर्थिक घटक :** महाराष्ट्रातील नद्यांच्या खोऱ्यात सुपीक मृदा, पाणीपुरवठा, वाहतूक सुविधा विकसित झालेल्या आहेत, यामुळे कृषी व कृषीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा विकास झालेला आहे, यामुळे तेथे केंद्रित वसाहती निर्माण झालेल्या आहेत.

**(३) सामाजिक घटक :** नैसर्गिक आपत्ती, परकीय आक्रमणे, चोरी, दरोडेखोरी, हिंसाचार व श्वापदे यांपासून संरक्षणासाठी लोक एकत्र राहतात व केंद्रित वस्ती निर्माण होते. केंद्रीकरणातून मानवाला शिक्षण, आरोग्य, करमणूक, वाहतूक, व्यापार, धार्मिक संस्था, श्रद्धास्थाने या सुविधा मिळतात.



**(४) राजकीय घटक :** • महाराष्ट्रात आदिवासी क्षेत्रावर शासनाने लाकूडतोडीला जेव्हा नियंत्रण आणले तेव्हा आदिवासी लोकांनी संघटित होऊन केंद्रित वसाहती निर्माण केल्यां. • पंचवार्षिक योजनाकाळात वाहतूक उद्योग, व्यापाराची पुनर्रचना यावर भर देण्यात आला. रस्ते, लोहमार्ग, समुद्रकिनाऱ्याला लागून रेषीय वस्त्या केंद्रित झालेल्या आहेत.

**केंद्रित वसाहतीची वैशिष्ट्ये :** • वसाहतीमधील घरे परस्परांना जवळजवळ असतात. • संरक्षण, सुरक्षितता, समूह प्रवृत्ती, सांघिक कार्य यामुळे गृहसमूहाचे केंद्रीकरण होते. • वसाहतीमध्ये सामाजिक सेवा उपलब्ध असतात. पंचायत, न्यायदान, शिक्षण, टपाल सेवा, सण, उत्सव, प्रार्थनास्थळे, बाजारपेठ, करमणूक केंद्रे अशा सामाजिक सुविधा असतात, यामुळे लोकांच्या सामाजिक, धार्मिक, मानसिक गरजा भागविल्या जातात. • केंद्रित वस्त्यांना स्थल व कालसापेक्ष वितरणामुळे विशिष्ट आकार प्राप्त होतो. • वाहतूक मार्ग, नदीकाठी, सागरकिनारी रेषीय केंद्रीकरण, चौरसाकृती किंवा आयताकृती केंद्रीकरण; तर विहीर, तलाव, किल्ला यांच्याभोवती वर्तुळाकार केंद्रीकरण आढळते. • वसाहतींच्या आंतररचनेत विविध जाती, धर्म, पंथ, वंश व विचारप्रणालीमुळे सामान्यतः सजातीय, स्वधर्मीय, सपंथीय समूहांचे विविध विभाग स्वतंत्र परंतु एकजिनसी केंद्रीकरणाच्या रूपात आढळतात. • केंद्रीकरण अति प्रमाणात झाल्यास सामाजिक, धार्मिक, राजकीय संघर्ष सुरू होतात, यामुळे दुर्बल अल्पसंख्याक घटकांना बाहेर पडावे लागते. केंद्रित वस्त्या भौगोलिक घटकांचा जास्तीत जास्त लाभ उठवू शकतात, त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या त्यांच्यातील विकासाचा स्तर विकेंद्रित वस्त्यांपेक्षा उच्च असतो.




**नकाशा क्र. १०.४ : संमिश्र/संयुक्त वसाहती (सांगली जिल्हा)**
संदर्भ : सर्व्हे ऑफ इंडिया, No 47 K/12

**(३) संमिश्र/संयुक्त वसाहती : मुख्य वसाहत व तिच्या सभोवतालच्या अलग-अलग घरांचे समूह मिळून निर्माण होणाऱ्या वसाहतीला 'संमिश्र वसाहत' असे म्हणतात.** ही सघन परंतु विकेंद्रित वसाहत असते. महाराष्ट्रात मुख्य ग्रामीण वस्त्यांच्या सभोवती कृषी क्षेत्रातील वस्त्या किंवा वाड्या मिळून या प्रकारच्या वसाहती बनलेल्या आहेत.

नकाशा क्र. १०.४ वर सांगली जिल्ह्यातील तुर्ची-ढवळी, निमनी-नागाव, निमनी ही जुळी खेडी आहेत, तर भिलवडी गावच्या सभोवती हजारवाडी, जुळेवाडी, भिलवडी स्टेशन, पालवाडी, माळवाडी यांसारख्या गाव व गावाखाली येणाऱ्या वाड्या आहेत.

**संमिश्र/संयुक्त वसाहतीची वैशिष्ट्ये :** • एक गाव व त्या गावाखाली येणाऱ्या छोट्या-छोट्या वाड्या तसेच जुळी खेडी या संयुक्त वसाहती आहेत. • सांस्कृतिक, सामाजिक व शासकीयदृष्ट्या एका वसाहतीच्या वाड्या मूळ वसाहतीशी संलग्न असतात. • काही वेळा एकाच नावाने ओळखली जाणारी जोडखेडी असतात. यातील लहान खेड्यांना 'खुर्द' मोठ्या खेड्यांना 'बुद्रुक' अशी विशेषणे लावली जातात. • नदी किंवा डोंगरामुळे अलग झालेल्या एकाच नावाची अशी दोन गावे महाराष्ट्रात दिसून येतात. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात अशी चौदा खेडी आहेत.

**(४) विखंडित/अपखंडित वसाहती :** एकाच वसाहतीमधील घरांचे समूह अलग-अलग, कमी-जास्त अंतरावर, अनियमित वसलेले असतात, त्यास 'विखंडित/अपखंडित वसाहत' असे म्हणतात. नदी, टेकडी, डोंगराचा अडथळा, पाणीपुरवठा, शेतजमिनीची उपलब्धता, सामाजिक किंवा व्यावसायिक विकेंद्रीकरणामुळे एकाच वसाहतीचे विखंडन झालेले असते. महाराष्ट्रात सह्याद्रीच्या उतारावर घाटाला लागून पूर्वेकडे व पश्चिमेकडे विखंडित वसाहती आढळतात.

### वस्ती आणि वाडी

गावठाणखेरीज वस्ती आणि वाडी निर्माण होण्यास दोन कारणे संभवतात :

(अ) काही शेतकरी कुटुंबांना व्यवसायाच्या सोईच्या दृष्टीने आपल्या कृषी क्षेत्रात घर बांधणे सोईचे वाटते. अशी कुटुंबे आपल्या नोकरांबरोबर शेतात राहू लागतात, याला 'वस्ती' या नावाने संबोधले जाते. कालांतराने वस्तीचा विस्तार झाला म्हणजे त्यांना 'वाडी' म्हणतात.


(ब) दुसरे कारण म्हणजे गाव पंढरीत असणाऱ्या शेती करणाऱ्या प्रमुख जातीखेरीज दुसऱ्या जाती जेव्हा शेती किंवा मेंढपाळीसारखा व्यवसाय करण्यासाठी गावात राहावयास येतात, त्या वेळी ते शक्य असल्यास गावाच्या अधिकाराखालीच स्वतंत्र वसाहत करून राहतात. अशा वसाहतीमधून वाड्यांची निर्मिती होते.

## ग्रामीण वसाहतीची प्ररूपे
## (PATTERNS OF RURAL SETTLEMENT)

वसाहतीचे प्रकार व प्ररूपे यांत फरक आहे. वसाहतीचा आकार (Shape) व बाह्यविस्तार यांचा समावेश प्ररूपात होतो. वसाहतीची प्ररूपे/प्रतिरूपे/स्वरूपे ही त्या वसाहतीला जो आकार प्राप्त होतो, त्यावरून अभ्यासली जातात.

ग्रामीण प्ररूपे पुढीलप्रमाणे आहेत :

### १. रेषाकृती/रेखाकृती प्ररूप (Linear Pattern)



आकृती क्र. १०.१ : रेखाकृती/रेषाकृती प्ररूप

**व्याख्या : "रस्ता, कालवा यांच्या दुतर्फा, नदी व समुद्र किनाऱ्यांच्या काठांवर आणि पर्वतीय प्रदेशाच्या पायथ्याशी एका पंक्तीत घरे वसलेली असतात. अरुंद पट्टीच्या आकाराची ही वसाहत असते; म्हणून या वसाहतीला 'रेषाकृती प्ररूप' असे म्हणतात."**

दोन्ही काठांवर जरी घरे वसलेली असली तरी त्यांची प्रवेशद्वारे परस्परांना समांतर असतात. अलग-अलग घरे किंवा घरांचे समूहदेखील असतात.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला वसलेली खेडी पाहावयास मिळतात. महाराष्ट्रात मुंबई-पुणे रस्त्यावर अशी अनेक खेडी आहेत.


**रेषाकृती/रेखाकृती प्ररूपाची वैशिष्ट्ये :**

(१) **घरे बहुधा एका रांगेत असतात. कालांतराने त्यांच्या अनेक रांगा असतात.**
(२) **घरे जवळजवळ असतात.**
(३) **प्ररूपामधील रस्ते व गल्ल्या परस्परांना समांतर असतात.**
(४) **रस्त्याच्या बाजूला महत्त्वाची दुकाने असतात.**
(५) **घरांची प्रवेशद्वारे एकाच दिशेला नसतात.**
(६) **भविष्यकालीन प्ररूपाचा विकास रस्त्यांच्या दिशेने होतो.**



### २. केंद्रोत्यागी/त्रिज्याकार प्ररूप (Radial Pattern)

**व्याख्या : "वसाहतीतील प्रमुख चौकात किंवा मध्यवर्ती महत्त्वाच्या ठिकाणापाशी अनेक मार्ग एकत्र येऊन मिळतात. किंवा येथून विविध दिशांना मार्ग बाहेर गेलेले असतात; परंतु वसाहतीमधील हे मार्ग परस्परांना समांतर नसतात. हे मार्ग जेथे एकवटलेले असतात तेथे घरांची गर्दी झालेली असते. घरांच्या समोरून किंवा मागच्या बाजूने रस्ते असू शकतात, याला 'केंद्रोत्यागी प्ररूप' असे म्हणतात."**




आकृती क्र. १०.२ : केंद्रोत्यागी/त्रिज्याकार प्ररूप

**केंद्रोत्यागी/त्रिज्याकार प्ररूपाची वैशिष्ट्ये :**

(१) वसाहतीच्या केंद्रभागापासून बाहेर जसा रस्त्यांचा विकास होत जातो त्याबरोबर नवीन घरांची स्थापना होत जाते.
(२) वसाहतीमधील रस्ते, गल्ल्या परस्परांना समांतर नसतात. जसा केंद्रभाग जवळ येत जातो तसे त्यांच्यातील अंतर कमी होत जाते.
(३) वसाहतीच्या **मध्यभागी व्यापारी केंद्रे** असतात. लोक तेथे वस्तूंची खरेदी-विक्री करतात.
(४) केंद्रभागी घरे अत्यंत दाटीने व अनियंत्रितपणे वसलेली असतात, तर बाहेरच्या बाजूला रस्त्याला अनुसरून घरे बांधलेली असतात.

### ३. बाणाकृती प्ररूप (Arrow Type Pattern)

**व्याख्या : "वसाहती नदीच्या टोकदार अग्र वळणाच्या अंतर्गत भागात किंवा समुद्रात घुसलेल्या जमिनीच्या उंच निमुळत्या भूभागावर स्थापन झालेल्या असतात, याला 'बाणाकृती प्ररूप' असे म्हणतात."**




आकृती क्र. १०.३ : बाणाकृती प्ररूप

**वैशिष्ट्ये :**

(१) वळणाच्या अग्रभागावर घरांची संख्या कमी असते, तर पार्श्वभागावर तुलनेने घरांची संख्या जास्त असते.
(२) पार्श्वभागावर वाहतुकीच्या सोई जास्त असतात.
(३) या प्रकारच्या वसाहतींचा भविष्यकालीन विकास पार्श्वभागावरच होत असतो.

### ४. ताराकृती/तारकासादृश्य प्ररूप (Star Pattern)

**व्याख्या : "सुरुवातीला केंद्रत्यागी/त्रिज्याकार स्वरूपाच्या वसाहतीचा विकास होत जाऊन, नंतरच्या काळात वसाहत वाढत गेल्याने, त्या वसाहतीचे रूपांतर तारकाकृती वसाहतीमध्ये होते."**

सुरुवातीला घरे अनियमित स्वरूपाने गावाच्या मध्यभागातून जाणाऱ्या रस्त्याला अनुसरून असतात; परंतु गावांचा जसा विकास होत जातो त्याबरोबर बाहेरून जाणाऱ्या रस्त्यांना अनुसरून नियमबद्ध घरे बांधलेली असतात.

वैशिष्ट्ये :


(१) वसाहतीचा आकार ताऱ्याप्रमाणे/चांदणीप्रमाणे (Star) असतो.

(२) रस्त्याला अनुसरून घरे बांधलेली असतात.

(३) वसाहतीच्या बाहेरील बाजूला घरांच्या रांगा परस्परांना समांतर असतात.


(४) वसाहतीच्या केंद्रभागी दुकाने, उपाहारगृहे यांसारखी व्यापारी केंद्रे असतात.

(५) वसाहतीमधील रस्ते एकमेकांना समांतर असतात.



आकृती क्र. १०.४ : ताराकृती/तारकाकृती प्ररूप

## ५. गोलाकार/वर्तुळाकार प्ररूप (Circular Pattern)



आकृती क्र. १०.५ : गोलाकार/वर्तुळाकार प्ररूप

**व्याख्या : "तलाव, सरोवर, वटवृक्ष किंवा गावातील एखादी महत्त्वाची वास्तू/घर यांच्याभोवती वर्तुळाकार स्वरूपात घरे बांधलेली असतात, याला 'गोलाकार/वर्तुळाकार प्ररूप' असे म्हणतात."**

**नाभिक वसाहत** *(Nucleated Settlement)* **:** वसाहतीत केंद्रभागी एखादी महत्त्वाची वास्तू असते व तिच्या सभोवती इतर घरे बांधलेली असतात.

**वैशिष्ट्ये :**

(१) वसाहतीमधील घरांची प्रवेशद्वारे मध्यवर्ती भागाकडे असतात.

(२) प्रत्येक घराला एकच प्रवेशद्वार असते. घरांना दारे-खिडक्या कमी असतात.

## ६. चौकोनाकृती/चौकपट्टीय प्ररूपे (Checkboard Pattern)

**व्याख्या : "सपाट मैदानी प्रदेशात ज्या ठिकाणी हमरस्ते किंवा लोहमार्ग परस्परांना ओलांडतात, तेथील वसाहतींना चौकोनाकृती किंवा चौकपट्टीय प्ररूप असे म्हणतात."**

मुख्य सडकांच्या व्यतिरिक्त इतर रस्ते व गल्ल्यादेखील समांतर असतात व एकमेकांस समकोनात मिळतात. वसाहतीमधील घरे पंक्तिबद्ध असतात.

महाराष्ट्रातील 'कुर्डूवाडी' हे मुंबई-सोलापूर व मिरज-लातूर लोहमार्ग परस्परांना ओलांडतात तेथे वसले आहे.


**वैशिष्ट्ये :**

(१) वसाहतीमधील रस्ते परस्परांना समांतर असतात.


(२) रस्ते बहुधा/शक्यतो परस्परांना काटकोनात छेदतात.

(३) वसाहतीमधील घरांच्या रांगा पाहावयास मिळतात.





आकृती क्र. १०.६ : चौकोनाकृती/चौपट्टीय प्ररूप



आकृती क्र. १०.७ : चौकोनी/ठोकळाकृती प्ररूप

## ७. चौकोनी/ठोकळाकृती प्ररूप (Square/Block Pattern)

या प्रकारच्या वसाहती वाळवंटी व निमओसाड प्रदेशात आढळतात. वाऱ्याबरोबर उडत येणाऱ्या वाळूपासून संरक्षण व्हावे तसेच चोर, डाकू, लुटारू यांपासूनदेखील संरक्षण व्हावे या उद्देशाने वसाहतीच्या चारी बाजूंना उंच तटबंदी बांधलेली असते. वसाहतीच्या मध्यभागी जागा सोडलेली असते. या खुल्या जागेमुळे हवा व सूर्यप्रकाश मिळण्यास मदत होते.

**वैशिष्ट्ये :**


(१) वसाहतीमधील घरांच्या भिंती उंच असतात.

(२) एखाद्या प्राचीन किल्ल्याप्रमाणे ही वसाहत दिसते.

(३) वसाहतीभोवती संरक्षक तटबंदी असते.

(४) वसाहत शक्यतो उंच जागी असते; त्यामुळे दुरून सहज दृष्टीस पडते.

## ८. शिडीच्या आकाराचे/वेदिकायुक्त प्ररूप (Terraced Pattern)



आकृती क्र. १०.८ : शिडीच्या आकाराचे/वेदिकायुक्त प्ररूप

**व्याख्या : "पर्वतीय भागात उताराला अनुसरून टप्प्याटप्प्याने घरांच्या रांगा बांधलेल्या असतात; त्यामुळे त्यांची रचना शिडीसारखी दिसते, याला 'शिडीच्या आकाराचे प्ररूप' असे म्हणतात."** दूरवरून पाहिल्यास या घरांच्या ओळी परस्परांना समांतर वाटतात.

पर्वतीय प्रदेशांत अशा प्रकारची वसाहत आढळते.

**वैशिष्ट्ये :**

(१) उताराच्या टप्प्यानुसार पायऱ्या-पायऱ्यांप्रमाणे घरे बांधलेली असतात.

(२) वसाहतीचा विकास उंचीनुसार होत जातो.

(३) घरे व शेतजमीन यांच्या दरम्यान वेडेवाकडे रस्ते असतात. ते पूर्वनियोजित नसतात.

(४) घरे मुख्यत: लाकूड, गवत, दगडांपासून बनविलेली असतात.

(५) नापीक क्षेत्रावर घरे असतात.

### ९. अनियमित/अनाकार प्ररूप (Irregular Pattern)

**या प्रकारच्या वसाहतींना विशिष्ट असा आकार नसतो.** लोकांच्या सोईनुसार घरे बांधलेली असतात; यामुळे घरे कोठेही असू शकतात. रस्त्यांचा विचार केलेला नसतो. घरांना अनुसरून नंतर रस्ते केले जातात.

## ग्रामीण वसाहतीची कार्ये
## (FUNCTIONS OF RURAL SETTLEMENT)

जगातील ग्रामीण वसाहतींची कार्ये विविध असू शकतात.

### (अ) प्रमुख कार्ये

**(१) कृषी** *(Agriculture)* **: ग्रामीण वसाहतीचे कृषी हे प्रमुख व महत्त्वाचे कार्य आहे.** शेतजमिनीजवळ ही वसाहत स्थापन होते. या वसाहतीत शेती करणाऱ्यांची व त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जास्त असते. **"ज्या खेड्यातील जास्तीत जास्त लोक कृषीशी संबंधित व्यवसायात गुंतलेले असतात, त्या खेड्याला 'कृषी खेडे'** *(Agricultural Village)* **असे म्हणतात."**

**(२) मासेमारी** *(Fishing)* **: "काही खेडी नद्या, सरोवरे व समुद्रकिनाऱ्यावर वसलेली असतात. या खेड्यातील जास्तीत जास्त लोक मासेमारी व्यवसायात गुंतलेले असल्यामुळे या खेड्याला 'मासेमारी खेडे'** *(Fishing Village)* **असे म्हणतात."**

या खेड्यातील काही लोक मासेमारी व्यवसायाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी (उदा. जाळे, बोटी) तयार करण्यात गुंतलेले असतात. प्रत्यक्ष खाजणच्या (Lagoons) भागात लाकडी डांब रोवून पाण्यावर झोपड्या बांधून मासेमारी वसाहत तयार केलेली असते.

**(३) खाणकाम** *(Mining)* **:** खनिज उत्खननाच्या ठिकाणी वसाहती निर्माण होतात. पूर्वीच्या काळात खाणकाम वसाहतीचे स्वरूप ग्रामीण होते. आधुनिक काळात मात्र खाणकाम वसाहतीस नागरी स्वरूप आले आहे. खनिजसंपत्ती संपल्यावर या वसाहतीचे कार्य संपते व कालांतराने दुसऱ्या कोणत्याही व्यवसायाला वाव नसल्यास ही वसाहत लोप पावते. प्रत्यक्ष खाणकामाच्या उद्देशातून निर्माण झालेल्या वसाहतीस **'खाणकाम खेडे'** *(Mining Village)* असे म्हणतात.

**(४) लाकूडतोड** *(Lumbering)* **:** लाकूडतोडीच्या उद्देशाने निर्माण झालेली वसाहत स्थायी किंवा अस्थायी असू शकते. **ज्या अरण्याच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर व वर्षानुवर्षे लाकूडतोडीचा व्यवसाय चालतो, त्या अरण्याच्या भागात स्थायी वसाहत निर्माण होते. कधी-कधी वर्षातील काही काळच लाकूडतोड चालते. नंतर तेथे लाकूडतोडीस वाव नसेल तर मात्र अस्थायी वसाहत स्थापन होते.** समशीतोष्ण कटिबंधातील सूचिपर्णी अरण्याच्या भागात स्थायी स्वरूपाची खेडी आढळतात; कारण या जंगलमय भागात वर्षानुवर्षे लाकूडतोडीचे काम चालूनदेखील तेथील जंगल फारसे कमी होत नाही. प्रत्यक्ष जंगलात किंवा जंगलाजवळ वसलेल्या खेड्यातून लाकूडतोड करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असेल तर त्या खेड्याला **'लाकूडतोड खेडे'** *(Lumbering Village)* असे म्हणतात.

### (ब) दुय्यम कार्ये

**प्रमुख कार्यांशिवाय ग्रामीण वसाहतीतील काही लोक इतर कार्यांतदेखील गुंतलेले असतात. या कार्यांना 'दुय्यम कार्ये' असे म्हणतात.** ही कार्ये खालीलप्रमाणे आहेत :

**(१) दुकानदारी** *(Shopping)* **:** ग्रामीण वसाहत अन्नधान्याच्या बाबतीत बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण असली तरी ती इतर गरजांच्या दृष्टिकोनातून स्वयंपूर्ण नसते. उदा. किराणा माल, कपडेलत्ते व इतर आवश्यक वस्तू विकत घ्याव्या लागतात; म्हणून व्यापार करणारे दुकानदार त्या वसाहतीत राहतात. हे दुकानदार जवळपासच्या नागरी भागातून वस्तू आणून विकतात व वसाहतीतील इतर लोकांची आवश्यक ती गरज भागवितात. **आधुनिक काळात प्रत्येक खेड्यात दुकानदारी कार्य महत्त्वाचे ठरले आहे.**

**(२) सामाजिक सेवा** *(Social Service)* **:** ग्रामीण वसाहतीत पोस्ट ऑफिसची सोय, वैद्यकीय सोय, शाळेची सोय असते; पण या सोई सर्वच खेड्यांतून असतील असे सांगता येत नाही. आपल्या भारतातील खेड्यांतून स्वातंत्र्यानंतर या सोई वाढत आहेत. **शासनातर्फे व खासगी संस्थांतर्फे सामाजिक सेवा बजावल्या जातात. खेड्यांमध्ये दिवसेंदिवस सामाजिक सेवा वाढत आहेत.**

**(३) धार्मिक कार्ये** *(Religious Functions)* **:** खेड्यात देऊळ, मशीद, चर्च असू शकते. हिंदूंचीच संख्या असेल तर त्या वसाहतीत देऊळ असते. तिन्ही धर्मांचे लोक राहत असतील तर तिन्ही प्रकारची धर्मस्थळे त्या खेड्यात असू शकतील. **खेड्यातील लोक धर्मावर विश्वास ठेवणारे असल्याने धार्मिक कार्याला फार महत्त्व आहे.** निरनिराळ्या धर्मांत कार्य करणारे लोक धार्मिक सेवा बजावताना आढळतात. उदा. हिंदूंमध्ये भटजी किंवा पुजारी, मुसलमानांमध्ये मुल्ला-मौलवी, ख्रिश्चन लोकांमध्ये पाद्री वगैरे.



**(४) शासकीय कार्ये** *(Administrative Functions)* **:** भारतातील खेड्यांत ग्रामपंचायतीमार्फत शासकीय कार्य चालते. **ग्रामपंचायतीत निवडून आलेले लोक शासकीय सेवा बजावतात व खेड्यात आवश्यक त्या सोई उपलब्ध करून देतात.**

## तांडे

भारताची खरी ओळख खेड्यामधूनच होते. अजूनही भारताची पन्नास टक्के जनता ग्रामीण भागातच वास्तव्य करीत आहे. भारतीय मान्सूनचा लहरीपणा आणि नैसर्गिक आपत्तीचा फटका प्रामुख्याने ग्रामीण भागाला बसतो. खेड्यामध्ये उदरनिर्वाहाची साधने मर्यादित प्रमाणात असतात. विशेषतः गरीब, अर्धपोटी उपासमारीत जीवन जगणाऱ्या लोकांना जीवन जगणे दुरापास्त होते. विपरीत परिस्थितीमध्ये ते तग धरू शकत नाहीत. यामधून काहीतरी रोजगार प्राप्त होईल आणि रोजीरोटीचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल या आशेने हे लोक शहराकडे धाव घेतात. प्रसंगी हे लोक तांड्यांनी शहराकडे येऊ लागतात. या लोकांची भाबडी आशा असते की, मुंबई-पुणे यांसारख्या महानगरात गेल्याने काहीतरी कामधंदा मिळेल आणि पोटाची खळगी भरली जाईल. महाराष्ट्रात हवामानाची विपरीत परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्ती आल्यास ग्रामीण भागातील लोकांचे तांडे किंवा झुंडी शहराकडे जातात आणि परिस्थिती सुधारल्यावर बरेच जण पुन्हा गावाकडे जातात किंवा काहीजण शहरामध्येच जमेल त्या ठिकाणी राहतात. याची आपण कारणमीमांसा करू.

**भारतीय मान्सूनचा लहरीपणा :** भारतीय लक्षावधी लोकांचे जीवन मान्सूनवर अवलंबून असते. पावसाचे स्वरूप, वितरण, पावसामधील खंड यावर भारतीय शेती आणि कृषी उत्पन्न अवलंबून असते. भारतीय अवर्षण ही एक अतिशय चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रामध्येही अवर्षण पडते. अवर्षणाचा परिणाम ग्रामीण भागात अल्प भूधारक, भूमिहीन शेतकरी, शेतमजूर यांच्यावर होतो. तीव्र अवर्षण काळात पाण्याची तीव्र टंचाई, अन्नधान्याची टंचाई, बेरोजगारी इत्यादींमुळे प्रामुख्याने पुरुष आणि प्रसंगी कुटुंबाची कुटुंबे काहीतरी काम मिळेल या आशेने शहराकडे जातात. यांची संख्याही भरपूर असते. त्यांचे तांडे असतात असे म्हटले तरी फारसे वावगे होत नाही. याचा ताण नागरी भागावर पडतो, झोपडपट्ट्यांची वाढ होते, बकालपणा वाढत जातो.

**नैसर्गिक आपत्ती :** अति पर्जन्यामुळे नद्यांना विनाशकारी पूर येतात. उभी पिके पाण्याखाली जातात, अशा लोकांचेही स्थलांतर होते. बरेच जण शहरातही येतात.

वरील प्रमुख कारणांमुळे लोकांचे तांडे शहराकडे येतात. याचा विपरीत परिणाम नागरी सुविधावर पडतो आणि नगराचे संतुलन बिघडते.

खेड्यामधील लोकांचा ओघ शहराकडे रोखण्यासाठी शासकीय योजना आखून अशा विपरीत परिस्थितीत त्यांना योग्य सुविधा व कामकाज उपलब्ध करून दिल्यास त्यांचा शहराकडील ओघ कमी होईल आणि नागरी संतुलन राखले जाईल.

### ग्रामीण गृहनिर्माणाच्या शासकीय योजना

**इंदिरा आवास योजना :** राज्यात इंदिरा आवास योजना ही केंद्रपुरस्कृत योजना, जवाहर रोजगार योजनेचा एक भाग म्हणून एप्रिल, १९८९ पासून राबविली जाते. भारत सरकारने या योजनेला १ जानेवारी, १९९६ पासून स्वतंत्र दर्जा दिला असून त्यानंतर ही योजना राज्यात ग्रामीण क्षेत्रात स्वतंत्रपणे राबविली जात आहे. यासाठी ७५ टक्के निधी केंद्राकडून प्राप्त होतो व २५ टक्के निधी राज्याकडून प्राप्त होतो. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील घर नसलेल्या कुटुंबांना घरे बांधून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ६० टक्के अनुदान अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती लाभार्थ्यांसाठी उपलब्ध केले जाते. टिकाऊ दर्जाची घरे बांधण्यासाठी केंद्रशासनाने १ एप्रिल, २००८ पासून प्रत्येक घराची किंमत ३५,०००/- रु. इतकी निश्चित केली आहे. राज्यशासनाने १ एप्रिल, २००९ पासून राज्याचा अतिरिक्त हिस्सा रु. ८,५०० वरून रु. ३३,५०० इतका वाढविण्याचे ठरविले आहे. प्रति घरासाठीचा एकूण खर्च ७०,००० रु. इतका निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये मजुरीच्या स्वरूपातील लाभार्थ्यांचा १,५०० रुपयांचा हिस्सा अंतर्भूत आहे.

भारत सरकारने २००९-१० या वर्षासाठी २,२३,६५३ घरांचे लक्ष्य निर्धारित केले असून ४५७.७४ कोटी रु. रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केली असून राज्य सरकारने ९४७.७६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. डिसेंबर, २००९ अखेरपर्यंत ८२.०१३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून रु. ४२८.५४ कोटी रु. इतका खर्च झाला आहे.

**राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना :** इंदिरा आवास योजनेत समावेश न होऊ शकलेल्या व दारिद्र्यरेषेखालील येणाऱ्या ग्रामीण जनतेला निवारा पुरविण्यासाठी राज्य सरकारने 'राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना' नोव्हेंबर, २००५ मध्ये जाहीर केली आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांसाठी राज्य सरकारने ही योजना विस्तारित केली आहे. याप्रमाणे 'राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-I' ही दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी आहे. 'राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II' ही दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांसाठी आहे व 'सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-II' ही दारिद्र्यरेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी आहे.

राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना–I अंतर्गत दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना त्यांची स्वत:ची घरे बांधण्यासाठी २८,५०० रु. प्रति लाभार्थी अनुदान उपलब्ध केले आहे. लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेद्वारे होत असून ही योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते. म्हाडामार्फत दोन हप्त्यात अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत ५१,५१० लाभार्थ्यांचे लक्ष्य असून त्यासाठी ५०,८३४ लाभार्थ्यांना १४४.६१ कोटी रु. निधी वितरित करण्यात आला आहे. डिसेंबर, २००९ अखेरपर्यंत ४५,७०६ घरांचे काम पूर्ण झाले असून ४,११० घरांचे काम प्रगतिपथावर आहे.

राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना–II अंतर्गत दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांसाठी जिल्ह्यातील अग्रगण्य बँकेकडून ४५,००० रु. प्रति लाभार्थी कर्ज पुरविण्यात येते. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरूपात राज्यशासनाकडून भागविले जाते. या योजनेसाठी ५१,५१० घरांचे उद्दिष्ट असून ऑक्टोबर २००९ अखेरपर्यंत ४८,४४४ घरांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ३४,३७२ घरकुलांचे प्रस्ताव बँकेकडे सादर केले असून ३,४२१ प्रस्तावांना मंजुरी प्राप्त झाली आहे आणि १,५८३ घरकुलांना कर्ज वितरित केले आहे. ३१३ घरकुले पूर्ण झाली असून ६३५ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

दारिद्र्यरेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील कुटुंबासाठी घरकुले बांधण्यासाठी शासनाने सुधारित राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना–II राबविण्याचा निर्णय घेतला असून १,२५,००० घरकुले दोन वर्षांत बांधण्याचा संकल्प केला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी जिल्ह्यातील अग्रगण्य बँकेकडून ९०,००० रु. कर्ज मंजूर करण्यात येते. कर्जावरील व्याज अर्थसाहाय्याच्या स्वरूपात राज्यशासनाकडून भागविले जाते. मासिक हप्ता ८३३ रु. इतका निश्चित करण्यात आला आहे. या योजनेसाठी ऑक्टोबर २००९ अखेरपर्यंत २७,३९८ प्रस्तावांना गृहनिर्माण समितीमार्फत मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १८,१९६ घरकुलांचे प्रस्ताव बँकेकडे सादर केले आहेत. त्यापैकी १,३१२ घरकुलांच्या प्रस्तावांना मान्यता प्राप्त झाली असून ३८० घरकुलांसाठी कर्ज वितरित करण्यात आले आहे. त्यापैकी ६७ घरकुले पूर्ण झाली असून २६२ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

(**संदर्भ :** महाराष्ट्र आर्थिक पाहणी, २००९-१०; पान १६९ ते १७१)

**तांडे याचा संदर्भ आदिवासी जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती यासाठीही वापरला जातो. याची माहिती प्रकरण ७ : लोकसंख्या यामध्ये पाहणे.**

## महाराष्ट्रातील ग्रामीण वसाहती

| मानवी वसाहत | ग्रामीण वसाहतीचे प्रकार | ग्रामीण वसाहतीची प्ररूपे |
|---|---|---|
| • उदय व विकास | घरांचे प्रकार व वितरण | १. रेषाकृती/रेखाकृती प्ररूप |
| • अश्मयुगीन महाराष्ट्र | • देश/पठारावरील घरे | २. केंद्रोत्यागी/त्रिज्याकार प्ररूप |
| • मध्याश्म युग व ताम्रपाषाण युग | • कोकणातील घरे | ३. बाणाकृती प्ररूप |
| • नवाश्म युग | • घाटमाथा व डोंगराळ प्रदेशातील घरे | ४. ताराकृती/तारकासदृश्य प्ररूप |
| • ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्र | वसाहतीचे प्रकार : | ५. गोलाकार/वर्तुळाकार प्ररूप |
| • लोहयुगीन महाराष्ट्र | १. विखुरलेल्या/एकाकी वसाहती | ६. चौकोनाकृती/चौकपट्टीय प्ररूप |
| • नागरी संस्कृतीस प्रारंभ | २. सघन/केंद्रित वसाहती | ७. चौकोनी/ठोकळाकृती प्ररूप |
| • सांस्कृतिक परंपरा | ३. संमिश्र/संयुक्त वसाहती | ८. शिडीच्या आकाराचे प्ररूप |
| • आजचा महाराष्ट्र | ४. विखंडित/अखंडित वसाहती | |
| • महाराष्ट्रातील ग्रामनामे व नगरनामे | | |

**ग्रामीण वसाहतीची कार्ये :**

(अ) प्रमुख कार्ये : (१) कृषी (२) मासेमारी (३) खाणकाम (४) लाकूडतोड.

(ब) दुय्यम कार्ये : (१) दुकानदारी (२) सामाजिक सेवा (३) धार्मिक कार्ये (४) शासकीय कार्ये.



# बहुपर्यायी प्रश्न

(१) एक किंवा एकापेक्षा जास्त कुटुंबे जेव्हा परस्परांपासून थोड्या दूर अंतरावर राहतात, यामुळे निर्माण होणाऱ्या वसाहतीला . . . . . असे म्हणतात.

(अ) विखुरलेल्या वसाहती (ब) केंद्रित वसाहती
(क) संमिश्र वसाहती (ड) विखंडित वसाहती

(२) एकापेक्षा जास्त गटसमूह एकत्र येऊन वस्त्यांचे केंद्रीकरण होते, याला . . . . . असे म्हणतात.

(अ) संमिश्र वसाहती (ब) विखुरलेल्या वसाहती
(क) विखंडित वसाहती (ड) केंद्रित वसाहती

(३) मुख्य वसाहत आणि तिच्या सभोवतालच्या अलग-अलग घरांचे समूह मिळून निर्माण होणाऱ्या वसाहतीला . . . . . असे म्हणतात.

(अ) विखंडित वसाहती (ब) संमिश्र वसाहती
(क) केंद्रित वसाहती (ड) विखुरलेल्या वसाहती

(४) एकाच वसाहतीमधील घरांचे समूह कमी-जास्त अंतरावर, अनियमितपणे वसलेले असतात याला . . . . . असे म्हणतात.

(अ) केंद्रित वसाहती (ब) विखुरलेल्या वसाहती
(क) विखंडित वसाहती (ड) संमिश्र वसाहती

(५) रस्ता, कालवा यांच्या दुतर्फा, नदी व समुद्रकिनाऱ्याच्या काठावर आणि पर्वतीय प्रदेशाच्या पायथ्याशी एका पंक्तीत घरे वसलेली असतात, याला . . . . . असे म्हणतात.

(अ) रेषाकृती प्ररूप (ब) केंद्रोत्यागी प्ररूप
(क) चौकोनी प्ररूप (ड) वर्तुळाकार प्ररूप

(६) वसाहतीतील प्रमुख चौकात किंवा मध्यवर्ती महत्त्वाच्या ठिकाणापाशी अनेक मार्ग एकत्र येऊन मिळतात किंवा येथून विविध दिशांना मार्ग बाहेर गेलेले असतात. हे मार्ग जेथे एकवटलेले असतात तेथे घरांची गर्दी झालेली असते. घरांच्या समोरून किंवा मागच्या बाजूने रस्ते असू शकतात, याला . . . . . असे म्हणतात.

(अ) बाणाकृती प्ररूप (ब) केंद्रोत्यागी प्ररूप
(क) ताराकृती प्ररूप (ड) चौकोनी प्ररूप

(७) वसाहती नदीच्या टोकदार अग्र वळणाच्या अग्र भागात किंवा समुद्रात घुसलेल्या जमिनीच्या उंच निमुळत्या भूभागावर स्थापन झालेल्या असतात, त्याला . . . . . असे म्हणतात.

(अ) चौकोनाकृती प्ररूप (ब) त्रिभुजाकृती प्ररूप
(क) बाणाकृती प्ररूप (ड) पंखाकृती प्ररूप

## उत्तरे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | अ | (२) | ड | (३) | ब | (४) | क |
| (५) | अ | (६) | ब | (७) | क | | |

(८) सुरुवातीला केंद्रोत्यागी/त्रिज्याकार स्वरूपाच्या वसाहतीचा विकास होत जाऊन नंतरच्या काळात वसाहत वाढत गेल्याने त्या वसाहतीचे रूपांतर . . . . . वसाहतीमध्ये होते.

(अ) अनियमित प्ररूप (ब) गोलाकार प्ररूप
(क) ताराकृती प्ररूप (ड) चौकोनी प्ररूप

(९) तलाव, सरोवर किंवा गावाची एखादी वास्तू/घर यांच्याभोवती वर्तुळाकार स्वरूपात घरे बांधलेली असतात, याला . . . . . असे म्हणतात.

(अ) गोलाकार प्ररूप (ब) केंद्रोत्यागी प्ररूप
(क) शिडीच्या आकाराचे प्ररूप (ड) पंखाकृती प्ररूप

(१०) सपाट मैदानी प्रदेशात ज्या ठिकाणी हमरस्ते किंवा लोहमार्ग परस्परांना ओलांडतात, तेथील वसाहतींना . . . . . असे म्हणतात.

(अ) रेषाकृती प्ररूप (ब) ठोकळाकृती प्ररूप
(क) अनियमित प्ररूप (ड) चौकोनाकृती प्ररूप

(११) पर्वतीय भागात उताराला अनुसरून टप्प्याटप्प्याने घरांच्या रांगा बांधलेल्या असतात. त्यामुळे त्यांची रचना शिडीसारखी दिसते, याला . . . . . असे म्हणतात.

(अ) पंखाकृती प्ररूप (ब) शिडीच्या आकाराचे प्ररूप
(क) अनियमित प्ररूप (ड) तारकासदृश्य प्ररूप

(१२) ग्रामीण वसाहतीमध्ये प्रमुख व महत्त्वपूर्ण कार्य . . . . . आहे.

(अ) मासेमारी (ब) लाकूडतोड
(क) कृषी (ड) खाणकाम

**उत्तरे**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (८) | क | (९) | अ | (१०) | ड | (११) | ब | (१२) | क |

# ११. गलिच्छ वस्त्या/झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न

## प्रस्तावना

एखाद्या गावात वा शहरात, सर्वसाधारण स्वच्छतेच्या तेथील रूढ कल्पनेच्या दृष्टीतून इतर वस्त्यांपेक्षा गलिच्छ असलेल्या वस्त्या. भिन्न-भिन्न समाजात वेगवेगळ्या काळी गलिच्छ वस्त्या या संज्ञेचा अर्थ वेगवेगळा संभवतो. स्वच्छता व निवासस्थान याविषयीच्या कल्पना जशा बदलत जातील त्यानुसार गलिच्छ वस्तीची व्याख्या आणि लक्षणे बदलणे अपरिहार्य ठरते. म्हणूनच विकसित व अविकसित देशांमध्ये, शहरांमध्ये व खेड्यांमध्ये तसेच औद्योगिकीकरणाच्या पूर्वोत्तरकालीन नागरिकीकरणामध्ये गलिच्छ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वस्त्या भिन्न प्रकारच्या दिसून येतात.

औद्योगिकीकरणपूर्व काळातील गलिच्छ वस्त्या या काही विशिष्ट गावात/शहरात दिसून येत असत. माणसांची अधिक वर्दळ असेल तेथे, किरकोळ खरेदी-विक्रीचा व्यवहार मोठ्या प्रमाणात होत असेल तेथे; तसेच जीवनोपयोगी साधनांच्या जवळपास दुकानांची व घरांची गर्दी होणे स्वाभाविक आहे. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मुख्य देवस्थानाच्या भोवती अशी गर्दी आजही दिसून येते. त्याचप्रमाणे नळाची सोय नसलेल्या गावी, नदी किंवा तलाव हेच पाणीपुरवठ्याचे मुख्य साधन असल्यास व त्याचे पात्र बंदिस्त असल्यास त्याभोवती घरांची गर्दी होण्याची शक्यता असते. शहरातील इतर वस्त्यांबरोबरच गलिच्छ वस्ती ही फार पूर्वीपासून मानवाच्या परिचयाची आहे. इजिप्त आणि बॅबिलॉन संस्कृतीतही गलिच्छ वस्त्यांचे अस्तित्व आढळून येते. मुख्य शहराभोवती किल्ला किंवा भिंत असली की त्याच्या हद्दीबाहेर वेशीला लागून किंवा जवळच गलिच्छ वस्त्या असल्याचे उल्लेख सापडतात. परंतु गलिच्छ वस्त्या व त्यांच्या समस्या प्रामुख्याने आधुनिक नागरिकीकरणाच्या प्रक्रियेतूनच उद्‌भवल्या आहेत.

औद्योगिकीकरणामुळे नगरांचा विस्तार झाला आणि ती अवाढव्य वाढली. नागरी नियोजनच्या विसंवादी स्वरूपामुळे गलिच्छ वस्त्यांची निर्मिती झाली. विसाव्या शतकाच्या आरंभापासून भारतात मुंबई, चेन्नई, कोलकता, दिल्ली, कानपूर या महानगरांप्रमाणेच इतर शहरांमध्येदेखील गलिच्छ वस्त्यांचा किंवा झोपडपट्ट्यांचा प्रश्न प्रकर्षाने जाणवू लागला आहे. झोपडपट्ट्या फक्त भारतातच आहेत असे नाही तर संयुक्त संस्थाने, इंग्लंड, फ्रान्स या पाश्चिमात्य राष्ट्रातदेखील ही समस्या मोठ्या प्रमाणात आहे. प्रसिद्ध विचारवंत हंटर यांनी असे म्हटले आहे की, 'गलिच्छ वस्त्या म्हणजे नागरी जीवनाला झालेला कॅन्सर आहे.' विकासाच्या दृष्टीने प्रत्येक शहर प्रयत्नशील असते. शहरांचा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा असते. परंतु या विकासाबरोबरच शहराच्या काही भागांकडे दुर्लक्ष होते. ज्या भागाचा विकास होत असतो तेथे गगनचुंबी इमारती असतात. अनेक मोठमोठ्या अन्य इमारती, शैक्षणिक संस्था, प्रार्थना-मंदिरे पाहावयास मिळतात तर दुसरीकडे दूर अंतरावर अनेक कच्च्या झोपडपट्ट्यांचा समूह असतो.

### गलिच्छ वस्ती/झोपडपट्टीची व्याख्या :

* **"अपुऱ्या राहत्या जागेत झालेली माणसांची दाटी, त्या जागेचा खालावलेला दर्जा, अनारोग्यकारक परिसर किंवा स्वच्छतेच्या सोई-सवलतींचा अभाव आणि त्यामुळे तेथील रहिवाशांच्या किंवा एकंदर समाजाच्या आरोग्याला, सुरक्षिततेला किंवा नीतिमत्तेला पोहोचणारा धोका इत्यादी लक्षणांनी युक्त असलेली एखादी इमारत, इमारतींचा समूह किंवा प्रदेश यांना गलिच्छ वस्त्या असे म्हणतात." — संयुक्त राष्ट्र संघटना**
* **"ज्या परिसरातील घरे राहण्यास निकृष्ट, अपुरी, आरोग्यास घातक, संरक्षण, नैतिकता आणि तेथील निवासी लोकांच्या दृष्टीने हानिकारक असतात त्या परिसरास झोपडपट्टी असे म्हणतात." — फोर्ड**
* **"अवैधरीत्या गोंधळाने बळकावलेल्या, अविकसित, दुर्लक्षित, दाट लोकसंख्या असलेल्या, मोडकळीस आलेल्या दुर्लक्षित वस्तीला गलिच्छ वस्ती असे म्हटले जाते." — गलिच्छ वस्तीविषयक परिसंवाद**

### गलिच्छ वस्त्यांचे स्वरूप :

* घरे जुनाट असून मोडकळीस आलेली असतात. अपुऱ्या जागेत माणसे कशीबशी राहत असतात.
* शयनगृहे व स्नानगृहे यांची, विशेषत: स्त्रियांसाठी स्वतंत्र सोय नसते.
* वेगवेगळ्या आकाराची व उंचीची ओबडधोबड घरे अव्यवस्थितपणे एकमेकांना लागून असतात.
* घरांभोवती मोकळी जागा नसते.
* घरांच्या रांगांमध्ये रस्ता असला तरी तोही कच्चा, ओबडधोबड आणि अरुंद असतो.
* हवा व उजेड यांना घरात वाव नसतो.
* स्वतंत्र संडासाची सोय नसते.
* सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटारांची सोय नसते.
* वीज व पाणी यांचा पुरवठा पुरेसा किंवा अजिबात नसतो.

- स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीने स्थानिक शासनाचे या वस्त्यांकडे मुळीच वा पुरेसे लक्ष नसते. त्यामुळे भोवतालचा परिसर दुर्गंधीयुक्त कचऱ्याने व पाण्याने भरलेला असतो.
- गलिच्छ वस्त्यांमध्ये मोडकळीस आलेल्या घरांचा जसा समावेश होतो तसेच बांबू, पत्रे, ताडपत्री इत्यादींनी बांधलेल्या झोपड्याही त्यात येतात.

## गलिच्छ वस्ती/झोपडपट्ट्या निर्मितीची कारणे व प्रश्न

भारतात निकृष्ट दर्जाच्या चाळी, झोपडपट्ट्या तसेच भटक्या लोकांच्या तात्पुरत्या वस्त्या या गलिच्छ वस्त्या म्हणून ओळखल्या जातात. गलिच्छ वस्त्या या सार्वत्रिक आहेत व विकसित आणि अविकसित अशा दोन्ही प्रकारच्या देशात त्या दिसून येतात. म्हणून गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन हा नागरी शासनाचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा तसेच नागरी समाजशास्त्रज्ञांचा एक कायमचा प्रश्न बनला आहे.

गलिच्छ वस्ती/झोपडपट्ट्या निर्मितीची कारणे पुढीलप्रमाणे :

(१) औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातील लोक शहरांकडे येतात ते प्रामुख्याने मोलमजुरी करतात. असे लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात.

(२) ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या वाढीमुळेदेखील ते शहरांकडे धाव घेतात; कारण खेड्यात सर्वांनाच रोजगार मिळत नाही.

(३) या लोकांना नागरी जीवनाचेदेखील जबरदस्त आकर्षण असते. त्यांची लहानशा जागेतदेखील राहण्याची तयारी असते. यामुळेच बकाल वस्तींची वाढ होते.

(४) दुष्काळ, महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटाच्या वेळी ग्रामीण भागातील लोक फार मोठ्या प्रमाणात शहरांमध्ये स्थलांतर करतात.

(५) महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी दुष्काळ पडला होता तेव्हा बरेच लोक रोजगार मिळविण्याच्या आशेने पुण्या-मुंबईसारख्या शहरांकडे गेले. असे लोक रेल्वेस्थानकावरच वास्तव्य करतात किंवा जवळपासच्या झोपड्यांत राहतात. यामुळेदेखील शहरांमध्ये झोपडपट्ट्यांचा प्रश्न गंभीर होत आहे.

(६) महानगरांमध्ये घरांच्या तीव्र टंचाईमुळेदेखील गरीब लोक अशा झोपडपट्ट्यांमधून राहणे पसंत करतात. गलिच्छ वस्त्यांचा उगम, वाढ व निर्मूलन याविषयीचा अभ्यास सतत चालू आहे. तसेच निर्मूलनाचे प्रयोगही ठिकठिकाणी केले जात आहेत. परंतु गलिच्छ वस्ती संपूर्णपणे कोणत्याच देशातून नष्ट झालेली नाही.

(७) दारिद्र्य, स्पर्धात्मक अशी भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि शासन व समाज यांची या समस्यांबद्दलची उपेक्षा ही गलिच्छ वस्ती निर्माण होण्यामागील मुख्य कारणे समजली जातात.

(८) समाजातील प्रचलित अर्थव्यवस्थेत व सांस्कृतिक जीवनात समरस वा स्वीकृत न झालेले व आर्थिक-सांस्कृतिकदृष्ट्या अगदी हीन पातळीवर असलेले लोकच गलिच्छ वस्तीत राहणे पत्करतात किंवा तेथेच त्यांना राहणे सोईचे किंवा क्रमप्राप्त ठरते असे म्हटले जाते.

(९) ज्याप्रमाणे घरांची रचना, त्यांच्या वाढत्या किमती आणि स्वच्छतेच्या सोई-सवलतींचा अभाव यामुळे गलिच्छ वस्त्या निर्माण होतात.

(१०) एखाद्या वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या स्वच्छतेच्या कल्पना आणि सवयी यामुळेही ती वस्ती कालांतराने गलिच्छ बनत जाते.

गलिच्छ वस्तीस नागरी समाजरूपी शरीरातील रोग समाजरूपी शरीरातील रोग समजावा की नगरवाढीतील एक अपरिहार्य टप्पा समजावा याबद्दल शास्त्रज्ञांमध्ये दुमत आहे.

(११) नागरिकीकरणाच्या सततच्या प्रक्रियेमध्ये शहरातील विविध भागांची औद्योगिक उत्पादने, करमणूक, किरकोळ व ठोक व्यापार, सावकारी पतपेढ्या, वाहतूक व संदेशवहन, तसेच कौटुंबिक वसतिस्थाने या उद्दिष्टांनुसार विभागणी होत जाते. वाढत्या लोकसंख्येनुसार व शहराच्या परिस्थितिजन्य जबाबदारीनुसार विविध प्रकारच्या कार्याकरिता स्वतंत्र यंत्रणा आणि जागा व्यापक प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे ठरते. योजनाबद्ध रीतीने या वाढीस वाव करून न दिल्यास वाढ होण्याचे थांबत तर नाहीच, उलट एखाद्या कार्याचे क्षेत्र वाढत जाऊन ते शेजारच्या दुसऱ्या कार्याच्या क्षेत्रावर अतिक्रमण करते व त्या कार्यक्षेत्राला दुसरीकडे हुसकून लावते, असे अनेक शहरांच्या वाढीच्या अभ्यासाने सिद्ध झाले आहे. गलिच्छ वस्तीचे मूळ हे याप्रमाणे एखादे क्षेत्र पूर्वीच्या कार्यास अपात्र किंवा अवास्तव ठरून दुसऱ्याच कार्याचे अतिक्रमण त्यावर होत राहण्यामध्ये आणि त्यामुळे जमिनीच्या किमतीत चढ-उतार होण्यामध्ये आहे असे म्हटले जाते. सर्व शहरात सामान्यपणे या प्रक्रियेस अनुसरून गलिच्छ वस्त्या निर्माण झाल्याचे दिसून येते.



(१२) शहरातील मध्यवर्ती आर्थिक व्यवहारांची व व्यापारी उलाढालींची व्याप्ती वाढत जाऊन त्यांचे भोवतालच्या कौटुंबिक निवासस्थानाच्या क्षेत्रावर अतिक्रमण होते. त्यामुळे तेथील जमिनीच्या किमती वाढू लागतात आणि घरभाडे वाढतात. शिवाय व्यावसायिक व्यवहारांच्या वाढत्या गजबजाटामुळे कौटुंबिक जीवनाला ती वस्तीच अयोग्य ठरते. म्हणून तेथील कुटुंबे उपनगरांकडे किंवा शहराच्या सीमेवरील वस्तीकडे धाव घेतात. त्या ठिकाणच्या राहत्या घरांची दुर्दशा होते. घर केव्हातरी खाली करावे लागणार, म्हणून त्याच्या दुरुस्तीकडेही दुर्लक्ष केले जाते. अशा परिस्थितीत कमी उत्पन्नाची कुटुंबे अनेक अडचणी सोसून तेथे राहणे पत्करतात.

(१३) व्यावसायिक व्यवहारांकरिता लांबून येणाऱ्या लोकांना अनेक सुखसोई उपलब्ध करून देणाऱ्या संस्था (उदा., खाणावळी, निवासस्थाने इ.) वा व्यक्ती (उदा., वेश्यागमन) याही असली घरे पसंत करतात. साहजिकच, तेथे अनेक प्रकारचा गलिच्छपणा वाढीस लागतो.

(१४) एखाद्या विशिष्ट कार्याकरिता राखून ठेवलेल्या आणि काही काळ रिकाम्या झालेल्या जागेतही विशेषत: बाहेरून कामाच्या शोधार्थ असलेल्या आणि खालच्या दर्जाची कामे करीत असलेल्या लोकांची वस्ती असते. ही बहुधा झोपडपट्टीच असते. त्या जागेच्या किमती जास्त असतात, म्हणून कायमची घरे बांधायला ती जागा परवडत नाही.

(१५) शहरविस्ताराच्या प्रक्रियेत विशिष्ट कारणाकरिता राखून ठेवलेल्या किंवा अन्य मोकळ्या जागांवर झोपड्या बांधल्या जातात आणि नंतर त्यांना अन्यत्र हलविणे दुरापास्त होऊन बसते.

(१६) शहरविस्ताराच्या प्रक्रियेत लोहमार्ग, इतर संदेशवहनाचे मार्ग आणि उत्पादक व दुरुस्तीकामाचे कारखाने हे महत्त्वाचे घटक समजले जातात. या कारखान्यांच्या नोकरवर्गापैकी जो खालचा वर्ग असेल तो बहुधा दैनंदिन कामाच्या जागेजवळच घर करणे पसंत करतो. म्हणूनच शहराबाहेर लोहमार्गाच्या व इतर मार्गाच्या पट्ट्याला लागून तसेच कारखान्याजवळ झोपडपट्ट्या किंवा निकृष्ट दर्जाची घरे दिसून येतात. लोकांचे दारिद्र्य, घाणेरड्या सवयी आणि इतर सुविधांचा अभाव यामुळे अशा वस्त्या गलिच्छ बनतात.

## गलिच्छ वस्ती/झोपडपट्ट्या निर्मूलनाच्या उपाययोजना

गलिच्छ वस्ती नाहीशी करावयाची झाल्यास दोन उपाय मुख्यत्वेकरून सुचविले जातात :

(१) गलिच्छ वस्तीतील लोकांना अन्य ठिकाणी - विशेषत: आरोग्य व राहणीमान यांच्या दृष्टीने योग्य अशा घरात हलविणे व गलिच्छ वस्ती संपूर्णतया नष्ट करणे.

(२) खेड्यातील शेतीचे उत्पादन वाढवून, उपलब्ध शेतजमिनीचे फेरवाटप करून, लहान-लहान शहरांमध्ये उद्योगधंद्याकरिता नव्यांना संधी प्राप्त करून देऊन, अन्य औद्योगिक वा तत्सम वसाहती स्थापून मोठ्या शहराकडे धाव घेणाऱ्यांची संख्या कमी करणे किंवा आटोक्यात आणणे.

यापैकी पहिला उपाय अधिक तातडीने करता येण्यासारखा आहे आणि सध्या अस्तित्वात असलेल्या गलिच्छ वस्त्यांकरिता तो आवश्यकही आहे. याविषयी संयुक्त राष्ट्रांच्या, नागरिकीकरणाविषयीच्या १९६८ च्या अहवालात पुढील चार प्रकार सांगितले आहेत :

(१) शहरवाढीस बाधक ठरणाऱ्या वस्तीस अन्यत्र निर्वेध अशा जागी हलविणे.

(२) भविष्यकाळात बाधक ठरणाऱ्या वस्त्यांना आरोग्याच्या सोई-सवलती उपलब्ध करून देऊन त्यांच्यात सुधारणा घडवून आणणे.

(३) स्वत:ची घरे बांधू न शकणाऱ्या किंवा बांधू न इच्छिणाऱ्या लोकांची राहण्याची सोय करून देणे.

(४) ज्यांना कशीबशी घरे बांधणे शक्य आहे किंवा ज्यांची तशी इच्छा आहे, अशा व्यक्तींना आवश्यक त्या सोई-सवलती उपलब्ध करून देणे.

वरील उपाय आज अनेक राष्ट्रांत योजले जात आहेत. परंतु गलिच्छ वस्ती-निर्मूलनाचा अंतिम उपाय हाती लागला आहे, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. नियोजनाच्या अभावी तर गलिच्छ वस्त्या वाढतातच; परंतु नियोजनपूर्वक अगदी नव्याने उभारलेल्या चंदीगडसारख्या शहरातही गलिच्छ वस्त्या कालांतराने निर्माण झाल्या आहेत. यावरून या समस्येचा परिहार आज तरी संपूर्णपणे झाला आहे, असे म्हणता येत नाही.

गलिच्छ वस्तीची समस्या सामाजिक आरोग्य आणि नीतिमत्ता या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. गलिच्छ वस्तीत गुन्हेगारी बळावते, अनैतिक व अवैध व्यवहारास तिथे आसरा मिळतो असेही सिद्ध झाले आहे. तसेच गलिच्छ वस्तीचे अस्तित्व हे आधुनिक पक्षीय राजकारणात प्रतिपक्षाविरुद्ध प्रचार करण्याचे एक महत्त्वाचे साधन झाले आहे, हेही निर्विवाद आहे.

भारतातील बहुतेक राज्यांत सरकारी गृहनिर्माण मंडळे स्थापन झालेली असून त्यांच्यामार्फत गलिच्छ वस्त्यांतील लोकांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केला जात आहे. केंद्र सरकारही या बाबतीत मदत देत असून त्यामार्फत गलिच्छ वस्त्या सुधारण्याची एक योजनाही जारी केलेली आहे.

## गलिच्छ वस्ती/झोपडपट्टी पुनर्वसनासंबंधी शासनाच्या योजना

निवारा ही मानवाची एक मूलभूत गरज आहे. काळाच्या ओघात गृहनिर्माण हे केवळ निवारा पुरविण्यास मर्यादित नसून रोजगाराची संधी व स्थानिक विकासाची निर्मिती करण्यातील एक मुख्य घटक आहे. घरांची कमतरता दूर करणे हे दारिद्र्यनिर्मूलनातील एक महत्त्वाची बाब आहे. घरांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गृहनिर्माण धोरण सक्रिय केले आहे. गरजूंना परवडणारी घरे पुरविण्यासाठी राज्यशासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांची स्थापना केली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजना व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांची अंमलबजावणी केल्यामुळे नागरी भागातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाला गती प्राप्त झाली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे (एमएमआरडीए), मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) राबविले जात असून त्या अंतर्गत बृहन्मुंबईतील (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर) प्रकल्प बाधित कुटुंबांना घरे बांधून दिली जातात. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी व ग्रामीण क्षेत्रातील दुर्बल घटकांसाठी दर्जेदार घरे पुरविण्याच्या दृष्टीने राज्यशासन 'इंदिरा आवास योजना' व 'राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना' या योजनांची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करीत आहे.

या क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाचे दिनांक २३ जुलै, २००७ रोजी गृहनिर्माण धोरण घोषित केले आहे. या धोरणातील काही महत्त्वाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

- राज्यातील अल्प उत्पन्न गट व आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी घरांची निर्मिती करणे.
- नागरी व ग्रामीण विकास केंद्राच्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देणे, रोजगाराची संधी उपलब्ध करणे, झोपडपट्टीमुक्त शहरे करण्याच्या दृष्टीने झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन वैशिष्ट्यपूर्ण रीतीने करणे, अल्प उत्पन्न घटकातील लोकांसाठी वित्तपुरवठा करणे तसेच बांधकाम व घराची दुरुस्ती-देखभाल सुलभ होण्यासाठी सार्वजनिक व खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे.
- प्रगत आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान या बाबींना प्रोत्साहन देणे. पर्यावरणाच्या दृष्टीने शाश्वत राहतील अशा शहरांचे व उपनगरांची निर्मिती करणे.

ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी खालील प्रमुख निर्णय घेण्यात आले आहेत :

- मुंबई शहर व उपनगर भागात, उपकर भरणाऱ्या व न भरणाऱ्या जुन्या व मोडकळीस आलेल्या, इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी त्यांचे मालक, खाजगी विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था आणि महानगरपालिका तसेच म्हाडामार्फत नागरी पुनर्विकास योजना राबविणे.
- पुनर्विकासासाठी घेण्यात आलेल्या इमारतीमधील भाडेकरूंना किमान २२५ ते ३०० स्क्वेअर फूट इतकी जागा मोफत देणे.
- शहरातील गरीब व गरजू लोकांना भाडेतत्त्वावर तात्पुरता निवारा उपलब्ध करून देण्यासाठी एमएमआरडीए याच्या माध्यमातून महानगर क्षेत्रात पाच लाख घरे बांधणे.
- सदनिकांची खरेदी-विक्री ही सदनिकेच्या चटई क्षेत्राच्या आधारावर व्हावी याकरिता महाराष्ट्र मालकी सदनिका हक्क कायदा, १९६३ मध्ये सुधारणा करणे.

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

राज्यातील रहिवाशांना निवासाची समान संधी पुरविण्याच्या हेतूने, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणची (म्हाडा) स्थापना १९७७ साली करण्यात आली. राज्यात या प्रमुख गृहनिर्माण प्राधिकरणाची उभारणी झाल्याने स्थावर मालमत्तेची मागणी जलदरीत्या वाढत आहे याची जाणीव झाली. झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करून त्या जागेचा विकास पाणीपुरवठा व वीज यांसारख्या आवश्यक सुविधा पुरवून घरे व सदनिका बांधून त्याद्वारे झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यात म्हाडा कारणीभूत आहे. मुंबई व राज्याच्या इतर भागात गृहनिर्माण विकासामध्ये वृद्धी करण्यासाठी म्हाडा हे महत्त्वाचे माध्यम आहे. म्हाडाने स्थापनेपासून मार्च २००९ अखेरपर्यंत एकूण ४,२२,८२४ सदनिका बांधल्या असून त्यापैकी ४,१८८ निवासी सदनिका २००८-०९ या वर्षामध्ये बांधल्या आहेत. सन २००९-१० (ऑक्टोबर २००९ पर्यंत) मध्ये १,२३९ सदनिका बांधल्या असून त्यावर २८९.४४ कोटी रु. इतका खर्च झाला आहे.



म्हाडाने २००३-०४ साली बांधलेल्या सदनिकांची प्रवर्गनिहाय संख्या व त्यावर झालेल्या खर्चाचा तपशील तक्ता क्र. ११.१ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ११.१ : म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिकांचा तपशील**

| वर्ष | प्रवर्ग | | | | | एकूण सदनिका | खर्च (कोटी रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक दुर्बल घटक | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | | |
| २००३-०४ | १,३६१ | ३,८६२ | ९७५ | ६४२ | १,३०१ | ८,१४१ | २०६.१९ |
| २००४-०५ | ९९७ | २,८२४ | ९०३ | १,२७० | ८१६ | ६,८१० | ३०५.४१ |
| २००५-०६ | २८८ | ३,३२५ | ६०१ | ६३४ | ३० | ४,८७८ | २१७.५५ |
| २००६-०७ | ९० | २,६७८ | १२८ | १,११३ | १५ | ४,०२४ | ३२६.५६ |
| २००७-०८ | १,६६८ | २,७२३ | ८८६ | ९४३ | २९ | ६,१९९ | २६६.३५ |
| २००८-०९ | १,५७८ | १,३०९ | ९३२ | ३४२ | २७ | ४,१८८ | ४९०.७६ |
| २००९-१०@ | ५२९ | ४१८ | १६ | १४८ | १२८ | १,२३९ | २८९.४४ |

संदर्भ : म्हाडा, मुंबई. @ ऑक्टोबर २००९ पर्यंत.

म्हाडाने राज्यात विविध गृहनिर्माण मंडळामार्फत एकूण ३,७५,९५७ सदनिका व राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या अंतर्गत १८,२९१ सदनिका बांधल्या असून २८,५७६ जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे पुनर्वसन केले आहे. विविध गृहनिर्माण मंडळाखाली बांधलेल्या सदनिकांचा तपशील तक्ता क्र. ११.२ मध्ये सादर केला आहे.

**तक्ता क्र. ११.२ : विविध गृहनिर्माण मंडळामार्फत म्हाडाने बांधलेल्या सदनिकांचा तपशील**
**(स्थापनेपासून ते मार्च २००९ पर्यंत)**

| मंडळ | औद्योगिक | झोपडपट्टी पुनर्वसन | आर्थिक दुर्बल घटक | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २९,६०० | १९,१८४ | ३६,८२४ | ७१,१६१ | १७,७१४ | १६,२०८ | १५,२२९ | २,०५,१९५ |
| पुणे | १,३७४ | २,६२८ | ५,०२४ | २१,७०६ | ६,४८४ | २,४७५ | ३,१६५ | ४२,८५६ |
| नाशिक | | | १,२४४ | १,६४९ | ८२३ | ११६ | ३८ | ३,८५३ |
| अमरावती | | | ३,०९१ | १,१०१ | २६६ | २०० | २ | ४,६६० |
| कोकण | ३,४७२ | | ३,४०८ | ११,१२९ | ३,९९६ | १,४०२ | १३,७७९ | ३७,१८६ |
| औरंगाबाद | १,१०७ | १,००० | ११,३२१ | १७,६४४ | ३,९४९ | १,११६ | २१६ | ३६,३५३ |
| नागपूर | ३,९३४ | | १०,९१६ | १६,८२५ | ५,०८१ | २,६२४ | ६,४७१ | ४५,८५४ |
| राजीव गांधी प्रकल्प निवारा (विशेष प्रकल्प) | ला. ना. | ला. ना. | ला. ना. | ला. ना. | ला. ना. | ला. ना. | १८,२९१ | १८,२९१ |
| मुंबईतील इमारती दुरुस्ती | ला. ना. | ला. ना. | ला. ना. | २८,४५१ | ला. ना. | ला. ना. | १२५ | २८,५७६ |

ला. ना. : लागू नाही. संदर्भ : म्हाडा, मुंबई.

अलीकडे डिसेंबर २००९ मध्ये म्हाडातर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट यांच्यासाठी परवडण्याजोग्या घरांच्या योजनेखाली एकूण ३,४४९ घरे विक्रीला होती. या योजनेअंतर्गत ५,०२,९४० एवढ्या अर्जांची विक्री झाली होती व त्यापैकी ३,२८,३४९ अर्ज म्हाडाने स्वीकृत केले. घरासाठीच्या या अभूतपूर्व मागणीवरून हे सिद्ध होते की, मंदीच्या काळातही परवडणाऱ्या घरासाठी मुंबईत मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.

## जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान अनेक उपनगर व शहरांचे राहणीमान सुधारण्यासाठी प्रोत्साहित करणारा अर्थपूर्ण कार्यक्रम आहे. भारत सरकारने वाल्मीकी आंबेडकर आवास योजना आणि राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम बंद करून जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान राबविण्याचे ठरविले आहे. राज्यात या अभियानांतर्गत 'शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा' व 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' राज्यात राबविण्यात येत असून या योजनांचे नियंत्रण करण्यासाठी म्हाडाची 'नोडल एजन्सी' म्हणून नेमणूक केली आहे.

१. **शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा :** अनियोजितरीत्या वसलेल्या व मूळ सुविधांशिवाय असलेल्या विकसित होणाऱ्या वसाहतींचे नागरिकीकरण करणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प आणि मूलभूत सुविधा असलेली घरे हे या योजनेचे घटक आहेत. भारत सरकार नागरी पायाभूत सुविधांच्या मोठ्या प्रकल्पासाठी ५० टक्के अर्थसाहाय्य देईल तर प्रत्येकी २५ टक्क्यांचा भार राज्य सरकार व अंमलबजावणी यंत्रणा उचलेल. मूलभूत सुविधा असलेली घरे बांधण्यासाठी भारत सरकारचे ५० टक्के अर्थसाहाय्य, ३० टक्के अनुदान राज्यशासनाकडून, ९ टक्के अंमलबजावणी यंत्रणेकडून आणि उर्वरित ११ टक्के लाभार्थ्यांचे योगदान (राखीव वर्गासाठी १० टक्के) असते. ही योजना महाराष्ट्र राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक व नांदेड या पाच महानगरांमध्ये राबविण्यात येत आहे. भारत सरकारने या शहरांमध्ये ६० प्रकल्पांतर्गत १,८२,८४१ घरांसाठी ६,६८२.११ कोटी रु. मंजूर केले आहेत. मंजूर झालेल्या १,८२,८४१ घरांपैकी १३,६९२ घरे बांधून पूर्ण झाली असून ७४,९६७ घरांच्या बांधणीचे काम प्रगतिपथावर आहे.

२. **एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम :** राज्य सरकारने ही योजना शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा कार्यक्रम राबविण्यात येणारी पाच शहरे वगळून इतर शहरांमधील झोपडपट्टीवासियांसाठी राबविण्याचे ठरविले आहे. ही योजना समूह पद्धतीचा वापर करून राबविण्याची आहे. राज्यशासनाने नोडल एजन्सी म्हणून म्हाडाची नेमणूक केली आहे. या योजनेअंतर्गत भारत सरकारचे ८० टक्के अर्थसाहाय्य, ८ टक्के राज्य सरकारचे अनुदान (राखीव वर्गासाठी १० टक्के) आणि उर्वरित १२ टक्के लाभार्थ्यांचे योगदान (राखीव वर्गासाठी १० टक्के) असते. भारत सरकारने विविध शहरांत ९१,०६५ घरांसाठी १०३ प्रकल्प मंजूर केले आहेत. मंजूर प्रस्तावाची एकूण प्रकल्प किंमत रु. १,८२५.९२ कोटी असून केंद्रशासनाच्या हिश्श्याची रक्कम १,१६०.४१ कोटी रु. व राज्यशासनाच्या हिश्श्याची रक्कम ४३१.७० कोटी रु. आहे तर उर्वरित रक्कम लाभधारकांची व नागरी स्थानिक संस्थांची आहे. मंजूर झालेल्या एकूण ९१.०६५ घरांपैकी ४,३३२ घरांचे काम पूर्ण झाले असून १०,६४१ घरांचे काम प्रगतिपथावर आहे.

❊ **गृहनिर्माण पुनर्वसन :** राज्यात कित्येक दशकांकरिता झोपडपट्ट्या अनेक शहरांचा अविभाज्य भाग बनला आहे. झोपडपट्टीतील रहिवाशांची झोपड्यांमध्ये व निकृष्ट पर्यावरणामध्ये राहण्यास पसंती नसली तरी परिस्थितीनुसार झोपडपट्टीत राहणाऱ्यांना सर्वसाधारण घरे न परवडणारी व त्यांच्या आवाक्याच्या बाहेरची असल्याने त्यापासून ते वंचित राहिले आहेत. राज्य सरकारने झोपडपट्टीतील राहणीमानाचा दर्जा वाढविण्यासाठी अनेक उपयुक्त धोरणे राबविली आहेत व झोपडपट्टीवासियांना त्याच झोपड्यांसाठी मालकी हक्क देणे हे या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. यामुळे आरोग्यात दर्जेदार सुधारणा होऊन त्यामुळे लोकांच्या ढासळलेल्या आरोग्याच्या दर्जाच्या पातळीत वाढ होईल.

❊ **झोपडपट्टी पुनर्वसन योजना :** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात गरिबांना यशस्वीपणे निवारा पुरविला आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत योजलेल्या सुरुवातीपासून (१९९५) ऑक्टोबर २००९ अखेरपर्यंत ५८२ प्रस्ताव पूर्ण करण्यात आले व १,११,४४४ झोपडपट्टीतील कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्यात आले.

❊ **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित :** झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम जलद गतीने होण्याच्या दृष्टीने शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना १९९८ साली करण्यात आली. शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या सुरुवातीपासून ऑक्टोबर २००९ पर्यंत ४०२ कोटी रु. खर्चाच्या ७,६४९ सदनिका असलेल्या ८५ इमारती बांधण्यात आल्या तर ३,०२४ सदनिका असलेल्या २६ इमारतींचे काम प्रगतिपथावर आहे.

**संदर्भ :** महाराष्ट्र आर्थिक पाहणी, २००९-१०; पान १६६ ते १६९.



## मुंबईमधील झोपडपट्ट्यांमध्ये साक्षरतेचे लक्षणीय प्रमाण – एक आश्चर्यकारक बाब ! (२००१)

सर्वसाधारण असा समज असतो की, झोपडपट्ट्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असते. परंतु मुंबईच्या (मुंबई शहर व मुंबई उपनगर एकत्रित) झोपडवासियांनी हा समज साफ खोटा आहे हे सप्रमाण दाखवून दिले आहे. बोला आता तथाकथित उच्च मध्यमवर्गीय व उच्चभ्रू समाजातील लोकांच्या भुवया निश्चितच उंचावल्या जाणार ! कदाचित ते खरेही मानणार नाहीत. परंतु हे त्यांचे गृहीत किती तकलादू आहे हे २००१ सालच्या जनगणनेच्या आधारे सप्रमाण सिद्ध झाले आहे. याची बऱ्याच जणांना कल्पनादेखील नसेल.

महाराष्ट्र शासनाने २००१ साली स्वतंत्रपणे झोपडवासियांची जनगणना केली. परंतु त्यांनी अद्यापही अहवाल प्रसिद्ध केला नाही.

**भारतीय जनगणना अधिकाऱ्यांनी प्रथमच झोपडवासियांच्या परिसराच्या जनगणनेसाठी समावेश व त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे :**

(१) **मुंबईचे सुमारे ४९% लोकांचे झोपडपट्टीत वास्तव्य :** २००१ सालच्या जनगणनेनुसार संपूर्ण मुंबईची एकूण लोकसंख्या ११९ लाख आहे. यांपैकी ५८.२३ लाख लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. याचा अर्थ **मुंबईच्या एकूण लोकसंख्येपैकी ४८.८८% लोक झोपड्यांमध्ये राहतात.** पूर्वी असा अंदाज वर्तविला जात होता की मुंबईत ६०% लोक झोपडपट्टीत राहतात. यापेक्षा ही टक्केवारी कमी आहे.

(२) **झोपडपट्टीत सुशिक्षितांचे चांगले प्रमाण :** झोपडपट्टी संदर्भात सर्वसाधारण लोकांचे बरेच गैरसमज आहेत. येथे अशिक्षित, निरक्षर लोक राहतात. समाजघातक, गुन्हेगारी करणाऱ्या लोकांचे ते आश्रयस्थान आहे. काही बाबतीत ही शक्यता नाकारता येत नाही. तरीही २००१ सालच्या जनगणनेनुसार आढळलेल्या **मुंबईच्या झोपडपट्टीत सुशिक्षितांचे प्रमाण चांगल्यापैकी आहे. मुंबई महानगराच्या आर्थिक घडामोडीत यांचा वाटा लक्षणीय आहे.**

(३) **उच्चवर्गीयांची झोपडवासियांच्या बाबतीत अनास्था :** "मुंबईच्या उच्चवर्गीयांना याची जाणीव असत नाही की, यांच्याकडे काम करणारे घरगडी, मोलकरीण व अन्य लोक झोपडपट्टीत राहतात. एवढेच नव्हे तर त्यांच्या ऑफिसचा व कारखान्याचा बराचसा कर्मचारी वर्ग गलिच्छ वस्त्यांमध्ये राहत असतो. झोपडवासियांना अशा गर्दीच्या अनारोग्य पर्यावरणासह व गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणे भाग पडते" असे स्पष्ट मत माजी महानगरपालिका कमिशनर श्री. तिनईकर यांनी व्यक्त केले आहे.

(४) **भारतामधील अन्य महानगरांमधील झोपडवासियांची संख्या :** आपण वर उल्लेख केला आहे की, मुंबई महानगरात झोपडपट्ट्यांमध्ये ५८.२३ लाख लोक राहतात. या खालोखाल दिल्ली महानगरात १८ लाख झोपडपट्टीत वास्तव्य करतात. यानंतर कोलकता महानगरात १४ लाख व चेन्नई महानगरात ७ लाख लोक झोपड्यांमधून राहतात. यावरून आपणास लक्षात येईल की, मुंबईच्या झोपडपट्टीचा प्रश्न किती गंभीर स्वरूपाचा आहे.

(५) **मुंबई महानगरामधील झोपडपट्ट्यांचे स्वरूप :** भारतीय जनगणनेने २००१ साली मुंबईच्या प्रत्येक वॉर्डाची या दृष्टीने जनगणना केली. त्याचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे :

(अ) **सर्वांत जास्त झोपडवासियांचे केंद्रीकरण कुर्ला-साकी नाका परिसरात :** मुंबई महानगरात सर्वांत जास्त झोपडवासियांचे केंद्रीकरण कुर्ला-साकी नाका परिसरात झालेले आहे. ' एल ' वॉर्डमधील कुर्ला-साकी नाका भागात ८.६६ लाख लोक राहतात.

(ब) **'एम/ई' वॉर्डात ८०% पेक्षा जास्त लोक झोपडवासी :** मुंबईच्या 'एम' व 'ई' वॉर्डात ८.०९ लाख लोक गलिच्छ वस्त्यांमध्ये राहतात. यामध्ये चेंबूर, गोवंडी, मानखुर्द आणि देवनारचा समावेश होतो. या परिसरातील एकूण लोकसंख्येपैकी ८०% लोक झोपड्यांमध्ये वास्तव्य करतात. यावरून असे लक्षात येते की, 'एम/ई' वॉर्डात झोपडपट्टीचा प्रश्न किती गंभीर स्वरूपाचा आहे.

(क) **दक्षिण मुंबईमध्ये झोपडवासियांचे ११% प्रमाण :** कुर्ला-साकी नाका आणि चेंबूर, गोवंडी, मानखुर्द व देवनारच्या मानाने दक्षिण मुंबईमधील झोपडवासियांचा प्रश्न एवढा गंभीर नाही. येथील 'डी' वॉर्डात मध्य मुंबई, कामाठीपुरा, गिरगाव व मलबार हिल परिसरात झोपडपट्ट्या आहेत. येथील एकूण लोकसंख्येपैकी ११% लोक गलिच्छ वस्त्यांमध्ये राहतात.

(ड) **'ई' वॉर्डामध्ये झोपडपट्टीवासियांचे ११% प्रमाण :** मुंबईच्या 'ई' वॉर्डातील भायखळा, माझगाव, आग्रीपाडा, ताडदेव आणि मुंबईच्या जुन्या भागात तेथील परिसरातील ११% लोक झोपडपट्टीत राहतात.

## मुंबईच्या झोपडपट्ट्यांमधील साक्षरतेचे ८३.१३ प्रमाण

(अ) मुंबईमध्ये 'एल' वॉर्डमधील कुर्ला-साकी नाका; 'एम/ई' वॉर्डमधील चेंबूर, गोवंडी, मानखुर्द व देवनार; 'डी' वॉर्डमधील मध्य मुंबई, कामाठीपुरा, गिरगाव आणि मलबार हिल आणि 'ई' वॉर्डमधील भायखळा, माझगाव, आग्रीपाडा, ताडदेव आणि जुन्या मुंबईच्या झोपडीमधील साक्षरतेचे प्रमाण पाहिल्यावर सर्वसामान्य मुंबईकरांना आश्चर्याचा धक्का बसेल तर महाराष्ट्राच्या अन्य भागातील लोकांना अचंबा वाटल्यास त्यात नवल ते काय !

सर्वसाधारण जनतेला असे वाटत असेल की, मुंबईच्या झोपड्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण १५ ते २०% असेल. फार तर २० ते ३०% असेल. परंतु नाही; **मुंबईच्या झोपडपट्ट्यांमधील साक्षरतेचे प्रमाण आहे ८३.१३%. खरेच धक्का देणारी आकडेवारी आहे आणि हा अहवाल आहे २००१ सालच्या भारतीय जनगणनेचा !**

**(ब) मुंबईमध्ये मुस्लीम वस्ती असणाऱ्या परिसरात साक्षरतेचे फक्त ५५% प्रमाण :** मुंबईमध्ये मुस्लीम वस्ती असणाऱ्या मस्जिद, पी-डी-मेलो रोड, महमद अली रोड व उमरवाडी परिसरात साक्षरतेचे फक्त ५५% प्रमाण आहे. महाराष्ट्रात सर्वांत कमी साक्षरतेचे प्रमाण नंदुरबार जिल्ह्यात ५६% आहे. याहीपेक्षा मुंबईच्या मुस्लीम वस्ती असणाऱ्या प्रदेशात यादीपेक्षा कमी म्हणजे साक्षरतेचे प्रमाण ५५% आहे. याचा विचार महाराष्ट्र शासन, सामाजिक विचारवंत, लोकसंख्याशास्त्रज्ञ, भूगोलकार इत्यादींनी करण्याची गरज आहे. अशा वस्त्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे.

## मुंबईच्या झोपडपट्टीमध्ये गरिबी, स्थलांतर व लिंग-गुणोत्तरांचे प्रत्यक्ष संबंध

**(१) मुंबईच्या झोपडपट्ट्यांमध्ये लिंग-गुणोत्तर ७६९ : १००० :** २००१ सालच्या जनगणनेनुसार मुंबईमधील लिंग-गुणोत्तर ७७४ : १००० आहे तर मुंबईच्या झोपडपट्ट्यांमध्ये लिंग-गुणोत्तर प्रमाण ७६९ : १००० आहे.

**(२) गोरेगाव झोपडपट्टीमध्ये लिंग-गुणोत्तर ५५७ : १००० :** मुंबई उपनगराच्या गोरेगाव झोपडपट्टीमध्ये लिंग-गुणोत्तराचे प्रमाण सर्वांत कमी म्हणजे ५५७ : १००० आहे. याचे प्रमुख कारण गोरेगाव झोपडपट्टीमध्ये उत्तर भारतीय लोकांचे प्रमाण जास्त आहे. बरेचसे उत्तर भारतीय पुरुषच मुंबईला आलेले आहेत. त्यांच्या बायका मुलखात आहेत.

**(३) मुंबई महानगरामधील लिंग-गुणोत्तराचे घटते प्रमाण :** मुंबई शहर जिल्ह्यात १९९१ साली लिंग-गुणोत्तर ७९१ होते. ते २००१ साली ७७४ पर्यंत घटले तर मुंबई उपनगरामध्ये १९९१ साली लिंग-गुणोत्तर प्रमाण ८३१ होते. ते २००१ साली ८२६ पर्यंत खाली आहे.

**(४) महाराष्ट्रातदेखील लिंग-गुणोत्तरात घट :** महाराष्ट्राचे सरासरी लिंग-गुणोत्तर १९९१ साली ९३४ होते. ते २००१ साली ९२२ पर्यंत खाली आले आहे.

**(५) गडचिरोली जिल्ह्यात लिंग-गुणोत्तरात बरीच घट :** महाराष्ट्रात पूर्वेकडे असणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात १९९१ साली लिंग-गुणोत्तर ९५२ होते. ते २००१ साली ९१० पर्यंत खाली आले.

**(६) चंद्रपूर जिल्ह्यात लिंग-गुणोत्तरात वाढ :** विदर्भात गडचिरोली जिल्ह्याच्या पश्चिमेला असणाऱ्या जिल्ह्यात १९९१ साली लिंग-गुणोत्तर ९०० होते. ते २००१ साली ९५९ पर्यंत वाढले हे विशेष !

(संदर्भ : *Times of India, May 11, 2002 News.*)

## मुंबईची धारावी झोपडपट्टी

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :** अठराव्या शतकामध्ये धारावी एक बेट होते. फेब्रुवारी १७३९ मध्ये चिमाजी आप्पांनी वसईवर हल्ला केला. यापूर्वी त्यांनी धारावीचा ताबा घेतला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सध्याचे धारावी क्षेत्र प्रामुख्याने खाजण दलदलीचे क्षेत्र होते. तेव्हा तेथे कोळी लोकांची वसाहत होती. जेव्हा दलदली क्षेत्र गाळाने भरण्यात आले तेव्हा मत्स्योद्योग संपुष्टात आला. धारावीजवळील सायन येथील धरणामुळे स्वतंत्र बेट जोडण्यात येऊन तो एक निमुळता भाग बनला. अशा रीतीने मुंबई बेटाच्या रूपांतरणाचा प्रारंभ झाला. या प्रक्रियेमध्ये धारावीच्या मत्स्य शहराला त्याच्या परंपरागत उपजीविकेपासून वंचित राहावे लागले. परंतु नवीन तयार झालेल्या दलदलीने नवीन समाजाला प्रवेशासाठी जागा प्राप्त करून दिली.

गुजरातमधून आलेल्या स्थलांतरितांनी कुंभारांची वसाहत स्थापन केली. महाराष्ट्रीयन कातडी कमविणारे चर्मकार धारावीमध्ये स्थलांतरित झाले आणि त्यांनी कातडी कमविणारा उद्योगधंदा स्थापित केला. उत्तर प्रदेशामधील कशिदाकाम करणाऱ्यासारख्या काही कलाकारांनी येऊन तयार कापडाचा व्यापार सुरू केला.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये तमिळनाडूमधून तमिळ, मुस्लीम, आदिद्रविडर आणि नादर स्थलांतरित म्हणून येऊ लागले. १९२० च्या दरम्यान कातडी कमविणाऱ्या प्रदेशाजवळ बऱ्याच लोकांचा ओघ वाढला. १९२४ साली मुंबईमधील पहिली तमिळ शाळा आणि धारावीमधील पहिली शाळा बांधण्यात आली. पुढील चार दशकापर्यंत धारावीमध्ये फक्त एकच शाळा होती. १९३० साली धारावीमधून माहीम रेल्वे स्टेशनपर्यंत जाणारा एकमेव रस्ता बांधण्यात आला.



१९६० साली प्रसिद्ध समाजसेवक आणि काँग्रेसचे नेते श्री. एम. व्ही. दोरायस्वामी यांच्या प्रेरणेने हजारो झोपडवासियांचे जीवनमान उंचावण्यासाठी धारावी सहकारी गृहनिर्माण सोसायटीची स्थापना करण्यात आली. धारावी सहकारी गृहनिर्माण सोसायटीने ३३८ सदनिका आणि ९७ दुकाने बांधली. याचे नामकरण 'डॉ. बालिगा नगर' असे करण्यात आले.

**रहिवासी :** धारावीमधील बहुसंख्य रहिवासी 'पराईयार' जातीचे विशेषतः तमिळचे आदिद्रविडर आहेत. इतर जाती आणि जमातींच्या लोकांचेही वास्तव्य आहे. अल्पसंख्याकांमध्ये ख्रिश्चन, मुस्लीम आणि बौद्धवासी आहेत. धारावीचे (Dharavi) पोर्तुगीज स्पेलिंग Daravi आणि ब्रिटिश स्पेलिंग (Darravy/Dorrovy) आहे.

**धारावीचे भौगोलिक स्थान :** मुंबईमध्ये मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे दरम्यानच्या भागात वसलेले आहे. मुंबईच्या सायन, बांद्रा, कुर्ला आणि कलिना उपनगरादरम्यान असून ती एक मोठी झोपडपट्टी आणि एक प्रशासकीय वॉर्ड आहे. धारावीच्या पश्चिमेला माहीम आणि बांद्रा, उत्तरेला मिठी नदी आहे. पुढे ती पश्चिमेकडे मिठी खाडीमधून अरबी समुद्राला मिळते. दक्षिण आणि पूर्वेला सायन व माटुंगा आहे. धारावीचे स्थान आणि सांडपाण्याची अत्यंत साधारण व्यवस्था यामुळे मान्सून काळात विशेषतः पुराला संवेदनशील आहे.

धारावीच्या झोपडपट्टीचे साधारण क्षेत्र सुमारे १७५ हेक्टर (०.६७ चौ. मैल/१.७ चौ.कि.मी.) आहे.

नॅशनल सॅम्पल सर्व्हे संघटनेने (National Sample Survey Organization, NSSO) धारावी झोपडपट्टीचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी असे निवेदन केले की, भारतामधील एक मोठी झोपडपट्टी आहे.

मुंबईमधील एकूण झोपडपट्टीमधील लोकसंख्या २००१ साली ५८ लाख होती. ती मार्च २०११ साली ७० लाख लोकसंख्या ओलांडली.

२०११ साली दिल्ली (३१.६३ लाख), कर्नाटक (३६.३१ लाख), गुजरात (४६.६२ लाख), मध्य प्रदेश (६३.९३ लाख), उत्तर प्रदेश (१.०८ कोटी) आणि पश्चिम बंगालमध्ये (८५.४६ लाख) झोपडवासियांची लोकसंख्या आहे.

भारतामध्ये २००१ साली झोपडवासियांची लोकसंख्या ७.५२ कोटी होती, ती २०११ साली ९.३ कोटी झाली.

**अर्थव्यवस्था :** धारावीमध्ये परंपरागत व्यवसाय मातीची भांडी आणि कापड उद्योगधंद्याव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात मुंबईच्या इतर भागामधून आणलेल्या कचऱ्यावर पुनर्वापर प्रक्रिया केली जाते. या परिसरात ५,००० व्यावसायिक आणि एक खोलीमधील १५,००० फॅक्टरीज आहेत.

**व्यापार :** धारावी झोपडपट्टीमधील वस्तूची जगभर निर्यात होते. एकूण वार्षिक उलाढाल (यापैकी बरीचशी अनधिकृत) सुमारे ५०० दशलक्ष डॉलर्स ते ६५० दशलक्ष डॉलर्स दरम्यान चालते.

**पुनर्विकास योजना :** धारावी झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी १९९७ पासून हाँगकाँगमधील पूर्वीच्या ताई-हँग (Tai Hang) झोपडपट्टीसारख्या अनेक योजना आखलेल्या आहेत.

२००४ साली पुनर्विकासाचा खर्च ५,००० कोटी (०.०१ अब्ज डॉलर्स) अंदाजे काढलेला होता. धारावी विकासासाठी जागतिक स्तरावर निविदा आहेत की, ज्यामध्ये लेहमन ब्रदर्स, दुबईची लिमिटलेस आणि सिंगापूरची कॅपिटललँड लि. सारख्या नामवंत कंपन्या आहेत. २०१० साली धारावी पुनर्विकास योजनेचा अंदाजित खर्च रु. १५,००० कोटी (०.०४ अब्ज डॉलर्स) वर्तविण्यात आला आहे.

धारावी क्षेत्रासाठी प्रस्तावित सर्वांत अलीकडची नागरी पुनर्विकास योजना अमेरिकन प्रशिक्षित वास्तुशिल्पकार मुकेश मेहता यांनी व्यवस्थापंकीय केलेली आहे. यानुसार गृहनिर्माण शाळा, बागा आणि रस्त्यासाठी २,८००,००० चौ.मी. क्षेत्र गृहीत धरले असून ५७,००० कुटुंबे निवास करू शकतील. याचबरोबर ३,७०,००० चौ.मी. जागा निवास आणि व्यापारीदृष्ट्या विकली जाईल. स्थानिक स्तरावर या योजनेला प्रखर विरोध आहे. कारण तेथील बऱ्याचशा रहिवाशांना प्रत्येकी फक्त २२५ चौ. फूट (२०.९ चौ.मी.) जागा उपलब्ध होणार आहे. याशिवाय २००० सालापूर्वी वास्तव्य करणारी कुटुंबे घरासाठी प्राप्त असतील तसेच ज्याचा अनधिकृत छोटा व्यवसाय आहे त्यांचा पुनर्विकास होणार नाही. शासनाने असेही निवेदन केले आहे की, जे उद्योगापासून प्रदूषण होत नाही अशा अधिकृत उद्योगाचेच पुनर्वसन केले जाईल.

धारावी झोपडपट्टीच्या अनेक समस्या आहेत. परंतु त्या सोडविण्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय इच्छाशक्ती आणि मानसिकतेची खरी गरज आहे.

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान

गौतमबुद्धांपासून गाडगेबाबांपर्यंत किंवा महात्मा जोतीराव फुलेंपासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत पाहिले की समाज विकासासाठी काम करणाऱ्या या माणसांना समाजाच्या जाचातून जावे लागले. चांगल्या कामाची आधी उपेक्षा करावी, नंतर विरोध करावा आणि शेवटी स्वीकार करावा अशी समाजाची रीत असते.

**स्वच्छता म्हणजे परमेश्वर :** स्वच्छता म्हणजे प्रसन्नता, स्वच्छता म्हणजे पवित्रता, स्वच्छता म्हणजे समाधान, स्वच्छता म्हणजे आनंद, स्वच्छता म्हणजे प्रगती, स्वच्छता म्हणजे स्वावलंबन, स्वच्छता म्हणजे सर्वोद्धार, स्वच्छता म्हणजे 'स्व' कडून 'पर' कडे जाणारा मार्ग. स्वच्छता म्हणजे प्रदूषणापासून मुक्तता. स्वच्छता म्हणजे पर्यावरणास पर्याय. स्वच्छता म्हणजे आरोग्य. स्वच्छता म्हणजे स्वस्थता आणि स्वच्छता म्हणजे सर्वोदय. या विचारसूत्राचा कृतिशील सुंदर आविष्कार म्हणजे गाडगेबाबांचा सफाई यज्ञ !

**स्वच्छता : समाजोद्धाराचा खरा मार्ग :** 'स्वच्छता' हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. अन्न, हवा आणि पाणी शुद्ध स्वरूपात मिळणे हा उत्तम जीवनाचा एक अपरिहार्य भाग आहे. अस्वच्छतेमुळे अन्न, हवा आणि पाणी दूषित होते. त्यामुळे अनेक प्रकारच्या रोगांना निमंत्रण मिळते. आजारपण वाढते. आजारपणाची कैद माणसांना असहृय होते. या कैदेतून सुटका करण्यासाठी पैसा-अडका कमी पडला तर थेट मृत्यूशी भेट होते. जगणे संपते. उरते दुःख, गाडगेबाबांनी मानव जीवनातील हे दुःख ओळखले. दीर्घायुष्यावरील रामबाण उपाय म्हणून बाबांनी लोकांना 'स्वच्छतेची' देणगी दिली. स्वोद्धारापासून लोकोद्धार करण्याचे दार उघडले. मानव जीवनात स्वच्छतेचा 'निर्मळ झरा' निर्माण केला. निर्मळतेच्या मंत्राने लोकांचे मन परिवर्तन केले. सर्वांच्या हृदयाची दारे उघडून त्यात निर्मळतेचे वारे सोडून दिले.

**झाडू – स्वच्छतेचा नंदादीप :** एका अक्षरशून्य माणसाच्या हातातील 'झाडू' हजारो माणसांच्या मनात 'स्वच्छतेचा नंदादीप' तेवत ठेवू शकतो ही शब्दावली गाडगेबाबांनाच शोभून दिसते. ही बिरुदावली बाबांच्या बाबतीतच खरी वाटते. लोकसेवेसाठी आपल्या हाती 'स्वच्छतेचा टॉर्च' घेऊन पुढे-पुढेच जाणाऱ्या गाडगेबाबांनी लोकमनात स्वच्छतेचा अंगार चेतविला.

**स्वच्छ गाव – श्रमसंस्कृतीचा सुवर्णकळस :** गाडगेबाबांनी हाती खराटा घेऊन सार्वजनिक स्वच्छता केली म्हणजे श्रमसंस्कृतीचे उदात्तीकरण केले. स्वच्छतेला परमेश्वर म्हणा किंवा परमेश्वराला स्वच्छता म्हणा, अशा या प्रमेयात अडकून न पडता स्वच्छता करण्याच्या कामालाच बाबांनी परमेश्वराची सेवा मानली. म्हणून गाडगेबाबांच्या हातातील खराटा हे श्रमसंस्कृतीवर साचलेली धूळ नष्ट करण्याचे साधन आहे.

बाबांनी महारोग्यांची केलेली शारीरिक स्वच्छता हा तर श्रमसंस्कृतीचा एक वस्तुपाठच आहे. गाडगेबाबांनी आपल्या कृतीमधून समाजाला श्रमसंस्कृतीचे महत्त्व पटवून दिले.

**स्वच्छता – श्रमदानाच्या संस्काराचा आविष्कार :** गाडगेबाबांनी आपल्या महाराष्ट्रात स्वच्छतेचे आंदोलनच निर्माण केले. त्यामुळे खेडोपाडी 'स्वच्छतेचे वारे' खेळू लागले. लोकमत जागे झाले. लोकांना सज्ञानी करणारा, लोकांना नम्रता शिकविणारा, लोकांना आरोग्यसंपन्न बनविणारा, लोकांच्या मनात चैतन्य फुलविणारा, लोकांची प्रगती साधणारा आणि लोकमन सदैव प्रफुल्लित ठेवणारा बाबांचा 'खराटा' होता. बाबांनी या स्वच्छता आंदोलनाला श्रमदानाच्या संस्काराचे स्वरूप प्राप्त करून दिले.

**स्वच्छता – एक जीवनधर्म :** बाबांचा 'खराटा' विषमतेकडून समतेकडे, विसंवादाकडून संवादाकडे, जडतेकडून चैतन्याकडे, विघातकाकडून विधायकाकडे, उदासीनतेकडून उत्साहाकडे, विफलतेकडून सफलतेकडे, विद्वेषाकडून विनयाकडे, अचेतनाकडून सचेतनाकडे, विनाशाकडून विकासाकडे, नैराश्याकडून आनंदाकडे आणि द्वैताकडून अद्वैताकडे घेऊन जाणारे एक सबल साधन होते.

**स्वच्छतेच्या चंदनाचा गंध :** गाडगेबाबांचा 'खराटा' हा केवळ रस्ते स्वच्छ करणारा खराटा नव्हता. तो माणसांची मने स्वच्छ करणारा खराटा होता. बाबांचा खराटा बाहृय स्वच्छतेकडून आंतरस्वच्छतेकडे नेणारा खराटा होता. बाबांचे हात व पायही चंदनाचे होते.

**खराटा धर्म आचार धर्म ठरला :** गाडगेबाबांनी दीन-दुःखी, दलित-वंचित आणि शोषित माणसे पाहिली. आकाशात सोडलेल्या बिनदोरीच्या पतंगासारखी, समुद्रात वाऱ्यावर सोडलेल्या होडीसारखी ही माणसे पाहून बाबांचे हृदय मेणबत्तीसारखे पाघळून जात असे. 'तळागाळातील माणसांना कोणीच वाली नाही' हे पाहून बाबा दुःखाने घायाळ होत असत. म्हणून तळागाळातील माणसे बाबांनी आपल्या तळाहातावर घेऊन फुलासारखी सांभाळली.



**स्वच्छता – सुखी जीवनाची गुरुकिल्ली :** घरात, दारात आणि गावात स्वच्छतेची नितांत गरज असते. स्वच्छता ही आपल्या सुखी जीवनाची गुरुकिल्ली आहे. स्वच्छतेशिवाय घरदार आणि गाव कोंडवाड्यासारखेच होईल. कोंडवाडा म्हणजे अनेक दिवसांची मुलाखाची घाण. जिथे घाण तिथे रोगराई, जिथे रोगराई तिथे मृत्यूला निमंत्रण. हे ओळखूनच गाडगेबाबांनी स्वच्छतेला शिरोधार्य मानले होते.

**स्वच्छता हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे :** गाडगेबाबांनी 'स्वच्छता' हा आपल्या जीवनाचा मानबिंदू मानला होता. विशेषतः 'सार्वजनिक स्वच्छता' हा आपल्या जीवनाचा केंद्रबिंदू ठरविला होता. 'स्वच्छता हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या विचाराने गाडगेबाबांनी स्वच्छतेची मोहीम हाती घेतली होती.

**सामाजिक स्वच्छतेचे प्रतीक :** गाडगेबाबांच्या अंगावरील चिंध्यांचा अंगरखा हे गरिबीचे प्रतीक आहे. हातातील खराटा हे सामाजिक स्वच्छतेचे प्रतीक आहे. गाडगे हे जीवनाच्या क्षणभंगुरतेचे प्रतीक आहे. बांगडी आणि कवडी हे फाटक्या संसाराचे प्रतीक आहे. गाडगेबाबांची काठी ही समाजाच्या दंभावर, ढोंगरावर, कर्मकांडावर, अन्यायावर, अहंकारावर, भ्रष्टाचारावर, दुर्गुणावर, भोंदूगिरीवर, व्यसनाधीनतेवर, अंधश्रद्धेवर, हिंसाचारावर, अज्ञानावर, दैववादावर आणि दुराचारावर कठोर प्रहार करणारी काठी आहे. स्वच्छता, आरोग्य, ज्ञान, संपत्ती, त्याग, सेवा, काटकसर, साधेपणा आणि असंग्रह वृत्तीची आठवण करून देणारा बाबांचा खराटा म्हणजे लोकजीवनात आनंदाचे अंगण निर्माण करणारा खराटा आहे. असे हे गाडगेबाबा म्हणजे गोरगरिबांच्या सुखी आणि संपन्न जीवनासाठी अहोरात्र राबविणारा चिंध्या पांघरलेला साक्षात 'पांडुरंग'च म्हटला पाहिजे.

माणसांच्या चालण्या-बसण्याची जागा झाडणारे गाडगेबाबा हे सामाजिक स्वच्छतेचे एक चालते-बोलते विद्यापीठच होते.

**लोकमनात स्वच्छतेच्या घंटेचा गजर :** गाडगेबाबांनी समाजातील दुःख, दैन्य, आर्तता, व्याकुळता, घायाळता आणि अस्वच्छता पाहिली. बाबांनी दयार्द्र अंतःकरणाने गरिबांच्या दुःखमय जीवनात सुखाची दिवाळी करण्यासाठी बाबांनी खराट्याचा धर्म स्वीकारला. माणसांच्या बाहृय शुद्धीबरोबरच आत्मशुद्धीची किती गरज आहे हे सक्रियपणे सांगणारा पहिला महापुरुष म्हणजे गाडगेबाबा होय.

**खराट्याचे पसायदान :** गाडगेबाबा आयुष्यभर माणुसकीच्या आराधनेत रमले. आपल्या त्यागाने, प्रेमाने आणि सेवेने त्यांनी समाजाची दुखणी सुखद केली. समाजाच्या अंगणापर्यंत 'खराटा' नेऊन भिडविला. खराट्याने अंधश्रद्धेचा अंधार नष्ट केला. समाजाला स्वच्छतेच्या सूर्याचे दर्शन घडविले. श्रमदानाचा नगारा वाजवून जनमनात श्रमप्रतिष्ठेचे बीजारोपण केले. आरोग्याचा संदेश घेऊन समाजात व्यसनमुक्तीचा गजर केला. समाजातील विषमता, पाखंडता, कर्मकांडता, मूढता नष्ट केली. समता, प्रेम, बंधुभाव आणि न्याय निर्माण केला. सदाचार, सौजन्य आणि सामंजस्याची शिकवण देणारा असा हा बाबांचा 'खराटा' सार्वजनिक स्वच्छतेचा खराखुरा मानदंड होता. आज कधी नव्हती एवढी 'स्वच्छ माणसांची' समाजाला नितांत गरज आहे. लोकजीवनात 'स्वच्छ हातांची' संख्या वाढावी म्हणून बाबांनी आपल्या हाती खराटा घेतला. समाजात सज्जनांचे संरक्षण साधावे आणि दुर्जनांचे निर्दालन करावे हेच बाबांच्या 'खराट्याचे पसायदान' होते.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान :** महाराष्ट्र शासन संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान प्रामुख्याने ग्रामीण भागात शौचालयाचा उपयोग करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राबविली जात आहे. या अभियानांतर्गत २०००-०१ ते २००७-०८ सालापर्यंत ८,४०० ग्रामपंचायतींना पारितोषिके देण्यात आलेली आहेत. आतापर्यंत यासाठी २६० कोटी खर्च करण्यात आलेले आहेत.

हागणदारीमुक्त पंचायत समिती आणि हागणदारी मुक्त जिल्हा परिषदांतर्गत अनुक्रमे प्रथम पारितोषिके पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेला दिली जातात.

संदर्भ : स्वच्छतासंत गाडगेबाबा, प्रा. रा. तु. भगत

# गलिच्छ वस्त्या/झोपडपट्टी व त्यांचे प्रश्न

✲ **गलिच्छ वस्ती/झोपडपट्ट्या :**
- गलिच्छ वस्ती/झोपडपट्टीची व्याख्या
- गलिच्छ वस्त्यांचे स्वरूप
- कारणे व प्रश्न
- निर्मूलनाच्या उपाययोजना.

✲ **गलिच्छ वस्ती/झोपडपट्टी पुनर्वसनासंबंधी शासनाच्या योजना :**
- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)
- जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान
  (१) शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा
  (२) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम
  ✲ गृहनिर्माण पुनर्वसन ✲ झोपडपट्टी पुनर्वसन योजना ✲ शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित.

✲ **मुंबईमधील झोपडपट्ट्यांमध्ये साक्षरतेचे लक्षणीय प्रमाण - एक आश्चर्यकारक बाब ! (२००१)**

✲ **मुंबईच्या झोपडपट्ट्यांमधील साक्षरतेचे ८३.१३ प्रमाण**

✲ **मुंबईच्या झोपडपट्टीमध्ये गरिबी, स्थलांतर व लिंग-गुणोत्तराचे प्रत्यक्ष संबंध**

✲ **मुंबईची धारावी झोपडपट्टी**
- ऐतिहासिक पार्श्वभूमी
- भौगोलिक स्थान
- अर्थव्यवस्था
- व्यापार
- पुनर्विकास योजना

✲ **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान**

## बहुपर्यायी प्रश्न

(१) . . . . . . . म्हणजे नागरी जीवनाला झालेला कॅन्सर आहे.
(अ) झोपडपट्ट्या (ब) ग्रामीण वस्त्या (क) श्रीमंत वस्त्या (ड) मध्यमवर्गीय वस्त्या

(२) महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी . . . . . . . या आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात रोजगार मिळण्याच्या आशेने पुण्या-मुंबईसारख्या शहराकडे गेले.
(अ) पूर (ब) अवर्षण (क) अति उन्हाळा (ड) अति वृष्टी

(३) झोपडपट्ट्यांना नागरी समाजरूपी शरीरातील रोग समजावा की नगरवाढीतील एक अपरिहार्य टप्पा समजावा याबद्दल शास्त्रज्ञांमध्ये . . . . . . . आहे.
(अ) एकमत (ब) बहुमत (क) तटस्थ मत (ड) दुमत

### उत्तरे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अ | (२) | ब | (३) | ड |



(४) एखाद्या विशिष्ट कार्याकरिता राखून ठेवलेल्या आणि काही काळ रिकाम्या झालेल्या जागेतही विशेषत: बाहेरून कामाच्या शोधार्थ असलेल्या आणि खालच्या दर्जाची कामे करीत असलेल्या लोकांची वस्ती बहुधा . . . . . . . असते.
(अ) मध्यमवर्गीय वसाहत (ब) कमी उत्पन्नाची वसाहत
(क) झोपडपट्टी (ड) श्रीमंत वसाहत

(५) झोपडपट्टीचे अस्तित्व हे आधुनिक पक्षीय . . . . . . . मध्ये प्रतिपक्षाविरुद्ध प्रचार करण्याचे एक महत्त्वाचे साधन झालेले आहे.
(अ) राजकारण (ब) अर्थकारण (क) नीतिमत्ताकारण (ड) ऐतिहासिक कारण

(६) शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे नागरी भागातील . . . . . . . पुनर्वसनाला गती प्राप्त झालेली आहे.
(अ) मध्यमवर्गीय वस्ती (ब) झोपडपट्ट्या (क) अल्प उत्पन्न गट वस्ती (ड) उच्चभ्रू वस्ती

(७) २००१ सालच्या जनगणनेनुसार मुंबईमधील . . . . . . . लोकांचे झोपडपट्टीत वास्तव्य आहे.
(अ) २५% (ब) २०% (क) १५% (ड) ४९%

(८) २००१ सालच्या जनगणनेनुसार मुंबई झोपडपट्टीमध्ये साक्षरतेचे प्रमाण . . . . . . आहे.
(अ) ८३% (ब) ६०% (क) ५५% (ड) ४०%

(९) २००१ सालच्या जनगणनेनुसार मुंबई झोपडपट्टीमध्ये लिंग-गुणोत्तर . . . . . . आहे.
(अ) ९१५ (ब) ८८३ (क) ७६९ (ड) ९४०

### उत्तरे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (४) | क | (५) | अ | (६) | ब |
| (७) | ड | (८) | अ | (९) | क |

✲✲✲

# संदर्भ ग्रंथ


- **प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी;** 'मराठी विश्वकोश खंड'
- महाराष्ट्र राज्य वन विभाग; **महाराष्ट्रातील अभयारण्ये - माहिती पुस्तिका.**
- सवदी ए. बी.; **'महाराष्ट्राचा ॲटलास' (प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक ॲटलास) :** प्रकाशनाच्या मार्गावर.
- **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी :** २००९-१०.
- **महाराष्ट्र संक्षिप्त सांख्यिकी : २००७**
- **वनविभागवार माहितीपुस्तिका :** प्रसिद्धी व माहिती अधिकारी, वने, महाराष्ट्र राज्य, पुणे.
- विविध वर्तमानातील व मासिकातील माहिती.
- माहिती व जनसंपर्क कार्यालयाने काढलेली महाराष्ट्रावरील पुस्तिका.
- भटकंती / गृहशोभिका / चारचौघी / साप्ताहिक सकाळ / टाईम्स ऑफ इंडिया / महाराष्ट्र टाइम्स.
- प्रा. रा. तु. भगत; **'स्वच्छतासंत गाडगेबाबा'.**
- **Maharashtra :** Its Land and People – *Iravati Karve.*
- **Maharashtra :** Marg Publications, Mumbai.
- **Techno Economic Survey of Maharashtra.**
- **Monsoon :** *P. Das.*
- **Minerals of India :** *M. N. Wadia.*
- **Maharashtra in Maps :** *K. R. Dixit.*
- **India :** Year Book – 2010.
- **Climate of Maharashtra :** India Meteorological Department.
- **Population of India - 2001 :** *Ashish Bose.*
- **Census Paper-1 of 2001 :** PROVISIONAL POPULATION TOTALS – The Register General and Census Commissioner in Series CENUS OF INDIA 2001 – Series - 1
- **Census Paper-1 of 2001 :** PROVISIONAL POPULATION TOTALS – The Register General and Census Commissioner in Series CENUS OF INDIA 2011 – Series - 1;
- **The Land Records Department :** Maharashtra State.




# संदर्भ ग्रंथ


क ॲटलास) : प्रकाशनाच्या

राज्य, पुणे.

इंडिया / महाराष्ट्र टाइम्स.

The Register General
I

The Register General
I;